मानवी जीवनाच्या सर्वांगीण उत्कर्षाचा मार्ग दाखविणारा ग्रंथ

# सहस्रनेत्र

विष्णुसहस्त्रनाम स्तोत्राचे नवे आकलन



डॉ. श्रीनिवास कशाळीकर

# सहस्रनेत्र

**तृतीय आवृत्ती : जानेवारी, २००४**

**डॉ. श्रीनिवास जनार्दन कशाळीकर**
१०१, ए/२४, हॅप्पी व्हॅली,
टिकुजिनीवाडी रोड,
ठाणे (पश्चिम)- ४०००६१०
मोबाईल : ९८६९३२६०८९
फोन : २५८९८९३४

**प्रकाशक :**

**सौ. रेखा सुहास म्हेत्रे**
२/३, विजय एनक्लेव्ह,
वाघबीळ नाका,, घोडबंदर रोड,
ठाणे (प)- ४००६०७.
फोन : २५९७१८३४
मोबाईल : ९८२०८९८८७०

ईशा प्रकाशन

श्री लक्ष्मीनारायणाने करवून घेतलेली ही सेवा,

त्याच्या सगुण मूर्ती,

जनताजनार्दन

आणि

माझे पूज्य आई-वडिल

वै. पं. पं. ती. **जनार्दन नारायण कशाळीकर**

आणि

ती. **सौ. रुक्मिणी जनार्दन कशाळीकर**

यांच्या चरणी आदर व कृतज्ञ प्रेमभावपूर्वक

अर्पण असो.

- श्रीनिवास

# हृद्‌गत

मान्यवर वाचक स्नेही,
सादर प्रणाम.
सहस्त्रनेत्र उघडल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद आणि अवलोकन सोहळ्यात आपले सप्रेम सहर्ष स्वागत. तुम्हाला या सोहळ्यात मूळ संस्कृत विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र, त्यातील विष्णूच्या एक हजार मराठी नावांचे मराठी अर्थ आणि त्या अर्थांमधून मला जाणवलेला आशय अनुभवायला मिळेल.

हा आशय स्वतःच्याच अंतर्यामी स्फुरला आहे असे जर तुमच्यातील प्रत्येकाला वाटले त्यात काहीही वावगे नाही. कारण हा शब्दबद्ध आशय वास्तविक शब्दातीत आणि अस्तित्वाच्या व जाणिवेच्या मूलस्त्रोताशी एकजीव आहे. जाती, धर्म, राष्ट्रीयत्व, वंश, संस्कृती, व्यवसाय, लिंग, प्रवृत्ती, विचार, विकास, वय वगैरे विविध प्रकारच्या वर्गीकरणातील प्रत्येकाच्या मूलाधाराशी तो एकात्म आहे. त्यामुळे ही आनंद संजीवनी खऱ्या अर्थी तुम्हा सर्वांचीच आहे व राहील.

तुम्हा सर्वांच्या अंतरंगीचं हे अमृत, संकुचितपणाकडून विशालत्वाकडे, धर्मवेडाकडून सहृदय उदारतेकडे , वैचारिक गुलामीतून सत्याच्या प्रचितीकडे , दुबळेपणाकडून सामर्थ्याकडे आणि विपन्नावस्थेतून संपन्नतेकडे नेणारी विश्वकल्याणकारी संजीवनी आहे अशी खात्री होत राहिल्यामुळे हे कठीण काम माझ्या सारख्या अति सामान्य व्यक्तीकडून पार पडलंय. ह्या अतंर्यामीच्या अमृतपानानं आणि अमृतानुभवानं सर्वंकष वैयक्तिक आणि वैश्विक कल्याणाचा प्रत्यक्ष अविष्कार कसा होईल ते पाहू.

विष्णुसहस्त्रनामाचा सहस्त्रनेत्रात आढळणारा आशय म्हणजे सत्याची प्रचिती. ही प्रचिती म्हणजे काय व ती विश्वकल्याणकारी एकात्मतेची कशी बनेल ते पाहुया. प्रथम व्यक्ति आणि विश्वाला अंतर्बाह्य व्यापणाऱ्या या सत्याची प्रचिती म्हणजे काय हे एका उदाहरणाने समजून घेऊ.

पहिलं उदाहरण वीजेच्या बल्बचं घेऊ. बल्ब वीजेमुळे 'पेटतो' तसेच सजीव आणि निर्जीव चिरंतन सत्यामुळे क्रियाशील होतात. या सत्यालाच, पुरुषाकृती, शिवशक्ती, लक्ष्मीनारायण, राधाकृष्ण वगैरे द्वंद्वांच्या रूपात वर्णन करतात. फक्त वीजेच्या बल्बला त्याचे मूळस्वरूप वीज आहे हे कळत नाही. त्यामुळे वीजेच्या बल्बला वीजमय अस्तित्वाने अमर, व स्वतंत्र होता येत नाही व इतर बल्बांच्या मूळस्वरूपाशी एकजीव असणाऱ्या वीजतत्वाशी समरस होता येत नाही. या उलट माणसाला मात्र स्वतःच्या अंतर्यामी व विश्वांतर्यामी अखंडतेने असलेल्या चिरंतन परमतत्वामुळे विश्वातील चराचराला क्रियाशील अस्तित्व आहे हे कळते. तसेच त्या परमतत्वाशी होणाऱ्या समरसतेच्या जाणीवेत अमर्याद, अमर व स्वतंत्र होता येते. विश्वांतर्बाह्य व्यापणाऱ्या चित्स्वरूपाने विशाल होता येते. अर्थात बल्ब आणि वीजेचा संयोग तिसऱ्या घटकामुळे होतो. तर मानव आणि सत्य यांचे मीलन, त्यामुळे मानवाला जाणवणारी सत्याची प्रचिती आणि तिचा

अविष्कार वैश्विक सत्याच्या सत्तेनेच घडून येत असतात. तसेच आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे बल्ब फुटला तरी वीज जशी नष्ट होत नाही. त्याचप्रमाणे मनुष्य देह नष्ट झाला तर मनुष्य स्वतःच्या मूळ स्वरूपात अमर राहतो.

स्वतःचे हे विशाल अमर रूप विसरणे आणि स्वतःला केवळ देह, समजुती, भावना, श्रद्धा, कल्पना, विचार, संकेत समजणे म्हणजे स्वतःच्या नश्वर अंशाला संपूर्ण (व शाश्वत) समजणे. अशा ह्या खोलवर रूजलेल्या समजुतीला देहबुद्धी म्हणतात. आणखी स्पष्ट करायचं तर असं म्हणता येईल शरीराच्या नख, दात वगैरे एका छोट्याशा भागाला संपूर्ण शरीर समजणे ही जशी गफलत आहे. एक मूलभूत भ्रम आहे, जबर अंधविश्वास आहे.

देहबुद्धीमुळेच आपण आपलं समर्थ व विशाल स्वरूप विसरून क्षुद्रत्वाचा अविष्कार करीत जगतो. कधी स्वतःच तयार केलेल्या देवकल्पनेचे, विचारांचे, वा स्वतःच्या वासना, भावना वा क्षुद्र स्वार्थांचे गुलाम बनतो तर कधी इतरांना गुलाम बनवतो. कधी स्वतःला तर कधी कधी इतरांना यातना देतो. अगतीकता व हिंस्रपणा यांचा अघोरी हैदोस मग आमच्या वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, राजकीय वगैरे जीवनाच्या सर्व क्षेत्रात आक्राळ-विक्राळ रूप धारण करतो व सारी मानवता बेचिराख करणाऱ्या विनाशपर्वांचे भयानक व किळसवाणे लोण सर्वत्र व सतत पसरू लागते.

पण ह्या भयंकर परिस्थितीतून सत्याच्या प्रचितीच्या कल्याणकारी अविष्काराची प्रक्रिया एखाद्या उषेप्रमाणे बहुतेकांच्या नकळत कशी उदयाला येते आणि यथावकाश तिची परिणती विश्वव्यापी महासूर्योदयात कशी होते ते थोडक्यात पाहू.

सहस्त्रनेत्रातून येणारी सत्याची प्रचिती कितीही कमी अधिक असली तरी जीवनाची जाण वाढवणारी व स्वसामर्थ्याची खात्री पटवणारी असल्यामुळे तिचा जो महत्त्वाचा दृश्य परिणाम होईल तो म्हणजे निर्भयता येणे. कार्यशक्ती, ज्ञानशक्ती व इच्छाशक्तींचा उगम अशी ही संजीवनी आहे. सामान्य व्यावहारिक जिवंतपणाचा अनुभव जेवढा अस्सल व खरा असतो. त्याच्या कित्येक पटीनं या संजीवनीचा खरा अनुभव असल्यामुळे चिंता, बेचैनी, असहायता, वैफल्य, अस्वस्थता, काळजी, भीती किंवा ह्यांना दडवण्यासाठी आणलेले उसने धैर्य, मगरूरी, आढ्यता यांच्या मगरमिठीतून सुटका होऊन कोणत्याही वैयक्तिक वा सामाजिक संकटात न डगमगता त्याचा मुकाबला करण्याचे सामर्थ्य, धैर्य व आत्मविश्वास येईल.

धैर्य व आत्मविश्वासामुळे आणि विकृत वृत्तींचे दडपण दूर झाल्यामुळे आजूबाजूला, घरीदारी, शाळा कॉलेजात, कारखान्यात , कार्यालयात, शेतीवाडी बागायतीत, संशोधन संस्थात तणावमुक्त वातावरण तयार होईल. त्यामुळे मुले आणि कनिष्ठ लोक परस्परांशी आणि वडिलधाऱ्यांशी व वरिष्ठांशी अधिक मोकळे बनतील त्याचप्रमाणे इतरांवर अवलंबून असणारे वृद्धही सुरक्षितता अनुभवू लागतील. घर, शाळा, कॉलेजे, कारखाने, रुग्णालये, शेती वगैरे सर्व क्षेत्रात समजूतदार व निर्भय संवादाचं प्रसन्न वातावरण तयार होईल. मज्जातंतूंच्या तुटण्यानं निकामी झालेले अवयव मज्जातंतू जोडण्यानं पुन्हा सचेतन आणि कार्यरत व्हावेत, त्याप्रमाणे निर्भय संवादाच्या संजीवनीमुळे सर्वच क्षेत्रात नवजीवन संचारेल.

वरिष्ठांच्या, अध्यापकांच्या, वडिलधाऱ्यांच्या, मालकांच्या, पुढाऱ्यांच्या, भीतीपायी विकृत आणि वरिष्ठ निकामी झालेल्या कौटुंबिक, शैक्षणिक, कार्यालयीन, औद्योगिक, राजकीय, धार्मिक अशा सर्व क्षेत्रात सध्या चाललेली सद्सद्विवेकाची गळचेपी, दडपणूक, गुदमर थांबून ह्या सर्व क्षेत्रात सद्सद्विवेकाचा नवचैतन्यदायी प्रवाह सुरू होईल.

आंतरिक एकात्मतेतून विकसित होणाऱ्या ह्या संवादामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये अविचारी, बाचाबाची, थिल्लर कुरघोड्या, कुत्सित कुचाळक्या, ढोंगी मुलाखती, लाचार- स्तुतीस्तोत्रे, वाह्यात बडबड, निर्लज्ज खुलासे, क्षुद्र हेवेदावे, कुटिल उलट तपासण्या, हिशेबी सल्लामसलती, हीन खलबते, मतलबी बतावण्या, दुष्ट अफवा, फसवे दावे, खोटे प्रस्थ कमी होऊ लागेल. बेजबाबदार विधाने, खोटी आश्वासने, नकली भाषणबाजी, पोकळ घोषणाबाजी यांचा प्रभाव ओसरू लागेल. सद्सद्विवेक गुदमरल्यामुळे तयार होणाऱ्या असंतोषाला कल्याणकारी प्रेरणा, दृष्टी, विचार व भावनांची वाट मिळेल आणि असंतोषातून तयार होणाऱ्या विनाशकारी भावना, विचार आणि कृतीचं परिवर्तन सर्जनशील व विघातक भावना, विचार, योजना व कृतीमध्ये होऊ लागेल. परिणामी कौटुंबिक जीवनात आत्मीयतापूर्ण वागणूकीचे नवे संकेत विकसित होत जातील. शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या बदलांमुळे पोटार्थी, पुस्तकार्थी, परीक्षार्थी, व्यवसायार्थी असे शिक्षण सत्याभिमुख बनेल. सत्याभिमुख परिमाणाने सर्व प्रकारच्या शिक्षणाला सामाजिक हिताचा पाया व हेतू मिळेल. राजकीय क्षेत्रातील विविध उपक्रम आणि योजना अधिकाधिक कलेअंतर्भूत केली जातील, शेती आणि औद्योगिक क्षेत्रांमधील योजना केवळ शेतमजूर व कामगारांच्या किंवा जमीनदार आणि उद्योजकांच्या नव्हेतर सर्वांच्या कल्याणाच्या दृष्टीने बनवल्या जातील व एकूणच समाजामध्ये सद्सद्विवेकाचं प्रसन्न व उत्साहजनक अस्तित्व अधिकाधिक प्रमाणात अविष्कृत होईल.

सत्प्रेरणा व सद्विचारांच्या प्रभावी प्रगटनामुळे आजवर कुंठित वा बेबंद असणाऱ्या वैयक्तिक जीवनातील व्यसनाधीनता, कमी होईल. कौटुंबिक कलह आणि वैयक्तिक शत्रुत्वे कमी होतील. बालसंगोपन सुधारेल. वृद्ध पिढीशी दिलजमाई होईल.आंतरिक समाधानामुळे आणि विविध क्षेत्रातील बदलांमुळे रोजच्या कामातील वैयक्तिक व सामाजिक समृद्धी आणि प्रगल्भता जोपासण्याची क्षमता जाणवेल. त्यामुळे स्वतःच्या कर्तव्यातील सौंदर्याचा व सामर्थ्याचा नवा साक्षात्कार होऊन त्याविषयी आस्था वाटू लागेल. रोजच्या कामातला जोम, उरक व समाधान वाढेल. समाधान, उत्साह आणि आत्मीयतेच्या संजीवनीमुळे पैसा, सत्ता, मोठेपणा, अधिकार, विलास, दिखाऊपणा याचं वेड कमी होईल. साहजिकच चुका, प्रमाद व गुन्हे यांचं प्रमाण कमी होईल.

अशा तऱ्हेनं व्यक्ति आणि विविध क्षेत्रात कल्पनातील हितकारी बदल घडून येतील व ते परस्परांना पोषक होऊन व्यक्ति व समाजाचे अधिकाधिक हित होत जाईल. या साऱ्याचा तपशील या ठिकाणी अप्रस्तुत आहे.परंतु त्याविषयी नीट कल्पना येण्यासाठी एखादे उदाहरण पाहणे नक्की आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्राचं उदाहरण घेतल्यास असं सांगता येईल की निर्भय व प्रगल्भ विद्यार्थी, अध्यापक,

शिक्षणतज्ज्ञ यांच्यात सुसंवाद होऊन प्रमाणपत्रे, पदव्या, परीक्षा, संस्था, शिक्षणखात्याचे जाचक नियम व बंधने यांचे प्राबल्य कमी होऊन ज्ञानाबरोबरच प्रत्यक्षानुभव, कौशल्य, सर्जनशीलता, तंत्रज्ञान, उत्पादकता व ह्यांच्याबरोबरच आनंद, निर्भयता, सामर्थ्य देणारी सत्याची प्रचिती यांना योग्य ते महत्व देणारं शिक्षण विकसित होऊ लागेल. केवळ काही संस्थामध्ये ते कोंडलेले न राहता जीवनाच्या सर्व क्षेत्रात ते उपलब्ध होऊ लागेल. शिक्षणासाठी शाळा कॉलेजच हवे अशी परिस्थिती राहणार नाही. शेते, बँका, रुग्णालये, उद्योग, मंदिरे सर्वत्र उपलब्ध होऊ लागल्यामुळे सर्व प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची, व्यवसायाची निवड करण्यासाठी पुष्कळ संधी राहतील. तसेच अभ्यासक्रम व व्यवसाय बदलण्याच्याही संधी उपलब्ध होतील. त्यामुळे मोठेपणासाठी, पैशासाठी, पोटासाठी वा गैरसमजुतीपायी वा विशिष्ट वेडापायी एखाद्या अभ्यासक्रमासाठी जीवाचा आटापीटा करणाऱ्या व एखाद्या अभ्यासक्रमात वा व्यवसायात अडकून पडणाऱ्या परीक्षा, संस्था, रानटी संस्था, पुस्तकी पांडित्य , राजकीय प्रभाव व दबाव तसेच जाचक नियम व बंधने इत्यादींच्या सहाय्याने कोट्यावधी मुले व पालकांना वेठीस धरून स्वतःचा व समाजाचा घात करणाऱ्या दलालांची व मक्तेदारांची उठाठेव कमी होईल.

विद्यार्जन आणि व्यवसाय यांच्यासाठी चाललेल्या रानटी स्पर्धेची तसेच विद्यार्जन व व्यवसायातील हीनतम डावपेचांची गरज नाहीशी होऊन व्यक्तीतील सर्वोत्तम पैलूंच्या जोपासनेला व अविष्काराला प्रोत्साहन मिळेल.

निर्भय सुसंवादातून होणाऱ्या व्यक्तिविकासाचे पडसाद सर्व क्षेत्रांमध्ये उमटून त्यांचे अधिष्ठान व स्वरूप निकोप होण्याची महाप्रक्रिया वेग घेईल. त्यामुळे लायक व प्रामाणिक व्यक्तींना शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक इत्यादी सर्व क्षेत्रात अधिकार व महत्व प्राप्त होऊन त्यांच्यातील उत्तम गुणांचा त्यांना आणि इतर सर्वांना अधिकाधिक फायदा मिळू लागेल.

भौतिक सत्याच्या बौद्धिक आकलनाला व आत्मविष्काराला विज्ञान म्हणतात. जीवनातील उदात्ततेच्या भावनिक आकलनाला व आत्मविष्काराला जीवनातलं काव्य कला व नाट्य म्हणतात. वैश्विक सत्याच्या प्रचितीला म्हणजेच स्वतःच्याच मूळ रूपाशी तद्रुप होण्याला आत्मज्ञान म्हणतात. पूर्वीच्या काळात आत्मज्ञानी व इतर श्रेष्ठ विभूती होऊन गेल्या. तरीही आजपर्यंतच्या इतिहासात उदात्तता व संपन्नता, कधीही सर्व स्तरांवर एकत्र नांदल्या नाहीत. परंतु सध्याच्या काळाचंच वैशिष्ट्य असं आहे की आत्मज्ञान व संपन्नता सार्वत्रिक होतील. ईश्वर सर्व चराचरात आहे असे शिकवावे लागणार नाही व दया -धर्म करा असेही सांगावे लागणार नाही. कारण साक्षात्कार व समृद्धी सर्वांना साध्य होतील. या प्रक्रियेचा एक भाग म्हणजेच संतांनी दिलेली सर्वांना सुलभ व तांत्रिकदृष्ट्या किल्ष्टता नसलेली ''नामसाधना'' त्यांचं हे कार्य म्हणजे अध्यात्मिक जीवनगंगा पृथ्वीवर आणण्याचं भगीरथासारखं महत्कार्य होय. त्यामुळे मी विष्णुसहस्त्रानामामध्ये असलेल्या तांत्रिकतेचे अंग असलेल्या न्यासांचा उहापोह केलेला नाही. न्यास म्हणजे काय वगैरे जाणण्याची इच्छा असणाऱ्यांनी इतर ग्रंथ वा अधिकारी व्यक्तींचा आधार घ्यावा.

या अगोदरचं सारं स्पष्टीकरण वाचलं तरीही नामस्मरणामध्ये किंवा विष्णुसहस्त्रनामाच्या आशयात

उर्ध्वगामी क्रांतीचा उर्जास्त्रोत आहे असं म्हंटल तर त्यात काही गैर नाही. कारण देवाची भक्ती वा नामस्मरण यांचा संबंध सामाजिक संपन्नतेशी कधीच घातला गेला नव्हता. किंबहुना नामस्मरणाची सांगड निरसता, निष्क्रीयता, उदासीनता, अंदश्रद्धा बुवाबाजी यांच्याशी घातली जाते. हे अर्थातच अत्यंत चुकीचे आहे. याउलट सहस्त्रनेत्रात भौतिक सत्य, भावनिक उदारता आणि वैश्विक सत्यांची प्रचिती यांची अखंडता व एकात्मता आढळेल. ह्या सम्यग् अनुभवात निर्भयता, सुसंवाद आणि पसायदानाची पूर्ती यांची बीजे आहेत, स्फूर्तीस्त्रोत आहेत. पूर्वीच्या महापुरुषांच्या अध्यात्मिक व भौतिक क्रांतीच्या तत्त्वज्ञानांनीच ही एकात्मता परिणती आहे. म्हणूनच वैयक्तिक आणि वैश्विक कल्याण व समृद्धीची त्यात हमी आहे. म्हणूनच वैयक्तिक आणि वैश्विक कल्याण व समृद्धीची त्यात हमी आहे.

सत्याचा शोध ही स्वतःशी संवाद साधण्याची प्रक्रिया असल्याने ईश्वराशी म्हणजेच स्वतःच्या मूळ स्वरूपाशी संवाद साधला जायला आणि लेखकाची उपस्थिती नाहीशी व्हायला पोषक ठरावी अशी मांडणी जमून आली आहे.

विष्णुसहस्त्रनामामध्ये पुनरूक्ती व पाठभिन्नता असल्यामुळे आणि चिन्मयानंद, आगाशे आणि इतरांनी वेगवेगळे अर्थ लावल्यामुळे विष्णुसहस्त्रनामामध्ये काहिशी क्लिष्टता येते व वाचणाऱ्याचा गोंधळ उडतो हे खरे आहे परंतु सहस्त्रनेत्राच्या वाचनाने सत्याची प्रचिती येऊन गोंधळ नष्ट होईल. त्याचप्रमाणे विष्णुसहस्त्रनाम, सत्यनारायणाची पूजा व हिंदु धर्म यांचं अतुट नातं यामुळे होणारी सांप्रदायिक पूर्वग्रहांचा आभासही सहस्त्रनेत्रांद्वारे होणाऱ्या आकलनाने नष्ट होईल असा भरवसा वाटतो. तसेच सत्यनारायणासारख्या सर्वच पूजा-पाठादीप्रथांचे मर्म लक्षात येईल व वादी-प्रतिवादी अभिनिवेश संपतील अशी खात्री वाटते. सर्वांना सत्याची प्रचिती व समृद्धीची प्राप्ती म्हणजेच उर्ध्वगामी वा स्वात्म्यवादी क्रांती. तिची ही वीज तुम्हाला स्वात्म्यभावानं समर्पित असेल.

सहस्त्रनेत्रातील उर्ध्वगामी क्रांतीचं बीजामृत म्हणजेच तुमच्या अंतर्यामी व सर्वांतर्यामी असणारं स्वरूपामृत खरोखर अस्सल आहे की नाही हे तुम्हीचं ठरवायचं आहे. ते सोपं जावं म्हणून श्रद्धा म्हणजे काय हे पाहू. श्रद्धा म्हणजे स्वतःची संकुचित बुद्धी ठरवेल तेच खरं इतर सारं खोटं असं म्हणण्याचा आततायीपणा टाकणं. अशा श्रद्धेनं मूळ स्वरूपाची प्रचिती येणं सोपं जातं. परंतु आज श्रद्धेच्या नावाखाली स्वतःची बुद्धी गहाण टाकण्याचा व दुसऱ्याच्या मूर्खपणावर भिस्त ठेवण्याचा प्रकार चालतो. असली श्रद्धा म्हणजे आत्मघाताला व इतरांच्या घाताला निमंत्रण होय. त्यामुळे स्वतःच्या संकुचित बुद्धीला प्रमाण न मानता पण त्याचबरोबर माझ्या सर्वस्वी सहजसंभव अशा मूर्खपणावर विश्वास न ठेवता तुम्ही सत्याची कास धरून सत्याच्या प्रचितीशी तडजोड न करता ह्या बीजामृताचा स्वीकार व त्याग करावा. हे सापं व्हावं यासाठी आस्तिक व नास्तिक या शब्दांची व्याख्या लक्षात घेतली तर ते उपयुक्त ठरेल. खरा अस्तिक तो, जो केवळ सत्यावर संपूर्णपणे विश्वास ठेवतो, किंबहुना केवळ सत्य हे खरे चिरकालीन अस्तित्व असल्याची प्रचिती घेतो. खरा नास्तिक तो जो स्वतःच्या संकुचित बुद्धी, कल्पना, भावना, वासना यांचे सापेक्षत्व जाणून त्यांच्यावर संपूर्ण सत्य म्हणून विश्वास ठेवीत नाही. तो या दृष्टीने पाहिल्यास

त्यागी, योगी, संत, ऋषी हे खरे आस्तिक व तेच खरे नास्तिक असल्याचं लक्षात येईल.त्याचप्रमाणे आस्तिकतेच्या वा नास्तिकतेच्या नावाखाली आजकाल चाललेलं बहुतेक सारं म्हणजे हिंस्त्रता व शोषण आणि भाबडेपणा व असहाय दीनपणा यांना आमंत्रण असल्याच ध्यानात येईल. शेवटी सत्याच्या प्रचिती आणखी एका बाबीचं स्पष्टीकरण देखील नक्की उपयुक्त ठरेल. ती बाब म्हणजे आशयाची प्रचिति घेताना येणारा तिचे देखील नक्की उपयुक्त ठरेल. ती बाब म्हणजे आशयाची प्रचिती घेताना येणारा तिचे शब्दांकन करणाऱ्याविषयी येणारा विचार. सहस्त्रनेत्रातील आशयाचं शब्दांकन  हे श्रीनिवास कशाळीकर ह्या व्यक्तीचं कार्य नव्हे. किंबहुना व्यक्ती म्हणून कुणीही, त्याचे मातापिता , अनुवंशिकता, जन्म इत्यादी, व्यक्तीच्या कार्याला पायाभूत अशा बाबी ठरवून प्राप्त करू शकत नाही. एखाद्या कपातून गंगाप्राशनाचा योग आला तरी तो कप हा गंगेचा कर्ता नसतो हे जसं खरं तद्वतच हे आहे. तसेच कप फुटका असला तरी जो आपण गंगेला कमीपणा देत नाही त्याचप्रमाणेचकेवळ माझ्या क्षुद्रत्वामुळे तुम्ही आशयाला गौणत्व देणं योग्य ठरणार नाही.

व्यावहारिक दृष्ट्या मात्र सहस्त्रनेत्रातील सर्व त्रुटींना मी जबाबदार आहे व जमेच्या बाजूचे श्रेय माझे आई-वडिल, कुटुंबीय, गुरुजन, सहाकारी, मित्र व हितचिंतक, रुग्ण व विद्यार्थ्यांना आहे.

या ठिकाणी के.ई.एम्. हॉस्पिटलच्या डीन डॉ. प्रज्ञा पै. विभागप्रमुख डॉ. सौ. केंदूकर, विभागातील ज्येष्ठ व कनिष्ठ सहकारी यांच्या सदिच्छा व विविध प्रसंगी त्यांनी केलेलं सहकार्य, श्री. मिलिंद माईणकर आणि वंदना नाबर यांनी दाखवलेली विलक्षण आस्था व उत्साह, सुनीत भट, पुश्कर शिकारखाने, डॉ. जयश्री गडकरी, डॉ.अमर सोलपुरे, वगैरेंशी झालेल्या चर्चा तसेच डॉ. महेंद्र कांदळकर, डॉ. कमळाकर कुलकर्णी,  प्रा. सुभाष अंगडी वगैरे अनेक मित्रांनी वेळोवेळी केलेलं सहकार्य व माझ्या मुली चि. मुक्ता, चि. उर्जिता व पत्नी डॉ. सौ.विभा यानी आजवर विविध प्रसंगी दिलेली समजूतदार साथ याबद्दल त्यांचा ऋणनिर्देस करणं योग्य ठरेल. परंतु नामनिर्देश नव केलेल्या अशा अनेकांचे आभार मानणं त्याहूनही रास्त व आवश्यक ठरेल,

शेवटी डी.टी.पी. ची संस्था 'निर्मिती' व 'प्रकाशक' यांचे आभार मानतो व हृदगत पूर्ण करतो.

आपला नम्र

**श्रीनिवास जनार्दन कशाळीकर**

‘सहस्रनेत्र’ ह्या पुस्तकाच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीला चोखंदळ, विद्वान व सहृदय वाचकांचा अत्यंत उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. दै नवाकाळमध्ये संपादक नीळकंठ खाडिलकर यांनी गौरवपूर्ण असा अग्रलेखच लिहिला. ‘सहस्रनेत्र’ च्या वाचनाने कित्येकांना अद्‌भुत समाधान व सामर्थ्य अनुभवाला आले.

**डॉ. श्रीनिवास जनार्दन कशाळीकर**

# श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र-बोधामृत प्रारंभ ।

**श्री गणेशाय नमः**

श्री गणेशाला नमस्कार असो.

पृथ्वी (गंध), आप(रूप), तेज(रस), वायु(स्पर्श), आकाश (शब्द) ही पंचमहाभुते असून, विश्वोत्पत्तीच्या एका स्पष्टीकरणानुसार पुरुष-प्रकृतीपासून आकाश व पुढे इतर महाभूते (चराचर) तयार झाली. आकाश= शब्द ब्रह्म=गणपती. म्हणून आत्मप्रचितीसाठी स्वतःच्या मूलाधाराची-गणपतीची आरंभीच नम्रतापूर्वक आठवण व प्रार्थना केली जाते.

**श्री वेदव्यासाय नमः ।**

श्री वेदव्यासाना वंदन असो. महाभारतकार व्यास महर्षी विष्णुसहस्त्रनामाचेही कर्ते असल्याने विष्णुसहस्त्रनामारंभी महर्षी व्यासांना, म्हणजेच त्यांच्या आत्मज्ञानी प्रज्ञेला म्हणजेच स्वतःच्या आत्मरूपालाही वंदन केले जाते.

**यस्य स्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात् ॥**

**विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ॥१॥**

ज्याच्या केवळ आठवणीनेही जन्म आणि मृत्यूच्या सांसारिक चक्रातून म्हणजे अज्ञ व परावलंबी देहाभिमानी अस्तित्वातून मुक्ती मिळते त्या साऱ्या विश्वाला व्यापणाऱ्या धर्मसंप्रदायातीत- विचारातीत अमर सत्याला भगवान श्री विष्णूला माझे ( माझ्या मर्यादित अस्तित्वाचे ) साष्टांग नमस्कार असोत ॥१॥

**नमः समस्तभूतानामादिभूताय भूभृते ॥**

**अनेकरूपरूपाय विष्णवे प्रभविष्णवे ॥२॥**

सर्वसामान्यपणे पाच महाभूतांमध्ये वर्गीकृत केलेल्या चराचर मूळ पदार्थांचेही जे मूळ त्या अनेकानेक रूपातील जगत्स्वामी विष्णूला माझे (पुन्हा पुन्हा) साष्टांग नमस्कार असोत.

**वैशंपायन उवाच**

**श्रुत्वा धर्मानशेषेण पावनानि च सर्वशः**

**युधिष्ठिरः शान्तनवं पुनरेवाभ्यभाषत ॥३॥**

वैशंपायन ऋषी जनमेजय राजाला म्हणतात, ''भीष्माचार्यांकडून संपूर्ण पवित्र धर्म व धर्माचार यांच्यासंबंधीचे विवेचन ऐकून धर्मराज युधिष्ठिर भीष्माचार्यांना सहा प्रश्न विचारतात'' ॥३॥

**किमेकं दैवतं लोके किं व्यापेकं परायणम् ।**
**स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाः शुभम् ॥४॥**
**को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः ।**
**किं जपन्मुच्यते जन्तुर्जन्मसंसारबन्धनात ॥५॥**

**प्रश्न १)** या विश्वामध्ये एकमेवाद्वितीय असा देव कोणता ? ( देव या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना ते पुढे विचारतात)

**प्रश्न २)** यच्चयावत् सर्वांसाठी व सर्वांना प्राप्त व्हावं असं किंवा प्राप्त होण्यास सर्वोच्च असं स्थान कोणतं ?

इथे स्थान या शब्दाचा अर्थ केवळ जागा असा नाही. कारण हे केवळ शरीराचं स्थान नव्हे, तर अस्तित्व , अस्तित्वाची जाणीव व जाणिवेच अस्तित्व ह्या साऱ्याचं स्थान आहे. हे स्थान शरीर सामावणाऱ्या पोकळीप्रमाणे तीन मितींचं नसून ते अनंत मितींचं किंवा मितींच्या अतीत असं समजावं त्यामुळे ह्या स्थानाला शरीराने नव्हे , तर मन, भावना, विचार, अहंकार, यांच्या अतीत जाऊन पोचता येतं. ग्रंथकर्ते व्यास महर्षी ब्रह्मज्ञानी असल्यामुळे त्यांनी युधिष्ठिराच्या तोंडी हा मर्मभेदी प्रश्न टाकला आहे. या प्रश्नाचं आणखी स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करता येईल. सर्व चरचरातील घटनांचे मूळ कारण किंवा सर्व कार्यकारणांचाही उगम, उद्गाता व नियंता (देव) कोण? सर्वोच्च उत्क्रांतीची अवस्था व प्रचिती जिथे प्राप्त होते, ते परमोच्च स्थान कोणतं ? ज्या अनुभूतीमध्ये क्षुद्र व बंधनकारी वासनांचा क्षय होतो ती अनुभूती कोणती ? त्याचप्रमाणे असा वासनाक्षय होऊन खरी आनंदमय आत्मसत्ता ज्या अवस्थेत प्राप्त होते ती अवस्था तिचं स्थान कोणतं ? जिथे किंवा ज्या आधारे अज्ञानमुक्त आणि बंधनमुक्त अशी आंतर्बाह्य प्रकाशावस्था रहाते ते परमश्रेष्ठ धाम कोणतं ? ज्या आत्मसाक्षात्काराने सामर्थ्य, आनंद आणि निर्भयता प्राप्त होतात त्या आत्मसाक्षात्काराचा कारक आधार कोण ? जिथे पोचल्यानंतर अस्तित्वाला जन्म-जरा-मरणादि देहपातळीवरील बंधनकारक जीवन बाधत नाही ते सर्वोच्च आश्रयस्थान कोणतं ? स्वतःच्या खऱ्या ज्ञानाने जेव्हा व जिथे व्यक्ती विश्वनियंत्याशी तद्रुप होते व तादात्म्य पावते ती सर्वोत्तम, अखेरची कालातीत जागा कोणती ?

**प्रश्न ३)** सर्वजण परिणामतः कोणत्या देवाचा स्तुतिपाठ , संकीर्तन , अर्चन वगैरे करतात? म्हणजे आस्तिक, नास्तिक विचारांच्या, विविध जाती-धर्मांच्या, विभिन्न

प्रकारच्या लोकांच्या उदात्त भावना, विचार, कल्पना व कृती ज्यामध्ये येऊन मिळतात व चिरंतनपणे निगडित, समरस व एकात्म होतात अशा विश्वाचे उत्तम केंद्र असलेला तो कोण आहे ?

**प्रश्न ४)** कोणत्या देवाची स्तुती केली असता (आत्मशुद्धी होऊन, संकुचित वृत्तीचा क्षय होऊन) स्तुती करणारे आत्मावलंबी, स्वावलंबी व मुक्त होतात ? ॥४॥

**प्रश्न ५)** वेगवेगळ्या सांप्रदायिक मतांचा, तसेच विश्वाच्या नियमांचा सर्वंकष व सखोल विचार केला असता विश्वव्यवस्थेला आधारभूत असा सार्वत्रिक परमश्रेष्ठ आधार परमधर्म कोणता ?

**प्रश्न ६)** ज्याच्या सतत स्मरणाने जीव संसार दुःखाच्या (वैयक्तिक शारीरिक, आर्थिक, मानसिक, वैचारिक) पातळीवरून उन्नत होऊन अज्ञानजन्य बंधने व दुःखापासून मुक्त होतो असा कोण आहे व त्याचा जप कोणता ? ॥५॥

**भीष्म उवाच ।**
**जगत्प्रभुं देवदेवमनन्तं पुरुषोत्तमम् ।**
**स्तुवन्नामसहस्रेण पुरुषः सततोत्थितः ॥६॥**

युधिष्ठिर हा श्रेष्ठ पुरुष असल्याने त्याने जे प्रश्न विचारले ते केवळ व्यक्तिगत मोक्षासाठी नव्हे तर साऱ्या विश्वाला उपयोगी व्हावेत म्हणून विचारले आणि त्याचप्रमाणे भीष्मानी देखील त्याची उत्तरे जगत्कल्याणाच्या दृष्टीने दिली, हे महर्षी व्यासानी स्पष्ट केले आहे. वरीलपैकी सहाव्या प्रश्नाला उत्तर देताना भीष्माचार्य म्हणतात, ''चल आणि अचल अशा साऱ्या विश्वाचा स्वामी, देवांचाही देव असा देश-कालाला व्यापून उरणारा जो परमेश्वर आहे, त्याचप्रमाणे ज्याच्या अस्तित्वाला अंत नाही, जो विश्वाच्या घटनांमध्ये गुंतलेला नाही व साक्षीरूपाने राहतो, अशा देवाचे त्याच्या सहस्रनामस्तोत्राद्वारे स्मरण आणि आकलन केले असता मनुष्य अज्ञान व तज्जन्य दुःखातून बाहेर येतो. ॥६॥

**तमेव चार्चयन्नित्यं भक्त्या पुरुषमव्ययम् ।**
**ध्यानन्स्तुवन्नमस्यंश्च यजमानस्तमेव च ॥७॥**

चवथ्या प्रश्नाच्या उत्तरादाखल भीष्माचार्य म्हणतात, ''कधीही नाश न पावणाऱ्या व सर्वांच्या अंतर्यामी असणाऱ्या ( म्हणजेच एकाच वेळी व्यक्तीमध्ये व समष्टीमध्ये) वसणाऱ्या परमेश्वराची आपण सर्वांनी मनोभावेकरून , भक्तिपूर्वक पूजा करावी. ॥७॥

**अनादिनिधनं विष्णुं सर्वलोकमहेश्वरम् ।**
**लोकाध्यक्षं स्तुवन्नित्यं सर्वदुःखातिगो भवेत् ॥८॥**

राजा युधिष्ठिराच्या तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देताना भीष्म म्हणाले, प्रत्येक देहाला सहा विकार, गुण किंवा लक्षणे आहेत.

१) उत्पन्न होणे

२) वाढणे

३) टिकून राहणे

४) बुद्धीभ्रंश होणे. (आत्म्याला 'स्व' न समजता स्वतःच्या शरीरालाच (म्हणजेच शरीर, मन, बुद्धी, अहंकार) आपला 'स्व' समजणे व सर्व कार्ये हा 'स्व'च करतो असे समजणे याला अहंकार किंवा देहबुद्धीजन्य देहाभिमान म्हणतात. यामुळे सारासारविवेक नष्ट होतो, संवेदना, ज्ञान विचार व अनुमान विपरीत होतात, भ्रष्ट होतात.)

५) क्षीणता येणे.

६) नाश पावणे.

हे सहा विकार नसल्याने अनादिनिधनः ( म्हणजे आदि व अंतरहित) म्हणून वर्णन केला जाणारा अचल व चल अशा विश्वाला अंतर्बाह्य वेष्टणारा, वेढणारा किंवा व्यापणारा असा जो विष्णू तोच प्रार्थनेस अत्यंत योग्य आहे. हा विष्णु जो सर्वांना स्वभावसिद्ध बोधनशक्तीने पाहतो व जो सर्व जाणीवांच्या पातळ्यांचा (लोक याचा एक अर्थ, जाणिवेची पातळी उदा. बेशुद्ध, शुद्ध, स्वप्न, झोप इत्यादी) स्वामी आहे त्याची निरंतर उपासना केल्यास म्हणजे स्वतःची भावना व विचार त्यांच्या सन्निध ठेवल्यास सर्व प्रकारच्या दुःखांपासून जीव मुक्त होतो.'' ॥८॥

**ब्रह्मण्यं सर्वधर्मज्ञं लोकानां कीर्तिवर्धनम् ।**
**लोकनाथं महद्भूतं सर्वभूतभवोद्भवम् ॥९॥**

ब्रह्मज्ञान व ब्रह्मानुभावाच्या प्राप्तीसाठी तर करणाऱ्यांचे कल्याण इच्छिणारा (कारण ब्रह्मजिज्ञासा व तीनुसार तपश्चर्या व ब्रह्मज्ञानाची प्राप्ती हे सारे ईश्वरेच्छेनेच घडते. एखाद्या व्यक्तीच्या क्षुल्लक व वैयक्तिक इच्छेने नव्हे ) ईश्वर शरण जाण्यास योग्य आहे. विश्व व युगायुगांना धारण करणाऱ्या धर्मतत्त्वांचा खरा ज्ञाता जाणकार आणि स्वतःच्या अविष्काराने जाणिवांचे विश्व संपन्न करणारा व भक्तांची हृदये महान आणि जनप्रिय बनवणारा ईश्वर, स्तुती करून आळविण्यात सुयोग्य आहे. पंचमहाभुतांचे उत्पत्तीस्थान व सूक्ष्मतेने म्हणजेच अधिकरणतत्त्वाने पंचमहाभूते ज्यामध्ये राहतात असे महत्तम भूत जो आहे व ज्याच्या जाणिवेने सारे विश्व क्षणभंगुर व अविश्वासार्ह असल्याचे लक्षात येते आणि व्यक्तिगत इंद्रियगोचर ज्ञानाची मर्यादा व संकुचितता समजते असा तोच,

सर्वस्व समर्पित करून आराधना करण्यास अत्यंत योग्य आहे. ॥९॥

**एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मत : ।**
**यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ॥१०॥**

पाचव्या प्रश्नासंदर्भात भीष्माचार्य उत्तरले, '' अज्ञान व आभासांच्या अंधाराला दूर करून हृदय शुद्ध आणि तेजोमय बनवणाऱ्या हृदयांतरी प्रकाशणाऱ्या वासुदेवाची सतत आठवण करणे व त्याविषयी तीव्र ओढ व आवड अखंड उपभोगणे ( भक्ती ) आणि या वासुदेवाची माहिती इतरांना मोठ्या प्रेमाने देणे (संकीर्तन) व त्यातील उत्स्फूर्त आनंदाची अनुभूती घेणे, घेत रहाणे व त्यातच रमणे हा माझ्या मते सर्वश्रेष्ठ धर्म आहे.''

यापेक्षा अधिक अंहिसारूप असा धर्म नाही हे पाच कारणे देऊन विषद करता येईल.

१) या धर्मामध्ये कुणाचेही अहित नाही, या अर्थाने तो अहिंसारूपी आहे व बळजबरी नाही म्हणूनही अहिंसारूपी आहे.

२) ह्यामध्ये सांस्कृतिक प्रगतीचे परमोच्च शिखर-असा निस्वार्थीपणा आहे. कारण एका ईश्वरप्रेमाशिवाय म्हणजेच सर्व तऱ्हेच्या प्राणीमात्रांच्या अंतःकरणाशी निष्कपट शुद्ध प्रेमाचे नाते निर्माण करून वृद्धींगत करण्याशिवाय यामध्ये कोणताच अन्य हेतू नसतो.

३) ह्या धर्माचा मोठेपणा असा की तो स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण असल्यामुळे कोणत्याही भौतिक साधनावर अवलंबून नाही. उदाहरणार्थ, पैसा अडका, पुजारी दक्षिणा, व्रते, उपवास इत्यादींची जरूर नाही.

४) या धर्मपालनासाठी, या धर्माची सत्ता त्रिकालबाधित व कालातीत असल्याने विशिष्ट स्थळ-काळादि मुहूर्तदिकांची आवश्यकतासुद्धा नाही.

५) यामध्ये नृत्यगायनासारख्या कोणत्याही कलेमध्ये प्रावीण्य असण्याचीही गरज नाही. साहजिकच एक बाब सहज ध्यानी येईल. ती म्हणजे, हा धर्म विश्व उन्नतीचा वैश्विक धर्म आहे. त्यामध्ये कोणतीही दडपणे व स्वातंत्र्याचा संकोच करणारे जाचक नियम व बंधने नाहीत. त्यात भेदभाव नाही. म्हणून सर्व दृष्ट्या पाहिले असता जगन्नियंत्या कूटस्थ ईश्वराचे स्मरण करणे व त्यासाठी त्याच्या अर्थपूर्ण नावांचा जप करणे हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. विशेषतः कलियुगामध्ये तर भगवद्प्राप्ती व विश्वकल्याण साध्य करून देणारा याहून श्रेष्ठ धर्म नाही.॥१०॥

**परमं यो महत्तेजः यो महत्तपः ।**
**परमं यो महद्ब्रह्म परमं यः परायणम् ॥११॥**

यानंतर धर्मराजाच्या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरादाखल पितामह भीष्म म्हणाले, ''परमश्रेष्ठ असे, अंतर्बाह्य सारे जीवन उजळून टाकणारे जे चैतन्यरूपी तेज आहे. (जे दृश्यमान् झगमगाटाहून अगदी भिन्न आहे) व ज्याच्या अंशमात्राने सारे विश्व अंतर्बाह्य प्रकाशते आणि ज्याचे भान मर्यादित जाणिवा व्यक्तित्वातीत झाल्या की येते, त्याला **परम तेज** म्हणतात. ज्याच्यामुळे अस्तित्वाच्या व जाणिवांच्या विविध स्तरांवरील जिवांना (देव-देवता-यक्ष आदी) आत्मनंदानुभूती प्राप्त होते ते पवित्रतम ज्ञानदायी तप म्हणजे खरे **परम तप** होय. ज्याच्यामुळे विश्व आहे व युगे आहेत व ह्यामुळे जे महाकारण आहे ते महद्ब्रह्म म्हणजे सर्वांनी शेवटी जिथे पोचायचं ती ज्ञानदायी, तेजोमय, चैतन्यमय अवस्था म्हणजे **परम श्रेष्ठ ब्रह्माअवस्था** होय. या परम तेजस्वी, परम तपोरूपी ब्रह्मरूपी अवस्थेला **परमपद** म्हणतात. ह्या चारही लक्षणानी युक्त असा ईश्वर विनम्रपणे पूजण्यास, सतत स्मरण्यासव अखेर तद्रुप होण्यास / अनुभवण्यास योग्य आहे.'' ॥११॥

**पवित्रानां पवित्रं यो मंगलानां च मंगलम् ।**
**दैवतं दैवतानां च भूताना योऽव्ययः पिता ॥१२॥**

युधिष्ठिर राजाच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना भीष्म म्हणाले, '' गंगा वगैरे तीर्थानाही ज्याच्या योगाने पवित्रता येते व ज्याच्यामुळे तीर्थादिकानी न जाणारी महापापेही (अविद्या-माया-अज्ञानमूलक अशी पराधीन अवस्था, जिच्यामध्ये आत्मरूपी ईश्वराचे विस्मरण असतं) निघून जातात तो ईश्वर अत्यादर व उत्कट भक्तीने आळवण्यास योग्य आहे. (कारण त्याचं स्मरण हीच मर्यादित अस्तित्वाच्या उत्क्रांतीवर स्थित्यंतराची सुरुवात व लक्षण असते) ज्याच्या अंतःकरणपूर्वक स्मरणामुळे आणि ज्याची स्थापना मनाने हृदयात केल्यामुळे केवळ पारंपरिकच नव्हे तर धर्मशास्त्रातील कर्मेही न करता सर्वकाही मंगल होते, तो देव नित्यस्मरणासाठी सुयोग्य आहे, कारण तो अविनाशी मांगल्याचा कारक आहे. सर्व चराचरातील चैतन्याचा, वीर्याचा उगम असल्याने त्याला देवांचा देव, मूळ कारण, विश्वाचा पिता म्हणतात, आणि तो देव स्वतःच्या भावनांच्या द्वारे ज्याच्याशी सतत निगडीत राहावं व ज्याच्या पायी लीन व्हावं असा आहे.'' ॥१२॥

**यतः सर्वाणि भूतानि भवन्त्यादियुगागमे ।**
**यस्मिंश्च प्रलयं यान्ति पुनरेव युगक्षये ॥१३॥**

अशा तऱ्हेने राजा युधिष्ठिराचे शंकानिरसन केल्यावर भीष्माचार्य म्हणाले, '' ज्यापासून सृष्टीच्या प्रारंभी पंचमहाभूतादी उत्पन्न होतात व प्रलयकाली ज्याच्यात लय पावतात असे भगवान परमेश्वराचे अस्तित्व ( हे अस्तित्व ढोबळ अस्तित्वासारखे

नाही. तरल आहे. उदाहरणार्थ पोकळी, अवकाश, काळ जाणीव यांचे अस्तित्व दाखवणे अत्यंत कठीण असते) सर्वश्रेष्ठ होय. (आयुष्याचे सर्व इमान त्यालाच वाहणे श्रेयस्कर)'' ॥१३॥

**तस्य लोकप्रधानस्य जगन्नाथस्य भूपते ।**
**विष्णोर्नामसहस्त्रं मे श्रृणु पापभयापहम् ॥१४॥**

सर्वत्र अंतर्बाह्य असलेल्या, जगाचे मूळ कारण असलेल्या अनादि, अनंत, अविनाशी व नित्य अशा परमेश्वरांचे स्तोत्र ऐक. ज्याच्यावर कोणत्याही चराचराची सत्ता चालत नाही व जो कशानेही लिप्त, बद्ध वा गौण होत नाही त्या सर्व सामर्थ्यवान चैतन्यदायी स्वामीचे सहस्त्रानामरूप स्तोत्र श्रवण कर. याच्या श्रवण-मनन-चिंतनाने मर्यादित जाणिवेचे व्यक्तित्वातीत जाणिवेत स्थित्यंतर होऊन ईश्वराचे विस्मरण, अहंकार, दुराभिमान, भीती, बेचैनी, यातना इत्यादी सर्व बाबी दूर होतात'' ॥१४॥

**यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः ।**
**ऋषिभि परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये ॥१५॥**

'' परमेश्वराच्या या नावांचा शब्दशः किंवा भाषेनुसार होणारा अर्थ अनास्तव काल्पनिक नाही. रुढार्थाने ज्याला स्तुती म्हणतात ती वारेमाप स्तुती हे ह्या नावांचे प्रयोजन नाही. उलट मानवी प्रज्ञेला जाणवलेल्या ईश्वराच्या प्रत्यक्ष गुणातून वाहत आलेल्या अर्थाने अक्षरांना खेचून घेतल्यामुळे ही अर्थपूर्ण नावे संघटित झाली आहेत. म्हणून ही सार्थ अशी नावे उच्चारताना, स्मरताना व्यक्ती गहिवरून जाते, भारावून जाते, आत्मतत्वाशी निगडीत होऊ लागते. वेद, नारदादी ऋषी इत्यादी सर्वश्रेष्ठींना ह्या स्तोत्राचे गायन-मनन-चिंतन आवडते व लोकहितार्थ ते ह्या स्तोत्राचा उपदेश इतरांना करतात. स्तोत्राच्या आधारे धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे सर्व पुरुषार्थ प्राप्त होतात;कारण ह्या स्तोत्राने जगातील सर्वश्रेष्ठ सत्ता जी आत्मसत्ता तिची प्राप्त होते. ह्या कारणास्तव हे धर्मराजा, हे स्तोत्र तुला सांगतो.'' कलियुगाच्या काळात ह्या आत्मसत्तेतून केवळ चारही पुरुषार्थच नव्हे तर सर्वंकष ऊर्ध्वगामी विश्वकल्याण प्रत्यक्षात येऊ शकते.कारण ह्या सत्तेतून वैश्विक कल्याणकारी दृष्टी, योजना, साकार होऊ शकतात आणि यशस्वी होऊ शकतात आणि विविध धर्म, वंश, राष्ट्रीयता, विचार इत्यादींमध्ये उन्नयन होत होत महासमन्वय होऊ शकतो.

**। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।**

मी साऱ्या विश्वाचे मूळ शब्द ओंकाराचे स्मरण करून भगवान वासुदेवाना माझ्या ह्रदयात आवाहन करून ते अतंर्बाह्य सर्वत्र आहेत व माझे खरे स्वरूप आहेत असे लक्षात घेऊन (पुन्हा पुन्हा) नमन करतो.

# सार्थ विष्णुसहस्त्रनाम

**ॐ विश्वं विष्णुपर्वषट्कारो भूतभव्यभवत्प्रभुः ।**
**भूतकृद्भूतभृद्भावो भूतात्मा भूतभावनः ॥**

**१) ॐ विश्वं । ॐ विश्वस्मै नमः ।**

विश्व. विश्वाचे मूळ रुप. मूळ तत्त्व किंवा खरे 'स्व' रुप तू आहेस. अर्थात् दृश्यादृश्य विश्वाचे कारणही तू आहेस. विश् म्हणजे प्रवेश करणे ह्या अर्थाने ज्या स्वरूपी विश्व प्रलयकाली विलयास जाते तेही तूच आहेस, आणि चराचरांतर्यामी प्रवेश करणारे ह्या अर्थानेही तुला विश्व म्हंटल आहे. ''मी (ईश्वर) भूतमात्रात, माझ्या सनातन अंशरूपाने प्रवेश करतो आणि मन व पंचेंद्रियांनी युक्त अशी प्रकृती संघटित करतो'' असे गीतेमध्ये म्हटले आहे. (पंधरावा अध्याय). तुला माझा साष्टांग नमस्कार असो.

**२) विष्णुः । विष्णवे नमः। वेवष्टि व्याप्नोति इति विष्णुः ।**

संपूर्ण विश्वाला अंतर्बाह्य वेढणारा, व्यापणारा व सामावणारा असा तू आहेस. तुला मनःपूर्वक नमस्कार असोत.

**३) वषट्कारः । वषट्काराय नमः ।**

वषट्कार म्हणजे विशिष्ट मंत्रोच्चारपूर्वक स्तुती करीत अर्घ्य देणे. हे वषट्कार ज्याच्या कृपेसाठी केले जातात तो आणि ज्या यज्ञात (जाणीवपूर्वक उत्क्रांती वा उन्नयनाचा पद्धतशीर प्रयत्न म्हणजे यज्ञ.यात पशुत्वाचा बळी दिला जातो.) केले जातात तो यज्ञही तू आहेस. यज्ञांमध्ये हजारो पशु बळी दिले जात असे जे वर्णन आहे ते १) खोटे / अर्धसत्य असावे. २) मूळ यज्ञ कल्पनेचे भ्रष्ट रूप असावे किंवा ३) प्राचीन मानवाच्या / विकासाभिमुख धडपडीचा एक टप्पा असावा. तुला भक्तिभावपूर्वक प्रणिपात असोत.

**४) भूतभव्यभवत्प्रभुः । भूतभव्यभवत्प्रभवे नमः ।**

भूत, भविष्य व वर्तमान काळातील सर्व विश्वव्यापारांचा धनी तू आहेस. कारण तूच सर्वात तरल आहेस. जड पदार्थ, शक्ती, अवकाश आणि काळ यांच्याही पेक्षा तू तरल असल्यामुळे या साऱ्या बाबी तुझ्या सत्तेनेच नियंत्रित होतात. अशा तऱ्हेने सर्वात तरल, सर्व सत्ताधीश व सर्वज्ञ स्वामी तूच आहेस. माझे अस्तित्व तुझ्या विश्वसंकल्पाशी समरस होवो, ही तुझ्या चरणी प्रार्थना. तुला त्रिवार वंदन असो.

**५) भूतकृत । भूतकृते नमः । भूतानि करोति इति भूतकृत्** किंवा,

**भूतानि कृन्दति इति भूतकृत् ।**

ब्रह्मदेव ही सृजनशील तत्त्वाची आणि रूद्रमूर्ती ही संहाराच्या तत्त्वाची कल्पना दोघींना धारण करणारा व त्याद्वारे विश्वनिर्मिती व विश्वविलय ह्या दोघांचेही मूलस्थान/ आधारस्थान/ कारण असलेला, असा तू आहेस. म्हणजे, तिन्ही गुणांची उत्पत्ती व कार्य तुझ्यापासूनच उत्पन्न होते आणि तुझ्यातच विलीन होते. तू मात्र ह्या सर्वांमध्ये सारतत्त्वाने असून त्यांच्या आधी व नंतरही चिरंतनपणे राहतोस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**६) भूतभृत । भूतभृते नम : ।**

सत्वगुणाला म्हणजेच विष्णु ह्या विश्वपोषण करणाऱ्या देवतेला धारण करून विश्वाचे पोषण करणारा 'स्थितीचा कारक' तूच आहेस. म्हणजेच विश्वाची उत्पत्ती, स्थिती व संहार ह्यांचा कारक तूच आहेस. अन्य अर्थाने पाहिल्यास शरीरामध्ये चैतन्य ओतणारा प्राणही तूच आहेस. त्याचप्रमाणे ज्याच्या स्मरणाने चैतन्याचा व शक्तीचा संचार होतो व अनुभवाला येतो तोही तूच आहेस. तुला भक्तीपूर्वक नमन असो.

**७) भाव : । भावाय नमः । भवति इति भावः ।**

तूच हे सारे चराचर विश्व बनला आहेस. ह्या चराचरातील ज्ञानेंद्रिये असलेले व नसलेले असे सर्व सजीव आणि निर्जीवही तूच आहेस. कारण हे सारे म्हणजे वेगवेगळे दागिने असावे तसे आणि तू त्यांचे मूलद्रव्य जे सोने त्यासारखा आहे. त्याचप्रमाणे हे सर्व सृजनभावाने उत्पन्न होण्याची प्रक्रिया व त्या प्रक्रियेचा जनक तूच आहेस. अशा तऱ्हेने विश्व, विश्वनिर्मिती आणि निर्माता ह्या सर्व नात्यानी तू विश्वाला अंतर्बाह्य व्यापून राहिला आहेस. तुला शतशः नमस्कार असोत.

**८) भूतात्मा । भूतात्मने नमः ।**

सर्व प्राणीमात्रांना सत्प्रेरणा देण्यासाठी त्यांच्या अतंर्यामी ( व बाहेरसुद्धा) वास करणारा आत्मा म्हणजे अविनाशी कालातीत तत्त्व. ह्या तुझ्या कल्याणकारी अस्तित्वानेच एकात्मता आणि उदात्तता विश्वात अवतरू शकते. तुला अंतःकरणपूर्वक प्रणाम असोत.

**९) भूतभावनः । भूतभावनाय नमः ।**

पंचमहाभूतांमध्ये वर्गीकृत केलेल्या विश्वातील सर्वांचा-अगदी अणु-रेणु-अवकाश-काळ-जाणिवांचे विश्व इत्यादी-सर्वांचा उत्पन्नकर्ता तू आहेस. त्यामुळे

माझ्याही प्रत्येक कृतीचा कर्ता तूच आहेस या जाणिवेत माझे तुला विनम्र प्रणाम असोत.

**पूतात्मा परमात्मा च मुक्तानां परमा गतिः ।**
**अव्ययः पुरुष साक्षी क्षेत्रज्ञोऽक्षर एव च ॥**

**१०) पूतात्मा । पूतात्मने नमः ।**

शुद्धतम आत्मा. तू विश्वाचा, त्यातील अणुरेणूचा केंद्रीभूत व साररूप असा नियंता आहेस व कोणत्याही व्यक्तिगत क्षुद्रतेचा स्पर्श नसल्याने पवित्रतम आहेस. सर्वांच्या अंतर्यामी व बाहेरही असूनही व्यक्तिगत विकारानी आणि विकारांचे मूळ जे 'त्रि'गुण त्यानी लिप्त न झाल्याने तू सर्वांच्या कल्याणाचा कारक व सर्वश्रेष्ठ न्यायदाता आहेस. या दृष्टीनेही तू पवित्र आहेस. तुझ्यामध्ये सर्वस्वाचा विलय होतो, चित्तवृत्ती तुझ्याचरणी लीन राहोत व तुझ्या चरणामृतपानाने शुद्ध, बुद्ध व समर्थ होवोत ही प्रार्थना.

**११) परमात्मा । परमात्मने नमः ।**

सर्वोच्च कारक तत्त्व. विश्व, त्यातील बदल , त्या बदलांमागची कारणे त्या कारणांमधील बदल, अंतराळ, ह्या सर्वांना सामावणारा काळ, ह्या सर्वांना कवेत घेणारी बुद्धी व जाणीव, ह्या सर्वांना तू स्वतःमध्ये सामावून घेतलं आहेस आणि तू त्यांचा नियंताही आहेस. साऱ्या विश्वाचा इतिहास स्वतःमध्ये सामावल्याने तुला 'इतिहासातीत' असेही जाणणे योग्य आहे. कारण त्यामुळे इतिहासावर आधारलेल्या विचारसरण्यांची मर्यादा स्पष्ट होऊ शकते. तुझ्या अनुसंधनात तुला अखंड नमन असो.

**१२) मुक्तानां परमा गतिः । मुक्तानां परमायै गतये नमः ।**

गती म्हणजे अखेरची स्थिती. अखेरचे व कायमचे अवस्थांतर. जिवांची श्रेष्ठतम अंतिम अवस्था म्हणजे भगवत्स्वरूप होणे. व्यक्तिगत आशा-आकांक्षा आसक्ती-अहंकाराची बंधने नष्ट होऊन जीव विश्वात्मक होतो. ही अवस्था 'मुक्तावस्था' व हे जीव 'मुक्तात्मे' म्हणून ओळखले जातात. जिवांचे हे एक प्रकारचे स्थित्यंतर असते. शिवाय, गती म्हणजे ईप्सितावस्था. सत्य हेच मुक्तांची गती व सत्यातच मुक्तजन अखेरचा कायमचा विसावा घेतात म्हणून व्यक्तिगत क्षुद्रता नष्ट झालेल्या विश्वात्मक झालेल्या महात्म्यांचे ईप्सित व परमप्रिय स्थान तू आहेस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**१३) अव्ययः । अव्ययाय नमः ।**

व्यय म्हणजे नाश पावणे, स्थित्यंतरीत होणे. बदलणे. अव्यय म्हणजे बदलरहित. म्हणजेच स्थित्यंतरीत न होणारा. कधीही नाश न पावणारा. आधुनिक विज्ञानानुसार,

शक्ती-ऊर्जा व पदार्थ नष्ट न होता रूपांतरित होतात. परंतु पोकळी, काळ व जाणिवांना खचितच वेगळे नियम असायला हवे. त्यांचप्रमाणे त्यांच्यात स्थित्यंतरेदेखील कमीत कमीच असायला हवी. अन् हे जर खरं तर कालातीत व जाणिवांच्या अतीत असा तू उत्पत्ती, स्थिती, बदल, नाश यांनी बद्ध नसणे स्वाभाविक अन् तर्कसंगतही आहे. विश्वचैतन्यात्मक, सच्चिदानंदमय अशा अविनाशी ईश्वरा, तुला अखंड प्रणिपात असो.

१४) **पुरुष : । पुरुषाय नमः । ''पुरि शेते इति पुरुषः ।**

शरीर नगरीचा राजा, किंवा **''पुरा आसीत् इति पुरुषः''**विश्वापूर्वीही अस्तित्वात असणारा किंवा **''पूरयति इति पुरुषः''** सर्व अस्तित्वाला पूर्णत्व देणारा असा.

थोडक्यात, आयुर्वेदात वर्णन केलेला चिकित्सा करण्यास योग्य पुरुष आणि सांख्य तत्त्वज्ञानातील विश्वात्मक पुरुष तूच आहेस. शरीरामध्ये शारिरीक-मानसिक सुखदुःखांचा भोक्ता व विश्वात्मकतेने विश्वातील सर्व बाबींचा उपभोक्ता तूच आहेस. सुख-दुःखादी फळे व त्यामुळे येणारा अहंकार वा न्यूनता व्यक्तीने स्वतःकडे घेणे हे अज्ञान आहे. ज्याप्रमाणे लिहिण्यासारखा कृतीचा कर्ता हात नसून मेंदू असतो हे आपण समजून घेतो त्याचप्रमाणे शरीराच्या सर्व व्यापारांचा कर्ता शरीरापूर्वी होता, शरीर असताना आत व बाहेर आहे व नंतरही राहील व विश्वात्मकही आहे. ज्याप्रमाणे वादळामध्ये एखाद्या खिडकीचं दार उघडलं म्हणून खिडकीचं दार हे कर्ता बनत नाही आणि वादळ हे खिडकीपुरतं सीमितही रहात नाही, त्याचप्रमाणे शरीर-मन इत्यादींच्या मार्फत होणाऱ्या क्रिया व त्यांचे फळ आणि विश्वोत्पत्तीसारख्या क्रिया व व त्यांचे फळ यांचा कर्ता व भोक्ता शरीरापुरता वैयक्तिक अहंकारापुरता किंवा केवळ बाह्य भौतिक विश्वापुरता सीमित रहात नाही. हे अंगी भिनले की आत्मज्ञान होते. तुला मनःपूर्वक नमस्कार असोत.

१५) **साक्षी । साक्षिणे नमः । 'साक्षात् द्रष्टारि साक्षी स्याद्** किंवा **'स अक्षी'**

सर्व क्रियांचा कारक व ज्ञाता पण त्यांच्यात रूढार्थाने प्रत्यक्ष भाग न घेणारा सर्व चराचराच्या चलनवलन आणि अस्तित्वाचा साक्षीदार. खऱ्या साक्षीत्वासाठी अतंर्बाह्य सारे अणुरेणू व्यापावे लागते. जाणिवांच्या स्तरातही असावे लागते. तरलतम अशा अस्तित्वाशिवाय ( जे रूढ नियमात बसत नाही) हे शक्य नाही. केवळ तूच अशा तऱ्हेने असणारा व सर्व पाहणारा साक्षी आहेस. स्पष्टीकरणासाठी पोकळीचे उदाहरण घेता येईल.पोकळी वस्तूला आणि तिच्या अणुरेणूंनाही अंतर्बाह्य व्यापते. पण रूढार्थाने वस्तू आणि अणुरेणूतील प्रक्रियांमध्ये पोकळी प्रत्यक्ष भाग घेत नाही. तुला विनम्र प्रणिपात असोत.

**१६) क्षेत्रज्ञ :। क्षेत्रज्ञाय नमः ।**

क्षेत्र म्हणजे शरीर. व्यक्तीचे व विश्वाचे शरीर व त्यांच्या अंतर्बाह्य घडणारे सारे काही जाणणारा. आधुनिक विज्ञानानुसार जगाचं ज्ञान इंद्रियांमार्फत होत असलं तरी इंद्रिये, मज्जातंतू, मज्जापेशी ह्यातले कोणीही जाणणारे नाहीत. शरीराच्या अंतर्बाह्य अस्तित्वाच्या साऱ्या पातळीवरील घडामोडी आणि विश्वातील प्रक्रियांचा खरा ज्ञाता आणि चैतन्यमय ईश्वर तू आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**१७) अक्षरः । अक्षराय नमः ।**

नाश न पावणारा. कधीही न घटणारे, न संपणारे असे त्रिकालबाधित परब्रह्म तूच आहेस. जाणिवांचे उन्नयन झाल्यानंतर 'स्व' चे खरे रूप म्हणून ज्याला आत्मज्ञानी लोक ओळखतात ते अविनाशी ब्रह्म तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**योगो योगविदां नेता प्रधानपुरुषेश्वरः ।**
**नारसिंहवपुः श्रीमान् केशवः पुरुषोत्तमः ॥**

**१८) योग : । योगाय नमः ।**

योग म्हणजे जुळणे, एकजीव होणे, एकत्व पावणे, योगाचे ऋणानुबंध, काळयोग, दैवयोग असेही अर्थ आहेत. कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, मन, बुद्धी, अहंकार इत्यादीच्या घडामोडींशी म्हणजे 'वैयक्तिक स्व'शी निगडीत राहता राहता ह्या पातळीवरून व्यक्तीचे अस्तित्व वैश्विक मूलस्वरूपाशी जाणिवेने आणि वास्तविकपणे निगडीत होण्याच्या प्रक्रियेस व अवस्थेस योग म्हणतात. योगसिद्धीची अवस्था प्राप्त व्हावी यासाठी भिन्न भिन्न प्रकृतीच्या व प्रवृत्तीच्या अधिकारी व्यक्तींना रूढ केलेल्या व वेगवेगळ्या साधनांनी वैशिष्ट्यपूर्ण बनलेल्या या प्रक्रियेच्या विविध प्रकाराना भक्तियोग, ज्ञानयोग, राजयोग, कर्मयोग, लययोग इत्यादी नावानी ओळखतात. ही अवस्था व ही प्रक्रिया तूच आहेस. त्याचप्रमाणे खगोलाचे २७ वा २८भाग केले जातात त्यानाहि योग म्हणतात. थोडक्यात एकत्वाने सर्वत्रसमरसून असलेला व पिंड-ब्रह्मांडामधील दुवाही तूच आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**१९) योगविदां नेता । योगविदां नेत्रे नमः ।**

योगविद् म्हणजे योग जाणणारे, योगी, योगाचार्य. या योगी जनांचा नेता, मार्गदर्शक, प्रेरक तू आहेस. तसं पाहिलं तर साऱ्या विश्वाचाही तू नियंता आहेस. पण तो अप्रत्यक्षपणे. अज्ञानी जनांना त्याचे भान नसते. ते स्वतःच्या मर्यादित, संकुचित, आंशिक व नश्वर अस्तित्वाला पूर्ण, चिरंतन आणि श्रेष्ठतम समजून संकुचित हव्यास व आशा - आकांक्षामध्ये बेभानपणे, मस्तवालपणे किंवा असहायपणे वावरत असतात. परंतु

योगी लोकांचे तसे नसते. मायेच्या जोरदार प्रवाहातून उसळी घेऊन ते कुशलतेने स्वतःच्या खऱ्या शाश्वत व पूर्ण 'स्व' शी तादात्म्य पावलेले असतात. त्यामुळे त्यांचे सर्व जीवन, तुझ्या प्रेरणांनी प्रत्यक्षपणे नियंत्रित होत असते. व तुझ्या वैश्विक संकल्पानुसार घडत असते व याची त्याना स्पष्ट आणि सुखद जाणीव असते. जीवनाची ही कृतकृत्य अवस्था तुझ्या संकल्पानुसार सर्वांना प्राप्त होवो ही मनःपूर्वक प्रार्थना. तुला शतशः प्रणिपात असोत.

**२०) प्रधानपुरुषेश्वरः । प्रधानपुरुषेश्वराय नमः ।**

प्रधान म्हणजे माया, शक्ती, पुरुष म्हणजे जीवात्मा, आत्मा. व्यक्ती वा चराचरातील शक्ती तत्त्व आणि साक्षी पुरुषत्त्व यांचा नियंता ईश्वर तू आहेस. तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**२१) नारसिंहवपु : । नारसिंहवपुषे नमः ।**

नर+सिंह+वपु म्हणजे अनुक्रमे माणूस, सिंह व शरीर, आकार, रूप किंवा सौंदर्य. म्हणून नारसिंहवपुः म्हणजे अर्धा नराचा व अर्धा सिंहाचा आकार, शरीर असलेला हा विष्णुचा चवथा अवतार. चराचरातील चैतन्याचा (पशुत्व, माणुसकी, ईश्वरत्व इ.) साक्षात्कार होताच स्वतःच्या क्षुद्र अस्तित्वाला माणूस मुकतो.ह्याची प्रचिती नारसिंह व हिरण्यकश्यपुच्या कथेने येते. या कथेतून व नारसिंह ह्या नावातून, हेही कळते की चराचरातील तुझ्या अस्तित्वाच्या (सत्याच्या)कल्पनेमुळे तमोगुणाने व आसक्तीनेबद्ध झालेल्यांना अत्यंत भीती वाटते. कारण त्यांना अहंकाराशिवाय जगण्याची कल्पनाच महाभयंकर , असह्य, अशक्य वाटते. मृत्यूसमान वाटते. तुला त्रिवार वंदन असो.

**२२) श्रीमान् । श्रीमते नमः ।**

श्री सहित असणारा. श्री म्हणजे लक्ष्मी. लक्ष्मी म्हणजे ऐश्वर्य व विश्वातील साऱ्या सृजनशीलतेची, प्रेरकशक्तीची साऱ्या त्रिगुणात्मक व पंचमहाभूतात्मक विश्वाची माता, मूळमाया, महालक्ष्मी. तू ह्या लक्ष्मीसहित असतोस. कारण ती तुझ्या हृदयात असते, तुझ्याशी समरस असतेच. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२३) केशवः । केशवाय नमः ।**

निर्मिती, स्थिती व संहार तत्त्वांच्याही अतीत अर्थात् कालातीत असे तत्त्व. त्यामुळे ही तत्त्वे निर्देशित करणाऱ्या ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवता ज्याच्या अधीन आहेत असा. दुसऱ्या अर्थी केशव म्हणजे केशिनामा या राक्षसाचा वध करणारा. अन्य सर्वसामान्य अर्थाने सगुण रूपामध्ये उत्तम केस असलेला. त्यामुळे सगुण रूपात सुंदर

आणि दुसऱ्या अर्थी कालातीतने सर्व पाशवी-राक्षसी बाबींचा संहार करू शकणारा तू आहेस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**२४) पुरुषोत्तमः । पुरुषोत्तमाय नमः ।**

पुरुषोत्तम म्हणजे उत्तम किंवा सर्वात चांगली व्यक्ती. सर्वात चांगला पुरुष हे तुझे रूप लोक भजतात तेव्हा त्यांना नाशिवंत आणि स्थित्यंतरणीय दैहिक पुरुषाहून तुझे अस्तित्व किती उच्चतम आहे याची जाणिव होते. तुझ्या सर्वश्रेष्ठ अशा वैश्विक पौरूषात्वाची , स्वामित्वाची थोडीफार कल्पना येते. गीतेमध्ये, ''क्षराच्या अतीत व अक्षरातही सर्वोत्तम असल्याने मला (ईश्वराला) पुरुषोत्तम म्हणतात'' असे स्पष्टपणे म्हटले आहे. (पंधरावा अध्याय). अशा तऱ्हेने सर्वच दृष्ट्या तू सर्वश्रेष्ठ पुरुष आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**सर्वः शर्वः शिवः स्थाणुर्भूतादिर्निधिव्ययः ।**
**संभवो भावनो भर्ता प्रभवः प्रभुरीश्वरः ॥**

**२५) सर्वः । सर्वस्मै नमः ।**

सर्व विश्वातील अणुरेणू असे सर्व काही. सर्व काही त्याच्या आरंभापूर्वी व नाशानंतर तुझ्यात विलीन होते. कारण चराचरच्या आरंभापूर्वीचे व अंतानंतरचे मूळ स्वरूपच तू आहेस. माझे तुला अनन्य भावे नमस्कार असोत.

**२६) शर्वः । शर्वाय नमः ।**

पवित्र, मंगलमय. तू अविनाशी व त्रिकालातीत असल्याने भीती, संकट, नाश , वैर, बंधन, इत्यादींपासून पूर्णपणे मुक्त आहेस. त्यामुळे तू खरा मंगल आहेस. प्रापंचिकांची संकुचित व जड बुद्धी तुझ्या स्मरणात विशाल, तरल व मंगल होते. अस्तित्वही तुझ्या स्मरणात अविनाशी व म्हणून मंगल होते. प्रकाशमय, प्रसन्न, व संपन्न होते. माझे मस्तक अखंडपणे तुझ्याचरणी राहो ही प्रार्थना.

**२७) शिवः । शिवाय नमः ।**

शुद्ध, ज्ञानमय व पवित्रतम असे तत्त्व. पवित्र्य म्हणजे आत्मज्ञान. अपवित्रता म्हणजे अज्ञान किंवा आत्मज्ञानाचा विसर व क्षुद्रता, संकुचितता व हिंस्त्रतेचा वावर, थैमान. तू त्रिगुणातीत, आत्मज्ञानमय व म्हणून शुद्धतम, शिव आहेस. शरीर-मन-बुद्धी अहंकार यातून उत्पन्न होणारे माझे सारे काही तुझ्या पायाशी समर्पित असो.

**२८) स्थाणुः । स्थाणवे नमः ।**

राष्ट्रसीमा दाखविणारे स्तंभ विशाल दृष्टीने पाहिल्यास विश्वाची अंतिम सीमा केवळ

तुझ्यामुळेच समजते. कारण तूच अनादि, अनंत आणि चिरंतन आहेस. सारं त्रिगुणात्मक विश्व तुझ्यातच आहे. तू कालातीत असल्याने भूत, वर्तमान भविष्यादी साऱ्या घटनाही तुझ्यातच आहेत. शरीरात्मकता किंवा देहबुद्धी आणि क्षणभंगुरातील आसक्ती संपून माझे सर्व लक्ष आत्मरंगी व आत्मरूपी एकाग्र राहो. आत्मरूपी तुला शतशः प्रणाम असोत.

**२९) भूतादिः । भूतादये नमः ।**

सर्व भूत मात्रांचा आरंभ, उगम. कालातीत असा तू सर्वांचा खरा उगम आहेस. एकाच वेळी स्थळ कालातीत असणाऱ्या, शरीर,मन,बुद्धीच्या अंतर्यामी रहाणाऱ्या व अनुभूतीने जाणवणाऱ्या तुला लीनभावनेने वंदन असो.

३०) **निधिः ।** किंवा **निधिरव्ययः । निधिव्ययाय नमः ।**

कधीही न बदलणारा निधी. **निधियते अस्मिन् इति निधिः ।**

विश्वातील सुरक्षित व गुप्त असा संपूर्ण चैतन्याचा व ऐश्वर्याचा स्थलकालातीत, सूक्ष्माहून सूक्ष्म व विशालतमाहूनही विशाल खजिना तू आहेस. तुला स्थलकालाचे तसेच जड चैतन्याचे रूढ नियम नाहीत. त्यामुळे तू नेहमीच परिपूर्ण असतोस. तुझ्यातून काही काढून घेतले किंवा नवीन कशाची तुझ्यात भर घातली असे कधीच नसते. विश्वप्रलयकालीही अविनाशी, चिरंतन, व परिपूर्ण अशा अस्तित्वाने तू असतोसच. तुझ्यासमोर क्षणभंगुर विश्वातील सारे काही तुच्छ आहे. तुला मी काया -वाचा -मनाने समर्पित आहे.

**३१) सम्भवः। सम्भवाय नमः ।**

प्रकट होणे किंवा प्रकट करणे. चराचर सृष्टीचे असणे—नसणे यामध्ये खऱ्या अर्थाने व सर्वकाळी असणारा व सृष्टीद्वारे प्रकट दिसणारा तूच आहेस. कारण संभवणाऱ्या साऱ्या बाबींचे आदीकारण, सारतत्त्व आणि ह्या सर्व बाबींना सर्व दिशांनी व भूत भविष्य कालानी व्यापणारे महत्त्व तूच आहेस. अन्य दृष्टीने, संपूर्ण ज्ञानमय अशा अस्तित्वाने पुन्हा पुन्हा अवतार घेणारा व विश्वाला चेतना देणारा परंतु अज्ञानांधकारी खितपत पाडणारे व अज्ञानजन्य भोग भोगवणारे जन्म न घेणारा सहजज्ञानी परमात्मा तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**३२) भावनः। भावनाय नमः ।**

प्रत्येक घटनेला उत्तम परिणाम देणारा. सर्व घटनाक्रमांचा उद्गाता व नियंता तू आहेस. त्यामुळे प्रत्येक घटना जी आजूबाजूला, व्यक्तीच्या शरीरात किंवा व्यक्तीच्या

करवी घडते (पुष्कळदा व्यक्ती या घटनेचे कर्ते पण स्वत:कडे घेते) त्यांचे मूळ, कारण व परिणाम हे सर्व काही तू व्यापलेले आहेस. एवढेच नव्हे परिणामांचा भोग घेणाराही (व्यक्ती नव्हे) तूच आहेस. अहंकारानेच व्यक्ती कर्तेपणाची व सुखदु:खांच्या धक्कयांची मालक बनते. तुझ्या अंतर्बाह्य स्वामित्वाची मला सतत स्मृती राहो व या स्मृतीत तुला शतशः नमस्कार असोत.

**३३) भर्ता । भर्त्रेन नमः ।**

म्हणजे पालन–पोषणकर्ता आधार, ढोबळमानाने पाहता, पेशीला ज्याप्रमाणे पेशीकेंद्र धारण व नियंत्रित करते तसा किंवा जिंवत व्यक्तीला देहांतर्गत चैतन्य जसे आधारभूत असते (म्हणजे ज्याच्याशिवाय शरीराचे कलेवर बनते, माती बनते) तसा विश्वाचा चैतन्यदायी धारणकर्ता आधार तू आहेस. जड –चेतन, दृश्य–अदृश्य आणि भूत भविष्यादी सर्वांचा मूलाधार, संगोपनकर्ता व शक्तिदाता तू आहेस. तुला अनन्यभावे प्रणिपात असोत.

**३४) प्रभवः । प्रभवाय नमः ।**

गर्भाशय, किंवा ज्यापासून सारे उगम पावते असा. पंचमहाभूतात्मक आणि त्रिगुणात्मक विश्व, चेतना, अवकाश, काळ व जाणिवांचे स्तर हे काही जन्माला घालणारे (गर्भाशय) तू आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**३५) प्रभुः । प्रभवे नमः ।**

कर्तुम, अकर्तुम अन्यथा कर्तुम असे, अनुक्रमे, करण्याचे, न करण्याचे व अन्य काहीही करण्याचे स्वातंत्र्य असलेला. सर्व व्यापी अशा अस्तित्वातीत अस्तित्वाने घडणे व न घडणे यांच्या अतीत व उत्पत्ती विनाश या स्थित्यंतरादरम्यानही तू आहेस. अंतर्बाह्य सारे व्यापणारा व्यक्तीचे खरे स्वरूप असा तू व तुझे महान सामर्थ्य व स्वामित्व निष्कपट व शुद्ध बुद्धीच्या भक्ताना जाणवते. घडणे व न घडणे एवढेच नव्हे, तर एकाच वेळी अनेक ठिकाणी घडणे तसेच जाणीव, काळ, अवकाश व घटना यांच्या दरम्यान अनाकलनीयपणे संबंधित असलेल्या अगम्य प्रक्रिया घडणे, या साऱ्यांचे स्वामीत्व तुझ्यापाशी आहे याची जाणीव व प्रचीती वैयक्तिक परिमाणे संपताच (अंशाला पूर्ण समजण्याची गल्लत संपताच) येते. तुला विनम्र प्रणाम असोत.

**३६) ईश्वरः । ईश्वराय नमः । ईष्टे इति ईश्वरः ।**

सारे विश्व म्हणजे तुझ्यावर अवलंबून असलेल्या म्हणजे तुझ्यापासून उत्पन्न होऊन तुझ्यातच विलीन होणाऱ्या तुझ्या उपाधी होत. अविनाशी आणि सर्वसत्ताधीश अशा

तुला मी त्रिवार वंदन करतो.

**स्वयंभू : शंभुरादित्यः पुष्कराक्षो महास्वनः ।**
**अनादिनिधनो धाता विधाता धातुरुत्तम : ।।**

**३७) स्वयंभू : । स्वंयभुवे नमः ।**

कोणत्याही कारणाने न घडणारा, परिणामस्वरूप नसणारा. तू, कारणे परिणाम या द्वंद्वाच्या अतीत असे महाकारण आहेस. अन्य अर्थाने, परावाणीच्या व जाणिवतेच्या अतीत अशा ज्या महान 'जाणीवरूपात' तू असतोस त्यामध्ये सारे काही विलय पावते व तू मात्र स्वतःतूनच उद्भवून स्वतःतच राहतोस आणि पवित्र व स्वतंत्र अस्तित्वाने चिरंतन, असतोस. तुला मनःपूर्वक प्रणाम असोत.

**३८) शम्भु : । शंभवे नमः।**

शिव शिव म्हणजे सर्वोच्च आणि चिरंतन कल्याणमय, कल्याणकारी. ज्याच्या भावना तुझ्यामध्ये केंद्रित झालेल्या असतात व जाणिवा तुझ्याशी समरस झालेल्या असतात, तो तुझ्यापासून विभक्त रहात नाहीत. त्यांच्या मर्यादित अस्तित्वात स्थित्यंतर होऊन अस्तित्वाच्या सर्व स्तरांवर तो तद्रुप होतो. त्याच्या जीवनाची मूलभूत प्रेरणा केवळ तूच असतोस. तू त्याच्या जीवनाचा मूलाधार व तेजोस्त्रोतही असतोस. ज्याला हे जाणवते तो त्याच्या अंतःकरणातून तुझ्याशी कायमचे नाते जोडतो व अजरामर होतो. अशा ज्या भक्ताला दैहिक व व्यावहारिक अशी क्षणभंगुर सुखदुःखे प्रभावित करू शकत नाहीत व जो कायम तुझ्या स्मरणात परमानंदी राहतो तो भक्त अंतर्बाह्य पवित्र होतो व कल्याणकारी होतो. तुला सहस्त्रवार वंदन असो.

**३९) आदित्यः । आदित्याय नमः ।**

आदितीचा पुत्र, वामनावतार. सूर्यमंडळातील हिरमण्य पुरुष. बारा आदित्यामध्ये विष्णु. ही सारी सगुण रूपे तुझे निर्णायक श्रेष्ठत्व आणि निर्गुण महत्त्व विशद करण्यासाठी वापरतात. सूर्य जसा किरणांमुळे अनेकत्वमय भासतो तसाच विश्वरूपी विस्ताराने तू अनंत भासतोस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४०) पुष्कराक्ष :। पुष्कराक्षाय नमः ।**

कमळासारखे डोळे असलेला. तुझ्या निर्गुण व निराकार अस्तित्वाशी एक होण्याचा मार्ग म्हणजे सर्व काही विशेषतः अहंकार दुय्यम ठेवून सगुणोपासनेला जीवनात सर्वोच्च स्थान देणे. नामस्मरण करणे व तुझ्या लोकविलक्षण सुंदर सगुण मूर्तीची पूजा करणे. कमळासारखे सुंदर डोळे असलेला हे तुझं एक सगुण रूप आहे. दुसऱ्या अर्थी कमळ

म्हणजे आकाश. त्यामुळे सारे विश्व हे ज्याचं शरीर, विश्व चैतन्य सर्वज्ञ परमात्मा हे ज्याचं अंतर्याम आणि अवकाश व काळ हे ज्याचे डोळे आहेत व या डोळ्यानी अंतर्बाह्य सारे काही जो पाहतो असा तू आहेस. माझे सर्वस्व तुझ्या चरणी लीन असो व तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४१) महास्वनः। महास्वनाय नमः।**

महाध्वनी करणारा किंवा मोठा श्वास घेणारा. विश्वाच्या उत्पत्तीचे पहिले चिन्ह किंवा पहिला अविष्कार ॐ या ध्वनीने सूचित होतो. व्यक्तीमध्ये परावाणीचे स्थान बेंबी आहे. हे स्थान अनुभवाने ठरवलेले आहे. व्यक्तीच्या व्यक्तित्वाच्या अविष्काराची सुरुवात येथून अत्यंत सूक्ष्मतम ध्वनीने होतो. शारीरिक दृष्ट्याही बेंबी हाच मागची पिढी व पुढच्या पिढीमधील दुवा असतो. व्यक्तिजीवनाच्या उगमाचे/ मूलाधाराचे व्यक्त स्वरूप असते. थोडक्यात साऱ्या विश्वाच्या अविष्काराचा व व्यक्तिच्या आविष्काराचा उगम, त्याचाही उगम व कर्ता तू आहेस. या शब्द ब्रह्माची पहिली प्रज्ञामय जाणीव म्हणजे वेद. वेद म्हणजे ज्ञान म्हणजे तुझा निःश्वास, तुझा हुंकार. म्हणून तुला आदिगुरुही म्हणतात. तुला सर्वस्व अर्पण असो व तुझ्याचरणी विनम्र प्रणिपात असोत.

**४२) अनादिनिधन :। अनादिनिधनाय नमः।**

जन्म–मृत्यूरहित. जन्म व मृत्यू ह्या बाबी आकार–प्रकारादी मर्यादेतील वस्तूंकरिता असतात. तू सर्वतोपरी, सर्व दिशांना, सर्व कालांमध्ये पसरलेला व सूक्ष्मतम आणि विशालतम आहेस. त्यामुळे तू अस्तित्व व नाश यांच्या अतीत आहेस. त्यामुळे आणि तू जाणिवेच्या आणि अस्तित्वाच्याही सर्व स्तरांत एकाच वेळी असल्यानेच तुला जन्म व मृत्यू नसलेला अनादिनिधनः म्हटले आहे. तुझ्या चैतन्यमय चरणी अखंड प्रणाम असोत.

**४३) धाता। धात्रे नमः।**

आधार देणारा. तूच खरोखर सर्वांच्या अंतरंगाचा त्यांच्या सर्वस्वाचा मूलाधार आहेस. साऱ्या दृश्य आणि अदृश्य विश्वाचे मूलतत्त्व व मूलाधार आहेस. तू विश्वाला सर्व बाजूंनी व सर्वतोपरी आधार देतोस. तुझ्या एकमेवद्वितीय स्वामित्वाच्या स्मरणात तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४४) विधाता। विधात्रे नमः।**

कर्माचे फल देणारा. याचा अर्थ प्रत्येक घटना किंवा प्रसंगाच्या कार्यकारण भावाच्या,

(पदार्थ विज्ञान–रसायनशास्त्राच्या) ज्ञात–अज्ञात नियमांचा नियंता. सारे घटनाक्रम तुझ्यात सामावलेले आहेत. त्यामुळे परिणामांचा नियंता तू आहेस. अज्ञानजन्य दु:ख व ज्ञानजन्य मुक्ती व सच्चिदानंद यांचा कर्ताही तूच आहेस. मी तुला शरण आहे. व्यक्ती म्हणून माझे सर्वस्व तुझ्या संकल्पात विलीन होवो. तुला माझे नम्र प्रणाम असोत.

**४५) धातुरूत्तम : । धातुरुत्तमय नम: ।**

सर्वोत्तम असा चित् धातू तू आहेस. म्हणजेच पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या विश्वाला आधार देणाऱ्या धातूपेक्षाही सर्वोत्तम आणि अविनाशी असा असा धातू तू आहेस. अन्य दृष्टीने गुणवैशिष्ट्य संपन्न असे अस्तित्व धारण करणारा तो पदार्थ या अर्थाने सारे विश्व त्यांच्या अस्तित्व आणि संहारासकट व गुणवैशिष्ट्यांसकट धारण करणारा पदार्थ किंवा खराखुरा चिरंतन धातू तू आहेस. म्हणूनच तुझे नामस्मरण हे मुक्तीचे साधन व साध्य आहे तसेच सिद्धता आहे. आणखी एका अर्थाने व्यक्तीच्या शारीरिक धातुंना व त्यामुळे व्यक्तिमत्वाला ज्ञानाचे व चिरंतन जाणिवेचे अविनाशी परिणाम देणारा धातू तू आहेस. तूच धातूनांही धारण करणारा व अंतर्बाह्य जपणारा, सर्वश्रेष्ठ धातू तू आहेस. तुला समर्पण भावनेने माझे प्रणाम असोत.

**अप्रमेयो हृषीकेश: पद्मनाभोऽमर प्रभु: ।**
**विश्वकर्मा मनुस्त्वष्टा स्थविष्ठ : स्थविरो ध्रुव: ।।**

**४६) अप्रमेय: । अप्रमेयाय नम: ।**

प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष उपमा वगैरे कोणत्याही प्रकारे प्रमेयात बसवून सिद्ध करता न येणारा.

तू कोणत्याही संदर्भ चौकटीत बसवून अनुभवास येत नाहीस. तू स्थळ, काळ, जड, चेतन यात अंतर्बाह्य आणि यांच्या अतीतही अखंडपणे असतोस व बुद्धिगम्य नाहीस. केवळ तद्रुप होऊनच तुझे कर्तेपण हृदयाला भिडू शकते. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४७) हृषिकेश : । हृषिकेशाय नम: ।**

हृषिका म्हणजे ज्ञानेंद्रिये व ईश म्हणजे ईश्वर. सर्व ज्ञानेंद्रियांचा व त्यांच्या कृतीचा स्वामी तू आहेस या सार्थ जाणिवेने अज्ञानजन्य अहंभाव कमी होऊ शकतो. तद्रुपता येऊ शकते. हृषिका याचा अन्य अर्थ किरण. चेतनादायी व ज्ञानदायी किरणानी विश्वाला चैतन्य देणारा व जाणिवतेचे विश्व ज्ञानाने समृद्ध करणारा चैतन्यसूर्य व ज्ञानसूर्य तू आहेस. विश्वरूपाचा आविष्कार करणारा व कल्पांती ते स्वत:त सामावून घेणारा

निर्गुण–निराकारही तू आहेस व हृष  म्हणजे कुरळे केस असलेला विलक्षण सुंदर सगुण ईश्वरही तूच आहेस. तुला भावपूर्ण प्रणिपात असोत.

**४८) पद्मनाभः । पद्मनाभाय नमः ।**

सत्य व सामर्थ्याचे प्रतीक असे कमळ सगुण रूपांमध्ये ज्याच्या बेंबीतून उगवताना दाखवले जाते असा. ह्या कमळात ब्रह्मदेव दाखवतात. कारण कमळ म्हणजे जीवनाचा चिरंतन मूळस्त्रोत आणि चारमुखी ब्रह्मदेव म्हणजे मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार यानी बनणारे अंत:करण चतुष्य. तू व्यक्तीच्या बेंबीमधून म्हणजे परावाणीतून अंत:करण चतुष्ट्याचा व आदी पुरुषांच्या बेंबीतून ब्रह्मदेवाचा व सृष्टीचा उगम करतोस हा मथितार्थ. व्यक्तिजीवनाचा मूळ गाभा बेंबीच्या स्थानी असतो. तेथून परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखारी ह्या चार वाणींच्या द्वारे (चारमुखी ब्रह्म देवाकडून) ज्ञानविश्वाचा आविष्कार होतो. प्रत्येक  व्यक्तीच्या हृदयी असणारा कूटस्थ विष्णू व त्याच्या बेंबीतून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानविश्वाची प्रतिमा पिंडी ते ब्रह्मांडी या तत्त्वाने विश्वनिर्मात्याच्या वर्णनासाठी वापरली आहे. तुला माझे साष्टांग नमस्कार असोत.

**४९) अमरप्रभुः । अमरप्रभवे नमः।**

तर्कसंगत विचाराने पाहता सजीवांपेक्षा वेगळ्या स्तरांवर वावरणारी असंख्य सजीव अस्तित्व असणे व ती प्रचंड काळ टिकणे ( व म्हणून अमर म्हटली जाणे) व त्यांचा अतींद्रिय अनुभव होणे हे असयुक्तिक नाही. याचमुळे तुला अमर देवांचा स्वामी म्हंटलेले आहे. कारण तू यांचाही नियंता व सर्वार्थानी अमर आहेस. गीतेमध्ये तुझे  वर्णन अक्षरादपिचोत्तमः असे आहे. (पंधरावा अध्याय). तुला विनम्र अभिवान असो.

**५०) विश्वकर्मा । विश्वकर्मणे नमः ।**

विश्व हे ज्याचे कर्म आहे असा. व्यक्तिगत पातळीवरील भावना, विचार, ज्ञान, अनुभूती यांचा कारक आणि वैश्विक पातळीवरील चराचरातील अनंताच्या उदात्त प्रवासाचा कारकही तूच आहेस. कारण जाणिवांचे विश्व आणि इतर दृश्यादृश्य विश्व ह्यांचा कर्ता तूच आहेस. परंतु अपूर्ण भासणाऱ्या कोणत्याही दृश्य बाबीनी तुला अपूर्णत्व येत नाही ; कारण तू त्यांचे चिरंतन स्थायी स्वरूप आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**५१) मनु : । मनवे नमः ।**

मननशील व मंत्र. अचूक वैश्विक मनाने व मनोदयाने विश्वसंकल्प साकार करणारा. तसेच मायाभासाच्या. अज्ञानांधकारी प्रलयातून ज्योतिर्मय जीवनावस्थेच्या सामर्थ्यदायी ज्ञानानुभूतीकडे नेणारा. तुझे स्मरण अखंड राहो व तुझ्याचरणी लीनभावे नमस्कार

असो.

**५२) त्वष्टा । त्वष्ट्रे नमः ।**

स्थित्यंतराचा नियंता व सारे दृश्यादृश्य विश्व संहारकाली स्वत:मध्ये सूक्ष्मातिसूक्ष्म बीजरूपात विलीन करणारा. तुला शतशः नमस्कार असोत.

**५३) स्थविष्ठः । स्थविष्ठाय नमः ।**

सर्व स्थलकालसापेक्ष मापदंडांच्या अतीत असल्याने सूक्ष्म असतानाच सर्वव्यापी, सर्वसमावेशक असा मोठ्यात मोठा, अतिमहानही असलेला. तू अनंत व अमर्याद आहेस, याची मला नेहमी आठवण राहो व तुझ्याचरणी विनम्र अभिवादन असो.

**५४) स्थविरो ध्रुवः । स्थविराय ध्रुवाय नमः ।**

म्हणजे पुरातन व अचल. काळातीत, काळाहूनही सूक्ष्म आणि काळाच्या उत्पत्तीच्याही आधीपासून विलक्षण अस्तित्वाने असणारा व विजेचा प्रवाह जसा अतिवेगवान असल्याने अचल भासतो तसा अचल भासणारा, विश्वाचा आधार तू आहेस. आत्मज्ञान व तद्रुपतेचा कारकही तूच आहेस. तुला माझे नम्र प्रणाम असोत.

**अग्राह्यः शाश्वतः कृष्णो लोहिताक्षः प्रतर्दनः**
**प्रभूतस्त्रिककुब्धाम पवित्रं मंगलं परम् ॥**

**५५) अग्राह्यः । अग्राह्याय नमः ।**

अनाकलनीय. ज्याप्रमाणे वडिलांच्या बारशाला मुलगा जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, तर्क, बुद्धी, मन, विचार, भावना, जाणीव, ज्ञान यांचा कारक असा तू यापैकी कोणत्याही मार्गाने संकुचित अस्तित्व वेगळे ठेवून जाणला जाऊ शकत नाहीस. माझे सर्वस्व तुझ्याच मालकीचे आहे ह्या जाणिवेत तुला माझे प्रणिपात असोत.

**५६) शाश्वतः । शाश्वताय नमः । शश्वत भवतीति शाश्वत : ।**

सर्व काली असणारा. तुझे अस्तित्व परिणामस्वरूप नाही. कारणरूप आहे. पण रूढार्थाने परिणामरहित आहे. त्यामुळे ते अस्तित्व रूढ नसून विलक्षण आहे. त्यामुळे तू भूत–भविष्य–वर्तमानातीत निरंतर आहेस. अंतस्थ असणाऱ्या तुझ्या शाश्वत अस्तित्वाची म्हणजेच खऱ्या स्वत्वाची मला नेहमी आठवण राहो व तुला साष्टांग नमस्कार असोत.

**५७) कृष्ण : । कृष्णाय नमः ।**

कृश् म्हणजे चिरकालीन, सत्, व न म्हणजे आनंद. म्हणून कृष्ण म्हणजे चिदानंद. कृष्ण म्हणजे प्रकाशलहरींच्या अतीत व चैतन्यमय म्हणून वरपांगी काळा दिसणारा पण खरोखरी प्रकाशाचा प्रकाश असणारा. कृष्ण म्हणजे अहंकारी पांडित्य व ज्ञान यांमधील पडदा. कृष्ण म्हणजे अखेर सारेच स्वत:मध्ये सामावण्याची विशालता असणारा, आकर्षणाची महाशक्ती असणारा. तुला विनम्र प्रणाम नसोत.

**५८) लोहिताक्ष : । लोहिताक्षाय नमः**

तांबड्या कमळाप्रमाणे तांबडे डोळे असलेला, असं तुझ्या सगुणरूपाचं वर्णन आहे. कारण तू आमच्यातील हीनत्व, नीचत्व, क्षुद्रत्व इत्यादींचे क्रोधायमान नेत्रानी भस्म करतोस व उदात्ततेच्या उत्तुंग शिखरावर आम्हाला पोचवतोस. माझे सर्वस्व तुझ्या कार्यात उपयोगी ठरो व तुझ्याचरणी माझे अभिवादन राहो.

**५९) प्रतर्दनः । प्रतर्दनाय नमः ।**

प्र म्हणजे उच्च व तर्द म्हणजे नाश. तू विश्वाला पुन्हा बीजमय अस्तित्वात शोषून घेणारा आहेस. माझ्या भावना केवळ तुझ्याशी निगडित राहोत व माझे तुला भावपूर्ण वंदन असो.

**६०) प्रभूतः । प्रभूताय नमः।**

परिपूर्ण. कल्पनातीत, परिणामातीत 'परिणामानी' युक्त असा तू सर्व पातळ्यांवर (जाणिवेच्या व अस्तित्वाच्या) सत्ता गाजवतोस. पूर्वी अस्तित्वात असलेल्या, आज अस्तित्वात असलेल्या आणि पुढे अस्तित्वात येणाऱ्या अशा साऱ्या उत्तमोत्तम बाबींवर तुझी सत्ता आहे. अवतीर्ण होणे, अवतार कार्य करणे हे पैलू असणाऱ्या तुझ्या ठायी मन व बुद्धी स्थिर राहो व तुझ्याचरणी अखंड दंडवत राहो.

**६१) त्रिककुब्धाम । त्रिककुब्धाम्ने नमः ।**

म्हणजे विश्वाच्या तीन भागांचे निवासस्थान, आश्रयस्थान. स्वर्ग, मृत्यू , पाताळ – सत्व, रज, तम – झोप, स्वप्न, जागृती –वात , पित्त, कफ – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद– भूत, भविष्य, वर्तमान–प्रवृत्ती, मध्यम निवृत्ती इत्यादींनी समृद्ध विश्वाचे सारसर्वस्व, ईप्सित अंतिम ध्येय व आश्रयस्थान तूच आहेस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**६२) पवित्रं । पवित्राय नमः ।**

शुद्धतम. तू साऱ्या शुद्ध बाबींचा कारकही आहेस. मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या मंत्रांच्या

मुळाशीही तूच आहेस. त्याचप्रमाणे पवि म्हणजे वज्र म्हणजे इंद्रांचे शस्त्र आणि त्रायते म्हणजे रक्षण करणारा. इंद्र म्हणजे मन. म्हणून अंत:प्रकाशी अस्तित्वाने मनाच्या संकल्प–विकल्पापासून आमचे रक्षण करणारा तू आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**६३) मंगलं परम् । मंगलाय परस्मै नमः ।**

अज्ञानमूलक दु:खनाश करून अंत:करणात हर्ष उत्पन्न करणारा. तुझे स्मरण, चिंतन, मनन, निदिध्यास, वर्णन, श्रवण, वाचन यामुळे मिंधेपणा, दुबळेपणा, दुश्चितपणा, गांजलेपणा, खिन्नपणा, असहायपणा, दु:खीपणा, भित्रेपणा, संकुचितपणा, इत्यादींचा नाश होऊन आनंदाची प्राप्ती होते. तुला माझे वंदन असो.

**ईशान : प्राणदः प्राणो ज्येष्ठ : श्रेष्ठः प्रजापतिः**
**हिरण्यगर्भो भूगर्भो माधवो मधुसूदनः॥**

**६४) ईशान : । ईशानाय नमः ।**

स्वत:च्या सर्वव्यापी संकल्पाचे नियमन व प्रकटन करणारा सर्वश्रेष्ठ ईश्वर. अंतर्बाह्य साऱ्या घडामोडींचे नियंत्रण करणाऱ्या तुला विनम्र प्रणाम असोत.

**६५) प्राणद : । प्राणदाय नमः ।**

साऱ्या विश्वाच्या व तदंतर्गत प्राण्यांच्या प्राणाचाही प्राण. स्थळ, काळ, स्थिती, जाणीव इत्यादींच्या सर्व स्तरांचा प्राणदाता मूळ चेतनास्त्रोत अशा तुला मोजणारी मोजपट्टी नाही. तुझ्या कृपेने प्राणायाम –राजयोगादी मार्गांनी तुझी प्रचीती येते आणि जीवनाचे चिरंतन सार–सर्वस्व एकमेव तूच आहेस याची खात्री पटते. तुला त्रिवार वंदन असो.

**६६) प्राण : । प्राणाय नमः । प्राणिति इति प्राण : ।**

प्राण्याला धारण करणारा. तू प्राण्यांना म्हणजेच जीवनाला धारण करतोस व व्यक्तिसापेक्ष व व्यक्तिनिरपेक्ष आणि कालसापेक्ष व कालनिरपेक्ष जीवनचैतन्याचा अनंतरंगी आविष्कार करतोस. तुझ्यामध्ये समरस होण्याच्या एकमेव दृष्टीने तुला अखंड दंडवत असो.

**६७) ज्येष्ठ : । ज्येष्ठाय नमः ।**

कालातीत असल्याने ज्येष्ठ म्हणजे वयाने सर्वाधिक. तुझे वय गणनेच्या अतीत आहे. तुझ्या अजरामर अनंत अस्तित्वाचे अनुसंधान व चरणी शिरसाष्टांग प्रणिपात

राहो.

**६८) श्रेष्ठ : । श्रेष्ठायनमः ।**

श्रेयः, श्रेय व श्रेष्ठ म्हणजे महान, महानतर व महानतम आनंदघन. अस्तित्व व जाणिवेच्या सर्व स्तरांना तू सर्वोत्तम आहेस. प्रत्येक क्षणी तुझे स्मरण राहो व तुझी प्राप्ती हे एकमेव उदिष्ट जाणवत राहो. तुला नम्र अभिवादन असो.

**६९) प्रजापतिः । प्रजापतये नमः ।**

विश्वामध्ये अस्तित्वात येण्याच्या, उद्भवण्याच्या क्रियेचा व म्हणून, उद्भवणाऱ्या प्रत्येक वस्तुमात्र, पदार्थाचा स्वामी अधिपती तूच आहेस.प्रजस् म्हणजे मुले. विश्वातील अणुरेणू तुझी प्रजा व तू पिता आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**७०) हिरण्यगर्भः। हिरण्यगर्भाय नमः ।**

हिरण्य म्हणजेस सुखदायक, सुवर्णाप्रमाणे शोभिवंत आणि तेजःपुंज असे विश्व. गर्भ म्हणजे गाभा. ब्रह्म, ब्रह्मांड व ब्रह्मज्ञानाचा कर्ता ब्रह्मदेव. सोनेरी आणि सुखद क्षणांचा नियंता. तू अनुभूतीचा कर्ताही आहेस. अन्य दृष्टीने पाहिल्यास सारे विश्व आणि त्याची सर्वोच्च अनुभूती हे सारं काही तुझे गर्भ आहे. तुला शतशः प्रणाम असोत.

**७१) भूगर्भ : । भूगर्भाय नमः ।**

अस्तित्वाचा गाभा. पृथ्वीचा गाभा व त्राता तू आहेस. अन्य अर्थाने, सारे अस्तित्व हा तू प्रसवलेला गर्भ आहे. आणखी एका दृष्टीने विश्वात्मक देवालयाचे अंतर्गृह किंवा गाभारा तू आहेस. सर्वांतर्यामी महासत्तेने वावरणाऱ्या तुला शतशः प्रणाम असोत.

**७२) माधवः । माधवाय नमः ।**

मायेचा पती. शिव व शक्तीतील शिव. तसेच छंदोग्य उपनिषदात वर्णन केलेल्या मधुविद्येच्या आचरणाने होणारा साक्षात्कार तू आहेस. मा–मौन, ध–ध्यान आणि व–योग असाही माधव या शब्दांचा अर्थ केला जातो. कारण या मार्गांनी मनोलय ( वैयक्तिक स्वार्थी संकुचिततेचा संपूर्ण विनाश) होऊन व्यक्तीला वैश्विक अस्तित्वाची जी दृष्टी व प्रचीती येते तो तूच आहेस. सच्चिदानंदमय तुला निरंतर अभिवादन असो.

**७३) मधुसूदनः । मधुसूदनाय नमः ।**

मधु व कैताभ या राक्षसांना ठार करणारा (महाभारत). मूलतः मधु याचा अर्थ कर्म–विपाक, कर्म–फळ , कर्माचा परिणाम इत्यादी. तू स्वतः करणारा, केलेले, करणे, कार्य यांच्या अतीत आहेस. त्यामुळे कर्मफलादींच्या वासना, कर्मफलतृप्तीचा

आठवणी इत्यादी सर्व बद्धकारक  जाणिवांपासून नैसर्गिकपणेच मुक्त आहेस व तुझ्या भक्तांना  तू मुक्त करतोस. तुला साष्टांग नमन असो.

**ईश्वरो विक्रमी धन्वी मेधावी विक्रमः क्रमः ।**
**अनुत्तमो दुराधर्षः कृतज्ञः कृतिरात्मवान्॥**

**७४) ईश्वरः । ईश्वराय नमः ।**

क्रियाशक्ती, इच्छाशक्ती आणि ज्ञानशक्ती यांचा उगम असा सर्वसत्ताधीश स्वामी. तुझ्या प्रचीतीने स्वरूपाची जाण व सामर्थ्य मिळते. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**७५) विक्रमी । विक्रमिणे नमः ।**

विक्रमी म्हणजे सर्वश्रेष्ठ शक्तिवान, सर्व समावेशक. तुझे पाऊल विश्व व्यापते या अर्थाने तुझं वामनावताराच्या रूपात वर्णन केलं आहे. तुला विनम्र प्रणाम असोत.

**७६) धन्वी । धन्विये नमः ।**

शारंग हे (विष्णूचे) धनुष्य धारण करणारा विष्णू व राम. अन्य दृष्टीने  सर्वांतर्बाह्य राहून विश्व हेच धनुष्य पेलून प्रत्यंचेतील शक्तीने  अंतर्बाह्य चैतन्याचे सर्व स्त्रोत नियंत्रित करणारा कल्याणकारी ईश्वर तूच आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**७७) मेधावी  । मेधाविने नमः ।**

म्हणजे सत्‌बुद्धिसंपन्न. ज्ञानाची अधिष्ठात्री (देवी, शक्ती, प्रेरणा) तुझ्या अंकित आहे. तुझ्या भक्तीने मन व बुद्धी पवित्र व न्यायी बनते. तुला नम्र प्रणाम असोत.

**७८) विक्रमः । विक्रमाय नमः ।**

घटनांचे क्रम नियंत्रित करणारा, सर्वत्र संचरणारा. वि. म्हणजे पक्ष्यांचा राजा गरूड. म्हणून गरूड वाहन असलेला सर्व संचारी विष्णू असंही तुझं वर्णन करतात. अन्य अर्थाने वि म्हणजे जीवात्मारूपी पक्षी आणि शरीर म्हणजे पिंजरा. म्हणून आत्म्याद्वारे सर्वत्र विहरणारा ईश्वरही तू आहेस.तुला शतशः प्रणिपात असोत.

**७९) क्रमः । क्रमाय नमः ।**

सर्वत्र संचार करणारा. चैतन्यमय बीजरूपातून विश्वाचा आविष्कार होणं व पुन्हा चैतन्यमय बीजात विलय होणं हे सारं काही तूच आहेस. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या अंतरंगातील वेदज्ञान व साक्षात्कार तूच आहेस. तुला शतशः वंदन असो.

**८०) अनुत्तम : । अनुत्तमाय नमः । अविद्यमान उत्तमो यस्मात् ।**

ज्याहून अधिक उत्तम काहीही नाही असा. तुझ्या उत्तमतेमुळे तुझे स्मरण कल्याणकारी होते. तुला माझे विनम्र अभिवादन असो.

**८१) दुराधर्षः । दुराधर्षाय नमः ।**

ज्यावर कुणीही मात करू शकत नाही असा. तुझ्या चैतन्यमय अस्तित्वाला अज्ञान, संकुचितता, वासना, विकार, जडता स्पर्शूही शकत नाहीत. तुझ्या साक्षात्कारामुळे व कृपेमुळे अशा दैत्यांवर विजय प्राप्त होतो. तुला नम्र प्रणाम असोत.

**८२) कृतज्ञ : । कृतज्ञाय नमः ।**

जे घडलेलं आहे ती कृती. म्हणून सर्वांतर्यामी द्रष्ट्या अस्तित्वाने सर्व कृती जाणणारा. अन्य अर्थाने विश्व ही तुझी कृती असल्याने कृतज्ञतेने ज्याचे नेहमी स्मरण करावे असा. तुझी आठवण निघताच तुझा अविष्कार होतो. कारण तुझे स्मरण, तुझे असणे व तुझा आविष्कार हे सर्व सुसंलग्न आहे. तुला भक्तिपूर्वक अभिवादन असू दे.

**८३) कृतिः । कृतये नमः ।**

कार्य, घटना. प्रत्येक प्रक्रियेचे सारतत्त्व व प्रत्येक घटनेला (मानवी अस्तित्वासकट) तिचा विनाश ( म्हणजे ढोबळ अस्तित्वाच्या अतीत असं अस्तित्व), असतो. म्हणून कृतीमागील संकल्प, कृतीची प्रक्रि या, कृतीचं कारण, कृतीचा परिणाम, कृतीचा विनाश असं कृतीशी संबंधित सारं काही तू आहेस. कृतिः ह्या शब्दात हे सर्व सामावलेले असल्याने तुला कृतिः म्हणतात. तुला साष्टांग नमन असो.

**८४) आत्मवान् । आत्मवते नमः ।**

स्वत्वापासून कधीही विचलित न होणारा व कधीही वेगळा न होणारा, म्हणून तुला आत्मवान म्हणतात. त्रिकालाबाधित, अविनाशी, आत्मतत्त्वमय असा तू अस्खलनशील अस्तित्वाने चराचरात विद्यमान असतोस. वैयक्तिक क्षुद्रत्वातून बाहेर येताच अविद्येचा पडदा दूर होऊन तुझे दर्शन होते. तुला शतशः साष्टांग प्रणिपात असोत.

**सुरेशः शरणं शर्म विश्वरेता : प्रजाभवः ।**
**अहः संवत्सरो व्यालः प्रत्ययः सर्वदर्शनः।।**

**८५) सुरेशः । सुरेशाय नमः । सुष्ठु राति ददाति इति सुरः ।**

सुरः म्हणजे देव. देवांचा किंवा सत्पुरुषांचा ईश तो सुरेश. स्तपुरुषांचे कर्मदेखील

तुझ्यापासूनच उद्‌भवते व तुझ्याकडून नियंत्रित केले जाते. त्यांच्या सत्कर्माच्या इच्छेचा अमृतमय प्रेरणास्रोत आणि त्यांचे सत्कर्महीतू आहेस. अशा तऱ्हेने देवदेवतांचा (ज्या निसर्गातील विविध शक्ती व विविध जाणिवांच्या पातळीवरील व्यक्तींच्या शक्ती आहेत) स्वामी व कर्ताकरविता ईश्वर तू आहेस. तुला सादर प्रणाम असोत.

**८६) शरणं । शरणाय नमः ।**

दु:खितांचं खरं आश्रयस्थान, ज्ञानमय, चैतन्यमय व परिणामातीत असा अंतर्यामी वसणारा तूच केवळ शाश्वत आनंद व सामर्थ्य देतोस. त्यामुळे तूच एकमेव व खरे आशास्थान आहेस. तुला माझे आदरपूर्वक नमस्कार असोत.

**८७) शर्म । शर्मणे नमः ।**

शर्मन् म्हणजे सुख, आशीर्वाद किंवा घर. सुख, सांत्वना व कल्याण देणारे आश्रयस्थान तूच आहेस. कारण तन्मय होणे ही चिरंतन विश्रांतीची–आनंदाची अवस्था आहे. तुला माझे मन:पूर्वक अभिवादन असो.

**८८) विश्वरेता : । विश्वरेतसे नमः ।**

विश्वरेत म्हणजे विश्वाचे बीजारूपी विधान. सारं जग तुझ्यापासून उद्‌भवतं म्हणून तुला विश्वरेत म्हणतात. दुसऱ्या अर्थाने व्यक्तीचे चैतन्य ओजापासून वा वीर्यामुळे असते तसे विश्वाचे चैतन्य तुझ्यामुळे असते. म्हणूनही तू विश्वरेत आहेस. त्याचप्रमाणे व्यक्ती व विश्वातील श्रेष्ठ पराक्रमाचा कारकही तूच आहेस. तुला माझे विनम्र प्रणाम असोत.

**८९) प्रजाभवः । प्रजाभवाय नमः ।**

प्रजा म्हणजे जन्म, मुले इत्यादींना जन्म देणारा म्हणून तुला प्रजाभवः म्हणतात. जे जे काही उत्पन्न होतं ते सारं तुझ्यापासूनच व तुझ्या सत्तेने होतं. व्यावहारिक संदर्भात व्यक्तीच्या शरीर आणि मनांतर्गत विविध घडामोडी उदा. रंगसूत्रांचं व गुणसूत्रांचं वैशिष्ट्यपूर्ण संघटन, गर्भावस्थेतील विविध प्रक्रिया आणि पुढे जन्मांनंतरच्या कृती, भाव–भावना, विचार ह्या साऱ्यांचा जनक आणि नियंता तू आहेस. माता व पिता यांना देव म्हणतात ते त्यांचे तुझ्याशी असलेले साधर्म्य स्मरणांत राहण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. तुला अनन्यभावे नमस्कार असोत.

**९०) अहः । अह्ने नमः ।**

अहन् म्हणजे हिंसा न करणारा. तसेच अहन् म्हणजे दिवस. तू हिंसेच्या, विनाशाच्या देखील अतीत आहेस आणि साऱ्या घटनाक्रमांना सामावणारा, नियंत्रित करणारा,

प्रकाशमान करणारा (दिवस–काळदेखील) आहेस. तुला शतशः वंदन असो.

**९१) संवत्सरः । संवत्सराय नमः।**

वर्ष. साऱ्या गतींचा नियंत्रक काळ, कालमापन, कालमापनाची बुद्धी–जाणीव आणि त्याचप्रमाणे कालातीत असा काळाचा स्वामी तू आहेस तुझ्या चिंतनाने भूतकाळाच्या बेड्या व भविष्यकाळाचे जूं यातून मुक्तता होते. तुला साष्टांग दडंवत असो.

**९२) व्यालः । व्यालाय नमः ।**

व्याल म्हणजे दुःसाध्य, साप, फसवा  मनुष्य, वाघ इत्यादी. कोणत्याही प्रकारे समजण्यास अगम्य असा तू आहेस. मुलाने वडिलांचे बारसे पाहणे अशक्य तसेच तुला आम्ही अविद्येद्वारे जाणणे अशक्य. सगुण रूपात विश्वाचा आधार शेष (नाग), शक्तीचा (दुर्गेचा) आधार व वाहक वाघ, आणि अज्ञान, माया मोह, अविद्या यांची अगम्य लीला करणारा तू मायावी आहेस. तुला एकाग्र चित्ताने प्रणाम असोत.

**९३) प्रत्यय : । प्रत्ययाय नमः ।**

खरे ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान ही तीनही ठायी असलेला. ही तीनही वैशिष्ट्ये सर्वोच्च अवस्थेतच व्यक्ती अनुभवू शकते. कारण या अवस्थेत जाणण्याचे, जाणणे व जाणणारा हे तीनही सर्वोत्कृष्ट, परमोच्च असतात. त्यामुळे तुला जाणणे म्हणजे खरी प्रत्यक्षानुभूती, अंतिम ज्ञान व जाणणाऱ्यांचे अंतिम परमधाम, हा प्रत्यय आणून देणारा सद्‌गुरुही तूच आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**९४) सर्वदर्शनः । सर्वदर्शनाय नमः ।**

सर्व पाहणारा. तसेच सद्‌भक्तांची दृष्टी शुद्ध करून त्यांना स्वतःचे  ( व विश्वाचे) यथार्थ स्वरूप जाणवून देणारा. सत्य जाणवून देणारा, सत्य पाहणारा व सत्य हे सारे तूच आहेस. मी फक्त क्षणभंगुर निमित्त आहे. तुला विनम्र अभिवादन असो.

**अजः सर्वेश्वरः सिद्धः सिद्धिः सर्वादिरच्युतः ।**
**वृषाकपिरमेयात्मा सर्वयोगविनिः सृतः ।।**

**९५) अजः । अजाय नमः ।**

जन्मरहित. तू जन्म–मरणाच्या स्थित्यंतरातीत, स्थलकालातीत, परिमाणातीत कैवल्यावस्थेमध्ये कायम आहेस. संकुचित जाणिवेच्या ऊर्ध्वगामी उन्नयनाने तुझ्या अशा अस्तित्वाची प्रचीती येते. ही प्रचीती मला कायम राहो व तुझ्याचरणी भावपूर्ण नमन असो.

**९६) सर्वेश्वरः । सर्वेश्वराय नमः ।**

जड, चैतन्य, ऊर्जा, अवकाश, काळ, जाणीव इत्यादी सर्वांचा स्वामी, नियंता. तुला शतशः वंदन असो.

**९७) सिद्धः । सिद्धाय नमः ।**

आत्मसंकल्पी विश्वसंकल्पी असा स्वत:सिद्ध. कारण तुझ्या स्वरूपात सिद्धीसाठी संकल्प असे द्वैत नाही. अन्य अर्थाने पूर्णज्ञानी, चराचराचा आधार, सामर्थ्यसंपन्न व सर्वार्थांनी पूर्ण असा असल्याने व तुझे अस्तित्व परिणामातीत असल्याने तुझे अस्तित्व सिद्ध करणारे असे अन्य कोणतेही अधिक सत्य तत्त्व नाही. वेगळ्या दृष्टीने पाहिल्यास ऊर्जा जशी तरल विशाल पण एकजीव असते तसाच तू सारे विश्व सांधणारा व स्वत: अभेद्यपणे व सुसंबद्ध असलेला महान सांधा आहेस. तुला मन:पूर्वक प्रणिपात असोत.

**९८) सिद्धिः । सिद्धये नमः ।**

साऱ्या विश्वाची अंतिम श्रेष्ठतम अवस्था व सर्वोच्च साध्य तू आहेस व तुझी प्राप्ती म्हणजे सर्वश्रेष्ठता, पूर्णत्व व सिद्धी आहे. म्हणूनच तू अंतिम पूर्णावस्था, मोक्ष, अमर व अमर्याद आनंदमय महासिद्धि आहेस. तुला माझे मनोभावे नमन असो.

**९९) सर्वादिः । सर्वादये नमः ।**

सर्वांचा आरंभ. अनेकविध परिमाणांमध्ये अस्तित्वात असलेल्या व पुढे अस्तित्वात येणाऱ्या असंख्य कल्पनातीत बाबींचे अदिकारण तूच आहेस. आरंभ, स्थिती, विनाश या साऱ्यांचा मूळारंभही तूच आहेस. तुला माझे निरंतर अभिवादन असो.

**१००) अच्युतः । अच्युताय नमः ।**

अच्युतः म्हणजे पतीत. अच्युतः म्हणजे पतीत न होणारा. स्वस्थानापासून किंवा जाणिवेच्या उच्चतम पातळीवरून संभ्रमावस्थेमध्ये मोहबद्धतेमध्ये घसरण्याची प्रवृत्ती साधनेच्या मार्गात अनुभवास येते. परंतु जाणिवांच्या सर्वोच्च, तरलतम व उदात्ततम व पातळीवर असामान्य धारणाशक्तीने शुद्धतम व पवित्रतम अवस्थेमध्ये निरंतर राहणारा सर्वेश्वर तू आहेस. तू कधीच स्थानभ्रष्ट होत नाहीस. तुला भक्तीभावपूर्वक दंडवत असोत.

**१०१) वृषाकपिः । वृषाकपये नमः ।**

वृषा म्हणजे धर्म व कपि म्हणजे वराह किंवा बुडत्याला तारणारा. वराह अवताराचा गर्भितार्थ किंवा मथितार्थ असा की आधार बनून, ज्ञानसूर्य किरणांनी चेतना व सामर्थ्य देऊन विश्वाला अधर्माच्या महासागरात बुडण्यापासून तू तारतोस. अंतर्यामी प्रगट होऊन

बुद्धिभ्रष्टतामय पतनापासून मला वाचव ही मनोमन प्रार्थना. तुला शतशः प्रणिपात असोत.

**१०२) अमेयात्मा । अमेयात्मने नमः ।**

असंख्य किंवा अनंत किंवा मोजण्यास मापण्यास अशक्य असे/असा आत्मे/आत्मा. पदार्थ, ऊर्जा, अवकाश, काळ, जाणीव इ. मधील गबन संबध व अखंडता लक्षात घेतल्यावर या साऱ्यांच्या अंतरंगाचा नियंता तू म्हणजे खरोखरच मापनातीत विश्वात्मा असल्याचे जाणवते. म्हणून तुला अमेयात्मा म्हणतात. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**१०३) सर्वयोगविनिःसृतः । सर्वयोगविनिःसृताय नमः ।**

सर्वामतर्यामी असूनही कोणत्याही संबधाने व बंधनाने लिप्त वा बद्ध न होऊन स्वतंत्र राहणारा. सर्व काही अंतर्बाह्य निरंतर व्यापून सर्वश्रेष्ठ जाणिवेद्वारा प्रत्येक चराचर वस्तूशी निगडित असल्यामुळे तू मोह, माया, आसक्ती वगैरेपासून मुक्त आहेस. तुला नम्र प्रणाम असोत.

**वसुर्वसुमनाः सत्यः समात्मा संमितः समः ।**
**अमोघः पुण्डरीकाक्षो वृषकर्मा वृषाकृतिः ॥**

**१०४) वसुः । वसवे नमः ।**

म्हणजे चराचराचे मूलतत्व किंवा मूलाधार सर्वांतबाह्य मूलाधार तूच असल्याने तुझ्याशिवाय कोणतीही वस्तू अस्तित्वात असणे अशक्य आहे. उदाहरणार्थ अणुरेणूंना अंतर्बाह्य व्यापणाऱ्या व्यापणाऱ्या पोकळीच्या अभावी वस्तूचे अस्तित्व अशक्य आहे. अन्य दृष्टीने पाहता विश्वाचे आठ प्रमुख आधार वसु असून त्या वसुमधील पावक हा सर्वश्रेष्ठ वसु आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**१०५) वसुमनाः । वसुमनसे नमः ।**

शुद्ध मनाचा. अन्य दृष्टीने पाहता, विश्वाधार असा तू अस्तित्वातीत, विकारातीत महामना आहेस. परमपवित्र व सच्चिदानंदमय तुला विनम्र प्रणिपात असोत.

**१०६) सत्यः । सत्याय नमः । सत्सु साधुः सत्यः ।**

सत्य म्हणजे साधु. सत् ति यम् म्हणजे अनुक्रमे प्राण अन्न व सूर्य. याचा अर्थ विश्वचालक चैतन्य, विश्वपोषक तत्त्व आणि विश्वाला तेज देणारे तत्त्व तू आहेस. अन्य अर्थाने, संकुचित मनाच्या विलयानंतर म्हणजेच उन्नयनानंतर प्रत्ययास येणारे परमसत्य तत्त्व तू आहेस विश्वाचे पोषण-संगोपन व शिक्षण करणारा व भक्त हृदये आनंदकिरणांनी

भरणारा परमसत्य तेजोनिधी व आनंदघन ईश्वर तूच आहेस. तुला निरंतर प्रणाम असोत.

**१०७) समात्मा । समात्मने नमः ।**

सर्वत्र समभावनेने, समानतेने अंतर्यामी राहणारा आत्मा. तुझा या अणुरेणू व्यापणाऱ्या न्यायी अस्तित्वाची मला सतत जाणीव राहू दे. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**१०८) सम्मितः । संमिताय नमः किंवा असंमिताय नमः ।**

**समात्मा** या नावास जोडून घेतल्यास **असम्मितः** हे नाव ठरते. **असम्मितः** म्हणजे अजोड. **सम्मितः** म्हणजे सगुण किंवा सीमित. तू काही भक्तांना विशिष्ट रूप व गुणानी सीमीत असा सगुण तर काही भक्तांना निर्गुण जाणवतोस (श्री. के वि. बेलसरे यांच्या 'अतंर्यात्रा' पुस्तकात सगुम दर्शणाचे स्पष्टीकरण आहे). तुला माझे शतशः नमन असो.

**१०९) समः । समाय नमः ।**

फरक किंवा बदल नसलेला. नेहमी पूर्णावस्थेत असल्यामुळे तू सर्वकाली बदलरहित, विकाररहित आहेस. त्याचप्रमाणे मा म्हणजे लक्ष्मी व स म्हणजे सहित म्हणून लक्ष्मीवान किंवा मायेचे सर्व ऐश्वर्य असणारा असाही तू आहेस. माझे चित्त तुझ्या पायाशी दृढपणे राहो ही प्रार्थना. तुला मनःपूर्वक प्रणाम असोत.

**११०) अमोघः । अमोघय नमः ।**

कधीही निष्फळ न ठरणारा. क्रियाशक्ती व इच्छाशक्ती ह्या तिन्ही तुझ्यामध्ये पूर्णत्वाने असल्याने तू पूर्ण प्रभावी आहेस. तसेच याच कारणाने तुझे अंतःकरणपूर्वक स्मरणदेखील नेहमीच प्रभावी असते. तपश्चर्या, पुजा, स्तुती,भजन , संकीर्तन, नामस्मरण, धर्माचरण, ध्यान, धारणा इत्यादींपैकी कोणत्याही प्रकारे तुला आळवणाऱ्या भक्ताना तुझ्याशी तद्रुप होण्याचा संकल्प तुच देतोस व तूच तो फलद्रूपही करतोस. तूच त्यांचे प्रज्ञाचक्षू उघडून तुझ्या व त्यांच्यातील अविभक्ततेची आनंददायी व शक्तिदायी जाणीव त्याना देतोस. माझे हृदयदेखील तुझ्या कृपेच्या अमृतकिरणांनी प्रकाशित होऊन तुझ्या स्मृतीने भरून राहू दे. तुला माझे शतशः नमस्कार असोत.

**१११)पुण्डरीकाक्षः । पुण्डरीकाक्षाय नमः ।**

कमळासारखे डोळे असलेला आणि पुण्डरीक म्हणजेच हृदय म्हणून हृदयाच्या नेत्रांनी पाहता येण्यासारखा. कमळासारखे म्हणजे भवतापहरण करणारे, भक्तांचे अंतःकरणचक्षु शुद्ध करणारे डोळे असलेला. तू हृदयाच्या नेत्रांनी पाहता येण्यासारखा आहेस. कारण चर्मदृष्टीने तुला पाहता येत नाही. अन्य अर्थाने हृदयी चित्त एकाग्र करून

पाहता येण्यासारखीही तू आहेस. माझे तुला एकाग्र मनाने भावपूर्ण अभिवादन असो.

**११२) वृषकर्मा । वृषकर्मणे नमः ।**

वृष म्हणजे धर्म. वृषकर्मा म्हणजे ज्याची प्रत्येक कृती धर्मकृत्य आहे असा. विश्वाची सर्व कार्ये स्वाभाविकपणे घडण्यामागील नियम व यंत्रणा चालवणे ही तुझीच कृती आहे. अस्तित्वाच्या सर्व स्तरांवर विद्यमान असणाऱ्या धर्माचा शास्ता अशा तुला साष्टांग नमस्कार असोत.

**११३) वृषाकृतिः । वृषाकृतये नमः ।**

धर्माचा ढांचा वा आकार. विश्वधर्म ही तुझी कृती आणि म्हणून तू व विश्वधर्म वेगळे करता येत नाहीत. तुझे अवतार व त्यांचे कार्य हाही धर्मच. पसायदानपूर्तीच्या विश्वसंकल्पाची सेवा हा आजचा धर्म प्राप्त होवो व तुझी समीपता मिळो हीच प्रार्थना तुला अंतःकरणपूर्वक प्रणिपात असोत.

**रूद्रो बहुशिरा बभ्रुर्विश्वयोनिः शुचिश्रवाः ।**
**अमृतः शाश्वतः स्थाणुर्वरारोहो महातपाः ॥**

**११४) रूद्र : । रूद्राय नमः ।**

रोदयति रूद्र : म्हणजे शोक उत्पन्न करणारा. विनाश, मृत्यू, स्थित्यंतर या साऱ्यांचा कारक व यांचा मोह उत्पन्न करून दु:ख देणाराही तूच आहेस. तुझ्यापासून दूर नेणारी अविद्या उत्पन्न करणारा आणि गर्व, अभिमान, अहंकार व तज्जन्य दु:ख देणाराही तूच आहेस. त्याचप्रमाणे उपनिषदकर्ते साधू, सज्जन वगैरे सर्वांना तळमळ लावणारा, ओढ लावणारा व तमोगुणाचा नाश करणाराही तूच आहेस. तुझ्या प्राप्तीच्या मार्गात येणारे सर्व अडसर तुझ्या कृपेने नष्ट व्हावेत ही प्रार्थना. तुला नम्र प्रणाम असोत.

**११५) बहुशिराः । बहुशिरसे नमः ।**

असंख्य डोकी (मेंदू, अवधाने इत्यादी) असलेला. तू विश्वातील असंख्य घटकांमध्ये द्रष्ट्या व नियंत्या साररूपाने अंतर्यामी वावरतोस. तुला ध्यानपूर्वक नमन असो.

**११६) बभ्रुः । बभ्रवे नमः ।**

अग्नी, तेज, विश्वनियंता इत्यादी. साऱ्या विश्वाचा चैतन्यदायी नियंता तू आहेस. त्याचप्रमाणे व्यक्तीमध्ये व्यक्तीची विवेक बुद्धी, चित्त, अहंकार, मन, संवेदनशक्ती, इंद्रिये यांचाही प्रेरक नियंत्रक तूच आहेस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**११७) विश्वयोनि: । विश्वयोनये नम : ।**

विश्वाच्या उत्पत्तीचे, उगमाचे स्थान. तू विश्वाच्या आविष्कारामागील क्रियाशक्ती, ज्ञानशक्ती, संकल्पशक्ती, चिद्‌शक्ती यांचा उगम, विश्वप्रसविणी योनी आहेस. आदिकारण व महाकारणरूपी अशा तुला अंत:करणपूर्वक प्रणिपात असोत.

**११८) शुचिश्रवा: । शुचिश्रवसे नम: ।**

चांगले ऐकणारा किंवा ज्याचे नाव कानांना व अंत: करणाला अत्यंत मधुर वाटते असा. सर्वव्यापी व सर्वांतर्यामी असा तू भक्तांच्या परमशुद्ध भावनांचे तरंग अचूकतेने क्षणात ऐकतोस आणि तुझे भक्त म्हणजे केवळ बुद्धीच्या नव्हे तर तुला सर्वस्व समर्पित करून विशेषत: भावनेनं तुझी अनुभूती घेणारे सत्यमार्गी लोक, परमोच्च सत्याचे शुद्धीदायी श्राव्यरूप किंवा स्पंदरूप असे तुझे नाव अत्यंत आवडीने प्राधान्याने व उत्कटतेने ऐकतात. तुला शतश: नमस्कार असोत.

**११९) अमृत: । अमृताय नम: ।**

अमर. आत्मज्ञानाने, आत्मस्वरूपी अमरतत्त्वाशी म्हणजे तुझ्याशी जाणिवेसह/ जाणिवेने निगडीत होणे, तद्रुप होणे, शक्य होते. त्यामुळे आत्मरूपाने सर्वांतर्यामी राहणाऱ्या तुला अमृत: म्हणतात. स्वत: विनाशरहित असलेल्या व तुझे चिंतन करणाऱ्यानाही अविनाशीत्वाकडे नेणाऱ्या तुला आदरपूर्वक प्रणिपात असोत.

**१२०) शाश्वत: स्थाणु: । शाश्वत: स्थाणवे नम: ।**

चिरंतन आणि अढळ. बदलांच्या अंतर्यामी व कालातीत असल्याने तू अजरामर व अढळ आहेस. कालातीत देखील असल्याने तू अजरामर व अढळ आहेस. कालातीत असल्याने रूढ गतीचा प्रभाव तुझ्यावर पडत नाही व तुझ्यामध्ये बदलही संभवत नाही. तुला साष्टांग नमन असो.

**१२१) वरारोह: । वरारोहाय नम: ।**

आनंददायी आणि देदीप्यमान असे उच्चतम निधान. तू परमोच्च परमात्मपद आहेस व त्यामुळे तुझ्या प्राप्तीने क्षुद्र वासना, आसक्ती, इच्छा व अहंकाराना जन्म देणारी अविद्या अज्ञान नष्ट होतात. खालच्या व संकुचित पातळीवर घसरणे शक्य होत नाही. म्हणूनच ह्या कारणास्तव तुला उत्तमलोक म्हणतात. केवळ तुझ्या चरणप्राप्तीच्या इच्छेमध्ये तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**१२२) महातपा : । महातपसे नमः ।**

तप, ऐश्वर्य, सामर्थ्य आणि ज्ञान. सारी सृष्टी प्रसवण्याचे, पोसण्याचे आणि नष्ट करण्याचे महान तप करणारा, ज्ञानमय ज्ञानदाता, चैतन्यमय महाअग्नी, आणि परमशुद्धी, सामर्थ्य व स्फूर्ती देणारा महासूर्य. वैश्विक ऐश्वर्याचा धनी अशा तुला साष्टांग दंडवत असोत.

**सर्वगः सर्वविद्भानुर्विष्वक्सेनो जनार्दनः ।**
**वेदो वेदविदव्यंगो वेदांगो वेदवित्कविः ।।**

**१२३) सर्वगः । सर्वगाय नमः ।**

भूत, भविष्य, वर्तमान, चराचर, इत्यादी सर्वांच्या अंतर्यामी जाणारा आणि प्रज्ञाचक्षू, भक्ताना या वैशिष्ट्यात प्रचित होणारा. तुला माझे विनम्र प्रणाम असोत.

**१२४) सर्वविद्भानु : । सर्वविद्भानवे नमः ।**

सर्वत्र व देदीप्यमान, तेजोमय. सर्व विश्व यथार्थपणे जाणणारा पण त्याचबरोबर ज्ञानाप्रमाणेच अविद्याही निर्माण करणारा तू आहेस. नाक, कान, डोळे, मेंदू यांद्वारे होणारे सत्यज्ञान नव्हे. इंद्रियातील ज्ञान म्हणजे खरे व्यक्तिनिरपेक्ष ज्ञान. तुला व्यक्तिनिरपेक्ष असे ज्ञान आहे. तसेच तू ज्ञानमय असल्याने व्यक्तिनिरपेक्ष आणि अहंकारशून्य व्यक्तीला ज्ञात होतोस. तू ज्ञानी आहेस याचा अर्थ नाक, कान, डोळे, मेंदू यानी तू जाणतोस असा नव्हे. (सगुण प्रतिमेमध्ये नाक–कान–डोळे दाखवलेले असले तरीही). ज्ञानेंद्रियातीत अशी तुझी जाणीव सारे जीवन ज्ञानमय, चैतन्यमय, प्रकाशमय, अचूक आणि सामर्थ्यवान बनवते. वास्तविक, तुझ्या चिरंतन अस्तित्वाच्या पार्श्वभूमीवर ( व तुलनेत) तूच निर्माण केले ले विश्व आणि आम्हाला इंद्रियांमार्फत होणारे त्याचे ज्ञान म्हणजे अविद्या (आभास, माया ) होय. ही अविद्या व तिच्यात बद्ध होणाऱ्या आम्हालाही तूच निर्माण केलंस. अनंतज्ञानसूर्य समूहरूपी तुला माझे भक्तिपूर्वक अभिवादन असो.

**१२५) विष्वक्सेनः । विष्वक्सेनाय नमः ।**

ज्याला घाबरून शत्रू पळून जातात असा. अंतर्यामी ज्ञानोदय झाला की दुर्गुणरूपी राक्षस पळ काढतात. तसेच ज्ञानी माणसाचे सर्वसत्ताधारी तेज पाहून महाशक्तीशाली दैत्यांचे अवसान गळते. ते गलितगात्र होतात. थिजून राहतात. एवढेच नव्हे तर सात्त्विक अहंकार असणारेही तुझ्यापुढे गळून जातात. तुला अखंड प्रणिपात असो.

**१२६) जनार्दनः । जनार्दनाय नमः ।**

अर्दयाति म्हणजे सुखदु:खांचा दाता. दुष्टांना अविद्याजन्य दुर्गती आणि सज्जनांना ज्ञानजन्य प्रसन्नता व वेगवेगळ्या कसोट्या आणि अग्निदिव्य यांद्वारे विश्वकल्याणकारी सामर्थ्य प्रदान करणार तू आहेस. तुला नम्र नमन असो.

**१२७) वेदः । वेदाय नमः ।**

ज्ञान देणारा. अज्ञानांधकार नष्ट करून स्वरूपाचे यथार्थ ज्ञान प्रगट करणारा. स्थलकालातीत असा तू. ज्ञानेंद्रियातीत परास्पर्शी प्रज्ञावंतांची जाणीव व यांना जोडणारा अखंड दुवा (वेद) किंवा पूल हे सारे अभिवक्त आहे म्हणून तुला वेदः म्हणतात. तुला आदरपूर्वक वंदन असो.

**१२८) वेदवित् । वेदविदे नमः ।**

वेद जाणणारा. व्यक्तीची संकुचित बुद्धी व असहाय परावलंबित्व लक्षात घेता, ज्ञानमय असा तूच त्याना तुझ्याकडे म्हणजे सत्यानुभूतीकडे आकृष्ट करतोस व अखेर त्याना परास्पर्शी , तद्रुप व तपोनिधी बनवतोस हे सहज स्पष्ट होते. याच कारणास्तव तुला सर्वश्रेष्ठ गुरु म्हणतात. कारण तद्रुप बनवून तूच त्यांच्यावर अंतर्बाह्य ज्ञानप्रकाश उधळतोस. तुला भावपूर्ण नमन असो.

**१२९) अव्यंग : । अव्यंगाय नमः ।**

व्यंग नसलेला, दोष नसलेला व व्यक्तिमत्त्वातीत म्हणजे अव्यंग. शरीरादींमुळे ज्ञान, भावना इत्यादींना मर्यादा पडते. तू शरीरातील व संवेदनातीत शुद्ध व निर्दोष ज्ञानमय आहेस. तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**१३०) वेदांगः । वेदांगाय नमः ।**

वेद हे ज्याचं शरीर आहे असा. तू अशरीरी आणि सत्यज्ञानमय आहेस. त्यामुळे ज्ञानमय वेद हे जणु काही तुझी अंगेपांगे आहेत, शरीर लक्षणे आहेत. तुझे स्मरण कायम राहो व तुझ्याचरणी प्रणिपात असोत.

**१३१) वेदवित् । वेदविदे नमः ।**

वेदांचा (निर्माता, उगम असल्यामुळे) खरा जाणकार. वेदांचा ज्ञाता चिंतक व आविष्कार करणारा. वेद वेदांताचे साररूप असा महान गुरु तूच आहेस. इतर सारी अविद्या बंधनकारक आणि पंगु करणारी आहे. तुला अंत:करणपूर्वक दंडवत असोत.

### १३२) कवि: । कवये नम: ।

द्रष्टा. द्रष्टा असल्यामुळे तू दृश्य नाहीस व म्हणून तुला पाहणे शक्य नाही. द्रष्टेपणा, शहाणपणा, सर्वज्ञता इत्यादींच्या रूपात महाकाव्य करणाऱ्या द्रष्ट्या महाकवींच्या (वाल्मिकी, शुक्राचार्य, व्यास) हृदयात वास करणारा व त्याना प्रेरित करणारा प्रज्ञासूर्य तू आहेस. तुझ्या प्रचीतीमुळे काव्यातून काव्यातीत काव्य प्रगट होते. त्यातून व्यक्तित्वातीत विश्वकल्याणकारी सद्‌भावाचा जगावर वर्षाव होतो. कलेमध्ये तुझी लीला आविष्कृत होते आणि स्वर्गीय सौंदर्य व विशुद्ध आनंदानं मनं तृप्त होतात. विज्ञानामध्ये तुझी सृजनशील प्रज्ञा अवतरते आणि सर्व क्षेत्रांना नव्या शोधांना बहर येतो. अशा तऱ्हेनं, सद्‌भावना, सौंदर्य आणि समृद्धीचे मळे फुलतात. काव्यात दिव्यत्व, कलेत चित्कला आणि विज्ञानात प्रज्ञान अवतरून साक्षात् सच्चिदानंदाचं साम्राज्य प्रत्यक्षात येतं. तुला विनम्र प्रणाम असोत.

**लोकाध्यक्ष: सुराध्यक्षो धर्माध्यक्ष: कृताकृत:।**
**चतुरात्मा चतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुज: ॥**

### १३३) लोकाध्यक्ष : । लोकाध्यक्षाय नम: ।

लोक याचा एक महत्त्वाचा अर्थ अनुभव किंवा जाणिवतेची पातळी. त्यामुळे अनुभूती अजिबात नसणे, (निर्जीव वस्तू) ते ईश्वरी साक्षात्कार होणे इत्यादी साऱ्या पातळ्यांवर ज्याची सत्ता असते असा, व अनुभवाच्या सर्व पातळ्यांवरील सर्व चराचरावर ज्याची सत्ता असते असा. तुला अंत:करणपूर्वक अभिवादन असो.

### १३४) सुराध्यक्ष : । सुराध्यक्षाय नम: ।

विविध देवतांचा नायक. देवता म्हणजे विविध पातळ्यांवरील शक्तीकेंद्रे. ज्ञानेंद्रियांच्या किंवा उपकरणाच्या सहाय्याने जाणण्यास, कल्पिण्यास व नियमित किंवा नियंत्रित करण्यास अत्यंत कठीण अशा शक्तीचा स्वामी व शास्ता तूच आहेस. ह्या शक्ती व्यक्तीच्या जाणिवांशी निगडीत आहेत व व्यक्तीच्या हृदयाकाशात राहणाऱ्या अशा तुझ्या, अंकित आहेत. तूच त्यांना अधोगतीरूपी राक्षसांपासून वाचवतोस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

### १३५) धर्माध्यक्ष: । धर्माध्याक्षाय नम: ।

धर्माचा प्रमुख. सजीव आणि निर्जीव अशा प्रत्येक अणुरेणूचे अस्तित्व व तदंर्गत क्रिया नियंत्रित करणाऱ्या अचूक व सूक्ष्मातिसूक्ष्म नियमांचा उद्‌गाता व सत्ताधीश तू आहेस. त्यामुळेच उत्पन्न झालेलं नाश करणारा यमदेखील तूच आहेस. अन्य अर्थाने, समाजाचे अस्तित्व नियंत्रित करणारे कायदे, रीतीरिवाज, संप्रदाय, नीती, न्याय–

अन्यायाचे संकेत तसेच जाणिवांचे विश्व विकसित करणाऱ्या पाप–पुण्य, आत्मानात्मविवेक इत्यादी कल्पनांचा शास्ताही तूच आहेस. तुला मी मनोभावे वंदन करतो.

**१३६) कृताकृतः । कृताकृताय नमः ।**

कृतम् म्हणजे घडलेले अविष्कृत झालेले आणि **अकृतम्** म्हणजे आविष्कृत न झालेले. हे दोन्ही ज्याच्या ठायी आहेत तो **कृताकृतः** । रूढार्थाने असलेले व नसलेले सारे काही तुझ्या आधारानेच असते व हे सर्व काही तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**१३७) चतुरात्मा । चतुरात्माने नम :।**

चारही वेदांचा आत्मा. अन्य अर्थाने निद्रावस्था, स्वप्नावस्था, जागृती व तुर्यावस्था हे चारही पैलू असलेला आत्मा. तुला भक्तिभावपूर्वक नमन असो.

**१३८) चतुर्व्यूह : । चतुर्व्यूहाय नमः ।**

चार पद्धतींनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणारा. परंपरेनुसार वासुदेव, प्रद्युम्न, अनिरूद्ध व संकर्षणा इत्यादी सगुण मूर्तींच्या उपासना करून साक्षात्काराद्वारे, ब्रह्मदेव, दक्षादिप्रजापती, काल व तीनराशींच्या ज्ञानाद्वारे व सृष्टीच्या उत्पत्तीचे ज्ञान मिळवून, विष्णू, काल, मनु, सर्व भूते इत्यादींद्वारे सृष्टीचे पालन समजावून घेऊन आणि रूद्र, मृत्यू , काल व जीव यांच्याद्वारे विश्वप्रलय समाजवून घेऊन तुला जाणण्याचा प्रयत्न केला जातो. १) सृष्टीची उत्पत्ती २) पालन ३) विनाश यांमागील तत्त्वे समाजवून घेणे व ४) उपासनेद्वारा तुझा संपूर्ण साक्षात्कार करवून घेणे हे चार व्यूह म्हणजेदेखील तूच आहेस. वेगळ्या शब्दात भक्ती, ध्यान, कर्म, ज्ञान इत्यादी सत्य जाणून घेण्याचे व सत्याची प्रचीती घेण्याचे मार्ग म्हणजेच आत्मज्ञानमार्गदेखील तूच आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**१३९) चतुर्दंष्ट्र : । चतुर्दंष्ट्राय नमः ।**

शब्दश : चार सुळे, चार शिंगे किंवा चार दाढा असणारा नरसिंह. नरसिंहमूर्तीमध्ये चराचराचे एकत्व दिसून येतेच पण त्याचप्रमाणे जागृती, निद्रा, सुषुप्ती व तुर्या या चार (सुळ्यानी) पातळ्यांवरील राज, भक्ती, ज्ञान व कर्म या योग प्रकारांच्या वा चार वेदांच्या द्वारे अज्ञानरूपी हिरण्यकश्यपूला फाडून काढणारे कालातीत ईश्वरत्वही प्रत्ययास येते. तुला माझे कृतज्ञ वंदन असो.

**१४०) चतुर्भुज : । चतुर्भुजाय नमः ।**

निर्मिती, पालन, संहार व आशीर्वाद अशा चार महाप्रक्रिया व धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांचा कारक. परंपरेनुसार पूजल्या जाणाऱ्या सगुण रूपामधल्या तुझ्या चार हातांमधील शंख आतला आवाज म्हणजे शब्दब्रह्म किंवा निर्मिती दाखवतो. चक्र उत्पत्ती –पालन विनाश यापैकी विनाश दर्शविते. गदा, दंडक, दंड इ. द्वारे पालन दाखवते. व पद्म मोक्षदायी आशीर्वाद दाखवते.चार हात म्हणजेच चार वेद चार हात म्हणजेच मन, बुद्धी, चित्त व अहंकार, ज्यांच्याद्वारे व्यक्तीकडून तू कार्य करवून घेतोस व व्यक्तीला मुक्तही करतोस. तुझ्या सगुण मूर्तीमधील हे तथ्य सर्वांना आत्मसात होवो व तुझ्याचरणी विनम्र अभिवादन असो.

**भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिजः ।**
**अनघो विजयो जेता विश्वयोनिः पुनर्वसु : ।**

**१४१) भ्राजिष्णुः । भ्राजिष्णवे नमः ।**

तेजस्वी, ज्ञानप्रकाशरूप, ज्ञानतेजरूप. तुझ्या तेजापुढे सूर्याचे तेजही फिके पडते व तुझ्या तेजानेच अंधारातही चैतन्य भरले जाते. तुला माझे त्रिवार नमन असो.

**१४२) भोजनम् भोजनाय नमः ।**

अन्नसेवन. ज्ञानेंद्रिये व इंद्रियातीत जाणिवांद्वारे होणारे ज्ञान व अनुभूती आणि विश्वरूपी माया ( अन्न) ही ज्याच्यात विलीन होतात (सेवन) ते महाकारण, 'महाविवर'. अन्य दृष्टीने चराचराचा पोषणकर्ता. तुझ्या कृपेच्या निरंतर जाणिवेत तुला कृतज्ञ अभिवादन असो.

**१४३) भोक्ता । भोक्त्रे नमः ।**

एकात्मरूपाने व द्रष्ट्या अस्तित्वाने अखिल विश्व व विश्वाचे ज्ञान आणि शरीर / मनाच्या सर्व संवेदनांचा उपभोग घेणारा भोक्ता. तुला मनःपूर्वक वंदन असो.

**१४४) सहिष्णुः । सहिष्णवे नमः।**

सहनशील किंवा विजयी. मूलतः अंतिम सत्य व द्रष्टा असा अंतरात्मा तूच असल्याने साऱ्या सुखदुःखांचा अनुभव तूच घेतोस. तसेच ह्या सत्याचे स्मरण असणारा माणूस अंतर्बाह्य उत्क्रांत व रूपांतरीत होतो व प्रचंड दुःखे आघात सहज पचवून त्यांच्यावर मात करू शकतो. हे सामर्थ्य हीच खरी सहनशीलता. दुसऱ्या दृष्टीने सहिष्णुः म्हणजे पृथ्वी पळवणाऱ्या हिरण्याक्षाला ठार करून पृथ्वीला वाचवणारा किंवा लाव्हामय समुद्रातून जमीन आविष्कृत करणारा. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**१४५) जगदादिजः । जगदादिजाय नमः ।**

विश्वाच्या आरंभापूर्वीही असणारा. म्हणजेच सूक्ष्मतम अशा वैश्विक मन, बुद्धी व संकल्प रूपाने ( ज्याला हिरण्यगर्भ किंवा ब्रह्मदेव असेही म्हणतात) अस्तित्वात असणारा, वेगळ्या दृष्टीने विश्वाचे उगमस्थान जिथून उद्‌भवते ते. तुझ्या वैश्विक मातृपितृवासल्याच्या रमणीय स्मरणामध्ये तुला अंत:करणपूर्वक नमस्कार असोत.

**१४६) अनघः । अनघाय नमः ।**

निर्दोष, सर्वांगसुंदर. निष्कपट अशा तुझ्या स्मृतीने माझे जीवनही शुद्ध आणि निष्कलंक होऊ दे. तुला माझे सविनय प्रणाम असोत.

**१४७) विजयः । विजयाय नमः ।**

दृश्यादृश्य चराचरावरील व काळावरील प्रभुत्व किंवा असे प्रभुत्व असणारा. तुझ्या स्मृतीचे महादान देऊन भक्तांना ज्ञान वैराग्यादी ऐश्वर्याने संपन्न करणारा आणि यशस्वी करणारा हृदयस्थ ईश्वरही तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**१४८) जेता । जेत्रे नमः ।**

स्वरूपाच्या जाणिवेत राहण्यामध्ये यशस्वी होणारा व भक्तांना यशस्वी करणारा व त्याद्वारे चराचराचा सर्वंकष उत्कर्ष यशस्वीपणे करणारा. तुझ्या वैश्विक संकल्पनात व कार्यात कुणीही अडथळा आणू शकत नाही. तुला नम्रवंदन असो.

**१४९) विश्वयोनिः । विश्वयोनये नमः ।**

साऱ्या विश्वाचा उगम (योनि) आणि ग्लानि आलेल्या विश्वात अवतार घेणारा ईश्वर. तुला विनम्र अभिवादन असो.

**१५०) पुनर्वसुः । पुनर्वसवे नमः । वसति इति वसुः ।**

पुन्हा पुन्हा शरीरे धारण करणारा. अन्य दृष्टीने पाहता, तुझे ज्ञान झाल्यानंतर पुन्हा पुन्हा तुला विसरणाऱ्यांच्या अंतरंगात पुन्हा पुन्हा अवतीर्ण होणारा तूच आहेस. अंतर्बाह्य संपूर्ण जीवन उत्क्रांत करणाऱ्या तुला त्रिवार वंदन असो.

**उपेंद्रो वामनः प्रांशुरमोघः शुचिरूर्जित : ।**
**अतींद्रः संग्रहः सर्गो धृतात्मा नियमो यम : ॥**

**१५१) उपेंद्रः । उपेंद्राय नमः ।**

इंद्राचा धाकटा भाऊ. अन्य अर्थाने पाहता इंद्र हा ज्याचा धाकटा भाऊ असा. कारण ज्ञानेंद्रियांचा स्वामी जो इंद्र त्याहूनही श्रेष्ठ असा कूटस्थ परमात्मा महाविष्णू तू

आहेस. आणखी एका अर्थी जाणिवेच्या विविध पातळ्यांवरील संवेदनामधील सर्वोत्तम संवेदना इंद्र असून इंद्राप्रत नेणारी, जाणीवही तूच आहेस. तुला निरंतर नमस्कार असो.

**१५२) वामनः । वामनाय नमः ।**

बळी राजाचे गर्वहरण करणारा व ध्यानास योग्य असा वामन. अन्य दृष्टया साऱ्या दृश्यादृश्य विश्वाची मिळकत तुझ्यापुढे पूर्णपणे लटकी ठरते व अहंकार फोल ठरतो. तुला अखंड नमन असो.

**१५३) प्रांशुः । प्रांशवे नमः ।**

विराट, विशाल, सर्वव्यापी. विश्वाच्या संपूर्ण पसाऱ्याच्या ज्ञानापेक्षाही ज्याचे ज्ञान होणे कठीण आहे असा अतिविराट. तुझे ज्ञान व्हावे ही नम्र प्रार्थना.

**१५४) अमोघ : । अमोघाय नमः ।**

अचूक वेध घेऊन विश्वातील असंख्य गुंतागुतीच्या प्रक्रियांमधील परिणाम साधणारा. तुझ्या स्मृती मध्ये केलेली वैचारिक, मानसिक व शारीरिक कृती कल्याणमय व अचूक बनते. तुला आदरपूर्वक प्रणाम असोत.

**१५५) शुचिः । शुचये नमः ।**

शुद्ध. तू निरंतर शुद्धतम असतोस. चराचराचे, जाणिवेचे, बुद्धीचे व आचरणाचे धारण करणारा शुद्धतम धर्म (ज्यायोगे व्यक्तीचे कल्याण होते) अशा तुला सविनय अभिवादन असो.

**१५६) ऊर्जित : । ऊर्जिताय नमः ।**

शक्ती. उत्कर्ष, वैभव वगैरे. तूच व्यक्तीला उदात्त, तेजस्वी, सुंदर समृद्ध, सामर्थ्यशाली बनवतोस. तुला निरंतर नमन असो.

**१५७) अतींद्रः । अतींद्राय नमः ।**

ज्ञानेंद्रियांचा स्वामी मन. मनालाच इंद्र म्हणतात. मनाच्या पलीकडे असलेला. तुला शरणभावनेने अभिवादन असो.

**१५८) संग्रहः । संग्रहाय नमः ।**

सारे काही ग्रहण करणारा, त्यायोगे सारे काही जोडणारा, साऱ्या घडामोडी आत्मिक प्रेमाने स्वतःत सामावून घेणारा व व्यापक एकी/ विश्वसमन्वय उत्पन्न करणारा. तुला मनोभावे वंदन असो.

**१५९) सर्ग: । सर्गाय नम:।**

स्वत:तून विश्व उद्‌भवणारा. विश्वनिर्मितीच्या महान त्यागमय कृतीने व दृढ निश्चयात्मक संकल्पाने तू सर्व कर्मांचा श्रेष्ठ व आदर्श आधार आहेस. निर्गुण निराकार असा तू सृष्टीनिर्मितीने निर्माता म्हणून सगुण झालास हा सर्वश्रेष्ठ त्याग असून प्रत्येक घटना सुयोग्य प्रकारे घडणे हा तुझाच दृढ निर्धार होय. तुझ्याचरणी सतत लोटांगण राहो.

**१६०) धृतात्मा । धृतात्माने नम: ।**

स्वयंभू, स्वतंत्र व स्वत:च स्वत:चा आधार असून अंतर्बाह्य अस्तित्वाने विश्व सांधणारा विश्वाधार. वर वर दिसणारी सगुण, निर्गुण आदी रूपे बाह्यत: एकत्वाने, अनेकत्वाने वा परत्वाने धारण करणारा महान् आत्मा तू आहेस. कारण तू कालातीत, मूलाधार आहेस. तुझ्याचरणी विनम्र प्रणाम असोत.

**१६१) नियम: । नियमाय नम: ।**

चराचरांतर्गत नियम, या नियमांचा कर्ता व हे नियम अमलात आणणारा. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या कार्याचा खरा कर्ता तू आहेस. तुला माझे शतश: नमस्कार असोत.

**१६२) यम : । यमाय नम:।**

निसर्गातील सर्व शक्ती, प्रवृत्ती, प्रक्रिया, स्थित्यंतरे इत्यादींचे नियंत्रण करणारा व म्हणून मृत्यूचाही ज्याला नियंता म्हणतात. त्याचप्रमाणे योगसाधनेतील यम, ज्यायोगे व्यक्ती आत्मसाक्षात्काराच्या समीप येते, ते देखील तुझेच रूप आहे.तुला साष्टांग दंडवत असोत.

**वेद्यो वैद्य: सदायोगी वीरहा माधवो मधु: ।**
**अतीन्द्रियो महामायो महोत्सीहो महाबल: ।**

**१६३) वेद्य: । वेद्याय नम: ।**

बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध ह्या टप्प्यांनी, विविध प्रकारच्या साधनांनी आणि इंद्रिये, मन, बुद्धी, चित्त व अहंकार ह्या सर्वांसह शरण जाऊन जाणण्यासारखे एकमेव ज्ञेय. तुझ्याव्यतिरिक्त इतर कोणतीही महत्त्वाकांक्षा मनाला न स्पर्शो . तुला निरंतर वंदन असो.

**१६४) वैद्य:। वैद्याय नम: ।**

ज्ञानी आणि व्याधी दूर करणारा. आत्मज्ञानाच्या योगे अविद्या—मायाजन्य दु:खे दूर करणारा तूच आहेस. (अविद्या म्हणजे दृश्य व नश्वर असे सारे, चिरंतन खरे समजणे.)

तुझ्या चरणी दंडवत असोत.

**१६५) सदायोगी । सदायोगिने नमः ।**

ज्याच्या समीप राहणे हाच खरा योग असून आत्मस्वरूपी चिरकाल असण्याने व भक्त हृदयी कायम असणारा. तुला साष्टांग नमन असो.

**१६६) वीरहा । वीरघ्ने नमः ।**

सूक्ष्मतम, तरलतम, सर्वव्यापी, चैतन्यमय सत्ताधीश म्हणून महावीर. तुझ्या सतत स्मरणाने दुबळेही सामर्थ्यवान व पराक्रमी होतात. तुझ्या पायाशी लीनभावे लोटांगण असो.

**१६७) माधवः । माधवाय नमः ।**

मा–ध्यान, ध–अंतर्ध्यान व आत्मनिरीक्षण आणि व–एकजीवता. त्याचप्रमाणे मा–ज्ञान, सरस्वती, व लक्ष्मी आणि ध–स्वामी. त्यामुळे आत्मरूपी असणारा. ऐश्वर्य व ज्ञानाचा स्वामी तू आहेस. तुझ्या कृपेनेच आत्मसाक्षात्कार होतो. त्यामुळेच आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियेची एक विद्या जिला मधुविद्या म्हणतात तिचा स्वामी, कृष्णही तूच आहेस. तुला अखंड नमन असो.

**१६८) मधुः। मधवे नमः ।**

मधु म्हणजे मध, जीवरस, चैतन्यरस, तेजोरस, मकरंद इ. तसेच मधु म्हणजे वसंतऋतु. आत्मसाक्षात्काराला पोषक असा वसंतऋतु आणि शरीर, मन, बुद्धीच्या पोषणाद्वारे आत्मज्ञान प्राप्त करून देणारा जीवनस्वरूपी मधु तू आहेस. तुझ्यामुळे जीवनाचा व तेजाचा वर्षाव होतो. तुला शतशः अभिवादन असो.

**१६९) अतीद्रिय : । अतीद्रियाय नमः ।**

संवेदना, वासना, भावना , विचार, साक्षात्कार यांचा कारक व म्हणून संवेदनातीत व इंद्रियातीत असणारा. या शब्दांचा कर्ताही तूच आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**१७०) महामायः । महामायाय नमः ।**

विश्वातील जाणिवांचे, घटनांचे, काळाचे, अवकाशाचे अनंत स्तर म्हणजे महामाया. शक्ती तू या मायेशी नेहमी निगडीत असतोस व कधीही वेगळा केला जाऊ शकत नाहीस. पण या मायेने कधीही लिप्त होत नाहीस. ज्याप्रमाणे ज्या अवकाशात/ पोकळीत प्रसंग घडतात त्या प्रसंगापासून पोकळी वेगळी काढता येत नाही. पोकळीशिवाय ते प्रसंगही घडू शकत नाही, तसेच हे आहे. अर्धनारीनटेश्वराची प्रतिमा

हेच सूचित करते. निसर्गामध्ये सूर्य हे तुझे तर सूर्यापासून वेगळे न करता येणारे ऋतुचक्र हे मायेचे रूप आहे. प्रकाशाचा आधार व कारक उगम प्रकाशापासून जसा वेगळा काढता येत नाही तसेच तुझे व मायेचे आहे. नवविधाभक्तीने व नवरसानी नटलेली सर्वगुणसंपन्न माया तुझ्यापासून वेगळी केली जाऊ शकत नाही. परंतु पोकळी जशी प्रसंगानी लिप्त होत नाही, सूर्य जसा प्रकाशाने व ऋतुचक्रानेही लिप्त होत नाही त्याचप्रमाणे तूही मायेने लिप्त होत नाहीस. तुला अंत:करणपूर्वक नमस्कार असोत.

**१७१) महोत्साह : । महोत्साहाय नमः ।**

महान शक्ती किंवा उत्साह. समुद्राच्या पर्वतप्राय लाटाच्या निरंतर खळबळीने समुद्राची शक्ती समजते त्याचप्रमाणे अनंत कोटी प्रक्रियांमधून तू चैतन्याचा व उत्साहाचा महोदधि असल्याचे जणवते. तुला अखंड वंदन असो.

**१७२) महाबलः । महाबलाय नमः ।**

सामर्थ्यवान ऊर्जा, अवकाश, काळ यांच्या अतीत अशा तुझ्या अस्तित्वात सामर्थ्याचे महानद आहेत. व प्रत्येक कण, वस्तु, व्यक्ती व घटनांतील सामर्थ्याचा उगम हेच नद आहेत. मला त्यांच्या धारा प्राशन करीत तद्रुप होऊ दे. तुला विनम्र अभिवादन असो.

**महाबुद्धीर्महावीर्यो महाशक्तिर्महाद्युतिः ।**
**अनिर्देश्यवपुः श्रीमानमेयात्मा महाद्रिधृक ॥**

**१७३) महाबुद्धीः । महाबुद्धये नमः ।**

महाबुद्धीवान व महाप्रज्ञावान विभूतींच्या अचाट बुद्धीचाही धारणकर्ता व द्रष्टा परमात्मा. तसेच विश्वप्रक्रियेचा महाबुद्धीवान कर्ता. तुझ्याचरणी निरंतर वंदन असो.

**१७४) महावीर्यः । महावीर्याय नमः ।**

तेज व ओजाचा सर्व श्रेष्ठ उगम, आदिकारण. विश्वाचे कारक, बीजाभूत सार. तुला शतशः नमस्कार असोत.

**१७५) महाशक्तिः । महाशक्तये नमः ।**

इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती यांचा संगम ज्याच्या ठायी आहे व म्हणून जो विश्वनियमांचे नियंत्रण करु शकतो. तुझी समीपता व तज्जन्य शक्ती दे. तुला त्रिवार प्रणिपात असोत.

**१७६) महाद्युतिः । महाद्युतये नमः ।**

प्रकाशाचा प्रकाश, तेजाचे तेज व ज्ञानाचे ज्ञान तू आहेस. म्हणून तुला महाद्युति म्हणतात. स्वयंप्रज्ञाप्रकाशी अशा तुझी निकटता राहो व तुझ्याचरणी साष्टांग दंडवत असोत.

**१७७) अनिर्देश्यवपुः । अनिर्देश्यवपुषे नमः ।**

ज्याचा आकार किंवा स्वरुप दाखवता येत नाही, वर्णन करता येत नाही किंवा व्याख्येत बसवता येत नाही असा. कारण तुझी प्राप्ती होताच व्यक्ती तद्रुप होते व बुद्धी, तर्क आणि शब्द विरुन जातात. दृश्य, दृष्टी, द्रष्टा व दर्शनक्रिया सारे एकजीव होतात. व्यक्तित्व व वर्णनशक्ती विरुन जाते. आत्मरुप असा द्रष्टा तू दृश्य किंवा वर्णनविषय बनवणे अशक्य असते. तुला विनम्र प्रणिपात असोत.

**१७८) श्रीमान्। श्रीमते नमः ।**

दृश्यादृश्य असे सारे विश्व म्हणजे महामायेचे सर्वस्व ज्याच्यापाशी आहे आणि वैयक्तिक पातळीवर सर्व सुख, दुःख, कल्यनांच्या संवेदना जो उपभोगतो तो कर्ता व उपभोक्ता म्हणजे श्रीमान्. तुला माझे कोटी कोटी प्रणाम असोत.

**१७९) अमेयात्मा । अमेयात्मने नमः ।**

असंख्य आत्मे असलेला किंवा ज्याचा आत्मा अमर्याद आहे असा. विश्वातील सजीवांतर्यामी असल्याने असंख्य व विश्वांतर्बाह्य असल्याने अमर्याद असे म्हटले आहे. तुझ्या स्वरुपाचे ज्ञान होता होता व्यक्तिगत वैशिष्टये गळून जातात व वादविवाद, कारणमीमांसा व तत्त्वचर्चा करणे निरर्थक वा अशक्य बनते. तुझ्या वैश्विक आविष्कारातून सतत तुझे स्मरण होवो व तुझ्याचरणी अखंड अभिवादन असो.

**१८०) महाद्रिधृक् । महाद्रिधृगे नमः ।**

मोठा पर्वत उचलून धरणारा , मंदराचल व गोवर्धन उचलून तू भक्तांचे रक्षण केलेस असे तुझ्या सगुणावतारांचे वर्णन आहे. अन्य दृष्टया भक्ताच्या जडत्वाचे उन्नयन करणारा व त्याला आत्मसाक्षात्कार घडवणारा तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**महेष्वासो महीभर्ता श्रीनिवासः संता गतिः ।**
**अनिरुद्धः सुरानंदो गोविन्दो गोविदां पतिः ॥**

**१८१) महेष्वासः । महेष्वासाय नमः ।**

उत्तम धनुर्धारी सगुण रुपात अचूक शरसंधान करणारा उत्तम गुणी राम, तात्त्विकदृष्टया

घटना, वेळ व परिणाम यांच्यावर अचूकपणे नियंत्रण ठेवणारा. सर्वांची दृष्टी व्यक्तिनिरपेक्ष व अंतर्भेद करणारी अचूक होवो ही नम्र पार्थना. तुला विनम्र नमन असो.

**१८२) महीभर्ता । महीभर्त्रे नमः ।**

पृथ्वीला आधार देणारा. सगुण रुपात पृथ्वीला आधार देणारा शेष व वराह म्हणजे तूच तात्विकदृष्ट्या, विश्वातील व विशेषतः तमोगुण वाढवणारे व्यक्तीमधील जडत्व उत्क्रांत करणारा तू आहेस. तुला शिरसाष्टांग दंडवत असोत.

**१८३) श्रीनिवासः । श्रीनिवास नमः ।**

वैश्विक ऐश्वर्य प्रसवणारी महाशक्ती लक्ष्मी—माया, ज्याच्या हृदयी आहे किंवा अशा मायेच्या हृदयात जो आहे असा, ईश्वर. तुला अंतःकरणपूर्वक प्रणिपात असोत.

**१८४) सतां गतिः । सतां गतये नमः ।**

उत्तम दिशा, उत्तम मार्ग, उत्तम ध्येय, उत्तम प्रगती, उत्तम परिणती, उत्तम चिंरतन अंतिम अवस्था तुझी प्राप्ती, निकटता, तद्रुपता हीच सवश्रेष्ठ ध्येयपूर्ती तुला विनम्र नमस्कार असोत.

**१८५) अनिरुद्धः । अनिरुद्धाय नमः ।**

कालातीत, स्थित्यंतरातील व सर्व चराचराचा नियंता असल्यामुळे कुणाकडूनही रोखला जाऊ न शकणारा. तुला अंतःकरणपूर्वक प्रणिपात असोत.

**१८६) सुरानंद : । सुरानंदाय नमः ।**

विश्वातील जाणिवेच्या सर्व स्तरांवरील आनंदाचा उगम. तुझा चित्स्पंद हाच ओंकार. तुझा आविष्कार माझ्या हृदयी होऊन तुझ्या प्राप्तीच्या चिरकालीन आनंदाने माझे मनही भरुन जाऊ दे. तुला माझे शतशः नमस्कार असोत.

**१८७) गोविंदः । गोविंदाय नमः ।**

शरीरातील पृथ्वीतत्त्व, वासना, भावना, वाणी व परमज्ञान यांचा शास्ता. अन्य दृष्टीने, साऱ्या विश्वाचा तारक. तसेच, सगुण अवतारात, पृथ्वीला हिरण्याक्षापासून वाचवणारा वराह आणि गोकुळात गाई पाळणारा कृष्ण, पृथ्वीतत्त्वाशी असलेल्या नाल्याप्रमाणेच आयुर्वेदात अत्यंत गुणकारी मानल्या जाणाऱ्या पंचगव्याशी व गाईशीही तू निगडित आहेत म्हणून तुला गोविंद म्हणतात. तुला नम्र प्रणाम असोत.

**१८८) गोविंदा पतिः । गोविंदापतये नमः ।**

चराचरांतर्गत मूलतत्त्वे व त्यांचा नियंता तू आहेस याची जाणीव व अनुभूती असणारे ते गोविंद आणि त्यांची प्रत्येक कृती नियंत्रित करणारा त्यांचा स्वामी म्हणजे गोविंदापतिः प्रत्येक आत्मज्ञानी व्यक्तीची कृती नियंत्रित करणाऱ्या तुला साष्टांग नमन असो.

**मरीचिर्दमनो हंसः सुपर्णो  भुजगोत्तमः ।**
**हिरण्यनाभः सुतपाः पद्मनाभः प्रजापतिः ॥**

**१८९) मरीचिः । मरीचये नमः ।**

तेजःपुंज. ज्ञानप्रकाशाने अंतर्बाह्य उजळून टाकणारा तेजोमय ज्ञानसूर्य तू आहेस. तुला माझे अप्रतिहत अभिवादन असो.

**१९०) दमनः । दमनाय नमः।**

राक्षसी वृत्ती, अविद्याजन्य तमोगुण, दुरभिमान व अधिकारानी येणारा माज नष्ट करुन व्यक्तीचे सर्वांगीण उन्नयन व कल्याण करणारा. तुला साष्टांग दंडवत असोत.

**१९१) हंसः । हंसाय नमः।**

म्हणजे अहं सः. म्हणजे ते ब्रह्म म्हणजेच खरा मी आहे. व्यक्तीचे खरे आत्मस्वरुप किंवा खरा 'मी' म्हणजे परमेश्वर, तू आहेस. तुला सविनय प्रणाम असोत.

**१९२) सुपर्णः । सुपर्णाय नमः ।**

(आत्मरुपी) पक्ष्यांचा व गतीचा राजा गरुड (परमात्मा). अन्य अर्थाने, अत्युत्तम शाखा विस्तार पाने (पर्ण) असलेला आणि सत्याशी निगडित मुळे आहेत असा विश्वरुपी अश्वत्थ वृक्षदेखील मूलतः तूच आहेस. आणखी वेगळ्या दृष्टीने उत्तम शरीररुपी वृक्षावर बसून फळे भोगणारा जीवरुपी पक्षी, साक्षी परमात्मारुपी पक्षी, व वृक्ष हे सारेही तूच आहेस. तुला निरंतर वंदन असो.

**१९३) भुजगोत्तमः। भुजगोत्तमाय नमः ।**

नागातील अतिपवित्र अनंत नाग तूच आहेस. नाग ह्या संकल्पनेने कुंडलिनी आणि पृथ्वीला धारण करणारी तत्त्वे दर्शवली जातात. त्यामुळे पृथ्वीतत्त्व उन्नयित करणारा (शेष), शरीरस्थ आत्मा व परामात्म्याचे (शक्ती व शिव यांचे) मीलन घडवून साक्षात्कार घडवणारा ( कुंडलिनी) आणि संपूर्ण विश्वाचे सहस्य पराजाणिवेने समजणारा घटस्थ नाग (कुंडलिनीसदृश) तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**१९४) हिरण्यनाभः। हिरण्यनाभाय नमः।**

विश्वाचा निर्माता ब्रह्मदेव ह्या रुपाने व ह्या प्रक्रियेचा नियंता विष्णू ह्या सगुण रुपाने दर्शविला जातो. तुझ्या सगुण रुपात तुझी ही महती सतत जाणवत राहो ही तुझ्याचरणी प्रार्थना. तुला आदरपूर्वक अभिवादन असो.

**१९५) सुतपाः। सुतपसे नमः।**

शुद्ध विचार, शुद्ध भाव, शुद्ध कृती यांचा उगम म्हणजे स्वरुपज्ञानावस्था. ह्या अवस्थेत दृढ राहणे/वावरणे म्हणजे तप. म्हणून तुला सुतपाः म्हणतात. तूच तुझ्या भक्तांची अंतः प्रज्ञा जागवून त्यानाही सुतपाः बनवतोस. बदरिकाश्रमी नरनारायणाच्या रुपाने असणाऱ्या तपस्वी रुपाचे तथ्य असेच आहे. तुला भक्तिपूर्वक नमन असो.

**१९६)पद्मनाभः। पद्मनाभाय नमः।**

नाभीतून कमळ व कमळात विश्व रचणारा ब्रह्मदेव असे सगुण ध्यान पराकोटीची सृजनशीलता दर्शवते. त्याचप्रमाणे नाभीस्थान हे परावाणीचे व वातस्थान असून व्यक्तीच्या सर्व जीवनाचे नियंत्रण केंद्र आहे याची जाणीव देते. तुला शतशः दंडवत असोत.

**१९७)प्रजापतिः। प्रजापतये नमः।**

विश्वातील सर्व अणूरेणूंचा उगम व म्हणून सर्वांचाही पिता. तुला त्रिकरणपूर्वक (काया वाचा, मनाने ) वंदन असो.

**अमृत्यूः सर्वदृक् सिंहः संधाता सन्धिमान् स्थिरः।**
**अजो दुर्मर्षणः शास्ता विश्रुतात्मा सुरारिहा॥**

**१९८) अमृत्युः। अमृत्यवे नमः।**

जन्म, स्थिती (प्रकृती, विकृती), लय इत्यादी सर्वसामान्य नियम लागू नसणारा व तरल अस्तित्वाने अमर असणारा, स्थित्यंतरातील व अमर अशा तुझ्या अंतर्यामीच्या स्वरुपज्ञानाने भक्तही अमर होतो. तुझ्या ठायी माझ्या सर्व वृत्ती स्थिर–राहोत आणि पारंपारिक आस्तिक्यातून संभवणारा भाबडेपणा, नेभळटपणा, परावलंबित्व, आणि नास्तिक्यातून येणारा माज, गोंधळ, औदासीन्य दूर होऊन तुझ्या कृपेने सत्याचा प्रत्यक्षात विजय होवो. तुला विनम्र प्रणाम असोत.

**१९९) सर्वदृक्। सर्वदृशे नमः।**

सर्व काही जाणणारा, त्रिकालज्ञानी, दृष्टा व म्हणून इंद्रियगोचर किंवा बुद्धिगम्य

नसलेला व सर्वांतर्यामी असणारा. तुझे ज्ञान अशरीरी व इंद्रियातीत आहे व तुझा साक्षात्कारही मनाचा लय झालेल्या. अंहकार संपलेल्या, तद्रुप झालेल्या भक्ताला होतो. तुला मनोभावे नमन असो.

**२००) सिंहः । सिंहाय नमः ।**

पराक्रमी व नाश करणारा. सिंह सारी रुपांतरे, परिवर्तने घडवणारा, त्यांच्या अंतर्गत असलेला शाश्वत नियम. अन्य अर्थाने ज्याचे ज्ञान होताच इतर सर्व खालच्या अवस्था नष्ट होतात, म्हणजेच खालच्या अवस्थाचे स्थित्यंतर होते असा. वेगळ्या दृष्टीने शरीर, मन,वासना, कल्पना इत्यादींच्या जंगलाचा राजा. तसेच चराचर अस्तित्वाचा राजा. तुला सदैव साष्टांग प्रणिपात असाते.

**२०१) संधाता । संधात्रे नमः।**

चराचर विश्व घटना व भूत, भविष्य, वर्तमानकाळ यांना एकमेकांशी जोडणारा कालातीत ईश्वर. म्हणून विश्वाचे ऐक्य साधणाऱ्या तुला **संधाता** म्हणतात. याच कारणाने कर्म व कर्मफळ या दोन्हीनादेखील तू जोडतोस, सांधतोस. तुला त्रिवार वंदन असो.

**२०२) संधिमान् । संधिमते नमः ।**

सर्व कर्मे त्यांच्या तत्कालीन नैमित्तिक कारणांना जोडणारा व जीवात्मा म्हणून त्या कर्माची फळे उपभोगाणारा व अशा तऱ्हेने सारे विश्व एकसंधपणे धारण करणारा. तुला विनम्र अभिवादन असो.

**२०३) स्थिरः । स्थिराय नमः ।**

ऊर्जा व काळापेक्षाही वेगवान असा तू स्वस्वरुपी दृढपणे स्थिर आहेस. कोणत्याही कारणाने प्रभावित न होता तू अपरिवर्तनीय राहतोस म्हणून ( मंद, न हलणारा किंवा आळशी या अर्थाने नव्हे ) तुला **स्थिरः** म्हणतात. या शुद्धतम स्वस्वरुपी तुझे परमभक्तही तुझ्या कृपेने स्थिर होतात, स्तब्ध होतात. तुला भावपूर्ण नमन असो.

**२०४) अजः । अजाय नमः।**

वैज्ञानिक उपकरणे व परिमाणे यांनी दाखविता येण्यासारख्या अस्तित्वात जो येत नाही तो. अन्य दृष्टीने, तुझ्या उच्चतम अस्तित्वातून अशुद्ध व खालच्या पातळीवर तू कधीच आविष्कृत होत नाहीत म्हणूनही तू **अजः** आहेस. स्वप्नातल्या समस्यांना स्वप्नात उपाय सापडावे त्याप्रमाणे जन्म, मृत्यू, निर्मितीच्या संबंधीच्या प्रश्नांचे व उत्तरांचे असते. तू जन्मला नाहीस व कुणाला जन्माला घालीतही नाहीस. कारण उत्पन्न होणे, काही अंशी उत्पन्न होणे, उत्पन्न झाल्याचा भास होणे, उत्पन्न न होणे अशा अनेक प्रकारे

जे जाणवते जागृती, स्वप्न व झोपेतील संवेदनांनी होणारे अस्तित्व, जन्मबाबतचे वरवरचे ज्ञान असते. तद्रुपतेमध्ये असे ज्ञान संपून तुझे सत्तामय नित्यत्व प्रत्ययाला येते व बाकीचेही सारे काही परम अर्थपूर्ण अस्तित्वात जन्माला येतच नाही याची जाणीव होते. त्यामुळे **अजः** हे नाव समर्पक आहे तुला मन:पूर्वक प्रणाम असोत.

**२०५) दुर्मर्षण: । दुर्मर्षणाय नमः ।**

अजिंक्य. तुझ्यापासून निर्माण होणे, तुझे विस्मरण होऊन अविद्या–मायेच्या बंधनात राहून सुख दु:खे भोगणे आणि कालांतराने तुझे ज्ञान व साक्षात्कार होऊन तुला मिळणे ह्या साऱ्या प्रक्रियाना नैमित्तिक कारणे म्हणून अनेक शक्ती जबाबदार असल्या तरी त्याना अजिंक्य असा त्याचा नियंता तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२०६) शास्ता । शास्त्रे नमः ।**

नियंता. अंत:प्रकाश देणारा, साक्षात्कार घडविणारा, विश्वातील प्रत्येक बाबीचा शासक नियंता (श्रुती, स्मृती, अवतार यांद्वारेही समाजजीवन नियंत्रित करणारा ) तूच आहेस. तुझ्या पायाशी माझे शिरसाष्टांग दंडवत असोत. ।

**२०७) विश्रुतात्मा । विश्रुतात्मने नमः ।**

ज्याचे वर्णन तो काय नाही हे अनेक प्रकारे सांगून ( वर्णनातील असतानाही) केले जाते असा श्रवणयोग्य सत्यात्मा. एकाच वेळी कूटस्थ आणि सर्वव्यापी असणाऱ्या परमात्मरुपी तुझ्या सामर्थ्याची सतत आठवण राहो व तुझ्या पायाशी अखंड नमन राहो.

**२०८) सुरारिहा । सुरारिघ्ने नमः ।**

देवांच्या, योग्यांच्या, साधकांच्या भक्तांच्या (अविद्यामायारूपी आलेल्या आणि अधोगतीला नेणाऱ्या) शत्रूना ठार मारणारा. भक्तांच्या अविद्यामायेप्रमाणेच या दुबळेपणाचा अधोगतीसाठी वापर करणाऱ्या अघोरी दुष्टांचा नाश करणाराही तूच आहेत. तुझे कधीही विस्मरण न होवो व अधोगती प्राप्त न होवो हीच प्रार्थना. तुला भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार असोत.

**गुरुर्गुरुतमो धाम सत्यः सत्यपराक्रमः ।**
**निमिषोऽनिमिषः स्रग्वी वाचस्पतिरुदारधीः ।।**

**२०९) गुरुः । गुरवे नमः ।**

पूर्णज्ञानी, पूर्ण प्रभावी आणि साऱ्या विश्वाला आत्मज्ञानप्रकाश देणारा असा पवित्रतम आणि आद्य गुरु केवळ तूच आहेस. तुझ्याचरणी माझे साष्टांग नमन असो.

**२१०) गुरुतमः । गुरुतमाय नमः ।**

सर्वोच्च ज्ञानमयतेतून (ब्रह्मदेव ) सृष्टीची रचना आणि सृष्टीतील जीवाची बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध असो उक्रांती या दोन्हींचा कर्ता, नियंता व मार्गदर्शक व (जाणण्यास सर्वात कठीण म्हणूनही) गुरु. त्याचप्रमाणे व्यक्ती व प्रकृती, सृष्टी व नियती यांचे नियंत्रण केंद्र तू आहेस व तुझ्याभोवती हे सारे तुझ्या इच्छेने फिरत आहे. कृष्णाच्या भोवती गोपीं ची रासक्रीडा व केंद्रस्थानी असणारा कृष्ण हे सगुण रुपदेखील हाच मथितार्थ सूचित करते. तुझ्याचरणी शतशः दंडवत असोत.

**२११) धाम । धाम्ने । धाम्ने नमेः ।**

ज्ञानयात्रेला अंतिम टप्पा. ज्ञानजन्य अवस्थांतरातील, वैयक्तिक व मर्यादित अस्तित्वाचे अखेरचे,शुद्ध तेजोमय व परमोच्च आनंदमय अस्तित्वात होणारे स्थित्यंतर तू आहेस. तुला भावपूर्ण अभिवादन असो.

**२१२) सत्यः। सत्याय नमः ।**

भूत, वर्तमान व भविष्य काळाने प्रभावित होत नाही व कधीही बदलत नाही ते सत्य. व्यक्तीच्या कुवतीनुसार तिला जाणवणारे तेही सत्यच. व्यक्तीचा विकास व्यक्तित्व संपण्याइतपत झाला, की ज्ञानेंद्रियातील अमर्याद जाणिवांना होणाऱ्या प्रचीतीने ब्रह्म हे सत्य, ज्ञान व अनंत आहे असे म्हणतात. तसेच सत्यानुभवाच्या एका स्थितीत प्राण आणि प्राणांचे मूलतत्व नारायण हेच शिल्लक राहतात व हे सत्य म्हणजे तुझेच रुप, तूच आहेस. वैयक्तिक, संकुचित व म्हणून मर्त्य व असत्य असे सर्व या अवस्थेत निष्प्रभ होते. तुझ्या आठवणीमध्ये प्रत्येक क्षण व्यतीत होवो व तुझ्याचरणी लोटांगण राहो.

**२१३) सत्यपराक्रमः । सत्यपराक्रमाय नमः ।**

तुझे अस्तित्व ही केवळ वादविवादाची किंवा कल्पनेची बाब नाही. ती एकाच वेळी व्यक्तीला आत्मप्रत्यय, प्रचीती देणारी, प्रभाव पाडणारी व परिणाम घडवणारी एकमेवाद्वितीय महाशक्ती आहे. म्हणून अजिंक्य अशा तुला सत्यपराक्रमः म्हणतात. त्याचप्रमाणे वैश्विक घटनांमागील तुझी यशस्वी यंत्रणा हीच चिरंतन व शाश्वत असल्यानेही तुला **सत्यपराक्रमः** म्हणतात. अन्य दृष्टीने पाहता तुझी प्रचीती व '' सत्यमेव जयते न अनृतं'' ( म्हणजेच तुझी वैयक्तिक अनुभूती व अवैयक्तिक / सामाजिक कल्याण) परस्परांशी संपूर्णतया निगडित असतात म्हणूनही तुला **सत्यपराक्रमः** म्हणतात. आस्तिकांना पुष्कळदा, देव सारे काही मनुष्यबुद्धीने पाप–पुण्याचा विचार करुन करतो असे वाटते. त्यामुळे देवाच्या अस्तित्वाविषयी पराधीन बनवणारी खुळी श्रद्धा तयार होते. समाज गर्तेत जातो. नास्तिकांना आस्तिकांची गल्लत कळते. पण

सर्व भौतिक विश्व आणि व्यक्तीचे आशिक अस्तित्व हेच पूर्ण सत्य मानण्याची घोडचूक ते करतात. त्यातून स्वैराचार अन्याय व पाशवीपणा फोफावत जातो व समाज गर्तेत जातो. आस्तिक आणि नास्तिक दोघेही त्यांच्या या गोंधळामुळे १) संकुचित लाभात धन्यता मानतात उदाहरणार्थ पुष्कळ नास्तिक लोकही वैयक्तिक व्यावहारिक यशात कृतकृत्यता मानतात. २) मनोदुर्बळ कृतीहीन, षंढ बनतात. उदाहणार्थ पुष्कळ आस्तिक लोक देवाधीन वा दैवाधीन होऊन ''देवाने दिलेल्या व दैवाने दिलेल्या'' परिस्थितीत निष्क्रियपणे जगत राहतात तर पुष्कळ नास्तिक त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांना आलेल्या अपयशाने खचून असहाय व वैफल्यग्रस्त जीवन जगतात. ३) साप म्हणून दोरी बडवत राहून/निरर्थक कर्मे करीत राहून कधीतरी मोक्ष मिळेल, स्वर्गाचे दार उघडेल किंवा क्रांती होईल ह्या खुळ्या आशेमागे फरफटत जातात. उदाहरणार्थ पुष्कळ आस्तिक लोक वर्षानुवर्षे व पिढ्यानपिढ्या यंत्रवत् भजन–पूजन, कीर्तन–मेळे, दान–धर्म वगैरे बाबी त्यांची सामाजिक सयुक्तिकता व उपयुक्तता यांचा विचार न करता व वैयक्तिक जीवनात योग्य मूल्यांचा आविष्कार न करता करीत राहतात तर पुष्कळ नास्तिक लोक क्रांती ह्या कल्पनेतील आशय त्याविषयीचे त्यांचे आकलन, त्यांच्या कार्याचे सामर्थ्य, परिणामकारकता आणि मर्यादा, त्यांचे स्वत:चे वैयक्तिक जीवन आणि त्यातील सुख–समाधान–स्थैर्य यांचे भान हरपून वेगवेगळ्या चळवळींमध्ये यंत्रवतच आणि प्रभावहीनपणे धडपडत राहतात. सत्याचा जयजयकार करीत माझे मस्तक नेहमी तुझ्या चरणी राहो.

**२१४) निमिषः। निमिषाय नमः।**

डोळ्याची उघडझाप होण्यासाठी (पापणी लवण्यासाठी) लागणारा काळ तू केवळ वस्तुमात्रातच नव्हे तर अनंतकाळातच नव्हे तर प्रत्येक क्षणामध्येही आहेस. त्याचप्रमाणे, निमिष या संज्ञेतून तुझी विश्वसत्यज्ञ, आत्मदर्शी व विश्वमय अवस्था दर्शविली आहे. तुझ्या सतत स्मरणात माझे र्स्वस्व विलीन होवो व तुझ्याचरणी भक्तिपूर्वक साष्टांग दंडवत असोत.

**२१५) अनिमिषः । अनिमिषाय नमः ।**

तुझी ज्ञानदृष्टी कधीच मिटलेली नसते व त्यामुळे चराचरांतर्बाह्य सारे काही तू अखंडपणे व निरंतर जाणतोस म्हणून तुला **अनिमिषः** ( पापणी न लावणारा ) असेही म्हटले आहे. स्वत:चे विश्वकारणरुप, विश्वकेंद्ररुप व विश्वमयरुप सतत जाणणाऱ्या व पाहणाऱ्या तुझ्या पायी निरंतर प्रणाम असोत.

**२१६) स्त्रग्वी । स्त्रग्विणे नमः ।**

सगुणरुपामध्ये वैजयंती माळ गळ्यात घालणारा. कालातीत आणि साऱ्या परिमाणांनाही स्वत:च्या अंकित ठेवणाऱ्या तू ही विश्वरुपी माळच गळ्यात घातली आहेस. तुला भावपूर्ण अभिवादन असो.

**२१७) वाचस्पतिरुदारधी: । वाचस्पतये उदारधिये नमः ।**

सम्यक् ज्ञानी, शिक्षक, उदारबुद्धीचा व बुद्धिजन्य कृतीचा प्रेरक. तुझ्या समीपतेच्या आकांक्षेत शिर तुझ्याचरणी राहो.

**अग्रणीर्ग्रामणी: श्रीमान् न्यायो नेता समीरण: ।**
**सहस्त्रमूर्धा विश्वात्मा सहस्त्राक्ष सहस्त्रपात् ।।**

**२१८) अग्रणी: । अग्रण्ये नमे: ।**

सन्मार्ग आणि परमपदाच्या मार्गावरील आत्मज्ञान्यांचा नेता. कारण तूच अनादी व अनंतत्वाने आद्य व अंतिम सन्मार्ग व कल्याणमयता आहेस. तुला शिरसाष्टांग नमन असो.

**२१९) ग्रामणी: । ग्रामण्ये नमः ।**

ग्राम म्हणजे समूह. विश्वातील वस्तू व घटनासमूह यांचा, शरीरातील सर्व अवयव घटकांच्या समूहाचा आणि जाणिवेच्या विविध पातळ्यांच्या समूहाचा नियंता. म्हणून तू **ग्रामणी:** आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**२२०) श्रीमान् । श्रीमते नमः ।**

श्री म्हणजेच चैतन्यमय ज्ञानशक्ती (लक्ष्मी) ने युक्त आणि अंतरंग आनंदाने भरणारा अत्यंत सुंदर म्हणून तुला श्रीमान् म्हणतात. आल्हाददायी विश्व सौंदर्य ही जणु तुझी अनुपम कांती (बाह्यविष्कार) होय. तुला साष्टांग दंडवत असोत.

**२२१) न्याय: । न्यायाय नमः ।**

न्याय: म्हणजे वैश्विक नियमांचे ज्ञान, अनुभूती आणि पालन होय. त्याचप्रमाणे साधनेची अचूक पद्धत, तंत्र, नियम म्हणजेही न्याय. ह्या दोन्हींची सुरुवात व परिणती तुझ्या इच्छेने, तुझ्यापासून व तुझ्यात होते. म्हणून तुला न्याय म्हणतात. तुझी, सर्वांना प्राप्ती होणे हा अंतिम व अचूक न्याय आहे. कारण पाप–पुण्याच्या विरोधाभासात दुभंगलेल्या परस्परपोषक प्रवृत्तीचे उन्नयन व कल्याण हीच अत्यंत इष्ट बाब आहे. तुला निरंतर अभिवादन असो.

**२२२) नेता । नेत्रे नमः ।**

साऱ्या  विश्वाचा, समाजाचा आणि प्रत्येक व्यक्तीचा संरक्षक, पोषणकर्ता व मार्गदर्शक, चराचराचा नियंता. तू श्रेष्ठ नेता आहेस. तुझ्या अधिष्ठानाशिवाय सारे काही भ्रष्ट आहे, अज्ञानमूलक आहे व आत्मवंचक आहे. तुझ्या पायाशी शतशः नमस्कार असोत.

**२२३) समीरणः । समीरणाय नमः ।**

सजीवांमधील प्राणतत्त्व. हे प्राणतत्वच वैदिक पंचमहाभूतांमध्ये आणि आयुर्वेद व योगात वायू म्हणून ज्ञात आहे. शरीरातील अणुरेणू, पेशीच्या आवरणामधून होणारी विद्युत्भारित कणांची हालचाल यांच्यामागे असलेले प्राणतत्त्व हे तुझे रुप असून तुझ्या स्वरुपाची कल्पना स्पष्ट व्हावी म्हणून तुझे ह्या स्वरुपात देखील वर्णन केले जाते. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२२४) सहस्त्रमूर्धा । सहस्त्रमूर्धे नमः ।**

सहस्त्रावधी ज्ञानकिरणरुपी शिरे असणारा व आत्मज्ञानी योग्यांच्या प्रज्ञेने असंख्य अवधाने असणारा, आणि हजारो मेंदूच्यापेक्षा अधिक जाणणारा. तुला सविनय अभिवादन असो.

**२२५) विश्वात्मा । विश्वात्मने नमः ।**

साऱ्या विश्वाचे एकमेव नियंत्रक तत्त्व, आत्मा. राजयोग, भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, लययोग, पूर्णयोग इत्यादी मार्गांनी व तुझ्या नामस्मरणाने तुझ्याशी तद्रुपता येत व भय, असुरक्षितता, संकुचितता, नेभळटपणा, बावळटपणा, खुळेपणा, भिडस्तपणा, क्षुद्रपणा, न्यूनगंड यांचा नाश होतो व भक्तही समर्थ होतो. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**२२६) सहस्त्राक्षः । सहस्त्राक्षाय नमः ।**

असंख्य डोळ्यांनी होणाऱ्या दृक्ज्ञानापेक्षाही अधिक पाहणारा. तुला इंद्रियातील प्रज्ञेने जाणणारे योगी व भक्तही अधिकाधिक तरल, उदात व विशाल बनतात. त्यांचे प्रज्ञाचक्षूही तुझेच डोळे आहेत. म्हणूनही तू सहस्त्राक्ष आहेस. व्यक्तींच्या अंतर्बाह्य असणारं तुझं अस्तित्वच त्यांची जाणीव अचूक, विशाल व सखोल बनवतं. सर्वकाही पाहणारा व सर्वांच्या दृष्टीमागील खरा द्रष्टा असलेल्या तुझ्या साष्टांग दंडवत असोत.

**२२७) सहस्त्रपात् । सहस्त्रपदे नमः ।**

हजारो पायांनी विश्वामध्ये अवतीर्ण असणारा व हजारो पायांच्या महाशक्तीने विश्व पेलणारा, सांभाळणारा म्हणून तुला **सहस्त्रपात्** म्हणतात. तुला निरंतर प्रणाम असोत.

**आवर्तनो निवृत्तात्मा संवृतः संप्रमर्दनः ।**
**अहर–संवर्तको वन्हिरनिलो धरणीधरः ॥**

**२२८) आवर्तनः । आवर्तनाय नमः ।**

उत्पत्ती, स्थिती व विलयरुपी चक्रांतर्गत चिरंतन सत्य, या चक्राचा हेतू व या चक्राची परिणती, तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**२२९) निवृत्तात्मा । निवृत्तात्मने नमः ।**

निवृत्त आत्मा साऱ्या विश्वाशी विश्वाच्या सारांशभावाने किंवा अंतर्यामाने निगडित पण स्वतंत्रतेने व परिणामशून्य राहणारा म्हणून तू निवृत्तात्मा आहेस. तुला माझा अखंड दंडवत असो.

**२३०) संवृतः । संवृताय नमः ।**

झाकलेला. अहंकारी संकुचित व्यक्तीना त्यांच्या अविद्येमुळे. तू नेहमी अनुभवातीत, आवरणांतर्गत झाकलेला, अदृश्य असतोस. अविद्या नष्ट होताच अंतर्बाह्य सर्वत्र स्पष्टपणे प्रगट होणाऱ्या तुझ्याचरणी कायम अनुसंधान राहू दे व तुझ्याचरणी माझा माथा कायम राहू दे.

**२३१) सम्प्रमर्दनः । स्म्प्रमर्दनाथ नमः ।**

संपूर्ण विश्वाचा पुन्हा ज्ञानमय महाकारणरुपात विलय घडवून आणणारा व व्यक्तीच्या अविद्येचे निर्दालन करणारा. ( अज्ञानी जिवांना ज्यामुळे पीडा होते) रुद् किंवा काल ह्या तुझ्याच प्रतिमा आहेत. म्हणून तुला **सम्प्रमर्दनः** म्हणतात. तुला साष्टांग नमन असो.

**२३२) अहः संवर्तकः । अहः संवर्तकाय नमः ।**

सृष्टीला चेतना देणारा दिवस सूर्यामुळे आणि सूर्याची कार्यशक्ती तुझ्यामुळे आहे. तू संपूर्ण विश्वातील स्फूर्ती आणि जीवनाच्या उल्हासाचा कारक आहेस. उगम आहेस. तुला शतशः प्रणाम असोत.

**२३३) वन्हिः । वन्ह्ये नमः ।**

पंचमहाभूतातील तेज विश्वामध्ये व शरीरामध्ये आवश्यकतेनुसार शक्ती देते. हे तेज म्हणजेच अग्नी तुझे रुप व कार्याचा एक पैलू असून, त्यामुळे आणि थंड प्रदेशात जीव वाचवणारा असल्याने अग्नी ह्या तुझ्या रुपाची अनादिकालापासून पूजा होते. सर्व तेजाचेही तेज अशा तुला भावपूर्ण अभिवादन असो.

**२३४) अनिलः । अनिलाय नमः ।**

वायू. पंचमहाभूतातील वायु व विश्वोत्पत्तीदेखील कारणीभूत अशी ओंकारशक्ती, शब्दब्रह्म हीतुझीच रुपे आहेत. ओंकारमय तुला स्थानबद्धता व कालबद्धता नाही. तसेच स्थानमर्यादा व कालमर्यादाही वास्तविक तूच आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**२३५) धरणीधरः । धरणीधराय नमः ।**

कृष्ण, शेष, अष्टदिग्गज व वराह रुपानी पृथ्वीला धारण करणारा. याचा मथितार्थ सारे विश्व सहज धारण करणारा आंतरिक जणिवेचा परमोच्च गाभा, जाणीवेचे महाकेंद्र, तुझ्या ह्या सगुण साक्षात्काराने सर्व परिस्थिती स्वतःच्या सामर्थ्याने सहज पेलण्याची शक्ती येते. परिस्थितीवर मात करण्यासाठी आत्मशक्तीची प्राप्ती होते. तुला अखंड नमन असो.

**सुप्रसादः प्रसन्नात्मा विश्वधृग्विश्वभुग्विभुः ।**
**सत्कर्ता सत्कृतः साधु र्जन्हर्नारायणो नरः**

**२३६) सुप्रसादः । सुप्रसादाय नमः ।**

मोक्षाचा, स्वातंत्र्या उत्तम प्रसाद, उत्कृष्ट आशीर्वाद देणारा. पाप–पुण्य, चांगले–वाईट, नीती–अनीती, शत्रू–मित्र, आस्तिक –नास्तिक अशा द्वंद्वांमध्ये सत्य नसते. या साऱ्या द्वंद्वांत अहंभावनेने लोळणाऱ्यांच्या हृदयी प्रगट होऊन सामर्थ्यसाक्षात्काराचा अत्युच्च प्रसाद तू देतेस व द्वंद्वांतीत आनंदानुभूती प्राप्त करुन देतोस. विश्वसमन्वयाची प्रेरणा देतोस. तुला अनन्यभावे कृतज्ञ प्रणाम असोत.

**२३७) प्रसन्नात्मा । प्रसन्नात्मने नमः ।**

प्रसन्न आत्मा तूच जीवात्म्याच्या व अहंकाराच्या द्वारे व पंचमहाभूतात्मक व त्रिगुणात्मक सृष्टीशी निगडित होऊन सुख–दुःखे भोगतोस. परंतु तूच तीन गुण, तीन अवस्था, तीन लोक, चार वाणी, तीन देह, सहा रिपु यांच्या अतीत जाऊन आत्मानुभूती घेतोस व सच्चिदानंदमय बनून जगाला आनंद देतोस. तुझ्याचरणी शतशः दंडवत असोत.

**२३८) विश्वधृक् । विश्वधृगे नमः ।**

विश्वाचा आधार. जाणिवांच्या आणि ज्ञानांच्या विश्वाचा आणि विश्वाचा कालातीत आधार तू आहेस. तुला अनंत प्रणाम असोत.

**२३९) विश्वभुक् । विश्वभुजे नमः ।**

विश्व व व्यक्तीचे अंतर्बाह्य पोषण करणारा तू आहेस. तरीही सारे विश्व अखेरीस ज्ञानमय अशा तुझ्यामध्ये चिरंतनपणे येऊन मिळते. म्हणून मला **विश्वभुक्** म्हणजे विश्व गिळणारा म्हणतात. तसेच व्यक्तीने अनुभवलेले सारे काही तुलाच प्राप्त होते म्हणूनही तुला विश्वभुक् म्हणतात. तुला सादर प्रणाम असोत.

**२४०) विभुः । विभवे नमः ।**

अनेक रुपे, अवतार व विभूतींच्या रुपात अनेकत्वाने वावरतोस किंवा मायेच्या बंधनामुळे तसा भसतोस पण मूलतः एकच असतोस म्हणून तू विभुः आहेस तुला शतशः नमस्कार असोत.

**२४१) सत्कर्ता । सत्कर्त्रे नमः । सत् करोति इति सत्कर्ता ।**

ज्याचं प्रत्येक कर्म चिरंतन, ज्ञानमय व आनंदमय आहे असा. तुझी प्रत्येक वैश्विक कृती ही तुझ्या आत्मरुपाची महापूजा आहे आणि तुझ्या स्मृतीमध्ये तुझे भक्त करतात ती प्रत्येक कृतीही अशीच पूजा व संस्कृती बनते. तुला सादर प्रणिपात असोत.

**२४२) सत्कृतः । सत्कृताय नमः ।**

विश्वातील विविध पातळ्यांवर वावरणाऱ्या देव-देवतादी शक्तींनाही पूज्य असलेला. कारण त्यांच्याही अंतरीचा परमात्मा तूच आहेस व त्यांच्या प्रत्येक कृतीची अंतिम परिणतीही तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२४३) साधुः । साधवे नमः । साधयति इति साधुः**

साधू. ज्याच्या हृदयी वैश्विक सत्याचा व तद्‌जन्य नियमांचा चिरंतन प्रकाश व प्रचीती असते आणि त्याची प्रत्येक कृती या ज्ञानातून प्रगट होते, यशस्वी होते आणि विश्वाला सत्याप्रत नेते असा, सर्वोत्तम पुरुष म्हणजे साधुः. या सर्व उत्तम व अचूक न्यायदात्या गुणांची पराकोटी असलेला म्हणून तूच खरा एकमेव श्रेष्ठतम साधू आहेस. तुझ्याचरणी मी नतमस्तक आहे.

**२४४) जन्हुः । जन्हवे नमः ।**

संहारसमयी सर्व विश्व लयास नेणारा. तू विश्वाचा व तिन्ही लोकांचा नायक असून

साऱ्या विश्वाला विविध द्वंद्वांतून ज्ञानमयतेकडे नेणारा व ज्ञानमय बीजरुपात जोपासणारा (सगुणरुपामध्ये कल्पांती महोदधिमध्ये वटपत्रावर शयन करणाऱ्या बाळकृष्णाच्या रुपात विश्व जोपासणारा) आहेस. तुला विनम्र वंदन असो.

**२४५) नारायणः। नारायणाय नमः।**

नारः म्हणजे प्रलयकालीचे जल व **अयनम्** म्हणजे त्यावर आरुढ असणारा नरः म्हणजे माणूस व **अयनम्** म्हणजे खरे चिरंतन निवासस्थान. तसेच **नारायणः** म्हणजे नराचे (ईश्वर) वैश्विक प्रगटन, म्हणून लोककल्याणाची इच्छा करणे म्हणजे तुझ्या प्राप्तीसाठी प्रार्थना करणेच होय व लोककल्याणाचा संदर्भ विसरणे म्हणजे तुला विसरणे होय. अशा विस्मरणात पूजाअर्चा करणे म्हणजे आत्मवंचनाच होय. व्यक्ती व विश्वाला आत्मानुभूती व चिरंतन मुक्ती देणाऱ्या तुला कृतज्ञ नमन असो.

**२४६) नरः। नराय नमः। नयति इति नरः। प्रोक्तः परमात्मा सनातनः।**

ईश्वर, परमात्मा, नियंता, अनादी, अनंत व अथांग असा तू वैश्विक घडामोडीप्रमाणेच व्यक्तीची साधना व सद्‌गतीही नियंत्रित करतोस. तुला अखंड अभिवादन असो.

**असंख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः शिष्टकृच्छुचिः।**
**सिद्धार्थ सिद्धसंकल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः।**

**२४७) असंख्येयः। असंख्येयाय नमः।**

गणनातीत, वीज, वारा, पोकळी, काळ यांच्याहीपेक्षा अधिक तरल व सूक्ष्मातिसूक्ष्म आणि अधिक व्यापक व विशालही असल्याने गणनातीत. अन्य दृष्टया पाहिल्यास अगणित अवतार, आविष्कार असलेलाही तू आहेस तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२४८) अप्रमेयात्मा। अप्रमेयात्मने नमः।**

प्रमेय मांडणाऱ्या, निर्माण करणाऱ्या बुद्धीचा निर्माता व नियंत्रक आणि अशा बुद्धीला अंतर्बाह्य व्यापणारा असल्याने तुझे अस्तित्व तर्काच्या कसोटीने सिद्ध करता येत नाही. त्याचप्रमाणे एकादी बाब सिद्ध करायची तर त्या बाबीपासून स्थळ, काळ, जाणीव ह्या दृष्टींनी वेगळे व स्वतंत्र असणे आवश्यक असते. पण तुझ्या बाबतीत हे अशक्य आहे. त्यामुळे तुझे अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे आणि तुझे अस्तित्व सिद्ध न झाल्यामुळे तू नाहीस असे समजणे परावलंबी परात्मभावाचे, देहबद्धध्याधीनतेचे लक्षण आहे. तुला मनःपूर्वक व निरंतर प्रणाम असोत.

**२४९) विशिष्टः । विशिष्टाय नमः ।**

सर्वश्रेष्ठ असे  एकमेवाद्वितीय सत्य, महाविष्णू. साऱ्या विश्वाला व साधकाला अनुक्रमे कल्पांती किंवा साधनेच्या परिसीमेवर स्वत:मध्ये सामावून घेणारा. विश्रांती देणारा ईश्वर तू आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**२५०) शिष्टकृत् । शिष्टकृते नमः ।**

सारे विश्व अचूकतेने नियंत्रित करणारा व भक्तांना निसर्गनियमांचे रहस्य उलगडून दाखवणारा व अुभवास आणून देणारा तसेच भक्तांचे विचार, भावना, कृती व योजना यांचे नियंत्रण करणारा व त्याना खरे शहाणे बनवणारा. तुला आणि तुझी कृपा झालेल्या, उपदेश मिळालेल्या, तुझ्याशी संवाद साधणाऱ्या, तुझे संकेत समजणाऱ्या महानुभावांना साष्टांग नमन असो.

**२५१) शुचिः । शुचये नमः ।**

स्वतः अविद्या–मायेने दूषित न होणारा आणि तुरीयावस्थेत प्रचीतीस येणारा पवित्रतम ईश्वर असल्याने तुला शुचिः म्हणतात. तुझ्याचरणी माझे लोटांगण असो.

**२५२) सिद्धार्थः  । सिद्धाथयि नमः ।**

धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चारही पुरुषार्थांचा धनी तुझ्या अस्तित्वांतर्गत अर्थ, गुणसंपत्ती अपरिमित, गहन, स्वत:सिद्ध व पूर्ण आहेत. जिथे साधायचे असे सर्व संपते व केवळ पूर्णत्वच राहते अशा तुला नम्र अभिवादन असो.

**२५३) सिद्धसंकल्पः । सिद्धसंकल्पाय नमः ।**

वैश्विक नियमानुरुप असलेले व त्यामुळे नेहमीच पूर्ण होणारे अव्यक्तिगत संकल्प करतो तो. खरे योगी व तुझे  भक्तही सिद्धसंकल्प असतात. तुझ्याचरणी मी लीन आहे.

**२५४) सिद्धिदः । सिद्धिदाय नमः ।**

प्रत्येक कर्माची अचूक फलश्रुती देणारा व त्यामुळे तुझी इच्छा करणाऱ्यांना तुझी प्राप्ती व इतरांना त्यांच्या मायामोहादिमुळे होणाऱ्या क्षुद्र इच्छांची तृप्ती ( व तज्जन्य सुख–दु:खे व अतृप्तता) देणारा. तुला विनम्र अभिवादन असो.

**२५५) सिद्धिसाधनः । सिद्धिसाधनाय नमः ।**

सिद्धीचे साधन. सर्वश्रेष्ठ सिद्धी (लाभ) व सिद्धीचे सर्वश्रेष्ठ साधन ( मार्ग, प्रयत्नांना लागणारी शक्ती, प्रयत्नाची दिशा, अनुसंधानाचे लक्ष्य) दोन्ही तू आहेस. कार्य–

कारणांतर्गत अचूक दुवाही तू आहेस. त्यामुळे तू सर्वोत्तम यशाचे गमक व सर्वोत्तम यशाचा मार्ग आहेस व सर्वोच्च यशही आहेस.तुला मनोभावे नमन असो.

**वृषाही वृषभो विष्णुर्वृषपर्वा वृषोदर।**
**वर्धनो वर्धमानश्च विविक्तः श्रुतिसागरः॥**

**२५६) वृषाही। वृषाहिणे नमः।**

म्हणजे यज्ञकर्मानंतर राहिलेल्याचा स्वामी. यज्ञकर्म म्हणजे सारे संकुचित अस्तित्व ईश्वरार्पण करणे. अहंकाराचा होम करणे. साहजिकच यानंतर शिल्लक राहते ते परमात्मतत्त्व. ते तूच आहेस. पुण्यकर्म व यज्ञकर्माचे (लोककल्याणासाठी केलेल्या कृतीचे) सर्वोच्च फळ ती कृती योग्य स्थळी, योग्य प्रकारे व योग्य वेळी केल्यास मिळते. म्हणजेच अचूक यज्ञाकर्मानंतर मिळणारे उत्तम फळ ज्यावर अवलंबून आहे असा उत्तम मुहूर्त व स्थळ. तुझ्याचरणी मन:पूर्वक अभिवादन असो.

**२५७) वृषभः। विष्णवे नमः।**

संपूर्ण विश्वातील चराचरांतर्बाह्य घटना व घटनाक्रमांवर स्वार झालेला ( नियंत्रण ठेवणारा). म्हणूनच **इंद्र विष्णुः विचक्रमे** असे उपनिषदांमध्ये, पुरुषसुक्तामध्ये म्हणतात. त्याचप्रमाणे विश्वाच्या आणि व्यक्तीच्याही अंतर्बाह्य असणारा व जाणिवेच्या सर्व पातळ्यासंकट सर्व काही व्यापणारा तू आहेस, म्हणूनही तुला विष्णु: ( श्रेष्ठतम अंतर्बाह्य व्यापणारे आवरण) म्हणतात. तुला विनम्र अभिवादन असो.

**२५९)वृषपर्वा। वृषपर्वणे नमः।**

धर्माचा सोपान. तुझ्या नामस्मरणाने, चिंतनाने सनातन अजरामर धर्माची त्याच्या आत्मज्ञानाधिष्ठित अचिंत्य अशा आत्मसाक्षात्काराची प्राप्ती होणे. म्हणून **वृष**(धर्म) **पर्वम्** (पायऱ्या, शिडी) ह्या अर्थी तुला **वृषपर्वा** म्हणतात. तुला माझे त्रिवार वंदन असो.

**२६०) वृषोदर :। वृषोदराय नमः।**

वृष म्हणजे धर्म व उदर म्हणजे पोट, उगम किंवा गर्भाशय. तू धर्माचे उगमस्थान आहेस. विश्वधर्माचे उगमस्थान, किंवा गर्भाशय असा तू यच्चयावत् जिवांचे अंतिम विश्रांतीस्थान आहेस. तुला सादर प्रणाम असोत.

**२६१) वर्धनः। वर्धनाय नमः।**

साऱ्या विश्वाचे आणि प्रत्येक व्यक्तीचे सर्वंकष पोषण आणि सर्वांगीण पोषण आणि सर्वांगीण अभिवृद्धी व विकास करणारा. अंतर्यामी राहून भक्तांना ज्ञान व आनंदमय

अशा आंतरिक सामर्थ्याचा, साक्षात्कार घडवणाऱ्या तुला साष्टांग दंडवत असोत.

**२६२) वर्धमानः । वर्धमानाय नमः ।**

विश्वात्मक असल्याने व विश्वाचा सर्वतोपरी विकास व वृद्धी होत असल्याने **वर्धमानः** चराचरातील सर्व प्रक्रियांना सामावणारे अवकाश व काळ यांनाही सामावून त्यांचीही सर्वांगीण वाढ करणारा तू आहेस. तुझ्या पायाशी सादर अभिवादन असो.

**२६३) विविक्तः । विविक्ताय नमः ।**

एकाच वेळी सर्वांतर्यामी असूनही कशानेही लिप्त न होणारा व प्रभावित न होणारा ( एकटा अचल, अबाधित) भक्तांनाही ह्या असामान्य गुणांचे वरदान देणाऱ्या तुला निरंतर नमस्कार असोत.

**२६४) श्रुतिसागरः । श्रुतिसागराय नमः ।**

आत्मबोधाचा सागर तू आत्मबोधाचा महासागर आहेस. तुझ्यापासूनच ऋषींचे अंतरंगरुपी मेघ ब्रह्मज्ञानाने भरतात आणि हजारो सत्शिंष्यांच्या हृदयकोशात उपदेशरुपी वर्षाव करतात. ह्याच सत्शिष्यांच्या प्रार्थनारुपी जलौघाने भरणाऱ्या नद्या फेसाळत पुन्हा तुलाच येऊन मिळतात. तुला निरंतर अभिवादन असो.

**सुभुजो दुर्धरो वाग्मी महेन्द्रो वसुदो वसुः ।**
**नैकरुपो बृहद्रूपः शिपिविष्टः प्रकाशनः ।।**

**२६५) सुभुजः । सुभुजाय नमः ।**

सारे विश्व हे ज्याचे उत्तम हात आहेत असा. तसेच सगुण रुपामध्ये ज्ञान, संरक्षण आशीर्वाद व प्रसंगी शिक्षा देणारे सर्वोत्तम हात असणारा. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**२६६) दुर्धरः । दुर्धराय नमः ।**

हृदयाकाशात हृदयकमली असूनही देहबुद्धीजन्य अहंकार व संकुचित वृत्तीमुळे आकलन होण्यास अत्यंत कठीण व दुष्प्राप्य, तथाकथित बुद्धिवंत, विचारवंत आणि तत्त्ववेत्यांचीही अहंमन्यता व दंभ न सरल्यामुळे त्यांनाही प्राप्त होण्यास अत्यंत दुष्कर असा तू आहेस. माझे शिर तुझ्या पदकमली राहो.

**२६७) वाग्मी । वाग्मिने नमः ।**

म्हणजे वाक्चतुर. उत्तम वाणीने संपन्न. आत्मज्ञानाने पूर्णअशा अचिंत्य, नादमधुर व आनंददायी वाणीने चराचराना त्यांच्या अंतर्यामी प्रगटून स्वतःकडे खेचणारा व

विशेषत: ऋषिजनांना आत्मसाक्षात्कार घडवणारा तुला शतश: नमस्कार असोत.

**२६८) महेंद्र: । महेंद्राय नम: ।**

आत्मज्ञानाप्रत नेणाऱ्या उदात्त भावना व मन या देवतांचा ईश्वर, आत्मा. साऱ्या दैवी शक्तींचा त ईश्वर आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**२६९) वसुद: । वसुदाय नम: ।**

आंतरिक व बाह्य अशी सर्वोत्तम संपत्ती, ऐश्वर्य म्हणजे तुझी सत्ता. तुझ्या भक्ताना ही श्रेष्ठ सत्ता प्रदान करणारा म्हणून तला वसुद: म्हणतात. तुला विनम्र अभिवादन असो.

**२७०) वसु: । वसवे नम: ।**

ऐश्वर्य. तुझी प्राप्ती हेच सर्व श्रेष्ठ धन होय. त्याचप्रमाणे **वासवति इति वसु:** म्हणून सर्वव्यापी असा तू वसु आहेत. तुला भावपूर्ण नमन असो.

**२७१) नैकरुप: । नैकरुपाय नम: ।**

भक्तांना अनेक मनोवेधक रुपात दर्शन देणारा, अनेक प्रसंग व अनुभवातून साक्षात्कार देणारा, त्याचप्रमाणे अनेक अवतारानी आविष्कृत होणारा. त्याचप्रमाणे विश्वाच्या असंख्य घडामोडीमध्येही आविष्कृत होणाऱ्या तुला माझे कृतज्ञतापूर्वक नमस्कार असोत.

**२७२) बृहद्रूप: । बृहद्रूपाय नम: ।**

सारे मापदंड ज्याच्या महानतेसमोर व विशालत्वासमोर थिटे पडतात तो. सर्वव्यापी अशा तुला माझे त्रिवार वंदन असो.

**२७३) शिपिविष्ट: । शिपिविष्टाय नम: ।**

संकुचितता व क्षुद्रत्वाचा त्याग, अहंकार व वैयक्तिक इच्छा आकांक्षांचा त्याग, किंवा त्या साऱ्या ईश्वरचरणी समर्पण करण्याची प्रक्रिया पवित्र करणारा. म्हणजे यज्ञ. तो तूच आहेस. सांकेतिक भाषेत यज्ञाचा बळी म्हणजे शिपि व शिपिविष्ट म्हणजे या बळीचा भोक्ता. तसेच विश्वातील सर्व प्रक्रिया उदाहरणार्थ सूर्यचंद्रांच्या किरणांकरवी जलतत्त्वाचे जे शोषण होत असते त्या साऱ्या क्रियांचा म्हणजेच वैश्विक यज्ञाचाही कारक तूच आहेस. तुला माझे अखंड नमन असो.

**२७४) प्रकाशनः । प्रकाशनाय नमः ।**

सर्वांतर्यामी सच्चिदानंदमय सामर्थ्याचा प्रकाश लखलखत ठेवणारा म्हणून प्रकाशनः. तुझ्या नामस्मरणात मी नतमस्तक आहे.

**ओजस्तेजोद्युतिधरः । प्रकाशात्मा प्रतापनः ।**
**ऋद्धः स्पष्टाक्षरो मन्त्रश्चन्द्रांशुर्भास्करद्युतिः ॥**

**२७५) ओजस्तेजोद्युतिधरः । ओजस्तेजोद्युतिधराय नमः ।**

उत्तम आरोग्य, आचार, विचार व भावनानी प्राप्त होणारे तेज व द्युति म्हणजे या सर्वांची अत्यंत रमणीय अनुभूती व प्रभाव. सर्वोत्तम गुणांची धारणा करणाऱ्या व अंतर्यामी वसणाऱ्या तुला साष्टांग दंडवत असोत.

**२७६) प्रकाशात्मा । प्रकाशात्मने नमः ।**

प्रकाशाचे खरे साररुप.तूच ज्ञानप्रकाश व भक्तिप्रकाशाचा उगम आहेस. तुला भक्तिपूर्वक लोटांगण असो.

**२७७) प्रतापनः । प्रतापनाय नमः ।**

विश्वविकासातील अनंत आविष्कारातून व्यक्त होणारा म्हणजे चैतन्यदायी सामर्थ्यदायी पराक्रम ( ज्यायोगे समाज व व्यक्ती स्वतःच्या मुक्तीची प्राप्ती करुन घेतात) म्हणून तुला **प्रतापनः** म्हटले आहे. तुला साष्टांग नमन असो.

**२७८) ऋद्धः । ऋद्धाय नमः ।**

योगाद्वारे प्राप्त होणाऱ्या धर्म, ज्ञान, वैराग्य इत्यादी उत्तम गुणांचा, सर्वंकष सत्तेचा आणि वैश्विक पातळीवर सृष्टीच्या संपूर्ण वैभवाचा स्वामी. तुला साष्टांग प्राणिपात असोत.

**२७९) स्पष्टाक्षरः । स्पष्टाक्षराय नमः ।**

स्पष्ट म्हणजे शुद्ध आणि अक्षर म्हणजे अजरामर. तू स्वतः अजरामर आहेस. त्यामुळे तुझी ओळख पटवणारे ॐकाररुप शब्द ब्रह्म तुझे सर्व गुणविशेष भक्तांतर्यामी प्रगट करणारे आहे. तुझ्या नामामध्ये ही शक्ती आहे व नामस्मरणात सर्वंकष मुक्ती आहे, विश्वक्रांतीचा आशय आहे आणि विश्वक्रांतीची बीजे आहेत. तुला विनम्र अभिवादन असो.

**२८०) मंत्रः । मंत्राय नमः । मननात् त्रायते इति मंत्रः ।**

ज्यांच्या मनन, चिंतनयुक्त जपाने आत्मसाक्षात्कार होतो व मंत्रजप करणारी व्यक्ती अविद्येमधून तरते त्याना मंत्र म्हणतात. तू उपासनेची, नामजपाची इच्छा देणारा, जप करवून घेणारा, व जप करणाऱ्यास प्राप्त होणारा आहेस म्हणून तुला मंत्रः म्हणतात तुला अखंड अभिवादन असो.

**२८१) चंद्रांशुः । चंद्रांशवे नमः ।**

चंद्रकिरणांच्या शीतल गुणांनी पृथ्वीचा त्रास व ताप जसा शमविला जातो व पृथ्वी जणुकाही रोगमुक्त व सुदृढ होते तद्ववतच तुझ्या साक्षात्काराने शारीरिक, आर्थिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक दाह नष्ट होतात. म्हणून तुला **चंद्रांशुः** ( चंद्रकिरण) म्हणतात. तुला त्रिवार वंदन असो.

**२८२)भास्करद्युतिः । भास्करद्युतये नमः ।**

सूर्यकिरणांप्रमाणे साऱ्या विश्वाला व विश्वातील प्रज्ञावंत तेजस्वी विभूतींना तू चैतन्य प्रदान करतोस म्हणून तुला **भास्करद्युतिः** (सूर्यकिरण) म्हणतात. अन्य दृष्टीने पाहिल्यास सूर्यकिरणांतर्गत (चंद्रकिरणांप्रमाणेच ) गुणवैशिष्ट्यांचा स्वामीही तूच आहेस म्हणून तुला **भास्करद्युतिः** म्हणतात. तुला त्रिवार प्रणाम असोत.

**अमृतांशूद्भवो भानुः शशबिंदुः सुरेश्वरः ।**
**औषधं जगतः सेतुः सत्यधर्मपराक्रमः ।।**

**२८३) अमृतांशूद्भवः । अमृतांशूद्भवाय नमः ।**

अमृतमंथनातून उत्पन्न होणारा म्हणून तुला अमृतांशूद्भवः म्हणतात. या शब्दातून व्यक्तिजीवनातील आणि विकासातील द्वंद्वात्मक प्रक्रिया आणि अशा प्रतिक्रियांमधून निर्माण होणारी आत्मसात्क्षात्कारी, वैश्विक दृष्टी, विश्वात्मकता दर्शविली जाते. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२८४) भानुः । भानवे नमः ।**

मूलतः सूर्य आणि त्याचे कार्य हा तुझा आविष्कार आहे आणि साऱ्या विश्वाला व जाणिवेच्या क्षेत्राला चेतना देणारा कालातील सूर्यही तूच आहेस. म्हणून तुला भानुः (सूर्य) म्हणतात. तुला भक्तिपूर्वक दंडवत असोत.

**२८५) शशबिंदुः । शशबिंदचे नमः ।**

चंद्रावर सशासारखा डाग असतो म्हणून चंद्राला **शशबिंदुः** म्हणतात. पृथ्वीला

शीतलता देण्याचा चंद्रामधील गुण तुझ्यापासून उत्पन्न होतो किंवा तूच या गुणाचा आणि परिणामाचा धारणकर्ता व कारक असा महेश्वर (चंद्र डोक्यात धारण करणारा शंकर हे सगुण रुप ) आहेस. तुला भावपूर्ण नमन असो.

**२८६) सुरेश्वरः । सुरेश्वराय नमः ।**

विश्वातील वेगवेगळ्या देवदेवतांचा (शक्ती) आणि व्यक्तीतील मुक्तिदायी भाव–भावनांचा कर्ता, स्वामी, ईश्वर तूच आहेस. तुला शतशः प्रणाम असोत.

**२८७) औषधं । औषधाय नमः ।**

स्वरुपाच्या अज्ञानामुळे होणाऱ्या परवशतेतून व वेदनांमधून मुक्ती देणारे म्हणून तू व तुझे स्मरण ह्यांना औषधं म्हटलं आहे. तुझ्या स्मरणाने आणि ज्ञानाने असुरक्षितता, असहायपणा, परावलंबित्व, अगतिकता असे रोग तर नष्ट होतातच. परंतु शारीरिक व्याधी नष्ट होण्यासाठीही तुझ्या नामस्मरणाचा उपयोग होतो. सामर्थ्य व आरोग्यदायी असे सर्वोत्तम औषधच असणाऱ्या तुला विनम्र अभिवादन असो.

**२८८)जगत:सेतू । जगतः सेतवे नमः ।**

विश्वातील चराचर वस्तू, व्यक्तींच्या जाणिवा, त्यांची अंत:करणे, विविध घटनांमागील निसर्गनियम, काळातील अवस्थेचा साक्षात्कार हे सारे जोडणारा. अज्ञानाच्या झंझावाती महाप्रलयात आधार व संरक्षण देऊन तुझ्या कालातीत अस्तित्वाची चिरंतन प्रचीती देणारा म्हणूनही तुला **जगतः सेतुः** म्हणतात. अहंभावजन्य त्रुटीच्या खाईतून सच्चिदानंदमय पैलतीरी नेणारा महासेतु अशा तुला अखंड नमन असो.

**२८९) सत्यधर्मपराक्रमः । सत्यधर्मपराक्रमाय नमः ।**

विश्वातील चिरंतन व अबाधितपणे चालू असणाऱ्या प्रक्रियांमागील अजरामर व महान् सामर्थ्यवान तत्त्व. त्यामुळे तुझ्या स्मरणातच खऱ्या व अस्सल शौर्याचा साक्षात्कार होतो. तुला आदरपूर्वक प्रणाम असोत.

**भूतभव्यभवन्नाथः पवनः पावनोऽनलः ।**
**कामहा कामकृत्कान्तः कामः कामप्रदः प्रभुः ।।**

**२९०) भूतभव्यभवन्नाथः । भूतभव्यभवन्नाथाय नमः ।**

भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळ या तीनही काळांपेक्षा सूक्ष्म व व्यापक असल्याने ह्या तिघांच्याही आतीत व तिघांचाही स्वामी. तुझे असे अस्तित्व, ढोबळ अर्थाने असणे व नसणे यांच्या पलीकडे आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**२९१) पवनः । पवनाय नमः ।**

व्यक्तीच्या शरीरात व बाहेर सूक्ष्मतर अशा विद्युत्भारितकणांची (Ions), प्रकाशकणांची (Photons) वा विजेची (Electrons) हालचाल असो अगर तारकांची, आकाशगंगांची अतिप्रचंड हालचाल असो. त्यांचा जनक व नियंता तूच आहेस. या तुझ्या गुणाला प्राण, वात इ. संज्ञा आहेस. मनोवेग व संकल्पशीलता यामागेही प्राण असतो. जाणिवेच्या विकासपातळीनुसार विकसित केलेल्या विविध मोजपट्ट्या व बौद्धिक, मानसिक चौकटींच्या द्वारे हे स्वरुप जाणता येत नाही. सर्वकाही अशाप्रकारे स्पंदनशील व शुद्ध बनवणाऱ्या तुला भावपूर्ण नमन असो.

**२९२) पावनः । पावनाय नमः ।**

साऱ्या विश्वावर काळाची सत्ता असते. काळाचा महिमा अगाध असतो. काळाप्रमाणे युगे व युगांनुसार युगधर्म घडतात व बदलतात. परंतु काळाच्या ह्या ओघावर आणि उपरोक्त प्राणवायूवर तुझी सत्ता आहे. तूच सारे विश्व, तुझ्या उपस्थितीने शुद्ध पवित्र बनवतोस. विश्वसंकल्प व व्यक्तिसंकल्प हे देखील तुझ्यामुळे व तुझ्या सत्तेने उदात्त व शुद्ध होतात. तुला अंतःकरणपूर्वक वंदन असो.

**२९३) अनलः । अनलाय नमः । अन= प्राण ल = प्राप्त करणे.**

विश्वातील व शरीरातील चैतन्य, तेज किंवा अग्नी. हा अग्नी सजीवातील सर्व हालचालीमागील प्राणतत्वाला धारण करतो. ह्या कारणास्तव अग्निपूजा भक्तीने केली जाते. हिमपाताच्या प्रदेशात व काळात तर अग्नी म्हणजे संरक्षक अभय देणारे वरदानच.घनघोर अरण्यात अग्नी म्हणजे मनुष्यप्राण्याना मोठा आधारच. तुला विनम्र अभिवादन असो.

**२९४) कामहा । कामघ्ने नमः ।**

चराचराच्या गतीमागील प्रेरणा, शारीरिक, आर्थिक, राजकीय, बौद्धिक, मानसिक, भावनिक, आकांक्षा व भोगेच्छा ह्या साऱ्यांचा कारक तू आहेस आणि ह्या सर्वांवर विजय मिळवून वैयक्तिक, संकुचित इच्छा-आकांक्षा, आसक्ती व कल्पनांचा होम यत्र करवून भक्तांना स्वतःमध्ये समरस करून घेणाराही तू आहेस. म्हणून तुला **कामहा** (इच्छेचा नाश करणारा) म्हणतात. तुला कृतज्ञ प्रणिपात असोत.

**२९५) कामकृत् । कामकृते नमः ।**

प्रत्येक इच्छा हे मूलतः तुझेच रुप आहे. प्रत्येक तऱ्हेची भोगवासना, तळमळ, प्रेम विरह, मीलन, आर्त ओढ, जिज्ञासा ही सारी तुझीच रुपे आहेत. म्हणून तू कामकृतू

आहेस. तुझे मला अखंड स्मरण राहो आणि तुला निरंतर नमन असो.

**२९६) कान्तः । कांताय नमः ।**

तुझ्या दर्शनाने उत्कट, अंत:करण उचंबळून टाकणारे भाव उत्पन्न होतात, अंतर्लय व ताल निर्माण होतो. आत्मसंगीताच्या लहरी सुसंबद्धपणे व मधुरतेने सर्वांगी भरतात म्हणून तुला **कांतः** म्हणजेच सुंदर किंवा क्षुल्लक सुखदु:खांची जननी जी माया तिचा पती म्हणतात. जीवन सौंदर्याचा महोदधी अशा तुला अखंड नमन असो.

**२९७) कामः । कामाय नमः ।**

साऱ्या चराचराची आत्मज्ञानाची, तुझ्या प्राप्तीची अंतिम व मूळ इच्छा जी त्यांना पुष्कळदा कळत नाही, पण कार्यरत असते. आदिम समाज तुझी (सत्याची) कल्पना करीत असे. पुढे त्यांना तुझ्या गुणांची अस्पष्ट जाणीव शब्दरुपात झाली. पुढे तुझ्या वैश्विक स्वरुपाचे दर्शन विचारांमधील स्पष्टतेच्या रुपात झाले. मग अनुभूती झाली. नराचा नारायण बनण्याची अवस्था मनुष्याने गाठली. मानवाला समजू लागले की मृगजळाचे असणे, स्वप्नाचे असणे, भासाचे असणे, कल्पनेचे असणे, असे असण्याचे विविध प्रकार असतात. स्थिर गाडीचे असणे, चालत्या गाडीचे असणे, विजेचे असणे असेही असण्याचे प्रकार असतात. त्याचप्रमाणे शरीर, भावना, अनुभव यांचे असणेही वेगवेगळे आहे. आत्मज्ञान्यांच्या मुखाने तू वारंवार दाखवून दिले की आत्मरुपी अशा तुझे अस्तित्व हेच सर्वाधिक सत्य व सत्तारुपी अस्तित्व आहे आणि आमच्या तथाकथित जागेपणी जे सत्य भासते त्याचे असणे हे तुझ्या असण्याच्या तुलनेमध्ये पोकळ, छायावत आणि भ्रामक आहे. तसेच तद्रुपतेच्या प्रचीतीच्या तुलनेमध्ये इतर सर्व अनुभव वरवरचे, उथळ आणि फसवे आहेत. तू आणि तुझ्या अनुभूतीव्यतिरिक्त इतर काहीही पारमार्थिक (परम अर्थपूर्ण, प्रगल्भ) सत्य नाही. व्यक्ती व समाजाला दिशा देणारी तद्रुपतेची, आत्मप्रचीतीची ओढ ( **कामः**) म्हणजे तुझंच रुप आहे. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**२१८) कामप्रदः । कामप्रदाय नमः ।**

संकुचित अस्तिवाचा त्याग करुन ज्याच्यात स्वत:ला विरघळू द्यावे, असा ज्याच्या सेवेत स्वत:ला समर्पण करण्याची इच्छा धरावी व ज्याच्या समीपतेची आकांक्षा धरावी असा म्हणून तुला कामप्रदः म्हणतात. तुला नम्र प्रणाम असोत.

**२९९) प्रभुः । प्रभवे नमः ।**

सर्वां च्या अस्तित्वाचा, विविध जाणिवांचा, या सर्व संयत्राच्या विकासाचा, आणि काळाचाही स्वामी तूच आहेस. म्हणून तुला प्रभुः (शास्ता, अधिपती, संचालक,

सत्ताधीश, आश्रयदाता, संरक्षक) म्हणतात. तुला विनम्र अभिवादन असो.

**युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशनः ।**
**अदृश्यो व्यक्तरुपश्च सहस्त्रजिदनन्तजित् ।।**

**३००) युगादिकृत् । युगादिकृते नमः ।**

तुझ्यामुळे काळ, काळामुळे काळमहिमा, काळमहिम्यामुळे युगे, युगांमुळे सृष्टी व समाजातील उत्क्रान्ती, या युगांनुसार आणि त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार नीतीनियम व ईश्वर साधनेचे नियम, पद्धती इत्यादी ठरतात. म्हणून तुला (युगांचा निर्माता) **युगादिकृत्** म्हणतात. तुला शतशः नमस्कार असोत.

**३०१)युगावर्तः । युगावर्ताय नमः ।**

युगांचे येणे व जाणे, त्यांचे विशिष्ट परिणाम, जाणिवाचा विकास हे सारे काही मूलतः तूच आहेस. कारण तू कालातीत असा कालचक्रांचा स्वामी आहेस. तुला सादर अभिवादन असो.

**३०२) नैकमायः । नैकमायाय नमः ।**

अंतरिक्षात भ्रमण करणारे कोटयवधी तारे, आकाशगंगा आणि अंतराळ, अवकाश, काळ हा विश्वाचा पसारा म्हणजे तुझे आविष्कार आहेत. ह्या आविष्कारांना मूलतत्त्व व संपूर्ण सत्य समजून राहणे हीच अविद्या होय. तू याच्या अतीत व स्वामित्वाने राहतोस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**३०३) महाशनः । महाशनाय नमः । महत् अशनं यस्य सः ।**

सारे दृश्यादृश्य विश्व (माया) सच्चिदानंदघन अशा तुझ्यामध्ये विरून जाते. तसेच या विश्वाचा अनुभवदेखील तुझ्या अस्तित्वाच्या जाणिवेने मनुष्य निर्भय, सुरक्षित, उदार, साहिष्णु आणि समर्थ बनू शकतो आणि तुझ्या कृपेने विश्वकल्याण साध्य करु शकतो. संकुचित लाभासाठी अनुष्ठाने, व्रते–वैकल्ये, देव–देवस्की, होम–हवन करणे म्हणजे स्वतःच्या बौद्धिक आणि मानसिक, शारीरिक व आर्थिक शक्तीचा गैरवापर होय. विश्वकल्याणकारी गुणांचा उगम अशा तुला शतशः दंडवत असोत.

**३०४) अदृश्यः । अदृश्याय नमः ।**

विशालत्व, सूक्ष्मत्व, तरलत्व, उन्नतावस्था ह्या सर्वच बाबतीत श्रेष्ठ व द्रष्टा असल्याने तुला पाहणे वा जाणणे अशक्य आहे. द्रष्टा हा 'दृश्य' बनत नाही. किंवा तला पाहणारा तद्रुप झाल्याने वेगळा उरत नाही म्हणून तुला संकुचित अस्तित्व वेगळे ठेवून 'पाहणारा' कुणीच नाही. तुला साष्टांग नमन असो.

**३०५) अव्यक्तरुप: । अव्यक्तरुपाय नम: । किंवा व्यक्तरुप: । व्यक्तरुपाय नम: ।**

कर्मेंद्रिये , ज्ञानेंद्रिये, मन, बुद्धी, अहंकार इत्यादी कोणत्याही साधनाने तुझी थेट प्रचीती किंवा प्रत्यय येत नाही. केवळ तन्मय झालेल्यांना संकुचित व्यक्ती म्हणून तुला समर्पित झालेल्यांना, वेगळे अस्तित्व न राहिलेल्यांनाच तू जाणवतोस. 'दिसतोस'. तुला मन:पूर्वक प्रणाम असोत.

**३०६) सहस्रजित् । सहस्रजिते नम: ।**

तू सारे काही जिंकलेले आहेस. तसेच तुझ्याशी समरस झालेले सर्व भक्त हीन व अन्याय्य वृत्ती, देहबुद्धी व अहंकारावर विजय मिळवतात. तुझ्याच कृपेने ते शुद्ध, निस्पृह व नि:पक्षपाती होतात. तुझ्याचरणी मला निरंतर नतमस्तक राहू दे.

**३०७)अनन्तजित् । अनंतजिते नम: ।**

सारं विश्व हे कार्य–कारण भावामध्ये बसवण्याचा खटाटोप केल्यानंतर ( जो तुझ्या इच्छेने शक्य होतो) हे विश्व म्हणजे केवळ तुझी लीला आहे हे एकमेव सत्य आहे याची प्रचीती येते. त्याचप्रमाणे अशी लीला करणारा तू अखंड नेहमीच विजयी होतोस याची पुन्हा पुन्हा प्रचीती येते. गूढरम्य व काव्यात्म अशा तुझ्या अखंड विजयी सामर्थ्याला साष्टांग नमस्कार असोत.

**इष्टो विशिष्ट : शिष्टेष्ट: शिखण्डी नहुषो वृष: ।**
**क्रोधहा क्रोधकृत्कर्ता विश्वबाहुर्महीधर: ॥**

**३०८) इष्ट:। इष्टाय नम: ।**

पारंपारिक यज्ञात आवाहन केलेली देवता. अन्य दृष्टीने हितकारक असे प्रेमाचे लक्ष्य कळत, नकळत सर्व जातिधर्माच्या व विचारांच्या लोकांकडून विविध प्रकारे तुझीच भक्ती होते. '' सर्व देव नमस्कार: केशवं प्रति गच्छति ।'' तुझ्या भक्तीने व तुझ्या कृपेनेच ''वसुधैवकुटुंबकम्'' ही कल्पना व वैश्विक संस्कृती प्रत्यक्षात, आचरणात येऊ शकते. कारण संस्कृतीचे मूळ प्रगल्भ परास्पर्शी जाणिवेत आहे जी तुझ्या स्मरणानेच प्राप्त होते. तुला अनन्यभावाने नमन असो.

**३०९) विशिष्ट: । विशिष्टाय नम: ।**

तू विशिष्ट म्हणजे सर्वांतर्यामी वसणारा असा आहेस. परंतु या तुझ्या अंतर्यामीत्वाची जाणीव, मनाच्या स्थूलत्वामुळे, शब्दाच्या (मर्यादित बुद्धीला कळणाऱ्या) अर्थातच अडकून पडण्याचा स्वभावामुळे, भक्ताला सतत राहणे अत्यंत कठीण आहे. तुझ्या निरंतर स्मरणात तुला विनम्र अभिवादन असो.

**३१०) शिष्टेष्टः । शिष्टेष्टाय नमः । शिष्ट इष्टः यस्य सः ।**

शिष्ट म्हणजे ज्ञानी. त्यांचा प्रिय म्हणून **शिष्टेष्टः** साऱ्या विश्वात्मक ऐश्वर्याचा नियंता व म्हणून खरा ऐश्वर्यवान तूच आहेस हे त्यांनाच कळतं. त्यामुळे त्यांचा आचारविचार शुद्र इच्छा–आकांक्षांपासून मुक्त, अलिप्त व स्वतंत्र राहतो व त्यांचे अस्तित्व तुझ्याशी भक्कमपणे व अतुटतेने निगडित राहते. ह्या ज्ञान्यांना ज्ञान देणारा व त्यांचे आचार–विचार समीपतेने व प्रेमाने नियंत्रित करणारा. अशा तुझ्याचरणी साष्टांग दंडवत असोत.

**३११ ) शिखंडी । शिखंडिने नमः ।**

सगुण रुपात मोराचे पीस ( मोर म्हणजे विद्येचे/सरस्वतीचे वाहन. मोराचे पीस हे विद्येचे चिन्ह.) डोक्यावर धारण करणारा. तूच ज्ञानयोगादींचा प्रणेता आहेस. योगी भक्तांची प्रज्ञा काव्यातून तुझीच पूजा करते. तुला शतशः नमस्कार असोत.

**३१२) नहुषः । नहुषाय नमः ।**

बंधन. पारंपारिक अर्थाने इंद्रपदी विराजमान होणारा नहुष व त्याची प्रभा. वेगळ्या दृष्टीने इंद्र=मन. अन् मनोलय होताच प्रकट होणारा, असाही अर्थ होऊ शकेल. भक्तांना त्यांच्या अविद्येने (वासना/भावना/विचार यांच्या द्वारे) बांधणारा आणि त्यांच्या सद्सद्विवेकाद्वारे (स्वत:शी एकरुप करून) मुक्त करणारा तूच आहेस. दुसऱ्या दृष्टीने स्वत:च्याच मायेने वेष्टीला गेलेला असाही अर्थ होतो. तुला शतशः प्रणिपात असोत.

**३१३) वृषः । वृषाय नमः । वृषो हि भगवान धर्मः ।**

अस्तित्वाचा नियम. कृपेचा अखंड वर्षाव करणारा महादाता. जाणिवेच्या उत्क्रांतीचा परिपोष व त्याद्वारे परस्परांमधील उदात्त प्रेम विकसित करणारा. जीवशास्त्रीय उत्क्रांतीचे अभ्यासक, त्या उत्क्रांतीच्या मुळाशी असलेल्या ह्या कालातीत प्रेरणेकडे/यंत्रणेकडे कळत-नकळत दुर्लक्ष करतात. वास्तविक उत्क्रांतीचे कारण, यंत्रणा व हेतूही तूच आहेस. अन्य दृष्टीने, चराचराचे मूळ स्वरूप व नियंत्रक मूळ तत्त्व म्हणजे धर्म (वृषः) तूच आहेस. कूटस्थ व अंतर्बाह्य सर्वत्र धर्मरूप असणाऱ्या तुला अखंड नमन असो.

**३१४) क्रोधहा । क्रोधघ्ने नमः ।**

सर्व भावभावनांचा व म्हणून क्रोधाचाही उगम आणि ह्या जाणिवेने क्रोधाचे यथार्थ रूप जाणवून देणारा व अखेरीस अनियंत्रित क्रोधाचे उच्चाटन करणारा तूच आहेस. तुझ्या चरणी मस्तक स्थिर राहो.

**३१५) क्रोधकृत्कर्ता । क्रोधकृत्कर्त्रे नमः ।**

सर्व क्षुद्रत्वाच्या विरोधात वाटचाल करण्यास प्रेरक असा दुष्टदमनकारी, निःस्वार्थ व सात्त्विक राग तुझ्यापासूनच स्फुरतो. ह्या रूपाने हृदयात वसणारा तू भक्तांचे हीनत्व आणि संकुचितपणा नष्ट करतोस. तुला विनम्र अभिवादन असो.

**३१६) विश्वबाहुः । विश्वबाहवे नमः ।**

सारे विश्व आणि व्यक्तीचे अस्तित्व ही तुझ्या उपांगाप्रमाणे (हात) आहेत. विश्वशरीर आणि सजीवांचे देह यातील महान् चैतन्य तू असून तुझ्या चैतन्यमय अमृतकुंभाच्या अक्षय कृपादानानेच विश्वकल्याण होऊ शकते. किंबहुना तद्रुपता हेच संकुचित व क्षुद्र भ्रमांच्या गुलामीतून सत्य अशा तुझी प्रचीती हीच खरी मुक्ती व कल्याणवस्था होय. निःस्वार्थ उपकार, दान, सेवा, कार्य, विचार, योजना ह्यांच्याही दबावातून मुक्ती तुझ्या प्रचीतीने शक्य होते. भ्रम स्वार्थी असो (selfish illusion) वा निःस्वार्थी (selfless illusion) क्रूरतापूर्ण असो वा दयार्द्र, त्याची परिणती सत्याच्या प्रचीतीत होणे हेच कल्याणाचे, सार्वत्रिक उत्थानाचे व वैश्विक क्रांतीचे स्वरूप होय. सोप्या भाषेत समजून घ्यायचे तर वैश्विक कल्याणकारी, क्रांतीचा ध्यास हेतू, साधन आणि स्वरूप यांचे परिणत स्वरूप म्हणजे तुझे नामस्मरण व तद्रुपता आहे. तुला शतशः नमस्कार असोत.

**३१७) महीधरः । महीधराय नमः ।**

मही म्हणजे पूजा, पृथ्वी, गाय इत्यादी. पूजा प्राप्त करणारा तसेच पृथ्वीला आधार देणारा म्हणून तुला महीधरः म्हणतात. तसेच गाईला आधार (संरक्षण देणारा ) तूच आहेस. गाईपासून मिळणारे पंचगव्य (गोमय, दूध, गोमूत्र, तूप, दही, गोरोचन इत्यादी. ) आणि गाईची शांत वृत्ती हे विशेष गुणही तुझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत. त्याचप्रमाणे प्रलयकाली शिष्यांना आधार देणाऱ्या पर्वतांनाही **महीधरः** म्हणतात. अनंत रुपानी प्रगट होणाऱ्या तुला विनम्र नमन असो.

**अच्युतः प्रथितः प्राणः प्राणदो वासवानुजः ।**
**अपां निधिरधिष्ठानमप्रमत्तः प्रतिष्ठितः ।।**

**३१८) अच्युतः । अच्युताय नमः ।**

स्खलनशीलता, विकारवशता, अन्यायबुद्धी, प्रमादशीलता, क्षणभंगुरत्व, दुबळेपणा, पराभव, हानी यांच्या अतीत असा तू एकमेव पवित्रतम ईश्वर आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**३१९) प्रथितः । प्रथिताय नमः ।**

चराचाला अंतर्बाह्य व्यापणारा व आत्मज्ञानी भक्तांच्या पूजा, स्तुती,उपासना व इतर लोककल्याणकारी कार्याने विश्वभरात सर्वात प्रसिध्द असा.तुला विनम्र अभिवादन असो.

**३२०)प्राणः । प्राणाय नमः ।**

कालातीत अशा प्राणशक्तीच्याद्वारे विश्वातील व विशेषतः सजीवातील अविरत स्पंदनाचा कर्ता व नियंता. अविद्येच्या अधीनतेतून वेगवेगळ्या मार्गानी स्वाधीनता प्राप्त झालेल्या आत्मसाक्षात्कारी भक्तांना ह्याच स्पंदनाचे सूर निस्सीम आनंद आणि समाधान देतात.

**३२१) प्राणदः । प्राणदाय नमः ।**

प्राणशक्तीचादाता म्हणून तुला **प्राणदः.** तूच साऱ्या विश्वाला प्राणावाटे चेतना देतोस.तुझ्या कृपेने प्राणायाम,प्राणधारणा इत्यादींद्वारे तुझ्या अस्तित्वाची विलोभनीय प्रचीती येते, तसेच क्षुद्र आशा-आकांक्षा संपून जातात. तुला विनम्र प्रणाम असोत.

**३२२) वासवानुजः । वासवानुजाय नमः ।**

कश्यप व आादिती यांचे इंद्रानंतरचे तिन्ही जगांना व्यापून उरणारे वामन हे अपत्य. तात्त्विकदृष्टया इंद्र म्हणजे मन व वामन म्हणजे मनानंतरचे तत्त्व, ईश्वरेष्णा, जे सुषुप्ती, स्वप्न व जागृती ह्या तिन्ही अवस्थांना जिंकते. मनाचा विलय ज्यात होतो अशा तुला निरंतर नमन असो.

**३२३) अपां निधिः । अपां निधये नमः ।**

प्राण, अपान, व्यान, उदान व समान या पाच वायूंपैकी अपान वायुचे स्थान व कुंडलिनी शक्ती तूच आहेस. अन्य दृष्टीने जमिनीवरील समुद्र, तलाव, जमिनीच्या आतील झरे, शरीरांतर्गत जल, विविध स्फटिकांतर्गत जल वगैरेंचे मूलस्थान तूच सर्व महाभूतांचाच उगम अशा तुला त्रिवार वंदन असो.

**३२४) अधिष्ठानम् । अधिष्ठानाय नमः ।**

सर्व पंचमहाभूते, तन्मात्रे, बुद्धी, अहंकार, महत्, इत्यादी चराचरांचा अधिष्ठाता तू आहेस. हे सारे काही तुझ्यामुळेच, उपादान म्हणून आहे. ही जाणीव व तज्जन्य भक्तिपूर्वक सर्वस्व तुझ्याचरणी समर्पित असो.

**३२५) अप्रमतः । अप्रमत्ताय नमः ।**

वेंधळेपणा, सुस्तपणा, मंदपणा, झोप, आळस वगैरे अजिबात नसलेली आणि दक्षता, जागरुकता, सावधपणा, आनंद, नम्रता असलेली जाणिवेची अत्युच्च अवस्था. ह्या सदा तेजस्वी व उन्नत अशा तुझ्या अवस्थेद्वारा विश्वनियम संचालित होतात. तुझ्या कृपेने परास्पर्शी अंतःप्रज्ञा जागृत होते व तुझा साक्षात्कार होतो. तुला अखंड नमन असो.

**३२६) प्रतिष्ठितः । प्रतिष्ठिताय नमः ।**

स्वरुपी कायम विराजमान असणारा, कधीच न ढळणारा. कोणत्याही कारणाने प्रभावित किंवा विचलित न होणारा. तुझ्या पायाशी नम्र अभिवादन असो.

**स्कन्दः स्कन्दधरो धुर्यो वरदो वायुवाहनः ।**
**वासुदेवो बृहद्भानुरादिदेवः पुरन्दरः ॥**

**३२७) स्कन्दः । स्कंदाय नमः ।**

संपूर्ण विश्वामध्ये अमृतरुपाने जीवन रसमम करणारे, स्त्रावी करणारे व वायुरुपाने जीवन गतिमान व शुष्क करुन समतोल साधणारे (पंचमहाभूतांतर्यामीचे ) महातत्त्व. सगुण रुपामध्ये शिवाचा पुत्र कार्तिकेय हे तुझेच रुप. वैयक्तिक पातळीवर मन, चित्तवृत्ती इत्तयादींची चंचलता उन्नयन व मनोलयतही तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**३२८) स्कंदधरः । स्कंदधराय नमः ।**

सगुणरुपामध्ये कार्तिकेय/सब्रह्मण्यम याचा पिता आणि अत्युच्चतम धर्माचं निधान केंद्रस्थानी बाळगणारा शिव. तात्त्विकदृष्ट्या विश्वधर्माचे केंद्र आणि व्यक्तीला ह्या धर्म केंद्राशी निगडित ठेवणारे महतत्त्व, महत्तम पुरुष तूच आहेस. हृदयांतर्यामी असणाऱ्या तुला आदरपूर्वक प्रणाम असोत.

**३२९) धुर्यः । धुर्याय नमः ।**

ईश्वराचा वाहक म्हणजेच ईश्वरी तत्त्व व तज्जन्य धर्माचा, विश्वधर्माचा, विश्वधर्माचा, विश्वव्यापाराचा नियंता तूच आहेस. महासत्ताधीश अशा तुला नम्र प्रणिपात असोत.

**३३०) वरदः । वरदाय नमः ।**

जे जे सर्वश्रेष्ठ आहे, उत्तमोत्तम आहे, उन्नत मनांद्वारे इच्छिले गेलेले आहे, ते घडवून आणणारा विश्वाधिपती. तुला शिरसाष्टांग दंडवत असोत.

**३३१) वायुवाहनः । वायुवाहनाय नमः ।**

महाप्रचंड व अतिसूक्ष्म रूपानी विश्वातील प्रचंड घडामोडींप्रमाणेच सूक्ष्मातिसूक्ष्म हालचाली घडवून आणणाऱ्या अवहन, प्रवहन, विवहन, परमवहन, उद्वहन, संवहन आणि परिवहन ह्या सात मरुत् रूपांतील वायूचा प्रेरक व वाहक (नियंता) तू आहेस. तुला भावपूर्ण नमस्कार असोत.

**३३२) वासुदेवः । वासुदेवाय नमः ।**

सर्व परिमाणांनी व्याप्त आणि सर्व परिमाणांना व्यापणारा. उपासना, सदाचरण आणि विश्वोत्थान हे केवळ तुझ्या अधिष्ठानानेच घडू शकतात. तुझ्या संरक्षणातच पार पडू शकतात. वसुदेवपुत्र बालकृष्ण (म्हणून वासुदेव ) हे तुझे सगुण रुप होय. ह्या अवताराद्वारेच तू जगद्गुरुची उत्तुंग भुमिका पार पाडलास. तुला अंतःकरणपूर्वक अभिवादन असो.

**३३३) बृहद्भानुः । बृहद्भानवे नमः ।**

सूर्य, चंद्र, तारे, आकाशगंगा, सजीव, सजीवांच्या जाणिवा इत्यादी साऱ्यांना चैतन्यमय व ज्ञानमय प्रकाश देणारा तू, जणु काही सहस्रकोटी सूर्यांचा समूह आहेस. म्हणून तुला **बृहद्भानुः** मोठा सूर्य म्हणतात. मथितार्थाने पाहता सूर्यापेक्षा अधिक उच्चतम असे तुझे अस्तित्व आहे केवळ मोठे नव्हे. तुला निरंतर नमन असो.

**३३४) आदिदेवः । आदिदेवाय नमः ।**

संपूर्ण विश्वाच्या आरंभी सर्वप्रथम असणारा देव. म्हणजेच सृष्टीच्या उत्पत्तीचे महाकारण. गीतेमध्ये वर्णन केलेल्या अश्वत्थ वृक्षाच्या मुळाचाही उगम म्हणजेही तूच आहेस. सर्वांना प्रिय असणाऱ्या व ऋषिमुनींकडून पूजिल्या जाणाऱ्या तुझ्या रुपाला माझे साष्टांग नमस्कार असोत.

**३३५) पुरंदरः । पुरंदराय नमः ।**

धर्मविरोधी तत्त्वांचे निर्दालन करणारा व धर्मपोषक तत्त्वांचे संगोपन करणारा, म्हणजे **पुरन्दरः** तसेच **पुरंदरः** म्हणजे स्थूल व कारणरुपी शरीरांचा म्हणजेच देहबुद्धीच्या विविध आविष्कारांचा नाश करून शुद्ध व पवित्र आत्मज्ञान देणारा. मानवी संस्कृतीचा इतिहास प्रगतीकडे जाणारा आहे की कालातीत अवनतीकडे जाणारा आहे ? की चक्रमय ? ह्याचे उत्तर संस्कृतीचा प्रवास कालातीत केंद्रानुवर्ती आहे जे ऊर्ध्वगामी क्रांतीतून अधिकाधिकांना प्राप्त होत राहते. तुला कृतज्ञ प्रणिपात असोत.

**अशोकस्तारणस्तारः शूरः शौरिर्जनेश्वरः ।**
**अनुकूलः शतावर्तः पद्मी पद्मनिभेक्षणः ।।**

**३३६) अशोकः । अशोकाय नमः ।**

अविद्याजन्य दुःख (शोक) नसलेला. तद्रुप झाल्याने धैर्य, सामर्थ्य, स्वरूपज्ञान व आनंद मिळतो. तुझ्या पायावर निरंतर लोटांगण असो.

**३३७) तारणः । तारणाय नमः ।**

अविद्याजन्य, क्षुद्र व संकुचित सुखदुःखांच्या म्हणजेच असंस्कृत हीन अभिरुचीच्या गर्तेतून पार करुन नेणारा म्हणून **तारणः** तूच अज्ञानमूलक असहायता व अगतिकता यातून मुक्त करणारा पामकृपाळू तारक आहेस. तुला मनःपूर्वक नमन असो.

**३३८) तारः । ताराय नमः ।**

भक्तांना ज्ञानमय ऊर्ध्वगामी बनवणारा व दुःखमुक्त करणारा तू आहेस. तू भक्तांना तारणारा आणि त्यांच्याद्वारे बद्ध, मुमुक्षु, साधक अशा सर्वांना दुःखाच्या खाईतून तरून नेणारा आहेस. तुझ्या उपासनेमुळे व कृपेमुळेच भक्त तरलतम, सूक्ष्म व तीक्ष्ण बुद्धी आणि विवेक प्राप्त करतो आणि अंतस्थ चपळतेने व कुशलतेने दुःखद विचार व विकार मोडून काढतो. तुझ्या प्रचीतीने तो आनंदमय बनतो व इतरांनाही आनंदमय बनवतो. तुला त्रिवार वंदन असो.

**३३९) शूरः । शूराय नमः ।**

ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती व क्रियाशक्तीचे अथांग भांडार असलेला तू सर्वश्रेष्ठ विक्रमशाली, शूर आहेस. तुझे स्मरण दुबळेपणा व क्षुद्रत्वावर विजय मिळवण्यास धैर्य व स्फूर्ती देते व दुष्ट शक्ती-प्रवृत्ती आणि अशा प्रवृत्तींमधून जन्मलेल्या समाजघातकी दृष्टी, योजना आणि कारवायांवर समर्थपणे मात करण्याची क्षमता देते. कागदी वाघ आणि खरा वाघ ह्यातील फरक म्हणजेच सर्वसामान्य तुझी प्रचीती नसलेली व्यक्ती आणि तुझी प्रचीती असलेल्या व्यक्तीतील फरक होय. तुझ्या प्रचीतीने व्यक्ती भ्रामक अस्तित्वातून मुक्त होऊन स्वतःच्या सत्य अस्तित्वाशी समरस होते. तुला मनोभावे नमन असो.

**३४०)शौरिः ।शौरये नमः ।**

सगुण रुपात शूरसेन याचा नातू. विष्णु, कृष्ण, बलराम आदी सारेदेखील तूच आहेस.शूर कुळातला म्हणूनही तुला **शौरिः** म्हणतात.तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**३४१)जनेश्वरः । जनेश्वराय नमः ।**

जे जे उत्पन्न होतं, जन्माला येतं,त्या त्या प्रत्येक वस्तुमात्राचा अंतस्थ परमेश्वर. त्या सर्वांना तुझ्या कृपेने तुझी (स्वस्वरुपाची) जाणीव यथावकाश होते व सारे काही तुलाच प्राप्त होते. तुला मनःपूर्वक अभिवादन असो.

**३४२) अनुकूलः । अनुकूलाय नमः ।**

खरा सहायक,सखा. साऱ्या विश्वाचा अंतरात्मा व नियंता असल्याने विश्वाचे कल्याण करणारा (विकासात संपूर्णपणे सहाय्यभूत होणारा) विश्वप्रिय परमेश्वर तूच आहेस. तुला सादर प्रणाम असोत.

**३४३) शतावर्तः । शतावर्ताय नमः ।**

सृष्टीमध्ये पुन्हा पुन्हा अवतार घेणारा, आविष्कृत होणारा, शरीरांमध्ये शेकडो नाड्यांमधून प्राणरुपाने वाहणारा आणि विश्वातील लक्षावधी रुपांमध्ये वावरणारा व याद्वारे धर्म रक्षण करणारा तू आहेस. स्वधर्मज्ञान, त्याद्वारे निकोप कल्याणकारी विश्वव्यवस्था आविष्कृत करणे. ही तुझी लीलाच आहे. तुला शतकोटी प्रणाम असोत.

**३४४) पद्मी। पद्मिने नमः ।**

शंख, चक्र, गदा, पद्म हे सगुणरुपामध्ये धारण करणारा म्हणून पद्मी. सगुण रुपात ही चार धारण करण्यामागे, सात्त्विक जीवनाचे प्रतीक धारण करणारा, उच्च जाणिवेचे क्षेत्र धारण करणारा तसेच उच्च जाणिवांचा उगम व उद्गाता असे सांकेतिक अर्थ आहेत. भूतभविष्याची चिंता मिटून व भविष्याचे ज्ञान होऊन तुझा भक्त निश्चित व सुरक्षित होतो. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**३४५) पद्मनिभेक्षणः । पद्मनिभेक्षणाय नमः ।**

कमळाप्रमाणे भाग्यसूचक डोळे असलेला. भक्तांचे डोळेही आशीर्वादमय, भाग्यसूचक करणारा. दुसऱ्या अर्थी एक पद्म म्हणजे १००००००००००००००० (सोळा अंकी संख्या ) म्हणजेच असंख्य डोळे (शरीरातीत अवधाने ) असलेला व भक्तांना तसेच बनवणारा. तुला शतशः प्रणाम असोत.

**पद्मनाभोऽरविन्दाक्षः पद्मगर्भः शरीरभृत ।**
**महर्धिर् ऋद्धोवृद्धात्मा महाक्षो गरुडध्वजः ॥**

**३४६) पद्मनाभः । पद्मनाभाय नमः ।**

ज्याच्या नाभीतून कमळ उगवते व त्या कमळातील चतुर्मुख ब्रह्मदेव सृष्टीची निर्मिती

करतो असा. विश्वात्मक पुरुषाच्या व षड्धात्वात्मक (रस,मांस, मेद, अस्थी मज्जा, शुक्र ) पुरुषाच्या नाभीचे स्थान हे परावाणीचे म्हणजे उत्तुंग व महत्तम सृजनशीलतेचे स्थान आहे.यातून शद्बब्रह्म (ब्रह्मदेव ), वेद(ज्ञान) व सृष्टीची आविष्कृती झाली व व्यक्तीमध्ये पश्यंती, मध्यमा व वैखरी या वाणीही तयार झाल्या. म्हणजेच मन, बुद्धी, अहंकार इत्यादी व्यक्तीचे कार्य तयार झाले. तुला भक्तिपूर्वक नमन असो.

**३४७) अरविन्दाक्षः । अरविंदाक्षाय नमः ।**

म्हणजे कमळासारखे डोळे असलेला. कमळाद्वारे चवदा भुवनांमध्ये वर्गीकृत केलेल्या विश्वाचा संकेतही दिला जातो. त्यामुळे विश्वात्मक दृष्टी असलेला आणि भक्तांचीही दृष्टी मर्मग्राही, न्यायी, निःपक्षपाती, विशाल, सहिष्णु आणि जीवनदायी बनवणारा आहेस. वेगळ्या तऱ्हेने पाहिल्यास अशी दृष्टी येणे, हे खऱ्या भक्ताचे, लक्षण आहे. तुझ्याचरणी भक्तिपूर्वक लोटांगण असो.

**३४८) पद्मगर्भः । पद्मगर्भाय नमः ।**

विश्वात्मक कमळाचा गाभा, मूळ, उगम. वैयक्तिक पातळीवर व्यक्तीची बुद्धी, विवेक इत्यादी ज्यामध्ये सामावलेली असतात ते सहस्त्रदल कमल (मेंदु) यांचा गाभा किंवा उगम जे चिदाकाश तो तूच आहेस. चिदाकाश म्हणजे चैतन्यमय कालातीत अवकाश. तुला शतशः प्रणाम असोत.

**३४९) शरीरभृत । शरीरभृते नमः ।**

प्राणरुपाने वैश्विक व वैयक्तिक शरीर धारण करणारा व स्वतःच्या अमृतमय चैतन्याच्या अस्त्राने त्यांचे पोषण करणारा. ह्यालाच मातरिश्वा म्हणतात. (ईशावास्योपनिषद ) त्याचप्रमाणे हा ब्रह्मदेव, रस हा विष्णू व भोक्ता (भोगणारा ) हा महेश्वर (शंकर ) अशा तऱ्हेने तिन्ही रुपांनी विश्व आणि व्यक्तिजीवन साकार करणाराही तूच आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**३५०) महर्द्धिः । महर्द्धये नमः ।**

उच्चतम बुद्धी, विचार व सामर्थ्यामुळे सर्वंकष ऐश्वर्याचा स्वामी तू आहेस. तुझ्या विभूतीमध्येही हे गुण असतातच. अशरीरी अशा महान क्षमतेने सर्वसत्ताधीश असा तू भक्ताच्या जाणिवेमध्ये व अस्तित्वामध्ये स्थायी स्वरुपाचे ऊर्ध्वगामी स्थित्यंतर घडवून आणतोस . तुझ्याचरणी साष्टांग नमन असो.

**३५१) ऋद्धः । ऋद्धाय नमः ।**

स्वतःच्या बीजरूपातून विशाल होऊन विश्वरूप धारण करणारा. ह्या विश्वरूपामध्ये

तू सतत बदतोस, वृद्धिंगत विकसित होतोस, अधिकाधिक सुनियंत्रित होतोस, जाणिवेचे क्षेत्रही बनून अधिकाधिक परिपक्व, परिपूर्ण व प्रगल्भ बनतोस. तुझ्या कृपेनेच अंतःप्रज्ञा विकसित होऊन तुझा व तुझ्या सामर्थ्याचा साक्षात्कार होतो. तसेच आजन्मा अशा ह्या दृश्यादृश्य साऱ्या विश्वाला **पामार्थिक अस्तित्व** कळते व वळते. त्याची भ्रामकता समजते व उमजते. तुझ्याचरणी वृती स्थिर राहो.

**३५२) वृद्धात्मा । वृद्धात्मने नमः ।**

विश्वाची आणि व्यक्तीच्या सुखाची अभिवृद्धी करणारा अनादी, अनंत व म्हणून प्राचीनतम (वृद्ध ) आत्मा. कारण स्थलकालात्मक, विविधांगी, विविधरूपी विश्वाचा/ व्यक्तीचा कालातीत अंतरात्मा तू आहेस. तुला शतशः वंदन असो.

**३५३) महाक्षः । महाक्षाय नमः ।**

मह म्हणजे यज्ञ. अक्ष् म्हणजे व्यापणे. त्यामुळे सर्वव्यापी असा महायज्ञ. विश्वकल्याणाच्या प्रक्रियेत सर्वस्व झोकून देण्याची ही महान त्यागमय व वैश्विक प्रक्रिया (यज्ञ ). **महत्** म्हणजे महान, अत्युच्च, तीव्र, कठीण. म्हणून तू सर्वश्रेष्ठ व सर्वव्यापी (**अक्ष्** ) आहेस. **मह** म्हणजे यज्ञ आणि **अक्ष्** शेवटी आल्याने **अक्ष्** म्हणजे डोळा. त्यामुळे तू निःस्वार्थी त्यागमय व कल्याणकारी कृपेचा झरा (महायज्ञ ) असलेली दृष्टी असणाराही आहेस. तुझे भक्तही तुझ्या कृपेने असेच होतात. **मह** म्हणजे महान व अक्ष् म्हणजे गाडीचा आस. साऱ्या विश्वाच्या चलनवलनासाठी गाडीच्या आसाप्रमाणे मूलाधार बनून राहिलेला म्हणूनही तुला **महाक्षः** म्हणणे सयुक्तिक आहे. त्याचप्रमाणे साऱ्या विश्वाला व्यापणारी अशरीरी, मर्मभेदी व मर्मग्राही, समदृष्टी असणारा म्हणूनही तू **महाक्षः** आहेस. केवळ सत्यमय अशा तुझ्या दर्शनासाठी तुझ्या अशरीरी दृष्टीची प्राप्तीच आवश्यक आहे. अशा दृष्टीने तुझ्याच चिंतनामध्ये माझे तुला साष्टांग नमस्कार असोत.

**३५४) गरुडध्वजः । गरुडध्वजाय नमः ।**

ज्याच्या ध्वजावर गरुडाच चिन्ह आहे असा तो गरुडध्वज. ह्या सगुण ध्यानाचा मथितार्थ असा की प्राणपक्ष्यांचा राजा (सर्वश्रेष्ठ गतिमान परिमाणतीत तत्त्व ) तुझ्या अधीन आहे. तू त्याच्यावर अधिष्ठित आहेस, स्वार झाला आहेस. सर्व श्रेष्ठ गती तुझ्या आधीन आहे. जाणीवेच्या परमोच्च पातळीवर हृदयाकाशातील अत्युच्च प्राणतत्त्वावर विहरणाऱ्या तुला मनोमन दंडवत असोत.

**अतुलः शरभो भीमः समयज्ञो हविर्हरिः ।**
**सर्वलक्षणलक्षण्यो लक्ष्मीवान् समितिंजयः ॥**

**३५५) अतुलः । अतुलाय नमः ।**

ज्ञानाच्या सर्व स्तरांच्या पलीकडे. विचारांच्या व कल्पनेच्या पलीकडे. तर्क व अंतःस्फूर्तीच्या पलीकडे सर्वसमावेशकतेने असल्याने तू उपमा, तुलना, मापन, यांच्या अतीत आहेस. त्यामुळे तू अनुपमेय, अतुलनीय, अमित आहेस. म्हणून तुला **अतुलः** म्हणतात. एकमेवाद्वितीय अशा तुझ्या स्मरणात, ओढीत व तज्जन्य उत्क्रांतीच्या अनुभवात तुला अखंड आभिवादन असो.

**३५६) शरभः । शरभाय नमः ।**

शरीरात (विश्वरुपी व वैयक्तिक ) आविष्कृत होऊन सारे अस्तित्व प्रकाशमान करणारा. शरभः म्हणजे सिंहाहूनही बलशाली असा आठ पाय असलेला हरिण. हा हरिण शंकराचा (शिवाचा ) अवतार आहे. या सगुण रुपाचा मथितार्थ म्हणजे अष्टांगयोगाच्या आठ पायानी प्राणरुपी सिंहावर काबू मिळवणारा व तद्रुप असणारा महायोगी. शरीर प्रकाशमान करणारा ईश्वरही तू आणि अंतर्यामीचे तुझे अस्तिव व सामर्थ्य प्रत्यक्ष अुनभवणारा महायोगीही तूच आहेच. तुला साष्टांग नमन असो.

**३५७) भीमः । भीमाय नमः ।**

अंतर्यामी चिद्सामर्थ्यरुपाने वसणारा तू. हीनत्वाच्या विरोधात लढण्याचे प्रचंड व थरारक सामर्थ्य देणारा आहेस. अधोमार्गी अविद्या-मायामय विश्वावर तुझ्यापासून मिळणाऱ्या शक्तीने विजय प्राप्त होतो. रुद्रभीषण चैतन्याने सज्जनांमध्ये वीरश्री संचारते. ते उत्साहाने व धडाडीने ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा आविष्कार करण्यासाठी सिध्द होतात. तुझ्याचरणी मी लीन आहे.

**३५८) समयज्ञः । समयज्ञाय नमः ।**

म्हणजे काळ व काळाच्या वैशिष्ट्यांचा ज्ञाता. सारे चराचर समत्वाने तुझी पूजा करते आणि समानपणे अखेर तुझ्यात लीन होते (यज्ञ) व तू सर्वांतर्यामी असल्याने स्थळ, काळ, घटना, अंतःकरणे आदी सर्व समत्वाने जाणतोस. भक्तांनाही कृपाळू व न्यायी बनवणाऱ्या तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**३५९) हविर्हरिः । हविर्हरये नमः ।**

पारंपारिक यज्ञात आवाहन केला गेलेला आणि अर्पण केलेली द्रव्ये व प्रार्थना स्वीकारणारा ईश्वर म्हणजे **हविर्हरिः । शरीरं आद्यं खलु धर्मसाधनम्** हे जाणून तुझ्या संकल्पातच जगणारे जेव्हा जेवतात तेव्हा ते व्यक्तिगत इच्छेपुरते मर्यादित नसून ती तुझी पूजाच (यज्ञ ) असते. त्यामुळे ग्रहण केलेल्या अन्नाचा खरा भोक्ता (त्याना जाणवत

नसले तरीही ) तू आहेस. अन्य दृष्ट्या, सारे विश्व अखेर तुलाच येऊन मिळते. सर्वोच्च जाणिवेच्या बीजरुपाने राहते म्हणून वैश्विक प्रक्रियेचा (ती समपर्णात्मक यज्ञात्मक आहे ) भोक्ताही तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**३६०) सर्वलक्षणलक्षण्य: । सर्वलक्षणलक्षण्याय नम: ।**

विविध लक्षणे (गुणधर्म/वैशिष्ट्ये) आणि लक्षणांवरून जाणण्याची वस्तू. यच्चयावत विश्वाच्या दृश्यादृश्य सर्व वैशिष्ट्यांमधून (आणि या वैशिष्ट्यांमधून सत्य जाणण्याच्या द्वैत, विशिष्टाद्वैत, अद्वैत इत्यादी दर्शनांमधून व राजयोगादी साधनांतून) प्रत्ययाला येणारा तूच आहेस. तुला नम्र प्रणाम असोत.

**३६१) लक्ष्मीवान् । लक्ष्मीवते नम: ।**

लक्ष्मी म्हणजे सर्वश्रेष्ठ व चिरंतन टिकणारे ऐश्वर्य. ऐश्वर्याचा धनी म्हणून तुला **लक्ष्मीवान** म्हणतात. अन्य दृष्ट्या चराचर प्रकृती म्हणजे लक्ष्मी. तिच्याही अंतर्यामी सर्वसत्तेने बसणारा म्हणूनही लक्ष्मीवान् तूच आहेस. वैयक्तिक पातळीवरही त्रिगुणात्मक व षड्धात्वात्मक प्रक्रियारुप प्रकृतीचा स्वामी म्हणूनही लक्ष्मीवान् आहेस. तुला त्रिवार वंदन असो.

**३६२) समितिञ्जय: । समितिञ्जयाय नम: ।**

नेहमी विजयी होणारा. सर्व अस्तित्वाची आणि जाणिवेची परिणतीच असल्याने अंतिम विजय नेहमी तुझाच असतो. तसेच प्रत्येक द्वंद्वांतून जो उन्नत समन्वय साध्य होतो तेही तुझेच रुप असल्याने द्वंद्वातीत सत्यरुपानेही तू विजयीच असतोस. सारे अखेर तुझ्यामध्ये विलयास जातो. त्यामुळे पारंपारिक अर्थाने तुला विनाशाचा नियंता यमंधर्म म्हणतात. आत्मज्ञान्यांमधील एकमत, संघर्षातून-द्वंद्वांतून होणारे उन्नयन व कल्पांत अशा विविध रुपांनी तू विश्वात आणि व्यक्तीमध्ये असतोस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**विक्षरो रोहितो मार्गो हेतुर्दामोदर: सह: ।**
**महीधरो महाभागो वेगवानमिताशन: ।।**

**३६३) विक्षर: । विक्षराय नम: ।**

उत्पती, स्थिती, परिवर्तन आणि कुजणे-नासणे वगैरे, म्हणजे नाश यातले काहीही नसलेला. अशरीर व म्हणून अज्ञानरहित कालातीततेने अजरामर असणाऱ्या सर्वातर्यामीच्या खऱ्या ‘स्व’ अशा तुला साष्टांग नमन असो.

**३६४) रोहित: । रोहिताय नम:**

रोहित म्हणजे मासा. इतर अर्थ केशर, रक्तवर्ण, इंद्रधनुष्य इत्यादी. पारंपारिकदृष्ट्या

मत्स्यावतारी म्हणून रोहित तर तात्त्विकदृष्ट्या संपूर्ण सृष्टीचा कल्पांतावेळचा तारणहार. इतर अर्थ शुभसूचकता, वीर्य, सौंदर्य दाखवतात. तुला विनम्र अभिवादन असो.

**३६५) मार्गः । मार्गाय नमः ।**

रस्ता. तुझ्याकडे पोचण्याचा म्हणजे तद्रुप होण्याचा व तत्स्वरुप होण्याची प्रचीतीही घेण्याचा महामार्ग म्हणजे नामस्मरण, संकीर्तन आणि अनुसंधान असल्याने तू महामार्ग आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**३६६) हेतुः । हेतुवे नमः ।**

विश्वाच्या अस्तित्वाचे आदिकारण ज्याप्रमाणे तू आहेस व विश्वाच्या अस्तित्वाचे साधन व आधार ज्याप्रमाणे तू आहेस, त्याचप्रमाणे (विश्वाचे सर्वोच्च उन्नत स्वरुपही तू असल्याने )विश्वाचा व विश्वप्रक्रियांचा हेतूही तू आहेस. व्यक्तीच्या जीवनाचा हेतूही तत्स्वरुप होणे व ते अनुभवणे हा आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**३६७) दामोदरः । दामोदराय नमः । दमात् दामोदरं विदुः ।**

मनोनिग्रह. दाम म्हणजे दावे म्हणजेच ज्याने पशु नियंत्रणात, कह्यात राहतो. निग्रहरुपी दाव्याने सर्व व्यक्तित्वावर नियंत्रण ठेवून आणि भक्तिरुपी दाव्याने (यशोदेप्रमाणे) ईश्वराला बांधून (तू ) प्राप्त होतोस म्हणून तुला दामोदरः म्हणतात. अन्य दृष्ट्या दावे म्हणजे ज्याद्वारे व्यक्ती शरणागत भावाने तुझ्याशी कायमची बांधली जाते ते. त्याचप्रमाणे दामोदरः म्हणजेच तुझं सगुण कृष्ण रुप. तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**३६८) सहः । सहाय नमः ।**

सहनशील. म्हणजेच उतावळेपणा, असहिष्णुता (जे गुण अविद्येने ग्रासलेल्या, देहबुद्धीने बांधलेल्या लोकात असतात ) नसलेला. कारण तू कालातीत, चिन्मय, अशरीर, समर्थ, साक्षीभूत त्रिकालज्ञानी आहेस. तुझे भक्तही तुझ्यासारखे होतात व म्हणून सहनशीलतचे मेरु बनतात. तू समर्थ असल्याने तुझे भक्तही समर्थ होतात व दुबळ्या लोकांप्रमाणे असहाय्य, उतावळे, परस्वाधीन किंवा हिंस्त्र होत नाहीत. तुझ्या चिन्मय व ज्ञानी अवस्थेमुळे तू व तुझे भक्त कधीही असुरक्षित नसतात. त्यामुळे ते असहिष्णु नसतात. व्यापकदृष्ट्या, विश्वातील सारे उत्पात तुझ्याच पार्श्वभूमीवर होत असल्यानेही तू सहनशील आहेस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**३६९) महीधरः । महीधराय नमः ।**

मही म्हणजे पृथ्वी, विश्व. या साऱ्यांचा आधार म्हणून **महीधरः** शरीरातील

जीवनाचा आधार कुंडलिनी शक्ती, आणि विश्वाच्या चराचराला स्थळ, काळ व जाणिवानी सांधणारा, धारण करणारा म्हणून तुला **महीधरः** म्हणतात. तुला साष्टांग लोटांगण असो.

**३७०) महाभागः । महाभागाय नमः ।**

विश्वप्रकियात्मक यज्ञाचा भोक्ता म्हणून महाभाग्यावान व भाग्यकारक तसेच अंगोपांगे अत्युत्कृष्ट असलेला असा तू आहेस, म्हणून तुला **महाभागः** म्हणतात. तुला मनोभावे नमन असो.

**३७१) वेगवान् । वेगवते नमः ।**

ज्याची गती सर्वाधिक आहे असा. प्रकाशाचा वेग (३ लाख किलोमीटर/सेकंद) मनाच्या लहरींचा व विचारांचा वेग (जो मन आणि विचार यांच्या 'पदार्थवैज्ञानिक' 'परिमाणे' व 'वैशिष्ट्ये' यांवर अवलंबून असतो) यांपेक्षाही, तू, इंद्रियातीत (परिमाणातीत) असल्याने, अधिक वेगवान आहेस. तुझ्या वेगाची कल्पनाच अशक्य आहे. कारण तू वेगालाही वेग देणारा आहेस, सारे वेगमय सामावणारा आहेस. तुला माझे विनम्र प्राणाम असोत.

**३७२) अमिताशनः । अमिताशनाय नमः ।**

प्रचंड भूक किंवा ग्रहणशक्ती असणारा. सारे विश्व कल्पांताच्या वेळी तुझ्यामध्ये विरुन जाते. सारे पूजापाठ, प्रार्थना इत्यादी तुलाच प्राप्त होतात व विश्वातील घडीमोडींचे देहबुद्धीजन्य ज्ञान (अविद्या), विकार, वासना, विचार यानी लिप्त असे संपूर्ण व्यक्तित्व तद्रुपतेमध्ये अंतर्धान पावते म्हणून या सर्व दृष्टीनी तू **अमिताशनः** आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**उद्भवः क्षोभणो देवः श्रीगर्भः परमेश्वरः ।**
**करणं कारणं कर्ता विकर्ता गहनो गुहः ॥**

**३७३) उद्भवः । उद्भवाय नमः ।**

साऱ्या विश्वाच्या उत्पत्तीमागील महाकारण, व विश्वाच्या उत्पत्तीचा उगम. विश्वाच्या उत्पतीमागील सृजनशीलता, विश्वामधील शारीरिक, मानसिक, कलात्मक, वैचारिक अशा सृजनशीलतेचा उगम व नियंता तू आहेस. तसेच या साऱ्याचा अंतिम हेतूही तूच आहेस. तुला माझे निरंतर आभिवादन असो.

**३७४) क्षोभणः । क्षोभणाय नमः ।**

विश्वाला स्फुरण देणारा. साक्षी (पुरुष) व माय (प्रकृती) म्हणजेच शिवशक्ती.

एकाद्या प्रसंगामध्ये, तो प्रसंग ज्या अवकाशात घडला व ज्या काळामध्ये घडला त्या अंतराळ व त्या काळाचे तो प्रसंग घडण्यातील जे कार्य असते तसे कार्य साक्षी पुरुषाचे असे व प्रत्यक्ष प्रसंगातील विविध घटकांचे कार्यकारणसंबंध घडवणे हे कार्य प्रकृतीचे (शक्तीचे ) असते. परंतु शिव-शक्ती किंवा विष्णु-लक्ष्मी ही एकाच वेळी दोनही आहेत व एकजीवही आहेत. एकापासून दुसरे वेगळे असू शकत नाही. तुला विश्वामध्ये चैतन्याचा संचार करणारा(क्षोभणः) म्हणतात. कारण विश्वातील घटनांचे (कर्माचे ) नियंत्रण

करणारा व कार्यकारण व कर्मफलसिद्धांत प्रसवणाऱ्यांच्या बुद्धीचा नियंताही तूच आहेस.परंतु अशा तऱ्हेने विश्वातील प्रत्येक प्रक्रियेचा (व त्या प्रक्रियेच्या जाणीवेचा) कारक तूच आहेस हे ज्याला कळले त्याचे जीवन कर्मफलातीत व कार्यकारणभावातीत 'स्व'तंत्र होते. कर्मफल संबंध व कर्मफलाचा विचार (आसक्ती) यांचा नाश होतो. मुक्तिदायी कर्मफलातील कर्माचे ज्ञान व स्फूर्ती देणाऱ्या व खऱ्या अर्थाने कर्ता असणाऱ्य तुला दंडवत असोत.

**३७५) देवः । देवाय नमः । दीव्यती इति देवः ।**

म्हणजे अंतर्बाह्य राहणारा, अंतरंग प्रकाशित करणारा, सर्वथा आराध्य व पूजनीय, सर्वातोपरी विश्वसनीय, यशस्वी व प्रेरक असा विश्वाचा देवाधिदेव तू आहेस. सामर्थ्य व सांत्वनेसाठी शरण जाण्यास सुयोग्य व म्हणून ह्या दृष्टिनेही खरा देव तू आहेस. अन्य दृष्ट्या सारे विश्व ही तुझी लीला असून ह्या लीलामध्ये प्रत्यक्ष काही न करताही सर्वोच्चतेने तू गुंतला आहेस. तूला विनम्र अभिवादन असो.

**३७६) श्रीगर्भः । श्रीगर्भाय नमः ।**

आविष्कृत व अनाविष्कृत अशा वैश्विक ऐश्वर्याचा बीजरूपी उगम असल्याने आणि विश्व हेच सर्व बाजूने सामावणारे ब्रह्मांड  बीज/ गर्भ तू प्रसवतोस म्हणून म्हणून तूला श्रीगर्भ म्हणतात. तूला माझे निरंतर नमन असो.

**३७७) परमेश्वरः । परमेश्वराय नमः ।**

इष्ट, सर्वश्रेष्ठ, श्रेयस्कर व प्रियकर असा पवित्र देव असल्याने तुला **परमेश्वरः** म्हणतात. सर्व देवदेवता (जाणिवेच्या अनेक पातळ्यांनी युक्त अशी अस्तित्वे), तुझीच अंगोपांगे असून तू सर्वसमावेशक आहेस. सर्व शक्तिमान अशा तूला लोटांगण असो.

**३७८) करणं । करणाय नमः ।**

साधन, किंवा वाहक. ज्याप्रमाणे विजेच्या वाहनासाठी धातूची तार कार्य बजावते,

किंवा विविध ग्रहताऱ्यांमधील चुंबकत्व त्यांना विशिष्ट गतीमध्ये फिरवते, त्याप्रमाणे घटनांक्रमांमधील संलग्नतेने घटनांचे नियंत्रण होते असा आशय **करणं** ह्या नावात आहे. ज्या तऱ्हेने चुंबकक्षेत्र वस्तूंना अंतर्बाह्य व्यापते त्याप्रमाणे घटनांना अंतर्बाह्य व्यापणारा तू चैतन्यमय असल्याने जाणता नियंता ( त्रिकालज्ञ) आहेस. या अर्थानेही तुझ्या प्राप्तीचे साधन तूच आहेस. तूला निरंतर नमन असो.

**३७९) कारणं । कारणायं नमः ।**

कार्यकारणभावाच्या दृष्टीने पाहिल्यास विश्वरूपी परिणामास कारणीभूत असे मूलतत्त्व, विश्वोत्पत्तीचे महाकारण तू आहेस. उत्पत्ती, स्थिती, विलय, अंतराळ, काळ, जाणीव या साऱ्यांचा मूलस्त्रोत तू आहेस. यालाच विश्वाचे त्रिगुणात्मक कारण असेही म्हटले जाते. तूला विनम्र प्रणिपात असोत.

**३८०) कर्ता । कर्त्रे नमः ।**

सूक्ष्मतम, तरलतम व सर्वव्यापी अशा अस्तित्वामुळे प्रत्येक घटनेचा कर्ता तू आहेस. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या सर्व कृतींचा खरा कर्ता आणि अंतर्बाह्य सारे काही व्यापणारा तू आहेस. ज्याप्रमाणे हातांच्या हालचालीचा खरा कर्ता मेंदू त्याचप्रमाणे मेंदू व त्यांच्या साऱ्या कार्यांचा खरा कर्ता व्यक्तिमत्वाच्या अतीत तूच आहेस. ह्या तुझ्या कर्तेपणाच्या यथार्थ ज्ञानाने व प्रचीतीने अहंकारी महत्वाकांक्षांचे घातक मृगजळ व तज्जन्य हीन कृती यांचा क्षय होतो आणि विश्वसंस्कृतीचे दीप उदयाला येतात. सर्व घटनांचा खरा कर्ता अशा तूला मनःपूर्वक वंदन असो.

**३८१) विकर्ता । विकर्त्रे नमः ।**

एकत्वातून अनेकत्व आणि वैविध्य निर्माण करणारा म्हणून तुला विकर्ता म्हणतात. या साऱ्या चित्रविचित्र विविधतेमागे कालातीत व अविचलतेने असणारा तूच आहेस. तूला साष्टांग नमन असो.

**३८२) गहनः । गहनाय नमः ।**

देहबुद्धीने जाणण्यास, कल्पना करण्यास, चिंतन करण्यास, आकलन करण्यास, अशक्य असा तू आहेस. तुझ्या चरणी माझे प्रणिपात असोत.

**३८३) गुहः । गुहाय नमः ।**

म्हणजे गुप्त असे हृदयाकाश, हृदयातील चिदाकाश, विश्वाचे आणि व्यक्तीचे अंतर्याम व अंतर्यामी असणारे तत्त्व हे दोन्ही तूच आहेस. परंतु साऱ्या विश्वाला व व्यक्तीला प्रेमाने अंतर्बाह्य कवटाळले असूनही त्यांच्यावरील मायेच्या आवरणामुळे तू

अदृश्य, अगम्य, गूढ व अनाकलनीय होतोस. तुला विनम्र अभिवादन असो.

**व्यवसायो व्यवस्थानः संस्थानः स्थानदो ध्रुवः ।**
**परर्द्धिः परमस्पष्टस्तुष्टः पुष्टः शुभेक्षणः ।।**

**३८४) व्यवसायः । व्यवसाय नमः ।**

अनाकलनीय ज्ञानशक्ती, शुद्धसंकल्प (इच्छाशक्ती) आणि प्रभावी क्रियाशक्तीने विश्वव्यवहाराची व्यवस्था लावणारा द्रष्टा शासक तू आहेस. अन्य दृष्टीने, व्यवसाय म्हणजे योग. आत्मरूपी 'स्व'स्त राहणे (व क्षुद्र व्यक्तिगत इच्छा-आकांक्षा- भावना- वासना ह्यांचा त्याग करून ईश्वरी संकल्पात रमणे) म्हणजे योग. तू व तूझे खरे भक्त असे असतात म्हणून तूला व्यवसाय म्हटले आहे. तुला साष्टांग लोटांगण असो.

**३८५) व्यवस्थानः । व्यवस्थानाय नमः ।**

म्हणजे आत्मरूपी स्वस्थ असल्याने दृढपणा, निश्चय, स्थिरता इत्यादी गुणांच्या निर्मिती द्वारे विश्वाची व्यवस्था लावणारे मूलभूत नियंत्रक तत्त्व. वैयक्तिक पातळीवरही आत्मसाक्षात्काराची व्यक्तींना अशी प्रचीती येते. तू व्यक्तिगत कार्याचा मूलभूत नियंता आहेस या दृढ भावनेने तुला साष्टांग दंडवत असोत.

**३८६) संस्थानः । संस्थानाय नमः ।**

सर्वोच्च सत्तास्थान. विश्वाचे व व्यक्तिचे खरे केंद्रस्थान व म्हणून शासनकर्ता व अंतिम इप्सित साध्य तू आहेस. तुझे ज्ञान व प्रचिती, क्षुद्रत्व घालवते म्हणून तू परमपवित्र तीर्थाचा समुच्चय आहेस. कल्पांताच्या वेळी विश्व व निर्वाणकाली व्यक्ती तद्रुपच होते. विविध प्रकारच्या चिन्हांनी व सांकेतिक अनेक महत्वाच्या बाबी कळतात. परंतु तुझ्या चिन्हाने विश्वनियंत्या सर्वोच्च तत्त्वाची (तुझे) प्रचीती येते. तुझ्या भक्तीच्या, निकटतेच्या दृढ जाणिवेत तुला साष्टांग दंडवत असोत.

**३८७) स्थानदः । स्थानदाय नमः ।**

विश्वातील प्रत्येक बाबीचे, घटनेचे स्थान निश्चित करणारा. याचा अर्थ तमोगुण रजोगुण व सत्वगुणाच्या विविध छटा व प्रमाणे, परस्पर पूरकतेनुसार निश्चित करून त्यानुसार विश्वातील व व्यक्तिजीवनातील घटना आणि त्यांचे फळ (महत्त्व, स्थान) ठरवणारा तू आहेस. (विश्वाची गुणक्रमशः विभागणी तू केलीस याचा आशय **स्थानदः** या नावात आहे. परंतु काही लोकांनी याचा वेगळा अर्थ केला आणि तो कळत, नकळत, नाइलाजाने वा अन्य कारणास्तव स्वीकारला गेला. व्यक्तीचे नाव समाजातील जन्मावरून ठरवले गेले, निश्चित होत गेले आणि पिढ्यान्‌पिढ्या कायम ठेवले गेले. ह्या

कृतीला आजच्या काळात समर्थन अजिबात नाही). कारण संकुचित महत्त्वाकांक्षा/ स्वार्थ, यावर मात करण्यासाठी आज आत्मज्ञानसूर्याचा सर्वांतर्यामी उदय करणे शक्य आहे आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षांना लोकहिताचे परिमाण देणेही आज शक्य आहे. व्यक्तिजीवनातील बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध ह्या अवस्था ठरवणारा व व्यक्तीला अहंकार व अविद्येद्वारे कमी-अधिक विव्हल करणारा) तूच आहेस. ज्याप्रमाणे आंब्याचे 'आंबापण' व पिकणे, नासणे वगैरे आंबा ठरवीत नाही त्याचप्रमाणे व्यक्तीचे गुणधर्म आणि कार्य यांचे श्रेय व्यक्तीकडे म्हणजे परिणाम-स्वरूप व्यक्तित्वाकडे नाही. आंबा ह्या फळाला त्याच्या पिढ्यान्‌पिढ्या आंबा बनून राहणे हे नैसर्गिक आहे. कारण आंबा या फळाला वरील ज्ञान नसतं. आणि मुक्तीचा मार्ग नसतो. परंतु व्यक्तीला जेव्हा वरील ज्ञान होतं तेव्हा व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग खुला होत असतो. त्यामुळे आजच्या काळात व्यक्तीला पिढ्यान्‌पिढ्या एकाच व्यवसायात पुरून ठेवणे अन्याय्य व अनर्थकारक आहे. केवळ जन्मावरून व्यक्तीला विनाकारण श्रेय, अपश्रेय देणारी, उच्चनीचता जोपासणारी व त्यावर पिढ्यान्‌पिढ्यासाठी शिक्कामोर्तब करणारी व्यवस्था जर एखाद्या व्यक्तीने/समूहाने बनवली आणि अशी व्यवस्था ईश्वरानेच माणसासाठी बनवली असल्याचे ठासून सांगितले तर तो एक अत्यंत घोर प्रमाद होय. त्याचप्रमाणे त्यावर विश्वास ठेवणे हेही घोर अज्ञानच होय. कालगतीमुळे अशी व्यवस्था बनवणाऱ्यांचा स्वार्थ व अहंकार आणि व्यवस्थेत भरडले जाणाऱ्यांची हतबलता ही व्यवस्था अधिकाधिक पोसत राहिली व तत्कालीन नेतृत्वाच्या अंध क्षुद्र स्वार्थावर व अगतिक अनुयायांच्या असहायतेवर स्वत: पोसली जात राहिली. तू नियंता आहेस ही प्रचीती व्यक्तीची आगतिकता, असुरक्षितता, संकुचितता, अहंकार, न्यूनगंड इत्यादी नष्ट करते. पण तू स्थानद: आहेस म्हणजे तूच प्रत्येकाला विशिष्ट जन्मात घालून त्याच्या पिढ्यान्‌पिढ्याना हाल भोगण्याचे प्रारब्ध दिलेस ही कल्पना कधी व्यक्तीमधील तुझ्या अस्तित्वाला नाकारते आणि त्यामुळे तिच्या प्रगतीला नाकारते तर कधी एखाद्या व्यक्तीला खोटे देवत्व प्राप्त करून देते व अनाचारी, दुराचारी सत्तांधांचे समर्थन करून (सत्ताधाऱ्यांना खरे कल्याण नाकारून) त्यांच्यातील तुझी अस्तित्व नाकारते. चातुर्वण्याच्या कल्पनेने बहुसंख्याचा वैयक्तिक स्वार्थ व अहंकार अगदी बेछूटपणे, तारतम्यहीन सरधोपटपणे आणि निर्दयपणे खरा, पण मारला जातो. पण त्याचबरोबर त्यांच्या आत्मोन्नतीचा उदंड उत्साहदेखील गाडला जातो. तू **स्थानद:** आहेस याचा आजच्या काळाशी सुसंगत आशय म्हणजे तू अधिकाधिक प्रभावी आणि उदात्त परस्पर पोषकता प्रत्यक्षात आणणारा आहेस. कारण तुझ्या कृपेने आज सर्वांना आत्मज्ञानाचे लोकहितकारी अमृतपान करणे व त्याद्वारे परस्परहिताचे नवे युग आणणे शक्य होत

आहे, होणार आहे. सर्वोच्च सत्ताधारी अशा तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**३८८) ध्रुवः । ध्रुवाय नमः ।**

अढळ, स्थिर. ही स्थिरता म्हणजे निश्चल (तमोगुणी) गतिहीन स्थिरता नव्हे. उलट गतिमानतेचा कारक व सर्व गतींनाही व्यापणारा, काळातीत व म्हणून काळाचा प्रभाव न पडणारा व म्हणून न बदलणारा ह्या अर्थाने तू स्थिर आहेस. अंतर्यामीच्या अस्तित्वाने भक्तांना मार्गदर्शन करणारा, गती, वेग, प्रवेग, अंतराळ, काळ (युगे) ह्या साऱ्यांना सामावणारा असा असल्याने तू स्थिर आहेस. तुझ्याचरणी विनम्र लोटांगण असो.

**३८९) परद्‌र्धिः । परर्द्धये नमः ।**

चराचरातील तुझे आविष्कार व युगायुगातील तुझे अवतार पवित्र आहेत; कारण त्यांच्या अंतर्बाह्य तू आहेस. तुला नम्र नमन असो.

**३९०) परमस्पष्टः । परमस्पष्टाय नमः ।**

स्पष्ट याचा अर्थ निःसंदिग्ध व वास्तविक व म्हणून अत्यंत प्रभावी. तू आणि तुझे ज्ञान समर्थ व प्रचीतीदायक आहेस. प्रभावी आहेत. इतर बाबी व त्यांचे ज्ञान परावलंबी व अगतिक आहेत. म्हणून तुला **परमस्पष्टः** म्हणतात. अन्य दृष्ट्या स्पष्ट म्हणजे अस्सल. साऱ्या विश्वामध्ये टिकाऊ व स्वयंभू असा असल्यानेही तुला **परमस्पष्टः** म्हणतात. तू व तुझे ज्ञान विश्वाचा अविनाशी मूलाधार आहात म्हणूनही तुला **परमस्पष्टः** म्हणतात. तुला माझे निरंतर प्रणाम असोत.

**३९१) तुष्टः । तुष्टाय नमः ।**

तृष्णा आणि तृप्ती ह्यांचा कारक असल्याने तू नेहमीच अत्यंत समाधानी असतोस आणि चिरंतन आनंदाचे झरे भक्तांच्या हृदयात निर्माण करतोस. साऱ्या इच्छा व वासनांचाही कारक असा तू भक्तांनाही इच्छा व आकांक्षांचा स्वामी बनवतोस, तृप्त बनवतोस. भक्तांना काळाचा स्वामी बनवणाऱ्या तुला माझे साष्टांग नमस्कार असोत.

**३९२) पुष्टः । पुष्टायनमः ।**

सारे वस्तुमात्र, अवकाश, काळ आणि साऱ्या प्रार्थना, पूजा, भक्ती यांनी भरलेला म्हणून **पुष्टः** तसेच एखादी बाब ठायी नाही असे कधीही न घडणारा व म्हणून सर्वतोपरी भरलेला, तू आहेस. त्याचप्रमाणे स्वतःच्या (चैतन्यरसाद्वारे) द्वारे सारे विश्व संपन्न व पुष्ट करणारा तू आहेस. तसेच कमतरता, टंचाई, दुबळेपणा, गरजूपणा, लाचारपणा इत्यादी वैशिष्ट्ये ज्याच्यामध्ये व ज्याच्या भक्तांमध्ये अजिबात नाहीत असा (व म्हणून **पुष्टः**) तू आहेस. तुला त्रिवार प्रणिपात असोत.

**३९३) शुभेक्षणः । शुभेक्षणाय नमः ।**

वासना, अहंकार, बुद्धी, मन यांच्या अतीत असल्याने तुला **शुभेक्षणः** म्हणतात. महन्मंगल कृपादृष्टी असणाऱ्या तुला साष्टांग नमन असो.

**रामो विरामो विरजो मार्गो नेयो नयोऽनयः**
**वीरः शक्तिमतां श्रेष्ठो धर्मो धर्मविदुत्तमः ॥**

**३९४) रामः । रामायनमः । रमन्ते योगिनः अस्मिन् इति रामः ।**

व्यक्तिगत आशा, आकांक्षा, विचार, वासना संपूर्णपणे नष्ट झालेले (योगी) ज्याच्या ठायी रमतात (एकरस होतात, समरस होतात) तो तू आहेस. कारण तू सर्वाधिक व चिरंतनपणे स्मरणीय व आनंददायी आहेस. अविनाशी जीवनाचा चैतन्यदायी झरा आहेस. रूढार्थाने परशुराम, राम, बलराम हे सर्व तूच आहेस व त्यांची पूजा ही मूलतः तुझीच पूजा असते. तुला माझे विनम्र प्रणाम असोत.

**३९५) विरामः । विरामाय नमः ।**

म्हणजे ज्याच्या स्थायी सर्व चराचर विश्व विश्राम पावते असे स्थान. विश्वाच्या दृश्यादृश्य रूपाचा विलय बीजरूपाने तुझ्यात होतो म्हणून तू अंतिम विसाव्याचे ठिकाण आहेस. वैयक्तिक पातळीवर व्यक्तित्वाचे परिमाण संपून आत्मज्ञानी लोक परिमाणातीत अशा तुझ्यामध्ये चिरविश्रांती घेतात. माया मोहाने निर्माण होणारी अ'स्व'स्थता, चंचलता व फरफट संपून ते खऱ्या अर्थाने 'स्व'तंत्र आणि 'स्व'स्थ म्हणजे आत्मरूपी विराजमान होतात. कारण अनादि व अनंत असा तू कालातीत अस्तित्वाने योगसमाधीच्या परमपदी चिरंतनपणे राहतोस. तुझ्या सतत स्मरणात तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**३९६) विरजः । विरजाय नमः ।**

विश्वनिर्मिती व विश्वाच्या व्यवहाराचा कर्ता आणि भोक्ता असूनही देहबुद्धीजन्य अविद्येने लिप्त न होणारा (शुद्ध) असल्याने तुला **विरजः** म्हणतात. तुझ्याशी एकरूप होणारे भक्तही बाह्यतः सर्वसामान्य व्यवहारात असूनही अत्यंत शुद्ध बुद्धीचे, पवित्र असतात. संपूर्ण समर्पण भावनेने तुला शतशः वंदन असो.

**३९७) मार्गः । मार्गाय नमः ।**

संकुचितपणा संपवणाऱ्या तुझ्या प्राप्तीसाठी सर्वश्रेष्ठ साधन (मार्ग) म्हणजे तुझेच स्मरण (तू) आहे. वेदवेदान्त व इतर सर्व मार्गांचे (भक्तिमार्ग, पूजापद्धती, योग, कर्मे, मंत्र, तंत्र, विचार, अभ्यास) सार व हेतू तुझे सतत स्मरण व अनुसंधान (तू) आहे. सारे

मार्ग तुलाच मिळतात या अर्थाने सर्वमार्गांनी येणाऱ्या साऱ्यांचे ईप्सित साध्य, आराध्य दैवत व खरा अंतिम मार्ग जिथे सर्वजण एक होतात तूच आहेस. तुला माझे विनम्र अभिवादन असो.

**३९८) नेयः । नेयाय नमः ।**

म्हणजे वाहक, मार्गदर्शक, सर्वांना आत्मस्वरूपीच्या प्रकाशाकडे (तुझ्याकडे) नेणारा, अंतर्यामीच्या परमपदी (तुझ्यामध्ये) स्थिर करणारा तू आहेस. विविध पद्धतीनी ज्यांची सगुणभक्ती (नामस्मरण, संकीर्तन, इत्यादीप्रमाणेच तुझ्या स्मरणातील प्रत्येक कृती) केली जाते ती तुझी रूपे भक्ताला कैवल्यपदी कायम करतात म्हणून तुला **नेयः** म्हणतात. तुला माझे त्रिवार नमन असो.

**३९९) नयः । नयाय नमः ।**

भक्तांच्या रूपामध्येही स्वस्वरूपी पावनपणे स्थिर राहणारा, सद्गुणांचाही सद्गुण, दृष्टीची दृष्टी, शहाणपणाचाही शहाणपणा, विश्व व्यवहारातील न्यायाचे न्यायतत्त्व, सर्वश्रेष्ठ वैश्विक धोरणे व योजना यांचे धोरण, इच्छांची इच्छा व सर्व वासनांची वासना, भुकेची भूक व तहानेची तहान असा तूच आहेस. सद्गुणांचा सद्गुण, वासनेची वासना, दृष्टीची दृष्टी वगैरे विधानाचा अर्थ असा की सद्गुणाचे गुणी व्यक्ती-प्रवृत्तीशी, वासनापूर्तीचे वासनेशी दृश्याचे दृष्टीशी जे नाते असते तसेच गुणी व्यक्ती-प्रवृत्ती, वासना व दृष्टी आणि तुझ्यामध्येही असते. मथितार्थ तू ह्या साऱ्यांची उगम, कारक आणि नियंता आहेस. तू भक्तांची वागणूक सर्वदृष्ट्या न्याय्य व उदात्त बनवतोस. तुला शतशः अभिवादन असो.

**४००) अनयः । अनयाय नमः ।**

कपट किंवा आपत्ती. व्यक्तिजीवनात वरपांगी अन्याय करणारा, ढोबळ अर्थाने मार्गदर्शक नसलेला (मार्गदर्शन न करणारा) अविद्या व मायेमध्ये भक्तांना त्यांच्या नकळत अडकवून थेट मार्गदर्शन न करता, त्यांच्या अनुभव विश्वातून अंतर्यामीचा प्रकाश उजळणारा तू आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**४०१) वीरः । वीराय नमः ।**

आत्मज्ञानाचे सामर्थ्य असणारा व देणारा व त्यामुळे भक्ताला अतिशय खंबीर, भक्कम बनवणारा व म्हणून सर्वोत्तम महाबली (वीर). तुला मनःपूर्वक प्रणिपात असोत.

**४०२) शक्तिमतां श्रेष्ठः । शक्तिमतां श्रेष्ठाय नमः ।**

सर्व सामर्थ्यवानांमध्ये सर्वश्रेष्ठ. कारण क्रियाशक्ती, इच्छाशक्ती व ज्ञानशक्तीचा

उगम आणि नियंता तूच आहेस. तू बुद्धी-वासनांच्या अतीत व सर्व शक्तीचा उगम असल्याने व स्फूर्तिदाता असल्याने सर्वश्रेष्ठ सामर्थ्यवान आहेस. भक्तांनाही स्वत:प्रमाणेच बनवणाऱ्या तुला निरंतर वंदन असो.

**४०३) धर्म: । धर्माय नम: । धारयति इति धर्म: ।**

तू विश्वाधार आहेस. सारे चराचर, घटनाक्रम, अंतराळ, काळ वगैरे सर्वांचा व जाणिवेच्याही सर्व क्षेत्रांचा मूलस्रोत व मूलाधार तू आहेस. त्यामुळे धर्मपालन करणे याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीने स्वधर्म जाणणे (म्हणजे अंतर्यामीचा ईश्वर जाणणे) व त्यानुसार वागणे होय. बाह्यत: पाहिल्यास प्रत्येक अणुरेणू व व्यक्तींमध्ये जो वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म वा स्वभावधर्म असतो त्याला धर्म म्हटले जाईल. सामान्यदृष्ट्या सारे विश्व तुझ्यापासून वेगळे नाही या अर्थाने हा अर्थ चुकीचा नाही. पण 'स्वधर्म' याचा हा अर्थ फारच संकुचित असल्याने व फक्त अंशसत्य असल्याने मानवी जीवनात उथळ व घातक ठरतो. कारण असा अर्थ लागल्याने व्यक्तीला सर्वश्रेष्ठ जीवनामृताला, खऱ्या 'स्व'ला मुकावे लागते. क्षुद्र बाबींमध्ये सत्याधिष्ठान शून्य आयुष्य व्यतीत करावे लागते. कधी शूद्रत्व/अस्पृश्यत्व तर कधी बनावट ब्राह्मण्य पदरी घ्यावे लागते. असा अर्थ लावल्यामुळे व्यक्तीमधील सुप्त ईश्वराची कोंडी होते आणि उथळ गुणधर्मानुसार ठरणारा जाचक संकुचित ''स्वधर्म'' आनुवंशिकतेच्या आधारामुळे जन्मानुसार लादला जातो व लादून घेतला जातो व पुढे पूजनीय धर्म म्हणून भावी पिढ्यानाही लागू राहतो. ही ''स्वधर्माच्या'' नावाखाली होणारी खऱ्या धर्माची विटंबना व कुचंबणाच होय. साधुसंतांनी भगवन्नामाद्वारे धर्माची ही कुचंबणा व कोंडी फोडण्याचा पहिला, योग्य दिशेने प्रयत्न केला. स्पृश्यास्पृश्य सर्वांना त्यांनी भगवन्नाम आणि आत्मज्ञानाचा दरवाजा उघडून दिला. मंदिराच्या दरवाजापेक्षा हा दरवाजा उघडणे ही सर्वोच्च क्रांती होती व आहे. स्वधर्माचे-हे-खरे ज्ञान झाले तरच गुणधर्मांचे उन्नयन होते व शुद्ध ज्ञानाने ह्या गुणांच्या संपूर्ण आविष्कारात व्यापकता येऊन विधायक क्रांती प्रत्यक्षात येऊ शकते. अन्यथा स्वधर्म म्हणजे **निव्वळ** गुणधर्म असे समजल्यास अपरिवर्तनशील व अन्याय्य अशा सामाजिक व्यवस्थेस निर्दोष व्यक्तिसमूह ज्याप्रमाणे बळी पडतो तसेच भगवन्ताम व आत्मज्ञानाला गौणत्व येऊन व्यक्तीच्या आंधळ्या, बेबंद व संकुचित महत्त्वाकांक्षेच्या थैमानामध्ये मनुष्यसमाज विदीर्ण होतो. खरा धर्म म्हणजे अंतर्यामीचा तूच आहेस. तुझी प्रचीती घेणं आणि उत्स्फूर्तपणे स्वत:च्या वैशिष्ट्यांनुसार त्या प्रचीतीला लोककल्याणकारी परस्परपोषक पद्धतीने आविष्कृत करणं हाच आजचा विश्वधर्म आहे. खरा स्वधर्म अशा तुला अखंड नमन असो.

## ४०४) धर्मविदुत्तमः। धर्मविदुत्तमाय नमः।

विश्वयंत्रणेचे इत्थंभूत ज्ञान सर्वसत्ताधीशत्वाने जाणणारा महतत्त्ववेत्ता. विश्वयंत्रणेच्या संबंधीचे ठोकताळे मानवी समाजावर लादण्याचा प्रयत्न म्हणजे उच्च दर्जाचे अज्ञान व अविद्याच होय. या अविद्येमुळे तथाकथित आस्तिक वा नास्तिक तत्त्वज्ञानांना साचेबंद सामाजिक स्वरूप येते. देवाविषयी विशिष्ट कल्पना करून त्या सत्य समजणे (उदा. तो न्याय देतो वगैरे) म्हणजे स्वतःच्या कल्पनांवरील अंधविश्वास श्रद्धा होय. तसेच डार्विनचा उत्क्रांतीवाद असो वा मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद, त्यांच्यावरील विश्वास म्हणजे स्वतःच्या मर्यादित बुद्धीवरील अमर्याद, भाबडी श्रद्धा होय. ज्याप्रमाणे जन्मानुसार व्यवसाय व सामाजिक स्थान ठरणे व पिढ्यान्‌पिढ्या चालू राहणे ही आत्मज्ञानाच्या प्रकाशात विरघळून टाकण्याची बाब आहे; कारण व्यक्तीचे गुण व्यवसाय व सामाजिक जन्मावरून ठरणे पिढ्यान्‌पिढ्या चालू राहणे हे गैर आहे,) ज्याप्रमाणे उत्पादनाच्या साधनातील विकासांवर समाजाचे बाकी सर्व पैलू अवलंबून असतात; हा भ्रमही आत्मज्ञानाच्या प्रकाशात विरघळवून टाकण्याची नितांत आवश्यकता आहे, (कारण उत्पादनाच्या साधनांसकट सर्वच जीवशास्त्रीय व मानवी उत्क्रांती ही परिणामस्वरूप आहेत. कारक नाहीत. श्रद्धांचा त्याग करून आत्मानुभूती घेणे हाच खरा धर्मयोग होय. श्रद्धा या शब्दाचा संतांना अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे अहंकाराचे समर्पण, देहबुद्धीचे समर्पण. त्या अर्थाने श्रद्धा हा शब्द यापूर्वी व इथे वापरलेला नाही. ''बिनबुडाचा विश्वास'' ह्या अर्थाने वापरला आहे. त्याचे ज्ञान तू देतोस कारण धर्माचा खरा ज्ञानी केवळ तूच आहेस. आज कामगारवर्गाच्या हुकूमशाहीचे किंबा बाजारबुणग्या खुल्या बाजारपेठेचे नव्हे तर आत्मज्ञानाच्या अंतःप्रकाशाचे कल्याणकारी राज्य साकार होणे आवश्यक व सयुक्तिक आहे. स्वरूपाकर (तद्रुप) होणारे महाज्ञानीच हे निश्चितपणे जाणू व अनुभवू शकतात, व आत्मज्ञानाच्या अनुभूती व दृष्टीतूनच विश्वव्यवस्था आणि विश्वव्यवहार विकसित झाला पाहिजे हे जाणू शकतात. तसेच व सर्व प्रकारचा वर्ण/वर्ग/वंश विरघळवणारा आध्यात्मिक अनुभूतीचा आविष्कार राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, विचारपद्धती, सिद्धान्त, समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, राज्यघटना इत्यादींवरील कडव्या निष्ठा आणि तदनुषंगिक ताणतणाव व युद्धे ही देहबुद्धी/अविद्येच्या पगड्याची द्योतक आहेत. जाती, भाषा, राज्य, राष्ट्र, पैसा यांतून उद्‌भवणारे संघर्ष अज्ञान व संकुचितपणाचे द्योतक आहेत. वैयक्तिक दयाळूपणातून उत्पन्न होणारा अहिंसेचा असो अगर क्रौर्यातून प्रगट होणारा हिंसक विचार असो- दोन्हीही अविद्याजन्य असून, प्रगतीच्या मार्गातील दीपस्तंभ बनू शकत नाहीत. आजच्या संभ्रमावस्थेत आत्मज्ञानरूपी तू दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक बनू शकतोस. स्पष्टीकरणासाठी व्यवहारातील धार्मिक श्रद्धांची काही उदाहरणे घेता येतील.

आत्मज्ञानाने समजते की, शिश्नावरील त्वचा कापल्याने, बाप्तिस्मा घेतल्याने, दाढी वाढवली किंवा कापल्याने, मुंज केल्याने धर्म घडत/बिघडत किंवा बदलत नाही. सोवळे नेसल्याने किंवा सोडल्याने धर्महानी होत नाही. काळे बुरखे घालून, झगे घालून, भगवे घालून किंवा अन्य कोणत्याही बाह्य बदलाने धर्म बदलत नाही. एवढेच नव्हे तर सकाळी येशू ख्रिस्ताची, दुपारी महंमद पैगंबरांची व रात्री गणपतीची पूजा केली तर त्यात धर्मभ्रष्टतेचा किंवा धर्मभंजनाचा भाग येत नाही. कारण असे करणारा निर्गुण निराकार अंतर्बाह्य व्यापणाऱ्या तुझीच पूजा करीत असतो **आणि अडाणी स्वार्थांध कडव्या धर्मकल्पनारूपी मूर्तींचे भंजन** करीत असतो. **धर्मांचे नव्हे.** त्याचप्रमाणे असा धर्मज्ञानी एकाच पूजास्थानामध्ये सर्व धर्मांची दैवते स्थापून त्यांचीही पूजा करू शकतो. कारण त्याच्या दृष्टीने ही सारी दैवते तुझीच चिन्हे असतात. अशी सर्वधर्ममंदिरे ही वैश्विक एकात्मतेची नांदीही ठरू शकतात. पण एवढेच नव्हे, तो सर्व धर्मांच्या दैवतांचा त्यागही करू शकतो आणि अंतस्थ अशा तुझ्यावर मन, बुद्धी व चित्त एकाग्र करू शकतो. अखेर, यातले काहीही केले अथवा न केले तरी तो धर्मभ्रष्ट होत नाही. तुला **धर्मविदुत्तमः** म्हणतात कारण तुझ्या ज्ञानाने (खरी धर्मप्रचीती आलेली) व्यक्ती तुझ्या कृपेने इतरानाही ज्ञानी बनवते. सर्व विचारांच्या चाहत्यांमधील, सर्वधर्माच्या निष्ठावंतांमधील व सर्व प्रकारच्या भिन्न भिन्न मनुष्यमात्रांतील तुझे अखंड व एकात्म अस्तित्व त्यांना दाखवून त्यांचे अंतःश्चक्षू उघडू शकते. परस्परविरोधी शक्तींना उन्नत करत त्यांना परस्परपूरक आणि परस्परपोषक बनवून मानव कल्याणाच्या महाप्रवाहात समरस करू शकते. सर्व दृश्य वैशिष्ट्यांचे दुय्यम व वरवरचे अस्तित्व समजावून देऊन संपूर्ण विश्वातील मानवा-मानवातील चिरंतन एकत्व प्रचीतीला आणून देऊ शकते. विश्वकल्याणाची हमी देणाऱ्या धर्मज्ञानी व धर्माविष्कारी (धर्मविदुत्तमः) तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**वैकुंठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः ।**
**हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ॥**

## ५०५) वैकुंठः । वैकुंठाय नमः ।

वैकुंठः म्हणजे विष्णुलोक, इंद्र (मन) आणि पांढरी तुळस. पंचमहाभूतात्मक विश्वाला आणि व्यक्तित्वाला धैर्य व आधार देणारा, निग्रहशक्ती देणारा, सुबकता, डौल, चिकाटी आणि माधुर्य देणारा व त्यायोगे अस्ताव्यस्तता आणि अवनतीचा प्रतिबंध करणारा तू आहेस. तुळशीमध्ये असे गुणसाधर्म्य असल्याने तुळशीलाही **वैकुंठः** म्हणतात. तुला माझे विनम्र अभिवादन असो.

**४०६) पुरुषः । पुरुषाय नमः । पुरी शयनात् पुरुषः ।**

सर्व चराचररूपी (पदार्थ, ऊर्जा, अवकाश, काळ, जाणीव आणि व्यक्तित्वे) शरीरात राहणारा म्हणून तुला **पुरुषः** म्हणतात. सृष्टीचा आरंभ व शेवट सारे व्यापणारा आणि अज्ञानाच्या अंधारातून मुक्त करणारा म्हणून तू स्वतंत्र, स्वयंभू, सच्चिदानंदमय मूळपुरुष, परमपुरुष आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**४०७) प्राणः । प्राणाय नमः ।**

प्राण ही परिमाणातीत 'ऊर्जा' आहे. ज्ञात ऊर्जाप्रकारांशी ती कशा तऱ्हेने संबंधित आहे  याचा निश्चित तपशील ज्ञात असून तिच्या जाणवणाऱ्या परिणामाना प्राण, अपान, व्यान, समान, उदान या संज्ञानी ओळखले जाते. हा तुझाच एक विलक्षण अविष्कार असून सारे विश्व त्याच्याद्वारे चैतन्यमय बनते. तुझे साधक प्राणायामाद्वारे तुला जाणण्यात यशस्वी होतात ते तुझ्या ह्या अविष्कारातील अस्तित्वामुळे. तुला अनन्यभावे प्रणिपात असोत.

**४०८) प्राणद :  । प्राणदाय नमः ।**

प्राणत्वाचा दाता, उद्गता. प्राणजन्य सर्व व्यवहारांचा उगम आणि शेवट तुझ्यामध्ये होतो. तुझ्या या महाशक्तिशाली व चिरकल्याणदायी अस्तित्वात स्वतःचे संकुचित अस्तित्व पूर्णपणे समर्पित व्हावे म्हणूनच युगानुयुगे मुमुक्षु, साधक, सिद्ध, भक्त, योगाभ्यासी, ज्ञानोपासक, वगैरे आणि कोट्यावधी सामान्य लोक धडपडत आहेत.कीर्तन, कथा-पुराण, ध्यान, पूजा, तपश्चर्या, उपास, व्रते, योग, सत्कर्मे इत्यादी विविध प्रकारे तुला आळवत आहेत. तुझ्यात समरस झालेल्यांना प्राणशक्तीची चेतना मिळते, जाणवते व त्यांचे जीवन अमर्याद शक्तीचा महासागर व महास्त्रोत बनते. कारण एका प्रकारे पाहिल्यास देहाला सार्थकता व आशयघनता जीवन चैतन्याने येते. जीवनचैतन्याला उदात्त वैश्विक परिमाण जाणिवेद्वारे येते आणि, जाणिवेला सच्चिदानंदमयता तुझ्यामुळे येते. कृतीला शक्तिजीवनाने, जीवनाला दिशा जाणिवेने आणि जाणिवेला सृजनशील चैतन्य तुझ्यामुळे प्राप्त होते. तुझ्याचरणी अंतःकरणपूर्वक नमन असो.

**४०९) प्रणव :  । प्रणवाय नमः । प्रणवन्ति ह्यमुं देवास्तमात् प्रणव उच्यते ।**

दृश्यादृश्य विश्वाची सुरुवात करणारे शब्दब्रह्म, ओंकार, याची जाणीव व्यक्तीला अंतर्ध्वनीने  होते. व्यक्तिमत्वाचे संकुचित अस्तित्व परावाणीच्या, अंतर्ध्वनीच्या, अनाहतध्वनीच्या जाणिवेबरोबर अमर्याद ईश्वरांमध्ये विरघळून जाते. जिथून जीवनाच्या आविष्काराला सुरुवात झाली तिथेच आपण आहोत याची जाणीव वैयक्तिक अस्तित्व

संपलेल्या व्यक्तीला होते. साहजिकच विश्वाचा उगम व अस्तदेखील याहून भिन्न असू शकत नाही. ( कारण विश्वातील सारी तत्वे कमी-अधिक प्रमाणात मनुष्यामध्येही असतातच,) या तर्कज्ञानाने आणि स्वतःच्या महासृजनशील अशा ओंकारमय अस्तित्वाच्या प्रचीतीने, विश्वाची सुरुवातही कालातीत ओंकाराने होते हे निश्चित होते. म्हणून तुला **प्रणवः** म्हणतात.

तुझ्याच कृपेने व्यक्तीला अंतर्यामी वसणारे तुझे ओंकाररूप जाणवते व सहस्रारचक्र व प्रज्ञाचक्षू उघडतात. तुझा अनाहत ध्वनी व जाणिवेच्या पलीकडील परावाणीतील तुझे रूप व्यक्तीच्या हृदयातून कलेच्या, वैज्ञानिक शोधांच्या, तत्त्वचिंतनाच्या, प्रासादिक काव्याच्या, ग्रंथरचनेच्या व कल्याणक्रांतीच्या युगप्रवर्तक कार्याने आविष्कृत होतात. व्यक्तीची विभूती होते व तिच्या आत्मसंगीताच्या आनंददायी लहरींवर आरूढ होऊन लाखोगण मुक्तिमार्गाने वाटचाल करू लागतात. खरे पाहता संकुचिततत्त्वाचे अमर्याद व ज्ञानी अस्तित्वात होणारे हे समर्पण म्हणजे यज्ञ आणि हे रूपांतर म्हणजेच खरा जन्म. म्हणूनही खऱ्या जीवनाचा आरंभकर्ता या दृष्टीनेही तुला **प्रणवः** म्हणणे सयुक्तिक ठरते. तुला निरंतर नमन असो.

**४१०) पृथुः । पृथवे नमः ।**

अतिशय विशाल आणि चतुर. तू कल्पनातीत विशाल आणि सहज मुक्ती देणारा (चतुर) आहेस. तुझी ही क्षमता आत्मज्ञानी ऋषींनी केलेल्या तुझ्या प्रार्थनांमध्ये व पराजाणिवेतून केलेल्या तुझ्या वर्णनात्मक नामामध्येही असते. म्हणून तुझे नाम हे एखाद्या महान्, कुशल व चतुर मार्गदर्शकासारखे आहे. तुझ्या नामाच्या निकटतेने भक्त आत्मप्रचीतीच्या चैतन्यमय स्थानी स्थिर होतो. तुला माझे अखंड अभिवादन असो.

**४११) हिरण्यगर्भः । हिरण्यगर्भाय नमः ।**

सारे चराचर कल्पांती बीजारूपाने तुझ्या ठायी राहून तुझ्यापासूनच पुन्हा उद्‌भवते म्हणून साक्षात् सृजनशीलतेचा (ब्रह्माचा) व म्हणूनच काळाचा व जाणिवेचाही महान् प्रसवशाली पिता तू आहेस. म्हणून तुला पराकोटीचे वैभव आविष्कृत करणारा गर्भ म्हणजेच हिरण्यगर्भ म्हणतात. तुझ्याचरणी कायम मस्तक राहो.

**४१२) शत्रुघ्नः । शत्रुघ्नाय नमः ।**

शत्रूंचा नाश करणारा. अज्ञान, देहबुद्धी, दु:ख, विकार, अविद्या, मोह व यानी लिप्त होऊन स्वत:च्या व इतरांच्या आत्मोन्नतीमध्ये अडथळा बनलेले लोक यांच्या संकुचित अस्तित्वाचा तू (तुझे ज्ञान) नाश करतेस. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**४१३) व्याप्तः। व्याप्ताय नमः।**

आकाशातील तारकासमूह, आणि आकाशगंगांच्या भ्रमणापासून ते अणुरेणूतील सूक्ष्मातिसूक्ष्म हालचालीपर्यंत आणि मनाच्या विविध पातळीवरील व्यापारांपासून ते व्यक्तीला अनाकलनीय अशा पराजाणिवेच्या घडामोडींपर्यंत विश्वाचा पसारा अफाट व अनंत आहे. त्याचप्रमाणे स्थळ, काळ व अंतर्दृष्टी ह्यांच्या अतूट पण अज्ञात संबंधांपासून ते अंत:प्रज्ञा व अणुरेणूतील घडामोडी यांतील संबंधांपर्यंत (ज्यामुळे विश्वातील नियम मानवाच्या आकलनात येतात) विश्व अमर्यादपणे पसरलेले आहे. तू हे सारे नियंत्याच्या व सत्ताधाऱ्याच्या भूमिकेने व्यापणारा आहेस. माझे सर्वस्व तुझ्या ठायी समर्पित होवो.

**४१४) वायुः। वायवे नमः।**

वायू. वायू हे प्राणाचे म्हणजे तुझे रूप. विश्वातील, शरीरातील व मनातील प्रत्येक हालचालीचा कारक म्हणजे पाच वायू किंवा आयुर्वेदातील त्रिदोषांपैकी वात हा दोष. प्राणायाम, नामस्मरण व इतर साधनांमुळे व तुझ्या कृपेने तुझ्या वायुरूपातील (वात) आविष्काराचे ज्ञान होऊन मायेचे (दृश्यादृश्य घटनांचे) खरे स्वरूप कळण्यास व मायेचे बंधन तुटण्यास मदत होते. आत्मानुसंधानामध्ये तुला साष्टांग दंडवत असोत.

**४१५) अधोक्षजः। अधोक्षजाय नमः। अधो न क्षीयते जातु यस्मात् तस्मादअधोक्षजः।**

जो कधीही अधोमार्गी व अधोगतीस जात नाही व निरंतर जाणिवेच्या अतीत ब्रह्मानंदमय अवस्थेत असतो तो अधोक्षज:. समरस होण्यासाठी तत्स्वरूप हेच एकमेव व सर्वश्रेष्ठ उत्कर्षाचे स्थान. तुला साष्टांग नमन असो.

**ऋतुः सुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः।**
**उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः॥**

**४१६) ऋतुः। ऋतवे नमः।**

वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे ऋतु व युगानुयुगांचा तू स्वामी व नियंता आहेस. हे सारे म्हणजे तुझे वैश्विक नृत्य-संगीत आहे, लीला आहे, क्रीडा आहे. तुझ्याविषयीच्या ह्या ज्ञानाने भक्तहृदयातील अहंकारजन्य दडपण नष्ट होऊन निरंतन आनंदाची कारंजी हृदयाकाशात उडू लागतात. तुला माझे भक्तिपूर्वक प्रणाम असोत.

**४१७) सुदर्शनः। सुदर्शनाय नमः।**

चांगले (शिव) दर्शन. तुझे दर्शन अंतर्बाह्य शुद्ध करते व समाधान देते. तसेच तुझ्या

दर्शनाने अज्ञान नष्ट होऊन ज्ञानाचा तिसरा नेत्र उघडतो. सत्याचे यथार्थ ज्ञान व तज्जन्य सामर्थ्य प्राप्त करून देणाऱ्या तुला माझे साष्टांग प्रणिपात असोत.

**४१८) कालः । कालाय नमः ।**

काळा व काळ. विठ्ठल, राम, कृष्ण, विष्णू या सर्व सगुण रूपामध्ये तुझा रंग काळा असतो. याचा गुह्यार्थ तू दृश्य प्रकाशाच्या अतीत आहेस आणि कालातीत आहेस असाही होतो. भूत, भविष्य, वर्तमान, हे सर्व काही तुझ्यामध्ये सामावलेलं व तुझ्या अधीन आहे. महासत्ताधारी व मुक्तिदायी तुला सादर अभिवादन असो.

**४१९) परमेष्ठी । परमेष्ठिने नमः ।**

तेजोमय स्वस्वरूपी, अशरीरी एकाग्रतेने निरंतर पाहणारा व भक्तांना हृदयगुंफेमध्ये अनुभवता येण्यासारखा. **परमेष्ठीचा** पारंपरिक अर्थ ब्रह्मदेव, विष्णू, महेश, अग्निदेव, सहावा मनु, ब्रह्मदेवाचे चौदा पुत्र (स्वायम् स्वारोचिप, उत्तम, तामस, रेवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि व इंद्रसावर्णि ज्याना मूळ पुरुष मानतात.) असा होतो. ह्यातील तथ्य असे की ब्रह्मदेव म्हणजे सृजनशीलता, ब्रह्मा, विष्णु, महेश हे तीन गुण व तीन क्रिया, मनु म्हणजे मनुष्य व सृष्टीच्या व्यापारांचा उगम असे वैश्विक मन व वैयक्तिक मन आणि ब्रह्माचे चौदा पुत्र म्हणजे चौदा भुवने (किंवा मन बुद्धी चित्त अहंकार व पंचमहाभूते व पंचतन्मात्रे) असा होऊ शकतो.परमेष्ठी म्हणजे गरुड. म्हणून विष्णूचा (विश्वस्थितीचा नियंता) वाहक व म्हणून विश्वातील प्रक्रियांचा वाहक तूच आहेस. अपरंपार विश्वव्यवहाराचा अधिपती अशा तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**४२०) परिग्रहः । परिग्रहाय नमः ।**

संचय किंवा साठा, किंवा साठा ग्रहण करणारा. साऱ्या वैश्विक अस्तित्वामुळे साठा तर त्या अस्तित्वाचा स्वामी असल्याने व हे सारे कल्पांती तुझ्यामध्ये विलीन होत असल्याने साठा ग्रहण करणारा. तसेच भक्तांच्या प्रार्थना घेणारा म्हणूनही **तू परिग्रहः** आहेस. तुझे भक्तही वस्तू, शक्ती, लाभ, कल्पना, अहंकार यांच्यामध्ये बद्ध व लिप्त न होता ब्रह्मतेजाचे व ऐश्वर्याचे सत्ताधीश असतात. भोक्ते असतात. तुझ्याचरणी मस्तक चिरकाळ राहू दे.

**४२१) उग्रः । उग्राय नमः ।**

भयंकर. तझ्या अनुसंधानाच्या दरम्यान संकुचित व्यक्तित्वाचा त्याग घडतो. हा त्याग साक्षात् मृत्यूप्रमाणेच अतिभयंकर असतो. जे आपलं आहे असं आपण जन्मभर समजत आलो व ज्यांच्यावर जीवापाड प्रेम केलं त्या सर्व व्यक्ती व वस्तूंना मनाने

अंतरणे म्हणजे एकाकीपणाची परिसीमा असते. अंधारकोठडीत कायमचे गडप होताना व्हावा तसा थरकाप स्वत:च्या अहंकाराचा, कल्पनांचा आणि साऱ्या मोहमयी दुनियेचा त्याग करताना होतो. आसक्तीतून मुक्ती देणाऱ्या तुझ्या मुक्तिदायी रूपाची प्रचंड भीती वाटते. विरक्तीचं वैभव न पेलवल्याने मोहाची बंधने तोडणारा तू अत्यंत रागीट व क्रूर भासतोस. परंतु अंतिम कल्याणाची प्राप्ती करून देणाऱ्या तुला तू कितीही उग्र भासलास तरी निरंतर अभिवादन असो.

**४२२) संवत्सरः। संवत्सराय नमः। सम्यक् वसन्ति भूतानि यस्मिन् इति संवत्सरः।**

सर्व काही ज्याच्या ठायी आहे असा काळ तू आहेस. काळालाही सामावणारा कालातीत व काळ अशा तुझ्या अस्तित्वाशी समरस होताच कोणत्याही क्षुद्र/क्षणभंगुर वस्तूची आसक्ती व संग राहत नाही. केवळ सत्याचा संग राहतो. म्हणून परमोच्च त्यागाचे श्रेष्ठ उदाहरण तूच आहेस. संवत्सर म्हणजे यज्ञ. सारे विश्वच तुला येऊन मिळते म्हणून तू श्रेष्ठ यज्ञ आहेस. (काळाचा एक भाग म्हणून वर्षालाही संवत्सर म्हणतात. शुभ मुहूर्त, सण, इत्यादी सर्व वर्षात येतात. ब्रह्मांड व पिंडाप्रमाणेच हे नाते आहे.) तुला विनम्र प्रणाम असोत.

**४२३) दक्षः। दक्षाय नमः।**

समर्थ, हुशार, तत्पर, शुद्ध व कनवाळू. संपूर्ण विश्वाचा अंतिम सृजनशील उगम अशा तुझ्यामध्ये एकरूप झालेल्यांमध्ये दुबळेपणा, मंदपणा, आळस, अज्ञान व असुरक्षिततेमधून येणारे क्रौर्य राहत नाही. वीर्य, ओज, विष्णू, शिव इत्यादी सृष्टिकर्त्या तत्त्वाच्या आविष्कारांनाही परंपरेने दक्ष म्हणतात. त्यामागील मथितार्थही तू सर्वोच्च सामर्थ्यवान असून भक्तांना तसे बनवतोस हाच आहे. माझ्या अज्ञानजन्य क्षुद्रत्वाची संपूर्ण आहुती तुला अर्पण असो व तुला कृतज्ञ अभिवादन असो.

**४२४) विश्रामः। विश्रामाय नमः।**

विश्वातील व व्यक्तीमधील सर्व क्रिया-प्रक्रियांचे उगमस्थान असल्याने तू स्वतः मात्र अत्यंत शांत आहेस. तसेच तुला जाणल्याने व्यक्तीची सारी अहंकारजन्य धडपड व अज्ञानजन्य कष्टमय परवड नष्ट होते. म्हणून तुला **विश्रामः** (म्हणजे विश्रांतीचे स्थान) म्हणतात. तुझ्याच अनुसंधानात माझे तुला शतशः प्रणाम असोत.

**४२५) विश्वदक्षिणः। विश्वदक्षिणाय नमः।**

अत्यंत कुशल व सक्षम. तू संपूर्ण विश्वाची व्यवस्था कुशलतेने पाहतोस (योग्य

कर्मफल देतोस) व वैश्विक यज्ञात (सारे विश्व तुझ्यात विलीन होते म्हणून) सर्वांना सहभागी करतोस. तुला विनम्र नमन असो.

**विस्तारः स्थाथरस्थाणुः प्रमाणं बीजमव्ययम्।**
**अर्थोऽनर्थो महाकोशो महाभोगो महाधनः ॥**

**४२६) विस्तारः । विस्ताराय नमः ।**

विश्वविस्तार बीजरूपातून आविष्कृत करणारा व विश्वाचा विस्तार स्वत:त सामावून घेणारा म्हणून तुला **विस्तारः** म्हणतात. तुला साष्टांग नमन असो.

**४२७) स्थावरः स्थाणुः । स्थावरस्थाणवे नमः ।**

हालचाल नसलेला. तू हालचाल नसलेला आहेस याचा अर्थ प्रभावजन्य हालचाल नसलेला आहेस. विश्वातील व व्यक्तीतील सर्व हालचालीचा व चंचलतेचा कारक पण स्वत:वर कोणत्याही बाबीचा प्रभाव नसलेला म्हणून तू भक्कम, अचंचल आणि अढळ असा मूलाधार आहेस. विश्वनियंता विश्वाधार  परिणामस्वरूप हालचाल नसलेला आहेस. वीज ज्याप्रमाणे इंजिनाच्या हालचालीची कारक असते व अतिवेगवान असूनही परिणामस्वरूप हालचालींनी युक्त नसते तसाच तू तरलतम, वेगमय असूनही दृढतम नियंता व अचल आहेस. तुला कृतज्ञ वंदन असो.

**४२८) प्रमाणं । प्रमाणाय नमः ।**

ज्याच्या आधारे सत्यासत्यतेचा पडताळा घेतला जातो किंवा ज्याच्या आधाराने बाकी बाबींचे मूल्यमापन होते त्याला प्रणाम म्हणतात. विश्वाची अंतिम मर्यादा, परिमाणांचही परिमाण व सर्वोतोपरि सर्व असल्याने विश्वघटनांचे व व्यक्तिजीवनाचे एकमेव चिरंतन व शाश्वत असे प्रमाण तूच आहेस. याउलट तू सूक्ष्मातिसूक्ष्म व चेतनेची ही चेतना असल्याने तद्रुप होण्याव्यतिरिक्त व प्रमाणांचे विचार तुझ्या अनुभूतीत विरघळण्याव्यतिरिक्त तुझ्या अस्तित्वाला अन्य कोणतेही प्रमाण नाही. तुझ्या चरणी कोटी कोटी दंडवत असोत.

**४२९) बीजमव्ययं । बीजाय अव्ययाय नमः ।**

साऱ्या विश्वाचं उत्पत्तिस्थान म्हणून तू बीज आहेस. परंतु सर्वसामान्य बीजाप्रमाणे अंकुरण्याच्या प्रक्रियेत बीजत्व हरवणारे बीज तू नाहीस. सर्व काळाना व्यापणारे, कालातीत असे श्वाश्वत, अव्यय बीज तू आहेस. सूक्ष्मातिसूक्ष्म व अनाविष्कारित (बीजरूप) आणि सर्वव्यापी कालातीत असे श्वाश्वत अव्यय असणारा असा तू असल्याने तुला **बीजमव्ययम्** (अव्यय बीज) म्हणतात. ब्रह्मा, विष्णू, महेश ह्या

विश्वाच्या तीनही गुणांना व स्थितींना उद्‌भवणारा व व्यापणारा अशा सर्वसत्ताधीश तुला निरंतर नमन असो.

**४३०) अर्थः । अर्थाय नमः ।**

विश्वातील विविध घटनांचे आणि त्यामागील नियमांचे संपूर्ण आकलन म्हणजे त्या सर्व घटनांवर नियंत्रण. संपूर्ण आकलन म्हणजे त्या घटना घडविता येणे, बदलता येणे. विज्ञानाने विश्वाच्या विविध घटनांचे आकलन करून तत्सदृश्य घटना घडविल्या जातात. जेवढे आकलन परिपूर्ण तेवढी विज्ञानाची झेप उत्तुंग होते, वैज्ञानिक आवाका मोठा होतो. संपूर्ण विश्वाची निर्मिती करणारा, निर्मितीलाही निर्मिणारा (म्हणून सर्वकाही इत्थंभूत जाणणारा) आणि निर्मिलेले व निर्माणप्रक्रिया हेही असणारा (म्हणून विश्वाचा खरा आशय असणारा) तू आहेस. अशा तऱ्हेने विश्वाचे कारण,विश्वनिर्मीती, विश्व, विश्वाचा उद्देश, हे सर्व काही असणारा व जाणणारा तू असल्याने प्राधान्याने जाणण्यास सर्वात महत्वाचा असा गुह्यार्थ तू आहेस. दुसऱ्या दृष्टीने तुला जाणणे म्हणजे जीवनाचे व विश्वाचे गुह्य सर्वतोपरि जाणणे. तुला जाणणे म्हणजे तुला समर्पित होऊन तद्रुप होणे. तुझ्या चरणी समर्पण भावनेने साष्टांग दंडवत असोत.

**४३१) अनर्थः । अनर्थाय नमः ।**

आशय, हेतू, उद्देश (वासना, आसक्ती) नसलेला. सर्वसामान्य व्यावहारीक बाबींचे बुद्धीला होणारे आकलन, त्यांविषयीचे स्वारस्य किंवा सर्वसामान्यपणे उद्देश, हेतू व ध्येय यांची केली जाणारी कल्पना तुझ्या अस्तित्वाला लागू होत नाही. कारण बुद्धीला आकलन होणाऱ्या अर्थ-अर्थहीनता, योग्य-अयोग्य, अंधार-प्रकाश, धन-ऋण, ज्ञान-अज्ञान, असणे-नसणे अशा सर्व द्वंद्वांच्या तू अतीत आहेस. ही सर्व द्वंद्वे तुझ्यात विलय पावतात, विरघळून जातात, सामावून जातात, उत्क्रांत होत होत तुझ्यात समरसून जातात. कारण द्वंद्वे ही बुद्धीमुळे व बुद्धीच्या पातळीवर जाणवतात आणि आविष्कृत होत असतात. बुद्धीचे उन्नयन ही तुझ्या प्रचीतीची पूर्वअट आहे. अहंकार व देहबुद्धीजन्य बुद्धी केवळ द्वंद्वे पाहते (ह्याला राजस ज्ञान असेही म्हणतात) द्वंद्वामधील एकाग्रता प्रत्यक्षात आणू शकत नाही. प्रामाणिक व कुशाग्र बुद्धीच्या बुद्धीवंतांना तर्कातीत असं तुझं अस्तित्व तर्कदृष्ट वाटतं, पटत नाही. त्याना तुझं अस्तित्व ही भाकडकथा वाटते, खोटेपणा वाटतो. सज्जन नास्तिकांच्या नास्तिकतेचं मूळ अंतरंगातीत परमानंदमय सामर्थ्याच्या अजाणतेपणात आहे, तर्कातीत प्रज्ञेच्या अभावात आहे. अहंकार व देहबुद्धीचे उन्नयन न होण्यात आहे. आत्मप्रचीतीचे सामर्थ्य न मिळाल्याने निर्माण होणाऱ्या दुबळेपणात आहे.त्याचप्रमाणे अत्यंत व्रतस्त आचरण करणाऱ्या बुद्धीवादी सद्‌गृहस्थांची पापाच्या गदारोळामुळे होणारी तळमळ आत्मसाक्षात्काराच्या अभावात आहे. वास्तविक असणे

व नसणे यांच्याही पलीकडील द्वंद्वातीत अशा अस्तित्वामुळे तू एकाचवेळी अर्थपूर्णही आहेस व अर्थहीनही आहेस हे पूर्णपणे सत्य आहे. म्हणून तुला अनर्थ असेही म्हटले आहे. तुला निरंतर प्रणाम असोत.

**४३२) महाकोशः । महाकोशाय नमः ।**

मोठी पिशवी, थैली किंवा आवरण. सजीव-निर्जीव वस्तूंच्या अस्तित्वाच्या तरल-तरलतर अशा विविध पातळ्यांनुसार त्यांचे त्यांचे गुणधर्म, क्रियाशक्ती व क्रियावैशिष्ट्ये ठरत असतात आणि विविधतेने नटलेली आढळतात. मनुष्याचे अस्तित्व अन्नमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश, प्राणमय कोश व आनंदमय कोश ह्यांनी वर्णन केले जाते. किलियन छायाचित्रकलेद्वारे घेतली जाणारी छायाचित्रे जी एक बाब दाखवून देतात ती म्हणजे दृश्य शरीराशी अखंडपणे निगडीत व शरीराहून सूक्ष्म अस्तित्वही मनुष्याला असते. ह्या छायाचित्रतंत्रातील विशिष्ठ विद्युत्भारित कणांच्या वापरामुळे किलियन छायाचित्रे वेगळी भासतात असे असले तरीही या विधानाला बाधा येत नाही. आनंदमय कोश इतर सर्व कोशांना अंतर्बाह्य व्यापतो व त्यांचे नियंत्रण करतो. विश्वाचे सारेच अस्तित्व तू अंतर्बाह्य व्यापतोस- प्रसवतोस व नियंत्रित करतोस म्हणूनही तू **महाकोशः**(गर्भाशय) आहेस. तू असे गर्भाशय आहेस की जे विश्वाच्या निर्मितीपूर्वी आणि निर्माल्यानंतरही त्याला व्यापते व नियंत्रितही करते. त्यामुळेच **महाकोशः** ह्या शब्दाला बीज व कलिका हे अर्थही आहेत. कारण बीजरूपातीत गुण, निर्मितीस व स्थितीस जबाबदार असतात.महाकोशः म्हणजे विश्वऐश्वर्यांच कठोर म्हणूनही तू **महाकोशः** आहेस. त्याचप्रमाणे **महाकोशः** म्हणजे अग्निदिव्य. अंतर्बाह्य संपूर्ण समर्पणाशिवाय व सुवर्णाप्रमाणे संपूर्ण अस्तित्व उत्क्रांत झाल्याशिवाय तुझी प्राप्ती होत नाही. जळणाऱ्या वातीला अंतर्बाह्य ज्योतीचं आवरण प्राप्त होतं तसं भक्तांना तुझं, म्हणून याही अर्थाने तुला **महाकोशः** म्हणणे योग्यचं दिसते. अंतर्बाह्य सर्व व्यापणाऱ्या व नियंत्रित करणाऱ्या तुला शिरसाष्टांग दंडवत असोत.

**४३३) महाभोगः । महाभोगा. नमः ।**

श्रेष्ठ अनुभुती व सर्प. भोगणारा, भोगणे व भोग्य हे सर्व काही तू व्यापले आहेस. तूच श्रेष्ठतम आनंदानुभव आहेस, कारण तुझी अनुभूती घेणारा वेगळा उरतच नाही. जडाचा चैतन्यमय उगम व आधार या अर्थाने पृथ्वीला शेषाचा व व्यक्तीला सर्पिणीचा (कुंडलिनी शक्तीची ) आधार दाखवलेला/वर्णिलेला असतो. म्हणून सर्प ह्या अर्थानेही तू **महाभोगः** आहेस.

**४३४) महाधनः । महाधनाय नमः ।**

जीवनात सर्वोच्च प्राधान्याने ज्याची इच्छा धरावी असे अत्युत्तम धन आणि वैश्विक ऐश्वर्याचा सामर्थ्यसंपन्न धनी तू आहेस. तुझ्या निकटतेने सारे काही मौल्यवान (उत्तम धन ) होते. तुझे भक्त खरे धनी होतात या अर्थानेही तू **महाधनः** आहेस. तुझ्यामुळे जीवनाला निष्कलंक, आनंदमय सामर्थ्याचे नवे मौलिक परिमाण प्राप्त होते. वैश्विक व वैयक्तिक (सर्वश्रेष्ठ ऐश्वर्याला ) त्याचे खरे मूल्य, महत्त्व, प्राप्त करुन देणाऱ्या तुला अनन्यभावे नमन असो.

**अनिर्विण्णः स्थविष्ठोऽ भूर्धर्मयूपो महामखः ।**
**नक्षत्रनेमिर्नक्षत्री क्षमः क्षामः समीहनः ॥**

**४३५) अनिर्विण्णः । अनिर्विण्णाय नमः ।**

निराशा नसलेला. कोणतीही इच्छा, आकांक्षा, आसक्ती ह्यानी लिप्त नसल्याने व त्रिकालज्ञानी महासमाधीत असल्याने तू पूर्णतृप्त आहेस.तुझ्या प्रचीतीने भक्तही तुझ्या उद्वेगरहित, वैफल्यरहित व नैराश्यरहित अस्तित्वाशी तादात्म्य पावतात व निष्काम कर्मयोगाचे उदात्ततम दीपस्तंभ बनतात. तुला अनन्यभावे साष्टांग प्रणिपात असोत.

**४३६) स्थविष्ठः । स्थविष्ठाय नमः ।**

मोठा, अतिप्रचंड. वीज ज्याप्रमाणे सूक्ष्मतिसूक्ष्म असते आणि अतिविशालही असते त्याचप्रमाणे अत्युच्च पातळीवरील कालातीत अस्तित्वामळे तू कल्पनातीत सूक्ष्म आणि कल्पनातीत मोठा (काळालाही व्यापणारा ) आहेस. तुझ्या अनाकलनीय अस्तित्वाच्या प्रचीतीने व्यक्तीचे शरीर, शक्ती, पंचप्राण, मन,बुद्धी, चित्त, अहंकार, क्रियाशक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती संपूर्णपणे तुझ्याशी निगडित होतात. तुझे असे भक्त म्हणजे चालते-बोलते ब्रह्म होत. अशी व्यक्ती कोणत्याही संप्रदायाच्या पगड्याने आणि सत्तेच्या जुलुमाने संकोच पावत नाही. उलट अन्याय्य समाजव्यवस्थांचा, कडव्या धर्ममतांचा, दडपशाही संप्रदायांचा, राजसत्तांचा, विचारशाह्यांचा, आणि मुक्तिमार्गातील अशा सर्व अडथळ्यांचा कालानुरुप व कलोचित ऱ्हास ती पाहू शकते व प्रत्यक्षात आणू शकते. आत्मप्रचीतीने सर्व संकुचित नष्ट झालेली, चराचर आपण झाला अशी ती महान व्यक्ती वैविध्यातील तुझे एकात्म अंतरंग जगाला दाखवून आत्मज्ञानी सहिष्णुतेचा नवा अध्याय मानवी इतिहासात घडवू शकते. सर्व प्रकारच्या अविद्यामय, ठोकळेबाज आचारविचारांच्या जोखडातून मानवाला मुक्त करुन स्वधर्मसूर्याचे महाज्ञान व तज्जन्य उदात्तमय आविष्कार विश्वामध्ये घडवू शकते. आत्मसंगीताच्या सुरसाने अखिल जीवन भरतानाच सर्व तमोगुणजन्य अविद्याजन्य

कडवेपणा, कटुता, दुराग्रह, हिंस्रता मुळातून उखडून मानवी जीवन अत्युत्कट माधुर्याने भरुन टाकू शकते. भक्तांवर अशी कल्पनातीत कृपा करणाऱ्या अंतर्बाह्य सर्व व्यापणाऱ्या तुला निरंतर अभिवादन असो.

**४३७) अभूः । अभुवे नमः ।**

न जन्मणारा. विश्वामध्ये जे जे आहे ते तुझ्यापासून उत्पन्न झालेलं आहे. परंतु तू कुणापासूनही उत्पन्न झाला नाहीस. तुला उत्पती स्थिती व लय ह्या अवस्था नाहीत. तू, असणे व नसणे याच्यापलीकडे कायम असतोसच. तुझ्या प्रचीतीच्या अभावामुळे लोक दुःखाच्या लाटांनी झोडपले जातात, फरपटतात व विव्हल होतात. असहाय होतात. तसेच सुखाच्या प्राप्तीने अहंमन्य व मदोन्मत होऊन हिंस्रतेचा, व हीनतेचा नंगानाच करतात. अशा परिस्थितीत कोणताही तर्कसंगत व कल्याणाचा उपदेश त्यांना उपयोगी पडत नाही.त्यांचं हृदयपरिवर्तन होत नाही. परंतु सर्वकाळी सर्वकाही सर्वतोपरी व्यापणारा व नियंत्रित करणारा तू विविध प्रकारे, वेगवेळ्या साधनांद्वारे व भक्तांद्वारे त्यांनाही आत्मप्रचीती देऊन त्यांचेही संपूर्ण कल्याण साध्य करु शकतोस. नवे युग निर्माण करु शकतोस. तुला नम्र प्रणाम असोत.

**४३८) धर्मयूपः । धर्मयूपाय नमः ।**

यज्ञाच्या वेळी पशूंना बांधण्याचा खांब, किंवा धर्माचा जयस्तंभ, मज्जारज्जू ह्यामागील संकेत पशुत्वाच्या त्यागाचा आहे. यज्ञ म्हणजे सर्वस्वाचे तुला सर्मपण. यामध्ये प्रथमतः पशुवृत्ती ह्या मोकाट न सुटता तुझ्या स्वरुपाशी निगडीत व्हाव्या लागतात. पशुवृत्ती तुझ्याचरणी अर्पण करणे मज्जारज्जूच्या सहाय्याने शक्य होते. तसेच धर्माच्या जयाचे देखील एक लक्षण उच्च स्तंभ (मथितार्थ, तुझी प्रचीती ) आहे. तुला सादर प्रणाम असोत.

**४३९) महामखः । महामखाय नमः ।**

सर्वोच्च त्याग, महायज्ञ. तुझ्याशी तद्रुप होणारा (यज्ञ करणारा ) वेगळा राहात नाही. यज्ञाचा हेतु, यज्ञ व यज्ञ करणारा हे सर्व एकरुप होतात. म्हणून तू आत्मार्पणरुपी, अग्निदिव्यरुपी, पवित्रतम यज्ञ आहेस. ब्रह्मतेजोमय ज्वाला, ज्ञानाचा धगधगता प्रकाश आणि सर्व वैयक्तिक आशा-आकांशा व वासनांचा समिधारुपी हवि यानी युक्त असा चिरंतन महायज्ञ तू आहेस. तुला निरंतर प्रणिपात असोत.

**४४०) नक्षत्रनेमिः । नक्षत्रनेमये नमः ।**

सर्व नक्षत्रमालांचा (विश्वाच्या विस्तीर्ण पसाऱ्याचा ) व त्यांच्या गतीचा परीघ

(परिसीमा) तू आहेस. कारण तू. हे सर्व व्यापणारा व नियंत्रित करणारा आहेस. अन्य दृष्ट्या शिशुमारचक्र (सूर्यमाला ) धारण करणारा विश्वाचा नियंता व धारणकर्ता व देहातील षट्चक्रांचा नियंता तू आहेस. तुला अनन्यभावे दंडवत असोत.

**४४१) नक्षत्री । नक्षत्रिणे नमः ।**

नक्षत्रांचा स्वामी, शीतलतेचा कारक असा चंद्र. भक्तांना त्रिविध तापातून मुक्ती देणारा. आल्हाददायी आणि जीवनाला शोभा आणणारा म्हणून तुला अलंकारिक अर्थाने **नक्षत्री** म्हणणे सयुक्तिक आहे. तुला अखंड नमन असो.

**४४२) क्षमः । क्षमाय नमः ।**

क्षमता व क्षमाशीलता असलेला. साऱ्या विश्वाच्या रचनेचे व नियंत्रणाचे कार्य अव्याहतपणे व अचुकतेने पार पाडणारा व कालातीत द्रष्टा असल्याने कोणत्याही आपत्तीनी विव्हल न होणारा व क्षमाशील असा तू आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**४४३) क्षामः । क्षामाय नमः ।**

कोणत्याही गोष्टीची कधीही कमतरता नसलेला. द्वंद्वातीत व सर्वसमावेशक अस्तित्वामुळे तू विश्वनिर्माता, विश्वनियंता आणि विश्वात्मकही आहेस. त्यामुळे विश्वविलयानंतरदेखील तू परिपूर्णच असतोस. व्यक्तिमत्वाच्या पातळीवर अज्ञानी व दुबळ्या लोकांच्या आसक्तीचा कारक आणि ज्ञानी लोकांच्या ज्ञानाचा ही कारक तूच आहेस. त्यामुळे हवेपणा व नकोपणा, आसक्ती व अनासक्ती, भूक तृप्ती यांच्या अतीत व पूर्णावस्थेतच तू असतोस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४४४) समीहनः । समीहनाय नमः ।**

म्हणजे महान संकल्पशक्ती असलेला. विश्वोत्पत्ती, स्थिती, प्रगती व विलय यांचे निरंतरपणे नियंत्रण करणारा व सर्वांना आत्मज्ञानाची गती प्रदान करणारा असा तुझा वैश्विक संकल्प आहे. बाकी सर्व संकल्प संकुचित, खुजे, अर्धवट किंवा चुकीचे आहेत. माझ्या सर्व संकल्पासकट माझे सर्वस्व तुझ्याचरणी अर्पण असो.

**यज्ञ ईज्यो महेज्यश्च क्रतुः सत्रं सतांगतिः ।**
**सर्वदर्शी विमुक्तात्मा सर्वज्ञो ज्ञानमुत्तमम् ।।**

**४४५) यज्ञः । यज्ञाय नमः । यज्ञो वै विष्णुः ।**

यज्ञ म्हणजे विष्णु. सर्व प्रकारच्या संयमाने (वृत्ती समर्पित करुन ) अंतःश्चक्षूंच्या व

प्रज्ञाचक्षूंच्या प्रकाशाकडे (तुझ्याकडे ) वाटचाल करणं म्हणजे ब्रह्मयज्ञ. सर्व काही तुझ्याचरणी अर्पण केल्यावर अर्पण करणारा, अर्पण करण्याची क्रिया व अर्पण करून घेणारा सर्व एकरूप यज्ञरूप होतात. म्हणून तुला यज्ञ म्हणतात. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**४४६) इज्यः । इज्याय नमः ।**

यज्ञात आवाहन करून हवि अर्पण करण्यास व सर्वतोपरी पूजा करण्यास योग्य असा देव तू आहेस. खऱ्या यज्ञात स्वतःचे संपूर्ण संकुचित अस्तित्व ज्याला अर्पण करावे असा परमेश्वर तू आहेस. तुझ्या पायशी सर्व अर्पण करण्याच्या परमसमाधानी अवस्थेमध्ये तुझ्याचरणी लोटांगण असो.

**४४७) महेज्यः । महेज्याय नमः ।**

पूजनीय. ज्याच्या पायावर सर्वस्वाचा त्याग करावा असा एकमेवाद्वितीय वंदनीय परमेश्वर अशा समर्पणातच जीवनाचं सर्वोच्च सार्थक आहे. तुला अनंत प्रणाम असोत.

**४४८) क्रतुः । क्रतवे नमः ।**

यज्ञात बळी दिला जाणारा पशु. तुला समर्पण केले जाते ते पशुत्वही तुझाच अंश आहे व ही प्रक्रियादेखील मूलतः तूच आहेस. कारण त्यांचाही उद्गाता तूच आहेस.अशा उदात्त यज्ञ संकल्पाचा व त्यागभावनेचा जनकदेखील तूच आहेस. उच्च, नीच, उदात्त व हीन अशा सर्व बाबतीत वसणाऱ्या व त्यांचे नियंत्रण करणाऱ्या तुला कृतज्ञ दंडवत असोत. अंतरंगातील तुझ्या प्रकाशामुळे स्वात्म्यभाव येतो. स्वात्म्य म्हणजे स्वतःचा आणि दुसऱ्याचा आत्मा **एकच** असल्याची खात्री. जगातील विषमतेने उद्विग्न होणाऱ्यांनी समतेचा करूणाजन्य उद्घोष केला. लाखो अनुयायांनी तो आत्मसात केला. कारण काहींच्या भाबड्या, हळव्या वृतीला त्यामुळे खतपाणी मिळाले तर काहींच्या व्यक्तिगत स्वार्थाला. सारा दोष समाजव्यवस्थेवर ढकलण्याच्या काहींच्या वृतीला तर अन्याय्य समाजव्यवस्था स्वतः तयार केल्याच्या काहींच्या गुन्हेगारी भावनेला. समतेचे तत्वज्ञान, समतेचा उद्घोष हा मूलतः स्वातंत्र्याचा व सुबत्तेचा उद्घोष होता. पण त्याचा आष्किार वर्गसंघर्ष, वंशसंघर्ष आणि वर्णसंघर्ष वगैरे रुपांत झाला. वस्तुतः शोषणकर्ते वर्ग, वंश आणि वर्ग इत्यादी म्हणजे स्वातंत्र्याच्या आणि सुबत्तेच्या आड येणारी प्यादी होती व आहेत. ह्या संघर्षातून स्वार्थपोषक पैशाची रेलचेल येऊ शकते, उदारतेतील समृद्धी नाही. लहरी पूर्ण करण्याची ऐपत येते पण वेड्या वा स्वार्थी लहरींना लगाम घालण्याचं स्वातंत्र्य नाही. समतेसाठीचा संघर्ष एका मर्यादेपर्यंत उत्क्रांतीला पोषक ठरतो. परंतु पुढे तोच संघर्ष असूया, बेजबाबदारपणा,

द्वेष, हिस्टेरिया, सूड, तिरस्कार, ऐतखाऊपणा, मग्रुरी, सत्ताकांक्षा, संकुचित (जातीय, भाविक, वांशिक, धार्मिक इ.) वृत्ती यांना पोषक ठरतो व ठरेल. त्याचप्रमाणे समतेचा हेका व सध्याचा खाक्या संपूर्ण विश्वसमाजामध्ये अनागोंदी, गोंधळ, बेदिली, अव्यवस्था माजवणारा ठरतो व ठरेल. अर्थात, याचा अर्थ विषमतेची कास धरावी असा **मुळीच नव्हे.** याचा अर्थ असा की **समतेच्या पुढची पातळी** गाठून त्या पायरीवर कार्य करणे आज अत्यावश्यक आहे. ही पुढची पायरी म्हणजे **स्वात्म्यभाव**. स्वात्म्यभावाची व्यवहारातील काही उदाहरणे म्हणजे आई-मूल, गाय-वासरु, बहीण-भाऊ, नवरा-बायको, आजी-आजोबा-नातवंडं, शिक्षक-विद्यार्थी, वगैरेंमधील आत्मीयता. ह्या भावनेत समतेचा स्पर्श नसतो. गंधही नसतो. आई-मुलगा समान नसतात. पण एकात्म असतात. कृष्णवंशीय व गोरा हे सारखे नसतात. पण मूलतः एकात्म असतात. परस्परांच्या आत्म्याशी तद्रुप होणे व तद्रुपता अनुभवणे म्हणजेच स्वात्मीयता. ती पूर्वी होती व आजही आहे. पण तुझ्या कृपेने ती विश्वकल्याणकारी प्रभावी होईल याची खात्री वाटते. तुला नमन असो.

### ४४९) सत्रं । सत्राय नमः । सतः त्रायते इति सत्रम् ।

म्हणजे सत्याचा विजय घडवून आणणारा. सत्याच्या जाणिवेच्या आणि त्या जाणिवेतून केल्या जाणाऱ्या कार्याचा कर्ता असल्याने त्या कार्यास यशप्राप्ती प्रदान करणाराही तूच आहेस. तसेच कमी किंवा अधिक व्यवहारज्ञान, कल्पना, प्रमेये, सिद्धांन्त वैगेरेमध्ये न अडकता तद्रुप होणारा भक्त तुझ्याच प्रचीतीमध्ये आणि तुझ्याच संकल्पात जगत असल्याने त्याचे कार्य विजयी बनवणाराही तूच आहेस. तुझ्या भक्तांना तुझ्याशिवाय तुझ्याभक्तिशिवाय अन्य काहीही नको असते आणि म्हणून ते पूर्णार्थाने आणि सदासर्वदा (भक्तीपूर्वी, भक्ती करताना,भक्तीनंतर) केवळ तुझ्या भक्तीचीच आस ठेवतात व तुझ्या लोककल्याणकारी संकल्पात (सत्य व विजयी होणाऱ्या संकल्पात) जगतात. तुला साष्टांग नमन असो.

### ४५०) सतां गतिः । सतां गतये नमः ।

गती म्हणजे आवड, कौशल्य, वेग व अंतिम स्थिती. तुझ्या भक्तीने (आवडीने) अविरतपणे, सावध व शहाणपणाने मन तुझ्यात एकाग्र करून (कुशलतेने) क्षणभरही न विसंबता (वेगाने) तुझ्या प्राप्तीसाठी जे धडपडतात ते तुलाच येऊन मिळतात (अंतिम स्थिती). म्हणून तुला गती म्हणतात. तसेच भक्तप्रेमाने (आवडीने), अशरीरी सावधपणे (कुशलतेने) विश्वप्रक्रिया व व्यक्तिप्रक्रिया चालवणारा, (कालातीत वेगाने) कार्यरत असणारा, भक्तांना स्वरूपी कायमची विश्रांती देणारा (अंतिम स्थिती) तूच आहेस. विज्ञान, ज्ञान आणि तत्त्वज्ञान, संगीत, कला व नाट्य, तसेच आचार, व्यवहार व

संस्कृती यांच्या वेगवान अभिसरणामुळे येणाऱ्या काळात तुझी प्राप्ती सर्वांना होऊ शकते. खऱ्या स्वातंत्र्य व समृद्धीचा वैश्विक आविष्कार होऊ शकतो. तुला विनम्र वंदन असो.

**४५१) सर्वदर्शी । सर्वदर्शिने नमः ।**

सर्व पाहणारा. संपूर्ण चराचराच्या अंर्तबाह्य सर्वत्र असून सर्व संवेदना, जाणिवा, ज्ञान, कृती यांचा ज्ञाता, निर्माता, नियंता व द्रष्टा. अज्ञान, अविद्या, मायेने लिप्त नसलेल्या अशरीरी दृष्टीने व कालातीत अस्तित्त्वाने त्रिकालीज्ञानीही तू आहेस. त्याचप्रमाणे भक्तांना त्यांच्या हृदयांतर्यामी व सर्व चराचरात अत्यंत स्पष्टपणे दिसणारा ही तूच आहेस. तुला मनोभावे नमन असो.

**४५२)विमुक्तात्मा । विमुक्तात्मने नम : ।**

संपूर्ण विश्वाच्या कारभारांचा नियंतां असूनही अत्यंत अलिप्त असणारा, चराचराचे अंतर्बाह्य व्यापणारा, ज्ञानी जनांना स्पष्टपणे जाणवणारा, स्वयंभू, स्वतंत्र आत्मा तू आहेस. तसेच कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, राजयोग इ.विविध मार्गांनी संकुचित अस्तित्व संपलेले भक्तश्रेष्ठ व योगी मुक्तात्मेदेखील तुच आहेस. तुला आदर पूर्वक प्रणाम असोत.

**४५३) सर्वज्ञः । सर्वज्ञाय नमः ।**

सर्व जाणणारा. सत्व, रज आणि तमोगुणी ज्ञान अविद्येला कारणीभूत होते.तू गुणातीत असल्याने प्रत्यक्षानुभूतीने एकत्व जाणणारा, अनुभवणारा व असलेला पूर्णज्ञानी आहेस. तसेच काल्पनिक ऐकीव पाहिलेले, अनुभवलेले व एकात्मतेने जगलेले अशा ज्ञानाच्या चढत्या श्रेणीच्या अतीत तुझे अशरीरी ज्ञान असल्यानेही तू महाज्ञानी आहेस. खऱ्या ज्ञानी अशा या तुला माझे साष्टांग दंडवत असोत.

**४५४) ज्ञानमुत्तमम् । ज्ञानाय उत्तमाय नमः । ज्ञानमुत्तमाय नमः ।**

वैश्विक एकात्मतेचं महासेतूरूप, महाशक्तिरूप, महाकेंद्ररुप प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे तूच. कारण सत्यज्ञानामध्ये ज्ञानी आणि ज्ञाता वेगळे राहत नाहीत. तमोगुणी ज्ञानामध्ये अत्यंत संकुचित, तुटपुंज्या व खालच्या पातळीवरील माहितीला सत्य समजण्याची गफलत असून या गफलतीचा हेका व दुराग्रह असतो. रजोगुणी ज्ञानामध्ये वैविध्याची दखल घेतलेली असते पण त्या विविधतेतून योग्य निष्कर्ष आणि बोध उत्पन्न होत नसतो. आणि सात्विक ज्ञानातून संपूर्ण विश्वाचे इंत्यभूत ज्ञान असून त्यातून एकत्वाचा स्पष्ट व शुद्ध निष्कर्ष काढलेला असतो. परंतु या तिन्ही ज्ञानप्रकारात ज्ञान व ज्ञाता यांचे

भिन्नत्व कमी-अधिक प्रमाणात अबाधित राहते. गुणातीत बनलेल्या सर्वस्वाचा होम केलेल्या भक्ताला जेव्हा तुझे ज्ञान होते तेव्हा तू व भक्त (विभक्त न राहिलेला तो भक्त) भिन्न राहत नाही म्हणून त्याला झालेले ते ज्ञान तुच आहेस. वैश्विक एकात्मता स्वतःच्या हृदयात स्पष्ट जाणवणे म्हणजे **स्वात्मीयता** म्हणजेच हृदयात होणारा तुझा अविष्कार. त्याचप्रमाणे अशरीरी आणि कालातीत व गुणातीत असलेला तू स्वतः ज्ञानी आणि जाणण्यास सर्वोत्तम असा ज्ञानमय असतोस, म्हणूनच तुला ज्ञानमुत्तमम् (उत्तमात उत्तम ज्ञान) म्हणतात. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**सुव्रतः सुमुखः सूक्ष्मः सुघोषः सुखदः सुहृत।**
**मनोहरो जितक्रोधो वीरबाहुर्विदारणः ॥**

### ४५५) सुव्रतः । सुव्रताय नमः ।

विश्वसंकल्पी अविरतपणे कार्यरत राहण्याचे निरंतन उत्तम व्रत आचरणारा आणि भक्तालाही अशी परमउत्कट, कल्याणकारी अवस्था प्रदान करणारा. तुला भावपूर्ण नमन असो.

### ४५६) सुमुखः। सुमुखाय नमः ।

उत्तम मुख असलेला. तसेच सुमुखः म्हणजेच गणेश, शिव, आचार्य, अनुकूल, सफेद तुळशी इत्यादी. सर्व सगुण रूपात तुझे मुख अत्यंत मनोरम असते. कारण भक्ताचे आत्मरूप असा तूच, त्यांना त्यांच्या आराध्यदैवताच्या सुंदर सगुणमरूपात दर्शन देत असतोस. तसेच ह्या सगुण मुखातून कधी यशोदामातेला ब्रह्मांडाचे दर्शन झाले. तर कधी भक्तांना गीता-ज्ञानेश्वरी आदी ब्रह्मविद्येचे अमृतप्रवाह मिळाले. ह्या तुझ्या सुंदर मुखांच्या निदिध्यासाने व भक्तीने तुझ्या निर्गुण निराकार रुपाची प्रचीतीही येते आणि निर्गुण मुखातून अनाहत ध्वनीच्या वाटे किंवा परावाणीच्या द्वारे तू भक्तहृदये आत्मज्ञानाने भरून टाकतोस ह्याची प्रचीतीही येते. तुझ्या भक्तांची जीवने आणि मुखेही तुझ्या गुणगौरवाच्या प्रासादिक सरितेने भरुन वाहू लागतात आणि अलौलिक तेजाने तळपून उठतात. तुझ्या अनुसंधानात तुला निरंतर वंदन असो.

### ४५७) सूक्ष्मः । सूक्ष्माय नमः । सर्वगतम् सूक्ष्मम् ।

सर्वांतर्यामी रिघू शकणारे ते खरे सूक्ष्मतम. चराचराच्या नव्हे तर घटनांच्या व काळाच्याही अंतर्यामी रिघणारे कालातीत ब्रह्म,विश्वाचे बीजरूप किंवा लिंगशरीर, साक्षात परब्रह्म शिव हे सारे तूच आहेस.म्हणूनच परिमाणातीत अशा तुला **सूक्ष्मः** म्हणतात. याचमुळे तू सर्व पाहतोस पण तुला कुणीही पाहत नाहीत. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**४५८) सुघोषः । सुघोषाय नमः ।**

पवित्र ध्वनी, श्रीकृष्णाचा शंख आणि विश्वोत्पत्तीच्या वेळेचा ओंकार आहेस, ब्रह्मविद्येचा हुंकार आहेस व भक्तहृदयाला जाणवणारा परावाणीचा मधुर नादही आहेस. तसेच भक्तांच्याद्वारे संपूर्णविश्व आत्मसंगीताने आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अवीट गोडीच्या हृदयंगम व्यवहाराने भरून टाकणाराही आहेस. तुला भक्तिपूर्ण वंदन असो.

**४५९) सुखदः । सुखदाय नमः ।**

सुख देणारा व सुख नष्ट करणारा. देहबुद्धी नष्ट करणारा व म्हणून देहबुद्धीमुळे उत्पन्न होणारी दुःखे नष्ट करणारा म्हणून तुला सुख देणारा म्हणतात. परंतु देहबुद्धी व अविद्येतून उत्पन्न होणाऱ्या क्षणभंगुर, नश्वर,संकुचित, क्षुद्र व पोरकट सुखांमधील स्वारस्यच नष्ट करणारा म्हणून तुला सुख नाहीसे करणारा असेही म्हणतात. ह्या दोन्हीं बाबी अगदी सत्य आहेत; कारण तु तुझ्या द्वंद्वातील अस्तित्वाच्या प्रचितीने अविनाशी आनंद आणि चिरंतन सुख देतोस आणि देहबुद्धीचा नाश करून देहबुद्धीद्वारे मिळणारे क्षणिक सुख (व सुखेच्छा) नष्ट करतोस. तुला विनम्र अभिवादन असो.

**४६०) सुहृत् । सुहृदे नमः ।**

सर्वांतर्यामि चिरंतन असणारा विश्वसनीय असा एकमेव अचल आणि अढळ आधार सखा तू आहेस. त्याचप्रमाणे सर्वतोपरी इतरांच्या कल्याणासाठी झटणारे तुझे भक्तही निष्कपट शुद्ध असे खरे सुहृत् आहेत. तुला भावपूर्ण प्रणाम असोत.

**४६१)मनोहरः । मनोहराय नमः ।**

सुंदर, आर्कषक आणि मनाचे हरण करणारा. तुझ्या आनंदमय प्रचितीद्वारे भक्तांची देहबुद्धी,अहंकार, व संकुचित असे मन तू आर्कषून घेतोस स्वतःमध्ये विलिन करतोस. अन्य दृष्ट्या तुझ्या निस्पृह भक्तांसाठी एकमेव चिंतनीय आणि वंदनीय वस्तू व मनोहर अशी आर्कषणाची बाब म्हणजे तू आहेस. तुला समर्पणवृत्तीने वंदन असो.

**४६२) जितक्रोधः । जितक्रोधाय नमः ।**

क्रोध जिंकलेला. तू षड्रिपुंच्या अतीत आहेसच. परंतु तुझे भक्तदेखील तुझ्याशी तद्रुप झाल्याने म्हणजेच तुझ्या भक्तिरसात बुडून गेल्याने व निर्गुण निराकार परब्रह्ममय झाल्याने षड्रिपुंच्या अतीत असतात. क्रोधादी विकार त्याना पाळीव पशुप्रमाणे वश झालेले असतात.आत्मज्ञानामुळे, अविद्या व अज्ञानजन्य अहंकार, संकुचितपणा, असुरक्षितता, भीती, मोह,आसक्ती, आशा, निराशा, दुःख, मत्सर,द्वेष, क्रोध व तज्जन्य हिंसेच्या ते अधीन होत नाहीत. अविद्या व मोहजन्य दुष्टचक्रापासून पूर्णतया स्वतंत्र

अशा तुला भावपूर्ण नमस्कार असोत.

**४६३) बीरबाहुः । बीरबाहवे नमः ।**

ज्याचे अशरीरी बाहु विश्वनियंते अनंत अविष्कारी आणि अत्यंत सामर्थ्यवान आहेत असा.तुझ्यापायी माझे लोटांगण असो.

**४६४) विदारणः । विदारायण नमः ।**

फाडणे, नाश करणे (अशा नाश करणारा). कल्पांताच्या वेळी विश्वाचे अंतरंगही फाडून ते स्वतःमध्ये विलीन करणारा आणि हिरण्यकश्यपूप्रमाणे देहबुद्धीमुळे मदांध झालेल्यांचे अज्ञान आणि संकुचित अस्तित्व संपवणारा असल्याने तुला विदारणः असे म्हणतात. तुला निरंतन नमन असो.

**स्वापनःस्ववशो व्यापी नैकात्मा नैककर्मकृत ।**
**वत्सरो वत्सलो वत्सी रत्नगर्भो धनेश्वरः ॥**

**४६५) स्वापनः । स्वापनाय नमः ।**

झोप आणणारा. स्वतः विश्वात्मक होणारा आणि स्वतःच अनंत सजीव-निर्जीव रूपांमध्ये अविद्या मायेच्या देहबुद्धीरुपी नेणीवेत (झोपेत) जगणारा. परंतू वेगळ्या दृष्टिने, भक्ताला आत्मज्ञान देणारा व त्याद्वारे देहबुद्धीजन्य संवेदनक्षमता व विकारवशता, अस्वस्थता बेचैनी, यांच्यापासून मुक्त करून योगनिद्रा व योगसमाधि (सर्व सांसारिक क्लेशांना चुकीचा प्रतिसाद न देण्याची क्षमता व अवस्था) प्राप्त करून देणारा. तुझ्या विषयीच्या जागृतीत व अन्य सर्व बाबीविषयींच्या सुषुप्तीत माझे तुला अखंड अभिवादन असो.

**४६६) स्ववशः । स्ववशाय नमः ।**

अशरीरी आणि कालातीत असा तू कोणत्याही बाबीच्या अंकित वा अधीन होत नााहीस म्हणून तुला स्ववशः म्हणजे केवळ स्वतःकरवीच स्वतःलाच वश झालेला असे म्हणतात. सारे विश्व म्हणजे तुझी जणु इंद्रियेच असल्याने आणि तू (कायम आत्मज्ञानतच मग्न असल्याने ) ह्या वैश्विक इंद्रियांनी कधीच प्रभावीत होत नाहीत. तसेच निस्पृह सुरक्षित आणि विशाल मनोवृत्तीमुळे क्षुद्र स्वार्थासाठी कुणालाही वश (भ्रष्ट) होत नाहीत. तुला अंतःकरणपूर्वक कृतज्ञ प्रणिपात असोत.

**४६७) व्यापी । व्यापिने नमः।**

विश्व, काळ व जाणिवेच्या सर्व पातळ्या व्यापणारा, नियंत्रित करणारा म्हणून

व्यापी. तुझ्या चिंतनाने भक्तही जणु चराचर होतो, त्याची दृष्टी आणि संकल्प अचूक आणि विश्वकल्याणकारी बनतात, किंबहुना मूठभर मेंदूत आकाश सामावतं आणि संकुचित व्यक्तित्वाचा स्वार्थ नष्ट होतो. भक्ताच्या क्षुद्र जीवनाची इतिश्री होते आणि तो ईश्वरमय चिरंतन परमानंदाचा झरा बनतो. तुझ्या अनुसंधानात तुला शतशः दंडवत असोत.

**४६८) नैकात्मा। नैकात्मने नमः।**

स्वतः एक असून विविध प्रकारच्या रूपात (अनेकत्वाने) साकार होणारा व भक्त, योगी, अवतारांच्या रूपातही अवतरणारा (म्हणून अनेक आत्मे असणारा). त्याचप्रमाणे चराचर, काळ आणि जाणिवेच्या सर्व पातळ्यांवरील अनेकविध आविष्कारांचा व योगी, अवतारी विभूतीचा एकमेव शुद्धतम आत्मा तू आहेस. तुला भक्तिपूर्वक नमन असो.

**४६९) नैककर्मकृत्। नैककर्मकृते नमः।**

अनेक प्रकारे, अनेक अवधानानी अनेक कृती करणारा. विश्वोत्पती, विश्वाचा वैविध्यपूर्ण विस्तार, विश्वाची व्यवस्था, विकास, संगोपन, विश्वाचा विलय अशी अनेक कार्ये अविरतपणे करणारा तू आहेस. व्यक्तीकडूनही विविधतेने पूर्ण अशी कार्ये करवून घेणारा स्फूर्तिदाता व खरा कर्ता तूच आहेस. तुझ्या स्मरणाने विश्वसंकल्पाची प्रचंड सेवा भक्ताच्या हातून तुझ्या कृपेमुळे घडते. तमोगुणाचा नाश करणाऱ्या व अखेर गुणातीत आत्मप्रचीती देणाऱ्या तुझ्या स्मरणात तुला अनन्यभावे लोटांगण असो.

**४७०) वत्सरः। वत्सराय नमः।**

ईश्वरी पार्श्वभूमी, आधार स्थान. वत्स म्हणजे पृथ्वीचा सूर्याभोवतीच्या परिभ्रमणाचा काळ. तू काळालाही व्यापणारा असल्याने या सर्व गतींचा नियंता आहेस.

त्याचप्रमाणे सगुण रूपात गवळ्यांना त्यांची वासरे शत्रूंपासून देणारा त्यांचा देव आहेस. कृष्ण आहेस. न्याय मिळवून देणारा .न्याय मिळवून देणारा आहेस. तुला अंतःकरणपूर्वक वंदन असो.

**४७१) वत्सलः। वत्सलाय नमः।**

वात्सल्यपूर्ण, प्रेमळ, कृपाळू. साऱ्या विश्वाचा व व्यक्तीचा उगम तुझ्यातून झाल्याने तू पिता व माता आहेस. सर्वांतर्यामी असल्याने, सर्वांना जाणणारा असल्याने व अविद्येतून चिरंतन सच्चिदानंदाकडे नेणारा असल्याने सर्वाधिक व कल्पनातीत कनवाळू गुरु व सखा आहेस. चैतन्यदायी अमृताने भक्तहृदये समृद्ध करणारा, त्यांची जीवने

सामर्थ्यवान करणारा व प्रभावीपणे त्यांचे संगोपन करणारा म्हणून प्रेमळ पालनकर्ताही आहेस. तुला कृतज्ञपूर्वक प्रणाम असोत.

**४७२) वत्सी। वत्सिने नमः।**

वत्सी म्हणजे पिता व वत्सी म्हणजे गाईच्या वत्सांचे पालन करणारा कृष्ण. विश्वाचा पिता तू आहेस. तसेच सगूण रुपात गाईच्या वासरांचे रक्षण करणारा तू आहेस. गाय केवळ पंचगव्य देणारी मनुष्य जीवनाला अत्यंत उपयुक्त पशु म्हणून नव्हे तर आध्यात्मिक जावनाला पोषक म्हणून तिला महत्त्व आहे. गार्यींचे सान्निध्य केवळ जीवशास्त्रीय समतोलासाठी नव्हे तर गर्यींच्या सात्त्विक वृत्तीसाठी व तज्जन्य सत्त्वगुणाच्या प्रभावासाठी महत्त्वाचे असावे अशी जाणीव अणि भावनादेखील सहजीवनाच्या उत्तुंग आदर्शाचा एक भाग आहे. गाय ही तेहतीस कोटी देवांचे स्थान आहे याचा अर्थ गाय ही बुद्धिनिरपेक्ष आत्मज्ञानाचे निधान व शारीरिक आधारस्थान असा आहे, मानवालाही तिच्या सहवासाने आत्मज्ञानाचा मार्ग सुकर होत असल्यानेच पंचगव्याला एवढे महत्त्व असले पाहिजे आणि द्रष्टे पुरुष गोहत्येच्या विरोधात व गोसंवर्धनात अग्रेसर असले पाहिजेत. गायीचा रक्षणकर्ता व पालनकर्ता कृष्ण, हे तुझे सगुण रुप प्रातःस्मरणीय आहे. तुला आदरपूवक नमस्कार असोत.

**४७३) रत्नगर्भः। रत्नगर्भाय नमः।**

कुबेर (ऐश्वर्यवान) व समुद्र (रत्नांचा खजिना), संपूर्ण वैश्विक ऐश्वर्याचा धनी (म्हणून कुबेर) आणि वैश्विक ऐश्वर्याची महान रत्ने सामावणारा कालातीत महोदधी(म्हणून समुद्र) तू आहेस. याशिवाय भक्तहृदये आत्मज्ञानच्या अतुलनीय अविनाशी ऐश्वर्याने भरणारा म्हणूनही तू ऐश्वर्यवान (कुबेर) व दातृत्ववान (कृपेचा महासागर) आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**४७४) धनेश्वरः। धनेश्वराय नमः**

साऱ्या चराचर विश्वाचा व कालचक्रांचा स्वामी, तसेच सच्चिदानंद आत्मज्ञानी म्हणूनही तू अविनाशी व श्रेष्ठतम वैभवाचा धनी आहेस. तुझ्या भक्तांना हे चिरंतन वैभव प्राप्त होते व अन्य कोणतीही इच्छा त्यांना उरत नाही (याचकता, कमतरता, आगतिकता राहत नाही) म्हणूनही तू धनेश्वर आहेस. तुझ्या प्राप्तीच्या एकमेव इच्छेत मस्तक सदा तुझ्या पायवर राहो.

**धर्मगुब्धर्मकृद्धर्मी सदसत्क्षरमक्षरम्।**
**अविज्ञाता सहस्रांशुर्विधाता कृतलक्षणः॥**

### ४७५) धर्मगुप् । धर्मगुपे नमः।

धर्माचा रक्षणकर्ता. आत्मज्ञानाधिष्ठित सनातन धर्माची भक्तांना जागृती देणारा व ती विकसीत करणारा आणि त्यायोगे खऱ्या विश्वधर्माचे रक्षण करणारा तूच आहे. तूच भक्तहृदयामध्ये आत्मसाक्षात्काराची अमर ज्योत पेटवून अतिमानवी प्रतिभा, विलक्षण घटना, उदात्ततम चारित्र्य, लोकोत्तर गुण, प्रभाव इत्यादी विविध मार्गानी विश्वधर्माचे रक्षण करतोस. सर्व प्रकारच्या देहबुद्धीजन्य अविद्येतून निर्माण होमाऱ्या अनावस्थेतून तूच विश्वसंस्कृतीचे सर्वोच्च अधिष्ठान म्णजेच आत्मप्रचीती भक्तांतर्यामी जागी करतोस. ती समृद्ध करतो, आविष्कृत करतोस व अशा तऱ्हेने विश्वधर्माचे (कडव्या, अतिरेकी, संकुचित आणि साचेबंद हिंस्त्र व घातक सांप्रदायिकतेपासून व उथळ उपयुक्ततावाद आणि पाशवी स्वैराचारापासून) संरक्षण करतोस. तुझ्याच कृपेने कळते की, स्नान करून मनाची आणि शरीराची शूचिर्भूतता पोथी, संकीर्तन, कीर्तन, पुराण, नमाज इत्यादी करताना आवश्यक असते. याचे कारण बेपर्वाई, आळस, संकुचितपणा, असहिष्णुता इत्यादींवर मात करून स्वतःशी अत्यंत प्रामाणिक राहण्यासाठी सर्वसाधारणपणे बहुतेकांना या

उपचारांची गरज असते. दारू पिऊन, चरस ओढून किंवा नेहमीच्या बेफिकीर, बेपर्वा, बेजबाबदार, बेदरकार किंवा उच्छृंखल व टवाळखोर वृत्तीमध्ये असताना सर्वसामान्य माणूस अंतरात्म्याशी प्रामाणिक राहू शकत नाही. ईश्वराची पूजा कोणत्याही धर्मातली असो तिच्यामध्ये अंतर्भूत असलेल्या शूचिर्भूततेचे मर्म हे असे आहे. त्याचप्रमाणे तुझ्याच कृपेने येणाऱ्या सत्याच्या प्रचीतीने विश्वातील सापेक्ष सत्यांची नीट कल्पना येते आणि प्रत्येक घटना, व्यक्ती वा वस्तूला योग्य महत्त्व देण्याचा विवेक साधतो.सर्वोच्च प्राधान्य कशाला द्यायचं कळू लागते. विविध संप्रदायांकडे पाहताना या बाबी समजल्या तर देवघर, पूजास्थाने, पूजापाठ, भक्ती, भजन-कीर्तन, नामसप्ताह यामागील मर्म आणि संबंधितांच्या खऱ्याखुऱ्या भावना जाणवू शकतील. सत्याची धारणा अशा प्रकारे क्षुल्लक व्यक्तीच्याही आवाक्यात आणणाऱ्या मुंगीला सूर्य गिळण्याची क्षमता देणाऱ्या व म्हणून धर्माचे सर्वतोपरी रक्षण करणाऱ्या तुला निरंतर दंडवत असोत.

### ४७६) धर्मकृत । धर्मकृते नमः ।

धर्माचरण करणारा. चराचराच्या गुणधर्मातून व्यक्त होणारे व्यवहार ही तुझीच रुपे असून अविरतपणे पाळतोस. मानवी समाजात विविध अवतार, संत, महात्मे, योगी,वीर यांच्या रूपात तूच अवतरतोस. तसेच लोकोत्तर ज्ञान, शक्ती व युक्तीच्या सहाय्याने **''आत्मनो मोक्षर्थ जगत् हितायच,'' ''वसुधैवकुटुंबकम''** अशी विशालतम दृष्टी

देणारा ज्ञानयुक्त विश्वधर्म आचरणात आणून दाखवतोस. तुला अखंड व अव्याहत नमन असो.

**४७७) धर्मी । धर्मिणे नमः ।**

धर्माचा आधार.  सारे व्यवहार, तदंतर्गत नियम (धर्म) आणि व्यक्तिजीवनातील इच्छाशक्ती, क्रियाशक्ती व ज्ञानशक्ती, इत्यादींच्या सुयोग्य व कल्याणकारी आविष्काराचा (धर्माचा) आधार (आत्मज्ञान म्हणजेच तुझे ज्ञान, तुझी प्रचीती म्हणजेच तू) तू आहेस. वंशद्वेष्टे, धर्मद्वेष्टे, आस्तिक, नास्तिक, विविध पूजापद्धती मानणारे, अवलंबणारे मतमतांतर भरकटलेले वगैरे सर्वांना उदात्त विश्वसंस्कृतीच्या गाभ्याकडे नेणारा अणि आत्मप्रचीतीतून येणारी निस्पृहता, विशाल उदात्त दृष्टी, उदार सहिष्णुता, खंबीरता अणि विश्वात्मकतेची अनुभूती अन् तज्जन्य आचरण यांच्याद्वारे भक्कम व चिरंतन आधार देणारा तूच आहेस.तुला शिरसाष्टांग दंडवत असोत.

**४७८) सत् । सते नमः ।**

कालातीत व कधीही न बदणारे शाश्वत तत्त्व. सामर्थ्यदायी, सर्वसत्ताधाीश आणि शाश्वत अशा तुझ्या स्मरणात तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**४७९) असत् । असते नमः ।**

जे मर्यादित, क्षणभंगुर, बदलते आहे किंवा जे सत् नाही ते. तू शाश्वत सत्य आहेस त्याचप्रमाणे अशाश्वत क्षणभंगुर असे असत् देखील आहेस याचा अर्थ तू असणे, बदलणे, नसणे या सर्व संकल्पनातून जाणवणाऱ्या अस्तित्वाच्या अतीत सर्व व्यापी अस्तित्व असलेला आहेस. सर्व नाशिवंत बाबीना तुझी लीला म्हटले जाते. विश्वाचे सर्व बदलते व चंचल असे सौंदर्य आणि विलोभनीय रुप ही तुझी लीला, तुझी माया, तुझे प्रतिबिंब आहे आणि यांचे ज्ञान (अविद्या ) हे देखील तुझीच लीला आहे. भक्तजन या लीलेकडे पूर्णपणे दंग होऊन पाहतात. पण ती तुझी लीला आहे तुझाच पैलू आहे, ह्या आठवणीने ते तुझ्यात समरस होतात. तुला त्रिवार वंदन असो.

**४८०) क्षरम् । क्षराय नमः ।**

नाश होणारा, रुपांतरित होणारा. कोणतीही वस्तू कधीही नाश पावते म्हणजे वास्तविक स्थित्यंतरित होते. म्हणून स्थित्यंतरानंतर अणि उत्पत्तीपूर्वी या वस्तूचे अस्तित्व असतेच. अर्थात हे उत्पत्तीपूर्वीचे अस्तित्व, उत्पत्तीनंतरचे अस्तित्व अखंड आहे तसेच नाश ह्या शद्बाने उघड होणाऱ्या ह्या अस्तित्वाला आणि या स्थित्यंतराना अंतर्बाह्य व्यापणारे व नियंत्रित करणारे तत्वही तुझ्यापासून भिन्न नसून तूच आहेस.

अशातऱ्हेने नाशाशी अतूटतेने निगडित असल्याने तुला **क्षरम्** म्हणतात. जीवनातील सर्व प्रकारच्या प्रसंगात, सर्व ठिकाणी, सर्व परिस्थितीत, संकटात, आनंदात, एकत्वाने अखंडतेने व नियंत्या भूमिकेत तू निगडित असतोस व ह्या जाणिवेने भक्तांना सर्व परिस्थितीत आनंदात ठेवतोस. तुझ्या स्मरणात जीवन व मरण प्राप्त होवो. तुझ्या चरणावर अव्याहतपणे लोटांगण असो.

**४८१) अक्षरम् । अक्षराय नमः ।**

अस्तिवाचे विविध स्तर विविध प्रकारे स्थळ व काळ व्यापतात. तू सजीव व निर्जीवांच्या अस्तित्वाचा असा स्तर आहेस जो त्यांचे अस्तिव, अस्तित्वाशी निगडित घटना, त्या घटनांमधील संबंध, घटनाना व्यापणारा काळ, काळाला व्यापणारे जाणिवांचे स्तर ह्या सर्वांना अंतर्बाह्य व्यापतोस व अनंत काळपर्यंत नियंत्रित करीत राहतोस. त्यामुळे तुला **अक्षरम्** असे म्हणतात. **क्षरम्** व **अक्षरम्** असे दोन्ही एकाच वेळी अखंडतेने असणाऱ्या तुला निरंतर प्रणाम असोत.

**४८२) अविज्ञाता । अविज्ञात्रे नमः ।**

न जाणणारा. एका पातळीवर ज्ञान व ज्ञात करून घेण्याची वस्तू यांना वेगळेपणाने जाणून वर्गवारी करता येते आणि त्यानुसार ज्ञानी व अज्ञानी अशी वर्गवारी करता येते. परंतु उच्च पातळीवर ज्ञाता, ज्ञान व ज्ञात करून घ्यायची वस्तू भिन्न राहत नाहीत. तुझे अस्तित्व सर्वोच्च पतळीवरील असल्याने तुला ज्ञान, ज्ञात करून घ्यावयाची वस्तू किंवा ज्ञात अशा कोणत्याच वर्गवारीत बसवता येत नाही. तुझ्या भक्तांनाही सत्यानुभूती (तुझे दर्शन) होताच ते तद्रुप होतात व त्यांचा ज्ञातेपणा शिल्लक उरत नाही. ते अहंकारमुक्त ज्ञानमय व ज्ञात होण्याची वस्तूदेखील होऊन राहतात. तुझ्याचरणी माझे सर्वस्व अर्पण असो.

**४८३) सहस्रांशुः । सहस्रांशवे नमः ।**

हजारो किरण असणारा. सारे विश्व, जीवन, शक्ती व चैतन्याने भरणारा सूर्य, आणि भक्तहृदये अमर ज्ञानाने भरणारा ज्ञानसूर्य तू आहेस. तुझ्या भक्तांची हृदयेही तुझ्या प्रचीतीने आत्मज्ञानाचे सूर्य बनतात. उदात्त जीवनाचे मळे फुलवताता तुला शिरसाष्टांग नमन असो.

**४८४) विधाता । विधात्रे नमः ।**

विश्वाचा आधार. विश्वाचा निर्माता, विकसनकर्ता व नियंता असल्याने तुला **विधाता**(विश्वाचा मूलाधार) म्हणतात. पारंपारिक अर्थाने आठ दिशांनी पृथ्वीची गती

व स्थिती निश्चित करणारे दिग्गज म्हणजे हत्ती(ऐरावत-पूर्व, पुंडरीक-पूर्व दक्षिण(आग्नेय), वामन-दक्षिण, कुमुद-दक्षिण पश्चिम(नैऋत्य), अजन-पश्चिम, पुष्पदंत-पश्चिमोत्तर (वायव्य), सार्वभौम-उत्तर, सुगतिक उत्तर पूर्व (इशान्य), आणि पृथ्वीला आधार देणारा शेष ही तुझी रुपे आहेत कारण हे सारे (प्राचीन भारतीय खगोलशास्त्रीय तपशील काहीही असला तरी) विश्वातील स्थिती-गतीचे नियंते या अर्थानेच वर्णिले जातात. वैयक्तिक पातळीवर अस्तित्वाचा व पराजाणिवेचा आधार तूच आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**४८५) कृतलक्षणः। कृतलक्षणाय नमः।**

पारंपरिक दृष्ट्या महर्षी भृगुच्या पायचे चिन्ह छातीवर असलेला. पण अन्य दृष्ट्या विश्वाची सर्व लक्षणे निर्मिणारा आणि त्याचप्रमाणे स्वतः वैभव, सामर्थ्य ज्ञान इत्यादी सर्वोत्तम लक्षणांनी युक्त म्हणून तुला **कृतलक्षणः** म्हणतात. आत्मस्वरुपाची लक्षणे परावाणीतून वर्णिली गेल्याने त्यांचा निर्माताही तूच आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**गभस्तिनेमिः सत्त्वस्थः सिंहो भूतमहेश्वरः।**
**आदिदेवो महादेवो देवेशो देवभृद्गुरुः॥**

**४८६) गभस्तिनेमिः। गभस्तिनेमिने नमः।**

किरणांचे केंद्र. साऱ्या विश्वाला जीवन देणारा, आत्मज्ञानाचा मार्ग दाखवणारा सूर्यनारायण तू आहेस. तसेच व्यक्तीच्या अंतर्यामी शाश्वत सत्यरुपाने जाणवणारा आत्मप्रचीतीचा प्रकाश आत्मज्ञानसूर्यही तूच आहेस. योग्यांना अनुभवास येणाऱ्या, षट्चक्र भेदन कुंडलिनी जागृती व शिवशक्तीचे मीलन (आत्मसाक्षात्कार ) यांचाही कर्ता तू आहेस. तुला आदरपूर्वक प्रणाम असोत.

**४८७) सत्वस्थः। सत्वस्थाय नमः।**

शाश्वत सत्यरुपाने सर्वाभूती राहणारा. अन्यदृष्टीने, सत्त्वगुणी लोक हे अधिक उत्क्रांत असल्याने त्यांच्या जाणिवेच्या तू निकट असतोस, त्याना जाणवतोस म्हणून सत्त्वगुणी राहणारा असाही अर्थ सयुक्तिक ठरतो. तुला साष्टांग नमन असो.

**४८८) सिंहः।सिंहाय नमः।**

अज्ञान व षड्रिपुंचा फडशा पाडणारा व्यक्तित्वांतर्गत सिंह तू आहेस, पारंपरिकदृष्ट्या सिंह म्हणजे तुझा नरसिंह आवतार. याचाही मथितार्थ संकुचितपणा व अज्ञानमूलक धर्मद्वेष. अज्ञानमूलक अहंमन्यता व माज आणि पाशवी वासनांचा नाश करणारा

असाच होतो. आज जगामध्ये कोणत्याही धर्मामध्ये, राष्ट्रामध्ये, विचारप्रणालीमध्ये किंवा समाजव्यस्थेमध्ये आणि जीवनाच्या कोणत्याही क्षेत्राकडे पाहिले तर एक बाब ठळकपणे जाणवते. ती म्हणजे आजचा व्यवहार शारीरिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, बौद्धीक अशा विविध प्रकारच्या तुलनेवर आधारलेला आहे. प्रत्येक सजीव वा निर्जीव अस्तित्वाला एका खास कारणपरंपरेची पार्श्वभूमी असते आणि ते अस्तित्व सर्वतोपरी स्वतंत्र व एकमेवाद्वितीय असते. या बाबींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे स्वतःच्या वैशिष्ट्यांबद्दल, कुवतीबद्दल पुरेशी जाण राहत नाही आणि दुसऱ्याशी तुलना करण्याचा व/वा स्पर्धा करण्याचा मोह होऊ लागतो. स्वतःच्या अंतर्यामीचे चिरंतन सत्य जाणून स्वतःच्या वैशिष्ट्यांचा लोककल्याणकारी आविष्कार करण्याऐवजी उंदीरस्पर्धेच्या मोहजालात व्यक्ती अडकत जाते. स्वतःची करिअर, शिक्षण, हौस, छंद वगैरे प्रत्येक बाब स्वातंत्रसुखाय केली न जाता दुसऱ्याशी मौजेची नव्हे तर जीवघेणी स्पर्धा करण्यासाठी केली जाते. नकळत स्वतःच्या अंतरात्म्याशी आणि व्यक्तिमत्त्वाशी प्रतारणा केली जाते आणि अवास्तव ध्येयापायी आयुष्यभराची आणि त्या त्या क्षेत्रातल्या बाजारबुणग्यांच्या क्षुद्रस्वार्थाची सोय केली जाते. भारतासारख्या देशांमध्ये उंदीर स्पर्धा, त्यामानाने कमी आहे. स्वतःची कुवत आणि वैशिष्ट्ये जाणून पुष्कळ व्यक्ती समाधानाने जीवन जगताहेत. पण जागतिक उंदीरस्पर्धेच्या वावटळीत अशा व्यक्ती तुझ्या कृपेशिवाय टिकू शकणार नाहीत. उंदीरस्पर्धेचा दुष्प्रभाव अत्यंत भयानक व तीव्र आहे व असणार आहे. व्यवहारातील साधी उदाहरणे पाहिली तर ही बाब लक्षात येईल. आज खेडूत लोकही स्वतःच्या रक्तशर्करेपासून ते स्वतःच्या फ्रीजपर्यंत आणि स्वतःच्या दिवाणखान्यातील गालीच्यापासून ते गाई-गुरांपर्यंत प्रत्येक बाबीकडे ' तौलनिकदृष्ट्या' पाहातात. स्वतःची उंची, रंग, आवाज, चालणे, बोलणे, प्रत्येक बाबीची तुलना केली जाते आणि क्षुद्र सुखदुःखांची सोय केली जाते. प्रत्येक बाबीत तथाकथित आंतरराष्ट्रीय 'प्रमाण' स्थापन होऊन त्या मृगजळामागे प्रत्येक जण वेड्यासारखा धावत सुटतो. समाजामध्ये सर्वतोपरी अनावस्था, अनागोंदी व विनाश आणणारी ही प्रक्रीया आहे. तुझ्या कृपेमुळे प्रथम स्वतःच्या गुणवैशिष्ट्यांचा आवाका व मर्यादा समजते आणि पुढे तुझी प्रचीती येते. स्वतःच्या व इतरांच्या गुणवैशिष्ट्यांकडे आंतरिक एकात्मतेच्या दृढ जाणिवेकडून पाहिले जाते. क्षुद्र व संकुचित व्यक्तित्वाच्या व तज्जन्न अढी, अहंकार, असूया, मत्सर, तिरस्कार, तुलना, स्पर्धा इत्यादींच्या भिंती कोसळतात. विषमतेचा जुलमी अंमल आणि समानतेचा देहबुद्धीजन्य हेका संपून स्वात्म्यभाव जागृत होतो. समाज समाज न राहता अनेक शरीरे असलेली एक व्यक्ती बनते. अपंगाचे अपंगत्व, काळ्याचा काळेपणा, रोग्याचा रोग, हुशाराची हुशारी सारे काही आंतरिक एकात्मतेच्या

तेजस्वी जाणीवेसमोर स्वात्म्यभावासमोर दुय्यम ठरते. कारण ती सारी एकात्म अस्तित्वाची विविधरुपी प्रतिबिंबे असल्याची प्रचीती येते. अशा तऱ्हेने त्यांचे संकुचित अस्तित्व नष्ट होताना सत्त्वगुणी आणि आत्मज्ञानी भक्तांना मात्र तुझ्या ह्या भयानक रुपामध्ये चिरकाल टिकणाऱ्या आनंदाचा दिलासा मिळतो. तुझ्याचरणी मस्तक कायम राहो.

**४८९) भूतमहेश्वरः । भूतमहेश्वराय नमः ।**

म्हणजे सर्वांतर्यामी राहून शारीरिक, मानसिक बौद्धीक व आत्मिक व्यवहारांचे नियंत्रण करणारा. अहंकार, आसक्ती , असुरक्षितता, असूया, द्वेष, क्रोय, लाभ, मोह, दुःख, क्रोध व तज्जन्य हिंसा यांचा, तुझ्या ज्ञानाने नाश होतो व चित्त शुद्ध होते. दृष्टी अचूक होते. वृत्ती सहिष्णु होते. मन समर्थ बनते. विचार व कृती कल्याणकारी होते. तुझ्या स्मरणात तुझ्या पायाशी निरंतर लोटांगण राहो.

**४९०) आदिदेवः । आदिदेवाय नमः ।**

अनादी असल्याने सर्वांच्या पूर्वीचा व सर्व अस्तित्वाला आत्मरुपाने प्रकाशित करणारा प्रमुख देव. तूच सर्वांची अविद्या व तज्जन्य क्षुद्र अहंकार नष्ट करून बद्ध-मुमुक्षूंना ईश्वरेच्छेच्या आणि साधक सिद्धांना आत्मानंदाच्या रुपात प्रचीती देतोस. भक्तांना शुद्ध प्रेम, योग्यांना समाधीसुख, ज्ञान्यांना त्यांच्या प्रज्ञाचक्षूंद्वारे सर्वज्ञता देणारा तर सद्यकाळी सर्वांनाच प्रेम, मानसिक शांती व समाधान, ज्ञान आणि सत्कार्यप्रवण सामर्थ्य देऊन विश्वकल्याण साध्य करणारा महान देव तू आहेस. तुझ्याचरणी कृतज्ञतेने मस्तक राहो.

**४९१) महादेवः । महादेवाय नमः ।**

शंकर, शिव, महान् देव, पवित्र देव. तू विश्वातील पावित्र्याचा उगम, पवित्रतम, शुद्ध ज्ञानमय, शुद्ध भावमय, षड्रिपुरहित, त्रिगुणातीत, वैराग्यधैर्य व वैराग्यसंपत्तीने युक्त असा महातेजोमय देवादिदेव आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**४९२) देवेशः । देवेशाय नमः ।**

देवांचा ईश्वर. विश्वातील देव अणि देवत्वाचा उत्पन्नकर्ता व नियंता. देव म्हणजे विश्वातील सत्शक्तीची अनेक पातळीवरील अस्तित्वे. देवत्व म्हणजे त्यांची वैशिष्ट्ये, त्यांची सत्ता. तू ह्यांचा स्वामी आहेस. तुला विनम्रभावाने प्रणाम असोत.

**४९३) देवभृद्गुरुः । देवभृद्गुरवे नमः ।**

इंद्राचा (मनाचा ) गुरु. वैश्विक पातळीवर विश्वाचे अंतरंग नियंत्रित करणारा व

व्यक्तीजीवनामध्ये व्यक्तीचे जीवन नियंत्रित करणाऱ्या मनाचे नियंत्रण करणारा. त्याला योग्य मार्गदर्शन करणारा शाश्वत सच्चिदानंमय गुरु. तुला साष्टांग दंडवत असोत.

**उत्तरो गोपतिर्गोप्ता ज्ञानगम्यः पुरातनः ।**
**शरीरभूतभृद्भोक्ता कपीन्द्रो भूरिदक्षिणः ॥**

### ४९४) उत्तरः । उत्तराय नमः ।

**उत्तरः** म्हणजे उंचावस्था, उच्च, नंतरचा वगैरे. अज्ञानातून उद्भवणारे दौर्बल्य व क्षुद्रत्व,संशयीपणा, शुद्ध स्वरुपाची प्रचीती देऊन तू दूर करतोस. विश्वाचे उत्तरदायित्व घेणारा या अर्थानेही तुला **उत्तरः** म्हणजे सयुक्तिक आहे. त्याचप्रमाणे विश्वाच्या अंतानंतरही राहणार म्हणूनही तू **उत्तरः** आहेस, तुला मी अनन्यभावे शरण आहे.

### ४९५) गोपतिः । गोपतये नमः ।

गायींचे व मनुष्याचे सहजीवन सर्व दृष्ट्या हितकारक असल्याने त्यांचा पालनकर्ता देव हजारो वर्षापासून विठ्ठल, व्यंकटेश, कृष्ण इत्यादी  अनेक रुपात पूजला जातो. सर्वात पूर्वी त्या देवाला पूष्यन म्हणत असत. मनुष्य समूहाचा उदात्त शहाणपणा व सुसंस्कृतता यांद्वारे अशा पूजेमध्ये तुझे प्रतिबिंब पडलेले दिसते. अन्य दृष्ट्या गो म्हणजे वाणी आणि वेद-ज्ञान. अंतर्यामीच्या शाश्वत सत्याची प्रचीती प्रथम प्रगट होते ती वाणीतून व वेदातून. ही वाणी व वेद प्रसवणारा व विकसित करणारा स्वामी म्हणूनही तुला **गोपतिः** म्हणणे योग्य आहे. वेगळ्या अर्थाने पहिल्यास गो म्हणजे पृथ्वी व पृथ्वी म्हणजे विश्वातील जड तत्त्व. म्हणून सर्व जड तत्त्वांचा चैतन्यमय आधार आणि नियंता म्हणूनही तू **गोपतिः** आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

### ४९६) गोप्ता । गोप्त्रे नमः ।

रक्षणकर्ता. साऱ्या विश्वाला स्वतःच्या अविनाशित्वामुळे तशाच अविनाशित्वाची हमी देणारा आणि अशीच अविनाशी अवस्था भक्तांना प्राप्त करुन देणारा(अविद्या, अज्ञान व संकुचित क्षुद्र अस्तित्व यांपासून संरक्षण व मुक्ती देणारा ) तूच आहेस. तुला आदरपूर्वक प्रणिपात असोत.

### ४९७) ज्ञानगम्यः । ज्ञानगम्याय नमः ।

संकुचित व्यक्तित्वापुरत्या मर्यादित वासना, भावना, विचार व कृती यांच्या पलीकडे गेलेल्यांना शुद्ध बुद्धीच्या द्वारे (अविद्याजन्य तर्कांने वा विचारांनी नव्हे ) ज्याचे शाश्वत अस्तित्व अंतर्बाह्य जाणवू लागते. असा तू आहेस. म्हणून तुला **ज्ञानगम्यः** म्हणतात. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**४९८) पुरातनः। पुरातनाय नमः।**

कालादिकांनीही अपरिच्छिन्न म्हणून तू पुरातनात पुरातन आहेस. भक्तांनाही त्यांच्या खऱ्या रुपाची जाणीव करुन देणाऱ्या तुला शतशः नमन असो.

**४९९) शरीरभूतभृत्। शरीरभूतभृते नमः।**

क्षणभंगुर शरीराचे स्वतःच्या पुरातन अस्तित्वातून पोषण करणाही माऊली. तुझ्या सामर्थ्याने पोसल्या जाणाऱ्या माझे तुला विनम्र प्रणाम असोत.

**५००) भोक्ता। भोक्त्रे नमः।**

शरीर आणि मनाचे भोग भोगणारा शरीरांतर्यामी आणि विश्वातील अनंत भोग भोगणारा विश्वांतर्यामीदेखील तुच आहेस. कोणतीही जड वस्तू ज्ञेय असू शकते. ज्ञाती नाही. शरीर शरीराला उपभोगत नाही. व शरीराचे संरक्षणही करीत नाही. भक्तांना या बाबीची सार्थ जाणीव होते व अंतर्यामी वसणारा तूच संरक्षक आणि भोगणारा आहेस याची निश्चिती होते. प्रत्येक जीवन ही एक सिस्टीम(संयंत्रणा) आहे. ती इक्विलिब्रियमला येत जाते, समतोल होत जाते. अर्थात् विश्वातील कोट्यावधी सिस्टीम्स परस्परपोषकतेने निरंतर अशा प्रकारे गतिमान राहणे हे त्यांच्या आधीन नसून सर्वव्यापी अन् परिमाणातीत अशा तुझ्या आधीन असते. म्हणून तुला **भोक्ता** म्हणणे समर्पक आहे. प्रत्येक जीवनाची संयंत्रणा तुझ्या ज्ञानापाशी इक्विलिब्रेट करणाऱ्या विश्वकल्याणकारी तुला भावपूर्ण नमन असो.

**५०१) कपींद्रः। कपींद्राय नमः।**

राम. वानरांचा अधिपती. आत्मज्ञानी व्यक्तीमधील पशुगुण कल्याणकारी बनतात ही जाणीव हनुमान ह्या तुझ्या प्रतिभेच्या पूजेत असावी. तसेच रामपूजेतही असावी. तात्त्विकदृष्ट्या पाहता पशुंच्या व पशु प्रतिमांच्या पूजेचे, आणखी एक कारण संभवते. ते म्हणजे स्वतःतील पशुवृती गोडीगुलाबीने स्वतःतील ईश्वरच्या आधीन राहवी. कारण पशुवृती ही त्याज्य नसून मानवी संस्कृतीला उपयुक्त आहे. फक्त ती अंतर्यामीच्या सच्चिदानंदाच्या अंकित असायला हवी. संपूर्ण जगाच्या प्राचीन संस्कृतीमध्ये पशु-पक्ष्यांची पूजा-आराधना विविध प्रकारे होत होती. एका दृष्टीने या प्राणीरुपी दैवतांमधील अद्भुतता तर्कदुष्टता दर्शवीत नसून मनुष्य व प्राणी यांच्यातील सहृदय व व्यापक एकोपा, एकत्व, परस्परपोषकता आणि उपयुक्तता दर्शविते. अध्यात्माच्या मार्गाध्ये नरसिंह, गरुड, नाग, हत्ती, सिंह, कासव, वराह, मासा, गाय असे पशु व वनस्पतींची जी अनेक प्रतीके येतात तेव्हा त्याचे कारण पर्यावरणातील परस्परपूरकता केवळ शारीरिक व भौतिक नव्हे तर आध्यात्मिक स्वाथ्य, समाधान व विकासास उपयुक्त ठरते ही जाणीव

होय. कारण प्राणी व वनस्पती यांचे (आणि पशुत्वाचे ) अस्तित्व जीवशास्त्रीय अस्तित्वासाठीच नव्हे तर सर्वांगीण उन्नतीसाठी (विश्वाच्या व व्यक्तीच्या)अ आवश्यक असते हे ऋषीना कळल्यामुळेच त्यानी शुद्ध आत्मरुपाला वश अशा पशु आणि पशुत्वाची विविध रुपात पूजा व आराधना केली. उदा. शंकराचे वाहन नंदी, विष्णूचे वाहन गरुड, दुर्गेचे वाहन वाघ, सरस्वतीचे वाहन मोर तसेच राम (आत्माराम ) भक्त हनुमान. अशी पुष्कळ उदाहरणे इतर धर्मामध्येही सापडू शकतील. तुला पुनःपुन्हा वंदन असो.

**५०२) भूरिदक्षिणः। भूरिदक्षिणाय नमः ।**

दक्षिणा देणारा. आत्मज्ञानाची श्रेष्ठ भेट (दक्षिणा ) विश्वाला देणारा तू आहेस. कारण यातून खरी यज्ञ संस्कृती (त्यागाधिष्ठित संस्कृती ) आणि महामना व महाज्ञानी कार्ये घडतात.ही कार्ये स्फूर्ती, प्रेरणा, दृष्टी, योजना, धोरणे, आणि कृती अशा कोणत्याही प्रकारची असली तरी उदात्त असतात आणि सर्व पंथ-पक्ष-धर्म-राष्ट्र-वंशातील सज्जनांना आर्तपणे जाणवतात, पटतात व अशा तऱ्हेने वैश्विक एकी व कल्याणास उपयुक्त ठरतात. त्याचप्रमाणे ही भेट (दक्षिणा ) भक्तांच्या आत्मज्ञानी कृतीतून (तुझ्या सेवेतून ) तुला प्राप्त होते. तुला विनम्र अभिवादन असो.

**सोमपोऽमृतपः सोमः पुरुजित्पुरुसत्तमः ।**
**विनयो जयःसत्यसंधो दाशार्हः सात्वतां पतिः ।।**

**५०३) सोमपः। सोमपाय नमः ।**

अंतःप्रज्ञा व तर्कप्रज्ञा यांच्या संयुक्त प्रभावातून शाश्वत सत्याशी समरस होण्याची प्रक्रिया म्हणजे यज्ञ. संकुचित असे सर्व काही, विश्वात्मक अस्तित्वात विलीन करताना (यज्ञ करताना ) उत्पन्न होणाऱ्या भावामृताचे प्राशन करणारा विश्वकल्याणकारी ईश्वर तुझ्याच कृपेने असा विश्वकल्याणकारी उदात्त व तेजस्वी यज्ञ संस्कृतीचे आविष्करण होते. आणि विश्व, उदात्त भावना, विचार, प्रचीती व कृतींनी भरुन जाते. तुला कृतज्ञ प्रणिपात असोत.

**५०४) अमृतपः। अमृतपाय नमः ।**

पारंपारिकदृष्ट्या समुद्रमंथनाने बाहेर आलेले अमृत पिणारा तू आहेस. तात्त्विक दृष्ट्या मंथनाचा मथितार्थ पाशवी व मानवी वृत्तीचे द्वंद्व असा आहे. वैचारिक, भावनिक, वासनिक द्वंद्वातून आत्मज्ञानाचा उदय होतो, आत्मामृत बाहेर येते. व्यक्तीच्या अंतर्यामी असणारा तूच हे अमृतपान करतोस म्हणून तुला **अमृतपः** म्हणतात. सार्वत्रिक पातळीवरदेखील विविध प्रकारच्या द्वंद्वांतून उत्पन्न होणाऱ्या वैश्विक जाणीवरुपी अमृताचे

पान व्यक्तिनिरपेक्ष, सच्चिदानंदमय असा तू निरंतर करतोस. त्याचप्रमाणे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे, सर्व विचारांचे, सर्व वंशांचे, सर्व देशांचे लोक ह्या ना त्या प्रकारे प्रार्थना करतात तेव्हा त्या भक्तिप्रेमामृताचं प्राशन करणाराही तूच आहेस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**५०५) सोमः। सोमाय नमः ।**

या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. वारा, चंद्र, सोमवेलीचा रस, पाणी इत्यादी. महत्त्वाचा अर्थ अमृत आहे. विश्वातील अमरत्व, आध्यात्मिक शीतलत्व, चराचरांच्या परस्परसंबंधातील ऋजुता व उदात्त भावना, स्त्री-पुरुष, धन-ऋण आदी द्वंद्वांदरम्यानचे द्वंद्वातीत शाश्वत तत्त्व आणि ह्या तत्त्वाचे गुह्य, गमक व सत्त्व तू आहेस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**५०६) पुरुजित् । पुरुजिते नमः ।**

अनेकांना जिंकणारा किंवा एकत्वाने अनेकत्वावर मात करणारा. विश्वातील सर्व चराचरांना एकत्वात बांधणारा व एकत्व चिरंतन विजयी करणारा. असंख्य द्वंद्वांतूनही एकत्वाचे शाश्वत अस्तित्व निरंतरपणे निश्चित करणारा. त्याचप्रमाणे तुझ्या शाश्वत एकत्वाचे अचूक ज्ञान भक्तांना करुन देणाराही तूच आहेस. ह्या एकत्वाच्या खात्रीतूनच जगातील शेकडो प्रकारचे लोक आत्मज्ञानी लोकांच्या मार्गदर्शनाखाली स्वात्म्याधिष्ठित एकत्वाधिष्ठित वैविध्यपूर्ण विश्वसंस्कृतीकडे विजयी वाटचाल करु शकतात आणि तुझ्या कृपेने शाश्वत एकत्व, आणि त्याचे शुद्ध ज्ञान विश्वाच्या खऱ्याखुऱ्या जिव्हाळ्याच्या व सौहार्दपूर्ण एकीमध्ये आविष्कृत करु शकतात. तुझ्या कृपेने सारे समुदाय परस्परांच्या अंतरंगाना शाश्वत एकात्मतेने बांधणाऱ्या तुझ्या अनुभूतीने कृत्रिम भौगोलिक विभाजन, राजकीय वेगळेपण, आर्थिक परस्परविरोध आणि सर्व प्रकारची बाह्य भिन्नता दुय्यम करून मूलभूत एकीची भावना आणि जिव्हाळा प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी एकत्र येऊन खंबीर योजना आखू शकतात. विविध परंपरा, आचारविचार, रुढी जर कटूता वाढणारी व तज्जन्य अन्याय हिंसा फोफावणारी शस्त्रास्त्रे बनू लागली तर त्या शस्त्रांस्त्रांचा नाश करण्यासाठी किंवा त्यांची संहारशक्ती नष्ट करून त्यांना दिवाणखान्यातील निरुपद्रवी खेळण्यांचे रुप देण्यासाठी विशेष प्रयत्न करू शकतात. शाश्वत एकीची अनुभूती देणाऱ्या विश्वकल्याणकारी तुला विनम्र अभिवादन असो.

**५०७) पुरूसत्तमः । पुरुसत्तमाय नमः ।**

सर्व महानतम तत्त्वांपेश्रा आणि विभूती अवतारांपेक्षाही उत्तोमत्तम. तू सर्वोतोपरी

व सर्वदृष्ट्या सर्वोत्कृष्ट आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**५०८) विनयः । विनयाय नमः ।**

याचा एक अर्थ नम्र व दुसरा चुका करणाऱ्यांना दुय्यम स्थान देणारा. संपूर्ण ज्ञात् विश्वाच्या तुलनेत तू अदृश्य आहेस आणि त्यामुळे अविद्येच्या पगड्यामध्ये असणाऱ्यांना त्यांच्या प्रचितीस न येऊन देणे त्याला न 'भेटून' खालचे स्थान देणारा आहेस (ज्यामुळे ते केविलवाणे होतात). अन्य दृष्ट्या स्वतःस सहजगत्या प्रगट न करणारा म्हणूनदेखील तू विनयी आहेस. वैयक्तिक पातळीवर पाहता तुझ्या प्रचीतीने आत्मसाक्षात्काराची व तद्रुप झालेले योगी, संत, महात्मे स्वतःच्या संकुचित अस्तित्वाला तुझ्याचरणी अर्पण करतात व कमी लेखतात. त्याचबरोबर त्यांच्या नैसर्गिक सहिष्णुतेमुळे अनाग्रही इच्छा, विचार, भावना आणि कृती षड्रिपुंच्या बंधनात सापडलेल्यांना सक्ती न करता पराधीन दुय्यम स्थानी जगण्यास मोकळे सोडतात. तुला मनोभावे नमन असो.

**५०९) जयः । जयाय नमः ।**

सूर्य, विजय, नियमन, निग्रह, सिद्धी इ. साऱ्या विश्वाचे अचुकतेने नियमन आणि नियंत्रण करणारा (अर्थात, स्वतः इतर कशातही नियमबद्ध न होणारा). त्याचप्रमाणे वैयक्तिक पातळीवर जीवनातील प्रत्येक कृती व भावनाप्रत्यक्षपणे नियंत्रित करणाराही तू आहेस. ज्या भक्तांची प्रत्येक कृती तू थेट नियंत्रित करतोस त्यांची कृती इतर कोणत्याही शुद्ध लाभाच्या विचाराने होत नाही. तुला भावपूर्ण वंदन असो.

**५१०) सत्यसन्धः । सत्यसंधाय नमः ।**

सत्य संकल्प असलेला. तुझे अशरीरी अस्तित्व, इच्छा, कृती, प्रत्यक्ष परिणाम, या परिणामांतर्गत तुझी प्रचिती हे सर्व अज्ञानविरहीत शाश्वत आहे. म्हणून सत्यसंकल्पी, सत्यव्रती, सत्यमय व सत्यज्ञानी असा तू आहेस. स्वतःच्या भक्तांना हीच प्रचीती देणाऱ्या तुला आदरपूर्वक प्रणाम असोत.

**५११) दाशार्हः । दाशार्हाय नमः ।**

दाशार्ह : नावाच्या यादवकुळी उत्पन्न झालेला. हे तुझे कृष्ण रूप. अन्यष्ट्या **दाशार्हः** म्हणजे स्वतःचे भासणारे सर्वकाही भक्तिभावपूर्वक ज्याच्या चरणी समर्पित करावे असा. तुला विनम्र अभिवादन असो.

**५१२) सात्वतां पतिः । सात्वतांपतये नमः ।**

सात्वतांचा म्हणजेच भागवत लोकांचा ईश्वर. तू भागवत तंत्राचाही (भगवद्प्राप्तीच्या तंत्राचा, साधनाचा, मार्गाचा) निर्माता व विकसनकर्ता असल्याने तुला **सात्वतांपतिः**

म्हणतात. पतितांचा उद्धारकर्ता अशा तुला साष्टांग दंडवत असोत.

**जीवो विनयितासाक्षी मुकुन्दोऽमितविक्रमः ।**
**अम्भोनिधिरनन्तात्मा महोदधिशयोऽन्तकः ॥**

**५१३) जीवाः । जीवाय नमः ।**

विश्वांतर्यामीच्या चराचरातील चैतन्य, सजीवता वा प्राणशक्ती, क्षेत्रज्ञ म्हणून जीव धारण करणारा जीवात्मा, ह्या साऱ्या रुपांतर्गत असणारा आणि सर्वांना सामावणारा तसेच ज्ञानाच्या सर्व पातळ्याही सामावणारा ज्ञानसागर असा ईश्वर तू आहेस म्हणून तुला **जीवः** आणि बृहस्पतीही म्हणतात. माझे चित्त तुझ्याचरणी लीन राहो.

**५१४) विनयिता साक्षी । विनयितासाक्षिणे नमः ।**

अविद्येमुळे उत्पन्न होणारा अहंकार, दुराभिमान, माज तुझ्या प्रचीतीने नष्ट होतो. तुझ्याकडे कर्तेपणा असल्याचे जाणून भक्त विनयशील होतो. शारीरिक, आर्थिक, बौद्धिक, वैचारिक, सामाजिक, राजकीय, जातीय, वांशिक, धार्मिक अशी कोणतीही मिजास वा न्यूनगंड उरत नाही. ह्या ज्ञानमय पवित्र अवस्थेचा कारक व साक्षी तूच आहेस. तूच अंतर्यामी राहून हे पाहतोस. तुला कृतज्ञ प्रणिपात असोत.

**५१५) मुकुन्दः । मुकुन्दाय नमः ।**

मुक्ती देणारा.अविद्येमध्ये बद्ध व म्हणून काळाधीन अशा परतंत्र अस्तित्वापासून व्यक्तीला काळातीत, स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र अशा अस्तित्वाची प्राप्ती आणि त्या प्राप्तीची प्रचीती देणारा तू आहेस. हे अमर अस्तित्व व्यक्तीच्या संकुचित व्यक्तित्वाच्या कोणत्याही शृंखलानी आणि भिंतीनी बांधलेले वा कोंडलेले नसते. व्यक्तीचे अंतरंग प्रकाशणाऱ्या आणि तिच्या सर्वव्यापी अशा या अमर अस्तित्वाची जाणीव व प्राप्ती तिला करुन देणाऱ्या तुला निरंतर अभिवादन असो.

**५१६) अमितविक्रमः। अमितविक्रमाय नमः ।**

विश्वातील अनंत घटनांमध्ये अचूक अशा वैश्विक तालबद्धतेने वावरणारा आणि सर्वत्र पोचणारा, सारे काही पादाक्रांत करणारा. साऱ्या सुनियंत्रित घटना म्हणजे तुझाच तालबद्ध पदन्यास आहे, वैश्विक नृत्य आहे, ज्यामध्ये कोणीही कधीही अडथळा आणू शकत नाही. तुला सविनय प्रणाम असोत.

५१७) **अंभोनिधिः । अंभोनिधये नमः ।**

महासागर. जीवनचैतन्य, चिदाकाश, काळ आणि जाणिवे अतीत ज्ञानाचा साठा

अणि एकंदरीत सर्व चराचर विश्वच ज्याच्या पोटी साठवले आहे असा महासागर म्हणून तुला **अंभोनिधिः** म्हणतात. तुझ्या कल्पनातीत व्यापक, सर्वसमावेशक अजरामर अस्तित्वाला साष्टांग नमन असो.

**५१८) अनन्तात्मा । अनंतात्मने नमः ।**

अगणित रुपांमध्ये असणारा पण रुपे नष्ट झाली तरी अनंतकाळपर्यंत राहणारा व काळ, देश, वस्तू सर्वांच्या अतीत असणारा तू आहेस. शरीर ज्याप्रमाणे त्याला अंतर्बाह्य व्यापणाऱ्या पोकळीला भेदू शकत नाही त्याचप्रमाणे चराचर विश्व त्याला अंतर्बाह्य व्यापणाऱ्या तुला भेदू शकत नाही. विश्वातील कोणतीही बाब तुला भेदू शकत नाही वा तुझ्यामध्ये रिघू शकत नाही. तुझ्या भक्तांना त्यांच्या खऱ्या स्वरुपाची म्हणजेच अनन्तात्मा अशा तुझी चिरंतन प्रचीती देणाऱ्या तुला अखंड अभिवादन असो.

**५१९) महोदधिशयः । महोदधिशयाय नमः ।**

महासागरामध्ये झोपणारा. विश्वनिर्मिती म्हणजे घटनांची कालपटलावरील विशिष्ट मांडणी वा रचना होय. असंख्य घटनांचे एकदम संघटनात्मक प्रक्रियांच्या दिशेने निगडित असणे विश्वनिर्मितीमध्ये प्रतीत होते, परिणत होते. घटनांची रचना संघटनाच्या दिशेने आणि विरुद्ध दिशेने अशा दोन्ही दिशांनी निगडित असणे म्हणजेच विश्वस्थिती चालू राहणे. आणि घटना विघटनात्मक नाशात्मक प्रक्रियांच्या दिशेने एकदम घडणे म्हणजे विश्वसंहार. ह्यानंतर काहीही न घडणे म्हणजेच घटनांचे निगडितपण नष्ट होणे ही वैशिष्ट्यपूर्ण स्तब्धावस्था असून हिलाच महोदधिशय म्हणणे अचूक दिसते. हिच्यामध्ये (स्तब्ध ) असणारा आणि पुन्हा घटनांना निगडित करुन विश्वनिर्मिती करणारा अशा तुझे महासागरातील वटपत्रावर झोपणारा बाळकृष्ण हे गोजिरवाणे रुप आहे. विश्वस्थित्यंतरे अनेकविध प्रकारे प्रत्यक्षात आणणारा परंतु स्वतः त्यांच्या अंतर्बाह्य असूनही त्यांनी लिप्त न होणारा म्हणून तुला झोपणारा, योगनिद्रेत असणारा म्हणतात. ह्या तुझ्या स्वरुपाशी एकत्वाची व समरसतेची प्रचीती येणारा (केवळ माहिती असणारा नव्हे ) भक्त, योगी स्थितप्रज्ञ असतो. तुला निरंतर भावपूर्ण वंदन असो.

**५२०) अंतकः । अंतकाय नमः ।**

अंत घडवून आणणारा, मृत्यू, विश्वातील असंख्य स्थित्यंतरे अत्यंत बारकाईने अभ्यासल्यास प्रत्येक स्थित्यंतरादरम्यानचे सूक्ष्मातिसूक्ष्म अस्तित्व लक्षात येते. अशाच अभ्यासातून कोणत्याही पदार्थाचा नाश होत नाही फक्त स्थित्यंतर होते असे म्हणतात. अविकसित बुद्धीला मात्र स्थित्यंतरांदरम्यानचे अस्तित्व (ज्याच्याद्वारे भूत, वर्तमान व भविष्यकाळातील लाखो स्थित्यंतरे अखंडपणे जोडली जातात व नियंत्रित

होतात आणि एकाच वेळी घडणारी असंख्य स्थित्यतंतरेही जोडलेली असतात ) आकलन होत नाही. वेगळ्या पातळीवरुन पाहिल्यास जर कोट्यावधी मनुष्य अत्यंत थोड्या काळात जन्माला आले तर लोकसंख्येचा स्फोट झाला असे म्हणतात आणि अगदी कमी अंतराने कोट्यावधी लोक मृत झाले तर साथ आली म्हणतात. विश्वाच्या बाबतीतही पुष्कळ घटना (Entropy) च्या विरुद्ध दिशेने घडल्या तर तर विश्वनिर्मिती व (Entropy) च्या दिशेने घडल्या तर विश्वप्रलय झाला असे म्हणतात. मूलतः ह्या साऱ्या घटना व त्यांच्या दरम्यानचे त्याना नियंत्रित करणारे तत्त्व अनुक्रमे प्रकृती व पुरुष(शक्ती व शिव, लक्ष्मी व विष्णू वगैरे) अमरत्वाने ही क्रीडा करीत असतात. हेच वैश्विक नृत्य होय. त्यामुळेच मृत्यू (स्थित्यंतर ) चा कारक अशा तुझे **अंतकः** हे नाव सार्थ आहे. अन्य दृष्ट्या प्रत्येक भक्ताचे संकुचित अस्तित्व, क्षुद्र व्यक्तित्व तू संपवतोस व शुद्ध बुद्ध्यात्मक अशा त्याच्या अस्तित्वात त्याला स्थित्यंतरित करतोस म्हणूनी तुला **अंतकः** म्हणतात. तुला शतशः दंडवत असोत.

**अजो महार्हःस्वाभाव्यो जितामित्रः प्रमोदनः ।**
**आनन्दो नन्दनो नन्दः सत्यधर्मा त्रिविक्रमः ॥**

### ५२१) अजः । अजाय नमः ।

जन्मरहित. (तू ) अखंडतेने सर्व अवकाश आणि काळ व्यापून असल्याने Entropy च्या विरुद्ध दिशेने स्थितंतरीत होत नाही म्हणजेच नाश पावत नाही आणि Entropy च्या दिशेने स्थितंतरित होत नाही म्हणजेच जन्म पावतही नाही. दुसऱ्या अर्थाने अज म्हणजे विष्णूचा पुत्र प्रद्युम्न कामदेव, हे सगुण रूप परमात्मोद्भव असा जो काम आहे, त्याचे आहे. विश्वनिर्मिती स्थिती व संहाराचा अशरीरी संकल्प म्हणजे काम होय, तुला अज म्हणतात ते या अर्थाने. वैयक्तिक पातळीवर जीवात्म्याच्या संकल्पाने पुनर्जन्माचे चक्र आणि चंक्रांतर्गत वासना, भावना, विचार, कृती यांचे आवर्त चालू राहतात. जीवात्मा व त्याचा संकल्प ही नियंत्रक रूपेदेखील तुझीच आहेत. म्हणूनच कर्तेपण ईश्वराकडे आहे, हे भक्तिमार्गाचे महान् तत्त्व जाणून सर्व पाप-पुण्य ईश्वरार्पण करणे अत्यंत नैसर्गिक, सुयोग्य व सुसंबद्ध व तर्कसंगतदेखील आहे. कोणत्याही साधनाचा कितीही बारकाईने अभ्यास केला तरी उदात्त विश्वसंस्कृतीची उज्ज्वल पहाट आत्मरंगी रंगलेल्या भक्तांच्या प्रचीतीपूर्ण भगवत्प्रेमातूनच उजाडणार आहे. कारण सर्व साधनांची सर्वोत्कृष्ट परिणती भक्तिमार्गातच आहे. कामदेव रूपातील (आविष्कारातील) तुझी प्रचीती काटेकोर, असहिष्णु, कडव्या, रूक्ष, बोजड, अवाजवी अशा सर्व थोतांडमय साधन व्यवहारांना फाटा देते आणि व्यक्तीच्या अस्तित्वाच्या कोणत्याही पैलूला ठेचून न टाकता भक्तिप्रेमाद्वारे आत्मरूपामध्ये आनंदसाम्राज्याचा अधिपती बनवते, नव्या

युगाचा आनंदयात्री बनवते. तुला मनोभावे नमन असो.

**५२२) महार्हः । महार्हाय नमः ।**

महापूजेच्या योग्य असा. सर्व विश्व व्यवहार आणि विश्वातील मनोव्यापार तुझ्या कृपेने अंतिमतः तुलाच प्राप्त होतात. म्हणून विश्वाद्वारे ज्याची सर्वश्रेष्ठ पूजा (कळत-नकळत) अव्याहतपणे चालू असते असा तू आहेस. तसेच प्रत्येक व्यक्तीचीही अत्यंत प्रामाणिक व उत्कट भक्तिभावना तुझ्याशी चिरंतनपणे निगडित असते, हे सत्य आहे. त्यामुळेही तू पूजनीय आहेस. तसेच विश्वामध्ये सारे काही अस्थिर व चंचल आणि म्हणून अविश्वासार्ह असून ते सर्व तुझ्या तंत्राने, तुझ्या सत्तेने चालत असल्यामुळेही स्थिर असलेला असा केवळ तूच संपूर्णतया विश्वासार्ह आणि पूजनीय आहेस. तुला निरंतर प्रणाम असोत.

**५२३) स्वाभाव्यः । स्वाभाव्याय नमः ।**

आत्मभावी दृढ असणारा. पवित्र आत्मरूपापासून कधीही विचलित न होणारा, कधीही अज्ञ पातळीवर न येणारा, परात्मभावी न अडकणारा, स्वतःसिद्ध व स्वयंभू परमेश्वर तू आहेस. तू परोत्पन्न नाहीस, परावलंबी नाहीस, परप्रभावी नाहीस. भक्तांनाही आत्मरंगी रंगवणारा, स्वरूपस्थितीची प्रचीती देणारा अशा तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**५२४) जितामित्रः । जितामित्राय नमः ।**

अमित्र म्हणजे शरीरांतर्गत आणि बाहेरील शत्रू. त्यांच्यावर विजय मिळवणारा, त्यांना कह्यात ठेवणारा. तुझ्या अखंड स्मरणात शिर तुझ्या चरणांवर लीन राहो.

**५२५) प्रमोदनः । प्रमोदनाय नमः ।**

आनंदी. स्वात्मामृताच्या प्राशनाने सतत स्वर्गीय आनंदात रमणारा, हर्षयुक्त आणि भक्तहृदयात अवतरून त्यांचे अंतरंग चिरंतन परम उल्हासाने भरणारा. तुला शतशः नमस्कार असोत.

**५२६) आनंदः । आनंदाय नमः ।**

तू शुद्ध व शाश्वत असा आनंद आहेस व अशा टिकाऊ आनंदाची प्रचीती ही तुझ्या प्राप्तीचे लक्षणही आहे. भक्तांना आनंदरूपाने दिलासा देणारा व दुश्चित लोकाना त्यांच्या मार्गभ्रष्टतेची जाणीव देणारा अशा तुला विनम्र अभिवादन असो.

**५२७) नंदनः । नंदनाय नमः ।**

भक्तहृदय ब्रह्मानंदाने भरणारा. भक्तांच्या सर्व वासना, भावना व विचार उत्क्रांत,

उन्नत आणि उत्तम बनवणारा व अनेक रूपानी त्यांचे हृदय अखंड आनंदाने उचंबळून टाकणारा सुखाचा महास्रोत तू आहेस. मातृहृदयाला पुत्रप्राप्ती, पुत्रप्रेमाच्या रूपात तर बालकाला मातेच्या वात्सल्याच्या रूपात अन् अशा अनेक आविष्कारात सर्व सजीवांचे जीवन आनंदमय करणारा तूच आहेस. तुझ्या भक्तिप्रेमाचे कायमचे व एकमेव बंधन म्हणजेच जीवनमुक्ती, सर्वोच्च जीवन. तुझ्या भक्तीमध्ये चित्त तुझ्याचरणी कायम लीन राहो.

**५२८) नंदः । नंदाय नमः ।**

संकुचित सुखाच्या अतीत असणारा (शाश्‍वत सुखाचा झरा). तू शाश्‍वत आनंदरूपाने विश्वातील सर्वांचा पोषणकर्ता आणि पालनकर्ता आहेस. भक्तांना याची प्रचीती येते. श्रीकृष्णाचा म्हणजेच शाश्वत आनंदाचा पिता ज्याने कृष्णरूपी शाश्वत आनंद जगाला दिला तो नंद हे सगुण रूप तुझंच व त्यातून हाच मथितार्थ निघतो. तुला साष्टांग नमन असो.

**५२९) सत्यधर्मा । सत्यधर्माय नमः ।**

शाश्‍वत सत्य नियम, ज्यानुसार विश्व चालते व जे आत्मसाक्षात्कारानंतर प्रचीतीस येतात. तू सनातन, सत्य आत्मज्ञानरूपी व चिरंतन असा विश्वधर्म आहेस. सर्व रीतीभाती, नीतीनियम, शिष्टाचार, कायदे, पक्षसंघटना, सरकारे, नियम, संकेत कर्मकांडे इत्यादी वैचारिक संघटनांची वा धर्मसंप्रदायांची अंगे मूलतः मुक्तीसाठीची साधने असूनही तमोगुणाच्या प्रभावाने कालांतराने घातक अशा शृंखलांमध्ये रूपांतरित होतात. ज्या घरांमध्ये संरक्षण व सोयी मिळायच्या तीच घरे मृत्यूचे सापळे बनावेत तसे होते. अशा परिस्थितीत कधी कुठे धर्मसंप्रदायांच्या विरोधात गदारोळ उठतो, संकुचित व क्षुद्र व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रचंड उदो उदो होतो तर कधी कुठे जुन्याच कालबाह्य तथाकथित धार्मिक जोखडांचे पुनरुज्जीवन करण्याचा म्हणजेच व्यक्तीच्या मुक्तीचा वाटा बंद करण्याचा कडवा प्रयत्न होतो. आज हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, जडवादी नास्तिक इत्यादी सर्व धर्मांच्या/विचारसरण्यांच्या अनुयायांपैकी पुष्कळांचा प्रवास असा चुकीच्या दिशानी चालू आहे. धर्मसंप्रदायांमधील अट्टहासाच्या विरोधात तंत्रज्ञ व उद्योजक उभे राहतात तर धर्मसंप्रदायांच्या नीती-नियमांच्या आणि सामाजिक-आर्थिक व्यवहाराच्या विरोधात (धर्मसत्तेच्या विरोधात) समाजशास्त्रज्ञ, विचारवंत, राजनीतिज्ञ उभे राहतात. याउलट व्यक्तीवादी चळवळींच्या परंपराविरोधी चळवळींना तथाकथित धर्मवादी आव्हान देतात. परंतु जोपर्यंत तुझ्या प्रचीतीने ह्या सर्व धर्मसंप्रदाय समर्थक आणि विरोधकांची **संकुचितता नष्ट** होत नाही तोपर्यंत सध्याचे गोंधळाचे आणि हिंसेचे वातावरण राहणे साहजिकच आहे, अटळ आहे. सर्व व्यक्तींच्या आत्मोन्नतीला

पोषक, उपयुक्त असे दृष्टिकोन, धोरण, योजना, कायदे, नियम, संकेत, प्रघात, आचार, विचार (वातावरण) व व्यवहार उत्क्रांत होणे हेच सत्यधर्माचे एकमेव लक्षण आहे व तुझ्या प्रचीतने ते घडू शकते. सत्यधर्मरूपी अशा तुझ्या प्रचीतीने घडणारे हे शाश्वत आनंददायी स्थित्यंतर सर्वप्रकारच्या **कोंडमारा करणाऱ्या बंधनांपासून** आणि सर्व प्रकारच्या स्वैराचाराच्या **दबावापासूनही मुक्त** असेल. अनाग्रही व सहजस्फूर्त अशी एकी आणि अत्यंत सहिष्णु अशी विविधता यांचा सुरेख व मनोहारी संगम या स्थित्यंतरात असेल. त्याचप्रमाणे पशुत्वाची व संकुचितत्वाची परिणती आत्मसाक्षात्कारात करण्याचे कटुताविरहित समतोल व कणखर प्रयत्न हे सत्यधर्माचा व्यावहारिक आविष्कार अशा या स्थित्यंतराचा अविभाज्य भाग असतील. विश्वकल्याणकारी व सत्यधर्मरूपी तुला शतशः दंडवत असोत.

**५३०) त्रिविक्रमः । त्रिविक्रमाय नमः ।**

वामनाच्या सगुण रूपामध्ये तीन महान पावलांत विश्व व्यापणारा परंतु तात्त्विकदृष्ट्या पदार्थ, ऊर्जा, अवकाश, काळ व जाणिवांची सर्व क्षेत्रे पादाक्रांत करणारा. सर्व संचारी अशा तुला निरंतर वंदन असो.

**महर्षिः कपिलाचार्यः कृतज्ञो मेदिनीपतिः ।**
**त्रिपदस्त्रिदशाध्यक्षो महाश्रृंगः कृतान्तकृत् ।।**

**५३१) महर्षिः कपिलाचार्यः । महर्षये कपिलाचार्यय नमः ।**

वैयक्तिक शारीरिक गरजा, वासना, भावना, मन, बुद्धी यांच्या मर्यादित ज्ञानाने (अविद्येने) व प्रभावाने संकुचित व दुराग्रही न बनलेले आणि संकुचित अस्तित्व व जाणिवांचे सर्व कोश पार करून परमात्मरूप, परातत्त्वरूप तुझ्याशी प्रत्यक्षात एकरूप झालेले सांख्य तत्त्वज्ञानाचे प्रणेते कपिलमहामुनी तूच आहेस. तुझ्या प्रचीतीचा महामार्ग दाखविणाऱ्या तुला शतशः कृतज्ञ प्रणाम असोत.

**५३२) कृतज्ञः । कृतज्ञाय नमः ।**

केलेले, घडलेले सर्व जाणणारा. साऱ्या सृष्टीचा सावधचित अशरीरी कर्ता, नियंता व ज्ञाता तूच आहेस. अन्य दृष्ट्या तुझे भक्त त्यांच्या सूक्ष्म व अचूक दृष्टीमुळे संबंधितांची प्रत्येक कृती इत्थंभूतपणे (कृतीमागील हेतू, भावना, कष्ट) जाणतात. या कृतज्ञतेने प्रतिसादाची व परस्परसंबंधांची पातळी उदात्त होते. भक्तांना ही दृष्टी देणारा व त्यांचीही कृती अचूकतेने जाणणारा म्हणूनही तूच खरा कृतज्ञ आहेस. तुला मनःपूर्वक प्रणिपात असोत.

**५३३) मेदिनीपतिः । मेदिनीपतये नमः ।**

पृथ्वीचा पती. पृथ्वीचा म्हणजे वैश्विक पृथ्वीतत्त्वाचा, जड पदार्थाचा व शारीरिक जड पदार्थांचा आधार, नियंता, स्वामी तू आहेस. तुला निरंतर नमन असो.

**५३४) त्रिपदः । त्रिपदाय नमः ।**

तीन पावले टाकणारा किंवा तीन पदे असणारा. तीन पदे असलेला गायत्री मंत्र तू आहेस. ह्या मंत्राचा अर्थ/आशय पूर्णपणे लोककल्याणकारी व निस्पृहतेने भरलेला आहे. याच्या जपाने जपकर्त्याला आत्मशुद्धीचा आत्मप्रचीतीचा अनुभव येतो. वासना, भावना व ज्ञान या तीनही पायऱ्या ओलांडून जपकर्ता परमात्ममय होतो. गायत्री मंत्राप्रमाणेच पुरुषसूक्त, गणपती अथर्वशीर्ष, श्रीसूक्त, तसेच इतर वेदमंत्र आणि ऋचा विशिष्ट पद्धतीने म्हटल्या जातात. मंत्राप्रमाणेच तंत्र आणि यंत्र यांच्याही विशिष्ट पद्धती आहेत. त्याचप्रमाणे यज्ञ, अष्टांग योग, आयुर्वेद, ज्योतिष, गणित, शिल्पकला वगैरे ज्ञानाच्या विविध शाखांमधील तपशील पूर्णपणे आजच्या विज्ञानाप्रमाणे तयार झाला नसावा. तो आत्मज्ञानजन्य असावा. त्याचा अभ्यास त्याच पद्धतीने होणे अत्यावश्यक आहे. आजच्या वैज्ञानिक पद्धतींमधून पुष्कळ प्रश्न अनुत्तरित स्थितीत निकालात निघण्याची शक्यता आहे. प्रचीती आणि पुरावे, प्रतिभा आणि तर्क, काव्य आणि विचार, कल्पना आणि प्रत्यक्ष, व्यक्ती आणि समष्टी वगैरेंतली एकात्मता जाणून त्या एकात्म दृष्टीने जगतानाच सम्यक् विश्वकल्याण साधू शकते. सध्याच्या संभ्रमावस्थेतून उत्क्रांत व्हायला अन्य मार्ग नाही. वाचन, पठण, लेखन, उच्चारण, पुनरुक्ती, विचार, कल्पना, ध्यान, चिंतन, निदिध्यास, आचरण, पुनराचरण, निरीक्षण, समरसता, एकाग्रता, आस्था, प्रयोग वगैरे अनेक मार्गांनी जीवनाला प्रगल्भता येत जाते. **विश्वास किंवा अविश्वास दोन्हीही बाजूला ठेवून म्हणजेच पूर्वग्रहविरहितपणे अभ्यास केला तर उपरोक्त ज्ञानभंडार खुले होईलच परंतु आजच्या मानवी क्षमतेला दिव्यत्वाचे, प्रज्ञानाचे पंख फुटतील.** अन्य दृष्ट्या विश्वव्यापक तीन पावले टाकणारा वामनावतार हे तुझेच सगुण रूप. त्याचा आशय तिन्ही लोक (जाणिवेच्या पातळ्या) व चराचर व्यापणारा असा आहे. तुझ्याचरणी माजे प्रणिपात असोत .

**५३५) त्रिदशाध्यक्षः । त्रिदशाध्यक्षाय नमः ।**

तीन दशांचा अध्यक्ष. सुषुती, स्वप्न आणि जागृती; उत्पती स्थिती व संहार; बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृद्धापकाळ; तमोगुण, रजोगुण व सत्वगुण या सर्व दशा अवस्थांमध्ये तुझाच अविष्कार आहे. तुझ्या या वैशिष्ट्यांमुळे भक्तांना सदासर्वकाळ तुझ्या चरणी अनुसंधान ठेवता येते आणि या दशांचा स्वामी असलेल्या तुझ्याशी

समरस होता येते. तुला मनोभावे वंदन असो.

**५३६) महाशृंगः । महाशृंगाय नमः ।**

कल्पांती सर्वत्र पाणी असल्याने स्वतःच्या शिंगाला साऱ्या जीवनाची नौका बांधून सृष्टीजीवन वाचवणारा. महामत्स्य, मोठा मासा. ह्या सगुण अवतारामध्ये संपूर्ण विश्वाच्या अंतानंतर पुन्हा विश्वाची उत्पत्ती घडवून आणणाऱ्या तुझ्या कार्याचे दिग्दर्शन आहे. जेव्हा संचयात्मक घटना कमी वेळात घडतात तेव्हा त्यातून विश्वाची उत्पत्ती होते. विश्वाच्या संहाराच्या वेळी विघटनांच्या घटना घडतात. संहारानंतर पुन्हा उत्पत्ती घडवून आणणारा महामत्स्य म्हणजे संचयात्मक घटनांची स्थळकाळाच्या पार्श्वभूमीवर आखणी व मांडणी करणारे काळातीत तत्त्व. संहारानंतरची आणि उत्पत्तीपूर्वीची अवस्था वर्णन करण्यासाठी सर्वव्यापी महासागराची उपमा दिलेली असून त्या स्थित्यंतरे नसलेल्या अवस्थेतून पुन्हा संचयात्मक स्थित्यंतरांतून विश्व प्रत्यक्षात आणणाऱ्या तुला मोठ्या माशाची उपमा दिलेली आहे. (अन्य दृष्टीने पाहता पृथ्वीच्या इतिहासातील शीतयुगाला महासागर म्हटले असून माशांपासून पुन्हा सृष्टीचा विकास सुरू झाला असाही अर्थ निघू शकतो. परंतु या अर्थातून उत्पत्ती स्थिती विलयाची आवर्तने, दिग्दर्शित होत नाहीत.)

व्यक्तीच्या जन्म व मृत्यूच्या संदर्भात तुझ्या या वैशिष्ट्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जाणिवेच्या उन्नयनाने तुझ्या या वैशिष्ट्याची प्रचीती येते. तत्स्वरूप झाल्याने स्वतःच्या **'आत्मना पुरितं विश्वं महाकल्पांबुना यथाम्'** म्हणजे प्रलयजलाप्रमाणे असलेला मी सर्वव्यापी आहे अशी सर्वव्यापी अजरामर अस्तित्वाची प्रचीती व प्राप्ती होते. तुला साष्टांग नमन असो.

**५३७) कृतान्तकृत् । कृतान्तकृते नमः ।**

संहारकर्ता. संहाराचा स्वामी. संहारावर अधिसत्ता असलेला. संकुचित बाबींवर व संकुचित जीवनावर संहार अधिसत्ता गाजवतो त्यामुळे असा माणूस काळाचा गुलाम असतो. परंतु संहार घडवणे व मोडून काढणे, किंबहुना संहाराचे अस्तित्वच क्षुद्रतम असत्य बनवणे, हे सारे, जो अमरत्वामुळे सहजतेने करतो तो तू आहेस. विश्वप्रलयाला एक छोटेसे व क्षणभंगुर स्थित्यंतर बनवणाऱ्या व व्यक्तीच्या मृत्यूलाही एक वरवरचे उथळ स्वरूपाचे स्थित्यंतर बनवणाऱ्या तुझ्या प्रचीतीमुळे तुला कृतान्तकृत् म्हणतात. मृत्यूचाही मृत्यू अशा तुझ्या प्रचितीमुळे शरीर त्यागाची भिती व तज्जन्य असुरक्षितता नष्ट होऊन निर्भयतेचा अनुभव येतो व व्यक्तिजीवनाचा तो कायमचा व भक्कम आधार व पैलू बनतो.उत्पत्ती, स्थिती, संहार, संहारानंतरची स्थिती हे सर्व व्यापणाऱ्या व सर्वांवर नियंत्रण ठेवणाऱ्या तुला साष्टांग दंडवत असो.

**महावराहो गोविन्दः सुषेणः कनकांगदी।**
**गुह्यो गभीरो गहनो गुप्तश्चक्रगदाधरः।**

**५३८) महावराहः। महावराहाय नमः।**

हिरण्याक्षाने जेव्हा पृथ्वी पळविली व समुद्रात नेली तेव्हा तिला वाचवणारा वराहावतार. ह्या तुझ्या सगुण रुपातूनही जीवसृष्टीचे प्रलयकाळी रक्षण करणारे कार्यच दिग्दर्शित केलेले आहे.इथेही स्थित्यंतरविरहित अवस्था व पुनरुत्पती अध्याहृत आहे. (अन्य दृष्टीने, इथेही शीतयुगाची अवस्था व त्यातून जीवसृष्टीला वाचवणारे तुझे कार्य महत्त्वाचे आहे.सृष्टी विकासाच्या क्रमामध्ये नंतरच्या शीतप्रलयाच्या वेळी केवळ रानडुक्कर व अन्य चतुष्पाद प्राणी सर्वत्र होते व टिकले अन पुढे त्यांच्यापासून सृष्टी विकसित झाली असाही अर्थ निघू शकतो. परंतु यातूनही उत्पती, स्थिती, लयाच्या आवर्तनांचे दर्शन होत नाही. त्याचप्रमाणे अवतार आणि जीवशास्त्रीय उत्क्रांती याचा मेळ घालणे हा कृत्रिम अट्टहास असून मासे किंवा डुक्कर हे प्राणी (अवतार कल्पनेला अनुस्यूत असलेली ) नियंत्रक व कर्त्याची भूमिका बजावत नाहीत. सर्वकाळी व सर्व परिस्थितीत व सर्वत्र संचार करणारे प्राणी असल्याने सृष्टिनिर्मितीच्या कार्याच्या नियंत्याचे रुप वर्णन करण्यासाठी ही रुपके वापरली गेलेली असणेच तर्कसंगत आहे. ह्याच कारणाने इतर कार्याच्या वर्णनासाठी व अंवतारासाठी इतर रुपके वापरण्यात आलेली असून सामजिक सुव्यवस्थेच्या कार्याच्या संदर्भात ऐतिहासिक व्यक्ती अवतार बनवण्यात आल्या आहेत. अवतार वर्णनामध्ये मासा, कासव, वराह, नारसिंह ह्यांच्याप्रमाणेच तीन मुखे असलेल्या दत्ताचा अन् दाशरथी राम, वगैरेंचाही समावेश आहे.) विश्वव्यापारच्या व्यापक विविधांगी नियंत्रणासाठीच नव्हे तर व्यक्तिजीवनाच्या व्यापक नियंत्रणासाठीही यातील काही रुपके समर्पक ठरतात. उदाहरणार्थ व्यक्तिजीवनाला भवसागरातून तारणारा (मासा ) मज्जारज्जूमध्ये होणाऱ्या संवेदनांच्या मंथनास आधार देणारा (कासव ) त्रिगुणात्मक त्रिगुणातीत (दत्त ) तीन पावलानी तिन्ही लोक जाणिवेच्या तिन्ही अवस्था व्यापणारा (वामन ) सर्व सजीवातील एकत्व आणि पशुत्वावरील मात साध्य करणारा आत्मज्ञानी नारसिंह वगैरे. या सर्व बाबींचा मथितार्थ असा की वेगवेगळ्या अवतारांची वर्णने, वैश्विक आणि वैविध्यपूर्ण नियंत्रक पैलू उघड करुन तुझे स्वरुप अधिक स्पष्टपणे दाखविण्यासाठीच करण्यात आली आहेत. तुझ्याचरणी माझे मस्तक असो.

**५३९) गोविंदः। गोविंदाय नमः।**

वेदान्ताद्वारे जाणता येण्याजोगा. वेदान्त ही तुझी वाणी आहे. ही तुला जाणण्यासाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक आहे. महर्षिंच्या हृदयाकाशातून परावाणीतून प्रगट होणाऱ्या

तुझ्या वाणीच्या अभ्यासाने भक्तांच्या हृदयातही तू प्रगट होतोस, प्रचीती देतोस व त्यांच्या वाणीनेही स्वतः बोलतोस. तुला अखंड नमन असो.

**५४०) सुषेणः । सुषेणाय नमः ।**

मनोहर सेना असलेला. सारं विश्व आणि व्यक्तीचं अस्तित्व हे तुझं साम्राज्य असून सत्त्व-रज-तम या गुणांच्या द्वारे तू यांचं नियंत्रण करतोस. तीन गुण म्हणजे तुझी सेना होय. ही सर्वव्यापी व प्रभावी आहे, उत्तम आहे. म्हणून तुला सुषेणः म्हणतात. अन्य दृष्ट्या पाहिल्यास तीन गुणांच्या आधारेच ज्ञान होते. पण ते अविद्यामय असते. पण अविद्यामय ज्ञानातून पुढे यथार्थ ज्ञान उद्‌भवते. त्यामुळे या गुणसेनेच्याच द्वारे विश्वव्यापार व मनोव्यापार करणारे महत्‌तत्त्व व मन शोषून घेऊन, यथार्थ ज्ञान देणारा म्हणूनही तू मनोहर सेना असलेला आहेस. संपूर्ण जीवनाचे, त्यातील सर्व अनुभवांचे कारण व हेतू, तुझी प्राप्ती व संकुचित अस्तित्वाची समाप्ती हेच आहे. तुला माझे साष्टांग अभिवादन असो.

**५४१) कनकाङ्गदी । कनकांगदिने नमः ।**

सोन्याची बाहुभूषणे असणारा. तुझ्या सगुण वर्णनात ही वैशिष्ट्ये येतात. याचा मथितार्थ आत्मज्ञानरूपी तुझी, विश्व व शरीर ही मूल्यवान परंतु दुय्यम आभूषणे होत. अशी सोन्याची भूषणे परिधान करणाऱ्या तुला साष्टांग लोटांगण असो.

**५४२) गुह्यः । गुह्याय नमः ।**

म्हणजे गूढ, गुप्त, रहस्यमय. देहबुद्धी आणि चर्मचक्षूंना आकलन न होणारा म्हणून तुला गुह्यः म्हणतात. आजतागायत कुणालाही, अगदी उपनिषदकारानाही देहबुद्धी व चर्मचक्षूच्या पातळीवर आकलन झाला नाहीस म्हणून तुला गुह्यः म्हणतात. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**५४३) गभीरः । गभीराय । नमः ।**

म्हणजे अत्यंत प्रगल्भ व अनाकलनीय. अंतर्यामी असूनही तुला अनाकलनीय म्हणतात. कारण व्यक्तीने तुला जाणणे म्हणजे मिठाच्या बाहुलीने समुद्राला जाणण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे मिठाची बाहुली समुद्राचे मापन करण्यासाठी गेली की स्वतः नष्ट होते, त्याचप्रमाणे तुला जाणण्याचा प्रयत्न करणारा तुझ्यामध्ये विलीन होतो, तुला जाणणे अशक्य होते. दुसऱ्या दृष्टीने ज्याप्रमाणे मिठाची बाहुली समुद्रापासून तयार होते त्याचप्रमाणे व्यक्तीचे अस्तित्व व जाणिवा देखील तुझ्यापासूनच तयार होतात,त्यामुळे मिठाची बाहुली असो की माणूस, स्वतःच्या पित्याच उगम पाहू शकत

नाहीत, म्हणून तला जाणू शकत नाहीत. वेगळ्या अंगाने पाहिल्यास तत्स्वरुप झालेला भक्त उच्चतम पातळीमुळेउथळ अभिरुची, सवंग आवड आणि छचोर वृतींपासून मुक्त असतो. त्याच्या जीवनात बेचैनीचा कोलाहल व वासनेचा गदारोळ रहात नाही. तो अत्यंत शांत, प्रगत व गंभीर बनतो. म्हणूनही **गभीरः** हे तुझे नाव सार्थ आहे. तुझ्या भक्तांचे व्यक्तिमत्त्व वखवखलेले, मागणारे राहत नाही. ते दात्याचे समाधानी व्यक्तिमत्त्व बनते. चिरंतन प्रसन्नतेचा दाता असलेल्या तुला विनम्र प्रणाम असोत.

**५४४) गहनः । गहनाय नमः ।**

समजण्यास कठीण. अचिंत्य. सूक्ष्मातिसूक्ष्म व गुप्त असल्याने ज्याच्यामध्ये जाणीव-बुद्धी शिरु शकत नाही व विशालात विशाल व वेगवान असल्याने बुद्धीमध्ये जो सामावला जात नाही तो तू आहेस. केवळ तुझ्याच कृपेने निष्कपट वृती, निस्सीम भक्ती, निस्वार्थ भाव, निस्पृह स्वभाव, समपर्णाची कृती हे सारे प्राप्त होतात. तुझ्या प्रेमामध्ये भक्त तदाकार होतो. तुला कृतज्ञ प्रणिपात असोत.

**५४५) गुप्तः । गुप्ताय नमः ।**

लपलेला. प्रत्येक चराचराच्या अंतर्यामी असलेला व त्यामुळे चर्मचक्षूंना मन-बुद्धी-विचार यांच्या दृष्टीलाही न दिसणारा असल्याने तुला **गुप्तः** म्हणतात. आणि अंतर्बाह्य सर्व व्यापणारे तुझे अस्तित्व तरलतम असल्याने देहबुद्धी, अहंकार, गर्व, मोह, दुराभिमान, भय संकुचित वासना, भावना, विचार आणि कृती असलेल्यांना तू दिसत नाहीस. तुला मनःपूर्वक वंदन असो.

**५४६) चक्रगदाधरः । चक्रगदाधराय नमः ।**

चक्र आणि गदा धारण करणारा. शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण करणाऱ्या तुझ्या सगुण रुपामागील रहस्य व्यक्तीच्या व विश्वाच्या शाश्वत कल्याणाशी निगडित आहे. वेगळ्या अर्थाने पाहिल्यास व्यक्तीमधील मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धा, आज्ञा आणि सहस्त्रार चक्रे आणि सूर्यनाडी, चंद्रनाडी सुषम्नानाडी रुपातील गदा, कुंडलिनी जागृतीने प्रचीतीस येणारा अनाहत ध्वनी (शंख) आणि आत्मसाक्षात्काररुपी आशीर्वाद (कमळ ) धारण करणारा क्षेत्रज्ञ आत्मा तू आहेस. अन्य दृष्ट्या वृतीरुप परावाणीचा शंख, सद्बुद्धीरुप गदा धरणारा व आत्मज्ञानाचे कमळ धरणारा कूटस्थ ईश्वर तू आहेस. विश्वाच्या संदर्भात ओंकार शब्दब्रह्म (शंख ) सूर्यमालादीपासून (शिशुंमारचक्र ) ते अणुरेणूतील चक्रांपर्यंत व युगावर्तापासून ते सूक्ष्मतिसूक्ष्म उत्पति-स्थिती-संहाराची चक्रे (चक्र ) आणि विश्वसंकल्पनाची गदा व सर्वज्ञतेचे कमळ धारण करणारा तू आहेस . त्याचप्रमाणे साक्षात् काळरुपी गदा आणि

तुझ्या प्राप्तीचा आशीर्वाद (कमळ) धारण करणारा विश्वनियंता ईश्वर तू आहे,. व्यक्ती व विश्वाचे कल्याण करणाऱ्या तुला भावपूर्ण नमन असो.

**वेधाः स्वांगोऽजितः कृष्णो दृढः संकर्षणोऽच्युतः ।**
**वरुणो वारुणो वृक्षः पुष्कराक्षो महामनाः ॥**

**५४७) वेधः । वेधसे नमः ।**

विश्वाचा निर्माता. ज्याचे सगुण रुप ब्रह्मदेव आहे. सृष्टीतील चराचर अणुरेणु, घटना, जीवन, गती, भावना, जाणीव, आत्मज्ञान, कृती या सर्वाचा निर्माणकर्ता तू आहेस. तुला माझे दंडवत असोत.

**५४८) स्वांगः । स्वांगाय नमः ।**

अत्यंत सुंदर. प्रमाणबद्ध शरीर असलेला व स्वतःच साधनरुप असलेला. तू विश्वानिर्माता असून विश्वनिर्मितीला लागणारे साधन-कच्चा माल ही तूच आहेस. तसेच विश्वनिर्मितीचे यंत्रही तूच आहेस. स्वतः विश्वनिर्माता, नियंता, विश्वात्मक आणि विश्वरुप असा तू सर्वतोपरी अत्यंत सौंदर्यवान आहेस, मनोरम आहेस. हेच दर्शविण्यासाठी तुझे सुंदर सगुण रुप व त्याचे वर्णन आहे. तुला विनम्र अभिवादन असो.

**५४९) अजितः । अजिताय नमः ।**

कधीही पराभूत न होणारा. शुद्धतम ज्ञानशक्ती, प्रखरतम इच्छाशक्ती आणि सर्वाधिक क्रियाशक्तीचा चिरंतन मूलस्त्रोत व अखंड मूलाधार तू आहेस. अविद्या मायेकडून, पाशवी वृत्तीकडून आणि हिंसा शक्तीकडून कधीही भ्रष्ट व पराभूत व होणारा म्हणून तुला **अजितः** म्हणतात. तुझे भक्तही असेच असतात. तुला निरंतर वंदन असो.

**५५०) कृष्णः । कृष्णाय नमः ।**

वसुदेव-देवकीचा पुत्र कृष्ण हे तुझेच सगुण रुप होय. वस्तुतः जीवनविद्येचा महान उपदेश देणारे महाभारत लिहिणारे महर्षी व्यास, कृष्ण, अर्जुन ही तुझीच रुपे होत. अन्य दृष्ट्या कृष्ण म्हणजे काळा. ज्ञानसूर्य असलेला व अंतर्बाह्य सर्व व्यापणारा तू सूर्यप्रकाशाप्रमाणे चर्मचक्षुंना दिसणारा (वास्तविक सूर्यप्रकाशदेखील अदृश्यच असतो ) प्रकाश नाहीस.अंतःश्चक्षुंचा प्रकाश आहेस. त्याचप्रमाणे संकुचित वासना, भावना, विचार, कल्पना आणि बुद्धीने तू कधीही आकलन केला जाऊ शकत नाहीस. ज्ञात होत नाहीस. म्हणून रुढार्थाने प्रकाश नसल्यामुळे आणि ज्ञात न होत असल्याने तुला **कृष्णः** म्हणतात. तुला शतशः प्रणिपात असोत.

**५५१) दृढः । दृढाय नमः ।**

भक्कम, अचल असा. तुला तुझ्या विशालतमुळे, सूक्ष्मतेमुळे, वेगवानतेमुळे व तरलतेमुळे फोडता येत नाही. तुझे विघटन कराता येत नाही. त्याचप्रमाणे गणिती बुद्धीनेही तुला विभागात येत नाही. त्यामुळे तू सर्वतोपरी दृढः(खंबीर ) आहेस. कालातीत असल्याने तुझ्यावर काळाचा परिणाम होत नाही, काळाची गदा चालत नाही. त्यामुळे तू निरंतर अप्रभावित आणि अचल **दृढः** आहेस. अविद्येच्या तडाख्याने ढेपाळणाऱ्या, चक्काचूर होणाऱ्या, मायेच्या झंझावाताने फोलफटाप्रमाणे भिरभिरणाऱ्या व भरकटणाऱ्या, देहबुद्धीने लिप्त असल्याने दुबळ्या बनून रखडणाऱ्या तुझ्या चंचल भक्तांना तूच अचल व चिरंतन आधार देतोस. तुला कोटी कोटी प्रणाम असोत.

**५५२) संकर्षणोऽच्युतः । संकर्षणोऽच्युताय नमः ।**

ज्यामध्ये सर्वकाही विलय पावते परंतु ज्याचा स्वतःचा कधीही विलय होत नाही व जो कधीही स्वस्थानापासून व स्वतःच्या कार्यापासून ढळत नाही असा. उत्पती, स्थिती व विलयाची सर्व स्थित्यंतरे अन् काळालाही सामावणाऱ्या, स्थित्यंतरातीत व काळातीत अशा तुला साष्टांग नमन असो.

**५५३) वरुणः । वरुणाय नमः ।**

अस्तकालीन सूर्य. दिवसाचा सूर्य व अस्तपानच्या सूर्य या रुपकातून अनुक्रमे ज्ञानप्रकाश देणारा (म्हणजे अविद्या दूर करणारा ) आणि ज्ञानप्रकाश स्वतःमध्ये शोषून घेणारा (म्हणजेच अविद्येच्या वातावरणात जीवांना बद्ध करणारा ) 'ज्ञान' सूर्य अभिप्रेत आहे. **वरुणः** म्हणजे जीवांना अविद्येत बद्ध ठेवणारा 'ज्ञान' सूर्य तूच आहेस. तुला तुझ्या या रुपातही भक्त अत्यंत आर्ततेने आळवतात. तू दिलेले दुःख व सुख तुझे जाणून तुझ्याच चरणी अर्पण करतात. **वरुणः** याचा दुसरा अर्थ जलदेवता, समुद्रदेवता. याचा गुह्यार्थ म्हणजे जलतत्त्वाचा स्वामी. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**५५४) वारुणः । वारुणाय नमः ।**

वरुणाचे पुत्र. अगस्त्य आणि वसिष्ठ ऋषि हे वरुणाचे पुत्र म्हणजे तुझेच आविष्कार असे म्हटले आहे. ह्या दोन सगुणा रुपांमध्ये तुला पाहण्याचे कारण या दोघांचे ब्रह्मज्ञानपूर्ण अस्तित्व होय. भक्तहृदयातून आणि भक्तजीवनकार्यातून स्वतःचा विहंगम आविष्कार करणाऱ्या तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**५५५) वृक्षः । वृक्षाय नमः ।**

या नावाने चिरंतन अशा अश्वत्थ वृक्षाचे स्मरण करण्यात आले आहे. ज्याची मुळे

जाणिवेच्या सर्वोच्च स्तरात असून ज्याचा शाखाविस्तार विश्वातील अणुरेणूच्या रुपात होतो तो अनादि अनंत अश्वत्थ वृक्ष तूच आहेस ह्या वृक्षाचे मूळ कापल्यानंतर पाहणारा मूलाधारही तूच आहेस. कारण तूच विश्वाचे मूळ आणि विश्वांतरबाह्य असलेला विश्वरुपात्मक असा अश्वत्थवृक्ष व त्याचा शाखविस्तारही आहेस. तला शतशः अभिवादन असो.

**५५६) पुष्कराक्षः । पुष्काराक्षाय नमः ।**

सगुण रुपामध्ये कमळाप्रमाणे सुंदर डोळे असलेला आणि तात्त्विकदृष्ट्या आकाश-अतंराळ हे ज्याचे डोळे आहेत असा. चराचराचे अंतरंग व्यापणारे अंतराळ हेही तुझ्या नजरेसाठी वापरलेले रुपकच आहे. वस्तुतः तुझे डोळे जाणिवेच्या उच्चतम स्तरावर कार्यरत असून स्थळ-काळादी सर्वच व्यापतात, पाहतात व नियंत्रितही करतात. या रुपकांनी निर्गुण, निराकार व सर्वशक्तिमान अशा तुझी थोडीफार कल्पना येते. तुझ्याचरणी निरंतर लोटांगण राहो.

**५५७) महामनाः । महामनसे नमः ।**

म्हणजे विशालतम मन असलेला. अशरीरी व कालातीत अशा तुझ्या विश्वसंकल्पासाठी व तुझ्या सर्वव्यापी, सर्वनियंत्रक आणि प्रभावी कार्यासाठी विशालतम मनाची कल्पना करण्यात आली असे नव्हे. विश्व अचेतन समजणे हीच गफलत आहे. 'स्वतः'च्या जाणिवेला अंतर्बाह्य व्यापणारी वैश्विक जाणीव आहे याची प्रचीती येताच **महामनः** या नावातील सार्थकता समजते. त्यामुळे तू प्रचीतीचा विषय आहेस, श्रद्धेचा नव्हे. तुला साष्टांग नमन असो.

**भगवान भगहा नन्दी वनमाली हलायुधः ।**
**आदित्यो ज्योतिरादित्यः सहिष्णुर्गतिसत्तमः ।**

**५५८) भगवान् । भगवते नमः ।**

पौराणिकदृष्ट्या भगवान् म्हणजे ऐश्वर्य, सामर्थ्य, धर्म, कीर्ती, ज्ञान व वैराग्य असणारा. त्याचप्रमाणे चराचराच्या उत्पत्ती, स्थिती व अंताचा ज्ञाता आणि आत्मज्ञान व अविद्या (देहबुद्धीजन्य ज्ञान) यांचा दाता. ही सारी वैश्विक पातळीवर तुझ्यापाशी आहेत तर वैयक्तिक पातळीवर भक्तांपाशी असतात. तुझ्या समीपतेमुळे त्यांच्यापाशी सर्वोच्च ज्ञान, सर्वोच्च सामर्थ्य, सर्वोच्च धर्म (विश्व व व्यक्तीचे नियंत्रण करणारी तत्त्वे), सर्वोत्तम कीर्ती (कारण उपाधीरहित अशा तुझ्यामध्ये दोषच नाही पण प्रभाव मात्र सर्वत्र आहे), सर्वोच्च ऐश्वर्य (विश्वात्मक वैभव तुझेच आहे) व पराकोटीचे वैराग्य (कारण मिळवण्यासारखे तुझ्यासाठी काहीही शिल्लकच राहिलेले नसते) असतात. तुला

भक्तिपूर्वक प्रणिपात असोत.

**५५९) भगहा । भगघ्ने नमः ।**

सर्व स्वत:मध्ये शोषणारा. सर्व काही अखेर तुझ्यामध्ये विलीन होते. त्याचप्रमाणे तुला कुणीही आकर्षून किंवा शोषून घेऊ शकत नाही. सारे विश्वक्रमदेखील जो शोषून घेऊ शकतो व कोणत्याही बाबीने आकर्षिला जाऊ शकत नाही असा तू तुझ्या भक्तांनाही तुझी प्रचंड आकर्षणशक्ती देतोस. ते काळाच्या झंझावाताने कधीच प्रभावित न होता उलट साऱ्या विश्वाचेच भाग्य घडविणारे युगपुरुष होतात. ते उद्याची असहायतेपणे वाट बघणारे मर्त्य जीव राहत नाहीत तर उद्याची पहाट घडवणारे युगसूर्य बनतात. तुला कृतज्ञ वंदन असो.

**५६०) आनन्दी । आनन्दिने नमः ।**

सर्वोत्तम आनंदाने कायम भरलेला. तू अज्ञानजन्य दु:खाने कधीच लिप्त होत नाहीस व आत्मज्ञानाच्या सामर्थ्याने सर्वांवर सत्ता गाजवतोस त्यामुळे नेहमीच आनंदी असतोस. स्वत:च्या भक्तांनाही असेच चिरंतन आनंदप्रकाशाचे दीपस्तंभ बनवणाऱ्या तुला आणि सत्ताकांक्षा नसलेल्या तुझ्या भक्तांना नम्र नमन असो.

**५६१) वनमाली । वनमालिने नमः ।**

वनमाली म्हणजे गळ्यात फुला-पानांची माळ घालणारा. सगुण रूपात वैजयंतीमाला धारण करण्याचा मथितार्थ पंचमहाभूतांना धारण करणारा शाश्वत परमात्मा हा होय. तुला विनम्र प्रणाम असोत.

**५६२) हलायुधः । हलायुधाय नमः ।**

नांगर हे ज्याचं आयुध (हत्यार) आहे असा बलराम किंवा बलभद्र. नांगर हे सर्जनशीलतेचे, उत्पादकतेचे प्रतीक आहे. निर्मिती प्रक्रियेचा नियंता असल्याने शेतकरी उत्तम पिकासाठी बलराम ह्या तुझ्या सगुण रूपाची पूजा करतात. वास्तविक त्यानी निर्मितीक्षमता अंगी बाणवून तुझ्या निर्मितीक्षमतेची, सर्जनशीलतेची पूजा करणे तुझ्या उपदेशाला धरून होईल. कारण गीतेत फलासक्तीरहित कर्माची तू शिकवण दिली आहेस. व्यक्तीने स्वत:च्या कार्यामध्ये निर्मितीक्षमता, सर्जनशीलता, कौशल्य, अचुकता, सूक्ष्मदृष्टी, कुशाग्रबुद्धी, सत्यान्वेषित्व, असंकुचितता, व्यक्तित्वातीतता, हे गुण बाणवावे हा त्या शिकवणीचा मथितार्थ आहे. कारण या गुणांतून, फलासक्तीबरोबर असणारी याचकता व पराधीनता जाऊन स्वयंपूर्णता येते. या गुणानी संकल्पशुद्धी होत जाते आणि संकल्प अचूक होत जातो. संकल्प अचूक झाला की

कार्यकुशलता व सर्जनशीलता अत्यंत विकसित होत जाऊन कार्याला उत्तमोत्तम विश्वकल्याणाच्या फळाची प्राप्ती होते. फलासक्ती सोडून कर्म करण्यातील (कर्मयोगातील) हे तथ्य सर्वश्रेष्ठ आहे. फलासक्ती म्हणजे बेड्या आहेत. झापडे आहेत. अंधारकोठडी आहे. फलासक्तीमुळे संकल्पशुद्धीची प्रक्रिया जशी कार्यरत होत नाही, त्याचप्रमाणे कौशल्य आणि प्रावीण्य संपादनाची प्रक्रियाही वेग घेत नाही. ही बाब विश्वकल्याणाच्या बाबतीतही लागू पडते. विश्वकल्याण ह्या फळाची आसक्ती देखील विश्वकल्याणकारी कार्याची कुशलता व अचुकता थोपवू शकते व विश्वकल्याणाच्या आसक्तीमध्ये विश्वकल्याणकारी कार्याचा विकास रोखू शकते. ह्याला वैज्ञानिक कारण असे की आसक्ती हे अज्ञान व पराधीनता यांचे लक्षण आहे. ज्या क्षणी विश्वकल्याणाच्या संकल्पामध्ये आसक्ती येते त्या क्षणी असं समजावं की विश्वकल्याणाचा 'तो' संकल्प वैयक्तिक बुद्धी व कल्पनांनी मर्यादित आणि आत्मज्ञानविरहित व म्हणून वांझ ठरणे तसेच त्यासाठी केलेले कार्य अकुशल आणि असफल ठरणे आणि फलप्राप्ती न मिळाल्याने होणाऱ्या अपेक्षाभंगाने हृदय विदिर्ण होणे क्रमप्राप्त आहे. स्वत:ची व जगाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी ही बाब नीट समजावून घेणे अत्यावश्यक आहे. 'फलासक्ती नाकारणे' म्हणजे फळ नाकारणे नव्हे. 'फलासक्ती नाकारणे' म्हणजे संकल्प आणि कार्य सर्वाधिक प्रभावी, परिणामकारक व फलदायी बनवण्याचा मार्ग आहे. मानवाला मुक्तिपंख देणाऱ्या तुला साष्टांग दंडवत असोत.

**५६३) आदित्यः । आदित्याय नमः ।**

आदितीचा मुलगा, वामन. बळीराजाचे सर्वस्व हिरावून घेतल्यानंतर त्याच्या दरवाजाबाहेर विष्णू द्वारपाल म्हणून राहिला अशी कथा आहे. या अवताराचा व या कथेचा भावार्थ असा की तू व्यक्तीचे संकुचित आणि क्षुद्र असे सर्वस्व हिरावून घेतोस. पण एकदा व्यक्ती तद्रुप झाली की विश्वात्मक असा तू तिच्या आधीन होतोस. आदित्य याचा दुसरा अर्थ सूर्य. साऱ्या जीवनाचा आधार सूर्य तू आहेस व संपूर्ण ज्ञानप्रकाशाचा उगम व कर्ताही तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**५६४) ज्योतिरादित्यः । ज्योतिरादित्याय नमः ।**

सूर्याच्या अंतर्बाह्य तेजाचा व ज्ञानसूर्याच्या ज्ञानतेजाचाही उगम आणि कर्ता तूच आहेस. त्यामुळे संपूर्ण विश्वाला चेतना व ज्ञानचेतना देणाऱ्या तेजोमय सूर्याच्या सोनेरी केंद्रामध्ये बसलेला नारायण हे तुझे ध्यान स्तवनीय, प्रार्थनीय व सतत चिंतनीय आहे. तुला निरंतर नमन असो.

**५६५) सहिष्णु: । सहिष्णवे नम: ।**

सहिष्णु: म्हणजे सहनशील. ''कोणताही अन्यया निमूटपणे सहन करणारा दुबळा, असहाय जीव'' हा सहनशीलतेला प्राप्त झालेला अर्थ या नावात अभिप्रेत नाही. शोषण स्वीकारणे आणि हताशपणे, निराश मनाने निष्क्रिय बनणे म्हणजे सहिष्णुता नव्हे. कालातीत अस्तित्वामुळे युगांतराचे तडाखे ज्याला स्पर्शू शकत नाहीत व ज्याला कधीही कोणत्याही प्रकारे प्रभावित करू शकत नाहीत किंबहुना जे त्याच्याकडून निर्मिले गेलेले व नियंत्रित केले गेलेले असतात व ज्याचे भक्त कोणत्याही भयानक दु:खाच्या व सुखाच्या प्रसंगाने गलबलून जात नाहीत असहाय होत नाहीत व नेहमीच समदृष्टी, शुद्ध, खंबीर आणि समतोल असतात असा परमेश्वर तू आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**५६६) गतिसत्तम: । गतिसत्तमाय नम: ।**

अंतिम अवस्था, वेग, दिशा व मार्ग. साऱ्या विश्वाची आणि व्यक्तीचीही सर्वोत्तम अंतिम अवस्था, सर्वत्र घडणाऱ्या घटनांमागील प्रेरणा, ह्या घटनांना कल्याणाप्रत नेणारी दिशा आणि अंतिम कल्याणाचा महामार्ग हे सारे तू आहेस. तू गतीचीही गती, गतीची दिशा, गतीची दिशा निश्चित करणारा मार्ग आणि या द्वारे होणारे विश्वकल्याण यांचा कर्ता व नियंताही आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**सुधन्वा खण्डपरशुर्दारुणो द्रविणप्रद: ।**
**दिवस्पकृक् सर्वदृक्व्यासो वाचस्पतिरयोनिज: ॥**

**५६७) सुधन्वा । सुधन्वने नम: ।**

उत्तम धनुष्य धारण करणारा. या सगुण रूपातून अशरीरी अचूक ज्ञानाने व दृष्टीने मर्मभेद करणारा, असंख्य घटनाना अचुकतेने सांधणारा, तसेच सतत आत्मस्वरूपाचा वेध घेणारा असा अर्थ अनुस्यूत आहे. त्याचप्रमाणे विश्वकल्याणाच्या संकल्पात कार्य करताना संकल्प व कार्य यातील तफावत दूर करण्यासाठी अचूक व परिणामकारक डावपेचादी साधने वापरणारा असाही अर्थ अनुस्यूत दिसतो. कारण व्यक्ती म्हणून कार्य करताना स्थळ, काळाप्रमाणेच स्वत:च्या व इतरांच्या सापेक्षतेचा मर्यादित विचार करून कार्य परिणामकारक बनवण्यासाठी डावपेचादी योग्य साधने वापरणे सर्वांच्या कल्याणाचे असते. तुझ्याचरणी विनम्र प्रणाम असोत.

**५६८) खण्डपरशु: । खण्डपरशवे नम: ।**

परशु धारण करणारा परशुराम. या सगुण रूपाचा मथितार्थ तमोगुण व रजोगुण

यांचा नाश करणारा आणि सत्त्वगुणाद्वारे, स्थत्त्वगुणातीत ब्रह्मतेजाचा साक्षात्कार घडवणारा अंतर्यामी वसणारा परशुराम, असा आहे. तुला शतशः प्रणिपात असोत.

**५६९) दारुणः । दारुणाय नमः ।**

भयंकर. अविद्येमुळे उत्पन्न होणाऱ्या अहंकार, मद, दंभ, दुरभिमान, वासना, आसक्ती, मोह, भीती, असुरक्षितता, निराशा, काळजी, चिंता, असूया, द्वेष, मत्सर, दुष्टपणा यांनी त्रासलेल्यांना निर्गुण-निराकार असे तुझे अस्तित्व भयंकर वाटते. तुझ्या भक्तांची वैराग्यपूर्ण श्रीमंती व निस्पृहतेचे ऐश्वर्य त्या अज्ञानी लोकांना अस्वस्थ बनवते. कारण मानसिक स्थूलत्वामुळे, आळसामुळे, पंगुत्वामुळे व्यक्तीला स्वतःच्या संकुचित अस्तित्वाच्या आकलनावर संपूर्ण विश्वास असतो. तसेच बुद्धीने शोधलेल्या ढाच्यावर (Patterns) वरही पराकोटीची भिस्त असते. त्यामुळे ह्या अशा व्यक्तींना त्यांच्या संकल्पनेत न बसणाऱ्या कोणत्याही बाबीने अस्वस्थता व बेचैनी येते. अविश्वास व तिरस्कार वाटतो. पण कितीही भयंकर वाटलास तरी तूच एकमेव असा चिरंतन सुखाचा व विश्रांतीचा वैभवसंपन्न दाता आहेस. तुला शिरसाष्टांग नमन असो.

**५७०) द्रविणप्रदः । द्रविणप्रदाय नमः ।**

उदार दाता. तू तुझ्या भक्तांना आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचे व साक्षात्काराचे महान दान देतोस आणि ते तत्स्वरूपी समरस झाल्यानंतर तुझ्या संकल्पात जगू लागल्यानंतर साहजिकच त्यांचे संकल्प पूर्ण करतोस. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**५७१) दिवःस्पृक् । दिवस्पृशे नमः ।**

आकाशाला स्पर्श करणारा. सर्वत्र पसरलेल्या अंतराळाला सर्वत्र निकटतेने स्पर्श करणारा म्हणजे काळ आहे. म्हणूनच अंतराळ व काळ अखंड आहेत. साक्षात काळपुरुष तूच आहेस. म्हणून तुला दिवःस्पृक् म्हणतात. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**५७२) सर्वदृग्व्यासः । सर्वदृग्व्यासाय नमः ।**

याचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे अनेक आत्मज्ञानी विभूती निर्माण करणारा आणि दुसरा अर्थ, सर्व जाणणारा व्यास. दोनही अर्थातून आत्मज्ञानी ऋषी, योगी, संत व लोकोत्तर पुरुषांमधील तुझ्या अस्तित्वाची साक्ष पटते. तुला व तुझ्या या सर्व अवतारांना विनम्र अभिवादन असो.

**५७३) वाचस्पतिरयोनिजः । वाचस्पतिरयोनिजाय नमः ।**

योनीवाटे जन्माला न आलेला असा सर्वज्ञ. योनीवाटे जन्माला येणे म्हणजे शरीर

धारण करणे. संपूर्ण विश्वाचा कर्ता आणि नियंता असा तू अशरीरी, निर्गुण आणि निराकारच आहेस. याचे कारण आकार व गुण हे अस्तित्वाच्या ढोबळ स्तरावरील व देहबुद्धीगम्य आहेत. अन्य दृष्ट्या तू अयोनिजः आहेस याचा अर्थ तुला कुणीही निर्माण केले नाही. कारण तू स्वतः कार्यकारणातीत आहेस. तुला अयोनिजः म्हटल्यानंतर तुझ्या अवतारांची संगती कशी लावायची? अवतार हे शरीरामध्ये बद्ध असल्याने योनिसंभवः नसतात का? ह्या शंकेचे उत्तर असे की तुझ्या अवतारांची स्थूल शरीरे योनिसंभवः असतात. परंतु केवळ स्थूल शरीरे म्हणजे त्यांच्या अस्तित्वाचा फारच थोडा भाग होय. आत्मज्ञान, आत्मप्रचीती व त्याद्वारे घडणारे युगप्रवर्तक कार्य हा अवतारांच्या जीवनाचा मोठा हिस्सा होय. त्यामुळेच जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ते सर्वतोपरी तुझ्याशी निगडित असतात आणि संकुचित अस्तित्वाचा त्यांना कधीच विचार येत नाही व देहबुद्धीची कोणतीही जोखडे, त्यांच्या जाणिवेवर स्वार नसतात. या दृष्टीने तसेच सर्वज्ञ असल्याने तू व तुझ्या अवतारांना अयोनिजः वाचस्पतिः म्हणतात. वाचस्पतिरयोनिजः अशा तुला (आणि तुझ्या सर्व अवतारांना) निरंतर वंदन असो.

**त्रिसामा सामगः साम निर्वाणं भेषजं भिषक् ।**
**संन्यासकृच्छमःशान्तो निष्ठा शान्तिःपरायणम् ।।**

**५७४) त्रिसामा । त्रिसाम्ने नमः ।**

आत्मज्ञानी ऋषींनी आत्मस्वरूपाचे परावाणीने जे वर्णन केले आणि त्यांच्या दिव्य चक्षूंना जे दिसले ते आत्मस्वरूप म्हणजे वेद, म्हणजे तू. म्हणून तुला त्रिसामा म्हणजे सामवेदादी तिन्ही वेदानी प्रार्थिलेला व तिन्ही वेदात्मक असे म्हणतात. तुला शतशः दंडवत असोत.

**५७५) सामगः । सामगाय नमः ।**

वेदांचे गायन करणारे आत्मज्ञानी ऋषी म्हणजे देखील तूच आहेस. त्यांच्या रूपाने, तूच तुझ्याकडे पोहोचण्याचा हा मार्ग जगाला देत आला आहेस. वेद ऋषींच्या संकुचित बुद्धीतून निर्माण झाले नाही म्हणून त्याना अपौरुषेय म्हणतात. वेद परावाणीतून स्फुरले म्हणून त्यांचा अशरीरी कर्ता तूच आहेस म्हणूनही ते अपौरुषेयच ठरतात. तुला साष्टांग नमन असो.

**५७६) साम । साम्ने नमः ।**

शुद्धज्ञानमय असा वेदातील श्रेष्ठतम वेद सामवेद. तुझ्या कायमच्या निकटतेमध्ये तुला अखंड लोटांगण असो.

**५७७) निर्वाणम् । निर्वाणाय नमः ।**

संपूर्ण विश्वाच्या निर्मिती, स्थिती व संहाराच्या क्रिया करीत असताना आणि अवतार म्हणून शरीरधर्म सांभाळताना पूर्णपणे मुक्तावस्थेमध्ये 'स्व'तंत्र, 'स्व'स्थ असणारा आणि भक्तजनांचे संकुचितपण आणि मांद्य गळून पडल्यानंतर किंवा परिवर्तित झाल्यानंतर त्याला जी उदात्ततम व चिरंतन आत्मप्रचीतीची मुक्तावस्था प्राप्त होते ती अवस्था. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**५७८) भेषजम् । भेषजाय नमः ।**

अविद्याजन्य संसारतापांपासून मुक्त करणारे, क्षुद्र इच्छा आणि संकल्पांतून निवृत्त देणारे, स्वरूपावस्थेची अजरामर प्राप्ती करून देणारे, अज्ञानमय असहाय जीवनाचा सामर्थ्यसंपन्न ज्ञानावस्थेमध्ये कायापालट करणारे सर्वश्रेष्ठ व एकमेवाद्वितीय औषध तू आहेस. खरे औषध तूच. तुझ्यायोगेच सूक्ष्म, तरल व खंबीर चित्तावस्था व स्थितप्रज्ञावस्था यांना साधक प्राप्त होतो. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**५७९) भिषक् । भिषजे नमः ।**

देहबुद्धीतून उत्पन्न होणाऱ्या संकुचिततेमुळे अनेक यातना व्यक्तीला भोगाव्या लागतात. त्या भोगानी जर्जर झालेल्या परावलंबी व हतबल जनांना त्यांच्यामध्ये चिरंतन आरोग्यदायी स्थित्यंतर घडवून आणणारे सत्यज्ञानामृत देणारा वैद्य तू आहेस. आजकाल, सर्वसामान्यपणे आरोग्याची जी व्याख्या केली जाते त्यामध्ये आध्यात्मिक हा शब्द अंतर्भूत केला जातो, हे खरे. परंतु आत्मज्ञान हेच खरे आरोग्य आहे याची प्रचीती बहुतेकांना नसते. शारीरिक आरोग्य ही निश्चितच महत्त्वाची बाब असली तरी इतर कोणत्याही भौतिक बाबीप्रमाणेच शारीरिक आरोग्यालाही अतिरिक्त महत्त्व देणे म्हणजे स्वत:च स्वत:च्या खऱ्या स्वत्वाकडे दुर्लक्ष करण्यासारखे म्हणजेच अत्याधिक महत्त्वाच्या पैलूकडे न्यूनता देण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे अपघातात हातपाय मोडलेल्या बेशुद्ध रुग्णाचा शर्ट फाटला असला तरी प्रथम शिवत नाहीत, एवढेच नव्हे तर हातापायाकडेही प्रथम लक्ष देत नाहीत, तर प्रथम लक्ष देतात ते जीव वाचवण्याकडे, त्याचप्रमाणे स्वत:पासून दुरावलेल्या सर्वतोपरी जराजर्जर मानवाला निकोप स्वास्थ्यासाठी सर्वात प्राधान्याने आज धोरणे व योजनांमध्ये आत्मप्रचीतीच्या आविष्काराची गरज आहे. एखाद्या खुनी-बलात्कारी माणसाची शारीरिक व्याधी बरी करण्यासाठी उपचार केले जाऊ नयेत असं मुळीच नव्हे. परंतु त्याची शारीरिक व्याधी दूर केल्याबद्दल आढ्यता मिरवणे व त्याच्या खुनी वृत्तीसकट तो पुढे काय करतो याबद्दल पर्वाच न करणे अशा प्रकारची स्थिती आत्मज्ञानाच्या सार्वत्रिक अभावामुळे

तयार होते. अशीच उदाहरणे शिक्षण-कायदा वगैरे अनेक क्षेत्रामध्येही आहेत व समाजाच्या दुरवस्थेला खतपाणी घालीत आहेत. साऱ्या विश्वाला, मानवी समाजाला आणि प्रत्येक व्यक्तीला प्राधान्याने आवश्यकता आहे ती तुझ्या औषधांची. आत्मज्ञानाची. कारण तूच ज्ञानाचं सामर्थ्य, निस्पृहतेचे वैभव, लोककल्याणकारी मन्वंतर घडवण्याची क्षमता निर्माण करणारं औषध देणारा वैद्य आहेस. खरं आरोग्य देणाऱ्या तुझ्या आत्मज्ञानारूपी औषधाची आज तीव्र गरज आहे. वैयक्तिक पातळीवर मज्जारज्जूमधूनच सर्व संवेदनांचे घुसळणे होते, मंथन होते. त्यातून ज्ञानामृत प्राप्त होते. ह्या प्रक्रियेचा जनक व अंती अमृत देणाराही तूच आहेस. हा सर्व मथितार्थ धन्वन्तरी ह्या तुझ्या सगुण रूपात अभिप्रेत आहे. तुला कृतज्ञ अभिवादन असो.

**५८०) संन्यासकृत् । संन्यासकृते नमः ।**

संन्यस्त. अशरीरी असल्याने संकुचित देहबुद्धीने कधीच लिप्त न होणारा व मोहाने जखडला न जाणारा सहजत्यागी, सहजसिद्ध संन्यासी. तुला कुणाचीच भुरळ पडत नाही. उलट साऱ्या मोहमयी विश्वालाच तुझी भुरळ पडते. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**५८१) शमः । शमाय नमः ।**

तू स्वत:च्या द्वंद्वातीत चैतन्यमय अवस्थेत भक्तांना एकरूप करून त्याना विश्वकल्याणकारी कृतिप्रवण शांतता देतोस. हताश, उद्विग्न, भयभीत, अस्वस्थ, संसार सोडलेले व संसारात अडकलेले (समाजकारण, राजकारण, कुटुंबकारण इत्यादींमध्ये घालमेल होणारे) इत्यादी सर्वांना सत्कार्यप्रेरक, महाप्रतापी व अढळ शांती प्रदान करतोस. तुझ्याचरणी माझे मस्तक निरंतर लीन राहो.

**५८२) शांतः । शांताय नमः ।**

तू सद्भावप्रेरक सत्कार्यप्रेरक व सत्कार्यकारक असा चिरंतन महाशांतीचा सागर आहेस. द्वंद्वातीत अशा तुझ्या या अस्तित्वाचा सर्वांना खरा आधार आहे. तुला माझे साष्टांग नमन असो.

**५८३) निष्ठा । निष्ठायै नमः ।**

अंतिम गती, पाया, श्रद्धा, स्थिरता वगैरे. विश्व चंचल आहे. चित्त, मन, बुद्धी, अहंकार हे चंचल आहे. तू अशरीरी आणि या सर्वांच्या अतीत आहेस, स्थिर आहेस. म्हणजेच सारे विश्व व व्यक्तीचे अस्तित्व प्रलयकाळी तुझ्यामध्येच विलीन होते आणि म्हणून विश्व व व्यक्ती त्यांचा अंत झाल्यानंतर ज्या 'स्व'रूपी सुप्तपणे बीजरूपाने

राहतात ते तू आहेस. तुझ्या या अमर अस्तित्वाची हृदयांतर्यामी चाहूल लागली की दृश्य-अदृश्य, चिंत्य-अचिंत्य, ज्ञात-अज्ञात अशा सर्व बाबींचा मोह व आसक्ती नष्ट होते. सर्वस्व तुझ्या स्वाधीन केलं जातं. आणि तूच तुझ्या निष्ठेच्या स्वरूपात भक्तजीवनात अवतरतोस. तुझ्या सतत स्मरणात तुला अखंड अभिवादन असो.

**५८४) शान्तिः । शान्तये नमः ।**

अस्वस्थता नसण्याची 'स्व'स्थ अवस्था. सर्व विश्वव्यापारांची व साधकाच्या साधनेची परिणती 'स्व'स्थतेत होते. आत्मरूपी स्थिर होण्यात होते. जिथे ही 'स्व'स्थता येते तो 'स्व' आणि ती 'स्व'स्थता तू आहेस. युगप्रवर्तक शान्तिरूप तुला सदैव वंदन असो.

**५८५) परायणम् । परायणाय नमः ।**

जीवनाचे सर्वोच्च ध्येय, सर्वोच्च अवस्था. देहबुद्धीजन्य असहाय जीवनाची अंतिम व श्रेष्ठतम परिणती तू आहेस. साऱ्या विश्वाचीही अंतिम, सर्वोच्च व चिरंतन अवस्था तू आहेस. तुला शतशः दंडवत असोत.

**शुभाङ्गः शान्तिदः स्रष्टा कुमुदः कुवलेशयः ।**
**गोहितो गोपतिर्गोप्ता वृषभाक्षो वृषप्रियः ॥**

**५८६) शुभाङ्गः । शुभाङ्गनाय नमः ।**

शुभ अंग असणारा. तुझ्या अंतस्थ अस्तित्वाने विश्व शुभ बनलं आहे. त्याचप्रमाणे तुझ्या अस्तित्वाच्या साक्षात्काराने भक्तांचे अस्तित्व शुभ बनते. तुझ्या वैश्विक व व्यक्तिगत अस्तित्वाच्या चिंतनासाठीच भक्त तुझ्या सगुण मूर्तीची पूजा करीत असल्याने ते सगुण रूप अत्यंत शुभ असते. शुभकारक, शुभदायक व शुभसूचक असते. सर्वांचे कल्याण करणारे असते. क्षुद्रत्वातून उदात्ततेकडे आणि दुबळेपणातून सामर्थ्याकडे नेणारे असते. तुला निरंतर वंदन असो.

**५८७) शान्तिदः । शान्तिदाय नमः ।**

तुझ्या कृपेने शाश्वत आणि सामर्थ्यदायी शांतीचा लाभ होतो. तुझ्या साक्षात्काराने देहबुद्धीजन्य (म्हणजे, शारीरिक, कौटुंबिक, भावनिक, वैचारिक, आर्थिक परिस्थितीनुरूप केलेले किंवा यातील एखाद्या लाभासाठी केलेले) विचार, प्रयत्न आणि तज्जन्य तळमळ, हळहळ, दुःख, असूया, असुरक्षितता, असहायता, अस्वस्थता, रूखरूख, चिंता, भीती, वेदना, काळजी, बेचैनी, नष्ट होतात. ज्ञानमूलक

व कृतिप्रवण शांती देणाऱ्या तुला विनम्र अभिवादन असो.

**५८८) स्रष्टा । स्रष्टे नमः ।**

दृश्य आणि अदृश्य बदलांच्या अगोदर व नंतर राहणारे स्थायी अस्तित्व या अर्थाने तू विश्व आणि वैयक्तिक अस्तित्वाचा निर्माता आहेस. म्हणून तुला स्रष्टा म्हणतात. वैयक्तिक जीवनात आत्मज्ञानमय तेजस्वी अनुभूतीची निर्मिती करणाराही तू आहेस. हृदयांतर्यामी शाश्वत सत्यमय अस्तित्वरूपाने प्रचीती देणाऱ्या तुला भावपूर्ण नमन असो.

**५८९) कुमुदः । कुमुदाय नमः ।**

पुलकित करणारा, कमळ, रूपे वगैरे, सारे विश्व तुझ्याच भक्तीने रंगले आहे हे अलंकारिकपणे सांगताना तुला कुमुदः म्हटले आहे. साऱ्या पृथ्वीची चैतन्यमय व परमपदरूपी अशा तुझ्यावरील भक्ती (जिचा कारकही तूच आहेस) पृथ्वीला पुलकित करते व कमळरूपाने प्रगट होते. हे भक्तिजन्य असे कमळ म्हणजे तू असा आशय. तसेच भक्तांच्या संकुचितपणाचा अंत होऊन त्यांच्या हृदयकमलात शुद्ध सत्यमय अशी तुझी भक्ती उपजते या अर्थानेही तुला कुमुदः म्हटले आहे. तुला माझे शतशः अभिवादन असो.

**५९०) कुवलेशयः । कुवलेशयाय नमः ।**

कुवल म्हणजे पाणी. पृथ्वीला वेढणाऱ्या पाण्यावर, शेषावर झोपणारा शेषशायी विष्णू. याचा मथितार्थ साऱ्या विश्वाला अंतर्बाह्य व्यापणाऱ्या काळावर योगनिद्रिस्ततेने पहुडलेला ईश्वर तू आहेस. कुवलेशायः याचा दुसरा अर्थ सुप्त कुंडलीनीशीही मिळताजुळता आहे. योगशास्त्रानुसार कुंडलिनीची जागृती तुझ्या साक्षात्काराशी निगडित आहे. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**५९१) गोहितः । गोहिताय नमः ।**

गो म्हणजे पृथ्वी (जीवसृष्टी/सृष्टी/सर्व चराचर) आणि गाय. संपूर्ण विश्वाचा आणि व्यक्तीचा खरा हितकर्ता आणि गायींचे हित, पालन-पोषण, संवर्धन व रक्षण करणारा या दोन्ही दृष्ट्या तुला गोहितः म्हणतात. प्राचीन काळी गायींचे महत्त्व अनन्यसाधारण होते. मानवाचे आरोग्य, वातावरण, पोषण, शेती या सर्वच दृष्टीनी गाय महत्त्वाची होती. या पार्श्वभूमीवर गायींचे हित तेच मनुष्याचे हित हे समीकरण होते. उपयुक्तता व सहजीवनातील अनन्यासाधारण उदात्त आशय लक्षात आल्याने गोरक्षणाला व गोपूजनालाही फार महत्त्व आले. माणसाच्या सर्वांगीण समृद्धीचे सर्वश्रेष्ठ निदर्शक

म्हणजे गोधन. त्याचे रक्षण व संवर्धन करणारा गोहित: म्हणजे मानवाला सर्वश्रेष्ठ समृद्धी देणारा. पूर्वीच्या काळी वैचारिक व वैज्ञानिक सिद्धांतांचा व्यवहारात पाठपुरावा करण्याचा एक मार्ग म्हणजे सयुक्तिक धार्मिक रीतीरिवाज, संकेत, रूढी, परंपरा प्रचलित करणे. परंपरा, रूढी, प्रथा, प्रघात ह्याबद्दल योग्य दृष्टिकोन येण्यासाठी मुलांचे उदाहरण मार्गदर्शक ठरते. ज्याप्रमाणे लहान मुलांना दात घासणे, आंघोळ करणे, व्यायाम करणे वगैरे सवयी पालकांनी आस्थेने, प्रेमाने वा क्वचित धाकाने लावणे सयुक्तिक आहे, रास्त आहे, त्यांना संपूर्ण शरीरक्रियाशास्त्राचे त्यासाठी क्लिष्ट धडे सक्तीने देणे हे सयुक्तिक नाही, तसेच परंपरा व प्रथांचेही आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात त्या रूढ करणे हे चुकीचं नव्हतं. आज मात्र आम्ही त्या अंधपणाने मोडणे किंवा पुजणे अयोग्य ठरेल. त्याऐवजी ह्या प्रथांमागील विधायक भावना, धारणा, ज्ञान, अचुकता यासाठी वाव ठेवून आणि जरूर तर मनाच्या चौकटी मोडून व वैज्ञानिक कसोट्या उन्नत करून त्यांचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. गोरक्षण व गोपूजा हा त्याचाच भाग. अन्य दृष्टीने पाहिल्यास गाईचे हित पाहणे किंवा पृथ्वीचे (सृष्टीचे) हित पाहणे म्हणजे तुझीच पूजा करणे. कारण आणखी एका प्रकारे पाहिल्यास सर्वांगीण कल्याण म्हणजे गोहित. म्हणूनही तुला गोहित: म्हणणे सयुक्तिक आहे. तुला विनम्र प्रणाम असोत.

**५९२) गोपति । गोपतये नमः ।**

गायीचा, गोधनाचा स्वामी, पृथ्वीतत्त्वाचा स्वामी व गो म्हणजे ज्ञानेंद्रिये म्हणून ज्ञानेंद्रियांचा स्वामी. कल्याणदायी विश्वसंस्कृती आत्मज्ञानाधिष्ठित, आत्मज्ञानजन्य व्यवहारातून व आत्मज्ञानाभिमुख मार्गदर्शक तत्त्वांचे जीवनाच्या सर्व क्षेत्रात पालन करण्यातून साकार होत आहे. गायींचे अशा संस्कृतीमधील महत्त्व केवळ उपयुक्ततावादी किंवा भोगवादी दृष्टिकोनातून ध्यानात घेणे अशक्य आहे. इतर सर्व कसोट्यांबरोबरच गायींचे मूल्यमापन त्यांच्या आत्मज्ञान सुलभ करण्याच्या क्षमतेच्या पार्श्वभूमीवरही केल्यास रहस्यभेद होऊन गायीच्या महत्त्वामागील खरे व सर्वात महत्त्वाचे कारण समजू शकेल, गोस्वामीत्वातील कृपाभाव आकलू शकेल. तुला साष्टांग दंडवत असोत.

**५९३) गोप्ता । गोप्त्रे नमः ।**

गुप्त आणि रक्षक. स्वत:च्याच मायेने स्वत:च्या आत्मस्वरूपाला भासमानतेने वेढून त्यात गूढपणे, गुप्तपणे राहणारा आणि भक्तांना ह्या सत्याची प्रचीती देणारा सर्वांचा आत्मस्वरूप रक्षणकर्ता तू आहेस. तुझ्या सतत स्मरणामध्ये तुला निरंतर वंदन असो.

**५९४) वृषभाक्षः । वृषभाक्षाय नमः ।**

सत्यधर्मदृष्टी असलेला. कृपाळू नेत्र असलेला. भक्तांची दृष्टी सत्यज्ञ बनवणारा व

तत्स्वरूप झालेल्या भक्तांचे संकल्प पूर्ण करणारा तूच आहेस. तुझी वैश्विकन्ययदर्शी दृष्टी भक्तांना देऊन तूच त्यांचे संकल्प न्याय्य बनवतोस व ते सिद्धीस नेतोस. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**५९५) वृषप्रियः। वृषाप्रियाय नमः। वृषः प्रियो यस्य सः।**

ज्याला धर्म अत्यंत प्रिय आहे व जो धर्माला अत्यंत प्रिय आहे असा. विश्वनियम, धर्म सात्मभावाने, समरसतेने जाणणारा व त्यांच्यावर निस्सीम प्रेम करणारा तू आहेस व तुझ्या कृपेने व तुझ्या भक्तीद्वारे विश्वधर्माचरण व विश्वधर्म पुष्ट आणि संतुष्ट होतात. म्हणून तू वृषप्रियः आहेस. तुला शतशः लोटांगणे असोत.

**अनिवर्ती निवृत्तात्मा संक्षेप्ता क्षेमकृच्छिवः।**
**श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमतांवरः॥**

**५९६) अनिवर्ती। अनिवर्तिने नमः।**

कधीही पराभूत न होणारा. सर्व द्वंद्वांची अपरिहार्य परिणती ज्या द्वंद्वातीततेत होते ते द्वंद्वातीतत्त्व तूच असल्याने व द्वंद्वातीतत्त्व हेच अंतिम कल्याण असल्याने तू अजिंक्य आहेस. चिरंतन विजयी अस्तित्वाने विश्वधर्माचा कायमचा आधार व रक्षक तू आहेस. तुला सादर प्रणाम असोत.

**५९७) निवृत्तात्मा। निवृत्तात्मने नमः।**

सर्व मर्यादिततेतून, संकुचिततत्त्वातून व अविद्येतून मुक्त असा आत्मा- अस्तित्व. दैहिक अस्तित्वाच्या व तद्नुषंगिक अविद्येच्या सर्व स्तरांवरील सर्व संकुचित प्रेरणांपासन सदैव मुक्त असा परमात्मा तू आहेस. वैराग्यवैभवशाली, सर्वशक्तिमान व विश्वकल्याणकारी अशा तुला विनम्र नमन असो.

**५९८) संक्षेप्ता। संक्षेप्त्रे नमः।**

(नियंत्रक बीजरूपाने) विश्वाचा संक्षेप करणारा. साऱ्या विश्वाचा पसारा व त्यातील असंख्य स्थित्यंतरांचे स्थित्यंतरातीत अशा स्वतःच्या अस्तित्वामध्ये शोषण करणारा आणि वैयक्तिक पातळीवर संकुचित अविद्याजन्य प्रेरणा, विचार, आचार यांचे हृदयांतर्यामीच्या जाणिवेच्या अतीत अशा ज्ञानकेंद्री उन्नयन व तरलतापूर्ण सूक्ष्मीभवन करणारा तूच आहेस. तुझ्याचरणी अखंड अभिवादन असो.

**५९९) क्षेमकृत्। क्षेमकृते नमः।**

चिरंतन कल्याण करणारा. तुझ्या एकनिष्ठ भक्तीने संपूर्ण व्यक्तित्वाचे सर्वंकष

स्थित्यंतर घडून येऊन ते तरलतम व कालातीत बनते. तत्स्वरूप बनते. तुझ्या तेजाने व सामर्थ्याने परिपूर्ण होते. पारतंत्र्य, असहायता, दुबळेपणा, दुश्चित्तता ह्यांपासून मुक्त होते. साऱ्या विश्वाचेच असे कल्याण करणारा म्हणून तू क्षेमकृत् आहेस. तुला कृतज्ञतापूर्वक नमस्कार असोत.

**६००) शिवः । शिवाय नमः ।**

शिवः म्हणजे पवित्र, शंकर (महादेव). शंकर हे सगुण रूप तुझेच असून (किंबहुना भजली जाणारी विश्वातील सर्व देवदेवताची सर्व रूपे तुझीच आहेत, यात तीळमात्रही शंका नाही. उत्क्रांतीच्या/विकासाच्या विविध टप्प्यावर असणाऱ्या जनसमूहांकडून (पुष्कळदा संकुचित लाभासाठीही) पूजिली-अर्चिली जाणारी विविध देवतरूपेदेखील मूलतः तूच आहेस. (सर्व धर्माची आदरस्थाने, पूजास्थानेसुद्धा मूलतः तूच आहेस) तुझ्या नामस्मरणाने, चिंतनाने, संकीर्तनाने तू सर्व जीवन पावित्र्याने भरतोस व व्यक्तिजीवनही शुद्ध करतोस. तुझ्याचरणी भक्तिपूर्वक लोटांगणे असोत.

**६०१) श्रीवत्सवक्षाः । श्रीवत्सवक्षसे नमः ।**

भृगु महर्षींच्या लत्ताप्रहराने झालेले श्रीवत्सचिन्ह छातीवर असलेला विष्णू हे तुझेच एक सगुण रूप. ह्या सगुण रूपाचा मथितार्थ म्हणजे, ब्रह्मपद तुझ्या छातीमध्ये आहे. ब्रह्मर्षी तुझ्या अंतःकरणावर आरूढ असतो. सर्वश्रेष्ठ भक्तांना तू तुझ्या उरी कवटाळतोस. ब्रह्मज्ञानाची, ब्रह्मर्षींच्या पावलानी पुनीत झालेली वाट तुझ्या हृदयातच समाप्त होते. तुझ्या निरंतर स्मरणात तुला माझे साष्टांग दंडवत असोत.

**६०२) श्रीवासः । श्रीवासाय नमः । श्री वसत्यस्मिन्निति श्रीवासः ।**

जिथे श्री, वैश्विक ऐश्वर्याची स्वामिनी महामाया लक्ष्मी निरंतरपणे वश होऊन वास करते असा. (त्याचप्रमाणे लक्ष्मीच्या हृदयाचा स्वामी, लक्ष्मीहृदयात वसणारा देखील.) विश्वाच्या अस्तित्वाचा भाग असलेले माझे अस्तित्व ही तुझीच माया आहे व माझ्या हृदयांतर्यामीचा स्वामी तूच आहेस. मी तुझी माया व तू माझा स्वामी हे ह्या मधुर भक्तीचे परमोच्च तथ्य आहे. तुला प्रेमपूर्वक अभिवादन असो.

**६०३) श्रीपतिः । श्रीपतये नमः ।**

लक्ष्मीपती. संपूर्ण चराचर ऐश्वर्याची साम्राज्ञी प्रकृती, माया, लक्ष्मी ही ज्ञानवैराग्यसंपन्न अशा तुझ्या अंकित आहे. तुझ्या आधीन आहे. तुझ्या स्वामित्वामध्ये माझे मस्तक तुझ्याचरणी लीन राहो.

**६०४) श्रीमतांवरः । श्रीमतांवाराय नमः ।**

आत्मज्ञानमार्गाधिकारी वेदकर्ते, आत्मज्ञानाधिकारी सृष्टिनिर्माता ब्रह्मदेव, आणि सर्व दृश्यादृश्य वैभवाची सम्राज्ञी लक्ष्मी आणि आत्मज्ञान ह्या सर्वांचा स्वामी असल्याने तुला श्रीमतांवरः म्हणजे सर्वोच्च श्रीमंत म्हणतात. तुला साष्टांग नमन असो.

**श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः ।**
**श्रीधरः श्रीकरः श्रेयः श्रीमाँल्लोकत्रयाश्रयः ॥**

**६०५) श्रीदः । श्रीदाय नमः ।**

लक्ष्मी (ऐश्वर्य) देणारा. तुझ्या कृपेने, तुझ्या प्रचीतीतून अंतर्बाह्य सर्वंकष उन्नयन होऊन तुझे ऐश्वर्य व सामर्थ्य भक्तांना प्राप्त होते म्हणून तुला श्रीदः म्हणतात. तुझ्या कृपेने लक्ष्मी माया अंकित होते, वश होते. तुझ्या या नावातील मायेवरील स्वामित्वाचे महान तत्त्व व्यक्ती व समष्टीच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. साऱ्या विश्वाची अर्थव्यवस्था, राजकारण, कायदे, उद्योग, शिक्षण, आरोग्य, शेती, संशोधन, क्रीडा, कला या सर्वांची आत्मज्ञानधिष्ठित फेररचना करणे, पुनर्बांधणी करणे हा कल्याणदायी विश्वसंस्कृतीच्या प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा, अनिवार्य व अतूट भाग आहे. संपूर्ण विश्व उदात्ततम परस्परसंबंधांबरोबरच ऐहिक समृद्धीने परिपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. तुझ्या भक्तांकडून तूच हे करून घेशील. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**६०६) श्रीशः । श्रीशाय नमः ।**

वैश्विक ऐश्वर्याच्या स्वामिनीचा - लक्ष्मीचा ईश्वर म्हणून श्रीशः लक्ष्मीनारायण ह्या तुझ्या सगुण रूपाचा मायेचा प्रभु हा गुह्यार्थ बोधप्रद आणि विश्वकल्याणकारी आहे. आत्मज्ञानाच्या दृष्टीतून सारे विश्व ही तुझी माया आहे व तत्स्वरूपातून प्रगट होऊन, तत्स्वरूपी राहून तत्स्वरूपी विलीन होणे ही एक स्थित्यंतराची बाब आहे. या स्थित्यंतरांतर्गत एक छोटेसे स्थित्यंतर म्हणजे मानवाचा इतिहास. शारीरिक, मानसिक, आर्थिक, राजकीय अशा असंख्य घटना व त्या घटनांबरोबरच तयार होणारे जाणिवेचे स्तर हे सारे ह्या स्थित्यंतरांतर्गत असतात. या जाणिवेच्या स्तरांचे वैशिष्ट्य असे की कधी बौद्धिक तर कधी कलापूर्ण, कधी वासनापूर्ण तर कधी भावनापूर्ण, कधी प्रज्ञा व प्रतिभासंपन्न तर कधी विकारग्रस्त अशा तऱ्हेने जाणिवांचे आविष्कार मनुष्यमात्रात घडत आले. सर्व काळी व सर्व जागी असे आविष्कार घडले. जगाच्या इतिहासात कुठे विज्ञान तर कुठे कला, कुठे क्रीडा तर कुठे संगीत, कधी स्थापत्य तर कधी गणित, कधी तंत्रज्ञान तर कधी जादू, विविध क्षेत्रात मानवाची जाणीव प्रगट झाली आहे. काही ठिकाणी गुलामगिरी तर काही ठिकाणी स्वैराचार, कुठे पक्की जातिव्यवस्था तर कुठे

मूर्तिभंजन, कुठे प्रचंड हिंसा तर कुठे आत्यंतिक अहिंसा, अशा स्वरूपात मनुष्याची जाणीव प्रगट झाली आहे. अनेक वेळा धर्मसंप्रदायांच्या तर पुष्कळदा हुकूमशहांच्या रूपात अन् कधी लोकसुखकारी तर कधी रक्तलांच्छित रूपात मानवी अंतरंग प्रगट झाले आहेत. परंतु ज्या तऱ्हेने पृथ्वी सूर्यमालेच्या अंतर्गत सूर्यमालेच्या नियमानी व सूर्यमाला संपूर्ण विश्व-अंतराळाच्या अंतर्गत आणि अधिक व्यापक नियमानी नियंत्रित होतात. त्याचप्रमाणे सारा मानव इतिहास हा मनुष्य जाणिवेलाही अंतर्बाह्य व्यापणाऱ्या शाश्वत व नियंत्रक, अवैयक्तिक सत्याच्या अधीन असतो. ह्या अवैयक्तिक, आणि माणसाने कल्पिलेला संकुचित हेतू नसलेल्या पण 'नियंत्रक' सत्यालाच, भक्त अनुभवतात व याचेच वर्णन आत्मसाक्षात्कार या शब्दाने होते. भक्त यालाच ईश्वराची भेट म्हणतात. तर इतर काहीजण याला शून्यावस्था, ब्रह्मसाक्षात्कार, समाधी, निर्वाण, इत्यादी म्हणतात. आत्मसाक्षात्काराने मनुष्य वैयक्तिकदृष्ट्या संकल्पशून्य होतो पण शून्यवत् होत नाही. अवैयक्तिक होतो पण बेभान होत नाही. शूर बनतो पण हिंस्त्र-आक्रमक होत नाही. शहाणा होतो पण शोषणकर्ता होत नाही. सहिष्णु होतो पण अडाणी व भाबडा नाही. आत्मसाक्षात्काराने मनुष्य संकुचित अस्तित्वातीत अस्तित्व, अनुभवत असल्याने ईश्वर किंवा ब्रह्म वगैरे संकल्पनानी, त्याचा अनुभव तो व्यक्त करतो. पण त्याच्या वेगळ्या अनुभवांवरून त्याला भ्रम झाला असा निष्कर्ष काढणे चूक असते. आत्मप्रचीतीने माणूस निस्पृह बनतो पण निराश नाही. तो वासनावश होत नाही पण म्हणून तो जीवशास्त्रीयदृष्ट्या वासनाहीन असत नाही. तो तरलतम बुद्धीमुळे काळाचा वेध घेतो व पुष्कळदा प्रतिसादाच्या बाबतीत इतरांहून वेगळा असतो. पण तो अजाण असत नाही. आत्मज्ञानी माणूस कोणत्याही धर्माच्या चौकटीत राहील असे नाही. पण तो धर्मद्वेष्टा, अन्यायी, हीन नसतो. तो देशातीत असतो पण देशद्रोही नसतो. तो वैश्विक आत्मीयतेने सारे अनुभवतो आणि त्याप्रमाणे वागतो. मनुष्य इतिहासात आत्मसाक्षात्काराचे अनेक प्रसंग घडले. आत्मसाक्षात्कार म्हणजे अवैयक्तिक अशी स्वरूपाची प्रचीती. या प्रचीतीने मानवाला सामर्थ्याचा वा अमरत्वाचा रस्ता दाखविला. परंतु जाणिवांच्या अतीत असलेले अस्तित्वानुभव शब्दात मांडणे, भावनेच्या योग्य धाग्यात गुंफणे, आचरणाच्या आकारात बांधणे किंवा बौद्धिक युक्तिवादाच्या तारेवरून वाहून नेणे ह्या बाबी कमीअधिक प्रमाणात घडल्या. परिणामी कधी माणूस समूह आत्मभ्रष्ट दास बनले तरी कधी अहंमन्य बनले. कधी क्रूर बनले तर कधी लाचार. धर्मांची वेगवेगळी रूपे, त्यांचे भिन्न आचार, वेदांचे नेति नेति म्हणणे, संतांचे चातुर्वर्ण्य मान्य करणे, मनुने व इतर स्मृतिकारांनी चातुर्वर्ण्य रूढ करणे किंवा पुढे अनेकानी स्मृतिग्रंथ जाळणे, स्वेच्छेने व जबरीचे धर्मांतर घडणे ह्या साऱ्या घटनांतून मानवी

जाणिवेची विभिन्न प्रगटने दिसतात. ऐतिहासिक भौतिकवादाचे पुरस्कर्ते, इतर अभ्यासक, विचारवंत भौतिक परिस्थितीवर मनुष्यांचे संबंध ठरतात असे किंवा मनुष्याच्या जाणिवेवर संबंध ठरतात असे प्रतिपादन करतात. ह्या दोन्ही दृष्टिकोनात सत्य आहे. परंतु ह्या दोनही मतांपैकी कोणतेही मत किंवा दोन्ही मते एकत्र घेतली किंवा कोणतीही विचारसरणी, विचारपद्धती, किंवा संप्रदायांची मते विचारात घेतली तरी मनुष्याच्या इतिहासाचे साद्यंत स्पष्टीकरण, कृतीबद्दलचे मार्गदर्शन व सामर्थ्य देऊ शकत नाहीत. त्यामुळे मूल्यसंभ्रम आणि अनाचार यात माणूस चिरफाडला जात आहे. याउलट, मानवी इतिहास हा आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रियेचा भाग असून अविद्याजन्य घडामोडींचे आघात सोसत सारी मानवजात अवैयक्तिकतेच्या महामार्गावर, अवैयक्तिक सत्याच्या, नियंत्रणाखाली व आत्मसाक्षात्कारी विभूतींच्या पावलावर पाऊल ठेवीत वाटचाल करीत आहे, याची जाणीव झाली की विश्व व व्यक्तीसाठी इतिहासाच्या नियंत्रक ईश्वराची म्हणजेच आत्मज्ञानाची म्हणजेच सत्याची कास जाणीवपूर्वक धरण्याचा महामार्ग निश्चित होतो व सोपा होतो. ईश्वरापासून येणे व ईश्वरात विलीन होणे हे अस्तित्वाच्या व जाणिवेच्या सर्व स्तरांचे, मानवी इतिहासाचे व व्यक्तिजीवनाचे एकमेवाद्वितीय शाश्वत वैशिष्ट्य आहे. आणि याचीच तर्कसंगत उपपत्ती म्हणजे उद्याचा मानवी समाज, (जो संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर व कार्ल मार्क्स आणि अन्य श्रेष्ठांच्या दृष्टिपथात होता व आहे) हे कळले की सर्व क्षेत्रातील सर्व व्यवहार आत्मज्ञानाधिष्ठित व आत्मज्ञानाभिमुख बनवणे हे सर्वश्रेष्ठ सामर्थ्यदायी कल्याणकारी मार्गदर्शक तत्त्व प्राप्त होते आणि असे कार्य सुरू होते. ही प्रक्रिया (नजरेत भरली नाही तरी) आजही समाजात काही प्रमाणात तरी चालू आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**६०७) श्रीनिवासः । श्रीनिवासाय नमः ।**

ज्याच्या हृदयात लक्ष्मी आहे असा. अंतर्बाह्य सर्वश्रेष्ठ सत्ता व वैभव असल्यामुळे लक्ष्मीनारायण हे तुझे सगुण रूप आहे. वैभवाची सत्ताधीश ज्याच्या अधीन आहे अशा तुझ्या स्मरणाने याचक वृत्ती निघून जाते. तुला शतशः प्रणाम असोत.

**६०८) श्रीनिधिः । श्रीनिधये नमः ।**

वैभवाचा साठा, ऐश्वर्याचा खजिना किंवा लक्ष्मीचे निवासस्थान, मूळस्थान. लक्ष्मी क्षीरसमुद्रातून बाहेर आली म्हणून सर्व वैभवाचा उगम अशा तुला समुद्र म्हणता येईल. पण असा समुद्र ज्यातून काळाचा, अंतरिक्षाचा व संपूर्ण वैश्विक ऐश्वर्याचा उगम होतो. तुझ्या स्मरणाने व्यक्तीला अविद्याजन्य दुर्बलतेतून मुक्ती मिळून सृजनशीलतेचा साक्षात्कार होतो व सामर्थ्याची प्राप्ती होते. तुला सदैव वंदन असो.

**६०९) श्रीविभावनः । श्रीविभावनाय नमः ।**

विश्वातील प्रत्येक घटना विवक्षित गुणधर्मानुसार शेवटास नेणारा कर्मफलरूपी ऐश्वर्य निर्माण करणारा. तुझ्या चरणी प्रणिपात असोत.

**६१०) श्रीधरः । श्रीधराय नमः ।**

लक्ष्मीचा आधार. ऐतिहासिक भौतिकतावादी, जड सृष्टीतून पुढे मानवी जाणीव तयार झाली या गृहीताचा आधार घेऊन त्याचा तर्कसंगत निष्कर्ष असा काढतात की मानवी जाणीव मानवी संस्कृती ही भौतिक परिस्थितीचे प्रतिबिंब किंवा परिणाम आहे. तसेच मानवीव्यवहार म्हणजे उत्पादनसाधनांच्या विकासाचा परिपाक आहे. वास्तविक मानवी जाणीव किंवा मानवी जीवन जड सृष्टीतून आले असे म्हणणे हीच एक गफलत आहे. विश्वाचे सजीव व निर्जीव हे वर्गीकरणच मुळात सजीवांच्या देहबुद्धीमुळे घडत असते. ते पूर्णसत्य नव्हे. सजीवसृष्टी व निर्जीवसृष्टी मूलतः एकात्म असून त्यातून जीवन वेगळे निघणे वा स्वतःच्या स्वरूपात प्रगट होणे याचा अर्थ ''जडतत्त्व हे मूळ कारण आणि जीवन हा केवळ दुय्यम परिणाम आहे'' असा काढणे चूक आहे. कारण जडातून जीवन आल्याचे जसे दिसते तसेच जीवनातून म्हणजेच चैतन्यातून जडत्व निर्माण होण्याचे उदाहरण म्हणजे काळ, अंतराळ, ऊर्जा व निर्जीव पदार्थांची उत्पत्ती. दुसरे महत्त्वाचे तथ्य म्हणजे सर्व स्थित्यंतरांच्या अतीत जे असते त्याला चेतन किंवा जड म्हणणे हे व्यक्तीच्या त्या अवैयक्तिक नियंत्रक सत्याच्या अनुभवावर ठरते. (माहितीच्या) देहबुद्धीजन्य ज्ञानाच्या आधारे ते निर्जीव ठरू शकते पण वैचारिक चौकट व वैयक्तिकता संपली तर तीच अवैयक्तिक नियंत्रक 'वस्तू' सर्वश्रेष्ठ चेतनेचा स्रोत असल्याची प्रचीती येऊ शकते. या दोन वेगळ्या अनुभवांमुळे अभ्यासक जडवादी व चिद्‌वादी अशा दोन प्रकारात विभागले जातात. परंतु त्या अवैयक्तिक, स्थित्यंतरातीत, नियंत्रक अस्तित्वाचा अनुभव सच्चिदानंदमय असू शकतो व त्याची माहिती (निष्कर्ष) जड असू शकते हे लक्षात घेऊन पुढील विचार केल्यास मूलभूत एकत्वाची खात्री पटते व वितंडवाद टळून पुढील जीवनाचे मार्गदर्शन मिळते. उत्पादनाच्या साधनांनुसार मानवी संबंधाचे स्वरूप बदलू शकते हे खरे परंतु उत्पादनाची साधने काही आपल्या आपणच तयार होत नाहीत, किंवा केवळ मानवही, निव्वळ स्वेच्छेच्या जोरावर ती बनवीत नाही, बनवू शकत नाही. इतिहास हा विश्वात्मक कालातीत नियंत्रक सत्याच्या किंवा अवैयक्तिकतेच्या सजीव, निर्जीव, नियंत्रणांतर्गत घडत असतो. त्यामुळे त्या अवैयक्तिक, नियंत्रक, विश्वात्मक, सत्याचा साक्षात्कार करून घेणे हे जडवादी किंवा चिद्‌वादी दोघांनाही मान्य होणे सयुक्तिक आहे. कारण जडवाद आणि चिद्‌वादातील

सत्याचा स्वीकार व मर्यादितांचा त्याग होऊन जडवादातील व चिद्वादातील शक्तिस्थळे एक होऊन उदात्त आणि संपन्न विश्वसंस्कृतीचा पाया घातला जाणे शक्य होईल. किंबहुना श्रेष्ठ विश्वसंस्कृतीच्या आविष्काराचा हाच एकमेव महामार्ग आहे असा काळाचा संकेत दिसतो. आत्मसाक्षात्कारातील विश्वसंस्कृती निर्मितीची ही शक्ती तुझ्या श्रीधरः या नावातून समजून येते. तुला शतशः दंडवत असोत.

**६११) श्रीकरः । श्रीकराय नमः ।**

वैभव देणारा किंवा वैभव, ऐश्वर्य ह्या ज्याच्या भुजा आहेत असा. चराचर विश्व ह्या भुजा (उपांगे) असलेला. तुझे भक्त तत्स्वरूप होतात व सर्व ऐहिक बाबींचे नियंते व भोक्ते बनतात. उद्याची संस्कृती व त्या संस्कृतीमधील राजकारण, शिक्षण, क्रीडा, मानवसंबंध, संशोधन, अर्थव्यवहार ह्या बाबींचा देखील आत्मा तू (तुझी प्रचिती) आहेस व ह्या बाबी तुझी (तुझ्या प्रचीतीची) उपांगे आहेत. तुला विनम्र अभिवादन असो.

**६१२) श्रेयः । श्रेयसे नमः ।**

मोक्ष. सारं विश्व व सारं जीवन तुझ्या कृपेने तुझ्याभोवती म्हणजेच सत्याभोवती जेव्हा जाणीवपूर्वक केंद्रित होतं तेव्हाच ते मोक्षप्रद म्हणजे खऱ्या अर्थाने श्रेयस्कर बनतं. तुझ्या भक्तीमुळे कृतीच्या हेतूला, कृतीला व तिच्या फळाला वैश्विक परिमाण प्राप्त होते. तुला आदरपूर्ण नमन असो.

**६१३) श्रीमान् । श्रीमते नमः ।**

लक्ष्मीवान. श्री म्हणजे लक्ष्मी, शक्ती, प्रकृती, माया, ऐश्वर्याची जननी. लक्ष्मीशिवाय तुझी कल्पनाच अशक्य आहे. लक्ष्मीसहित तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**६१४) लोकत्रयाश्रयः । लोकत्रयाश्रयाय नमः ।**

पारंपरिक दृष्ट्या स्वर्ग, मृत्यू, पाताळ किंवा सुषुप्ती, स्वप्न, जागृती ह्या सर्वांचा मूलाधार तूच आहेस. तात्त्विकदृष्ट्या असणे, नसणे, जाणीव, नेणीव इत्यादी अस्तित्वाच्या सर्व स्तरांचा आधार व अंतिम चिरंतन सांत्वनेचे अढळ स्थान तू आहेस. ह्याच कारणामुळे ज्ञानी व एकनिष्ठ भक्तांची सर्वांगीण व सार्वत्रिक कल्याणासाठी, केवळ तुझ्यावरच भिस्त असते. तुला विनम्र अभिवादन असो.

**स्वक्षः स्वंगः शतानन्दो नन्दिर्ज्योतिर्गणेश्वरः ।**
**विजितात्मा विधेयात्मा सत्कीर्तिश्छिन्नसंशयः ॥**

**६१५) स्वक्षः । स्वक्षाय नमः ।**

अशरीरी आणि आत्मज्ञानी असल्याने ज्याचे नेत्र सर्व पाहणारे व म्हणून सुंदर आहेत असा. तुझ्या सगुण रूपामध्येही तुझे डोळे सुंदर दाखविण्यामागील मथितार्थ हाच आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६१६) स्वंगः । स्वंगाय नमः ।**

सुंदर अंग असलेला. तू विश्वात्मक आहेस त्यामुळे तुझ्याइतके उत्तमांग इतर कुणाचेही नाही. तुझे भक्त विश्वातील अत्यंत रमणीय रूपे व विविध अनुभव घेताना विश्वात्मक अशा तुझे स्मरण तुझ्या कृपेमुळे करतात. तुझ्या खऱ्या अस्तित्वापासून भक्तांची जाणीव क्षणभरही ढळत नाही. तुझ्या निरंतर स्मरणात तुझ्याचरणी अखंड नमन असो.

**६१७) शतानंदः । शतानंदाय नमः ।**

विश्वामधील शेकडो प्रकारचे आनंद हे सच्चिदानंदमय अशा तुझेच अविष्कार होत. म्हणूनच भक्त आनंदाच्या प्रसंगी तुझे स्मरण करतात. जीवनातील सर्व सुखाच्या प्रसंगात तुझे स्मरण राहू दे व तुझ्या पायावर लोटांगण राहू दे.

**६१८) नन्दिः । नंदये नमः**

परमानंद. अवैयक्तिक, शाश्वत, नियंत्रक अस्तित्वाच्या साक्षात्कारामध्ये चिरंतन सामर्थ्याची व आनंदाची प्राप्ती होते. तुला निरंतर वंदन असो.

**६१९) ज्योतिर्गणेश्वरः । ज्योतिर्गणेश्वराय नमः ।**

आत्मज्ञानलक्षी सुसंस्कृतीचा मार्ग दाखवणाऱ्या व त्यासाठी सामर्थ्य देणाऱ्या श्रेष्ठ विभूतींचा ईश्वर (आत्मा) तू आहेस. तुला शतशः प्रणाम असोत.

**६२०) विजितात्मा । विजितात्मने नमः ।**

म्हणजे विश्वसंकल्पी विश्वमनाचा जेता किंवा स्वामी. अविद्या-माया इत्यादींवर विविध मार्गांनी मात करीत अवैयक्तिक, शाश्वत, नियंत्रक, सच्चिदानंदमय अस्तित्वाचा साक्षात्कार तुझ्या कृपेने घेणारे भक्त तुझेच अवतार आहेत. तुला आदरपूर्ण नमन असो.

**६२१) विधेयात्मा । विधेयात्मने नमः ।**

काहींच्या मते अविधेयात्मा. विधेयात्मा म्हणजे केवळ ईश्वरी संकल्पानुरूप कार्य करणारा (ईश्वर वा ईश्वरी अवतार). अविधेयात्मा म्हणजे कोणत्याही नियमानी कधीच

बद्ध नसणारा, कुणाच्याही अंकित नसलेला (ईश्वर). मथितार्थ, कोणत्याही संकुचित प्रेरणेने कार्यरत नसणारा केवळ शुद्ध ज्ञानप्रेरणेतून ज्याचे कार्य अव्याहत चालू राहते असा. तुला शतशः दंडवत असोत.

**६२२) सत्कीर्तिः । सत्कीर्तये नमः ।**

सत्य हीच ज्याची कीर्ती आहे असा किंवा ज्याची कीर्ती सत्य आहे (फसवी, पोकळ व परिणामशून्य नाही) असा. भक्त हृदयात अवतीर्ण होणारी तुझी जाणीव, अनुभूती आणि तुझ्याप्रमाणेच तुझ्या भक्तांना देखील इतरांच्या हृदयात जे स्थान मिळते तीच खरी कीर्ती. इतर सर्व प्रसिद्धी फसवी व वांझोटी असते. तुझ्या स्मरणातील व संकीर्तनातील हे सामर्थ्यदायी व कल्याणकारी सत्य भक्तांना उमजलेले असते. त्यामुळे ते तुझ्यामध्ये समरस होऊन तुझ्या कीर्तीचा डंका पिटत राहतात. तुझ्या नामाचा गजर करत राहतात. तुझ्या गुणगानात उभे आयुष्य खर्च करून जीवन सार्थकी लावतात. ही सारी तुझीच कृपा. तुझ्याचरणी विनम्र प्रणिपात असोत.

**६२३) छिन्नसंशयः । छिन्नसंशयाय नमः ।**

संशय रहित. संशयाचे मूळ अनिश्चिततेत असते. होय की नाही? कोणत्याही संदर्भात या प्रश्नाचे उत्तर नसले की संशय येतो. तुझे अस्तित्वच, ''होय की नाही?'' या सजीवांच्या मर्यादित बुद्धीतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या अतीत असल्याने संशयातीत आहे व विश्वातील प्रत्येक बाबींविषयी नियंत्रणपूर्ण ज्ञान असलेल्या तुझ्यामध्ये अनिश्चिततेचा लवलेशही नसतो. भक्तांच्या हृदयात संशयरहित असं आत्मज्ञान उत्पन्न करून (तुझी प्रचीती देऊन) त्यांचे अस्तित्व आणि त्यांची प्रत्येक कृती तू शुद्ध ज्ञानमय व परमकल्याणकारी बनवतोस. तूच त्यांच्या वाणीतून तुझा अमृतमय, चैतन्यमय कृपाप्रसाद सर्वांपर्यंत पोहचवून भक्तांचे व इतरांचे जीवन सच्चिदानंदमय बनवतोस. तुझ्याचरणी मस्तक कायम स्थिरावो.

**उदीर्णः सर्वतश्चक्षुरनीशः शाश्वतस्थिरः ।**
**भूशयो भूषणो भूतिर्विशोकः शोकनाशनः ॥**

**६२४) उदीर्णः । उदीर्णाय नमः ।**

अस्तित्वाच्या आणि अनुभवाच्या सर्व स्तरांच्या अतीत असलेला. तू कालातीत आहेस. तसेच व्यक्तीने, व्यक्ती म्हणून घेण्याच्या अनुभवातीत आहेस. ज्या क्षणी व्यक्ती तुझा अनुभव घेते त्या क्षणापासून व्यक्ती, व्यक्ती म्हणून मरत जाते. हा मृत्यू म्हणजेच अमर व विश्वात्मक जीवन होय. तुझ्या आठवणीत अशा तऱ्हेने मृत्यू पावत माझे

सर्वस्व तुझ्याचरणी अर्पण होऊ दे.

**६२५) सर्वतश्चक्षुः । सर्वतश्चक्षुषे नमः ।**

चराचरांतर्यामी असल्याने तुझी अशरीरी दृष्टी सर्व व्यापून असते, सर्वत्र असते हा अर्थ. व्यक्तीच्या संदर्भात व्यक्तीचे दृक्ज्ञान हे तुझे कार्य आहे. तुझ्या अस्तित्वाशिवाय दृक्ज्ञान असंभव आहे. याचा मथितार्थ सर्वांतर्यामी असणारा खरा ज्ञाता तू आहेस. कारण तू जड व चैतन्य निर्जीव व सजीव यांच्या अतीत आहेस. म्हणूनच व्यक्तीमधील अनुभव घेणारा खरा 'स्व' तू आहेस असे म्हणतात. या संदर्भात एक प्रतिवाद असा की तुझ्या अस्तित्वाशिवाय डोळे पाहू शकत नाहीत हे जर खरे तर जे पाहू शकत नाहीत (उदा. मेंदूतील रक्तस्रावामुळे, त्यांच्यात तू असत नाहीस का? याचे उत्तर असे की कणाकणांतर्गत, सजीवांतर्गत व ज्ञान्यांतर्गत असणारा तू ज्ञात्याची जी भूमिका बजावतोस त्याचा एक लहानसा पैलू डोळ्यानी पाहणे हा आहे. त्यामुळे हा पैलू नसला तरी तू नाहीस असे होत नाही. कारण त्या कार्यावर तुझे अस्तित्व व ज्ञातेपण अवलंबून नाही. उलट ते कार्य तुझ्या अस्तित्वामुळे घडून येते. प्रत्येक कणाकणांपासून ते ज्ञान्यापर्यंत त्यांच्या अंतःश्चक्षूनी (जे तुझेच आहेत) तूच सर्व काही (जे तुझेच आहे) पाहतोस. तुझे हे स्वरूप तर्कातीत असल्याने अत्यंत तर्कदुष्ट आणि अवास्तव भासणारे आहे. अर्थात तुझे कार्य संकुचित मेंदूच्या चौकटीत न बसणे व 'असण्याच्या' ढोबळ अवस्थेत 'नसणे' यामुळे तुझी प्रचीती घेतलेल्यांना काहीच फरक पडत नाही. तुझ्या कृपेने त्यांची तुझ्याविषयीची खात्री भक्कम होत जाते. तुला नम्र नमन असो.

**६२६) अनीशः । अनीशाय नमः ।**

तू शाश्वत, अवैयक्तिक, नियंत्रक, सजीव-निर्जीवातीत, स्थित्यंतरातीत, सच्चिदानंदमय अस्तित्व असल्याने कुणीही तुझा स्वामी नाही. तू सर्वांचा सर्वकालीन स्वामी आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**६२७) शाश्वतः स्थिरः । शाश्वतः स्थिराय नमः ।**

चिरंतन, अचल, कधीही न बदलणारा. सर्व घटनांचा कर्ता, धारणकर्ता व घटनांना सामावणारा तू आहेस. तू स्थित्यंतरातीत आहेस. अनादि अनंत (जन्म-मृत्यू, उत्पत्ती-विलयरहित), स्थिर आहेस. तुझ्या आठवणीत संपूर्ण चित्ताचा व वैयक्तिकतेचा विलय व्हावा हीच तुझ्या भक्तांची एकमेव इच्छा असते. तुझ्याचरणी शिरसाष्टांग दंडवत असोत.

**६२८) भूशयः । भूशयाय नमः । भूः शेते अस्मिन् इति भूशयः ।**

चराचर विश्व, असंख्य घडामोडींच्या गर्दीत, ज्या सर्वश्रेष्ठ स्थानी संपूर्ण विश्रांती

अनुभवू शकते, असे स्थान तू आहेस. तुझ्या, योगनिद्रावस्थेतील चिरशांत, अस्तित्वातीत अस्तित्वावर, घटनांनी भरलेले विश्व आधारलेले आहे, पहुडले आहे. त्यामुळे कल्पांती विश्व ज्यामध्ये विश्रान्ती घेते तो तूच आहेस. व्यक्तीच्या संदर्भातही हे महत्त्वाचे आहे. जे जे आहे ते ते जर स्थित्यंतरातीत अशा तुझ्या आधाराचे आहे व नसल्यानंतरही तुझ्यात राहणार आहे तर तोच नियम व्यक्तीलाही लागू पडतो. व्यक्तीही, घालमेलीने भरलेल्या जीवनात तुझ्या आधाराने आहे व मृत्यूनंतर तुझ्यात राहणार आहे. तुझ्या कृपेने भक्तांना या सत्याची व त्यांच्या मृत्यूनंतरच्या अस्तित्वाची जाण येते व ते स्थिरबुद्धीने जिवंतपणी व मृत्यूनंतर तुझ्यात विसवतात. तुला शतशः कृतज्ञ प्रणाम असोत.

**६२९) भूषणः । भूषणाय नमः ।**

सुशोभित करणारा. तुझ्यामुळे विश्वाला शोभा आहे. ही शोभा जाणण्याची दृष्टीही तुझ्यामुळे आहे. विश्वातील शोभेचा व शोभा अनुभवण्याचा मूलाधार नियंता तू आहेस. म्हणूनच वैयक्तिक व वैश्विक पातळीवरील सौंदर्यानुभवातील आल्हाददायकता रमणीयता व आनंद (शोभा) तुझ्यामुळेच आहे. तुझ्या रमणीय आठवणीत तुला सतत वंदन असो.

**६३०) भूतिः । भूतये नमः ।**

सत्तामय अस्तित्व. स्थित्यंतरातीत, शाश्वत, नियंत्रक, भौतिक, सजीव-निर्जीवातीत, जड-चैतन्यातीत, जाणीव-नेणीवातीत, अस्तित्वातीत अस्तित्व म्हणून भूतिः तुला साष्टांग नमस्कार असोत.

**६३१) विशोकः । विशोकाय नमः ।**

तू व तत्स्वरूप झालेले भक्त सतत आत्मानंदरूप व आत्मानंदमय असल्याने त्यांच्या या सामर्थ्यवान व चैतन्यमय अस्तित्वांपर्यंत अज्ञानमूलक संकुचितपणा, पराधीनता, दुःख व शोक पोचत नाहीत म्हणून तुला विशोकः म्हणतात. तुला शतशः प्रणाम असोत.

**६३२) शोकनाशनः । शोकनाशनाय नमः ।**

दुःख नष्ट करणारा. भक्तांना तुझ्या नामस्मरणाची गोडी लावणारा व त्यांचे संकुचित अस्तित्व, संकुचित विचार, संकुचित अहंकार, संकुचित आशा-आकांक्षा आणि त्यांच्या पाठोपाठ येणारे अभावाचे दुःख अत्यंत प्रभावीपणे समूळ नष्ट करणारा तू आहेस. तुझ्या प्रचीतीने तहानेचे तहानपण, आशेचे आशापण साफ नष्ट करणारा असा तू आहेस. किंबहुना तहानेची तहान, आशेची आशा, भुकेची भूक, विचारांचा विचार,

भावनेची भावना, संवेदनेची संवेदना अशा तरलतम आविष्काराने तू भक्तांची जाणीव अत्यंत सूक्ष्म आणि अत्यंत वेगवान बनवतोस. त्यामुळे सर्व तऱ्हेच्या संकुचित भावभावनांच्या मागून होणाऱ्या फरफटीतून भक्त पूर्णपणे मुक्त होतो. जीवन दु:खमुक्त करणाऱ्या तुला सविनय वंदन असो.

**अर्चिष्मानर्चित: कुम्भो विशुद्धात्मा विशोधन: ।**
**अनिरुद्धोप्रतिरथ: प्रद्युम्नोऽमितविक्रम: ।।**

**६३३) अर्चिष्मान् । अर्चिष्मते नम: ।**

तेजोमय. विश्वातील सर्व तेजोमयतेचा तू मूळस्त्रोत मूलाधार आहेस. तेजाचे तेजपण तुझ्यातच आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६३४) अर्चित: । अर्चिताय नम:**

ज्याची पूजा होते असा. मानवी इतिहासामध्ये वेळोवेळी स्वत:ची प्रचीती देऊन भक्तांकडून स्तुती, पूजा, प्रेम, भक्ती प्राप्त करतोस. त्यांच्या अंतर्यामी, त्यांच्या जाणिवेच्या गाभ्यामध्ये, त्यांचाच 'स्व' म्हणून तू त्यांना संशयातीत प्रचीती (अत्यंत अंत:करणपूर्ण निकटचा अनुभव) देतोस. त्यामुळे त्यांचे सर्वस्व ते तुझ्याचरणी अर्पण करतात. विश्वकल्याणाची नांदी अशी तुझी पूजा; क्षुद्रत्व, लाचारी, फसवेपणा नाहीसा करते. धर्म कोणताही असला तरी निस्वार्थ व निष्काम भक्तांकडून होणारी कल्याणकारी पूजा-अर्चा प्राप्त करणारा तू भावनेच्या उच्च स्तरावरील विश्वाची एकात्मता अनुभवाला आणून देतोस. तसेच मोक्षाच्या विरोधात येणारे सर्व काही (धर्म, विचार, प्रथा इत्यादींचे बाह्यांग) गौण होणार आहे, याची स्पष्ट ग्वाही हृदयाकाशातील तुझ्या वाणीने देतोस. तुला शतश: दंडवत असोत.

**६३५) कुंभ: । कुंभाय नम: ।**

कुम्भ: म्हणजे कलश, घागर. सारे विश्व, सारं जीवन, सारं तेज, काळ, जाणिवा सर्व काही ज्याच्यात सामावलं आहे असा कुंभ तू आहेस. तुला विनम्र लोटांगण असो.

**६३६) विशुद्धात्मा । विशुद्धात्मने नम: ।**

म्हणजे अत्यंत शुद्ध आत्मा. तू जड-चैतन्यातीत, सजीव-निर्जीवातीत अत्यंत शुद्ध जाणिवेच्याही अतीत असा शुद्धतम आत्मा आहेस. अविद्या-मायेपासून पूर्णत: अलिप्त आहेस. तुला निरंतर वंदन असो.

**६३७) विशोधनः । विशोधनाय नमः ।**

सर्वव्यापी, सर्वसंचारी आणि गुणातीत असल्याने तू मर्यादिततेचा व तज्जन्य हलाखीचा नाश करतोस. जीवन शुद्ध ज्ञानाने भरतोस. अज्ञान व तज्जन्य विकारांचा पगडा नाहीसा होणे हीच खरी शुद्धी, जी तू भक्ताला प्राप्त करून देतोस. ज्ञानमय शुद्ध अंत:प्रकाशात जगणारे लोक वैश्विक जीवन शुद्ध करतात. हीच खरी युगप्रवर्तक क्रांती, जी तुझ्या कृपेने कमी-अधिक प्रमाणात अंशाअंशाने विविध रूपात विविध काळी आणि विविध ठिकाणी घडून येते. तुला विनम्र अभिवादन असो.

**६३८) अनिरूद्धः । अनिरूद्धाय नमः ।**

ज्याला कुणीही रोखू शकत नाही, पराभूत करू शकत नाही असा. तू महाशक्तिमान आणि विश्वनियमांचा नियंता असल्याने तुला रोखणारा कुणीही नाही. दुसऱ्या अर्थाने विश्वरचनेच्या अंतर्भूत असे चार व्यूह म्हणजे वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध तूच आहेस. कारण तू विश्वात्मक आहेस. (हे व्यूह म्हणजे विशिष्ट अंतराळ-काळातील काही रचना/घटना/मांडण्या असू शकतील.) तुला भावपूर्ण नमन असो.

**६३९) अप्रतिरथः । अप्रतिरथाय नमः ।**

प्रतिस्पर्धी, प्रतिद्वंद्वी, शत्रू, विरोधक नसलेला. परिमाणातीत, सर्वसमावेशक, सर्वांतर्बाह्य व काळांतर्बाह्यही असल्याने तुला विरोधक नाही. तू सर्व द्वंद्वांच्या अतीत आहेस. तुझे भक्तही लाभ-तोटा, सुख-दु:ख, आशा-निराशा, शत्रु-मित्र, काळा-गोरा, मालक-नोकर, राजा-गुलाम, मान-अपमान, अशा सर्व द्वंद्वांच्या अतीत व म्हणून निर्वैर असतात. तुला शतशः नमस्कार असोत.

**६४०) प्रद्युम्नः । प्रद्युम्नाय नमः ।**

श्रीमंत. तसेच, विश्वरचनेच्या व्यूहातील तिसरा व्यूह. विश्वरचनात्मक आणि ऐश्वर्य सान्निध असणारा म्हणून तुला प्रद्युम्नः म्हणतात. तुला विनम्र वंदन असो.

**६४१) अमितविक्रमः । अमितविक्रमाय नमः ।**

असंख्य पराक्रम करणारा, असंख्य पावले टाकणारा, विश्वातील असंख्य प्रक्रिया म्हणजे ज्याच्या पाऊलखुणा आहेत असा. तसेच असंख्य अस्तित्वांचे व जाणिवांचे स्तर पार करणारा आणि भक्तांकरवी हे सर्व स्तर पार करवून घेऊन त्यांना स्वस्वरूपी स्थिर करणारा. अन्य दृष्ट्या पराज्ञानामध्ये व परावाणीवाटे क्रमण, संक्रमण करणारा व घडवणारा म्हणूनही तू अमितविक्रमः आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**कालनेमिनिहा वीरः शौरिः शूरजनेश्वरः ।**
**त्रिलोकात्मा त्रिलोकेशः केशवः केशिहाहरिः ।।**

**६४२) कालनेमिनिहा । कालनेमिनिघ्ने नमः ।**

कालनेमि दैत्याला मारणारा हे सगुण रूप. अन्य दृष्ट्या कालातीत अस्तित्वाने विश्वातील सर्व काही कल्पांताच्या वेळी काळासकट स्वत:मध्ये शोषून घेणारा. अन्य अर्थाने काळ ही मर्यादित अस्तित्व व तज्जन्य बुद्धीतून निर्माण झालेली संकल्पना आहे. ज्या क्षणी अवैयक्तिता प्रचीतीस येते त्या क्षणी भक्तांवरील काळाचा प्रभाव व काळाचा पगडा नष्ट होतो. म्हणून तुझ्याप्रमाणेच तुझ्या भक्तांसाठीही काळाचे अस्तित्व राहत नाही. ते केवळ सच्चिदानंदमय होऊनच राहतात. म्हणूनही तुला कालनेमिनिहा म्हणतात. तुला कोटी कोटी दंडवत असोत.

**६४३) वीरः । वीराय नमः ।**

सर्व तऱ्हेच्या संकुचित देहबुद्धीजन्य अज्ञानाचा अशरीरी, जड-चैतन्यातीत ज्ञानमयतेने फडशा पाडणारा सर्वशक्तिमान ज्ञानी ईश्वर तूच आहेस. तुझ्या प्रचीतीने भक्तांनाही तू हे गुणातीत सामर्थ्य प्रदान करतोस. तुला माझे कृतज्ञतापूर्वक भावपूर्ण वंदन असो.

**६४४) शौरिः । शौरये नमः ।**

शूर या यादव कुळात जन्म घेतलेला कृष्ण आणि दुसरा अर्थ अजिंक्य क्षमता असलेला. श्रीकृष्ण ह्या तुझ्या सगुण रूपातून तुझ्या अजिंक्य क्षमतेची जाणीव व्हावी हे अनुस्यूत असते. तुझ्या स्मरणात तुला शतशः दंडवत असोत.

**६४५) शूरजनेश्वरः । शूरजनेश्वराय नमः ।**

शूरांची शूरता व शूरतेचीही शूरता किंवा शूरतेचा उगम व कर्ता तू आहेस. शूरांच्या अंतर्बाह्य राहून शौर्य प्रगट करणारा म्हणून शूरजनेश्वर: म्हणजे शूरांचा ईश्वर तू आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**६४६) त्रिलोकात्मा । त्रिलोकात्मने नमः ।**

तिन्ही लोकांचा आत्मा. याचा मथितार्थ तू अस्तित्व व जाणिवेच्या सर्व स्तरांना अंतर्बाह्य व्यापणारा त्यांचे खरे स्वरूप व नियंता आहेस. तुला माझे विनम्र अभिवादन असो.

**६४७) त्रिलोकेश: । त्रिलोकेशाय नम: ।**

तिन्ही लोकांचा म्हणजे सुषुप्ती, जागृती व स्वप्न ह्या तिन्ही पातळ्यांचा ईश्वर, नियंता, ज्ञाता. सर्व परिस्थितीत व जाणिवेच्या सर्व अवस्थांमध्ये अस्तित्वाचे नियंत्रण करणारा. तुझ्याच कृपेने भक्तांना हे ज्ञान होते व मनाच्या सर्व अवस्थांमध्ये तुझीच आनंददायी निकटता लाभून या सत्याचा प्रत्यक्ष अनुभवही येतो. तुला मन:पूर्वक नमन असो.

**६४८) केशव: । केशवाय नम: ।**

म्हणजे लांबसडक सुंदर केस असणारा कृष्ण. ह्या सगुण रूपाचा मथितार्थ साऱ्या विश्वाला ऊर्जा देणारा, चैतन्य देणारा, ज्ञानकिरण व सामर्थ्याचे अमृतकिरण देणारा असा होतो. तसेच क म्हणजे ब्रह्मदेव व श्व म्हणजे शिव हे दोन्ही तुझ्यातून उत्पन्न झाले म्हणजेच उत्पत्ती, स्थिती व विलय तुझ्याच आज्ञेने होतात. तुझ्यामुळेच होतात म्हणूनही तुला केशव म्हणतात. तुला त्रिवार वंदन असो.

**६४९) केशिहा । केशिघ्ने नम: ।**

केशि नावाच्या दैत्याचा वध करणारा. ह्या सगुण रूपातून अध्यात्म आणि ईश्वरसाधना यांचे थेट समाज जीवन मूल्यपद्धतीशी असलेले नाते व दुष्टत्वावरील सुष्टत्वाची मात स्पष्ट होतात आणि समाजजीवन व व्यक्तिजीवनामध्ये ठोस मार्गदर्शन मिळते. तुला शतश: प्रणाम असोत.

**६५०) हरि: । हरये नम: ।**

म्हणजे हरण करणारा. तू भक्तांचे अज्ञान, अज्ञानास कारण अशी देहबुद्धी, त्यांचा अहंकार, त्यांचे मन, त्यांचे दु:ख, त्यांचे संपूर्ण संकुचित अस्तित्वच हरण करतोस. म्हणून तुला हरि: म्हणतात. त्यांच्या अंतर्बाह्य राहून तू त्यांची जाणीव स्वत:मध्ये शोषून त्यांना त्यांच्या अवैयक्तिक 'स्व'ची त्यांना प्रचीती देतोस. तुला माझे साष्टांग नमन असो.

**कामदेव: कामपाल: कामी कान्त: कृतागम: ।**
**अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनन्तो धनंजय: ॥**

**६५१) कामदेव: । कामदेवाय नम: ।**

अत्यंत विलोभनीय ईश्वरी अनुभव तसेच धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे सारे देणारा सामर्थ्यवान आणि आकर्षक ईश्वर तू आहेस. अन्य दृष्ट्या सर्व तऱ्हेच्या इच्छांचा

कर्ता-कामनांचा ईश्वर. प्रत्येक इच्छा, आकांक्षा, वासना, आसक्ती यांचा कारक तू आहेस या जाणिवेने भक्त रसिकतेने परिपूर्ण असे जीवन जगतो व आत्मज्ञानाचा व्यावहारिक आदर्श आविष्कृत करतो. आजच्या संदर्भात पाहता भक्तांच्या वैयक्तिक आकांक्षाचे उन्नयन विश्वकल्याणाच्या आकांक्षेत होणे व त्या उन्नत आकांक्षाची पूर्ती होणे हीच भक्तांवरील तुझी कृपा होय. तुला निरंतर वंदन असो.

**६५२) कामपालः । कामपालाय नमः ।**

सर्व कामनांचा निर्माता व संगोपनकर्ता. संपूर्ण चराचरामधील प्रत्येक अणुरेणुच्या संकल्पशक्तीचा जनक तू आहेस आणि वैयक्तिक पातळीवर प्रत्येकाच्या हृदयातील विविध आशा-आकांक्षांचा जनकही तूच आहेस. तुझी प्रार्थना म्हणजे कामनांच्या निर्मात्याची प्रार्थना, कामना ज्याच्यापासून व ज्याच्या अंकित आहेत अशाची प्रार्थना. अशा तऱ्हेने कामनांच्या मुळाशी जो गेला तो तद्रुप झाला. वैयक्तिकदृष्ट्या वासनातीत कामनातीत झाला. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६५३) कामी । कामिने नमः ।**

कामनांचा उगम व सिद्धसंकल्प असल्यामुळे सर्व इच्छा तृप्त झालेला किंवा इच्छा (अपूर्णतेचे लक्षण) नसणारा किंवा दुसऱ्या प्रकारे पाहिल्यास, कामी म्हणजे सर्वश्रेष्ठ अशी विश्वनिर्मिती-स्थिती-प्रलय यांची इच्छा करणारा. तुझ्याप्रमाणे वैयक्तिकदृष्ट्या इच्छाहीन होणे किंवा विश्वसंकल्प व विश्वप्रक्रियेत सहभागी होणे या दोन्ही तऱ्हांनी भक्त तत्स्वरूप होतो. इच्छा नसणारा या अर्थातील मथितार्थ असाही निघतो की कार्य-कारण, भाव-अभाव, इच्छा-इच्छापूर्ती अशा कोणत्याही प्रसंगाना स्थळकाळातीतपणे व्यापणारा व म्हणून कधीही इच्छेने लडबडून न जाणारा. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**६५४) कान्तः । कान्ताय नमः ।**

याचे दोन अर्थ आहेत. १) ब्रह्मदेवांचा संहारकर्ता २) सुंदर. उत्पत्ती, स्थिती व विलय तसेच जाणिवेचीही उत्पत्ती, स्थिती, विकास व लय यांचा नियंता व म्हणून ब्रह्मदेवालाही शेवटी स्वत:मध्ये विलीन करणारा अमर व सुंदर ईश्वर तू आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**६५५) कृतागमः । कृतागमाय नमः ।**

श्रुती, स्मृती (आगम) यांचा कर्ता, जो नव्या युगाचा प्रारंभ करतो. काहींच्या मते कृत युगाचा आरंभकर्ता. तर वेगळ्या दृष्टीने कृतागमः म्हणजे चराचराचा निर्माता.

मानवी इतिहासात स्वत:ला विविध प्रकारे प्रगट करणारा व जीवनामध्ये क्रांतिकारक परिवर्तने घडवून आणणारा. निस्पृहता होती. श्रुती केवळ बुद्धिगम्य नाहीत. त्यामुळे त्यांच्यामध्ये असलेले पृथ्वीच्या उगमाचे तर्कशास्त्रीय, बौद्धिक विश्लेषणही आज पटले किंवा नाही तरीही आत्मानुभवाधिष्ठित श्रुती या आजही साऱ्या विश्वाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. स्मृतींची रचना खरे तर तर्कसंगत समाजविचारावर आधारलेली होती. पण त्यांच्यात अंतर्भूत असलेला तपशील समाजाचे भौतिकज्ञान व प्रगल्भता यांच्या मर्यादांमुळे दोषपूर्ण बनत गेला. आज ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाची एवढी प्रगती झाली तरी स्मृतीला बौद्धिक आव्हान उभे होऊ शकलेले नाही, आणि पर्यायी व्यवस्था तयार होऊ शकलेली नाही. कारण स्मृतिप्रणीत समाजव्यवस्थेमध्ये बहुसंख्य व्यक्तींची सुबत्तेची ओढ दडपतानाच घातक स्वैराचाराची ओढदेखील दडपण्यात आली. ही विषम समाजव्यवस्था व जातिभेद शोषितांकडूनही स्वीकारला गेला. कारण तो मनुने एक वा अनेक व्यक्ती वा समाजघटकांना केवळ सुरचित केलेला पण वास्तविक पाहता मनुष्यस्वभावाचा, नैसर्गिक आचार होता व अजूनही आहे व म्हणूनच तो विषम असूनही जगात सर्वत्र वेगवेगळ्या स्वरूपात टिकला, व तो रूढ करणारा मनु युगप्रवर्तक ठरला. त्या मनुच्या रूपांमध्ये तेव्हा युगप्रवर्तक ठरलेला तू आज ती संपूर्ण व्यवस्था आत्मज्ञानाच्या पायावर प्रभावीपणे न्याय्य व्यवस्था रूपांतरित करणारा (कृतागम:) आहेस. कारण ''प्रत्येक युगाला वेगळी न्याय्य व्यवस्था आणणारा शासक'' हा मनु ह्या शब्दाचा अर्थ आहे. नुसत्या सदिच्छा व सहानुभूती किंवा आक्रस्ताळेपणा वा हिंसाचाराने न्याय्य व्यवस्था येऊ शकत नाही. तूच आत्मज्ञानीधिष्ठित, विविधांगी व सहिष्णु विश्वसंस्कृतीचा निर्माता आहेस. नव्या युगाचा निर्माता आहेस. तुझ्या या कार्यामध्ये प्रत्येक क्षण व्यतीत होताना तुला शतश: लोटांगणे असोत.

**६५६) अनिर्देश्यवपु: । अनिर्देश्यवपुषे नम: ।**

जो दाखविता येत नाही आणि समजावून देता येत नाही. तू अस्तित्वाच्या सर्व स्तरांच्या अतीत सर्व काही अंतर्बाह्य व्यापल्यामुळे तुला दाखविण्यासाठी, दाखवणारा, बघणारा व बघण्याची वस्तू (तू) हे वेगळे असण्याची अट पूर्ण होत नाही. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानामध्ये याची दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या दृष्टीने न जाणता येण्यासारखी क्षेत्र, बाबी असतात ज्यात तुझा समावेश होतो. तू भूत-वर्तमान-भविष्य सारे व्यापल्यानेही तुला दाखवणे अशक्य आहे. संकुचित अस्तित्व कायम ठेवून तुला दाखवणारा व बघणारा कुणीही कधीही असू शकत नाही. परंतु अस्तित्ववाद्यानी ज्यांची नोंद घेतलेली दिसत नाही ते अवैयक्तिक आत्मज्ञानी तुझा थेट अनुभव घेतात व तुझ्या कृपेने इतराना देऊ शकतात. फक्त या प्रक्रियेमध्येही दाखवलेले, दाखवणारा व

ज्याला दाखवले असा, हे तिन्हीही वेगळे राहात नाहीत. भक्तांच्या अंतर्यामी प्रचीती देणाऱ्या अनिर्देश्यवपुः अशा तुला कृतज्ञ वंदन असो.

**६५७) विष्णुः । विष्णवे नमः ।**

सारे काही अंतर्बाह्य व्यापणारा. तुझे अस्तित्व, 'अस्तित्व' शब्दाच्या रूढार्थाच्या अतीत आहे. देव ही संकल्पना भीती, असुरक्षितता, व्यावहारिक गरज, भावनिक गरज, निसर्गनियमांविषयीचे अज्ञान वगैरे विविध कारणातून उत्पन्न झाली आणि टिकली असली तरी देवाची वेदांती कल्पना ही अत्यंत शाश्वत व सत्य अनुभवातूनच विकसित झालेली आहे. ती तर्कसाध्य नाही हे जसे खरे तसेच ती अनुभवसाध्य अनुभवास येऊ शकणारी प्रचितीस येणारी आहे हेही खरे आहे. आज वैज्ञानिक दृष्ट्या कोणतीही वस्तु नाश पावत नाही, केवळ स्थित्यंतरित होते ही बाब सिद्ध झाली आहे. जिवंत मनुष्याने तो व इतर सर्वकाही स्थित्यंतरित होते ही बाब सिद्ध झाली आहे. जिवंत मनुष्याने तो व इतर सर्व काही स्थित्यंतरित झाल्यानंतर 'जे काही असते' त्या 'वस्तूचा', अवैयक्तिक जाणिवेने जिवंतपणी अनुभव घेतला व त्याला देव, ईश्वर, ब्रह्म वगैरे म्हटले. पण हा अनुभव घेताना त्याला हेही हळुहळु पण निश्चितपणे जाणवले, की त्याला आलेली प्रचीती वास्तविक त्या वस्तूनेच त्याला करून दिलेली आहे. अवैयक्तिक, नियंत्रक, स्थित्यंतरातित, जड चैतन्यातीत, सजीव-निर्जीवातीत ईश्वराने व्यक्तीला त्याच्याशी समरस करून घेणे हा एक श्रेष्ठतम अनुभव व मानवी संस्कृतीचा आधार म्हणून अब्जावधी लोकांकडून शतकानुशतके वर्णन केला गेला. कारण ह्या अनुभवामध्ये व्यक्तीचे संकुचित अस्तित्व संपणे, स्वातंत्र्य, सामर्थ्य, आनंद, सुरक्षितता, निर्भयता, विश्वात्मकता अनुभवाला येणे असे उदात्ततम पैलू अंतर्भूत असल्याचे विविध भक्तांच्या अनुभवास येत गेले. आजच्या परिस्थितीत मानवाने तुझ्यावर अंधश्रद्धा ठेवणे हे अत्यंत घातक आहे हे जेवढे खरे तेवढेच स्वतःची संकुचितता झटकून तुझी अनुभूती घेण्याची संधी न घेणेही मूर्खपणाचे आहे. प्रखर बुद्धीने सत्याचा शोध घेत, प्रत्येक अनुभव भौतिक वास्तव्याच्या कसोटीवर घासून पाहत आणि संकुचित देहबुद्धीजन्य दंभाच्या प्रभावातून तुझ्या कृपेने बाहेर पडल्यास तुझी प्रचिती शक्य आहे. तुझी प्रचिती म्हणजे स्थित्यंतरातीत, नियंत्रक अवैयक्तिक अवस्थेमध्ये परिणत होणारे भक्तांमध्ये घडून येणारे स्थित्यंतर. ह्या क्रांतिकारक प्रगल्भतम अवस्थेमध्ये अंतर्बाह्य शुद्ध बुद्धी, विशाल वैश्विक दृष्टी, सहिष्णुता, निःस्पृहता, आनंद व सामर्थ्य येते. ही अवस्था म्हणजेच विश्वसंस्कृतीच्या विहंगम आविष्काराचे कालातीत नियंत्रक बीज होय. अवैयक्तिक, नियंत्रक, स्थित्यंतरातीत, जड-चैतन्यातीत, कालातीत, सजीव-निर्जीवातीत, शाश्वत अशा हे अस्तित्वा- हे ईश्वरा- विश्वसंस्कृतीच्या तुझ्या या महान् संकल्पाच्या सिद्धीत

माझे जीव व्यतीत होवो. तुझ्या चरणी माझे प्रणिपात असोत.

**६५८) वीरः । वीराय नमः ।**

म्हणजे धैर्यवान, साहसी. संकुचित, दुबळा, असुरक्षित, नसल्याने व अमर असल्याने धैर्य हा ज्याचा स्थायीभाव असतो असा अशरीरी ईश्वर तू आहेस. भक्तांनाही तुझ्या स्वयंभु, स्वयंपूर्ण, स्वतंत्र आणि सामर्थ्यवान प्रचितीने तू वीर बनवतेस. तुला साष्टांग नमन असो.

**६५९) अनन्तः । अनन्ताय नमः ।**

स्थळ काळातीत असल्याने स्थित्यंतरातीत असा व ज्याचा अंत नसल्याचे मर्यादित बुद्धीने सिद्ध करणे अशक्य आहे असा. तुला माझे शतशः प्रणिपात असोत.

**६६०) धनंजयः । धनंजयाय नमः ।**

अर्जुन. या सगुण रूपातून सर्वोच्य धैर्य, शौर्य आणि ईश्वराशी एकात्मता या गुणांकडे निर्देश करण्यात आला आहे. गुणातीत व सर्वगुणसंपन्न अशा तुला सविनय अभिवादन असो.

**ब्रह्मण्यो ब्रह्मकृद् ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः ।**
**ब्रह्मविद्ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः ।।**

**६६१) ब्रह्मण्यः । ब्रह्मण्याय नमः ।**

तप, शास्त्रे, सत्य, ज्ञान इत्यादी ज्याला प्रिय आहेत असा. दुसऱ्या दृष्टीने ब्रह्मन् म्हणजे जीव ज्याला प्रिय असतो असा. अनादी-अनंत अशरीरी अस्तित्वाने जाणिवेच्या उच्चतम स्तराने मोक्षदायी जाणिवेला निकटतेने आकर्षून घेणारा (व मोक्ष देणारा) तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**६६२) ब्रह्मकृत् । ब्रह्मकृते नमः ।**

वगैरे मोक्षदायी ज्ञानाचा खरा कर्ता तू आहेस. कारण साक्षात्कारी पुरुषांचे अस्तित्व, त्यांची जाणीव व त्यांचे कार्य यांचा खरा उद्गाता व नियंता तूच आहेस. तुला विनम्र वंदन असो.

**६६३) ब्रह्मा । ब्रह्मणे नमः ।**

ब्रह्मदेव. या सगुण रूपातून तुझा सृजनशीलतेचा गुण दिग्दर्शित केला जातो. तुझ्या कृपेने महात्म्याना प्राप्त होणारी विश्वकल्याणकारी सृजनशीलताही तूच आहेस. तुला

नम्र प्रणाम असोत.

**६६४) ब्रह्म। ब्रह्मणे नमः। बृहत्वात् ब्रह्म। किंवा सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म।**

सर्वात मोठा, व्यापक, सत्य, अफाट व ज्ञानमय. सर्व धर्मियांकडून विविध रूपात पूजला जाणारा तसेच नास्तिकांकडून शून्य किंवा अस्तित्वात नाहीसच असे समजला जाणारा तसेच पुष्कळांकडून वैयक्तिक इच्छे-आकांक्षेच्या अतीत शक्ती म्हणून मान्य झालेला आणि लाखोंना ज्याच्या अस्तित्वाविषयी होय किंवा नाही असा कोणताही अभिप्राय देता येत नाही असा गुणरूपातीत, सर्वव्यापी, स्थित्यंतरातीत नियंत्रक तूच आहेस. तुला अखंड वंदन असो.

**६६५) ब्रह्मविवर्धनः। ब्रह्मविवर्धनाय नमः।**

विश्वनियमांचे व विश्वनियंत्याचे (म्हणजे तुझे स्वतःचे) संपूर्ण व अचूक ज्ञान एकात्मभावाने (कारण ब्रह्म तूच आहेस) असणारा तूच आहेस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**६६७) ब्राह्मणः। ब्राह्मणाय नमः।**

ज्याची जाणीव ब्रह्ममय, ब्रह्मभूत असून शरीर केवळ याच जाणिवेत वावरते असा एकपणाने (ब्रह्म व तो एक आहेत अशा तऱ्हेने) ब्रह्म जाणणारा (अनुभवणारा), उदात्त मानवी कल्याणकेंद्राचा चालता बोलता आविष्कार म्हणजे ब्राह्मण. ब्राह्मणाच्या पोटी जन्मणारा तो ब्राह्मण. उच्च कुळात, उच्च जातीत जन्मणारा तो उच्च आणि नीच जातीत जन्मणारा तो नीच हा चुकीचा अर्थ अनेक कारणांमुळे शतकानुशतके रूढ आहे.

१) सर्वसामान्यपणे ''शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'' हे पुष्कळांना पटते. कारण निसर्गामध्ये आंब्याच्या झाडाला आंबा व काल्र्याच्या झाडाला कार्ली येतात हे हरघडी दृष्टोत्पत्तीस येते.

२) व्यवहारामध्ये वांशिक व जातीय अशा बाह्य वैशिष्ट्यांमुळे व आनुवंशिकता निरीक्षणात आल्यामुळे जन्मजात उच्चनीचत्वाच्या कल्पनांना काही प्रमाणात पुष्टी मिळाली. उदा. सर्वसामान्यपणे गायकाच्या मुलाच्या रक्तात गायकी व हुशार आईबापांच्या मुलात हुशारी असणे.

३) कौटुंबिक (जातीचे) वातावरण ज्याचा गरोदर स्त्रीची मानसिक अवस्था, व आचरण यांच्यावर आणि त्या अवस्थेचा व आचरणाचा अपत्यावर परिणाम होतो.

४) व्यावसायिक वातावरणाने जाती वैशिष्ट्ये घडतात. उदाहरणार्थ, कुंभाराचा

मुलगा बालपणापासून अत्यंत प्रेमळ माता-पिता-बंधु-भगिनीच्या सहवासात अत्यंत नैसर्गिकपणे कुंभारकाम शिकतो. बालपणामध्येच कुंभारकला, प्रत्यक्षानुभव, व्यावसायिक नीतीमत्ता आणि उपजीविकेचे समाजोपयोगी साधन त्याला मिळते.

५) समाजाला सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, अध्यात्मिक आदि विविध बाबींमध्ये मार्गदर्शन करणे (म्हणजे मुहूर्त, अनुष्ठाने, संस्कार, विद्यादान, वगैरे ब्राह्मणांची कामे) व्यापक कल्याणकारी अधिष्ठानामुळे उच्च समजले गेले. कारण भौतिक व वैज्ञानिक प्रगतीच्या आणि अध्यात्मिक उन्नतीच्या त्या टप्प्यावर समाजाला अशा नेतृत्वाची गरज होती. आजही बऱ्याच प्रमाणात आहे.

६) जातीबद्धता व बलुतेदारीच्या चौकटीत बहुसंख्य व्यक्तींची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा दडपली गेली तरीही वैयक्तिक स्वार्थांधताही चिरडत गेली त्यामुळे वैयक्तिक स्वार्थानुसार व्यवसाय करण्यावर बंधने आली आणि अनागोंदी टळली. यामुळे परस्परावलंबी, परस्परपूरक जाती-व्यवसाय-आचार तयार झाले आणि जातीव्यवस्था घट्ट झाली आणि विषय असूनही टिकून राहिली. या व्यवस्थेमध्ये सुसंवादी सुसूत्रता पूर्ण समाजस्थैर्याला प्रथम प्राधान्य व वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व उत्कर्षाला दुय्यम स्थान होते. त्यामुळे विषमता व चातुर्वर्ण्यावस्था कोणत्याही जातीकडून व्यापक प्रमाणावर अन्याय्य समजली गेली नाही. एवढेच नव्हे तर सामाजिक स्थैर्याच्या दृष्टिकोनातून विविध नियम व रूढी बनत गेल्या व व्यक्तिस्वातंत्र्याची वा काही समूहांची गळचेपी झाली तरीही स्वीकारल्या गेल्या. विशेषत: धर्म हा समाजजीवनाचा मूलाधार मानला गेला असल्याने धर्मविरोध/धर्मबाह्य वर्तन आदींसाठी वाळीत टाकण्यापासून मृत्यूदंडापर्यंत अनेक कठोर शिक्षा देखील रूढ झाल्या आणि समाजाकडून स्वीकारल्या गेल्या असाव्या. पाप-पुण्याविषयीच्या कल्पना, गुन्हेगारीची भावना, पश्चात्तापाची भावना, सामाजिक व्यवस्थेची बांधिलकी व तिच्यावर अवलंबून असणे यांमुळे सर्व स्तरांमध्ये कमी अधिक प्रमाणावर विषम जातीव्यवस्था स्वीकारली गेली असावी. पाप-पुण्याच्या कल्पनांमध्ये बापाने केलेले पाप मुलाने भोगून संपवण्याची कल्पनाही होती. त्यातूनही वंशपरंपरागत उच्चनीचतेला व अस्पृश्यतेला खतपाणी मिळाले असणे शक्य आहे.

७) जातीव्यवस्था आणि उच्चनीचता जशा दृढमूल होत गेल्या तशी पापाचे फळ नीच जातीत जन्म घेऊन व पुण्याचे फळ उच्च जातीत जन्म घेऊन भोगावे लागते तशी कल्पनाही दृढ झाल्यामुळे साहजिकच, पुण्य करणाऱ्याला जन्म घेण्यासाठी उच्च आणि पाप्याला पुढचा जन्म घेता यावा म्हणून नीच जाती असणे स्वीकारार्ह ठरले असावे.

साहजिकच पुण्यपुरुष पुढच्या जन्मी उच्च कुळात जन्म घेतो असा विचार रूढ होऊन जातीय बंधने पापपुण्यानुसार जन्मापूर्वी निश्चित व्हायला आणि न्याय्य समजली जाण्याला व त्यामुळे जन्मापासून-मृत्यूपर्यंत कायम राहायला मदत झाली असावी. ईश्वरभक्त द्रष्ट्या संतांना स्मृतीप्रणीत जातीव्यवहारातील अन्याय, संपूर्ण समाजाला आत्मज्ञानाचे परिमाण दिल्यास नष्ट होईल हे कळले व त्यामुळे त्यांनी सर्वांच्या अध्यात्मिक प्रबोधनावर व उन्नतीवर भर दिला. समतावादी विचारवंतानी व्यावहारिक समतेचा पुरस्कार केला. परंतु त्यांची ही मागणी उदात्त मानवी प्रेरणेतून, करुणेतून किंवा असंतोषाच्या उद्रेकातून झाली होती. त्यांच्या विषमता नाकारण्याच्या/ नापसंतीच्या वृत्ती व चळवळींनी जातीव्यवस्थेसमोर ठोस पर्याय ठेवला नाही. आज समजून घ्यायला हवे की अध्यात्मिक उन्नतीची प्रक्रिया व्यक्तीला संकुचितपणाकडून विशालपणाकडे घेऊन जायला व कटुत्व कमी व्हायला तर फुले-मार्क्स-आंबेडकरादींची लोक-जागरण व अन्यायविरोधाची प्रक्रिया भौतिक स्वातंत्र्य व सुबत्तेसाठी उपयुक्त ठरली. परंतु अध्यात्मिक उन्नती आणि भौतिक समृद्धी यांचा मेळ (जो अत्यावश्यक आहे) बसलेला नाही हे सत्य आहे. शतकानुशतके टिकलेली आज कालबाह्य झालेली जातीव्यवस्था संकुचितपणाकडून विशालत्वाकडे गेल्याशिवाय खऱ्या अर्थाने जाणार नाही. कारण वैयक्तिक संकुचितता आहे तोपर्यंत नवे घातक भेदभाव तयार होत राहणारच. याची उदाहरणे जगात जेथे चातुर्वर्ण्यावस्था नाही तिथे देखील आजही आढळतात. तेव्हा जर जातीव्यवस्था प्रभावीपणे घालवायची असेल तर आत्मज्ञान, विज्ञान, द्रष्टेपणा, व्यावहारिक शहाणपणा यांची कास धरून त्यावर आधारलेली राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक वगैरे धोरणे अस्तित्वात आणायला हवीत व राबवायला हवीत. ही प्रेरणा व शक्ती, काया, वाचा, मनाने व बुद्धीने सत्याचा शोध घेण्याने आणि भगवन्नामस्मरणाने येते. ऋषी-मुनी व संतांनी दिलेल्या भगवन्नामाचा आजच्या काळातील संदर्भ व महत्त्व हे असे आहे. चातुर्वर्ण्य मानलं म्हणून संतांवर कितीही आगपाखड केली व समाजवादाचा कितीही उदोउदो केला तरी आजही जगाच्या कानाकोपऱ्यातून काळ्यांना, आदिवासीना, परधर्मीयांना, परजातीयांना शोषित जातींना, शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्यांना किंवा घाणेरडी (साफसफाई) कामे करणाऱ्यांना जी वागणूक मिळते ती लक्षात घेतली तर समतेच्या संकल्पनेची परवड झालेली दिसते.

सत्याच्या व आत्मज्ञानाच्या अप्रतिहतपणे वाढत जाणाऱ्या व पसरत जाणाऱ्या जाणिवेमुळेच जन्मजात लहानमोठेपणा व त्याच्याशी निगडीत अन्याय्य भावना आणि व्यवहार (जन्म मृत्यूच्या अतीत अशा जाणिवेत) विरघळून जाऊ शकतात. सारं विश्व

ब्रह्मजाणिवेने ओतप्रोत भरून जाणं, हा केवळ जन्माधिष्ठितच उच्चनीचता, भेदाभेद आणि कटुता नव्हे तर धर्माधिष्ठित, भाषाधिष्ठित, प्रांताधिष्ठित, अर्थाधिष्ठित, वंशाधिष्ठित, व्यवसायाधिष्ठित उच्चनीचता व असे सर्वप्रकारचे भेदाभेद व कटुता मोडून काढण्याचा मार्ग आहे. नैसर्गिक फरक राहणे पण जन्मोजन्मीची, पिढ्यान् पिढ्यांची, आयुष्यभरची बंधने न राहणे, अन्याय भावना व व्यवहार न राहणे, आत्मोन्नती, सत्याचा शोध व प्रचिती आणि भौतिक सुबत्ता ह्यांची महाद्वारे एकाच वेळी सर्वांना खुली होणे हा जातीव्यवस्था व इतर भेदांचा तर्कशुद्ध, वास्तविक, कल्याणकारी व रास्त शेवट आहे. सक्तीचा वर्णसंकर किंवा अन्य कोणत्याही कृत्रिम उपायांनी (ते न्याय्य व करुणापूर्ण वाटले तरी) नव्हे तर सत्याची कास धरूनच विश्वकल्याणकारी व व्यक्तिकल्याणकारी संस्कृती प्रत्यक्षात येईल. स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध, काळा-गोरा, पशु-मानव, उंच-ठेंगू, बुद्धिमान-निर्बुद्ध, भावनाप्रधान-वासनाप्रधान, सत्तापिपासू-निरीच्छ असे जीवनाचे सर्व पैलू समतेच्या तत्त्वाने नव्हे तर स्वातंत्र्याच्या स्वात्म्यत्वाच्या तत्त्वानेच एकात्म होतील. परस्परपोषक व कल्याणकारी होतील. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६६८) ब्रह्मी । ब्रह्मिणे नमः ।**

इथे ब्रह्म म्हणजे वेद-वेदान्त वगैरे आत्मज्ञानदायी सर्व ग्रंथांचा आशय. त्याचा हा आशय सामावणारा, म्हणजेच मानवी प्रज्ञेला आकळलेले सर्वकाही प्रत्यक्षात ज्याच्यात अंतर्भूत आहे असा. तुला माझे विनम्र नमन असो.

**६६९) ब्रह्मज्ञः । ब्रह्मज्ञाय नमः ।**

ब्रह्म जाणणारा. तू स्वतःच खऱ्या अर्थाने स्वतःला (ब्रह्माला) जाणतोस. ब्रह्मज्ञानी व म्हणून विश्वामध्ये ब्रह्मज्ञान संचारण्यासाठी एकमेव श्रेष्ठतम मार्गदर्शक तू आहेस. तसेच यासाठी विश्वामध्ये सामर्थ्य ओतणाराही तू आहेस. समानतेच्या पुरस्कर्त्यांना आणि संकुचित देहबुद्धिजन्य बुद्धिवादाचा अट्टाहास धरणाऱ्यांना तुझ्या प्रचितीनेच अंतर्बाह्य प्रगल्भतेचा व समृद्धीचा महामार्ग सापडू शकतो व तो आचरण्यास सामर्थ्याचा स्त्रोतही मिळू शकतो. आई-मुलामधील समानता नसतानाही असलेले महान नाते किंवा कोणत्याही तर्काचा पाया नसतानाही असणारे मनुष्यांमधील परस्परविषयक प्रेम यांमधून प्रगल्भ होत गेल्यावर प्रचितीस येणारे ब्रह्मज्ञान हे विश्वसंस्कृतीचा, पाया, नियंत्रक बीज व सामर्थ्यस्त्रोत आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**६७०) ब्राह्मणप्रियः । ब्राह्मणप्रियाय नमः ।**

ब्राह्मणांना प्रिय असणारा तू सर्वश्रेष्ठ गुरू, सहाय्यक, मार्गदर्शक व आत्मज्ञानप्रक्रियेचा, आत्मसाक्षात्काराचा नियंत्रक कर्ता आहेस. त्यामुळे ब्राह्मणांना

प्रिय आहेस आणि आत्मसाक्षात्कारी व आत्मसाक्षात्काराच्या निकट जाणारे असे जे (कमी-अधिक) ब्राह्मण आहेत ते तुला प्रिय आहेत व तू त्याना साक्षात्कार देतोस. तुला कृतज्ञ नमस्कार असोत.

**महाक्रमो महाकर्मा महातेजा महोरगः ।**
**महाक्रतुर्महायज्वा महायज्ञो महाहविः ॥**

**६७१) महाक्रमः । महाक्रमाय नमः ।**

म्हणजे मोठी पावले टाकणारा. वामनावतार. याचा मतितार्थ असा की तू विश्वव्यापी व काळातीत असून विश्वातील अनंत पातळ्यांवरील असंख्य अस्तित्वांच्या संबंधातील विविध घटना व विभिन्न घटनाक्रमांचा, त्या घटनाक्रमांमधील परस्पर संबंधांचा शास्ता आहेस. सर्व काही गणनातीत एकात्मतेने (जे एकाच वेळी एकही असते व अनंतही असते) व्यापणारा, धारण करणारा आहेस. तुला अखंड नमन असो.

**६७२) महाकर्मा । महाकर्मणे नमः ।**

म्हणजे मोठी कार्ये पार पाडणारा. तू, साऱ्या दृश्यादृश्य विश्वाचा मूलाधार, निर्माता, नियंता, ज्ञाता व सर्वसत्ताधीश असून हे सर्व महानतम कार्य पार पाडतोस. जाणिवेच्या विवक्षित पातळीशिवाय ही अनुभूती येत नाही. त्यामुळे तुला (सत्य) जाणण्याचा प्रयत्न करणे हेच एकमेव महानतम कार्य मनुष्यजीवनाचा आणि विश्वव्यवहाराचा केंद्रबिंदू आहे. ध्येय आहे. हेतू आहे. साध्य आहे. साधन आहे. त्यामुळे अंधश्रद्धेपोटी तुझ्यावर विश्वास ठेवणे आणि भीतीपोटी तुझी यथासांग पूजा-अर्चा-अनुष्ठाने करणे करवून घेणे हे मुक्तीचे साधन नव्हे. तसेच स्वतःच्या मर्यादित संकुचित अस्तित्वाची सार्थ जाण न ठेवता देहबुद्धीमुळे येणारा दुराभिमान बाळगणे व अहंकारजन्य स्वार्थांध स्वैराचार करणे हेही कल्याणाचे साधन नव्हे. मुंज, लग्न, पूजा इत्यादी कोणताही विधि हा मूलतः आत्मज्ञानाचे साधन असतो. त्याचप्रमाणे मंत्र, तंत्र, यज्ञ-याग, नामस्मरण, स्तोत्रपाठ, वगैरे तुझ्या प्राप्तीचीच साधने होत. जगातील सर्व प्रकारच्या लोकांनी (तुझ्या कृपेने निर्माण होणाऱ्या स्वेच्छेने जर हे ध्यानात घेतलं तर सर्व प्रथा व विधी (मूलतः आत्मज्ञानाचे मार्ग) सर्वांना खुले होऊन जो-तो स्वतःच्या कुवती-सोयीनुसार स्वतःच्या व इतरांच्या कल्याणाचा प्रयत्न करील व एकात्म सहृदयतेवर आधारलेली आत्मज्ञानावर आधारलेली विश्वसंस्कृती प्रत्यक्षात आणील. कर्मकांडे, प्रथा, रूढी, रिवाज, पूजापद्धती, मंत्रतंत्र, विधी, संस्कार, परंपरा ह्यामागे असलेले तथ्य गूढ आहे त्यामुळे ते सामान्य माणसावर न लादता सोपे नाम संतांनी सर्वांना दिले हा त्यांचा

सूज्ञपणा होय. परंतु यापुढे तुझे भक्त कधी मुंज केलेले ख्रिश्चन तर कधी दर्ग्यात प्रार्थना करणारे हिंदू. कधी ते पूर्णपणे एकाच धर्माचा किंवा साधनामार्गाचा निष्ठेने पाठपुरावा करणारे असू शकतील तर कधी कोणतीही रूढी न पाळणारे. पण ते सर्व (आत्मज्ञानाने) तुझ्या भक्तीने एकमेकाशी अतूटतेने बांधलेले असतील. हे महानतम युगप्रवर्तन घडविणाऱ्या तुला शतशः नमस्कार असोत.

**६७३) महातेजाः । महातेजसे नमः ।**

उच्चतम सर्वाधिक तेज असलेला. शरीरातील अणुरेणुपासून ते अंत:प्रज्ञा व तर्कप्रज्ञा वगैरे जाणिवांचे स्तर चेतवणारा तेजोनिधी तू आहेस. त्याचप्रमाणे विश्वातील परमाणूंपासून ते आकाशगंगांपर्यंत सर्वांना तेज प्रदान करणारा तेजाचा महासागर तू आहेस. माझे सर्वस्व तुझ्या चरणी लीन असो. जाणिवेच्या सर्व अवस्थांमध्ये मस्तक तुझ्या चरणांवर राहो.

**६७४) महोरगः । महोरगाय नमः ।**

मोठा नाग. पृथ्वी धारण करणारा शेष हे तुझेच सगुण रूप आहे. तू जडतत्त्वाचा आधार आहेस हा मतितार्थ. वैयक्तिक पातळीवर उर्ध्वगामी संवेदना, भावना, वासना, वृत्ती व इच्छांच्या घुसळण्यातून जी वैश्विक जाणीव प्राप्त होते ती बीजरूपाने (सुप्त कुंडलिनीच्या रूपात) अस्तित्वात असतेच. म्हणूनही महोरगः हे नाव सयुक्तिक आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६७५) महाक्रतुः । महाक्रवते नमः ।**

सर्वश्रेष्ठ त्याग किंवा यज्ञ. परमपवित्र अशा आत्मरुपात स्वयंभू असूनही विश्वव्यापारांमध्ये असणे व विश्वकल्याण साधणे हीच उदात्ततम प्रकिया व हाच सर्वात मोठा यज्ञ होय. वैयक्तिक पातळीवरून पाहिल्यास, संपूर्ण अस्तित्व तुझ्या चरणी अर्पण करते (तुझ्या संकल्पात गुंतवणे) ही यज्ञप्रकिया असून तिची कर्ताही तू व ती प्रक्रियाही तूच आहेस. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**६७६) महायज्वा । महायज्वने नमः ।**

मोठा यज्ञ करणारा. मानवी जाणविची क्षितीजे विस्तृत करीत मानवकल्याणाच्या महामार्ग मोकळा करणारा तू आहेस. तुझ्या प्रचितीतून ज्याच्या त्याच्या गुणधर्मानुसार महामना विश्वसंस्कृतीची विविध रूपे बहरतील यात शंका नाही. हा सत्कार्यरूपी यज्ञ करणाऱ्या तुला निरंतर वंदन असो.

**६७७) महायज्ञः । महायज्ञाय नमः ।**

मोठा यज्ञ. यज्ञाचा दुसरा अर्थ सर्व काही स्वाह्य करणारा असा होतो. वैश्विक व वैयक्तिक पातळीवर सर्वजण अखेर तत्त्वस्वरूप होतात. ही तत्त्वस्वरूप होण्याची प्रक्रिया म्हणजे यज्ञच होय. तो देखील तूच आहेस. यज्ञकर्ता, यज्ञप्रक्रिया व यज्ञसाधन हे सर्व तूच आहेस. कारण जपयज्ञ जो तुला प्राप्त होण्याचे साधन आहे तोही तूच आहेस. तुझ्या नावाचे प्रेम, भक्ती हेही तूच आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**६७८) महाहविः । महाहविषे नमः ।**

महान अर्पण द्रव्य. सारे विश्व, भक्तांचे संकुचित अस्तित्व, त्याना होणारी तुझ्या प्राप्तींची इच्छा, तुझे नाव, तुझ्या नामाचा जप हे सर्व तुलाच प्राप्त होणारे तुझ्यामध्ये समरस होणारे महान हविद्रव्य देखील तूच आहेस. तुला सादर प्रणाम असोत.

**स्तव्यः स्तवप्रियः स्तोत्रं स्तुतिः स्तोता रणप्रियः ।**
**पूर्णः पूरयिता पुण्यः पुण्यकीर्तिरनामयः ॥**

**६७९) स्तव्यः । स्तव्याय नमः ।**

स्तुत्य, पूजनीय. जगामध्ये विविध धर्मियांकडून व पंथीयांकडून आणि नास्तिकांकडूनही (त्यांच्या सद्भावना व जगण्यातून) भजला जाणारा व भजला जाण्यास योग्य असा केवळ तूच आहेस. माणूस कोणत्याही धर्माचा किंवा विचारांचा असला तरी संकुचित देहबुद्धीचा त्याग झाला की त्याला हे सत्य पूर्णपणे पटते. आज जगभरात देहबुद्धीमुळे विशिष्ट पूजापद्धती, राज्यपद्धती, समाजपद्धती, आचार किंवा समता, बंधुत्व, लोकशाही, सामाजिक न्याय, शोषणमुक्ती इत्यादींचा जे कुणी आग्रह धरतात त्या सर्वांना तुझ्या कृपेने तुझ्या प्रचितीचा लाभ होऊन आयुष्यभर जोपासलेल्या विचार व मूल्यांमधील मूळ आशय(तपशिलात फरक पडला तरी) साध्य होण्याचा महामार्ग सापडेल. त्यांचे व एकूण मानवी समाजाचे जीवन तद्रुप होऊन आत्मेश्वरी संस्कृती उदयाला येईल. तुझी स्तुती जाणीवपूर्वक होऊ लागेल. तुला अखंड वंदन असो.

**६८०) स्तवप्रियः । स्तवप्रियाय नमः ।**

ज्याला स्तुतिप्रिय असते असा. वरवर पाहता याचा अर्थ गौरव, प्रशंसा हे सारे आवडणारा किंवा त्याच्या मागे लागणारा असा होतो. पण तो अर्थ साफ चूक आहे. तुझ्या स्तुतीमध्ये एक महान तत्त्व आहे. हे महान तत्त्व म्हणजे संकुचित अहंकाराचा त्याग. तुझी सतत स्तुति करण्याची देहासक्ती व देहबुद्धी हळुहळु पण निश्चितपणे कमी होतात. त्याच्या भावना, वासना व बुद्धी अधिकाधिक विशाल व तरल होत जातात.

तो अधिकाधिक वैयक्तिक बनतो. हे सारे भक्तांमध्ये घडवणारा तू असतोस. पण तरीही जाणिवेच्या पातळीवर हे भक्ताला स्पष्टपणे कळते ते असे की तुझ्या स्तुतीच्या वाटे तो अधिकाधिक तन्मय झाला, तुला प्रिय झाला. तुझ्या सगुण रूपाची स्तुति असो वा निर्गुण निराकार आत्मरूपाची परिणाम एकच. तो म्हणजे देहबुद्धीचा ऱ्हास. तुझ्या प्रितीची आणि सामर्थ्य व विवेकाची प्राप्ती. तुझ्या वैश्विक कल्याणाच्या प्रक्रियेत सामील होण्याची अखंड तळमळ. विष्णुसहस्त्रनामस्त्रोत्राचे वाचन, पठण, मनन, चिंतन हे सारे करणारा तुझी स्तुतिच करत असतो. तो तुझ्या समिप येणे तुला प्रिय होणे ही तुझीच योजना आहे. विश्वाचे असे सर्वकष कल्याण करणाऱ्या तुला पुनः पुनः कृतज्ञ वंदन असो.

**६८१) स्तोत्रम्। स्तोस्त्राय नमः।**

स्तोत्र. तत्स्वरूप झाल्याने उचंबळून येणाऱ्या भावना जेव्हा वैखरीतून बाहेर पडतात तेव्हा ती जणु काही अमृतगंगाच असते. आत्मज्ञानाच्या मुखातून बाहेर पडलेली आत्मज्ञानानदायी अशी ही अमृतगंगा म्हणजे स्तोत्र होय. तूच भक्तांकरवी स्तोत्ररूपी रचना करून घेण्यासाठी त्यांना प्रासादिक वाक्वैभव- साक्षात् शब्दब्रह्म प्रदान करतोस. किंबहुना भक्तांच्या मुखावाटे विश्वकल्याणासाठी तूच धरण केलेले स्तोत्र होय. हे विष्णुसहस्त्रनाम स्तोत्ररुपी ईश्वरा तुझ्या चरणी समर्पणभावनेने शतशः दंडवत असोत.

**६८२) स्तुतिः। स्तुतये नमः।**

गौरव, स्तुती. यच्चयावत सर्व मानवांतील तद्रुपता जेव्हा विकसीत होत जाते, बहरते तेव्हा त्यांना तुझ्याशिवाय अन्य कोणतीच बाब स्तुत्य वाटत नाही, किंवा प्रत्येक स्तुत्य बाबीसाठी त्या बाबीचा कर्ता व नियंता अशा तुझीच स्तुती करावीशी वाटते. तुझ्या कृपेने भक्ताच्या मुखातून व अस्तित्वातून निघणारी तुझ्याविषयीची स्तुती व प्रेम म्हणजे तुझेच अंग होय.जीव व शीव (तू) यातील भक्तांना जाणवणारा व सुखावणारा हा प्रेमाचा व प्रेमळ स्तुतीचा दुवा म्हणजे तुझ्या अवैयक्तिक , शाश्वत, स्थित्यंतरातीत, चराचरातील अस्तित्वाचा भाग होय. म्हणून तुला स्तुती म्हणतात. भक्तहृदयांतर्यामी बहरणारे हे निस्वार्थ, पवित्र व उदात्ततम भावविश्व म्हणजे त्यांच्या हृदयात अविष्कृत झालेला तूच असतोस. तुला अखंड नमन असो.

**६८३) स्तोता। स्तोत्रे नमः।**

स्तुती करणारा. शब्दांनी व सत्कार्यांनी तुझी भक्ती करणारे (तुझे स्वरूप काहीसे जाणाणारे, तुझ्या अस्तित्वावर विश्वास ठेवणारे वा न ठेवणारे, पारंपारिक दृष्ट्या भक्त

म्हणून गणले जाणारे वा इतर म्हणजे तूच आहेस. कळत-नकळत, भावनेने किंवा प्रामाणिक कृतीच्या रूपात, तुझी विविध प्रकारे स्तुती करणाऱ्यांच्या देहबुद्धीमुळे त्यांना 'ते' तुझी स्तुती करतात किंवा करीत नाहीत असे वाटते. वास्तविक तुला आळवणारे, विनवणारे, समर्पित होणारे, स्वतःच्या अज्ञानाने विकल होणारे व ज्ञानाची आकांक्षा करणारे भक्त असोत किंवा तू नाहीसच या खात्रीने केवळ सद्विवेकबुद्धीचा कौल मानून मानवाची सेवा करणारे असोत, त्या सर्वांच्याद्वारे तूच भावनेतून, बुद्धीतून किंवा कृतीतून स्वतःची स्तुती करित असतोस. तुला सविनय प्रणाम असोत.

**६८४) रणप्रियः । रणप्रियाय नमः ।**

रण म्हणजे युद्ध शब्द व गती. सत्-असत्, उर्ध्वगामी- अधोगामी इत्यादी असंख्य द्वंद्वे ज्या पार्श्वभूमीवर घडतात ती द्वंद्वे सामावणारी व आवडणारी शाश्वत रणभूमी, ज्यातून विश्व साकारले तो ओंकार (शब्द) ज्याला अत्यंत समीप असतो व आवडतो साऱ्या विश्वाची अंतिम अवस्था (गती) आवडीने निश्चित करणारा ह्या सर्व दृष्ट्या तू रणप्रियः आहेस. तत्स्वरूप झालेल्या भक्तांना जीवनसंघर्ष (तेही तुझेच रूप असल्याने) प्रिय असतो आणि संकुचित व्यक्तिमत्वाची अजिबात तमा न बाळगता सर्व जीवनसंघर्ष तुझ्या निकटतेत ते आनंदाने स्वीकारतात. महाभारताच्या महानायकाच्या भूमिकेतून तू हीच बाब श्रीमद् भगवद्गीतेतून जगाला सामावून दिलीस. रमणप्रियः म्हणजे युद्धपिपासू, हिंसक, आक्रमक, हिंस्त्र नव्हे. युद्धपिपासू लोक स्वतःच्या अज्ञानजन्य संकुचित स्वार्थासाठी सर्व क्रूर कृत्ये करतात. याउलट तुझ्या कृपेने तुझ्या भक्तांना उदात्त व सद्भावनापूर्ण जीवन संघर्षात झोकून देण्याचे प्रचंड सामर्थ्य व प्रेरणा मिळते. तुला शतशः नमस्कार असोत.

**६५८) पूर्णः । पूर्णाय नमः ।**

पूर्ण. अपूर्ण नसणारा. अगाध, अनंत, अमर्याद, अमर, शब्दातीत, सर्वगुणसंपन्न, गुणातीत, अगणित, सर्वसमावेशक, सर्वशक्तिमान, पूर्ण व अपूर्ण वगैरे सर्व कल्पनांच्या अतीत असा तू सर्वतोपरी पूर्ण आहेस. तुझ्या चरणी साष्टांग नमन असो.

**६८६) पूरयिता । पूरयित्रे नमः ।**

मनोरथ पुरविणारा. सर्वांच्या अंतरंगात तुझ्या प्राप्तीचा मनोरथ उत्पन्न करणारा व पूर्ण करणारा तूच आहेस. संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचा युगप्रवर्तनाचा तुझा संकल्प पूर्ण करणारा तूच आहेस. वैयक्तिक व मानवसमाजाच्या संदर्भात तुझ्या प्रचितीद्वारे विविध व्यावसायिकांचे अंतःश्चक्षु उघडणारा व त्यांच्याद्वारे राजघटना, कायदे, धर्म, चालीरीती,

शिक्षण, राजकारण, विज्ञान, अर्थव्यवहार, उद्योग वगैरे सर्व क्षेत्रे आत्मज्ञानाभिमुख बनवून अब्जावधी मानवांचा तुझ्या प्राप्तीचा कळत नकळत मनात असलेला मनोरथ पूर्ण करणारा, नवी विश्वसंस्कृती घडविणारा तूच आहेस. तुला निरंतर वंदन असो.

**६८७) पुण्यः । पुण्याय नमः**

पुण्य. भक्ती वा स्तुती हे जसे तुझे अंग आहे, त्याचप्रमाणे विश्वकल्याणाच्या शुद्ध भावनेने केलेले कृत्य, जे तुझ्या संकल्पाचाच एक भाग असून तूच करून घेतोस. तुझ्या अजरामर नियंत्रक अस्तित्वाचा भाग असते. सगुण अवतारांच्या कार्याची जी पूजा व गुणगाने शतकानुशतके होतात ती मूलतः तुझीच असतात. तुझ्या कृपेने पुण्यकार्याचे हे स्वरूप सर्वांना कळून आस्तिक-नास्तिकातील व विविध धर्मियांतील झगडे नाहीसे होतील. तुला अप्रतिहत नमन असो.

**६८८) पुण्यकीर्तिः । पुण्यकीर्तये नमः ।**

शाश्वत, पवित्र व सत्य अशी ज्याची कीर्ती आहे असा. ज्याच्या अस्तित्वाची व कार्याची कीर्ती अस्सल व सत्य असते म्हणजेच ज्याच्याविषयी आत्मज्ञानी भक्तांनी सांगितलेलं सर्व काही पूर्ण सत्य आहे असा. तुझ्या भक्तांची कीर्तीही शाश्वत व सत्य असते. (डावपेच व क्लृप्त्यांच्या आधारे केलेली बनावट प्रसिद्धी नसते.) तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**६८९) अनामयः । अनामयाय नमः ।**

व्याधी नसलेला. शुद्ध ज्ञानमय अस्तित्वामुळे, अविद्यामायाजन्य भ्रम, देहबुद्धी, अहंकार, असहायता, इत्यादी अजिबात नसलेला. तू विश्वाचा सर्वसमावेशक नियंता असल्याने तुला कोणतीही (अविद्याजन्य) व्याधी नसते. त्याचप्रमाणे आत्मज्ञानी भक्तांनाही अविद्याजन्य संकुचित अस्तित्वातून होणारी कोणतीही दुःखदायी व्याधी नसते. तुला साष्टांग अभिवादन असो.

**मनोजवस्तीर्थकरो वसुरेता वसुप्रदः ।**
**वसुप्रदो वासुदेवो वसुर्वसुमना हविः ।**

**६९०) मनोजवः । मनोजवाय नमः ।**

मनासारखा वेग असणारा. मनाची परिमाणे ज्ञात नाहीत. मनाचा वेग अपरिमित असतो. मनासारखा वेग याचा अर्थ अपरिमित वेग असलेला. कालातीत तरलतेमुळे तुझा संकल्प व सिद्धी यात अजिबात तफावत नसते. म्हणूनही तुला मनोजवः म्हणणे

योग्यच आहे. महाबली, वायुपुत्र, आत्मज्ञानी व वेगवान हनुमान हे तुझेच सगुण रूप आहे. तुझे भक्तही विचारांच्या व भावनांच्यापेक्षा वेगवान बनतात. कोणतेही विचार किंवा भावना मनात येण्यापूर्वी किंवा मनातून जाण्यापूर्वी व येता-जाताना ते त्याची तात्काळ नोंद घेऊ शकतात. त्यामुळे मनावर विजय हा तुझ्या भक्तांचा स्थायी भाव असतो. अन्य दृष्टीने पाहता भक्तांच्या स्वत:च्या कल्पनेपेक्षाही वेगाने तू भक्तांवर कृपा करतोस. तुला कृतज्ञ दंडवत असोत.

**६९१) तीर्थकरः । तीर्थकराय नमः ।**

ज्ञानमय करणारा. हयग्रीव अवतारात मधुकैष्टभ दैत्यानी पळवलेले वेद तू निद्रावस्थेतील ब्रह्मदेवाला आणून दिलेस अशी कथा आहे. याचा मतितार्थ मनुष्यातील तमोगुणरूपी दैत्य त्याचा सद्सद्विवेक भ्रष्ट करतात, पळवतात. अशा वेळी मोहनिद्रेतून जाग आणून भक्ताला विवेक प्राप्त करून देणारी कृपाळू शक्ती तूच आहेस. तुला शतशः कृतज्ञ प्रणाम असोत.

**६९२) वसुरेताः । वसुरेतसे नमः ।**

शिव, अग्नी, सोनेरी मुलतत्त्व किंवा ज्याच्या विर्यापासून विश्ववैभव बनले असा. विश्वाचा व विश्वातील तेजाचा उद्‌गाता, जन्मदाता, निर्माता तू आहेस.सर्व वैभवाचा मूलस्त्रोत व मूलाधार आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**६९३) वसुप्रदः । वसुप्रदाय नमः ।**

ऐश्वर्य प्राप्त करून देणारा. विश्वाला तुझ्या प्राप्तीचे मौल्यवान दान देणारा. तुझ्याशिवाय विश्वाचे अस्तित्वच अशक्य आहे. वैयक्तिक जीवनात वैराग्य, निर्भयता, सुरक्षितता, आनंद, विशालता,सद्‌बुद्धी, विवेक, अवैयक्तिक निःपक्षपातीपणा, निस्पृहता, उत्साह, विजय इत्यादि असंख्य वैशिष्टांचे वैभव देणारा म्हणूनही तुला वसुप्रदः म्हणणे सयुक्तिक आहे. तुला भावपूर्ण वंदन असो.

**६९४) वसुप्रदः । वसुप्रदाय नमः ।**

ऐश्वर्य प्राप्त करून देणारा. तुझ्या विश्वसंकल्पानुसार जगभरातील सर्व मानवांचा शुद्ध ज्ञानवैराग्याचे व सामर्थ्याचे सर्वोच्च स्थान देणारा व त्यामागोमाग येणारे सर्व ऐहिक वैभवही प्राप्त करून देणारा व अशा तऱ्हेने समृद्ध व प्रगल्भ संस्कृती विश्वामध्ये अविष्कृत करणारा तू आहेस. तुला आदरपूर्वक नमस्कार असोत.

**६९५) वासुदेवः । वासुदेवाय नमः ।**

१) वासुदेवाचा पुत्र आणि २) अहंकाराचा ईश्वर. कृष्णावतार हे सगुण रूप धारण करून तुझ्या प्राप्तीचे मार्ग व युक्त्या गीतेद्वारे सांगणारा तू आहेस. तसेच, वैयक्तिक पातळीवर, देहबुद्धीजन्य अहंकाराचा स्वामी- या अहंकारावर विजय मिळवून देणारा भक्ताचा सखा तू आहेस. तुझ्या चरणी भावभक्तिपूर्वक लोटांगण असो.

**६९६) वसुः । वसुवे नमः ।**

आश्रय, निवास. सर्व विश्व ही तुझी लीला असून तिची अंतिम अवस्था म्हणजे तू आहेस. तूच तिला शेवटी स्वतःमध्ये कायमचा आसरा देणारा आहेस. वैयक्तिक पातळीवर सर्वातर्यामी राहून सुखदुःखमय जीवन घडविणारा व भोगवणारा खरा सूत्रधार (या खेळाचा खेळिया) तू आहेस. अविद्या-मायेचा तज्जन्य दुःखसुखांच्या उगम, मूळ तूच आहेस. हे ज्ञान झाले की प्रश्नोत्तरे व संशय संपून भरकटणाऱ्या बैचेन मनाला कायमचा आश्रय देणारी तुझ्या भक्तीचीच स्थिती शिल्लक राहते. तुझ्या चरणी भावपूर्ण दंडवत असोत.

**६९७) वसुमनः । वसुमनसे नमः ।**

सर्वत्र ज्याचे मन/अवधान आहे असा. विश्वातील अणुरेणुमध्ये तुझ्या जाणिवेचे अस्तित्त्व आहे. अन्य दृष्ट्या साऱ्या विश्वाची अशरीरी जाणीव(मन) हे तुझेच मन आहे. ज्या तऱ्हेने तुझे डोळे सर्वातर्यामी आहेत तसेच तुझे मन सर्वातर्यांमी आहेत, अर्थात प्रत्येकाच्या अंतरंगात तू (तुझे मन) आहे. तुझ्या कृपेने या सत्याची जाणीव होते. तुला सविनय वंदन असो.

**६९८) हविः । हविषे नमः ।**

यज्ञामध्ये अर्पण केले जाणारे द्रव्य. तुझ्या प्राप्तीच्या जाणिवेत असलेले व तुझ्याच कृपेने तुझ्यात विलय होणारे विश्व हे तुझ्या वैश्विक यज्ञातील हविः आहे, ज्यापआमाणे यज्ञ आणि यज्ञकर्ता तू आहेस त्याप्रमाणे हविः देखील तूच आहेस. तुला साष्टांग प्रणाम असोत.

**सद्गतिः सत्कृतिः सत्ता सद्भूतिः सत्परायणः ।**
**शूरसेनो यदुश्रेष्ठः सन्निवासः सुयामुनः ॥**

**६९९) सद्गतिः । सद्गतये नमः ।**

अंतिम मोक्षावस्था. साऱ्या विश्वाची व व्यक्तिची अंतिम, सर्वश्रेष्ठ आणि श्वाश्वत

अवस्था म्हणजे तूच होय. तुला सादर अभिवादन असो.

**७००) सत्कृतिः । सत्कृतये नमः ।**

सत्याचा साक्षात्कार घडविणारा आणि साक्षात्कार घडविण्याची प्रक्रिया दोन्ही तूच आहेस. ही सर्वश्रेष्ठ कृती तुझ्या अशरीरी अस्तित्वाचाच भाग आहे म्हणून तुला सत्कृतिः म्हणतात. तुझ्या कृपेने तुझे भक्त तुझ्याच नियंत्रणाखाली तुझाच विश्वकल्याणाचा संकल्प सिद्धिस नेण्यासाठी ही कृती करण्यात जीवन व्यतित करतात. त्यांच्याही अस्तित्वातून प्रकट होणारी अशी उत्तम कृती म्हणजे साक्षात तूच आहेस. वेगळ्या दृष्टिने पाहिल्यास, चराचरातील प्रत्येक घटना म्हणजे कृतीतील खरा महत्त्वाचा गाभा व सत्य तूच आहेस. तुला विनम्र नमन असो.

**७०१) सत्ता । सत्तायै नमः ।**

संपूर्ण नियंत्रण असणारा. विश्वाची उत्पत्ती, स्थिती, प्रगती व लय यांच्यावर संपूर्ण सत्ता असणारा तू आहेस. समाजामध्ये वावरणारे असंख्य सत्ताधीश केवळ तुझ्या इच्छेनेच सत्ता भोगू शकतात. म्हणजेच त्यांच्या जीवनाचा नियंता व म्हणून सत्ताधाऱ्यांचाही सत्ताधिश तू आहेस. तुझ्या कृपेने व सत्तेखाली, विश्वकल्याणाचा तुझा संकल्प सिद्धिस जाईल. तुला साष्टांग दंडवत असोत.

**७०२) सद्भूतिः । सद्भूतये नमः ।**

सत् किंवा शाश्वत ऐश्वर्य. सर्वश्रेष्ठ, चिरंतन आणि ऐश्वर्याचेही ऐश्वर्य असा तू आहेस. तुझ्या प्रचितीची महान् श्रीमंती देणाऱ्या तुला सविनय वंदन असो.

**७०३) सत्परायणः। सत्परायणाय नमः ।**

सर्वोच्च सत्य स्थान. विश्व व भक्तांचे- योग्यांचे- साधकांचे -सत्प्रवृत्त लोकांचे सर्वोच्च स्थान (ध्येय) तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**७०४) शूरसेनः । शूरसेनाय नमः ।**

शूर सेना असलेला, श्रीकृष्णाचा आजोबा, हनुमान ज्या सेनेच्या ध्वजावर आहे अशी सेना असलेला अर्जुन. तात्विक दृष्ट्या याचा अर्थ विश्वनियमांनुसार अव्याहतपणे व यशस्वीणे कार्यरत असलेली वैश्विक घटनांमागील सर्व शक्ती ही ज्याची सेना आहे असा. महासेनानी. तुझ्या या गुणवैशिष्ट्याने तुझी प्रचिती झालेल्यांच्या अंगी दहा सहस्त्र हत्तींचे बळ संचारते आणि ते तुझ्या संकल्पसिद्धीसाठी तुझ्या स्वामित्वाखाली लढण्याचा निश्चय करतात. तुला अखंड अभिवादन असो.

**७०५) यदुश्रेष्ठः । यदुश्रेष्ठाय नमः ।**

यादवांमधील सर्वश्रेष्ठ यादव जगद्गुरू व विश्वविनायक श्रीकृष्ण हे तुझेच रूप. याचा तत्वार्थ सर्व मानवी भाव-भावनांचा-विचारांचा-कृतींचा स्वामी. स्थितप्रज्ञता ह्या मानवी संस्कृतिच्या सर्वोच्च वैशिष्ट्याचे सोदाहरण दिग्दर्शन करणाऱ्या कृष्णरूपातील तुला सादर प्रणाम असोत.

**७०६) सन्निवासः । सन्निवासाय नमः ।**

सत्य जिथे राहते, तो किंवा जो नेहमी सत्यामध्येच (आत्मस्वरूपी) असतो तो. वैयक्तिक दृष्ट्या तत्स्वरूप झालेले सर्व लोक ज्या सत्यमय अवस्थेला, स्थानाला मिळतात ते स्थान ती अवस्था. अन्य दृष्टिने सत्याचा जिथे निवास असतो. ते आत्मज्ञानी लोकांचे हृदयाकाश तूच आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**७०७) सुयामुनः । सुयामुनाय नमः ।**

सुयामुनः म्हणजे ज्ञानक्षीरांचे कुंभ बाळगणाऱ्या ज्ञानेंद्रियांच्या आणि ज्ञानियांचाही स्वामी. तसेच सगुण रूपात यमुनानिवासीयांचा राजा. चराचरातीत असा तू सर्व ज्ञानियांचा अक्षरशः स्वामी आहेस ही प्रचिती तुझ्या कृष्णरूपाची सगुणभक्ती करणाऱ्यानाही येते. तुला विनम्र नमन असो.

**भूतावसो वासुदेवः सर्वासुनिलयोऽनलः ।**
**दर्पहा दर्पहा दृप्तो दुर्धरोऽथापराजितः ॥**

**७०८) भूतावासः । भूतावासाय नमः ।**

सर्व चराचर दृश्यदृश्य विश्व तुझ्या ठायी (व तुझ्या आज्ञेत) राहते. व्यक्तिगत पातळीवर व्यक्तीचे अंतर्बाह्य संपूर्ण अस्तित्व (व जाणीव) तुझ्यातच असते. तुझ्या स्मरणात माझे तुला साष्टांग नमस्कार असोत.

**७०९) वासुदेवः । वासुदेवाय नमः ।**

श्रीकृष्ण. वासुदेवाचा पुत्र. काळा कृष्ण हे सगुण रूप स्थितप्रज्ञता, स्वधर्माचरण आणि दृश्य प्रकाश नसलेला ( म्हणून काळा) ज्ञानप्रकाश यांची आठवण करून देते.कृष्णाची लीला म्हणजेच परात्मभाव (व तज्जन्य वणवण), सात्म्यभाव व स्वात्म्यभाव (व तज्जन्य सच्चिदानंद) होय. कृष्ण दास्याची महती अशी की त्यामध्ये व्यक्ती स्वतःचे संकुचित अस्तित्व मोठ्या सहजतेने, उत्स्फूर्ततेने, आनंदाने, आर्ततेने विसरून जाते. कृष्णचरणी अर्पण करते. देहबुद्धीचा विलय होताच कृष्णमय होऊन

जाते. परंतू शरीर मात्र कृष्णदासच राहते. ही नम्रता ही ऋतुजा सर्वांबरोबरच्या व्यवहारातही असते. कारण भक्तासाठी सर्व जगच कृष्णमय असते. यांत्रिकपणे ईश्वर मानणारे, ईश्वराचे अस्तित्व नाकारणारे, अहं ब्रह्मास्मि म्हणणारे, जडवादी, इहवादी, किंवा चिद्वादी असे बहुतेकजण स्वत:च्या अस्तित्वाच्या क्षणिक व आंशिक भागाला चिरंतन आणि परिपूर्ण समजण्याची गफलत करतात. परिणामी मनुष्य हाच विश्वाचे केंद्र असल्याचा किंवा याउलट विश्वामध्ये मानव काहीच नसल्याचा देहबुद्धीजन्य समज ते करून घेतात. यामुळे कधी पराकोटीचा अहंकार व तज्जन्य हुकूमशाही, क्रौर्य, आक्रमणे, अत्याचार, हिंसाचार तर कधी पराकोटीची पराधीनता, निष्क्रीयता, खिन्नता व नैराश्यवाद यांचा उद्रेक होतो. त्यामुळे एकीकडे हिंस्रता व दुसरीकडे व्यसनाधीनता, आत्महत्या, आत्मघृणा यांची परिसीमा होते. एका बाजूने गुन्हेगारी वाढते तर दुसऱ्या बाजूने लाचारी विमनस्कता व उदासीनता वाढते. पूजा अर्चा करणारे व रस्त्यातून भजन-नाच करत फिरणारे पुष्कळ तथाकथित धार्मिक, देवाची प्रचिती घेतलेले खरे देवभक्त नसतात. याउलट पारंपरिकपणे ईश्वर न मानणारे पुष्कळ लोक सत्कार्यातून विनम्रपणे ईश्वर सेवा करीत असतात. परिणामी त्यांना ईश्वराची निकटता समाधानारूपात मिळत असते, म्हणजेच ते खरे देवभक्त असतात. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की ज्याप्रमाणे लहान मूल आईच्या कुशीत निश्चिंतपणे व नि:शंकपणे झोपतं त्याचप्रमाणे तद्रुप होणारा भक्त अत्यंत समाधानी होतो. त्यामुळेच भक्तांना तुझ्याबद्दल वाटणारा 'विश्वास' आत्मप्रचितीतून आलेला 'अढळ विश्वास' असतो व तुझ्याबद्दल वाटणारे प्रेम प्रत्यक्ष प्रमाणावर आधारलेलं असतं (तसं नसेल तर ते ईश्वर-भक्ताचं नातंच नव्हे.) स्वत:च्या मातापित्यांची किंवा बाळाची सेवा करताना पुष्कळांना तहान-भूक-झोप यांपैकी कशाचीही पर्वा राहात नाही. असे होण्याचे कारण या नात्यांमध्ये माणसाचे अशरीरी अवैयक्तिक विशाल स्वत्वच असते. ही सेवा म्हणजे त्या व्यक्तीचे उत्स्फूर्त, असंकुचित जगणेच असते. कृष्णभक्तीमध्ये अशा उदात्ततेची परिसीमा होत जाते. तद्रुपतेच्या उत्स्फूर्त व विश्वकल्याणकारी आविष्कारांची तुलना डाव्या, उजव्या आणि उदारमतवाद्यांच्या आविष्काराशी करणे आवश्यक आहे. आर्थिक समानता, उत्पादनाच्या साधनांच्या खाजगी मालकीला विरोध, व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच अशा देहबुद्धीतून उत्पन्न झालेल्या समाजवादाच्या आणि स्वैराचार, अनियंत्रित अफाट नफेबाजी, रानटी स्पर्धा, उपयुक्ततावाद, सवंग लोकमतानुयायी लोकशाही इत्यादी तथाकथित लोकशाहीवाद्यांच्या बाह्यांगाचा पराभव होणे क्रमप्राप्त आहे. व्यक्तिवादाचा किंवा समाजवादाचाही तर्कसंगत व प्रगल्भतापूर्ण विस्तार व विकास करून त्यांचा आशय लक्षात घेतल्यास तुझ्या साक्षात्काराची महती पटते. व्यक्तिवाद व समाजवाद यातील

सर्व उत्तम बाबींचा समन्वय व आविष्कार घडतो. कृष्णदास्यातील व कृष्णभक्तीतील संकुचिततेच्या समर्पणाचे महानतत्त्व घेतले आणि नास्तिकांच्या किंवा अहंब्रह्मास्मि म्हणणाऱ्यांची बौद्धिक वा इतर कोणत्याही स्वरूपातील गुलामगिरी नाकारण्याची तडफ घेतली तर धर्माच्या नावाखाली चालणारी धर्मांध स्वार्थांधांची माजोरी आणि हिडीस थोतांडबाजी व गलिच्छ राजकारणबाजी नाहीशी होईल. तसेच बुद्धिवादाच्या व नास्तिकतेच्या नावाखाली वाढलेली व्यसनाधीनता, स्वैराचार, भ्रष्टाचार, माज, भौतिक सुखाच्या हव्यासातून येणारी अमानुषता नष्ट होईल. तुला माझे लक्षावधी कृतज्ञ प्रणिपात असोत.

**७१०) सर्वासुनिलयः । सर्वासुनिलयाय नमः ।**

सर्व विश्वाच्या व व्यक्तींच्या अस्तित्वाचे अंतिम चिरंतन परंधाम. प्राणायामाच्या व इतर साधनांच्या द्वारे व्यक्ती स्वतःच्या व्यक्तित्वाच्या अतीत जाऊ शकते. हाच संकुचित अस्तित्वाचा अंत व खऱ्या स्वत्वाचा जन्म होय. म्हणजे व्यक्ती तुझ्यामध्ये मरून नवा जन्म घेऊन अमर होते. तुझ्या प्राप्तीमध्ये चिरंतन विश्रांतीचे अढळस्थान कसे प्राप्त होते हे समजणे कठीण नाही. ज्याप्रमाणे नाटकातील पात्रे नाटक संपल्यावर मूळ जीवनात परत येतात किंवा मूल आईकडे परत जाते तसेच हे आहे. तू म्हणजे व्यक्तीच्या अंतर्यामी वसणारी व्यक्तीची खरी ओळख, तिचे खरे स्वत्व, तिची अजरामर व प्रेमळ आई आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**७११) अनलः । अनलाय नमः ।**

अमर्याद तेज व वैभव असलेला. सर्वशक्तिमान व सर्वात्मक असल्याने तूच सर्वात वैभवसंपन्न आहेस व विश्वाचा स्फूर्तिदाता, विश्वाचे शक्तिकेंद्र व विश्वाचे नियंत्रण केंद्र आहेस. तुझ्या कृपेने तुझ्या या वास्तव स्वरूपाची जाण व प्रत्यक्ष अनुभूती व तुझ्या नियंत्रक सामर्थ्याचा वारसा तुझ्या भक्तांना मिळतो व ते भविष्याची संस्कृती घडवतात. केवळ तात्त्विक चर्चा व मत-मतांतरे आणि कल्पनाविलास दुबळे असतात. प्रामाणिक बुद्धिमंतांच्या बुद्धीतून जेव्हा तुझा आविष्कार होतो, तेव्हा त्यांचे विचार प्रभावी होतात. त्यामुळे अपारंपरिक असो वा पारंपरिक, या धर्मातील असो वा त्या धर्मातील, तुझी भक्ती नेहमीच चैतन्यदायी सामर्थ्यदायी व नियंत्रण शक्तिदायी असते. तुला शतशः प्रणाम असोत.

**७१२) दर्पहा । दर्पघ्ने नमः ।**

दुराभिमान, दर्प, अहंकार नष्ट करणारा. अहंकार नाश म्हणजे तुझी प्राप्ती असेच

जणु समीकरण आहे. हीच महान बाब तू यमुनाकाठी गायींचे संरक्षण केलेस व इंद्राचे (मनाचे) गर्वहरण केलेस या कथेत अनुस्यूत आहे. तुला भावपूर्ण नमन असो.

**७१३) दर्पदः । दर्पहाय नमः ।**

खोटा किंवा पोकळ अभिमान, गर्व इत्यादी देणारा. संकुचित व्यक्तित्वामध्येच जखडून राहिलेल्यांचा दंभ, दुराभिमान, बडेजाव यांच्या मुळाशी (व हे सारे देणारा) तूच आहेस. परंतु संकुचित अविद्येत गुरफटलेल्याना स्वत:चा गर्व देखील ईश्वरानेच दिला हे कळत नाही. अज्ञानी लोकांना हे न कळल्याने गर्विष्ठांबद्दल त्यांच्या मनात कटुता येऊ शकते. घृणा येऊ शकते. आत्मज्ञानी लोकांना मात्र ही बाब पूर्णपणे कळल्यामुळे ते गर्विष्ठांचाही द्वेष करीत नाहीत. सर्व गुणावगुणांचा कर्ता व दाता तू आहेस हे जाणून तुझ्या स्मरणात व तुझ्या संकल्पाच्या सेवेत ते रममाण राहतात. कारण तुझ्या प्रचीतीने येणारी विशालता, शुद्ध बुद्धी, निर्भयता, अवैयक्तिकता, निस्पृहता यामुळे त्याना तुझे स्मरण प्रिय असते आणि आयुष्याचे एकमेव ध्येय, त्यांना जाणवणारा तुझा विश्वसंकल्प सिद्ध करणे हेच असते. विश्वात्मक भावनेने कोणत्याही वैयक्तिक भावनेच्या आहारी न जाता तुझे भक्त सर्वांमध्ये तुला पाहून प्रेमाने वागतात व तुझ्या संकल्पात कार्यरत राहण्याचा स्वधर्म अव्याहतपणे आचरत राहतात. सर्वसमावेशक व संकुचित अहंकारही निर्माण करणाऱ्या तुला शतशः प्रणाम असोत.

**७१४) दृप्तः । दृप्ताय नमः ।**

आत्मानंदाचे आकंठपान करून तृप्त असणारा. अपुरेपणा व अपुरेपणाची जाणीव ही वैशिष्ट्ये मनुष्याची आहेत. अशरीरी असल्याने व मर्यादित नसल्याने आत्मानुसंधान व तज्जन्य आत्मानंदामध्ये असणारा तू आहेस. तुझ्या प्रचीतीने जीवन तेजोमय विशाल,आत्मनंदमय, चैतन्यमय आणि समर्थ बनते. तुला शतशः दंडवत असोत.

**७१५) दुर्धरः । दुर्धराय नमः ।**

आकलन व्हायला, प्राप्त व्हायला अत्यंत कठीण असा. संपूर्ण चराचर विश्व, जाणीव, काळ हे सर्व व मानव ज्या अमर अस्तित्वापसून उत्पन्न झाले तेच तू असल्यामुळे तुला शरीररांतर्गत मेंदूच्या संवेदना विचार इत्यादी प्रक्रियांनी जाणणे अशक्य आहे आणि ह्या संकुचित अस्तित्वाच्या अतीत जाणे (ज्या द्वारे तू कळला नाहीस तरी तुझी प्रचिती येते) अत्यंत कठीण आहे. केवळ तुझ्याच कृपेने बद्धजीव, मुमुक्षू, साधक व सिद्धावस्थेत जातात व या अत्यंत हव्याहव्याशा पण असह्य अनुभवातून शेवटी तुला प्राप्त होतात तुझी प्रचीती घेतात. तुझ्या चरणी अन्यन्यभावे प्रणाम असोत.

**७१६) अपराजितः । अपराजिताय नमः ।**

कधीच पराभूत न होणारा. चराचरांतर्बाह्य असा तू वैश्विक प्रक्रियेमध्ये कधीही पराभूत होऊ शकत नाहीस, तुला कुणीही जिंकू शकत नाही. असंख्य जीवांना त्यांच्यातील क्षुद्रत्वाविरोधी संघर्षात विजय मिळवून देऊन स्वतःची प्रचिती देणारा व तुझ्या विश्वकल्याणकारी संकल्पात अंतर्भूत करून सदैव विजयी करणारा तूच आहेस. तुला सतत अभिवादन असो.

**विश्वमूर्तिर्महामूर्तिर्दीप्तमूर्तिरमूर्तिमान्।**
**अनेकमूर्तिरव्यक्तः शतमूर्तिः शताननः ॥**

**७१७) विश्वमूर्तिः । विश्वमूर्तये नमः ।**

विश्वरूप, विश्वात्मक ईश्वर. तू विश्वात्मक देव आहेस यामध्ये महान तत्व सामावलेले आहे. विविधतेने नटलेल्या विश्वाच्या अंतर्बाह्य सर्वत्र असलेल्या तुला विविध नावांनी, विविध रूपामध्ये व विविध प्रकारे भजणारे आणि तुझे अस्तित्व नाकारणारे असे सर्व लोक, त्यांचे धर्म/ संघटना इत्यादी व त्यांच्या जाणीवा देखील तुझ्यामध्येच सामावलेल्या आहेत व तू त्या सर्वांमध्ये आहेस.परंतु हे सत्य न समजणारे असंख्य आहेत. देहबुद्धी, अविद्या यांच्यामुळे उत्पन्न होणारे द्वेष, वासना, हवरटपणा, मत्सर, सात्ताकांक्षा, अंधश्रद्धा, कडवेपणा, दुराग्रह, अत्याचार, अन्याय, घातपात, युद्धे यांचा उगम गाभा व नियंता तू आहेस. हे कळणारे लोक गोंधळून जात नाहीत. अढळ शांती आणि स्थितप्रज्ञतेने ते तुझ्या भक्तीत व तज्जन्य विश्वकल्याणकारी कृतीत निर्भयपणे मग्न राहतात. तुला निरंतन वंदन असो.

**७१८) महामूर्तिः । महामूर्तये नमः ।**

अत्यंत विशाल. सर्वव्यापी, अमर्याद. महामूर्तिः, तुला साष्टांग नमस्कार असोत.

**७१९) दीप्तमूर्तिः । दिप्तमूर्तये नमः ।**

तेजोमूर्ति. ज्ञानतेजाचे वर्णन अशक्य आहे. परंतु तेजाचेही तेज अशा तुझ्या कल्पनातील अस्तित्वाच्या काहीशा जवळ समज व उमज पोचावी म्हणून केले जाणारे तुझे वर्णन हे तुझ्याच प्रसादाचे फळ होय. कारण भक्ताच्या तेजस्वी ज्ञानाचा कारक व उगम तूच असतोस. तूला सविनय अभिवादन असो.

**७२०) अमूर्तिमान् । अमूर्तिमतये नमः ।**

अमूर्त. आकारबद्ध नसलेला. तू निर्मिला गेलेलाच नाहीस. त्यामुळे तुला आकार

नाही.काळाला जसा आकार नाही त्याचप्रमाणे काळातीतालाही आकार नाही. परंतु संकुचित देहबुद्धीच्या आहारी जाऊन तुझ्या प्राप्तीला लोक वंचित होऊ नयेत म्हणून तूच सगुण पुजेचा मार्ग दाखवलास. त्यामुळे सगुण भक्ती निकृष्ट नाही. सर्वप्रकारच्या पूजापद्धतीमध्ये सामंजस्य, समजूतदारपणा व प्रेम केवळ तुझ्याच कृपेने व तुझ्याच प्रचितीने निर्माण होऊ शकते. तुझ्याच इच्छेने व प्रचीतीने सक्तीची धर्मांतरे, जुलमी धर्मसत्ता, धर्मद्वेष, वैचारिक हुकुमशाही, आर्थिक शोषण ह्या साऱ्या बाबी नामशेष, होऊ शकतात. तुझ्याचरणी साष्टांग दंडवत असोत.

**७२१) अनेकमूर्तिः । अनेकमूर्तये नमः ।**

अनेक आकार असलेला. आकार नसलेला तू तुझ्याच लीलेने असंख्य रूपे, गुण, आकार असलेले विश्वात्मक शरीर धारण करतोस, तुझ्याच इच्छेने अनेक सगुणवतार धारण करतोस. तसेच भक्तांना त्यांच्या देवतेच्या रूपात दर्शन देतोस. भक्त हृदये तुझ्या प्रचीतीने भरण्याच्या तुझ्या महान प्रक्रियेचा एक भाग म्हणजेच तुझे हे अनेक अवतार (आकार) धारण करणे. तुला विनम्र नमन असो.

**७२२) अव्यक्तः । अव्यक्ताय नमः ।**

म्हणजे व्यक्त न होणारा. तुझ्या भक्तांना तुझी होणारी जाणीव किंवा प्रचीती सत्य असली तरीही तुझा अंशमात्र असते. तसेच मर्यादितांशी संबंधित असते. ते प्रचीती रूपही मर्यादीतच असते. तू पूर्णपणे कधीच व्यक्त होत नाहीस म्हणून तुला अव्यक्तः म्हणतात. तुझे अवतार असलेल्या साधुसंतांनी तुझ्या अवतारावर देखील देह धारण केल्यानंतर स्थळ काळाची बंधने येतात त्याबद्दल स्पष्टपणे विधाने केली आहेत व तुझ्या एकूण एक सर्व अवतारांमध्येही तुझ्या सर्वशक्तिमान अस्तित्वाची पूर्ण अभिव्यक्ती होऊ शकली नाही व होऊ शकत नाही असे म्हटले आहे. तुझ्याचरणी सादर प्रणाम असोत.

**७२३) शतमूर्तिः । शतमूर्तये नमः ।**

शेकडो मूर्ती, रुपे असणारा. स्वतः अव्यक्त असणारा पण तरीही भक्तांकडून स्तुती करवून त्याना विविध प्रकारांनी, रुपांनी, स्वतःची प्रचीती देणारा आणि या अनेक रुपातील स्वतःचे एकत्व प्रचीती आणून देणारा तूच आहेस. भक्तवत्सल अशा तुला भावपूर्ण वंदन असो.

**७२४) शताननः । शताननाय नमः ।**

संपूर्ण विश्वांतर्बाह्य सर्वत्र तुझेच चेहरे आहेत, तुझीच अवधाने आहेत. ऋषींना वेद

(ज्ञान) देणारी शेकडो अशरीरी मुखेही तुझी आणि ज्या मुखातून हे वेद(ज्ञान) जगाला मिळाले ती ऋषींची मुखेही तुझीच. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**एको नैकः सवः किं यत् तत् पद्मनुत्तमम्।**
**लोकबन्धुर्लोकनाथो माधवो भक्तवत्सलः ॥**

**७२५) एकः । एकाय नमः । एकस्मै नमः ।**

एकमेवाद्वितीय असा. असणे-नसणे यांच्या अतीत अशा तुझे आकलनास सोपे जावे म्हणून एक असे वर्णन करतात. वस्तुतः तू गणनातीत आहेस. तुला विनम्र वंदन असो.

**७२६) नैकः । नैकाय नमः ।**

एक नसलेला. एकत्वात सर्वांमध्ये असल्यामुळे म्हणजे अखंडतेमुळे अनेक नसलास तरी गणनातीत असल्याने तू एक नाहीस. तू गुणविशेषातीत असल्यामुळे 'एक' हे संख्यात्मक विशेषण तुला लागू होत नाही. त्यामुळे तू एक नाहीस. दुसऱ्या दुष्टीने पाहिल्यास वैश्विक संलग्नतेमुळे तू एक असलास तरी तुझे अविष्कार अनेक असल्याने (अविद्येने लिप्त लोकांना) तू अनेक भासतोस. वगवेगळ्या लोकांना वेगवेगळा भासतोस म्हणूनही तुला एक म्हणता येत नाही. म्हणजेच एकसमावयाच्छेदेकरून (कालातीत असलेला) तू एकत्व, अनेकत्व,संलग्नत्व, अशा तऱ्हेने अनेक पातळ्यांवर वावरणारा भक्तांना प्रचीती देणारा ईश्वर आहेस. तुझ्या अखंड स्मरणात तुला विनम्र प्रणाम असोत.

**७२७) सवः । सवाय नमः ।**

त्याग. ज्या त्यागामध्ये ईश्वराला सोमरस अर्पण केला जातो त्याला सवः म्हणतात. ईश्वराच्या सगुण भक्ताच्या वेळी यज्ञदेवता किंवा मूर्ती याना आपण जे ग्रहण करतो ते प्रथम प्राधान्याने अर्पण करायचे असते.त्यामुळे आत्मस्वरूपाचे स्मरण होऊन क्षुद्र अहंकार संपतो. भक्ताकरवी असा त्याग करविणारा व त्यांच्या मनात असलेली त्याग भावना ह्या दोन्हीन्ही तूच आहेस. तसेच या त्यागातून भक्तहृदयात स्फुरणारी भक्तिगंगा, ज्ञानगंगा देखील तूच आहेस. कल्पांती तुझ्या स्वरूपी विलय पावणारे विश्वातील सारे भावामृत व सर्व काही रसमय असे तत्त्व तूच आहेस. तुला विनम्र दंडवत असोत.

**७२८) कः । काय नमः । कस्मै नमः ।**

आनंद, प्रश्न, ब्रह्मा-विष्णु-महेश. तू जाणिवेच्या अतीत आहेस. पण प्रचीतीस

आल्यावर  आनंदमय आहेस. बुध्दीचे समाधान होईल अशा तऱ्हेने तुझ्याविषयी स्पष्टीकरण मिळत नाही म्हणून नेहमीच न सुटलेले कोडे (प्रश्न) आहेस. त्याचप्रमाणे गुणातीत व रूपातीत  असूनही विश्वरूपी असल्याने त्रिगुणात्मकही तूच आहेस. तुला भावपूर्ण वंदन असो.

**७२९) किं। कस्मै नमः।**

म्हणजे, 'काय?' हा प्रश्नार्थक शब्द. संपूर्ण तर्कशक्तीचे मुळ (उगम), प्रयोजन (हेतू किंवा साध्य) आणि परिणीती (अंतीम उन्नयन वा अवस्था) तूच आहेस. त्यामुळे ज्या प्रश्नाचे उत्तर मानवी बुद्धी गफलतीने शोधते तो मुळात तुझ्यातून उत्पन्न झालेला (ईश्वर, सत्य) आहे. हे, एकाद्या शिकाऱ्याने (प्रश्नकर्ता) शिकारीचा शोध चालवला (प्रश्न) त्याला आपणच आपली शिकार (उत्तर) आहोत हे कळल्यासारखं झालं. म्हणजेच प्रश्नाचा उगम प्रश्न विचारण्याची प्रक्रिया व उत्तर एकच हे सत्य वा ईश्वर आहोत. तू 'किं' हा प्रश्न आहेस हा प्रश्न नीट समजून घेणे हा, बुद्धीगम्य नसलेल्या तुझी प्रचीती घेण्याचा, तूच दाखवलेला एक श्रेष्ठ मार्ग आहेस. तुला अव्याहत अभिमान असो.

**७३०) यत्। यस्मै नमः।**

म्हणजे जे. कः, किं, यत् या अव्यायातून तू आहेस हे सांगणे म्हणजे तुझे अस्तित्व सिद्ध करता न आल्यामुळे काढलेली पळवाट नसून बुद्धीला समजायला अशक्य असलेल्या अशा तुझी प्रचीती देण्याचा तुझ्याच कृपेने केलेला कुशाग्र बुद्धीचा प्रतिवाद आहे. यत् म्हणजे जे याचा अर्थही ज्याबद्दल प्रश्न विचारला जातो ते आणि तो प्रश्न विचारण्यासाठी काहीतरी गृहीत धरण्याची बुद्धी जी 'जे' या शब्दातून प्रगट होते तिचा उगम (ती बुद्धीही) तूच आहेस असा आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**७३१) तत्। तस्मै नमः।**

ते. ज्याप्रमाणे प्रश्नाचा उगम तुझ्यातून होतो त्याच प्रमाणे मर्यादित बुद्धीचे समाधान करणाऱ्या तथाकथित उत्तराचा उगमही तुझ्यातच होतो. त्यामुळे 'ते' आणि 'ते' ने दाखविले जाणारे तेही तूच आहेस. अन्य दृष्ट्या ॐ तत् तत्व ही ब्रह्माची तीन वैशिष्ट्ये म्हटलेली असल्यानेही तू 'तत्' आहेस. त्याचप्रमाणे श्रवण, मनन व निदिध्यासन या मार्गांनी आकलन करून घेण्याचे जे आहे त्याला उद्देशूनही 'तत्' हा शब्द वापरला आहे. तुला विनम्र नमन असो.

**७३२) पदमनुत्तमम्। पदमनुत्तमाय नमः।**

सर्वोच्च, शाश्वत अंतिम पद. विश्व, समाज व व्यक्तीसाठी सर्वोच्च कल्याणाचा

सर्वोत्तम मार्ग, सर्वोत्कृष्ट ध्येय आणि अतुलनीय असे अंतिम शाश्वत स्थान तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**७३३) लोक बंधुः । लोकबंधवे नमः ।**

लोकांचा बंधु. साऱ्या विश्वाला अत्यंत निकटचा. तसेच समाज व व्यक्ती यांना निकटचा. सर्वांतयामी असल्याने तू अत्यंत निकटतेने सर्वांचे पालन, पोषण, रक्षण करतोस म्हणून तू लोकबंधु आहेस. तूच त्यांना कल्याणप्रद प्रचीती देतोस म्हणूनही तू लोकबंधु आहेस. तुला भावपूर्ण अभिवादन असो.

**७३४) लोकनाथः । लोकनाथाय नमः ।**

जाणिवांच्या सर्व पातळ्यांचा, विश्वाचा, समाजाचा व व्यक्तिंचा (अंतर्बाह्य अस्तित्वाने त्यांचे सर्वकष नियंत्रण करणारा) स्वामी. तुझ्याच कृपेने व सत्तेने घडते. तुझ्या प्रचीतीमध्ये आणि प्रचीतीसाठी निर्माण होणारा, बोलला जाणारा, लिहिला जाणारा व वाचला जाणारा प्रत्येक शब्द केवळ तुझ्याच सत्तेमुळे निर्माण होतो, बोलला, लिहिला, वाचला जातो. तुला शतशः कृतज्ञ दंडवत असो.

**७३५) माधवः । माधवाय नमः ।**

मधु नावाच्या यादव कुळात जन्मलेला, माधव, श्रीकृष्ण. साऱ्या सृष्टीतील चैतन्य व चैतन्याचे वसंत ऋतुसारखे सौदर्यं, जीवनमाधुर्य व प्रफुल्लता ह्यांनी सृष्टीला मोहवणारे, व आत्मसंगीताने न्हाऊ घालणारे, मन रिझवणारे अविष्कार हे सर्व मूलतः तुझेच अवतरण आहे. म्हणून वसंत ऋतुलाही माधवः म्हणतात. अन्य दृष्ट्या पाहता हे सर्व पाहून अनुभवून निर्भेळ आनंद घेणारे मानवाने केलेले रसग्रहण मूलतः तूच आहेस. म्हणून तुझ्याशिवाय सारेकाही निरस आहे. तुला सादर प्रणाम असोत.

**७३६) भक्तवत्सलः । भक्तवत्सलाय नमः ।**

आईप्रमाणे भक्तावर प्रेम करणारा. तुझे आणि विश्वाचे नाते निर्सगातील एका नात्याच्या द्वारे काही प्रमाणात समजावता येते. हे नाते म्हणजे आईचे बालकाबरोबरचे वात्सल्याचे नाते. बालकाला जेव्हा काहीही कळत नसते, काहीही करता येत नसते, एवढेच नव्हे तर स्वतंत्रपणे जगताही येत नसते तेव्हा त्याच्याकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता आई त्याचे जे संगोपन करते त्यातून तुझे व निसर्गाचे (व भक्ताचे) नाते थोडे फार लक्षात येते. बालकाच्या आयुष्यातील सर्व घटनांवर आईचे नियंत्रण नसते, बालकावरील आईचे वात्सल्य ही तिची स्वतःची स्वयंभू कृती नसून तुझी लीला असते, तसेच आईचे वात्सव्य बालकाच्या अंतरंगात ज्ञातेपणाने नसते ह्या तीन बाबींमध्ये

तुझी भक्तवत्सलता निराळी आहे. तुझे भक्ताच्या प्रत्येक हालचालीवर व भावनेवर ज्ञानपूर्ण नियंत्रण असते. आणि तुझी भक्तवत्सलता अन्य कुणाची नसून तुझीच लीला असते. भक्तवत्सलता ही निव्वळ तुझी स्वतःची लीला असल्याने व तू भक्तहृदयात ज्ञानी सत्तेने नेहमीच असल्याने बालकांचा त्याग (या ना त्या कारणास्तव) करणाऱ्या माता असू शकतात पण तू मात्र कधीही भक्तांचा त्याग करीत नाहीस. त्यांना कधीही अंतर देत नाहीस. कारण तुझे वात्सल्य परप्रकाशी परावलंबी नाही. चिरंतन स्वतंत्र आहे. तुला शतशः कृतज्ञ दंडवत असोत.

**सुवर्णवर्णो हंगामो वरांगश्चन्दनांगदी ।**
**वीरहा विषमः शून्यो घृताशीरचलश्चलः ।।**

**७३७) सुवर्णवर्णः । सुवर्णवर्णाय नमः ।**

सोनेरी प्रभा असणारा. चराचरातील तेजाचा, चैतन्याचा व ज्ञानाचा उगम हे तुझे अंग व विश्वातील तेज, चैतन्य व ज्ञान ही तुझे सोनेरी प्रभा होय. तुझ्या भक्तांचं जीवन थेट तुझ्याप्रमाणेच तुझ्या कृपेमुळे तेजस्वी, देदीप्यमान, चैतन्यपूर्ण व ज्ञानतेजाने युक्त बनतं. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**७३८) हेमाङ्गः । हेमाङ्गय नमः ।**

ब्रह्मा, विष्णू, गरुड, सिंह, मेरू इत्यादी. तसेच हेमाङ्ग म्हणजे सुवर्णमय अंग असलेला. सृजनशीलता, संगोपन, वेगवानता, इंद्रियजय, वृत्तींची उत्क्रांती हे वैश्विक व व्यक्तीतील गुण तूच असल्याने तसेच सुवर्णाप्रमाणे अत्यंत तेजस्वी सूर्य हे तुझे अंग असल्याने तुला हेमाङ्गः म्हणतात. तुला माझे मनोभावे वंदन असो.

**७३९) वराङ्गः । वरांङ्गय नमः ।**

उत्तम अंगोपांगे असणारा. संपूर्ण विश्व हे तुझे सुंदर शरीर आहे किंवा विश्वातील सर्व सुंदरता हे तुझेच अंग आहे. वैयक्तिक पातळीवर व्यक्तीची सर्व उत्तमांगे जशी कुंडलिनी, षट्चक्रे, सहस्रार चक्र हे सारे देखील तूच आहेस. सगुण रूपामध्ये तुझे संपूर्ण शरीर उत्तम लक्षणी दाखविण्यामागील तथ्य तुझ्या निर्गुण निराकार अशरीरी शरीराचा बोध व्हावा हेच असतं. म्हणूनच तुझी मूर्ती लोकोत्तर आणि लोकविलक्षण वैशिष्ट्यांनी नटलेली असते. त्याचा एक हेतू तू निसर्गनियमांच्या अतीत आहेस हे दाखवण्याचा असावा. नरसिंह, गणपती, तुंबरू, जांबुवंत, हनुमान वगैरे सगुण रूपांद्वारे वैश्विक एकात्मता साधणारा तुझा गुण दिग्दर्शित होतोच, पण तू निसर्गनियमांचा नियंता असल्याचेही जाणवते. तुझ्या मानवदेहधारी मूर्तींची वैशिष्ट्ये देखील लोकविलक्षण

असतात. दाढी-मिशांचा अभाव, अनेक हात वा शिरे, डोक्यामध्ये चंद्र, गंगा व नाग, विविध वाहने इत्यादीमधून शास्त्रकारांच्या व मूर्तिकारांच्या मनातील तुझ्या निसर्गनियंता सत्तेविषयीची जाणीव दृग्गोचर होते. भक्तांना तो बोध होतो पण त्याच क्षणी ते काया वाचा मनाने तद्रूप होतात. तुझेच अंग बनतात. त्याना देहबुद्धी राहत नाही. वेगळेपणाची जाणीव राहत नाही. तुला विनम्र नमन असो.

**७४०) चन्दनाड्गदी। चन्दनड्गदिने नमः।**

आनंद हीच बाहुभूषणे असणारा किंवा अंग चंदनाने लिप्त असणारा. दान हे हातांचे सर्वोच्च भूषण आहे. आत्मज्ञानाचे दान दानामधील सर्वोच्च दान आहे. ज्याच्या अशरीरी सर्वोत्कृष्ट बाहूंचे कल्पानातीत उत्तम भूषण आत्मज्ञानानंदाचे दान आहे असा तू आहेस. सगुण मूर्तीची पूजा चंदनाच्या लेपासह केली जाते. तसेच भक्त स्वत:च्या देहालाही चंदन लावतो. चंदनाचा हा वापर चंदन आरोग्यदायी व आनंददायी असल्याने केला जातो. यादृष्टीनेही प्रसन्न सगुण मूर्तीमध्ये आणि चंदन लावून प्रसन्न मनाने भक्ती करणाऱ्या भक्तामध्ये तूच असतोस. तुला सविनय अभिवादन असो.

**७४१) वीरहा। वीरघ्ने नमः।**

वीरांना ठार मारणारा. विश्वातील द्वंद्वे एकत्वाने स्वत:मध्ये मुरवून टाकणारा. समाजातील द्वंद्वे स्वत:च्या लोकोत्तर ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती व क्रियाशक्तीने (विश्वधर्माच्या मार्गात अडथळे बनणाऱ्या महाबली प्रवृत्तींना ठार करून) नाहीशी करणारा आणि वैयक्तिक पातळीवरील परस्परविरोधी वासना, भावना, विचार व अहंकार याना विरघळून आत्मप्रचिती देणारा म्हणून तुला वीरहा म्हणतात. तुला विनम्र वंदन असो.

**७४२) विषमः। विषमाय नमः।**

ज्याला तुलना नाही असा. भयंकर. तू एकमेवाद्वितीय आहेस. तुझ्यासम कुणीही नाही म्हणून विषमः आणि विश्वधर्माच्या रक्षणासाठी कर्दनकाळ बनून संकुचित व हीन वृत्तींचे पारिपत्य करणारा आहेस म्हणूनही तुला विषमः म्हणणे सयुक्तिक आहे. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**७४३) शून्यः। शून्याय नमः।**

नसलेला. अभावाने असलेला. कोणतेही वैशिष्ट्य, मापन किंवा परिमाण नसल्याने तुला रूढार्थाने अस्तित्व नाही. कोणत्याही प्रकारे जाणण्यासारखे किंवा ज्यावर विश्वास ठेवावा असे अस्तित्व तुला नाहीच. तुझ्या प्रचीतीसाठी प्रयत्न करणारे

स्वतंत्र व तद्रुप होतात तर भाबडा आणि अनाठायी विश्वास माणसाला असहाय व परावलंबी बनवतो. अनुभवण्याची वस्तु, अनुभवणारा, अनुभवण्याची प्रक्रिया, अनुभवाची साधने यांपैकी काहीही नसल्यानेही तू शून्यच आहेस. परंतु रूढार्थाने अस्तित्व नसलेला म्हणजे मुळातच नसलेला असे नव्हे. तुझी प्रचीती ही तुझी कृपा आहे. तुझ्या कृपेनेच व्यक्तीच्या अस्तित्वात तुझा (सत्याचा) शोध घेण्याची शारीरिक, वासनिक, भावनिक, वैचारिक प्रक्रिया सुरू होते व तुझ्या कृपेनेच कोणत्याही वेळी तुझी प्रचीती येते पण तत्क्षणी व्यक्तीचे वेगळे अस्तित्व संपते. तुला आहे म्हणणाराच कुणी नाही असे होते. त्यामुळे तुला शून्य म्हणणेच योग्य. प्रचीती नसतानाही तू आहेस म्हणणे हा ढोंगीपणा, लबाडी किंवा वेडेपणा असतो. तसे तुझे अस्तित्व पुरस्कारणे म्हणजे अविद्येला सत्य म्हणणे असते. त्यामुळे तू शून्यच आहेस. तुझ्यावर विश्वास ठेवणे, तुझ्यावर विश्वास ठेवण्याचा दबाव टाकणे (संस्कारांच्या व अन्य रूपात) एवढेच नव्हे तर सत्याच्या मागे लागण्याचा वा आत्मसाक्षात्काराचा अभिनिवेश धरणे हेही अविद्याजन्यच आहे. भक्त तुझ्या प्रचीतीच्या कृपेने, तुझ्या इच्छेने, तुझ्या संकल्पानुसार अहंभाव विसरून अनाग्रही अनासक्त आनंदाने जगतात. त्यांचे असे सर्वस्वी नाहीसे होऊन जगणे हीच उद्याच्या महान विश्वसंस्कृतीची हमी आहे. तुला शून्य म्हणणे हा तुला (सत्य) जाणण्याचा अनुभवण्याचा ज्ञान मार्ग आहे. तद्रूपात काहीच राहत नाही. अज्ञान संपतेच परंतु तिथे ज्ञानही राहत नाही. केवळ शून्यच राहते. म्हणून तू (सत्य) शून्य आहेस. परंतु गणितातील, अभावाचा आशय सांगणारे बुद्धिगम्य शून्य तू नव्हेस. कारण इथे शून्यः याचा अर्थ, बुद्धिगम्य गणितातील अभावदर्शक शून्य नसलेले महाशून्य असा आहे. देव नाही असे म्हणणाऱ्यांची भूमिका वेगळी असते. त्यांना तू नाहीस व त्यांचे शरीर, बुद्धी, मन, अहंकार हेच सत्य आहे असे वाटते. शून्यः या तुझ्या नावाचा तसा अर्थ नाही. तुला निरंतर वंदन असो.

**७४४) घृताशीः । घृताशिषे नमः ।**

वृंदावनामध्ये चोरून लोणी खाणारा, कोणत्याही स्तुतीची गरज नसलेला. तू सर्वतोपरी परिपूर्ण आहेस व तुला कोणत्याही स्तुती, भजन, पूजन, अर्चनाची गरज नाही. उलट भक्तांच्याच सर्व इच्छा तू खाऊन टाकतोस. तुझ्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या गोपिकांचे लोणी तू चोरून खाल्लेस यामागील हृदयंगम सत्य हे असे आहे. अपूर्णतेतून, असुरक्षिततेतून, अविद्येतून इच्छा, आकांक्षा, गरजा नाहीत उलट भक्तांनाही परिपूर्ण करून तू त्यांच्या इच्छा खातोस. त्यांना अवैयक्तिक व इच्छा, आकांक्षांच्या अतीत विशालतम अजरामर बनवतोस. पुष्कळदा जेव्हा प्रश्न येतात की देव प्रार्थनेची लाच खाऊन पुण्य व सुख देतो काय? देवाला चांगल्या वागण्याची पर्वा नाही काय? चांगले

वाईट हे न करण्याइतपत तो झोपा काढणारा मूर्ख आहे काय की स्तुती वा प्रार्थनेद्वारे त्याला जागे करावे लागावे? पुण्यासाठी प्रार्थना करणे हे क्षुद्र स्वार्थीपणाचे लक्षण नव्हे काय? मग असा स्वार्थ साधणे हे अहितकारक नव्हे काय? देवाला न मानता व न पूजता श्रीमंत होणारे व देवदेव करून दरिद्री राहणारे जगात नाहीत काय? हे सर्व प्रश्न आणि ज्या कारणांमुळे ते तयार होतात, ते सारे आणि त्याना ह्या ना त्या प्रकारे दिली जाणारी उत्तरे व त्या उत्तरामागील भूमिका अविद्याजन्य आहेत. संपूर्ण जग व त्यातील प्रलोभने ज्याला तृणवत् वाटतात अशा निस्पृह असणाऱ्या तू आणि तुझ्या भक्तांना कुणाच्या विश्वासाची, भक्तीची, पूजेची वा स्तुतीची अजिबात गरज नाही. किंबहुना बारकाईने व कसून पाहिलं तर स्तुती करणं लोकांच्या 'हातातही' नाही. त्यांच्या अंतरात्म्याच्या तुझ्या हाती आहे. तुला व तुझ्या भक्तांना शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**७४५) अचलः । अचलाय नमः ।**

न हालणारा न चालणारा. चल-अचलाच्या, काळाच्या, परिमाणांच्या व जाणिवेच्याही अतीत असणारा व गतीचे गतीत्व आणि काळाचे काळपण असणारा व कोणतीही हालचाल नसलेला म्हणून अचल आहेस. तुला शतशः दंडवत असोत.

**७४६) चलः । चलाय नमः ।**

सतत हालचाल करणारा. न हलणारा याचा अर्थ सुस्त, निर्जीव, मंद असा होतो. तो तसा होऊ नये व तुझे अस्तित्व थोड्या अधिक अचूकतेने आकलन व्हावे म्हणून तुला चलः म्हटले आहे. कारण काळातीत असणे म्हणजे व्यवहारात आढळणारी हालचाल नसणे हे जेवढे खरे तेवढेच काळातीततेमुळे सर्व प्रकारचे स्थुलत्व, सुस्ती अजिबातच नसणे, किंबहुना सर्वाधिक व निरंतर हालचाल असणे हेही अगदी खरे आहे. वैयक्तिक पातळीवर तुझे भक्त स्थितप्रज्ञ म्हणजे अचल, अढळ निष्ठा असणारे चिरंतन आत्मानुसंधानी जसे असतात तसेच ते चैतन्य, उत्साह, चपळता, बुद्धी, भावना व क्रियाशीलता यांचे पुतळेही असतात. म्हणून तुला चलः म्हणणे अगदी रास्त आहे. तुला अखंड वंदन असो.

**अमानी मानदो मान्यो लोकस्वामी त्रिलोकधृक् ।**
**सुमेधा मेधजो धन्यः सत्यमेधा धराधरः ।।**

**७४७) अमानी । अमानिने नमः ।**

अहंकाररहित. सतत आत्मरूपी असल्याने अनात्म वस्तूंच्या ठायी आत्मरूपाचा अहंकार, अभिमान नसणारा, व विश्व, समाज, व्यक्ती त्यांना तसे बनवणारा. वैयक्तिक

जीवनात तुझ्या कृपेने व तुझ्या प्रचीतीने देह, वासना, भावना, इच्छा, आकांक्षा, प्रपंच वगैरे कोणत्याही बाबीबद्दल तीळमात्रही अहंकार राहात नाही. कारण तत्स्वरूपाचे वैभव एवढे शाश्वत व महान् की अन्य सर्व बाबी पोकळ, क्षणभंगुर व क्षुल्लक ठरतात. तुला अनन्यभावे नमन असो.

**७४८) मानदः । मानदा नमः ।**

खरा वा खोटा अहंभाव मोठेपणा मान, देणारा. तसेच मान नष्ट करणारा. सारे विश्व व जाणीव ही तुझी लीला आहे व व्यक्ती आणि तिच्या भावना/कल्पना ही देखील तुझीच लीला आहे. त्यामुळे देहबुद्धी आणि तज्जन्य अहंभाव व सुख-दुःखे देणारा तू आहेस. तसेच, तुझ्या प्रचीतीचा स्फोट घडवून आणून अहंभाव व सुख-दुःखांच्या ठिकऱ्या उडवणारा तू आहेस. तुला कृतज्ञ वंदन असो.

**७४९) मान्यः । मान्याय नमः ।**

मान मिळालेला किंवा मान मिळण्यास योग्य. प्रत्येकाच्या अंतर्बाह्य सर्वोच्च सत्तेने राहणारा, शाश्वत, संपूर्ण प्राधान्याने मान देण्यास योग्य व कळत नकळत मान दिला गेलेला असा तू आहेस. तुझे भक्तही जगाला वंद्य होतात. तुला आदरपूर्वक प्रणिपात असोत.

**७५०) लोकस्वामी । लोकस्वामिने नमः ।**

विश्वाचा, जाणिवांच्या विविध स्तरांचा व अनुभवांचा स्वामी. तुझ्या कृपेने व प्रत्यक्ष नियंत्रक, कर्त्या प्रभावाने अनुभवविश्व जन्मते, साकारते व अखेर तुझ्यात विलय पावते. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**७५१) त्रिलोकधृक् । त्रिलोकधृगे नमः ।**

संपूर्ण विश्वाचा व जाणिवांच्या स्तरांचा मूलाधार व चिरंतन नियंता आणि रक्षक तू आहेस. भक्ताच्या जाणिवांच्या व अनुभवविश्वाचाही मूलाधार (उगम), नियंता आणि राखणकर्ता तूच आहेस. तुझ्या आधाराच्या जाणिवेत तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**७५२) सुमेधाः । सुमेधसे नमः ।**

अशरीरी अस्तित्वाने शुद्धतम, देहबुद्धिरहित व देहाभिमानरहित बुद्धी असलेला. तुझ्या भक्तांची बुद्धी तुझ्याप्रमाणेच अत्यंत शुद्ध करणाराही तूच आहेस. तुझ्या विश्वकल्याणकारी संकल्पाच्या पूर्तीसाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अशी शुद्ध बुद्धी असलेल्यांचे नेतृत्व येणे आवश्यक आहे, जे तुझ्या कृपेनेच घडेल. तुला विनम्र वंदन

असो.

**७५३) मेधजः। मेधजाय नमः।**

त्यागातून जन्मणारा. संयम, ज्ञान, भक्ती, कर्म आदि विविध मार्गांनी संकुचित व्यक्तित्वाचा होम त्याग करणाऱ्यांच्या, अहंकाराच्या, वैयक्तिकतेच्या, संकुचिततेच्या अंताबरोबरच त्यांच्या हृदयाकाशात तू जन्मतोस (अवतरतोस) म्हणून तुला मेधजः म्हणतात. संपूर्ण विश्वच या प्रक्रियेमध्ये आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**७५४) धन्यः। धन्याय नमः।**

कोणतीही इच्छा अतृप्त नसलेला व सर्व भोग भोगून झालेला. तुझे भक्तही तुझ्याप्रमाणेच असतात. ते कोणत्याही तऱ्हेच्या टंचाईने, अभावाने ग्रस्त असत नाहीत. म्हणून तुला व तुझ्या भक्तांना धन्यः (भाग्यवान) म्हणतात. तुला विनम्र अभिवादन असो.

**७५५) सत्यमेधः। सत्यमेधाय नमः।**

सत्य बुद्धी असणारा. सर्व काही जाणणारी व कृतीतही आणणारी शाश्वत, नियंत्रक, अचूक बुद्धी असल्याने तुला सत्यमेधः म्हणतात. अशरिरी, वैयक्तिक, शाश्वत, स्थित्यंतरातीत नियंत्रक आणि वर्णनातीत सत्य बुद्धी असणाऱ्या तुला विनम्र वंदन असो.

**७५६) धराधरः। धराधराय नमः।**

पृथ्वीचा आधार, किंवा जडतत्त्वाचा आधार. संपूर्ण चराचरातील स्थित्यंतरांच्या दरम्यान असणारा स्थित्यंतरातीत असा विश्वाचा आधार तू आहेस. हीच बाब पृथ्वीला आधार देणारा शेष या सगुण रूपातून वर्णिली जाते. दुसऱ्या दृष्टीने पाहिल्यास वैश्विक किंवा वैयक्तिक पातळीवर, जडत्व, मंदता, स्थूलता, आळस, मूढत्व इत्यादींनी ग्रासलेल्यांना त्या गर्तेतून बाहेर काढणारा व मुक्ती देणारा म्हणून तुला धराधरः म्हणतात. तुला नम्र प्रणाम असोत.

**तेजोवृषो द्युतिधरः सर्वशस्त्रभृतां वरः।**
**प्रग्रहो निग्रहो व्यग्रो नैकशृङ्गो गदाग्रजः॥**

**७५७) तेजोवृषः। तेजोवृषाय नमः।**

तेजाचा पाऊस पाडणारा किंवा तेजरूपी धर्म किंवा धर्माचे तेज असणारा. मथितार्थ असा की विश्वनियमांहतर्बाह्य नियंत्रक धर्माच्या तेजाने विश्वाला अंतर्बाह्य न्हाऊ

घालणारा. वैयक्तिक पातळीवर, धर्मज्ञानाच्या (आत्मप्रचितीच्या) तेजाने भक्ताचे हृदयाकाश व जाणीवा झळाळून टाकणारा, असा ईश्वर. तुला शतशः प्रणिपात असोत.

**७५८) द्युतिधरः। द्युतिधराय नमः।**

विश्वातील व जाणिवेतील सर्व तेजाचाही आधार तूच आहेस. ज्ञानतेजाचा आधार व ज्ञानकिरणानी भक्ताला प्रचीती देणारा तू असा साक्षात्कार झालेल्यांच्या अंतर्दृष्टीला (प्रज्ञाचक्षूंना) अत्यंत, लावण्यमय, आल्हाददायी व तेजस्वी दिसतोस. अन्यदृष्टीने पाहता भक्तांना त्यांच्या जीवनातील सर्व चैतन्याचा व तेजाचा उगम व आधार तू असल्याचे सतत जाणवते म्हणून ते तुला द्युतिधरः म्हणतात. तुला विनम्र नमन असो.

**७५९) सर्व शस्त्रभृतांवरः। सर्वशस्त्रभृतांवराय नमः।**

सगुण रूपांमध्ये धनुष्यबाण धारण करणारा राम किंवा सुदर्शन चक्र धारण करणारा श्रीकृष्ण हे दोन्ही हे सर्वश्रेष्ठ शस्त्रधारी तूच आहेस. अन्य दृष्टीने पाहता, निर्गुण व निराकार अशा तुझा प्रभाव अनाकलनीय व शस्त्रास्त्रांच्या प्रभावापेक्षाही श्रेष्ठ आहे कारण तो कशाही प्रकारे निष्फळ करता येत नाही. तुझ्याचरणी लोटांगण असो.

**७६०) प्रग्रहः। प्रग्रहाय नमः।**

लगाम हाती धरून रथाचे सारथ्य करणारा, सर्व पूजा स्वीकारणारा. भक्ताच्या मनाचे लगाम धरून त्याचे जीवन नियंत्रित करणारा व सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या सर्व विचारप्रणालीच्या ज्ञानमय, भक्तिमय व कृतिमय पूजांचा स्वीकार करणारा. आणखी व्यापक अर्थाने पाहिल्यास विश्वातील चराचरांतर्बाह्य घटनांचे आणि जाणिवांच्या स्तरांचे अचूक नियंत्रण करणारा तूच आहेस. योग्य भक्तांना प्रचीतीही अचूक वेळी व अचूक प्रकारे देणारा तूच आहेस. तुझ्याचरणी नमस्कार असोत.

**७६१) निग्रहः। निग्रहाय नमः।**

नाश करून शोषून घेणारा. विश्वाचा नाश करून अखेर ते तूच शोषून घेतोस. त्याचप्रमाणे भक्तांचे संकुचित अस्तित्व नष्ट करून तू शोषून घेतोस. अन्य दृष्ट्या पाहिल्यास विश्वातील अणुरेणुमधल्या हालचालीवर आणि भक्तांच्या वासना-भावनांवर तुझेच नियंत्रण असून तूच ते सारे अखेर स्वतःमध्ये समरस करून घेतोस. तुला विनम्र वंदन असो.

**७६२) व्यग्रः। व्यग्राय नमः।**

अपूर्णत्व नसल्याने कोणतीही इच्छा नसलेला. अर्थात् जे जे अपूर्ण आहे त्या त्या

सर्वांना स्वस्वरूप (तद्रुप) बनवून इच्छामुक्तीची महान तृप्ती देणारा तू आहेस. म्हणून तुला व्यग्रः म्हणजे भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यात सतत मग्न असलेला असे म्हणतात. तुझ्या चिंतनाने दानातील सामर्थ्याचा व महान आनंदाचा प्रत्यय येऊ लागतो. तुला माझे साष्टांग प्रणिपात असोत.

**७६३) नैकशृंगः । नैकशृंगाय नमः ।**

जागृती, सुषुप्ती, स्वप्न व तुरीया ही शिंगे असलेला. मथितार्थ, अनेक अवधाने असलेला. थोडक्यात, जाणिवांच्या सर्व स्तरात्मक आणि स्तरातीत असा तू या जाणिवांद्वारे विश्वावर प्रभुत्व गाजवतोस, त्याचे वात्सल्याने पोषण करतोस आणि सर्वोच्च जाणिवेवरून क्रियाशक्ती व जीवनस्फूर्ती देतोस. तुला शतशः दंडवत असोत.

**७६४) गदाग्रजः । गदाग्रजाय नमः ।**

धाकट्या भावाचे नाव गदा म्हणून श्रीकृष्णाला गदाग्रजः म्हणतात. श्रीकृष्ण ह्या सगुणावतारातून गदापूर्वीही म्हणजे मंत्रापूर्वीही म्हणजेच वेदांपूर्वीही अस्तित्वात असलेला (अनादि अनंत परमेश्वर) हे सूचित करायचे आहे. तसेच मंत्राच्याद्वारे भक्तजाणिवेत अवतरणारा असाही भावार्थ निघतो. परावाणीच्याही अतीत अशा तुला भावपूर्ण अभिवादन असो.

**चतुर्मूर्तिश्चतुर्बाहुश्चतुर्व्यूहश्चतुर्गतिः ।**
**चतुरात्मा चतुर्भावश्चतुर्वेदविदेकपात् ॥**

**७६५) चतुमूर्तिः । चतुर्मूतये नमः ।**

चार आकार असलेला. चार मूर्ती असलेला. चार युगे, कृत (पांढरा वर्ण), त्रेता (रक्तवर्ण), द्वापार (पिवळा वर्ण) व कली (काळा वर्ण), चार अवस्था (जागृती, स्वप्न, झोप व शुद्धस्वरूप), चार सूक्ष्म रूपे (विश्व, तेजस्, प्रज्ञा व तुरीया), चार अस्तित्वे (विराट, हिरण्यगर्भ, ईश्वर व अनादि अनंत असा परमात्मा), अशा तऱ्हेने तुझे वर्णन करण्यात आले असल्याने तुला चतुर्मूर्तिः म्हणतात. तुला माझे साष्टांग प्रणिपात असोत.

**७६६) चतुर्बाहुः । चतुर्बाहवे नमः ।**

पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या चार दिशा व वैयक्तिक पातळीवर मन, बुद्धी, चित्त व अहंकार हे चार बाहु असलेला, म्हणून चतुर्बाहुः. तुझ्या सगुण भक्तीतून तुझी विश्वात्मकता जाणवते. तुला माझे अनन्यभावनेने लोटांगण असो.

**७६७) चतुर्व्यूहः । चतुर्व्यूहाय नमः ।**

चार क्रियाशील रचना किंवा अवतारानी स्वतः केंद्रस्थानी राहून कार्य करून घेणारा. ह्या रचनांना पुरुष असेही म्हणतात. शरीरपुरुष (शरीरातील पुरुष-जीवात्मा), छंदपुरूष (मंत्रातील पुरुषतत्त्व), वेद पुरुष (वेदातील पुरुष किंवा तत्त्व) आणि महापुरुष म्हणजे विश्वात्मक पुरुष किंवा तत्त्व, अशा चार रचनांच्या (पुरुषांच्या) द्वारे सतत कार्यरत असणारा असा तूच आहेस. चौघांनी बनलेला असल्याने तुला चर्तुर्व्यूहः म्हणतात. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**७६८) चतुर्गतिः । चतुर्गतये नमः ।**

अध्ययन-अध्यापन, अर्थार्जन, संरक्षण व सेवा करणारे चार वर्ण, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास आचरणारे चार आश्रम या चौघाही समूहांना मिळणारी धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही प्रकारची गती (परिणती) तूच आहेस. तुला सविनय अभिवादन असो.

**७६९) चतुरात्मा किंवा चत्वरात्मा । चतुरात्मने नमः ।**

वैश्विक पातळीवर चार व्यूहानी बनलेला परमात्मा तर वैयक्तिक पातळीवर मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चार अंगानी मंडित असा जीवात्मा तू आहेस. परंतु वैश्विक व वैयक्तिक पातळीवर तू शुद्ध व गुणातीत आहेस. विश्वात्मक व वैयक्तिक, शरीर आणि अंतःकरण प्रकाशित करणारा आहेस. तुला माझे मनोभावे नमन असो.

**७७०) चतुर्भावः । चतुर्भावाय नमः ।**

चारांचा मूलस्त्रोत, उगम. वैश्विक पातळीवर विचार करता, सत्व, रज, तम व गुणातीत असं सर्व अस्तित्व आणि वैयक्तिक पातळीवर विचार करता धर्म, अर्थ, काम व मोक्ष असं परिणामस्वरूप अस्तित्व, ही तुझ्यापासूनच उत्पन्न होतात. जागृती, झोप, स्वप्न व तुरीया अवस्थाही तुझ्यापासून तयार होतात. भक्तियोग, कर्मयोग, राजयोग व ज्ञानयोग देखील तुझ्यापासूनच उत्पन्न होतात. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**७७१) चतुर्वेदवित् । चतुर्वेदविदे नमः ।**

ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद हे चारही वेद जाणणारा वेदांचा खरा ज्ञाता व अशरीरी उगम तू आहेस. तुझ्यापासूनच ब्रह्मज्ञानी ऋषींना वेदप्राप्ती झाली व म्हणूनच वेदांना अपौरुषेय म्हणतात. मानवनिर्मित नसलेले म्हणतात. संकुचित देहबुद्धी पूर्णपणे नष्ट झालेल्या ऋषींच्या हृदयाकाशात परावाणीच्या द्वारे अशा तऱ्हेने अवतीर्ण झालेल्या

वेदाचे एकमेव उद्दिष्ट व सर्वोच्च परिणती तुझी प्राप्ती हेच आहे. सर्व ज्ञानाचा उगम, नियंता व अंतिम हेतू (व परिणती) असलेल्या तुला शतशः लोटांगणे असोत.

**७७२) एकपात्। एकपदे नमः।**

सर्व विश्व ज्याच्या एका पायाप्रमाणे आहे किंवा एका पायाने ज्याने विश्वाला आधार दिला आहे किंवा विश्व हे ज्याच्या एखाद्या अंशाप्रमाणे आहे. मथितार्थ असा की तू एकत्वाने जाणणारा, एकत्वाने असणारा, भक्ताला एकमेवाद्वितीयपदी नेणारा व स्वतः तेथेच राहणारा आहेस. तुला माझे कृतज्ञ अभिवादन असो.

**समावर्तोनिवृत्तात्मा दुर्जयो दुरतिक्रमः।**

**दुर्लभो दुर्गमो दुर्गो दुरावासो दुरारिहा॥**

**७७३) समावर्तः। समावर्ताय नमः।**

उत्पत्ती, स्थिती व विनाश (स्थित्यंतर) हा विश्वाचा नियम निर्मिणारा व नियंत्रित करणारा म्हणून तुला समावर्तः म्हणतात. स्वतः स्थित्यंतरातीत असून अशी असंख्य चक्रे फिरवणारा, विश्वनिर्मिती, स्थिती व विनाश यांचा कर्ता व नियंता तू आहेस. क्रमसंकोच व क्रमविस्ताराचे चक्र फिरवणाराही तू आहेस. वैयक्तिक पातळीवरील झोप जागृती झोप असे चक्र, जन्म-मृत्यूचे चक्र, बाल-युवा वृद्धावस्थेचे चक्र, इत्यादींचा कर्ता नियंताही तूच आहेस. समाजातील धर्मस्थापना, धर्मवृद्धी व धर्मनाशाचे चक्र घडविणारा व नियंत्रित करणाराही तूच आहेस. तुला माझे साष्टांग नमस्कार असोत.

**७७४) निवृत्तात्मा किंवा अनिवृत्तात्मा। निवृत्तात्मने नमः। अनिवृत्तात्मने नमः।**

ही दोन्ही नावे तुझे रूप वर्णन करतात. विश्वातील चराचरामध्ये प्रत्यक्षपणे सहभागी न झालेला व म्हणून साक्षी असल्याने तुला निवृत्तात्मा म्हणतात. तर अनिवृत्तात्मा म्हणजे विश्व उत्पत्ती, स्थिती व लय यांचे अप्रतिहतपणे नियंत्रण करणारा म्हणून तुला (कधीच पराङ्मुख न होता कार्य करणारा) अनिवृत्तात्मा म्हणतात. मुंडकोपनिषदात एकमेव परमात्मरूपी झाडावरील एक फळे न खाणारा तर दुसरा फळे खाणारा अशा दोन पक्ष्यांचे वर्णन आहे. हे दोनही तुझेच मानवाला जाणवणारे स्वभावविशेष आहेत. याचा तत्वार्थ असा की तू एकाच वेळी निवृत्तात्मा व अनिवृत्तात्मा असून दोन्हींच्या अतीत आहेस. तुला माझे निरंतर वंदन असो.

**७७५) दुर्जयः। दुर्जयाय नमः।**

अजिंक्य. विश्वात्मक पातळीवर अव्याहतपणे रेसभरही न विचलित होता तू जे

सर्वसमावेशक कार्य करतोस त्यामध्ये कुणीही बाधा आणू शकत नाही. सामाजिक व वैयक्तिक पातळीवरही सर्व अविद्याजन्य अवनतीचा प्रभाव यथास्थित, यथावकाश, यथायोग्य तऱ्हेने नष्ट करणारा आत्मज्ञानोदय घडविणारा सर्वव्यापी प्रज्ञासूर्य तू आहेस. तुला माझे लीनभावे नमन असो.

**७७६) दुरतिक्रमः । दुरतिक्रमाय नमः ।**

ज्याच्या पलीकडे किंवा विरोधात जाणे कठीण, (अशक्य) आहे असा. करुणा, क्रौर्य, तमोगुण, सत्वगुण, बुद्धी, भावना इत्यादी कोणत्याही अविद्याजन्य वृत्तीतून व तज्जन्य कृतीतून विश्वनाश किंवा विश्वकल्याणाचे कितीही प्रयत्न केले तरी ते सर्व तुझ्या संकल्पामध्ये विरघळून जातात. परमोच्च आणि विश्वनियंता अशा तुला विनम्र अभिवादन असो.

**७७७) दुर्लभः । दुर्लभाय नमः ।**

प्राप्त होण्यास अत्यंत कठीण असा तू आहेस. अविद्येने ग्रस्त अशा लोकांना संकुचित देहबुद्धिजन्य विचार येतात. तुझ्या अस्तित्वाचा विचार देखील त्यांच्या मनात येत नाही. त्यामुळे तुझी प्राप्ती अत्यंत कठीण बनते. यदाकदाचित तुझा विचार आला तर तुझ्या अस्तित्वाचा देहबुद्धिगम्य पुरावा न मिळाल्याने ते तुझा विचार सोडून देतात व स्वतः तर्कशास्त्रात अडकून राहतात. अविद्येने या तऱ्हनेही तुझी प्राप्ती अत्यंत कठीण होते. अविद्येमुळे अस्थिर नश्वर बाबींबद्दल सत्यत्वाची भावना आणि मोह तयार होतो व सारे लक्ष, ध्यान, तिथेच केंद्रित राहते व तुझा विसर पडतो. तुझी प्राप्ती दुर्लभ होते. अविद्येमुळे अहंकारही तयार होतो. 'मी' सर्व काही करू शकतो या कल्पनेमध्ये माणूस अडकून पडला की संकुचित 'मी'च्या पलिकडे असणारा तू दुर्लभ होतोस. केवळ तुझ्याच कृपेने प्राप्त होणारा पण अन्यथा दुर्लभ अशा तुला भक्तिपूर्वक लोटांगण असो.

**७७८) दुर्गमः । दुर्गमाय नमः ।**

जिथे पोचणे अतिशय कठीण असे स्थान. देहातील संवेदन केंद्रांमुळे शरीरसुख, अंतस्रावी ग्रंथींच्या प्रभावाने वासना, मेंदूतील विविध भागांच्या नैसर्गिक प्रक्रियांमुळे भावना, विचार, कल्पना, स्मरणशक्ती यांचा उगम आणि प्रभाव उत्पन्न होतो. मेंदूमुळे बुद्धीही कार्यरत होते. या सर्वांमुळे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय अस्तित्वाच्या वा सुखाच्या कल्पनेत व प्रयत्नात माणूस गुरफटतो. एवढेच नव्हे तर या सर्व जीवनसंघर्षात सुख मिळो वा दुःख अविद्येपायी तो शाश्वत सुखाला, तुला विसरतो. साहजिकच आत्मरूप अशा तुझ्यापर्यंत पोचणे एवढ्या

अडसरांमुळे त्याला कठीण होते. केवळ तुझ्याच कृपेने तुझा भक्त या अडसरांना जमीनदोस्त करून तुझ्यापर्यंत पोचतो व तद्रूप होतो. तुला सादर प्रणाम असोत.

**७७९) दुर्गः । दुर्गाय नमः ।**

अभेद्य किल्ला. देहबुद्धी, अहंकार, मोह, बुद्धीभ्रंश, तज्जन्य नास्तिकता किंवा अंध अस्तिकता, यांच्या तटबंदीमध्ये तुला अंतर्यामी कोंडले की तुझी प्रचीती दुरापास्त होते. तुझ्याप्रत पोचण्याच्या किल्ल्या तुझ्या कृपेशिवाय मिळत नाहीत. यास्तव तुला अभेद्य किल्ला म्हटले आहे. विश्वात्मक पातळीवर देखील जे आहे असे नेहमी भासते त्याच्या पार्श्वभूमीवर जे नाही असे भासते त्याचा विचारच नाकारला जातो व त्यामुळे जे नाही असे भासूनही असते ते (तू) दुर्ग बनून अभेद्य बनते. तुझ्या कृपेने संकुचित व्यक्तित्वाचा नाश करणाऱ्या व प्रचीती देणाऱ्या तुला माझे भावपूर्ण प्रणिपात असोत.

**७८०) दुरावासः । दुरावासाय नमः ।**

ज्या स्थानी राहणे अत्यंत कठीण असते असे स्थान. अस्तित्व आणि न-अस्तित्व यांच्या मनुष्याच्या जाणिवेमुळे या दोहोंच्या अतीत अशा तुझ्या स्थायी स्थिर होणे मनुष्याला अत्यंत कठीण होते. कारण त्यासाठी जाणिवेच्या अतीत बनावे लागते. सर्वसामान्यतः अस्तित्वाचा आधार म्हणून शरीर, मन, बुद्धी, कुटुंब, गाव, सामाजिक स्थान, राजकीय सत्ता, वगैरेंवर आणि यासंदर्भातील अनुभव, अपेक्षा इत्यादींवर व्यक्ती अवलंबून असते. तुझ्या ठायी राहणे म्हणजे या सर्वांचे ढोबळ अस्तित्व जरी नाकारणे नसले तरी या सर्वांवरची भ्रममूलक अशी दृढ भिस्त किंवा मदार नाकारणे आहे. ते न जमल्याने तुला **दुरावासः** म्हणणे रास्त आहे. केवळ तुझ्या कृपेनेच तद्रूप होऊन राहणे शक्य आहे - अन्यथा नाही. तुला माझे शतशः दंडवत असोत.

**७८१) दुरारिहा । दुरारिघ्ने नमः ।**

राक्षसांचा नाश करणारा. वाईट शत्रूंचा नाश करणारा. विश्वकल्याणाच्या तुझ्या संकल्पातील तुझ्या विरोधात येणाऱ्या व्यक्ती वा प्रवृतींना योग्य तो दंड (देहदंड किंवा अन्य) देणारा. लाखोंच्या अंतःकरणातील अधोगामी वृत्तींचा नाश करून विश्वकल्याण व आत्मोन्नती एकदमच साध्य करणारा म्हणून तुला **दुरारिहा** म्हणतात.

**शुभाङ्गो लोकसारंगः सुतन्तुतुस्तन्तुवर्धनः ।**
**इन्द्रकर्मा महाकर्मा कृतकर्मा कृतागमः ।**

**७८२) शुभांगः । शुभांगाय नमः ।**

उत्तम शरीर असलेला. किंवा उत्तमता हेच शरीर असलेला. ज्याच्या दर्शनाने

कल्याण होते असा. संपूर्ण विश्व व त्यातील अनुपम असे सर्वकाही म्हणजे तुझे शरीर आहे. सगुण रूपात तुझी मूर्ती तुझे शरीर निर्दोष व उत्तम लक्षणी असते. वैयक्तिक पातळीवर व सामाजिक पातळीवर तुझे दर्शन नेहमीच शुभ असते. निर्गुणाच्या ध्यानाने व सगुण भक्तीने तुझ्या कृपेने, संकुचितता व देहबुद्धी कमी होते. ती तशी कमी होणे हीच विश्वकल्याणाची अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. म्हणून तुला शुभांगः म्हणतात. मानसपूजेद्वारे वा मूर्ति, फोटो, नामस्मरण इत्यादींच्याद्वारे रोज सकाळी सर्वप्रथम देव दर्शन घेण्याचा उपदेश ह्याच महान सत्यावर आधारलेला आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**७८३) लोकसारंगः । लोकसारंगाय नमः ।**

सर्वज्ञ, सर्व चराचराचे मूळ तत्त्व. तू विश्वाचे सारतत्व जाणणारा सर्वज्ञ आहेस. चराचरातीत, दृश्यादृश्यातीत असे शाश्वत, सर्वसमावेशक व स्थित्यंतरातीत मूळतत्त्व तू आहेस. तुलाच ऋषिमुनींनी ॐ कार म्हटले आहे. तुझ्याचरणी माझे मस्तक असो.

**७८४) सुतन्तुः । सुतन्तवे नमः ।**

सुंदर तऱ्हेने एकाद्या धाग्यासारखे विस्तारलेले, खेचलेले. 'सुपरस्ट्रिंग' या नावाची नवी विश्वसंकल्पना तुझ्या स्वरूपाच्या काहीशी जवळपास पोचते. डॉ.श्वार्झ व डॉ.ग्रीन यानी सजीव व निर्जीवांप्रमाणेच विविध घटनांमागील नियमाच्या स्पष्टिकरणासाठी ही संकल्पना मांडली आहे. धागा ज्याप्रमाणे मण्याना एकत्र गुंफतो त्याप्रमाणे चराचर विश्व व काळ देखील तू एकत्वात गुंफले आहेस आणि त्यावर नियंत्रण करीत आला आहेस. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**७८५) तन्तुवर्धनः । तंतुवर्धनाय नमः ।**

वंशवेलीची (तंतु) वृद्धी करणारा. कालौघामध्ये जीवनतत्त्वाची अखंडता टिकवणारा मानववंश वृद्धिंगत ठेवणारा तूच आहेस. त्याचप्रमाणे गुरू-शिष्य परंपरेच्या द्वारे आत्मज्ञानाची अखंड परंपरा टिकवणाराही तू आहेस. त्याचप्रमाणे सृष्टीमधील घटनांची/घटनाक्रमांची अखंडता टिकवणारा देखील तूच आहेस. कारण मूळ बीज (जे नियंत्रकही असते) तूच आहेस. तुला माझे विनम्र वंदन असो.

**७८६) इंद्रकर्मा । इंद्रकर्मणे नमः ।**

कल्याणकारी कार्ये करणारा. मंगल कार्ये करणारा खरी वैभवसंपन्न कार्ये करणारा. अन्य दृष्ट्या मन (इन्द्र) हे ज्याचे कर्म आहे असा. म्हणजेच मनाचा (विश्वमन व व्यक्तीचे मन) निर्माता, कर्ता व नियंता तू आहेस. तुला माझे सविनय प्रणाम असोत.

**७८७) महाकर्मा । महाकर्मणे नमः ।**

मोठं कार्य पार पाडणारा. विश्वोत्पत्ती, स्थिती, जाणिवांचा विकास, आत्मज्ञानोदय, विनाश, (स्थित्यंतर) अशा तऱ्हेने विश्वक्रम चालविणारा. मला जाणीवपूर्वक तुझ्या दास्यात तुझ्या चरणी लीन राहू दे.

**७८८) कृतकर्मा । कृतकर्मणे नमः ।**

कार्य पार पडलेला. तू परिमाणातील, संकल्प-विकल्पातीत, चिरंतन पूर्णत्वाने राहणारा, कृतकृत्य परमात्मा आहेस. तुला भावपूर्ण नमन असो.

**७८९) कृतागमः । कृतागमाय नमः ।**

वेदमंत्र किंवा ईश्वरी वाणी जे ज्ञानविज्ञानाची सर्वोच्च पायरी असते. अवैयक्तिक बनलेल्या, मनरहिततेत जगणाऱ्या अहंकारातीत ऋषींच्या अंत:करणात ह्या शब्दरूपाने तू तुझी प्रचीती देतोस म्हणून वेद, ओंकार अपौरुषेय आहेत. त्यांचा कर्ता, सर्वज्ञ व सर्वव्यापी असा तू आहेस. खरे पाहता कु णीही काहीही लिहिले, बोलले तरी ते तुझ्यातूनच उगम पावलेले असते हे खरे. परंतु वेद-मंत्र म्हणजे अजिबत भेसळ नसलेली तुझी कृती असा इथे आशय आहे. बाकीच्यांच्या लिखाणात अविद्येची भेसळ येऊ शकते. दुसरी बाब अशी की वेदकर्त्यांनी कधीही कर्तेपण स्वत:कडे घेतले नाही कारण इश्वरी वाणी व प्रेरणा तात्काळ ओळखण्याइतपत ते शुद्ध आणि खरोखरच अहंकारातीत होते. उलट अहंकार अविद्येने ग्रस्त मंडळींचे लेखन त्या मंडळींना स्वत:ची करामत वा कर्तृत्व वाटते कारण ईश्वरी प्रेरणेची त्याना जाणीवही नसते. गंगा गंगाच असते पण गंगोत्री गंगा वेगळी व कलकत्त्यातील वेगळी. किंवा पाणी पाणीच असलं तरी मेघामधील पाणी वेगळं व गटारातून वाहू लागलेलं वेगळं. शिवाय या संदर्भात पाहता ''गंगोत्री'' आणि ''मेघांना'' माहीत असते की त्यांच्यातले पाणी ''ईश्वरीय'' आहे ''त्यांचे'' नाही. ही उदाहरणे शब्दश: कदाचित लागू पडली नाही तरी आशय स्पष्ट व्हायला मदत करतात. भक्त हृदय व भक्तप्रज्ञेतून अवतरणाऱ्या ज्ञान, भक्ती, कर्म, शब्द, मंत्र अशा सर्वांचा निर्माता कर्ता असलेल्या तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**उद्भवः सुन्दरः सुन्दो रत्ननाभः सुलोचनः ।**

**अर्को वाजसनः श्रृंगी जयन्तः सर्वविज्जयी ॥**

**७९०) उद्भवः । उद्भवाय नमः ।**

जो कुणाही कडून निर्मिला गेला नाही, प्रसवला गेला नाही, कुणाच्या इच्छेनेही जन्मला नाही व स्वत:च सर्व विश्वाचे मूळ कारण, (विश्व उद्भवणारा) आहे असा.

तुला विनम्र अभिवादन असो.

**७९१) सुंदरः । सुंदराय नमः ।**

सौंदर्यवान. मनुष्याच्या सौंदर्यानुभवांचे (सौंदर्याने भारले जाण्याच), अधिष्ठान, 'सुंदर' वस्तु, पाहणारे डोळे वा मन ह्या दोन्हींमध्येही नसून ह्या तिन्हीना निर्मिणारं, तिन्हीना (प्रत्यक्षात लाखो प्रक्रियाना) एकत्र आणणारे, त्यातून परस्परात संबंध आणि प्रक्रिया घडवणारे, त्यातून अनुभवाची निर्मिती करणारे, त्या अनुभवांचे प्रगटीकरण करणारे असे जे सर्वव्यापी व नियामक तत्त्व (तू) आहे, त्यामध्ये असते. तुझ्या कृपेने याची जाणीव होताच संपूर्ण विश्व तुझ्या दैवी अस्तित्वाने भरलेले व अतिसुंदर दिसू लागतेच पण त्याचबरोबर वस्तुचा पोकळपणा व क्षणभंगुरत्व समजून या सौंदर्यानुभवाला साजेशी निरासक्ती, निस्पृहताही येते. सौंदर्याचे मूलतत्व, सौंदर्याचा महानतम आशय व संपूर्ण विश्वातील सौंदर्यानुभवाचा नियंता प्राण तू आहेत. म्हणून जगातील यच्चयावत् सर्व बाबींपेक्षा तूच सुंदर आहेस. अन्य दृष्ट्या पाहता बाकी सर्व सौंदर्यानुभव क्षणभंगुर व मर्यादित असतात. परंतु तुझी अनुभूती संपूर्ण अस्तित्व अंतर्बाह्य व्यापून टाकणारी, अमर्याद, चिरंतर आणि विश्वकल्याणकारी आहेत. म्हणूनही तू सर्वाधिक सुंदर आहेस. आणखी एका अर्थाने तुझे सगुण रूप, तुझ्या भक्तीत पूर्ण रंगलेल्या भक्ताला फारच उत्तम वाटते. कारण त्याला अन्य कोणतीही गोष्ट तुझ्यासमोर निकृष्ट वाटते. सर्वतोपरी व चिरंतनपणे सुंदर अशा तुला शिरसाष्टांग दंडवत असोत.

**७९२) सुन्दः । सुन्दाय नमः ।**

कृपा, तू कोणत्याही मानवी भावनेच्या-विचारांच्या कल्पनांच्या अतीत आहेस. तुला मानवी मानव भावना आहेत असे समजणे म्हणजे संपूर्ण विश्व एक मानव चालवतो आहे असे समजणे. निर्गुण निराकाराविषयी अशी कल्पना करणारे नक्कीच भाबडे असतात. पण मुळात सगुण भक्तांच्या मनात कधीही अशी देवकल्पना नव्हती. असला वेंधळा भ्रम त्यांना कधीही नव्हता. त्यामुळे सगुण पूजा/भक्ती करणाऱ्यानीही असा भाबडा पोरकट विश्वास ठेवणे चुकीचे आहे. पण तरीही तुला सुंदः (कृपा) म्हणतात. कारण निर्गुण असो किंवा सगुण असो तुझी प्रचीती घेणारा भक्त प्रेमाच्या व दयेच्या महासागरात डुंबत असाते. ज्याप्रमाणे ज्याला आपण सुंदर म्हणतो तसे अन्य काही दिसले की आपण (मुळात ते सुंदर असो वा नसो) त्या सुंदर म्हणतो. तसेच उदात्त व दयाळू व्यक्तींच्या भेटीने जसे प्रेमाचे भरते येते तसेच भरते तुझ्या साक्षात्काराने येते म्हणून तुला कृपाळू, कृपामय, कृपा (सुंदः) म्हणतात. तुला अखंड वंदन असो.

### ७९३) रत्ननाभः । रत्ननाभाय नमः ।

बेंबीमध्ये रत्न असलेला, किंवा बेंबीमधून ब्रह्मदेव निर्माण झालेला असे तुझे सगुण रूप. याचा मथितार्थ असा की तू सृजनशीलतेचा उगम आहेस. नियंता आहेस. आधार आहेस. कारण नाभी हे प्राणशक्तीचे व वात दोषाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तसेच परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी ह्या चार वाणी नाभी, हृदय, गळा व जीभ यांच्याशी आणि जाणिवेच्या चार पातळ्यांशी संबंधित आहेत. शुद्ध ज्ञानाचा व म्हणून शुद्ध पवित्र वाणीचा शुद्ध, उगम परावाणीतून, नाभी स्थानातून, व्यक्ती 'व्यक्तित्वरहित' बनली की होतो. त्यामुळे हे तत्त्व ठसविण्यासाठी तुझ्या सगुण चित्रात तुझ्या नाभीत रत्न व नाभीतून ब्रह्मदेव आलेले दाखवतात व तुला रत्ननाभ म्हणतात. तुला साष्टांग नमन असो.

### ७९४) सुलोचनः । सुलोचनाय नमः ।

उत्तम नेत्र असलेला. तात्त्विक दृष्ट्या दृष्टिज्ञाचा कर्ता तू आहेस म्हणून विश्वातील डोळे, ज्ञानेंद्रिये तुझीच आहेत. या एकात्म्यामुळेच हे सर्व नेत्र सुंदर बनतात. अन्य प्रकारे पाहिल्यास संपूर्ण विश्वाच्या, मानवाच्या अंतर्बाह्य सतत पाहणारे तुझे नेत्र आहेत. मातेच्या ममतेने ते भक्ताना अंतर्बाह्य सदासर्वदा पाहतात हा भक्तांचा अनुभव आहे. म्हणून तुला उत्तम नेत्र असलेला म्हणतात ते समर्पक आहे. कारण सुंदर डोळ्यांचे लक्षण ममता (केवळ आकार व रंग नव्हे) निष्कपट. निस्वार्थ प्रेम हेच आहे. तुझ्या भक्तांना तुझे डोळे याच कारणास्तव अति सुंदर दिसतात. तुला साष्टांग लोटांगण असो.

### ७९५) अर्कः । अर्काय नमः ।

सूर्य रूपातील ईश्वर. तुझे उपासक साऱ्या सृष्टीला जीवन देणाऱ्या सूर्याच्या रूपात तुला पाहतात व म्हणून अनेक ठिकाणी सूर्यपूजा होते. सूर्य ज्याप्रमाणे जीवसृष्टीचा आधार आहे. त्याचप्रमाणे तू (ज्ञानसूर्य) चराचर संपूर्ण विश्वाचा शाश्वत आधार आहेस. हेच अधिक स्पष्ट करण्यासाठी, सूर्याचे तेजही तुझ्यापासून येते हे दाखवण्याच्या हेतूने सूर्याच्या मध्यभागी केंद्रस्थानी तुझी प्रतिमा करतात. सूर्योपासना, सूर्यनारायणोपासना यातील तथ्य म्हणजे सृजनशीलताही जिथून (ब्रह्म) उगम पावली त्याची पूजा असे आहे. तुला सविनय वंदन असो.

### ७९६) वाजसनः । वाजसनाय नमः ।

अन्नदाता, पोषणकर्ता. मातेप्रमाणे चराचराचा पोषणकर्ता. केवळ भौतिक दृष्ट्याच नव्हे जाणिवेच्या स्तरांनाही तृप्त करणारा. ज्यांमुळे सर्व 'भूक' तयार होते व ज्यामुळे ती भागते असा सर्व बाबींचा निर्माता व नियंता तू आहेस. परंतु सर्व तऱ्हेने पोषण करणारा याचा अर्थ व्यक्तिसापेक्ष नाही. व्यक्ती म्हणून व्यक्तीच्या गरजा भागविण्याचे तुझे नियम

आहेत व ते अविद्येने ग्रासलेल्यानी विविध प्रकारे आकलन केले आहेत. तुझे स्वरूप एकाद्या सर्व वस्तु मोफत मिळणाऱ्या दुकानाप्रमाणे केले आणि पदरी निराशा आली तर आश्चर्य वाटायला नको. त्याचप्रमाणे अल्लाऊद्दिनाच्या जादूच्या दिव्यातील राक्षसाप्रमाणे तुझे कार्य आहे अशी समजूत करून घेणाऱ्यांच्या पदरी दारुण वैफल्य आले तर त्यात नवल नाही. कुणालाही केव्हाही इच्छेनुसार हवे ते खाऊ देणारा ईश्वर अजूनपर्यंत तरी कुणाच्याही प्रचीतीस आलेला नाही. जगातील पुष्कळशी दु:खे अशा प्रकारच्या अविद्याजन्य कल्पनांमुळे तयार झाली आहेत. आंब्याच्या झाडावर बसून आंबा खाणाऱ्या खारीने आंब्याच्या झाडाचे अस्तित्व नाकारणे हे जेवढे चूक आहे तेवढेच आंब्याच्या झाडाने मोठ्या प्रेमाने त्या एका खारीला केव्हा व किती भूक लागेल हे लक्षात घेऊन योग्य वेळी आंबा पिकवला व तो खाण्याची बुद्धी दिली असेही खारीने स्वत:च्या कल्पनेने समजणे आणि आंबा तोंडात येऊन पडण्याची वाट पाहाणे हे सत्याचा आधार नसल्याने भ्रममूलक आहे. मर्यादित अर्थाने पाहिल्यास ईश्वर आंब्याच्या झाडासारखा आहे. तो ममताळू असला तरी दरवेळी वैयक्तिक इच्छा-आकांक्षा पोसण्यासाठी वेठविबगाराप्रमाणे काम करणारा आहे असे समजणे वस्तुस्थितीला धरून नाही. बारकाईने पाहिल्यास, ईश्वर संपूर्ण विश्वाचा निर्माता, नियंता व पोषणकर्ता आहे याचा एवढाच अर्थ आहे की ईश्वरस्वरूप झालेल्यांना या सर्व बाबी विचारातीत जीवनावस्थेत प्रत्यक्ष प्रचीतीस आलेल्या आहेत. पण यातील महत्त्वाची बाब म्हणजे ईश्वर जे पोषण करतो ते त्या व्यक्तीच्या आत्मस्वरूपी राहून. त्यामुळे आत्मस्वरूप न जाणवलेल्यांनी स्वत:च्या क्षुद्र संकल्पांबाबत ईश्वराकडून आशा धरणे आणि तिची पूर्ती न झाल्यास निराश होणे किंवा ईश्वराला जबाबदार धरणे म्हणजे आत्मवंचना होय. तसेच स्वत:च्या अविद्येमध्ये व तमोगुणी भ्रमामध्ये राहणे होय. नदीच्या काठावर बसून प्रवाहाच्या अनुभवाच्या कल्पनांची तृप्त वा हैराण होण्यासारखेच हे आहे. दोन्हीही खोटीच. सर्व विश्वाचे सर्वतोपरीचे पोषण योग्यायोग्यतेनुसार तुझ्या प्रचीतीने किंवा शारीरिक, मानसिक, बौद्धिक वगैरे अनुभवांनी आणि इतरही प्रकारांनी अंतर्यामी राहून करणारा असा तू वंदनीय ईश्वर आहेस हे खरे असले तरी कोणत्याही (संकुचित बुद्धीने ठरवलेल्या, आखलेल्या) नियमानुसार किंवा आडाख्यानुसार तू कुणाचेही कोणतेही पोषण करीत नाहीस. तू पोषण करतोस याचा विचारातीत अर्थ तुझ्या प्रचीतीनेच कळू शकतो व तोच खरा होय. त्याबद्दल प्रचीतीशून्य आडाखे बांधणे  किंवा अशा आडाख्यांवर विश्वास ठेवणे ही बांडगुळी वृत्ती होय. म्हणूनच तू व तुझ्या कृपेवर विश्वास ठेवणे हे आजच्या काळात निरर्थक व निरुपयोगी किंवा पराधीनता वाढवणारे ठरते, प्रचीतीच्या आड येते. अन्नच काय सर्व काही पुरवणाऱ्या तुझे नियम तन्मय व तद्रूप होऊनच कळू शकतात व तसे कळल्यावरच ते स्वीकारणे योग्य होय. अन्यथा नाही.

सर्वांचे पाषण करणाऱ्या तुला सविनय प्रणिपात असोत.

**७९७ ) शृंगी । शृंगिणे नमः ।**

शिंग असलेला. मत्स्यावतारामध्ये स्वतःच्या शिंगाला जीवनाची नौका बांधून ती सुरक्षित ठेवणारा हे तुझे सगुण रूप. त्याचा एक मथितार्थ ज्ञानविज्ञान व लोकोत्तर शहाणपणाच्या द्वारे (जे केवळ स्वीकृत प्रचलित हिंदू अवतारापुरते मर्यादित नाही) जीवनात आत्मज्ञानाचे अमर चैतन्य व सुरक्षितता निर्माण करणारा तूच आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**७९८) जयंतः । जयंताय नमः ।**

नेहमी विजयी होणारा. जे जे घडते ते तुझ्याच इच्छेने घडते. तुझ्या इच्छेव्यतिरिक्त अन्य काहीही घडत नाही, म्हणून नेहमी तूच विजयी असतोस. तुझे भक्त जेव्हा हे विधान करतात तेव्हा चांगल्या व वाईट सर्वच गोष्टी ईश्वरच घडवतो काय? जर ईश्वर वाईटही गोष्टी घडवतो तर ईश्वर व सैतान यांच्यात कोणता फरक राहिला? भक्तलोक कोणताच ठोस पुरावा देत नसल्याने सर्व काही ईश्वरी इच्छेने घडते असे सरधोपट विधान ते अंधश्रद्धेने कशावरून करीत नसावेत? शिवाय चांगल्या व वाईट दोन्ही गोष्टी जर ईश्वरच घडवीत असेल तर त्या ईश्वरावर विश्वास न ठेवल्याने (व्यवहार दृष्ट्या वाईट ते टळेल असे नाही व चांगले ते घडतेच असे नाही त्यामुळे) काय बिघडते? अखेर ईश्वरीइच्छा ही संकल्पनाच नाही काय? मानवी इच्छेनेच मानवाने कल्पनेच्या क्षेत्रात टाकलेले हे एक प्रतिबिंब कशावरून नाही? नास्तिक लोक यशस्वी होतातच ना? मग ईश्वराने वेगळा जय मिळवून देण्याची गरज काय? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. ह्या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर आहे. भक्तांना त्यांच्या संकुचित स्वत्वाचे दौर्बल्य आणि आत्मस्वरूपाची सर्वशक्तिमानता प्रचीतीला येते आणि हे आत्मरूप, क्षुद्र संकुचित 'स्वतः'पेक्षा 'अहं'पेक्षा निश्चितपणे वेगळे आहे, सामार्थ्यवान आहे पूर्ण आहे असे प्रचीतीस येते म्हणूनच ते ईश्वर व ईश्वर व ईश्वरेच्छेच्या अस्तित्वाचा दावा करतात. परंतु केवळ त्यावरच विश्वास ठेवण्याची आणि त्याबद्दल हेका धरण्याची अजिबात आवश्यकता नाही. व कारण असाच अनुभव दुसरा एकादा साधक निर्वाण, समाधी, शून्यावस्था वगैरे संज्ञा वापरून मांडू शकतो. परंतु **देहबुद्धी** व **अविद्येमुळेच** याबाबत **अविश्वास** वा **अंधविश्वास** तयार होतो ही बाब मात्र वाचकानी त्याना पटल्यास लक्षात घ्यावी. त्याचप्रमाणे खालील मुद्दे तपासून पाहावे. ईश्वर, 'ईश्वरी इच्छा' ही वर्णनाची पद्धत आहे. ईश्वर याचा अर्थ काल्पनिक किंवा ढोब्ळ अस्तित्व असलेली बाब नव्हे. तसेच इच्छा याचा अर्थ या ठिकाणी वैयक्तिक इच्छेसारखी वेगळी इच्छा असा नाही. सर्वव्यापी वैश्विक प्रेरणा असा आहे. चांगले व वाईट ही मानवी बुद्धीची वर्गवारी आहे. भक्तांचा अनुभव, त्यांचे

कार्य लाखोंना जीवनशक्ती देत असते, आनंदाचा साक्षात्कार देत असते म्हणून भक्त, ईश्वर आणि ईश्वराची इच्छा शुभ व शुभकारक असल्याचे नेहमी म्हटले जाते. वास्तवात काहीही 'चांगले' अगर 'वाईट' नाही. संकुचित, तामसी, अविद्याजन्य असे सारे हीन-दीन-पराधीन बनवते म्हणून व अशा वृत्ती व कृतींनी 'वाईट' किंवा 'पाप' म्हणतात आणि असंकुचित, व्यक्तिमत्वातीत, विशाल असे सारे मुक्त, आनंदी, समर्थ बनवते म्हणून अशा वृत्ती व कृतींना 'चांगले' वा 'पुण्य' म्हणतात. ईश्वरावर विश्वास न ठेवल्याने एरवी त्याच्या प्रचीतीचा प्रयत्न होत नाही, एवढेच महत्त्व विश्वासाला आहे. कारण विश्वासाच्या अभावी ईश्वराचा वा सत्याचा शोध व प्रचीती घेण्यासाठी प्रयत्न करणारे व्यवहारात फारच क्वचित आढळतात. त्यामुळे बहुसंख्य लोक या उत्तम संधीला मुकतात व देहबुद्धीच्या पराधीनतेत खितपत राहतात. स्वत:चेच सामर्थ्य, महानता, सौंदर्य व आनंदाला मुकतात. ईश्वर व ईश्वरेच्छा हे अवैयक्तिक (व्यक्तित्वातीत) वैश्विक वास्तव आहे. वैयक्तिक यश वा पराभव ईश्वरेच्छेच्या माथी मारत बसणे हे अज्ञान आहे. कारण यश व अपयश ह्याच मुळात अविद्याजन्य संकल्पना आहेत. वैयक्तिक यशासाठी ईश्वरावर विश्वास ठेवणे किंवा त्याची पूजा करणे म्हणजे अविद्याजन्य बावळट अजागळपणा आहे. उलट सत्याचा शोध घेताना येणाऱ्या प्रचीतीमध्ये वैयक्तिक दृष्ट्या समर्पित होणे हेच खरे तुझे व भक्तांचे यश आहे. म्हणून तुला **जयंत:** म्हणतात. नेहमी विजयी असणाऱ्या तुला तुझ्या भक्तांना साष्टांग नमस्कार असोत.

**७९९) सर्वविज्जयी । सर्वविज्जयिने नम: ।**

तू सर्वांवर विजय मिळवणारा आहेस. ज्ञानी, पंडित, योगी, भक्त तसेच दुष्ट, चोर, गुन्हेगार, ढोंगी, नास्तिक या सर्वांचे संकुचित व्यक्तित्व फाडून टाकून आणि वेगळेपणाचे सर्व अडसर फोडून टाकून तू त्यांना एकीच्या भावनेने स्वत:मध्ये सामावून घेतोस. याला कुणीही अपवाद नाही. वैज्ञानिक सत्य जाणणाऱ्यांच्या जीवनात असा मूलगामी फरक पडेलच असे नाही. परंतु तू ते सत्य आहेस जे वैज्ञानिक सत्य न नाकारता वैज्ञानिक सत्याला अंतर्यामीच्या क्रांतीचे विश्वकल्याणकारी परिमाण देते. एका प्रकारे पाहता तुझी प्रचीती, हे भावना, वासना, विचार आणि कला, भक्ती, विज्ञान इत्यादींचे सर्वोच्च व संपूर्ण परिणत स्वरूप आहे. तुला विनम्र वंदन असो.

**सुवर्णबिन्दुरक्षोभ्य: सर्ववागीश्वरेश्वर: ।**
**महाह्रदो महागर्तो महाभूतो महानिधि: ।**

**८००) सुवर्णबिंन्दु: । सुवर्णबिन्दवे नम: ।**

सोन्याप्रमाणे तेजस्वी व अमूल्य अशी अंगोपांगे असणारा. विश्वाचे अत्यंत तेजस्वी असे, विश्व उत्पन्न व नियंत्रित करणारे सुवर्णबीज, सुवर्णगर्भ तू आहेस. एका दृष्टीने

पाहिल्यास सूर्यमालेचे केंद्र सूर्य हा सुवर्णबिंदू आहे व व्यापकतेने पाहिल्यास त्याहूनही अनंतपट तेजस्वी असा तू विश्वाचे केंद्र व विश्वनियंता सुवर्णबिंदु आहेस. तुझ्या प्रचीतीने काही योगी-भक्ताना दिसणारा दिव्य प्रकाशही तूच आहेस. (प्रकाश दिसणे हे तुझ्या प्रचीतीचे आवश्यक लक्षण आहे असे नव्हे). तुला शतशः दंडवत असोत.

**८०१) अक्षोभ्यः । अक्षोभ्याय नमः ।**

ज्याचा क्षोभ होत नाही व जो अस्वस्थ होत नाही असा. विश्वातील अस्तित्वाच्या व जाणिवेच्या सर्व स्तरांवरील घडामोडी ज्याच्यामध्ये सामावलेल्या आहेत असा असल्यामुळे विश्वातील कोणताही उत्पात स्थित्यंतरातीत व काळातीत अशा तुला अस्वस्थ करू शकत नाही. व्यक्ती जेव्हा व्यक्तित्वशून्य होते तेव्हा ती स्थितप्रज्ञ होते. भक्त स्वतःचा राहात नाही तेव्हा सच्चिदानंदमय होतो. अशा अवस्थेतल्या व्यक्तीमध्येही कोणत्याही क्षुल्लक कारणाने क्षोभ किंवा विचलितता निर्माण होत नाही. स्वतःच्या कृपेने स्वतःची प्रचीती देऊन भक्तांना स्वतःच्या विश्वसंकल्पात विलीन करणाऱ्या व सर्वदृष्ट्या परिपूर्ण व क्षोभातीत बनवणाऱ्या तुला सादर प्रणाम असोत.

**८०२) सर्ववागीश्वरेश्वरः । सर्ववागीश्वरेश्वराय नमः ।**

चार वाणींचा ईश्वर असलेल्या अंतःकरणाचा ईश्वर. अस्तित्वाच्या अतीत असा तू भक्तांना जेव्हा प्रचीती देतोस तेव्हा त्यांची वाचा प्रासादिक होते. ते वाचेचे ईश्वर म्हटले जातात. अशा वाचेच्या ईश्वरांचा ईश्वर म्हणून तुला **सर्ववागीश्वरेश्वरः** म्हणतात. भक्तांना वाचेचे ईश्वर बनवणारा व परावाणीच्या रूपाने भक्तांमध्ये प्रवेष करणाऱ्या तुला विनम्र वंदन असो.

**८०३) महाह्रदः । महाह्रदाय नमः ।**

मोठे खोल जलाशय किंवा मोठा डोह. सारे विश्व कल्पांतीच्या वेळी ज्या स्थानी राहते ते सर्व व्यापणारे जलाशय तू आहेस. तसेच ज्या समाधी अवस्थारूपी जलाशयात डुंबणारा अंतर्बाह्य शुद्ध व आनंदी होतो असे सच्चिदानंदमय समाधीरूपी जलाशय तू आहेस. ह्या जलाशयाचा तळ लागू शकत नाही म्हणून तुला **महाह्रदः** म्हणजे खोल जलाशय म्हणतात. अन्य दृष्ट्या माया ही दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या रूपकाने वर्णन केली जाते. माया ही तुझ्यापासूनवेगळी नसल्यामुळे तुलाही अशी नदी डोह (महाह्रदः) म्हणणे असयुक्तिक नाही. तुला भावपूर्ण प्रणिपात असोत.

**८०४) महागर्तः । महागर्ताय नमः ।**

मोठी दरी. विवर. रथ इत्यादी. ज्याचा आदि व अंत लागत नाही असे संपूर्ण विश्व

शोषून घेणारे व काळ आणि जाणिवांच्या स्तरांनाही शोषून घेणारे महाविवर तू आहेस. खगोलशास्त्राच्या अभ्यासकानी वर्णन केलेली पण अजून पूर्णपणे मानवाला न समजलेली कृष्ण विवरे म्हणजे तुझे साधे व छोटेसे रूप होय. दुसऱ्या अर्थाने पाहिल्यास कल्याणाच्या मार्गाने विश्वाला आणि भक्तांना नेणारा महारथ तू आहेस. तुला सविनय अभिवादन असो.

**८०५) महाभूतः । महाभूताय नमः ।**

उत्पत्ती, स्थिती आणि लय हे सारे काही ज्याच्या ठायी घडते व त्यामुळे पंचमहाभूते देखील ज्याच्यापासून उत्पन्न होतात, ते ह्या सर्वांचे महाकारण म्हणून ओळखले जाणारे महाभूत तूच आहेस. तुला कृतज्ञ दंडवत असोत.

**८०६) महानिधिः । महानिधये नमः ।**

मोठा खजिना. मौल्यवान असे सर्व काही ज्यामध्ये सामावलेले आहे असे विश्व तुझ्यामध्ये आहे व तुझ्या अधीन आहे तसेच तुझ्या कृपेने, तुझ्या प्राप्तीचे, अजरामर चिरंतन वैभव मिळते म्हणून तुला महानिधिः म्हणतात. तुला नम्र प्रणाम असोत.

**कुमुदः कुन्दरः कुन्दः पर्जन्यः पावनोऽनिलः ।**
**अमृतांशोऽमृतवपुः सर्वज्ञः सर्वतोमुखः ॥**

**८०७) कुमदः । कुमुदाय नमः ।**

आनंद देणारा व प्राप्त करणारा. तुझ्यामुळे सर्व विश्व चैतन्यानं भरून जाते व आनंदी बनते, तसेच या वैश्विक लीलेतून तूही शाश्वत आनंद उपभोगतोस असा भक्तांचा अनुभव आहें. जीवन, जाणिवा आणि सच्चिदानंदानुभूती देणाऱ्या तुला शिरसाष्टांग नमन असो.

**८०८) कुंदरः । कुंदराय नमः ।**

पृथ्वी परिधान करणारा, किंवा पृथ्वी फाडणारा, कुंदीच्या कळ्यांप्रमाणे पारितोषिके देणारा. याचा मतितार्थ संपूर्ण अविद्या-माया स्वत:भोवती लपेटून घेऊनही राहणारा परंतु तसेच भक्तांची अविद्या फाडून टाकून त्याना आत्मज्ञानाचे जणु स्वर्गीय कुंदकळ्याप्रमाणे चिरंतन आनंददायी परितोषिक देणारा. तुझ्या पायाशी आदरपूर्वक दंडवत असोत.

**८०९) कुंदः । कुन्दाय नमः ।**

कुम = पृथ्वी द = दान देणारा. तसेच कु = पृथ्वीचे राजे व द = ठार मारणे. कुंद = कुंदीची फुले. दुष्ट राजांचा नाश करून पृथ्वी काश्यप ऋषींना दान देणारा परशुराम. मतितार्थ असा की जडबुद्धिजन्य अन्यायातून सृष्टीला मुक्त व प्रसन्न करणारा. संपूर्ण जड

अस्तित्वाला (पृथ्वीला) रजोगुणाच्या प्रभावापासून वाचवणारा आणि आत्मज्ञानाकडे नेणारा तू आहेस. कुंदकळ्यांप्रमाणे चिरंतन प्रसन्न अशा तुला नम्र नमन असो.

**८१०) पर्जन्यः । पर्जन्याय नमः ।**

पाऊस. (ऋतूंचाही नियंता असल्याने) पृथ्वीवर पाऊस पाडणारा तू आहेस. तसेच काळाचा नियंता असल्याने पृथ्वीला (विश्वाला) ब्रह्मज्ञानाने अंतर्बाह्य न्हाऊ घालणारा तू आहेस. तुझ्या ह्या ज्ञानामृताच्या अमृतवृष्टीकडे चातकाप्रमाणे नजर लावणाऱ्यांचे परमकल्याण होते. तुला सादर वंदन असो.

**८११) पावनः । पावनाय नमः ।**

पवित्र करणारा. देहबुद्धी अहंकार, अविद्या व तज्जन्य संकुचित व्यक्तित्व नष्ट करून शुद्ध आत्मस्वरूपाचा प्रत्यय देणारा, अंतबाह्य पवित्र करणारा. तुझ्या सतत स्मरणात तुला साष्टांग नमस्कार असोत.

**८१२) अनिलः । अनिलाय नमः ।**

वायू. दुसरा अर्थ ज्ञानी अवस्थेतून अज्ञानी अवस्थेत न घसरणारा. संपूर्ण विश्वातील सजीव, निर्जीवातील हालचालींचा कारक व नियंता वायु हे तुझेच रूप आहे. तू कधीच मोहबद्ध न होणारा (वायुही अखंड, अव्याहत कार्य करतो) चिरंतन ज्ञानी आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**८१३) अमृतांशः । अमृतांशाय नमः । अमृताशः । अमृताशाय नमः ।**

अमृत इच्छा. इच्छांचीही इच्छा असा तू अमर इच्छारूपी आहेस. किंवा सारे विश्वच तुझ्या इच्छेत आहे. वैयक्तिक पातळीवर, ज्याची आशा करणे हे साक्षात अमृत आहे, असा. अन्य सर्व आशा बंधनकारक तुझी आशा अमर करणारी असते. त्यामुळे तुला अमृताशः किंवा अमृतांशः म्हणतात. तुला साष्टांग दंडवत असोत.

**८१४) अमृतवपुः । अमृतवपुषे नमः ।**

शरीर अमर असलेला. ज्याचं अशरीरी शरीर म्हणजे चैतन्यमय व ज्ञानमय असं अमरतत्व आहे असा. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**८१५) सर्वज्ञः । सर्वज्ञाय नमः ।**

सर्व जाणणारा. मर्यादिताकडून जाणला जाण्याची वस्तु नसलेला व सर्वांतर्बाह्य राहून सर्व जाणणारा असा एकमेवाद्वितीय सर्वज्ञ तू आहेस. वैयक्तिक पातळीवर अनुभवविश्वाचा कारक नियंता व ज्ञाता तूच आहेस. तुला सविनय नमन असो.

**८१६) सर्वतोमुखः । सर्वतोमुखाय नमः ।**

सर्वत्र मुखे असलेला किंवा सर्वतोमुखी असलेला. तुझ्या कालातीत तरलतम व सर्वव्यापी अस्तित्वामुळे तुझी अशरीरी मुखे सर्वत्र असलेला असा तू आहेस. सगुणरूपामध्ये तुला पुष्कळ डोकी व पुष्कळ हात दाखवण्यामागील मूळ संकेत हाच आहे. अन्य दृष्ट्या जगातील सर्व मुखे जी अनुभूती, उपयोग, अभिव्यक्ती यांची केंद्रे आहेत ती तुझ्यामुळेच कार्यरत आहेत म्हणूनही तुला सर्वतोमुखी म्हणतात. तसेच तुझ्या कृपेने कळत नकळत सर्व काही तुझ्या प्रचितीसाठी, तुझ्या विविध नामरूपांच्या स्मरणात तुझ्या दिशेने येत असल्याने तू सर्व मुखामध्ये अव्याहतपणे व सर्वश्रेष्ठ प्राधान्याने असतोस. प्रशंसित होत असतोस असाही अर्थ संयुक्तिक आहे. तुला अनन्यभावे वंदन असो.

**सुलभः सुव्रतः सिद्धः शत्रुजिच्छत्रुतापनः ।**
**न्यग्रोधोदुम्बरोऽश्वत्थश्चाणूरान्ध्रनिषूदनः ॥**

**८१७) सुलभः । सुलभाय नमः ।**

सहज प्राप्त होणारा. अविद्येमुळे प्राप्त होण्यास जरी अत्यंत कठीण असला तरी अत्यंत निकट अगदी थेट हृदयातच आत्मरूपाने असल्याने तुझ्या कृपेने अविद्या अहंकाराचे जोखड फेकताच भक्ताला तू तात्काळ प्राप्त होतोस. अहंकारापोटी आयुष्यभर राबराब राबणाऱ्यांना जरी कधी दुर्लभ असलास तरी तुझ्या कृपेने तुझ्या भक्तीमध्ये रंगणाऱ्याला व अहंकारासकट सर्वस्व निःशंकपणे तुझ्या चरणी अर्पण करणाऱ्याला त्याने कोणतीही वणवण न करता देखील सहज प्राप्त होणारा तू आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**८१८) सुव्रतः । सुव्रताय नमः ।**

श्रेष्ठ व्रताचे आचरण करणारा. संपूर्ण चराचर विश्वातील सर्व घडामोडी यथायोग्य तऱ्हेने चिरंतर चालवण्याचे महाव्रत अनुसरणारा म्हणून **सुव्रतः**. युगनिर्मितीचे व्रत आचरणारा म्हणूनही तू **सुव्रतः** आहेस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**८१९) सिद्धः । सिद्धाय नमः ।**

सर्व संकल्पाची सिद्धी झालेला, इच्छारहित, किंवा ज्याचे सर्व संकल्प तात्काळ सिद्ध होतात असा. अन्य दृष्ट्या बद्ध, भुभुक्षु, साधक व सिद्ध ह्या अवस्थांचाही कारक व नियंता असा महासिद्ध. तुला शतशः दंडवत असोत.

**८२०) शत्रुजित् ।   शत्रुजिते नमः ।**

शत्रूंना जिंकणारा. तुझ्या वैश्विक कार्याच्या विरोधात येणाऱ्या सर्वांना जिंकणारा. सामाजिक व वैयक्तिक पातळीवर आत्मज्ञानाच्या मार्गातील सर्व अडथळे अविद्या व अविद्यामुक्त व्यक्ती, शक्ती वगैरे यांना त्या प्रकारे व कुणाच्याही द्वारे जिंकणारा म्हणून शत्रुजित्. तुला अनन्यभावे प्रणिपात असोत.

**८२१) शत्रुतापनः ।   शत्रुतापाय नमः ।**

शत्रूंना पोळणारा. ज्ञानसूर्य ह्या नात्याने स्वतःच उत्पन्न केलेल्या अविद्या, मायेला ताप करणारा तू आहेस. सामाजिक व वैयक्तिक पातळीवरील अविद्या व अहंकारामुळे तुझा विचार देखील लोकांना असह्य होतो. वैयक्तिकतेत गुरफटलेल्या माणसाला तुझ्या प्रचीतीचा अनुभव अत्यंत भयावह वाटतो कारण त्यासाठी अविद्येचा त्याग करणे व संकुचित स्वत्वही सोडून गुणातीत अशा तुझ्यामध्येच एकरूप होणे अत्यावश्यक असते. हजारो क्षणभंगूर व अविश्वासार्ह बाबींवर बिनदिक्कत (अंध) विश्वास ठेवणाऱ्या पण खऱ्या स्वत्वावर विश्वास न ठेवणाऱ्या व त्याचा शोध प्रचीतीचा यत्न न करणाऱ्या ज्ञानाच्या शत्रूंना तुझा विचार तापदायक होतो. तुला सादर नमन असो.

**८२२) न्यग्रोधः । न्यग्राधाय नमः ।**

मायेने वेष्टित असलेला. सर्व सजीव निर्जीवांचे जाणिवेचे विश्व माणसाना सर्व बाजूनी घेरत असल्याने त्याना तू प्रत्ययाला येत नाहीस. त्यामुळे ते तुला मायेने वेष्ठिलेला म्हणतात. वास्तविक तू जाणिवांच्या सर्व स्तरांच्या अतीत, मायेच्या अतीत आहेस. तत्स्वरूपी समरस झालेले मात्र मायेचा कर्ता व नियंता व सर्वांयर्तामी राहणारा म्हणून सयुक्तिकतेने तुला न्यग्रोधः म्हणतात. तुझ्याचरणी आदरपूर्वक वंदन असो.

**८२३) उदुंबरः ।   उदुंबराय नमः ।**

सर्वांचे पोषण करणारा, तरलतम अशा आकाशाच्या अतीत असणारा. सर्वसमावेशक चैतन्यमय आणि स्थित्यंतरातीत असल्याने तू तरलतम अशा व अवकाशाच्या अतीत आणि सर्वांतयामी राहून चैतन्याने त्यांचे पोषण करणारा आहेस. सदासर्वदा तुझ्या स्मरणात तुला निरंतर अभिवादन असो.

**८२४) अश्वत्थः ।   अश्वत्थाय नमः ।**

अश्वत्थ वृक्ष. अश्वत्थ वृक्ष अत्यंत पवित्र मानला जातो. त्याची पूजा केली जाते. त्यामध्ये आयुर्वेदिक औषधी गुणधर्मही आहेत. त्यामुळे अश्वत्थ वृक्षाच्या रूपकाने विश्वरूपी तुझे वर्णन केले जाते. परंतु हा अश्वत्थ वृक्ष उलटा व विलक्षण असतो. त्याची

मुळे वर आणि फांद्या खाली असतात. याचा मथितार्थ तू जाणिवेच्या अत्युच्च पातळीत उगम पावून जाणिवेच्या सर्व निम्न स्तरांवर पसरलेला असतोस (शाखाविस्तार खाली असतो.) नेहमी चंचल अशा तुझ्या विश्वरूपाचे यथार्थ वर्णन करण्यासाठी महाप्रचंड अशा सर्वव्यापी उलट्या अश्वत्थ वृक्षाची उपमा वापरली जाते. तुला अखंड वंदन असो.

**८२५) चाणूरान्ध्रनिषूदनः । चाणूरान्ध्रनिषूदनाय नमः ।**

चाणूराचा नाश करणारा श्रीकृष्ण. या सगुणावताराचा मथितार्थ असा की तमोगुण रजोगुण लोकांची वासना व अहंकार आणि हिंस्रता यांची ताकद कितीही प्रचंड असली तरी तुझी ताकद यासर्वांना नामशेष करते. भक्तांनाही असे महान सामर्थ्य देणाऱ्या तुला शतशः दंडवत असोत.

**सहस्रार्चिः सप्तजिह्वः सप्तैधाः सप्तवाहनः ।**
**अमूर्तिरनघोऽचिन्त्यो भयकृद् भयनाशनः ॥**

**८२६) सहस्रार्चिः । सहस्रार्चिषे नमः ।**

हजारो किरणांची प्रभा असणारा. तुझ्या धगधगत्या ज्ञानतेजाच्या ज्ञानाग्नीच्या ज्वाळा विश्वामधील सर्व पातळ्या चैतन्याने व स्फूर्तीने भरतात. तुझ्या सगुण प्रतिमांच्या सभोवती दिव्य प्रकाशाचे वलय दाखवले जाते. त्याचे कारण हेच असणे रास्त आहे. तुला सादर प्रणाम असोत.

**८२७) सप्तजिह्वः । सप्तजिह्वाय नमः ।**

सात जिभा असणारा. काली, कराली, मनोजवा, सुलाहिता, सुधूम्रवर्णा, स्फुल्लिंगिनी व विश्वरुची ह्या सात उपभोग घेणाऱ्या व ज्ञान देणाऱ्या जिभा असणारा (यज्ञातील अग्नी असतो तसा) सुपूर्ण विश्व वयापणारा दिव्य अग्नी तू आहेस. तू वैश्विक अस्तित्व तेजाने भरतोस. वेगळ्या दृष्टीने वैयक्तिक पातळीवरील दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या व एक जीभ अशा (सांकेतिक अर्थाने) जिभा असलेला म्हणजे उपभोगाची आणि सत्कर्माची साधने असलेला शरीरातील अग्नी तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**८२८) सप्तैधाः । सप्तैधसे नमः ।**

सात तेजस्वी ज्वाला किंवा समिधा असणारा अग्नी तूचआहेस. याचा मथितार्थ असा की विश्व (सात लोकांसह) स्वाहा करणारा किंवा वैयक्तिक पातळीवर ज्या सात धातूंनी शरीर (व्यक्तित्व) बनते ते सर्व खाणारा. महान अग्निरूपी तुला साष्टांग लोटांगण

असो.

**८२९) सप्तवाहनः । सप्तवाहनाय नमः ।**

सात घोड्यांचे वाहन असलेला सर्य. सूर्य हा तेज व प्रकाशाने जीवनदायी आहे. तू ज्ञानशक्ती व ज्ञानप्रकाशाने सूर्यासकट सर्व काही तेज, ज्ञानशक्ती व चैतन्याने भरणारा आहेस. तुझ्या चरणांवर निरंतरपणे मस्तक राहो.

**८३०) अमूर्तिः । अमूर्तये नमः ।**

आकार नसलेला, अमूर्त. सूक्ष्मातिसूक्ष्म व सर्ववयापी असे अमर अशरीरी अस्तित्व असणारा तू आकारहीन आहेस. अमूर्त आहेस. तुझे रूप असे अचिंत्य असल्याने तुझ्यावर विश्वास न ठेवणारे, अंधविश्वास ठेवणारे व तू आहेस याची खात्री असलेले व तुझ्या अस्तित्वाविषयी कोणत्याही निर्णयाप्रत न आलेले असे कोट्यवधी लोक आढळतात, ही तुझ्या लीलेचीच महती आहे. तुझ्यावर विश्वास न ठेवणारे काही कारणास्तव असे करतात. १) त्यांच्या गरजा मूलतः भौतिक असतात किंवा त्याना त्या तशा वाटतात. २) भौतिक गरजा भागवण्यासाठी आधुनिक विज्ञानात पुष्कळच सोय आहे व त्यामुळे तुझ्यावर विश्वास ठेवण्यासाठी कोणतेही तर्कसंगत कारण नाही. तुझ्या निकटतेची त्याना गरज वाटत नाही. तसेच संकटात 'काल्पनिक' अशा तुझ्या दयेची-भिकेची त्याना आवश्यकता वाटत नाही. त्याऐवजी शक्ती-बुद्धी-युक्ती-पैसा यांचा वापर त्यांना योग्य वाटतो. साहजिकच जोपर्यंत तुझ्या कृपेने अध्यात्मिक गरजा (प्रश्न, कुतुहल, जिज्ञासा, उत्कंठा) उत्पन्न होत नाही व भौतिक गरजांच्या पूर्तीसाठी तुझी गरज पडत नाही किंवा तुझे अस्तित्व तर्कसंगत वाटत नाही तोपर्यंत ते तुझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत. परंतु तुझ्याच कृपेने, कधी संसाराला विटून स्वतःची दुःस्थिती, दुबळेपणा, पराधीनता, प्रतिकूल परिस्थिती यांनी असहाय होऊन पुष्कळ जण तुझी भक्ती करतात तर कधी सामाजिक कल्याणाच्या स्वतःच्या कल्पनेतून तर कधी जिज्ञासेपोटी, काहीजण, तुझा तप, भक्ती, योग, अनुष्ठान आदी मार्गानी शोध घेतात. लोक कशा तऱ्हेने तुझ्या महत्स्वरूपाला प्राप्त व्हायचे हे शेवटी तूच ठरवतोस. त्यामुळे तुझ्या प्राप्ताने व्यक्तीचा व जगाचा लाभ काय? तुझ्यावर विश्वास ठेवावा की ठेवू नये? तुझी भक्ती करावी की करू नये? यावर उत्तर असे की आजचा काळ आत्माज्ञाला सत्याच्या (अंतःस्थ तुझ्या) प्रचीतीला पोषक आहे. व्यक्ती व समष्टीच्या उत्थानाला अनुकूल आहे, हे शक्यतो ध्यानात घेऊन स्वतःशी प्रामाणिक राहून जगणे, वागणे श्रेयस्कर/प्रियकर आहे. अमूर्त अशा तुला साष्टांग लोटांगण असो.

**८३१) अनघः । अनघाय नमः ।**

अविद्यामायाजन्य वासना, भावना, बुद्धी व कृतीमुळे तुझ्यापासून (स्वस्वरूपापासून) दूर जाणे हे पाप. त्यामुळे स्वस्वरूपी चिरंतनपणे असणारा तू पूर्णतया निष्पाप आहेस. तुझे भक्तही असेच निष्पाप असतात. तुला व तुझ्या भक्ताना शतशः दंडवत असोत.

**८३२) अचिन्त्यः । अचिन्त्याय नमः ।**

चिंतन करण्यास अशक्य असा. देहबुद्धीच्या मर्यादांमुळे तुझे देहबौद्धिक चिंतन अशक्य असते. ते सोपे व्हावे म्हणून सगुणोपासना आहे. सगुण भक्तीचे विविध मनोहर व उपयुक्त आविष्कार आहेत. तुझ्याचरणी मस्तक राहो.

**८३३) भयकृत । भयकृते नमः । भयं कृन्तति इति भयकृत् ।**

अर्थात् भय उत्पन्न करणारा तो भयकृत. कालातीत असल्याने भीती व मृत्यू जिथे जायला घाबरतात असा. सर्व संवेदनाजन्य बाबी उदाहरणार्थ विचार, भावना, वासना, अस्तित्व आणि त्याबद्दलची आसक्ती यामुळे निराकार व निर्गुण अशा तुझ्या अस्तित्वाच्या जाणिवेने व चाहुलीने व विशेषतः तुझ्या पायाशी सर्व समर्पण करण्याच्या कल्पनेने तुझी प्रचीती न आलेल्यांच्या जीवाचा थरकाप उडतो. कारण तुझ्या स्वरूपी बाकी सर्व नसतेच पण एकटेपणाही नसतो कारण संकुचित अस्तित्वही संपल्याशिवाय व्यक्तीला तत्स्वरूपी प्रवेश नसतो. अन्य दृष्टीने पाहता तुझी प्रचीती आलेल्यांच्या अंत:करणात भय उत्पन्न होऊ शकत नाही. भयाला त्या अंत:करणात प्रवेश करण्याची भीती वाटते. आणखी एका अर्थी पाहिल्यास अविद्येचाही निर्माता या नात्याने भयाचाही (तसेच शोक, चिंता वगैरे देहबुद्धीजन्य भावनांचा) निर्माता म्हणूनही तुला **भयकृत** म्हणजे भय उत्पन्न करणारा म्हणणे संयुक्तिक आहे. तुला सादर प्रणाम असोत.

**८३४) भयनाशनः । भयनाशनाय नमः ।**

भय नाश करणारा. अजरामर कालातील अस्तित्वामुळे तुझी प्रचीती (आत्मप्रचीती) ज्याला तू कृपाळूपणे देतोस त्याचे भय नष्ट होते. कारण मृत्यू, असुरक्षितता, दु:ख यांचे विचार नष्ट होतात. तुझ्या नामस्मरणामध्ये व तुझ्या चरणांच्या अनुसंधानामध्ये तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**अणुर्बृहत्कृशः स्थूलो गुणभृन्निर्गुणो महान् ।**
**अधृतः स्वधृतः स्वास्यः प्राग्वंशो वंशवर्धनः ॥**

**८३५) अणुः । अणवे नमः ।**

चराचरातील भूलभूत सूक्ष्मतिसूक्ष्म कणाला अणुः म्हणतात. तू अणु आहेस याचा अर्थ प्रत्येक चराचर पदार्थाचे मूळरूप देखील तुझाच अविष्कार आहे. अणु म्हणजे प्रत्येक पदार्थाच्या आतील सूक्ष्मतिसूक्ष्म आणि प्रचंड शक्तीने भरलेला असा कण ज्याच्याशिवाय पदार्थाला अस्तित्व व गुणधर्म प्राप्त होणे शक्य नाही. सर्वातर्यामी असलेल्या तुझ्या स्मरणात तुला निरंतर वंदन असो.

**८३६) बृहत् । बृहते नमः ।**

मोठा. वीज, प्रकाश, अवकाश, काळ ह्या एकाहून एक पदार्थांमध्ये एक महत्त्वाचा गुणधर्म आढळतो. हा गुणधर्म म्हणजे ते सूक्ष्मही असतात व विशालही असतात. काळ तर सर्वव्यापी आहे. कारण तो चराचर विश्व व अवकाश व्यापतो. पण तू काळालाही व्यापणारा म्हणून त्याहूनही विशाल अक्षरशः सर्वव्यापी आहेस. तसेच अमर असल्यामुळे टिकण्यामध्येही तू सर्वात विशाल आहेस. तुला अखंड अभिवादन असो.

**८३७) कृशः । कृशाय नमः ।**

नाजुक, किडकिडीत. विश्वातील विविध ऊर्जा व त्यांच्या लहरींचे आकारमान (जाडी) पाहिली तर जाणवते की ही विश्वाची नियंत्रक तत्त्वे जाडीला सूक्ष्म आहेत. विद्युतलहरी, प्रकाशलहरी, क्षकिरण, लेसर अशा एकाहून एक सुक्ष्म पण प्रभावी लहरींमध्ये त्यांच्याही पेक्षा सूक्ष्मतेने तू असतोस म्हणून तुला कृशः म्हटले आहे. तुला विनम्र नमन असो.

**८३८) स्थूलः । स्थूलाय नमः ।**

अतिशय लठ्ठ असा. विश्वाच्या नियंत्रक शक्ती जशी रूपे आहेत त्याचप्रमाणे तू सर्व सामावणारा व विश्वात्मक असल्यामुळे मोठाले पर्वत, ग्रह, तारे अशा मोठ्या नियंत्रित (स्थूल) बाबींमध्येही तू आहेस. तेही तुझेच आविष्कार आहेत. म्हणून तुला **स्थूलः** म्हटले आहे. तुझ्या चरणी साष्टांग लोटांगण असो.

**८३९) गुणभृत् । गुणभृते नमः ।**

त्रिगुणांचा कर्ता. त्रिगुणात्मक. गुणातीत असूनही सत्व, रज व तम या तीन गुणांच्याद्वारे तू गुणवैशिष्ट्यांसह चराचरामध्ये प्रगट होतोस व तुझी लीला घडवतोस म्हणून तुला गुणभृत म्हणतात. प्रत्येक कणा-गुणातुन तुझे अस्तित्व प्रगट होते या जाणिवेत तुला विनम्र प्रणिपात असोत.

**८४०) निर्गुणः । निर्गुणाय नमः ।**

गुणातीत, गुणवैशिष्ट्ये नसलेला. गुणवैशिष्ट्य फक्त जे जन्मले व मेले त्याला (स्थित्यंतरित होऊ शकणाऱ्याला) असते. देहबुद्धीला जे जाणवू शकते अशा फलस्वरूप बाबीना असते. तसेच जाणवायाच्या वस्तूला असते. तू परिमाणातीत, स्थित्यंतरातीत, शाश्वत, अवैयक्तिक, चराचरातीत, अमर, ज्ञाता व नियंत्रक असल्याने तुला गुणवैशिष्ट्ये नाहीत. तुला नम्र नमन असो.

**८४१) महान् । महते नमः ।**

महान. तू सर्वतोपरी महान आहेस आणि तद्रुप झालेले भक्त महान विश्वसंस्कृतीचे महान् आधारस्तंभ व महान दीपस्तंभ आहेत. तुला व तुझ्या भक्तांना शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**८४२) अधृतः । अधृताय नमः ।**

कोणत्याही प्रकारच्या आधाराची गरज व कोणताही आधार नसलेला. (निराधार म्हणजे आधाराची गरज असून आधार नसलेला. अधृतः म्हणजे असा निराधार नव्हे.) संपूर्ण चराचराचा निर्माता नियंता व आधार असल्याने तुला कुणाचाही, कोणताही आधार नाही व असू शकत नाही. अन्य दृष्टीने पाहता कालातीत व तरलतम असल्याने तुला आधार देण्याची कल्पनाच निरर्थक ठरते. आणखी एका प्रकारे पाहिल्यास तू कोणत्याही तर्कसंगत विचारांमध्ये मावत नाहीस व बुद्धीला गम्य नाहीस त्यामुळे तुला आधार (पुरावा) नाही. तू स्वयंसिद्ध आहेस. तुला अखंड अभिवादन असो.

**८४३) स्वधृतः । स्वधृताय नमः ।**

स्वत:च स्वत:चा आधार असलेला. अन्य कुणाचा आधार नसलेला म्हणून तूं स्वत:च स्वत:चा आधार असलेला, स्वयंभू व स्वयंपूर्ण आहेस. तुझे भक्तही तुझ्या सारखेच असतात. तुला व तुझ्या भक्तांना कृतज्ञ प्रणिपात असोत.

**८४४) स्वास्यः । स्वास्याय नमः ।**

अत्यंत सुंदर, आकर्षक चेहरा असलेला. आकाश हे 'नेत्र' व 'ओंकार' असल्याने मुखातून वेद बाहेर पडल्याने तुझा सर्वव्यापी अजरामर चैतन्यदायी चेहरा अत्यंत सुंदर दिसतो. वेदांमध्ये तुझ्या ह्या सौंदर्याचा आविष्कार दिसतो. सगुण रूपामध्ये ज्याचा चेहरा अतिशय आकर्षक असतो (कारण मूर्तिकाराच्या किंवा चित्रकाराच्याच नव्हे तर भक्ताच्या डोळ्यानी त्याच्यावर स्वत:च्या जीवापाड भक्ती केलेली असते.) तुझ्याचरणी निरंतर वंदन असो.

**८४५) प्राग्वंशः । प्राग्वंशाय नमः ।**

पुरतन वंश असलेला. यज्ञाच्या स्थानाच्या पूर्वेला ब्रह्मज्ञानी निमंत्रितांसाठी असलेले मानाचे पवित्र स्थान. चराचराचा (व व्यक्तीचाही) गाभा, खरा स्व, बीजरूपी आत्मा अस्तित्वाच्या वेगळ्या स्तरावर परिमाणातीत अवस्थेत अनादि कालापासून अनंत काळपर्यंत राहतो. तुला प्राग्वंश म्हणतात कारण तुझे (आत्मरूपी) मूळही अनादि आहे. चराचराची तुझ्यामध्ये समर्पित होण्याची प्रक्रिया (यज्ञ) असो की व्यक्तीची व्यक्तित्वे तुझ्यामध्ये समर्पित करण्याची प्रक्रिया (यज्ञ) असो, यांचा साक्षी तूचआहेत. म्हणून तुझे हे स्वरूप चिंतिण्यासाठी प्राग्वंशः म्हणणे संयुक्तिक आहे. तुझ्या पायाशी चिरंतन लोटांगण असो.

**८४६) वंशवर्धनः । वंशवर्धनाय नमः ।**

वंश वाढवणारा. विश्वप्रक्रियारूपी स्वत:चा वंश अखंडितपणे अव्याहतपणे चालू ठेवणारा, स्वत:ची प्रचीती देऊन भक्तांना अमर करून त्यांचा (आत्मज्ञान्यांचा) वंश (परंपरा) वाढवणारा व अविद्येने ग्रस्त असलेल्यांचे संकुचित अस्तित्व संपून त्यांचा वंश (त्यांची परंपरा) तोडून टाकणारा तू आहेस. व्क्तीनिरपेक्ष, न्याय्य कृपा करणारा व ती स्वीकारण्याचे शहाणपणही देणाऱ्या तुला सादर नमन असो.

भारभृत् कथितो योगी योगीशः सर्वकामदः ।

आश्रमः श्रमणः क्षामः सुपर्णो वायुवाहनः ॥

**८४७) भारभृत् । भारभृते नमः ।**

भार वाहून नेणारा. चराचराचा कालातीत व नियंता आधार असल्याने तुला विश्वाचा भार, (विश्वांतर्बाह्य राहून) वाहणारा (भारभूत्) म्हणतात. तुझ्या शेषशायीअनंत या सगुणश रूपाचा हा अत्यंत महत्त्वाचा अनव्यार्थ आहे. तुला अनन्यभावे नमस्कार असोत.

**८४८) कथितः । कथिताय नमः ।**

वर्णन केला गेलेला व जाणारा. विश्वातील लिहिले, चिंतिले वा बोलले गेलेले सर्व सत्याची स्तुती करणारे शब्द प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे तुझीच कथा असते. भक्तांना याच कारणाने प्रत्येक शब्दात तुझे अस्तित्व दिसते. त्याचप्रमाणे जगातील सर्व सत्याचे पुजारी ज्या सत्याची महती गातात ते तूच आहेस. सर्व दर्शनशास्त्रांचे, महाकाव्यांचे, स्तोत्रांचे, भजनांचे, श्लोकांचे, ओव्यांचे, अभंगांचे आणि वैचारिक व वैज्ञानिक ग्रंथांचे सार तू आहेस. लक्ष्य तू आहेस. कथनाचा विषय व तत्त्व तू आहेस. त्यांचा हेतू, साध्य,

उद्दिष्ट तू (तुझी प्राप्ती) आहेस. तुझ्या चरणी भावपूर्ण प्रणिपात असोत.

**८४९) योगी । योगिने नमः ।**

मायामोहातीत आत्मरूपाकार असणारा. मनाचा, संकुचित अस्तित्वाचा पूर्ण लय झालेला. संपूर्ण विश्वप्रक्रियेचा नियंता असूनही आत्मस्वरूपी अढळपणे राहणारा व वैयक्तिक पातळीवर पाहता देहबुद्धी, अहंकार, मन, चित्त (अर्थात संपूर्ण संकुचित अस्तित्वच) नाहीसे झालेला स्थितप्रज्ञ योगी तू आहेस. तुला साष्टांग नमन असो.

**८५०) योगीशः । योगीशाय नमः ।**

योग्यांचा ईश्वर, सर्वश्रेष्ठ योगी. पारंपरिक दृष्ट्या शिव-शक्ती, लक्ष्मी-नारायण, पुरुषप्रकृती या रूपात पूजिला जाणारा विश्वव्यापी कालातीत पुरुष व तुझी माया हे नेहमीच परस्परांमध्ये अभिन्नतेने असतात. योग म्हणजेच एकत्व पावणे. प्रकृती ज्याच्याशी एकरूप झाली असा तू असल्याने तू अजरामर कालातीत व कायमचा योगी आहेस. योगाचे साधक याच स्वरूपाचे ध्यान करतात, याच स्वरूपावर मन केंद्रित करतात, प्राणधारणा याच स्वरूपी एकरूप होण्यासाठी करतात म्हणून तुला योग्यांचा ईश्वर म्हणतात. त्याचप्रमाणे योगविद्येचा कर्ता करविता, योगाची इच्छा निर्माण योग्यांच्या मनात निर्माण करणारा आणि अंतिमतः बद्धापासून सिद्धापर्यंत असा साधकाचा प्रवास यशस्वी करणारा म्हणूनही तुला **योगीशः** म्हणतात. तसेच भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग व राजयोग यांचा सर्वोच्च दार्शनिक (श्रीकृष्ण) म्हणूनही तुला **योगीशः** म्हणतात. योगाचे विविध कल्याणकारी मार्ग दाखविणारे योग्यांचे मुकुटमणी देखील तुझेच अवतार असल्यानेही तुला **योगीशः** म्हणतात. तुला निरंतर अभिवादन असो.

**८५१) सर्वकामदः । सर्वकामदाय नमः ।**

सर्व इच्छांची पूर्ती करणारा, सर्व इच्छा संपवणारा. आत्मज्ञानाच्या दिशेने निरंतरपणे विश्वाला नेणारा, तद्रुपतेची इच्छा देणारा आणि ती इच्छा विविध प्रकारे मार्गदर्शन करून पूर्ण करणारा तू आहेस. त्याचप्रमाणे भक्तांना आत्मरूप बनवून सर्व (क्षुद्र) इच्छा मारून टाकणाराही तूच आहेस. परंतु या प्रक्रियेमध्ये काही इच्छांची पूर्ती करणारा व भक्तांना सांभाळून आत्मज्ञानाकडे नेणाराही तूच आहेस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**८५२) आश्रमः । आश्रमाय नमः ।**

विश्रांतिस्थान. कालातीत आणि जाणिवेच्या अतीत अशा तुझ्यापर्यंत (देहबुद्धीजन्य) दुःखद जाणिवा पोचत नाहीत. त्यामुळे अवैयक्तिक बनलेल्या तुझ्या सर्व भक्तांनाही तुझ्या ठिकाणी चिरंतन शांतता मिळते. म्हणून तू पवित्र असे

विश्रांतिस्थान, आश्रम आहेस. जीवनामध्ये ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चार आश्रमांचा हेतू तुझी प्राप्ती हाच आहे व अचुकतेने समर्पण वृत्तीने व निस्वार्थपणे त्यांचे पालन करणारा तत्स्वरूप बनतो म्हणून या आश्रमांमध्येही भक्त तुझा आविष्कार पाहतात. त्यामुळे या कारणास्तवही तुला आश्रमः म्हणणे सुयोग्य आहे. तुझ्या चरणी मन:पूर्वक नमन असो.

**८५३) श्रमणः । श्रमणाय नमः ।**

श्रम किंवा कष्ट देणारा, संन्यासी, भिकारी (त्रास, श्रम, कष्ट घेणारा) संपूर्ण विश्वनिर्मितीची लीला करणारा आणि त्याचबरोबर मर्यादित जाणिवा, अहंकार, आशा, आसक्ती यांचीही माया रचणारा तूच आहेस. ह्या मायेमध्ये अडकलेल्याना ताप देणाराही तूच आहेस आणि ते ताप भोगणाराही तू आहेस परंतु त्याना हे प्रचीतीस आले नसल्याने त्यांचा संकुचित 'स्व'च ताप भोगतो असे त्यांना वाटते. वास्तविक ते भ्रामक ताप देणारा व घेणारा आणि दान देणारा व भ्रमकता जाणून ते घेणारा असल्याने तुला दाताही म्हणतात व भिकारी (**श्रमणः**) त्रास घेणाराही म्हणतात. अगाध लीलेमध्ये रममाण अशा परंतु तरीही पूर्णपणे संन्यस्त असलेल्या तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**८५४) क्षामः । क्षामाय नमः ।**

अत्यंत क्षीण, नाजुक, दुबळा वगैरे. सर्वकाही प्रलयकाली शोषण करणारा तसेच वैयक्तिक पातळीवर पाहता सर्व वासना इच्छा नष्ट करणारा, वैयक्तिक संकुचित आयुष्यच नष्ट करणरा व आत्मरूपामध्ये विलीन करणारा तू आहेस. तुझे स्वरूप गुणवैशिष्ट्यांनी भरलेले नसल्याने तुला क्षीण म्हटले आहे. तुझे भक्तही उपाधीसहित होतात अहंभावशुन्य (क्षीण) होतात. कृपाळू अशा तुझ्या चरणी मस्तक राहो.

**८५५) सुपर्णः । सुपर्णाय नमः ।**

अश्वत्थ वृक्ष. याचा उपयोग ईश्वर (मूळ) व त्याची माया (फांद्या, पानं वगैरे) यांचे वर्णन करण्यासाठी करतात. तू आणि तुझी माया अतूटतेने अखंडतेने असल्याने (व ते स्पष्ट करण्यासाठी) तुला **सुपर्णः**, उत्तम पाने असलेला (अश्वत्थ ) वृक्ष म्हणतात. वेगळ्या दृष्टीने पाहिल्यास व्यक्तीच्या अस्तित्वाचा व जाणिवेचा गाभा मेंदू (मूळ) आणि मज्जारज्जू (मेंदूपासून उलट गेलेले खोड आणि त्याच्या असंख्य शरीरभर पसरलेल्या नाड्या (फांद्या) असा व्यक्तीला व्यक्तीचं अस्तित्व देणारा (अश्वत्थ) वृक्ष तू आहेस. म्हणूनच जिथून संवेदना मेंदूपर्यंत पोचतात तिथून उलटे वळले व शेवटी मेंदुमध्ये केंद्रस्थानी स्थिर झाले की सर्व वैयक्तिकतेतून साधक, भक्त, योगी मुक्त होतो. अश्वत्थ वृक्षाच्या मुळात जाऊन नंतर तो कापून टाकणे वैश्विक व वैयक्तिक पातळीवरील अविद्या माया

नष्ट करणे याचा हा देखील अर्थ आहे. संपूर्ण विश्वमय, मुक्तिमय, मुक्तिदाता व मुक्ती घेणारा हे सर्व काही तूच आहेस. तुला शतशः दंडवत असोत.

**८५६) वायुवाहनः । वायुवाहनाय नमः ।**

वायूला वाहून नेणारा. वायूचे वहन करणारा. तू सूक्ष्मातिसूक्ष्म असल्याने व तरलतम असल्याने विश्वातील व शरीरातील सर्व हालचालींचा कारक जो वायू त्या वायूचा नियंता आहेस. तसेच वायूचे वाहणे तुझ्या अंतर्गतच होते कारण तू सर्वसमावेशक आहेस. या दोन्ही कारणासाठी तुला **वायुवाहनः** म्हणतात. तुला साष्टांग प्रणाम असोत.

**धनुर्धरो धनुर्वेदो उण्डो दमयिता दमः ।**
**अपराजितः सर्वसहो नियन्ता नियमो यमः ॥**

**८५७) धनुर्धरः । धनुर्धराय नमः ।**

राम. दुसरा अर्थ ईश्वरभक्त. धनुर्धारी राम हे तुझा सगुण अवतार. मुंडकेपनिषदातील वर्णनामध्ये ओंकाराच्या धनुष्याने सत्कार्य, सत्भक्ती, सच्चिंतन, अभ्यास यांचे बाण अचूकपणे मारून स्वतःचे संकुचित अस्तित्व नष्ट करणारा परमसिद्ध भक्त तूच आहेस. तुला सादर नमन असो.

**८५८) धनुर्वेदः । धनुर्वेदाय नमः ।**

रूढार्थाने धनुर्विद्या. तात्त्विक दृष्ट्या संकुचितता अचूकपणे व संपूर्णपणे संपवण्याचे सर्वश्रेष्ठ अनुभवसिद्ध प्रचीतीरूप व प्रचीतीदायी शास्त्र. तुला अखंड अभिवादन असो.

**८५९) दण्डः । दण्डाय नमः ।**

शिक्षा, शिक्षा देणारा, धर्मलक्षण अशा धर्मध्वजेचा आधार. पाण्याच्या थेंबांची किंवा दवबिंदूंची ज्याप्रमाणे माळ गुंफता येत नाही त्याचप्रमाणे शब्दांनी तुझे वर्णन करता येत नाही. परंतु त्या शब्दांचा आशय समजावून घेत राहिले की समजण्यास शक्य नाही अशा आशयातीत असलेल्या तुझ्या अनुभूतीची प्राप्ती होते. तुझ्या सहस्रनामाच्या परिशीलनाचे, स्मरणाचे उद्दिष्ट व महत्त्व हेच आहे. धर्मलक्षणांचा आधार म्हणून, धर्मलक्षण अशा शासनकर्त्याचा (दंड देणाऱ्याचा) आधार म्हणून किंवा धर्मलक्षण अशा शासनप्रक्रियेचा (दंडाचा) आधार म्हणून, संपूर्ण धर्माचा आणि धर्माच्या सामाजिक आविष्काराचा मूलभूत मूलाधार तू आहेस हा मथितार्थ. तुला आदरपूर्वक दंडवत असोत.

**८६०) दमयिता । दमयित्रे नमः ।**

शासक, नियंता. चराचराचा नियंता. समाजाचा नियंता व वैयक्तिक जीवनाचाही नियंता. मनूच्या स्मृतीपेक्षा पर्यायी आत्मज्ञानजन्य व न्याय्य समाजपद्धती स्मृतीचे पाठीराखे, विरोधक वा अन्य विचारवंत यांपैकी कुणीही जगाला दिली नाही. या दृष्टीने प्रत्येक युगाला अनुरूप जीवनपद्धती देणारा मनु म्हणून तुला दमयिता म्हटले असावे. परंतु आज मनुस्मृती आंधळ्या तथाकथित धर्मनिष्ठेने/संस्कृतीच्या अस्मितेने प्रमाण मानणे किंवा बेभान सूडभावनेने, विद्वेषाने पायदळी तुडवणे, धि:कारणे किंवा मनूच्या काळाचा हवाला देऊन सरधोपटपणे त्या काळी ती सुयोग्य होती किंवा नव्हती ह्याविषयी दावे करणे अयोग्य आहे. मनूचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ व सत्यनिष्ठ पद्धतीने केल्यास मनूची गफलत किंवा दोष, त्याचा मानवजातीवरील प्रभाव, मनुस्मृतीतील अमानुषता, याचबरोबर तिच्यातील स्पृहणीय मूळ उद्दिष्टे आणि पर्यायी सत्यनिष्ठ व्यवस्थेची तीव्र गरज ध्यानात येतात. तुझ्याचरणी साष्टांग नमस्कार असोत.

**८६१) दमः । दमाय नमः ।**

शिक्षा, नियंत्रण, शासन. आत्मज्ञानाधिष्ठित अवैयक्तिक विश्वन्यायानुसारी शासनाचा आद्य प्रणेता व तदनुरूप सामाजिक दंडविधानाचा प्रणेता, प्रत्यक्ष दंडविधान व त्याची अंमलबजावणी हे सारे तूच आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**८६२) अपराजितः । अपराजिताय नमः ।**

कधीही पराभूत न होणारा. कोणाचाही कोणताही प्रभाव न होणारा चराचराचा नियंता तू आहेस म्हणून तू अपराजित आहेस. तसेच तुझ्या वेगळी अन्य कोणतीही वस्तूच नाही त्यामुळे तुझ्यावर कुणी विजय मिळवण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. तुझे भक्तही तद्रूप असतात त्यांच्यावर (त्यांच्या खऱ्या 'स्व'वर शरीरावर नव्हे) कुणीही कधीही विजय मिळवू शकत नाही. तुझ्याचरणी विनम्र नमन असो.

**८६३) सर्वसहः । सर्वसहाय नमः ।**

सर्व सहन करणारा. सर्व वैश्विक उत्पात तुझ्या ठायी घडत असताना तुझीच ही लीला स्वस्थपणे, कालातीततेने अजिबात विचलित न होता पाहणारा स्थितीप्रज्ञ लीलाधर तू आहेस. (सहन करणारा म्हणजे असहायपणे दु:ख, व्याधी सहन करणारा असा नव्हे) तुला अखंड वंदन असो.

**८६४) नियन्ता । नियन्त्रे नमः । अनियन्ता । अनियन्त्रे नमः ।**

दोन्ही तऱ्हेने हे नाव घेतात. नियन्ता व अनियन्ता म्हणजे अनुक्रमे नियंत्रण करणारा

व (रूढार्थाने) नियंत्रण न करणारा असे दोनही अर्थ  समर्पक आहेत. साऱ्या विश्वाचा नियन्ता तू आहेस हे खरेच परंतु नियंत्रित केले गेलेले व नियंत्रण प्रक्रिया दोन्हीही तुझ्यापासून वेगळ्या नाहीत. तू नियन्ता, नियंत्रित व नियंत्रण हे तिन्ही एकत्रित असलेला असा आहेस त्यामुळे आणि तू साक्षीत्वाने असल्याने, रूढार्थाने तू नियंत्रण करणारा नाहीस. तुझे नियन्ता-अनियन्ता-साक्षीत्व विषद करण्यासाठी अवकाशाचे उदाहरण घेता येईल. एकादी गाडी चालते तेव्हा तिचा नियंत्रण कर्ता गाडीचा चालक समजला जातो. काहीजण गाडीचे इंजिन, इंधन, रस्ता इत्यादी बाबींचा गाडी चालण्यावर कसा परिणाम होतो व म्हणून या बाबीही अप्रत्यक्षपणे गाडीच्या चालण्यावर कसे नियंत्रण करतात हे लक्षात घेतात. परंतु ती गाडी ज्या मोकळ्या जागेतून (रस्ता नव्हे) पोकळीतून जाते त्या पोकळीचे काय? एवढेच नव्हे तर गाडीला व चालकालाही अंतर्बाह्य व्यापणाऱ्या सर्वत्र पसरलेल्या अखंड पोकळीचे काय? ही अखंड पोकळी गाडीच्या अणुरेणूमध्ये व चालकाच्याही अणुरेणूमध्ये अखंडपणे पसरलेली असते त्याचे काय? अणुरेणूंचे अस्तित्व ह्या पोकळीशिवाय अशक्य असते व अस्तित्वाचे (नियंत्रण) करणारी असल्याने संपूर्ण प्रक्रियेची अप्रत्यक्ष नियंत्रक बनतेच ना? एवढेच काय संपूर्ण गाडी, चालक यांची मूलद्रव्ये जिथून आली व जिच्यात संपणार तीही अखंड सर्वदूर पसरलेली पोकळीच त्यांची खरी नियंत्रक नाही काय? पोकळी आपण काही नसलेली ती असे म्हणतो. परंतु ते आपल्या मर्यादित जाणिवेमुळे. वास्तविक पोकळी व वस्तु वेगळ्या करणे हेच 'जाणिवे'मुळे घडले. या प्रकारे वस्तु आणि पोकळी समजण्याच्या प्रक्रियेला केवळ बाह्य स्वरूपाच्या ज्ञानाला सत्य समजण्याच्या प्रक्रियेला अविद्या म्हणतात. पोकळी व वस्तु वेगळ्या नाहीत त्यामुळे पोकळी गाडीचे चालणे नियंत्रित करते असे म्हणणे गाडीही पोकळीमय असल्याने निरर्थक ठरते. तसेच चालणे पोकळीतच घडत असल्याने ते चालणेही पोकळीमयच असते. अर्थात येथे नियंत्रक, नियंत्रण व नियंत्रित एकात्म-अखंड होतात. साहजिकच पोकळी ही रूढार्थाने नियंत्रणकर्ती राहात नाही. केवळ असण्याने व असल्याने ती साक्षी राहते. नियन्ता व अनियन्ता हे तुझेच गुण आहेत हे दाखविण्यासाठी हे उदाहरण घेतले. एका मर्यादेपर्यंत तुझे नियन्तेपण व अनियन्तेपण समजण्यासाठी या उदाहरणाचा उपयोग आहे. परंतु तू पोकळी नाही. नियंत्रण व अनियंत्रण या संकल्पनांच्याही आतील व गुणातीत अशा तुला शतशः साष्टांग प्रणिपात असोत.

**८६५) नियम : । नियमाय नमः । अनियमः । अनियमाय नमः ।**

विश्वनियमांचा नियंता व नियमरूपीही तू आहेस. नियमांपूर्वीच्या स्थितीचा नियंता व ती स्थितीही तूच आहेस. सामाजिक व वैयक्तिक पातळीवर देखील नियमित नसण्याची

अवस्था व नियमित होण्याची अवस्था ह्या दोन्हींचा कर्ता व दोन्हीही तूच आहेस. अष्टांग योगामध्ये नियम आहेत. ते नियम तू आहेस आणि ते नसण्याची अवस्थाही तूच आहेस. ते नियम निर्माण करणाराही तूच आहेस. नियम, नियमितता, नियम नसणे, अनियमितता, तसेच यांचा निर्माता व नियंता, तसेच त्यांची निर्मिती प्रक्रिया हे सर्व काही एकदमच असून यांच्या अतीत देखील असलेल्या तुला अनन्यभावे वंदन असो.

**८६६) अयमः । अयमाय नमः ।**

ज्याला मृत्यू नाही असा. तुला जन्म मृत्यू नाही तसेच तुझ्या भक्तांना अविद्यामय जीवन प्राप्त होत नाही म्हणून पुनर्जन्म नाही व तत्स्वरूप असल्याने मृत्यू नाही. अन्य दृष्ट्या मृत्यू म्हणजे स्वस्वरूपापासून ढळणे (मृत्यू म्हणजे मूर्खत्व म्हणतात ते यासाठी). जो अजन्मा जन्मयोगी असतो त्याला स्वस्वरूपापासून कुणीही कधीही ढळवू (ठार मारू) शकत नाही. इंद्रिय दमनाची बंधने वा निरोधाची गरज नसलेला व स्वस्वरूपी स्थिर असलेला अमर चिरयोगी (तुझा अवतार) तूच असतोस. तुला साष्टांग दंडवत असोत.

**सत्त्ववान् सात्त्विकः सत्यः सत्त्यधर्मपरायणः ।**
**अभिप्रायः प्रियार्होऽर्हः प्रियकृत् प्रीतिवर्धनः ॥**

**८६७) सत्त्ववान् । सत्त्ववते नमः ।**

आत्मज्ञानी सामर्थ्य व धैर्य असलेला. जन्म-मृत्यू-भीती यांच्या अतीत अशा तुझे भक्तही अत्यंत सत्वशील व धैर्यवान असतात. तुला विनम्र नमन असो.

**८६८) सात्त्विकः । सात्त्विकाय नमः ।**

सत्वगुणी. तमोगुण, रजोगुण व सत्वगुण ही व्यक्तीच्या अस्तित्वामधील स्थित्यंतरे दर्शवितात. तमोगुणापासून सत्वगुणापर्यंतचा प्रवास, बदल म्हणजे क्षुद्र अस्तित्वापासून विशाल अस्तित्वामध्ये व विशाल दृष्टिकोनामध्ये झालेली परिणती होय. या प्रक्रियेत कारक, ही प्रक्रिया व प्रक्रियेचा परिणाम. सत्वगुण आणि सत्वगुणाला धारण करणारा सात्विक. सत्वगुण हा आत्मज्ञानाचे महाद्वार आहे. परंतु तू आत्मरूपी आहेस त्याचप्रमाणे तुझ्या संपूर्ण मायेमध्येही (लीलेमध्येही गुणयुक्त भक्तामध्येही) अविभक्तपणे आहेस. म्हणून तुला सात्विकः (सत्वगुण धारण करणारा) म्हणतात. तुला साष्टांग दंडवत असोत.

**८६९) सत्यः । सत्याय नमः । ''त्रिकालाबाधितं वस्तु सत्यमिति ।''**

त्रिकालाबाधित सत्य. प्रचीतीने भक्त तत्स्वरूप म्हणजेच सत्स्वरूप होतात. त्यांचे

संकुचित, क्षणिक व अविद्यामय अस्तित्व अजरामर त्रिकालाबाधित अस्तित्वात स्थित्यंतरित होते. तुझ्याचरणी भक्तिपूर्व प्रणिपात असोत.

**८७०) सत्यधर्मपरायणः । सत्यधर्मपरायणाय नमः ।**

सत्याचरणानुभूतीची सर्वोच्च अवस्था. चिरंतन व सनातन सत्यधर्म (विश्वनियम) निर्मिणारा व आचरणारा विश्वेश्वर तू आहेस. पुष्कळदा आमच्या धर्मात सांगितलेला देव मोठा, व तुमच्या धर्माचा देव लहान व खालचा किंवा आमचे कुलदैवत जागृत, तुमचे कुलदैवत सामान्य असे काही संवाद ऐकू येतो. स्वतःच्या देवाची कल्पना स्वतःच्या संकुचितपणावरून ठरते. किंबहुना तथाकथित आस्तिक जेवढा संकुचित व अप्रचीतीपूर्ण तेवढा अभिनिवेश व अंधश्रद्धा अधिक व आस्तिक जेवढा विशाल हृदयी तेवढी त्याला आलेली देवाची प्रचीती वैश्विक आणि त्याची वृत्ती सहिष्णु व डोळस असते. देवांच्या लहानमोठेपणावरून वाद/संघर्ष करणे हा आंधळा अन् भ्रमिष्ट आचार होय. त्याऐवजी जे कोणते कुलदैवत, गुरू प्रेषित असेल त्याचे नाव व सगुण रूप कोणतेही असो, त्याचे पूजन अर्चन करताना स्वतःचे सर्व संकुचित अस्तित्व त्याला अर्पण करावे म्हणजे असे वाद बाजूला पडतील. **स्वतःच्या देवाला इतरानी मोठे म्हणायला हवे असेल तर सर्वप्रथम स्वतःच स्वतःचे सर्वस्व स्वतःच्या देवाला द्यावे व अवैयिक्तिक विशालता अनुभवावी. त्यामुळे (असे न करण्याने होणाऱ्या) दंग्याधोप्यांचे व कटुतेचे एक कारण नाहीसे होईल. त्याचप्रमाणे नास्तिकांनी नास्तिकतेच्या आपल्या तत्त्वाशी एकनिष्ठ राहून देवावरील अविश्वासाप्रमाणेच स्वतःचे संकुचित अस्तित्त्व, स्वतःचे सर्वस्व, स्वतःचे विचार ह्यांवरही अनाठायी असणारा विश्वास नष्ट करावा म्हणजे महासमन्वय साधेल व महान् विधायक क्रांती घडून येईल.** विश्वकल्याणाचे मळे फुलतील. संपूर्ण विश्व खरोखरच स्वात्मीयतापूर्ण व एकात्म होईल. तुझ्या कृपेने, तुझ्याच इच्छेने, तुझ्याच योजनेनुसार सर्व काही घडत असून घडत राहील या जाणिवेने तुझ्या चरणारावर साष्टांग लोटांगण असो.

**८७१) अभिप्रायः । अभिप्रायाय नमः ।**

सर्व सत्यप्रेमी ज्याच्या सन्मुख आहेत असा. संपूर्ण विश्वाचा एकमेव, सर्वोच्च आशय व सारतत्त्व. संपूर्ण जाणिवेमध्ये सर्वश्रेष्ठ जाणण्याची क्रिया, सर्वश्रेष्ठ अनुभूती ही तुझी अनुभूती आहे. हेच वेगळ्या शब्दामध्ये मांडताना दर्शनात सर्वश्रेष्ठ दर्शन (सत्याची प्रचीती देणारे) तुझेच आहे असे म्हटले आहे. तुला विनम्र अभिवादन असो.

**८७२) प्रियार्हः । प्रियार्हाय नमः ।**

सर्वांच्या समर्पणभावनेचा, समर्पित प्रेमाचा, सर्वस्वाच्या समर्पणाचा खरा हक्कदार.

सर्वात प्रिय अनुभूती, सर्वस्व तुझ्या चरणी (तुझ्या कृपेनेच) अर्पण केल्यानंतर मिळते. तसेच अशा अनुभूतीतून उत्पन्न होणारी कृतिप्रवण जीवनाची सार्थकताही तुझ्याच चरणी अर्पण करण्यातून ही अशी सर्वात प्रिय अनुभूती मिळत जाते. म्हणूनच सर्वांच्या समर्पित प्रेमाचा खरा व एकमेव हक्कदार तूच आहेस हे अक्षरशः खरे आहे. असेही म्हणता येईल की सर्व धर्म-पंथांच्या व सर्व विचारसरणींच्या काही लोकांमध्ये समर्पणाची भावना उत्पन्न करणारा, अशी समर्पणाची भावना व असे सर्वस्वाचे समर्पण (जे विश्वकल्याणकारी असते) अत्यंत आवडणारा म्हणून तू **प्रियार्ह:** आहेस. तुला विनम्र अभिवादन असो.

**८७३) अर्ह: । अर्हाय नम: ।**

समर्पित होण्यास सर्वथा योग्य असा. व्यापारामध्ये समर्पित झाला तर (नेहमी नाही तरी पुष्कळ) पैसे मिळतात. व्यायामाला समर्पित झाला तर शारीरिक आकार व शक्ती वाढते. पुस्तकांना समर्पित झाला तर माहिती मिळते. स्त्रीला समर्पित झाला तर अगतिक, लाचार परावलंबी अशी का होईना आणि काही अंशी का असेना वासनातृप्ती मिळते. देहबुद्धीजन्य ''उच्च'' ध्येयाच्या मागे लागूनही कधी तात्कालिक यश तर कधी दारुण वैफल्य पदरी येते परंतु अशा कोणत्याही ठिकाणाहून शाश्वत सत्याचा, आत्मज्ञानाचा लाभ होत नाही. विश्वकल्याणाचा लाभ होत नाही. तुला समर्पित झाले तरच अमरत्व आणि शाश्वत सत्याचा लाभ होतो. सच्चिदानंदाची प्राप्ती होते. तुला समर्पित होऊनच विश्वकल्याण होऊ शकते. **अविद्येला समर्पित झालेला किंवा अविद्येच्या कह्यात गेलेला (जाणारा) माणूस आत्महत्याच करत असतो. कारण अज्ञान हेच सर्वात खरे मरण होय.** असल्या समर्पणाने क्वचित भौतिक समृद्धी येते पण अज्ञान (मृत्यू) मिळते. राहते न वाढते किंवा भौतिक समृद्धीही मिळत नाहीच पण अज्ञान (मृत्यू) मिळते, राहते व वाढते ! किंबहुना अविद्येला समर्पण हे खरे समर्पण नव्हेच ! त्यामुळे जिथे व्यक्तीचे अक्षरशः सर्वस्व समर्पित होऊ शकते असा केवळ तूच आहेस. तुला समर्पित भावनेने निरंतर साष्टांग दंडवत असो.

**८७४) प्रियकृत् । प्रियकृते नम: ।**

प्रित कृती करणारा. ज्याच्या सर्व कृती भक्तांना प्रिय वाटतात व जो भक्तांकडून अचूक (व म्हणून प्रिय) कृती करून घेतो असा तू आहेस. तुला नम्र प्रणाम असोत.

**८७५) प्रीतिवर्धन: । प्रीतिवर्धनाय नम: ।**

भक्तांच्या हृदयात सत्याची प्रीती (व प्रचीती) वाढवणारा. अंतर्बाह्य समृद्ध अशा विश्वसंस्कृतीचा मूलस्रोत असे आत्मज्ञानाने अंत:करणे प्रकाशित झालेले अत्यंत प्रेमळ

'विश्वात्मक' भक्त निर्माण करणाराही तूच आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**विहायसगतिर्ज्योतिः सुरुचिर्हुतभुग्विभुः ।**
**रविर्विरोचनः सूर्यः सविता रविलोचनः ॥**

**८७६) विहाय सगतिः । विहायसगतये नमः ।**

अंतराळात भ्रमण करणारा. तू अंतराळ व काळापेक्षाही सूक्ष्म आहेस व या दोघांच्याही अंतर्बाह्य सर्व व्यापून आहेस. संपूर्ण आकाश व काळ शेवटी तुझ्यातच विलीन होतात. तुला यांची उत्तमगती (विहाय सगतिः) म्हणतात. तू अंतर्बाह्य व्यापून अंतराळात भ्रमण करणारा (जड नसलेला) असल्याने व सूर्याच्या तेजाचाही उगम व नियंता असल्याने तुझे सूर्यनारायण म्हणून पूजन करतात. तुझ्याचरणी कृतज्ञ नमन असो.

**८७७) ज्योतिः । ज्योतिषे नमः ।**

स्वयंप्रकाशी ज्ञानज्योति. भक्तांचा हृदयातील आत्मज्ञानप्रकाशज्योतीचा कारक तू आहेस. ज्योतीची ज्योती आहेस. तुला शतशः दंडवत असोत.

**८७८) सुरुचिः । सुरुचये नमः ।**

तुझ्याविषयी भक्तांना असलेली आवड आणि भक्ताविषयी तुला वाटणारी आवड हीच सर्वोच्च रुची आहे. वैयक्तिकता आणि अवैयक्तिक विश्वात्मक असा तू या मूलतः एकच असणाऱ्या बाबी मर्यादित बुद्धीमुळे वेगळ्या वाटतात. ह्या बाबी एक असल्याचे व्यक्तीच्या प्रचीतीस आणारा आत्मज्ञानाचा दुवा तूच आहेस. अविभक्ततेने चिरंतन प्रेमाने लीला करणाऱ्या पुरुषप्रकृतीतील आकर्षण, प्रेम जे विविध प्रकारे मानवी जीवनातही प्रगट होते, तूच आहेस. तुला शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**८७९) हुतभुक् । हुतभुजे नमः ।**

अर्पण केलेली भक्ती व हवि स्वीकारणारा व उपभोगणारा. विश्व व व्यक्ती यांच्यातील खरा उपभोक्ता तू आहेस. कर्म, भक्ती, संयम, ज्ञान ह्या साऱ्यांचा स्वीकार करून तूच भक्तांना तद्रूप बनवतोस. व तशी प्रचीती देतोस. तुझ्याचरणी नम्र वंदन असो.

**८८०) विभुः । विभवे नमः ।**

सर्वव्यापी, कालातीत, चराचरातीत, जाणिवेच्या अतीत, सर्व विश्व व्यापणारा असा नियंता तू आहेस. तुझ्या भक्तांच्या अस्तित्वाचा गाभाा, त्यांचे आत्मरूप, त्यांची आत्मरूपाची जाणीव तद्रुपतेने कालातीत व विश्वव्यापी असतात. शरीर इतर व्यक्तींप्रमाणे असले तरी, त्यांच्या अस्तित्वाचा हा गाभा अजरामर असतो. त्यांचे संकल्प म्हणजे

तुझे विश्वव्यापी संकल्पच असतात. सर्वव्यापी अशा तुला आणि तुझ्या भक्तांना आदरपूर्वक प्रणिपात असोत.

**८८१) रविः । रवये नमः ।**

सूर्य. सूर्याच्या तेजाचा कारक सूर्याचे आत्मरूप तू आहेस. तसेच ज्ञानसूर्य ब्रह्मर्षीच्या ज्ञानाचा कारक व त्यांचेही खरे आत्मरूप तूच आहेस. वेगळ्या अर्थाने, रविः म्हणजे रस शोषून घेणारा. सूर्य ज्याप्रमाणे सृष्टीतील जीवनरस शोषून घेतो त्याचप्रमाणे भक्तांचे खरे आत्मरूप तू शोषून घेतोस. त्याना आत्मरूप, तद्रूप बनवतोस. सूर्य जसे सृष्टीला जीवन देतो त्याचप्रमाणे सर्व भक्तांना तू तुझ्या कृपेने आत्मसाक्षात्काराचे अमर जीवन देतोस. तुला कृतज्ञ दंडवत असोत.

**८८२) विरोचनः । विरोचनाय नमः ।**

अनेक आकार धारण करणारा. विश्वातील तेजस्वी वस्तूंच्या (चंद्र, सूर्य इत्यादि) रूपात प्रगट होणारा. भक्तांची जाणीव अवैयक्तिक झाली, त्यांची समर्पण वृत्ती परिपूर्ण झाली की त्यांच्या हृदयातील त्यांचे आत्मरूप असा तू त्यांच्या इष्टदेवतेच्या रूपात त्यांना दर्शन देतोस. अशा वेळी भक्ताचे वैयक्तिक अस्तित्व नाममात्रच शिल्लक असून त्याने इष्टदेवतेच्या रूपातील तुला (आत्मस्वरूपाला) संपूर्णपणे सर्वस्व अर्पण केलेले असते. इष्टदैवत रूपातील (त्याचा आत्मरूपी) तू आणि भक्ताचे नाममात्र अस्तित्व यामध्ये भक्त जाणिवेतील संपूर्ण दास्याचा, मोठा पूल असतो. तो भक्त व ईश्वर याना जवळ जवळ एकात्मक बनवतो. भक्ताच्या समर्पण भावनेची, प्रियकर-प्रेयसी सदृश मधुरा भक्तीची, अहंभावशून्य प्रेमाची परमावधी झाल्यामुळे भक्त व तुझ्यामध्ये अतूटता, अविभक्तता एकात्मता असते. भक्ताचे सर्व काही (इष्टदेवतेच्या रूपातील) भगवंतच करतो आणि भक्ताला त्याच्या इष्ट देवतेच्या रूपातील भगवंताशिवाय (आत्मरूपाशिवाय) अन्य काहीही सुचत नसते. आत्मप्रचीती, आत्मसाक्षात्कार यांच्या अभ्यासकांमध्ये क्वचितप्रसंगी असणारा अभिमान, रुक्षता, सगुण भक्तीमध्ये अजिबात आढळत नाही. कारण द्वैताचा व द्वैत जाणिवेचा मोठ्या खुबीने वापर केल्यामुळे मधुर प्रेमाचा महासागर सगुण भक्तीमध्ये आढळतो. परंतु योगमार्ग, ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यामध्ये ज्याप्रमाणे देहबुद्धीजन्य अहंकाराची अधिक शक्यता असून आत्मसाक्षात्कार दूर राहू शकतो त्याचप्रमाणे सगुण भक्ती करणाऱ्यांच्या मनात, विचारपूर्वक दूर न केलेल्या स्वतःच्या संकुचित जाणिवा व देह बुद्धीतून उत्पन्न झालेल्या देवाच्या विवक्षित कल्पना आणि त्यांच्यावरील अनाठायी विश्वास यामुळे पराधीनता, भ्रम आणि आत्मघृणेची परिसीमा होऊन आत्मसाक्षात्कार दूर राहू शकतो. (बुद्धीने) अभ्यास, मनन, चिंतनाने, समर्पण भावनेने, (भक्तीने) अहंभावशून्यतेने, मधुरा, दास्य वगैरे भावनेने, जागरुकतेने,

कोणत्याही प्रकारच्या वैयक्तिक आसक्तीशिवाय कर्म केल्याने (कर्म) तुझी प्रचीती (ईश्वरी (तुझ्या) कृपेने) आली तर त्या जीवनावर (आत्मरूपी) तुझे सर्वंकष व स्वाभाविक नियंत्रण येते (राजयोग) व जीवन परिपूर्ण होत जाते. **सर्व धर्मांच्या व विचारांच्या अनुयायानी जर त्यांच्या इष्टदेवतांची त्यांच्या पद्धतीने भक्ती केली तरीही त्यांना (आत्मरूपी) ईश्वराचा साक्षात्कार घडेल, हे विरोचनः** या नावातून स्पष्टपणे सूचित होते. विश्वामध्ये सर्वंकष ऐक्य होण्याच्या प्रक्रियेचा हा एक हृदयंगम भाग आहे. कोणत्याही एका चाकोरीबद्ध धनसंप्रदायात विश्वाला कोंबण्याचा प्रयास नामशेष होईल. कोणत्याही धर्मसंप्रदायाची दृश्य बाजू यापुढे स्वत:चे अतिरिक्त महत्त्व गमावेल. मूर्तिपूजन किंवा मूर्तिभंजन यापैकी व अन्य कोणत्याही बाह्य स्वरूपावर उथळपणे भर देणाऱ्या हट्टाग्रही, दुराग्रही, एकांगी मार्गाने विश्वाला नेण्याची अपेक्षा करणारे अविद्येने ग्रस्त, भ्रमिष्ट आहेत. ते निश्चितच काळाच्या ओघात बहकतील व नामशेष होतील. तुझ्या कृपेने शिल्लक राहील व बहरून विश्वव्यापी आनंदाचे मळे फुलवील तो आत्मज्ञानाधिष्ठित आत्मज्ञानाभिमुख विविधमार्गी विविधलक्षणी असा स्वातंत्र्याने रसरसलेला सनातन विश्वधर्म विश्वकल्याणकारी ज्ञानसूर्य व भक्त सखा अशा तुला कृतज्ञ प्रणाम असो.

**८८३) सूर्यः । सूर्याय नमः ।**

अर्थ, विश्व आणि विश्वातील सर्व शक्तीचा उगम, तसेच याचा रूढार्थ सूर्यमालेमधील जीवनदायी असा सूर्य. तू विश्व, त्यातील शक्ती, अंतराळ, काळ, जाणीव इत्यादिंचा कालातीत उगम आहेस व सूर्य हे तुझेच (वरील गुणांकडे निर्देश करणारे) सगुण रूप आहे. थंड प्रदेशात सूर्य आणि अग्नी ह्यांना व्यावहारिक दृष्ट्याही अनन्यसाधारण महत्त्व असणे संयुक्तिक आहे. उपयुक्त देवता रूपाचे पुढे विश्वनियंताच्या आत्मरूपी ईश्वरामध्ये, तुझ्यामध्ये तुझ्या कृपेने उन्नयन झाले असे दिसते. आत्मरूपी तुला अखंड नमन असो.

**८८४) सविता । सवित्रे नमः ।**

सर्व अस्तित्वाचा जन्मदाता व सूर्याच्या द्वारे सृष्टीला जीवन देणारा. अगोदर म्हटल्याप्रमाणे, बर्फाळ, अति थंड प्रदेश, हिमयुग, अति पावसाचे प्रदेश वगैरे परिस्थितीत सूर्याचे महत्त्व असले तरी मूलतः तू अंत:सूर्यच आहेस. तुला मनोभावे अभिवादन असो.

**८८५) रविलोचनः । रविलोचनाय नमः ।**

चंद्र व सूर्य हे डोळे असलेला. या नावावरून, सविता, रवि या नावातून केवळ सूर्यमालेतील सूर्याकडे निर्देश केलेला नाही ह्याची अधिकच खात्री पटू शकेल. तू

विश्वव्यापी, विश्वात्मक, विश्वनियंता, विश्वनिर्माता व विश्वज्ञाता असा विश्वेश्वर आहेस. तुला भावपूर्ण वंदन असो.

अनन्तो हुतभुग्भोक्ता सुखदो नैकजोऽग्रजः ।

अनिर्विण्णः सदामर्षी लोकधिष्ठानमद्भुतः ॥

**८८६) अनन्तः । अनन्ताय नमः ।**

स्थळकाळातीत अजन्मा असल्याने अंत नसणारा, सर्व स्थित्यंतरे स्वतःमध्ये सामावणारा व स्वतः स्थित्यंतरातीत राहणारा असा तू आहेस. तुला भक्तिपूर्वक दंडवत असो.

**८८७) हुतभुक् । हुतभुजे नमः ।**

अर्पण केलेले स्वीकारून उपभोगणारा. प्रलयकाली अर्पण झालेले विश्व असो की यज्ञकाली अर्पण करण्यात आलेला हवि आणि पूजेच्या वेळी दाखविण्यात आलेला नैवेद्य असो की मानसपूजेत अर्पण केलेले अहंकारादी सर्वस्व, सर्व काही स्वीकारणारा व उपभोगणारा तूच आहेस. इथे महत्त्वाची दोन तात्पर्ये आहेत. एक म्हणजे सर्वस्व ईश्वरार्पण करणे म्हणजे परिणामतः देहबुद्धीने उत्पन्न होणारे पदार्थाचे आकर्षण व उपयुक्ततेचे विचार याबरोबरच सर्व भावना, वासना, विचार यांचे जोखड काढून फेकणे. दुसरे तात्पर्य असे की पूजा यज्ञरूपाची असो की मूर्तिरूपाची समर्पण भावना महत्त्वाची. समर्पण वृत्ती अधिक होते तशी सर्व जोखडातून मिळणारी मुक्ती आणि ईश्वराची प्रचीती संपूर्ण होते. वास्तविक हे सर्व करण्याची इच्छा देणाराही तूच असतोस. तुझ्याचरणी विनम्र प्रणिपात असोत.

**८८८) भोक्ता । भाक्त्रे नमः ।**

विश्वनिर्मिती, संगोपन, रक्षण आणि नियंत्रणाच्या लीलेचा मनसोक्त उपभोगच जणू काही घेणारा असा ईश्वर तू आहेस. नेहमीच्या जीवनात याचे महत्त्व असे की खरा भक्त कोणत्याही लहान मोठ्या प्रसंगाने डगमगत नाही. जीवनाचा उत्कट आस्वाद, उपभोग तो घेतो. भक्ताला भीती, असुरक्षितता, काळजी नसल्याने तो अन्य कुणालाही असहाय करील, थिजवून टाकील, थरारून सोडील अशा प्रकारच्या भयंकर परिस्थितीत उत्साहाने व आनंदाने रसरसलेला व जीवनाच्या मधुर रसाने डबडबलेला असतो. तो आनंदाचा महास्रोत असतो, जीवनशक्तीचा चालता बोलता झरा असतो. तुझ्या व तुझ्या भक्तांच्या चरणी शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**८८९) सुखदः । सुखदाय नमः ।**

सुख देणारा किंवा सुख नष्ट करणारा. कारण 'द' म्हणजे देणारा किंवा नष्ट करणारा. तू मोक्षसुख देणारा, तसेच अनेकानेक भौतिक सुखेही देणारा आहेस. परंतु पुष्कळदा क्षुल्लक व संकुचित आशा-आकांक्षांच्या पूर्तीने मिळणारी सुखे हिरावून घेणाराही आहेस. आरत्या, पूजापाठ, व्रत-वैकल्ये, तीर्थयात्रा, वगैरे सर्वकाही मूलतः नराचा नारायण होण्याची साधने आहेत. परंतु नराचा नारायण व इहलोकाचा स्वर्ग बनवण्याची ही प्रभावी साधने तमोगुणी लोकांच्या हाती क्षुद्र स्वार्थ साधण्याची अविश्वासार्ह साधने बनली आहेत, ही देखील तुझीच लीला आहे. अविद्येने ग्रस्त होऊन तुझ्या प्राप्तीचे मार्ग विसरलेल्या, लाचारपणे क्षुद्र बाबींसाठी नवस करणाऱ्या, बळी देणाऱ्या, इतर अनेक खुळ्या प्रथा व क्रूर परंपरा सांभाळणाऱ्या जीवांचा तारणहार तूच आहेस. त्यांच्या अंतर्यामी प्रगट होऊन आत्मप्रचीतीचा आनंदमय प्रकाश देऊन विश्वकल्याणाचे सुखमय वरदान देणाराही तूच आहेस. तुझ्या चरणी मस्तक निरंतरपणे राहो.

**८९०) नैकजः । नैकजाय नमः ।**

अनेकदा जन्मणारा. विश्वामध्ये प्रत्येक स्थित्यंतराचा गाभा असल्याने समाजामध्ये लोकोत्तर गुणांनी व असंकुचित, देहबुद्धिशून्य वृत्तीने पुनः पुन्हा जन्मणारा असल्याने आणि साधकाच्या मनात पुनः पुन्हा आत्मप्रचीतीच्या रूपाने प्रगटणारा असल्याने तुला नैकजः म्हणतात. तुला शतशः प्रणिपात असोत.

**८९१) अग्रजः । अग्रजाय नमः ।**

सर्वांअगोदर जन्मलेला. जन्ममृत्यूच्या अतीत असलेला तू विश्वातील यच्चयावत् सर्व पदार्थांपूर्वी होतास या अर्थाने तुला अग्रजः म्हटले आहे. कालातीत, स्थित्यंतरातीत व सर्वात जुना अशा तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**८९२) अनिर्विण्णः । अनिर्विण्णाय नमः ।**

कधीही वैफल्यग्रस्त न होणारा. अवैयक्तिक, तरल, कालातीत, नियंत्रक, स्थित्यंतरातीत, चैतन्यमय, ज्ञानी अस्तित्वाने असल्याने तुला कोणत्याही आशाआकांक्षा नसतात. त्यामुळे अपेक्षाभंग, वैफल्यही नसते. तद्रूप झालेला भक्त सत्यमय असतो. त्यामुळे कोणत्याही वैयक्तिक आशाआकांक्षा मनात न ठेवता व त्यामुळे कधीही वैफल्यग्रस्त न होता तो जगत असतो. तुझा खरा भक्त पुष्कळदा मोठ्या आर्तपणे तुझी करुणा भाकत असलेला असहाय झालेला दाखवतात. परंतु ही त्याची पूर्णांशाने आत्मप्रचीती येण्यापूर्वीची अवस्था असते. अशा वर्णनामध्ये दाखवलेल्या हतबलतेमुळे, भक्ताचे स्वरूप दयनीय पद्धतीत समोर येते. असा दयनीय झालेला भक्त

म्हणजे शांततेपूर्वीचे वादळ किंवा उष:कालापूर्वीची भयंकर रात्र. निस्वार्थी, विश्वकल्याणकारी असंकुचित अस्वस्थता. वास्तविक त्यांच्या विनवण्या दुबळेपणाची नव्हे तर सर्वोच्च वृत्ती व संस्कृतीची द्योतक असते. पुष्कळ भक्त काही देहबुद्धिजन्य विशिष्ट ठोकताळे मनात ठेवून तुझी भक्ती करतात. कधी व्यावहारिक प्रामाणिकपणातून यशाची अपेक्षा तर कधी नीतीने वागण्यातून संपत्तीची अपेक्षा त्यांच्या मनात असते. कधी स्वत:च्या साधनाचा अभिमान असतो. कधी अवैज्ञानिकतेने कर्तव्यच्यूतता असते तर कधी मोहजन्य असा हट्ट असतो. अगदी सत्वगुणी भक्तांचेही पुष्कळदा असे दोष असतात. पण भक्त परिपक्व झाला की आत्मप्रचीतीचे ताटवे फुलतात. चराचरातीत सत्यमयता येते. सत्यातील सामर्थ्याचा व सत्तेचा प्रत्यय येतो. साहजिकच व्यावहारिक सत्याची यशाशी सांगड घालण्याची गफलत होत नाही व देहबुद्धीजन्य अविद्येतून उत्पन्न होणाऱ्या मोहामुळे निर्माण होणारे आशा-निराशेचे दु:ख राहात नाही. सच्चिदानंदमय अशा तुला सविनय वंदन असो.

### ८९३) सदामर्षी । सदामर्षिणे नमः ।

क्षमाशील. तुझ्या एकनिष्ठ भक्तांना जी तुझी प्रचीती येते ती कधी स्वामी म्हणून तर कधी सखा म्हणून. कधी माऊली म्हणून तर कधी रक्षणकर्ता म्हणून. कधी पिता म्हणून तर कधी गुरु म्हणून. त्यामुळे त्याना तू नेहमीच क्षमाशील वाटतोस. याचे तात्विक कारण असे की कोणीही व्यक्ती कधीही ईश्वरापासून दूर जात नाही. जाऊ शकत नाही. ईश्वर (तू) कधीही कुणालाही अव्हेरत नाही. कारण ईश्वर सदा सर्वदा सर्वसमावेशक आणि स्थळ काळातीत असतो. कोणत्याही परिस्थितीत भक्ताला कधीही अंतर न देणाऱ्या अशा तुझी प्रचीती त्यामुळेच पराकोटीच्या क्षमाशील अशा स्वरूपात होते. तुझे भक्त वा प्रेषितही (येशू ख्रिस्ताची तथाकथित पापी स्त्रीच्या संदर्भातील कथा जगप्रसिद्ध व या संदर्भात बोलकी आहे. तसेच ते काय करतात ते त्याना कळत नाही त्याना क्षमा कर हे त्याचे उद्‌गारही महान सत्याचे उद्‌गार आहेत) क्षमाशील होत, याचे कारण ते विश्वात्मक अशा तुझ्याशी (आत्मरूपाशी) एकरूप होते, आहेत. अंगुलिमाल या खुनी गुन्हेगाराला प्रेमाने स्वीकारणाऱ्या बुद्धाच्या क्षमाशीलतेचे देखील हेच तथ्य आहे. सोवळे नष्ट होईल, जात बाटेल, धर्म बुडेल इत्यादी भाबड्या व प्रसंगी रानटी हिंस्रता धारण करणाऱ्या कल्पना म्हणजे अविद्या होय. ज्ञानेश्वरांच्या आईवडिलांना देहदंड ठोठावला जाण्याची घटना हे एक बोलके उदाहरण प्रत्येकाला मार्गदर्शक ठरणारे आहे. ह्या घटनेनंतरही ज्ञानियांचा राजा मात्र आत्मसाक्षात्कारी व विश्वात्मक असल्याने कुणावर सूड घेण्यासाठी धडपडला नाही. क्षमाशील अशा तुझ्या चरणी कृतज्ञ लोटांगण असो.

**८९४) लोकाधिष्ठानम् । लोकाधिष्ठानाय नमः ।**

जाणिवांच्या सर्व स्तरांचे नियंत्रक अधिष्ठान, पाया तू आहेस. सामाजिक व वैयक्तिक संदर्भामध्ये याचे महत्त्व असे की कोणताही वैयक्तिक स्वार्थ न ठेवता अहंकारशून्यतेने तुझ्या स्मरणात तुझी सेवा म्हणून जी कृती केली जाते (तुझ्या कृपेने), ती यशस्वी होते. तुझ्या अधिष्ठानामध्ये व तुझ्या स्मरणामध्ये माझे जीवन तुझ्या सेवेत व्यतीत होत होत तुझ्याच चरणी अर्पण असो.

**८९५) अद्भुतः । अद्भुताय नमः ।**

अद्भूत म्हणजे सर्वसामान्य ठोकताळे, बौद्धिक आकलन यात जे न बसणारे आहे, ते. तू सर्वतोपरी अद्भुत आहेस. तुझ्या प्रचीतीने देहबुद्धी गळून पडते, अहंकार झडून जातो. संकुचित व्यक्तित्व मरून पडते. तुझे असे भक्त मग अमृताचे सागर बनतात. दीपस्तंभ बनतात. चैतन्याचे मेरु बनतात. गुरु बनतात, शिष्य बनतात. संपूर्ण त्रिखंडात तुझ्या प्रचीतीचा चौघडा वाजू लागतो. ह्या साऱ्यांचा कर्ता असा तू सर्वच दृष्ट्या अद्भुत आहेस. तुला भक्तिपूर्वक वंदन असो.

सनात्सनातनतमः कपिलः कपिरव्ययः ।

स्वस्तिदः स्वस्तिकृत्स्वस्ति स्वस्तिभुक् स्वस्तिदक्षिण ।

**८९६) सनात् । सनात् नमः । तसेच सनात्ने नमः ।**

अनंतकाल राहणारा. कालातीत आणि सदासर्वदा स्थित्यंतरातीत अशा अस्तित्वाने तू अनादी अनंत आहेस. तुला शतशः प्रणाम असोत.

**८९७) सनातनतमः । सनातनतमाय नमः ।**

कालातीत व जाणिवेच्याही अतीत असा प्राचीनतम. क्षणभंगुर अस्तित्वाला विश्वासार्ह, विसंबण्यायोग्य पूर्ण सत्य समजून राहणे म्हणजे स्वतःच स्वतःची पूर्ण ओळख नाकारणे आहे. सनातनतम असा सर्वांतर्यामी वसणारा केवळ तूच, तुझ्या भक्तांना (त्यांच्या अनादी अनंत व अजरामर आत्मरूपाची) प्रचीती देऊ शकतोस व सर्व देहबुद्धिजन्य व अविद्याजन्य दुरवस्थेतून विश्वाला व मानवजातीला स्वधर्मसूर्याकडे व आत्मज्ञानप्राप्तीकडे नेऊ शकतोस. तुझ्याचरणी साष्टांग दंडवत असोत.

**८९८) कपिलः । कपिलाय नमः ।**

ज्ञानाग्नि व महर्षि कपिल. ज्ञानाग्नि आणि श्रेष्ठ दार्शनिक कपिल ही तुझीच रूपे. आत्मज्ञानदर्शी अशा तुला विनम्र अभिवादन असो.

**८९९) कपि: । कपये नम: ।**

स्वत:च्या ज्ञानकिरणांनी व्यक्तीतील संकुचित व्यक्तित्व नष्ट करणारा व त्यांचे ज्ञानमय अस्तित्व, (आत्मरूप, चैतन्य) स्वत:शी एकरूप करणारा तू आहेस. त्याचप्रमाणे **कपि:** म्हणजे वानर. तुझा अवतार राम. त्या रामाला सर्वतोपरी सहाय्य करणारा, आत्मज्ञानी हनुमान हे तुझे रूप आहे. तसेच **कपि:** म्हणजे वराह. पृथ्वीचा संरक्षक वराह हे रूपही तुझे असल्याने तुला **कपि:** म्हणतात. तुझ्याचरणी भक्तिपूर्वक लोटांगण असो.

**९००) अप्यय: । अप्ययाय नम: । तसेच अव्यय: । अव्ययाय नम: ।**

ज्यामध्ये विश्व विरून जाते असा. विश्व ज्यामध्ये विश्रांती घेते व पुन्हा ज्यापासून उद्‌भवते असा. काहींच्या मते अव्यय: हे नाव आहे. याचाही तात्विक अर्थ स्थित्यंतरातीतपणे विश्वाला सामावणारा व उत्पन्न करणारा. तुझे निष्ठावान भक्त तुझ्या कृपेने त्यांच्या सद्‌सद्‌विवेकपूर्ण जाणिवेच्या द्वारे तुझ्याशी थेट जोडलेले असल्याचे अनुभवतात. तुझ्या सत्तेची व सामर्थ्याच्या अतीत जातात. तत्स्वरूपात कधीही कमी न होणाऱ्या आत्मानंदात रममाण होतात. तुला व तद्रूप झालेल्या भक्त, योगी, द्रष्ट्या ऋषींना व प्रेषितांना शतश: दंडवत असोत.

**९०१) स्वस्तिद: । स्वस्तिदाय नम: ।**

मांगल्य व कल्याण प्रदान करणारा. तुझे स्मरण, तुझे पूजन, तुझे संकीर्तन, तुझे भजन, तुझ्या आठवणीत केलेली सर्व कामे यांनी जीवन कल्याणमय बनते. संपूर्ण विश्वात जर एकमेव अशी कल्याणकारी बाब असेल तर तुझ्या कृपेने प्राप्त होणारी तुझी भक्ती. तुझे ध्यान, तुझे चिंतन, तुझ्याबद्दलचे विचार, तुझ्या ग्रंथांचे अध्ययन, आणि ह्यातून उद्‌भवणारी व्यक्तीची कृती हे सारे केवळ तुझ्याच कृपेने प्राप्त वा शक्य होतात व ती भक्तिचीच दुसरी बाजू आहे, वेगळा आविष्कार आहे. उदात्त, मंगल, कल्याणमय, विश्वसंस्कृतीची पहाट तुझ्याच कृपेने होत आहे. तुला सर्वस्व समर्पित असो.

**९०२) स्वस्तिकृत् । स्वस्तिकृते नम:**

याचे दोन अर्थ आहेत. कल्याण करणारा व कल्याण शोषून घेणारा. कल्याणकारी या सापेक्ष कल्पनेत तुला पाहणे व चिंतिणे भ्रममूलक आहे. तू साक्षी असल्याने काहीही न करणारा आहेस. विशेषत: व्यक्तिसापेक्ष कल्याण तर मुळीच न करणारा आहेस. उलट तू भक्ताचे सर्वस्व, अगदी त्याची कल्याणाची कल्पना देखील शोषून घेतोस. त्यामुळे तुला कल्याण शोषून घेणारा, नाहीसे करणारा असे म्हणतात, ते योग्य आहे. त्याचप्रमाणे अन्य दृष्ट्या पाहिल्यास तुझी प्रचीती अविद्येने व क्षुद्र आशाआकांक्षानी ग्रासलेल्याना अतिशय भयानक व नकोशी वाटते, अमंगळ वाटते. म्हणूनही तुला कल्याण

शोषून घेणारा असे म्हणतात. भगवद्भक्तांचे, शास्त्रज्ञांचे, निस्वार्थी, असंकुचित, निस्पृह विचारवंताचे, प्रामाणिक कृतिशूरांचे तुझ्या कृपेने साकारणारे कार्य असह्य व काहींच्या दृष्टीने अमंगळ होते. त्या काहीनीच तुझ्या सेवकांचे छळ केले, हाल केले. आणखी एक प्रकारे पाहिल्यास तू स्वत: अविद्या व मायेचाही कर्ता असल्याने विश्वकल्याणाला होणाऱ्या कट्टर विरोधाचाही कर्ता तूच आहेस. अकल्याण करणारा आहेस असे म्हणतात. कारण भक्तांनी त्याची प्रत्यक्ष प्रचीती घेतलेली असते. भक्तांना तू केलेले सर्व कल्याणमय दिसते म्हणून ते तुला कल्याण करणारा म्हणतात. तेही योग्य आहे. विशेषत: तुझी प्रचीती हेच सर्वोच्च कल्याण असल्याने भक्तांनी तुला कल्याण करणारा म्हणणे साहजिकच आहे. कल्याण व अकल्याणाच्या अतीत असणाऱ्या तुझ्याचरणी मस्तक निरंतरपणे राहो.

**९०३) स्वस्ति । स्वस्तिने नम: ।**

कल्याण. भक्तांना जी तुझी प्रचीती येते ती प्रचीती, त्यांची भक्ती, त्यांची ती अमर अनुभूती म्हणजे तुझेच रूप आहे व तेच कल्याण होय. कल्याणस्वरूप अशा तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**९०४) स्वस्तिभुक् । स्वस्तिभुजने नम: ।**

स्वत: नेहमीच मंगलता अनुभवणारा. हा भक्तांचा अनुभव आहे. भक्त तद्रूप झाले की अखंड भरती असलेला मंगलतेचा महासागर अनुभवतात. त्यावेळी त्यांचे संकुचित व्यक्तित्व अस्तित्वातच (जाणिवेतच) नसल्याने, ते तुला हे सार्थ विशेषण लावतात. (वेगळ्या संदर्भात व शब्दश: अर्थ घेतल्यास (उदाहरणार्थ) पापी बाबींमध्ये मंगलता अनुभवणारा व पाप्यानाही सहाय्यक असे होते व म्हणून ते गैरलागू होते.) तसेच भक्तांना जे मंगल वाटते ते विश्वातले सर्व काही खऱ्या दृष्टीने निर्मिणारा व अनुभवणारा द्रष्टा, ज्ञाता व अनुभवणारा एकमेव तूच असल्यानेही तुला **स्वस्तिभुक्** म्हणतात. तुला सविनय वंदन असो.

**९०५) स्वस्तिदक्षिण: । स्वस्तिदक्षिणाय नम: ।**

कल्याण (भेट म्हणून) देणारा कर्तव्यतत्पर आणि कुशल. आत्मप्रचीतीची म्हणजेच सर्वोच्च कल्याणाची भेट देणारा तू आहेस. तुला नम्र अभिवादन असो.

**अरौद्र: कुण्डली चक्री विक्रम्यूर्जितशासन: ।**<br>**शब्दातिग: शब्दसह: शिशिर: शर्वरीकर: ॥**

**९०६) अरौद्र: । अरौद्राय नम: ।**

कधीही उद्विग्न, क्षोभित, असंतुष्ट, क्रोधित न होणारा. तु अवैयक्तिक, सर्वसमावेशक,

काळातीत, नियंत्रक, चराचरातीत असे अस्तित्त्व असल्याने तुझ्यामध्ये शरीरजन्य, देहबुद्धिजन्य वासना, आशा, आकांक्षा, आसक्ती नसते. त्यामुळे त्यांच्या अपूर्णतेतून येणारी अतृप्ती व खळबळ तुझ्यामध्ये नसते. तुझ्या भक्तांना तद्रुपतेच्या अनुभूतीमध्ये या बाबीचा प्रत्यय येतो म्हणून ते तुला **अरौद्रः** म्हणतात. तुझ्या भक्तांमध्येही तुझे हे परमवैशिष्ट्य प्रत्ययाला देऊ शकते. तुझ्या चरणी व तुझ्या प्रचीतीने पुनीत झालेल्या योग्यांच्या, भक्तांच्या व अवतारांच्या चरणी साष्टांग नमन असो.

**९०७) कुण्डली । कुण्डलिने नमः ।**

मकरकुण्डले, कर्णभूषणे, कुंडलिनी (नागीण). सगुण रूपात अत्यंत तेजस्वी कर्णभूषणे असलेला. तसेच सभोवती दिव्य वलय असलेला. वैयक्तिक संदर्भात कुंडलिनी (नागीण) शक्ती स्वरूप असलेला अन्य दृष्टीने पहाता (अनंत) शेषावर योगनिद्रेत पहुडलेला. व्यक्तीच्या शरीरातील कुंडलिनी रूपाने राहणारा, योगनिद्रेत पहुडलेला व दिव्य प्रकाश सभोवती असणारा ह्या वर्णनातून योगसिद्धीकडे निर्देश केलेला आहे. कर्णभूषणे घालणारा वगैरे सगुण रूपांचे वर्णन भक्तहृदयातून ईश्वरप्रेमामुळे व तुझ्या महानतेच्या प्रचीतीतून आलेले आहे. तुला मनोभावे वंदन असो.

**९०८) चक्री । चक्रिणे नमः ।**

चक्र धारण करणारा. या सगुण रूपातील तथ्य असे की तू शरीरांतर्यामीचा ईश्वर असून कुंडलिनी शक्तीच्या योगाने षट्चक्रभेदन होऊन सहस्रारचक्रात अनुभूती रूपाने राहतोस. सहस्रारचक्र धारण करून त्या द्वारे व्यक्तीला आत्मप्रचीतीचे 'सुदर्शन' देतोस. सहस्रारचक्रामध्ये कुंडलिनी जागृतीने शिवशक्तीच्या मीलनामुळे येणारी सर्वज्ञता व सामर्थ्यवानता सुदर्शन चक्राच्या द्वारे तुझ्या तेजस्वी सगुण रूपात दाखविली जाते. अन्य दृष्ट्या पाहिल्यास कालातीततेने सर्वज्ञ असा तू कालचक्राचा धारणकर्ता आहेस. कालचक्रातून सर्वज्ञान होते म्हणून कालचक्रच सुदर्शन चक्र आहे. तसेच त्याला कोणीही कधी छेदू शकत नाही भेदू शकत नाही, विरोधू शकत नाही त्यामुळे अति सामर्थ्यवान, अपराजित व परिणामकारक असे सुदर्शन चक्रच आहे. तुझ्या पायाशी लोटांगण असो.

**९०९) विक्रमी । विक्रमिणे नमः**

पांढरी मान असलेल्या गरुडावर बसून अंतराळात भ्रमण करणारा, निर्भय व पराक्रमी. गरुड म्हणजे जाणीव व गरुडाधिष्ठित विष्णू म्हणजे परमात्मा. कालातीत जाणिवेवर स्वार होऊन अंतराळ, काळाच्या पलिकडे सर्वत्र भ्रमण करणारा म्हणजेच सर्वव्यापी, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ परमात्मा. तुझ्या स्मरणात तुला विनम्र अभिवादन असो.

### ९१०) ऊर्जितशासनः । ऊर्जितशासनाय नमः ।

सर्वोच्च आणि पूर्णपणे नन्याय्य असे कायदे करणारा व अंमलात आणणारा. वैश्विक नियमांचा नियंता असा तू म्हणजे अवैयक्तिक चैतन्य आहेस. त्यामुळे कायदे करणे व अंमलात आणणे (त्यांचा परिणाम) दोन्हीही तू करतोस. तुझ्या प्रचीतीच्या कृपेनेच जगाला मार्गदर्शक अशी दर्शनशास्त्रे विकसित झाली व हजारो वर्षे आचारात राहिली. तुझ्याच कृपेने व तुझ्याच सर्वोच्च शासनाने आत्मप्रचीतीजन्य व आत्मप्रचीत्याभिमुख अशी नवी कल्याणमय वैश्विक संस्कृती व व्यवस्था प्रत्यक्षात येईल. तुला भक्तिपूर्वक प्रणाम असोत.

### ९११) शब्दातिगः । शब्दातिगाय नमः ।

शब्दातीत. शब्दांनी वर्णन करण्यास अशक्य. परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चारही वाणींच्या अतीत असा तू आहेस. या वाणी म्हणजे व्यक्तीचे मर्यादित अस्तित्व आणि संपूर्ण अंतर्बाह्य अशा चराचराचे अस्तित्व (तू) यामधील दुवे आहेत. परंतु या चारही दुव्यांनी मिळणारी अनुभूती तुझे खरे स्वरूप जाणत नाही. त्याचमुळे ह्या वाणीतून निघणारे शब्द तुझे वर्णन करू शकत नाहीत. तुझ्या कृपेने, तुझी प्रचीती आणि अनुभूती मिळते पण तुझे व्यावहारिक वर्णन करण्यासाठी व्यक्तित्वच शिल्लक उरत नाही. त्यामुळे तुझे वर्णन अशक्य होते. वेदकर्ते ऋषी व महर्षी तुझ्या कृपेमुळे पूर्ण तद्रूप होऊनही त्यांचे भान सांभाळून अतिशय कुशाग्र बुद्धीने तुझे वर्णन करू शकले. परंतु त्या शब्दातून तुझ्या प्रचीतीचा मार्ग खुला होत असला, मनाला तुझे ओझरते दर्शन होत असले व तुझ्या प्रसन्न अस्तित्वाची चुटपुटती कल्पना मिळत असली तरी तुझे संपूर्ण वर्णन कुठेही मिळत नाही. स्वत:च्या प्रचीतीने तू भक्ताला अशा उंचीवर नेतोस की तेथे दुसरा कुणी (तुझ्या इच्छेशिवाय) चढू शकत नाही, आणि तुझा भक्त खाली उतरू शकत नाही. परंतु तुझ्याच कृपेने मग भक्तहृदयातून परास्पर्शी शब्दांचे व सद्‌गुरुकृपेचे अमृत स्रवते आणि तुझ्याकडे पोचण्याचे सोपन तयार होता. सद्‌गुरूच्या रूपाने तूच मग या सोपानांवरून सद्‌भक्ताना स्वत:कडे नेतोस. शब्दातीत अशा तुला साष्टांग दंडवत असोत.

### ९१२) शब्दसहः । शब्दसहाय नमः

तुझ्या कृपेने संकुचित अस्तित्व नष्ट झाले की तुझे ज्ञान होते व हळुहळु या ज्ञानाला शब्दात पकडण्याची न संपणारी धडपड सुरू होते. ही सर्व प्रक्रिया अत्यंत निस्वार्थ आणि उदात्त असते. या प्रक्रियेतूनच वेदनिर्मिती झाली. सत्याकडे नेणारे महान ग्रंथ तयार झाले. वेद आणि सत्याकडे नेणारे हे शब्दब्रह्माचे आविष्कार, सत्य शब्दातीत असल्याचे मान्य करतात आणि तरीही उत्कटतेने सत्याचे (तुझे) वर्णन करतात. याचे

साधे कारण असे की तुझ्या कृपेने, विविध तर्क अनुमानांच्या शिड्यांनी शब्दांच्या सहाय्याने, (अथवा कृतीच्या मदतीने, व समर्पणाने देखील जरी तुला पूर्णपणे जाणता आले नाही तरी) तुझ्यापर्यंत पोचता येते. तुला शतशः प्रणिपात असोत.

**९१३ शिशिरः । शिशिराय नमः ।**

थंड ऋतू. तू विश्वात्मक असल्याने शिशिर ऋतू हे तुझेच एक रूप आहे. वैयक्तिक संदर्भात पाहिल्यास संसार-तापाने होरपळणाऱ्यांसाठी तू थंड ऋतू आहेस असाही एक अर्थ निघतो. तुला विनम्र वंदन असो.

**९१४) शर्वरीकरः । शर्वरीकराय नमः ।**

शर्वरी म्हणजे बृहस्पतीनी वर्णन केलेल्या आठ दुष्काळी संवत्सरांपैकी एक संवत्सर. दुसरा अर्थ अंधार. रूढार्थाने, अन्नधान्याचा अभाव व प्रकाशाचा अभाव करणाराही तूच आहेस. याचा संकेत असा की सर्व देणारा अशा विशिष्ट गुणवैशिष्ट्यांमध्ये तुला कोंबण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे. वैयक्तिक पातळीवर पाहता कोणत्याही अविद्याजन्य असंख्य सुख-दु:खादी घडामोडीचा अभाव असलेली व दृश्य प्रकाशही नसलेली केवळ अंत:प्रकाशी अवस्था म्हणजे शर्वरी उत्पन्न करणारा तू आहेस. तुझ्या चरणावर विनम्र लोटांगण असो.

**अक्रूरः पेशलो दक्षो दक्षिणः क्षमिणां वरः ।**
**विद्वत्तमो वीभयः पुण्यश्रवणकीर्तनः ॥**

**९१५) अक्रूरः । अक्रूराय नमः ।**

कंसाच्या नोकरीत असलेला भगद्वभक्त अक्रूर. अन्य अर्थ क्रूर नसणारा. सर्व गुणवैशिष्ट्ये गुणातीत अशा ईश्वरापासून (तुझ्यापासून) उगम पावली आहेत. म्हणून अक्रूर हा श्रेष्ठ भगवद्भक्त म्हणजेही तुझेच रूप असल्याचे **अक्रूरः** नावातून प्रत्ययास येते. अन्य अर्थानुसार स्थळकाळातीत सर्वव्यापी असल्याने तुला कोणीही कधीही क्षोभित करू शकत नाही, तू कधीही क्रोधित होत नाहीस, क्रूर होत नाहीस. तुला मन:पूर्वक अभिवादन असो.

**९१६) पेशलः । पेशलाय नमः ।**

अत्यंत मृदू. मृदू याचा अर्थ कठीणता नसणारा. विरोध किंवा अडथळा न करणारा. घट्ट नसणारा. मनाई, प्रत्यवाय न करणारा. अवरोध न करणारा, न अडवणारा. तू अवैयक्तिक, स्थित्यंतररहित, स्थळातीत, अवकाशातीत, कालातीत, नियंत्रक, सर्वसमावेशक, जडचैतन्यातीत, तरल अस्तित्व असल्याने तू सदासर्वदा मृदूच आहेस.

याशिवाय तुझी प्रचीती संपूर्ण अस्तित्वावर साक्षात् मृदुतेची पाखर घालणारी व भक्तालाही मृदू बनवणारी असल्यानेही तुला **पेशलः** (मृदू) म्हणतात. आणखी एका दृष्टीने पाहता, दुबळे व अविद्याग्रस्त लोकच कठोर, कर्कश, हिंस्र असतात. परंतु सर्वसमावेशक, सर्वशक्तिमान आणि अजरामर असल्याने आणि कोणतीही असुरक्षितता नसल्यामुळे तू पराकोटीचा मृदू आहेस हे भक्ताना जाणवते व भक्तही तुझ्यासारखेच मृदू बनतात. तुला भक्तीपूर्व वंदन असो.

**९१७) दक्षः । दक्षाय नमः ।**

सावध, तत्पर, जागृत. जाणिवेच्या संदर्भात विचार करता ज्या व्यक्तीचे लक्ष संवेदना, विचार, भावना, वासना, पूर्वग्रह, समजुती यानी भरलेले असते त्या व्यक्तीचे लक्ष, एकाग्रता, तत्परता, ग्रहणशक्ती, रसिकता हे सारे कमी होते. तू अशरीरी द्रष्टा असल्याने तुझे अस्तित्व निरंतर जागृत व तत्पर असते. तुझे भक्तही तद्रूप झाल्याने असेच सावध असतात. योगामध्ये सर्व संवेदनांपासून मन खेचून घेणाऱ्या योग्यालाही वैयक्तिक जाणिवांचे अस्तित्वच न उरल्याने तो देखील तुझ्याप्रमाणे निरंतर सावध असतो. तुझ्या प्रचीतीची, संकुचिततेच्या नाशाची, योगातील साधनेची महती व तुझ्या दक्षतेतील मर्म व महत्त्व अगाध आहेत. तुला आदरभावपूर्वक प्रणिपात असोत.

**९१८) दक्षिणः । दक्षिणाय नमः ।**

सरळ मनाचा, कुशल, चतुर, समर्थ, स्नेह वा सख्य करण्यास योग्य असा. दक्षिण व दाक्षिण्य यात कोणतीच कमतरता नसलेला. अशरीरी असा तू जसा आहेस तसाच आहेस. तुझे नियम आहेत त्यानुसार सर्व काही अत्यंत कुशलतेने,निःस्वार्थपणे, समभावनेने, तू करून घेतोस. अंतर्बाह्य सारे व्यापणारा असल्यामुळे तू सर्वशक्तिमान आहेस. तसेच कालातीत असल्याने व व्यक्तीच्या अंतरंगात आत्मरूपाने वसत असल्याने सख्य करण्यास अत्यंत सुयोग्य व आत्मप्रचीती महान दक्षिणा देणारा असाही तू आहेस. तूच तुझ्या विश्वकल्याणाच्या संकल्पामध्ये भक्तांना समरस करतोस व अत्यंत श्रेष्ठतम समाधान देखील देतोस हे तुझे लोकोत्तर चातुर्य आहे. तुझ्या भक्तांमध्येही हे गुण विपुल प्रमाणात आढळतात. तुला व तुझ्या भक्तांना नम्र वंदन असो.

**९१९) क्षमिणां वरः । क्षमिणां वराय नमः ।**

क्षमाशीलांमध्ये सर्वश्रेष्ठ असा तू क्षमाशीलांच्या क्षमाशीलतेचा कारक, क्षमाशीलांचा नियंता, क्षमाशीलांना पूज्य असा ईश्वर आहेस. तुझ्या अनुभूतीमध्ये भक्तांना क्षमा मिळते म्हणूनही ते तुला **क्षमिणां वरः** म्हणतात. जो अजरामरत्व अनुभवतो तो तुझा भक्त, महात्मा, योगी किंवा प्रेषित देखील तुझ्याप्रमाणेच क्षमाशील होतो. जो सामर्थ्य

व सुरक्षितता अनुभवत नाही असा अविद्येने ग्रस्त जीव स्वत:च्या दुबळेपणाची प्रतिक्रिया म्हणून खुनशी, सूडबुद्धीने युक्त, हिंस्र व क्रूर बनतो. तुझ्या क्षमाशीलतेच्या प्रसन्न चिंतनामध्ये माझे मस्तक निरंतर तुझ्या चरणावर राहो.

**९२०) विद्वत्तमः । विद्वत्तमाय नमः ।**

सर्वश्रेष्ठ विद्वान. ज्ञान्यांचा ईश्वर, स्वामी. ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान एकत्रितपणे ज्याच्या ठायी आहेत. सर्व ज्ञान्यांचा कर्ता व नियंता असा जो आहे व खराखुरा एकमेव ज्ञानी असा जो आहे त्या सर्वांतर्बाह्य सर्व काही जाणणाऱ्या तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**९२१) वीतभयः । वीतभया नमः**

भीती नसलेला. भीतीचे मुख्य कारण चिंता. चिंतेचे कारण दु:ख. दु:खाचे कारण शारीरिक किंवा मानसिक वेदना. वेदनांचे कारण जखमा, व्याधी. यातील क्रम उलट सुलट होऊ शकतात व एकाच वेळी एकापेक्षा अनेक भावनाही असू शकतात. पण सर्वात जास्त भीती जर कशाची असेल तर ती मृत्यूची. मृत्यूच्या कल्पनेनेच शारीरिक व मानसिक वेदना होतात व माणूस भयभीत होतो. अशरीरी, सर्वसमावेशक अजरामर, शाश्वत, स्थित्यंतरातीत आणि कालातीत अशा तुझ्या अस्तित्वामध्ये भीतीचा लवलेशही संभवत नाही. भीती जाणिवांच्या अभावाच्या (जसे विस्मरण, वेड, बेशुद्धी, अज्ञान इत्यादी) कल्पनेने, आशा-आकांक्षाच्या अपूर्ततेच्या (जसे पैसा-अडका, बढती, जमीनजुमला, सत्ता,घरदार वगैरे गमावण्याच्या) कल्पनेने, जननिंदेच्या (संकुचित स्वत्वाला ठेच पोचण्याच्या) कल्पनेने, वगैरे अनेक कारणांनी निर्माण होते. संकुचित भावनांची इमारत ढासळण्याच्या (निकटच्या व्यक्तीच्या मृत्यूचा विचार, शक्यता वगैरे) विचारानेही भीती निर्माण होते. परंतु सर्व प्रकारच्या भीतीचे खरे मूळ देहबुद्धीत आहे, अविद्येत आहे. स्वत:च्या अंशाला संपूर्ण समजण्यात व स्वत:च्या क्षणभंगूर हिश्श्याला अमर समजण्यात आहे. देहबुद्धी व अविद्या तुझ्या स्वरूपी संभवू शकत नाहीत. उद्भवूच शकत नाहीत. म्हणून तू भयशून्य, भयातीत आहेस. तुझे भक्त तुझ्या प्रचीतीमुळे असे निर्भय असतात. योगी, ऋषी, भक्त त्याच्या या महान प्रचीतीमुळेच घनघोर अरण्यातून निर्भयपणे वावरतात व महात्मे याच कारणाने कळिकाळालाही न घाबरता सत्याचा उद्घोष करतात. तुला निरंतर नमन असो.

**९२२) पुण्यश्रवणकीर्तनः । पुण्यश्रवणकीर्तनाय नमः ।**

ज्याच्या विषयीचं कीर्तन व श्रवण, मोक्षदायी असतं असा. तसेच जो पुण्यरूप मोक्षदायी श्रवणरूप आहे व मोक्षदायी कीर्तनरूपही आहे असा. तुला भक्तिपूर्वक प्रणाम असोत.

**उत्तारणो दुष्कृतिहा पुण्यो दुःस्वप्ननाशनः ।**
**वीरहा रक्षणः सन्तो जीवनः पर्यवस्थितः ॥**

### ९२३) उत्तारणः । उत्तारणाय नमः ।

तारणहार. अविद्या व देहबुद्धीमुळे संसारतापत्रयरूपी समुद्रात बुडणाऱ्यांना आत्मज्ञान देऊन वाचवणारा तारणहार तू आहेस. मनाचा संयम, निष्काम सत्कर्म, समर्पण वृत्तीपूर्ण भक्ती, मनन-चिंतन-निदिध्यास-अभ्यास-ज्ञान इत्यादी मार्गांनी व्यक्तीला आत्मरूपी स्थिर करणारा तूच आहेस. ब्रह्मज्ञानाचे अनेक मार्ग उपलब्ध करून देणाऱ्या महान् विभूती म्हणजे तुझेच अविष्कार आहेत. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आणि विविध अनाकलनीय पद्धतीनी विविध प्रकारे अनुभव देऊन भक्तांना आत्मज्ञानाचा रस्ता दाखवणारा तूच आहेस. तुझ्या चरणी कृतज्ञ दंडवत असोत.

### ९२४) दुष्कृतिहा । दुष्कृतिघ्ने नमः ।

स्वस्वरूपाचा विसर म्हणजे तुझा विसर, हेच सर्वात मोठे पाप होय. हे पापच विश्वातील सर्व दुष्कृत्यांची जननी आहे. अविद्येने ग्रस्त आणि आत्मस्वरूपाचा विसर पडलेल्यांना आत्मप्रचीती देऊन त्यांच्या अविद्येचा व पापाचा नाश करणारा तू आहेस. सामाजिक संदर्भात, आत्मज्ञानापासून दूर नेणारे सर्व काहीं प्रभावहीन करून विश्वकल्याणकारी संतुलन घडवून आणणारा तू आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

### ९२५) पुण्यः । पुण्याय नमः

पवित्र, कल्याणमय, पुण्यकर्ता, पुण्य व पुण्यकार्याने प्राप्त होणारा असे सर्व तूच आहेस. तुझे नामस्मरण व तुझ्या नामाचे प्रेम यामध्ये राहून तुझ्याचरणी विनम्र अभिवादन असो.

### ९२६) दुःस्वप्ननाशनः । दुःस्वप्ननाशनाय नमः ।

वाईट स्वप्ने नष्ट करणारा. देहबुद्धी व अविद्या-मायेमुळे उत्पन्न होणाऱ्या वासना, आशा, आकांक्षा, निराशा, वैफल्य, दुःख, भीती निर्माण होऊन केवळ जागेपणीचे विचार व कृतीचे नव्हे तर झोपेतील व स्वप्नातील विचार व अनुभव बिघडतात. हीच दुःस्वप्ने होय. आत्मज्ञानाच्या योगे अविद्या व तज्जन्य दुःस्वप्नांचा नाश करणाऱ्या तुझ्याचरणी आदरपूर्वक लोटांगण असो.

### ९२७) वीरहा । वीरघ्ने नमः ।

वीर म्हणजे अनेक प्रकारे कार्य करणारा(री) माया. माया सर्वतोपरी बलवान असते. जन्म, देहबुद्धी, अविद्या, मोह, संभ्रम व शेवटी मृत्यू अशा अनेक प्रकारे आविष्कृत

होऊन जन्म-मृत्यूच्या फेऱ्यामध्ये सर्वांना ती गुंतवते. आत्मज्ञानमार्गातील या महाबली मायेचा नाश करून भक्तांना आत्मस्वरूपी ज्ञानमय व काळातीत अस्तित्वात व जाणिवेत स्थिर करणारा तूच आहेस. तुझ्याचरणी साष्टांग प्रणिपात असोत.

**९२८) रक्षणः । रक्षणाय नमः ।**

विश्वाचे रक्षण करणारा. साऱ्या विश्वाचे, समाजाचे आणि व्यक्तीचे अविद्यारूपी गर्तेपासून रक्षण करणारा केवळ तू आहेस हा भक्तांचा अनुभव आहे. कालातीत व शाश्वत अस्तित्वाने तूच भक्तांनाही तुझे सामर्थ्य व अमरत्व (जाणीव व प्रत्यक्ष अस्तित्व ह्या दोन्ही अंगानी युक्त असे) प्रदान करतोस व त्यांचे सदासर्वदा रक्षण करतोस. तुला निरंतर वंदन असो.

**९२९) सन्तः । सद्भ्यो नमः । सन्ताय नमः**

तद्रूप झालेले योगी, भक्त, ब्रह्मर्षी, प्रेषित, महात्मे, महापुरुष म्हणजे सन्त. तू स्वतः सन्तांशी अतूटतेने एकरूप असतोस. सन्तसंगाचे हे तात्पर्य महान आहे. तुझ्याचरणी विनम्र नमन असो.

**९३०) जीवनः । जीवनाय नमः ।**

सर्वांतर्यामीचे जीवनतत्त्व. तू जीवनाचे मूळ आहेस. उगम आहेस. जीव, निर्जीव दृश्यादृश्य, चराचर आणि जड-चैतन्याला, एकात्मतेने, जीवनातीत असे (जीवनाचे कारक असे) जीवन देणारा तू आहेस. चंद्र-सूर्याच्या सगुण रूपात तू सृष्टीला जीवनरस देतोस म्हणून पूजतात त्यामागील तत्त्व हेच आहे. तुला सादर प्रणाम असोत.

**९३१) पर्यवस्थितः । पर्यवस्थिताय नमः ।**

सर्वव्यापी, स्थळ, काळ सर्व काही व्यापणारा. असा तू असून तुझ्या सतत स्मरणाने, चिंतनाने व भक्तीने विशालता, उदारता व अमरत्वाची (संकुचित व क्षणभंगुर अस्तित्व नाहीसे होऊन) प्राप्ती होते. तुला विनम्र अभिवादन असो.

**अनन्तरूपोऽनन्तश्रीर्जितमन्युर्भयापहः ।**
**चतुरस्रो गभीरात्मा विदिशो व्यादिशो दिशः ।**

**९३२) अनन्तरूपः । अनन्तरूपाय नमः ।**

अमर्याद अंतरहित असा. तू जळी स्थळी काष्ठी पाषाणी सर्वत्र आहेस. कालातीत आहेस. एवढेच नव्हे, जाणिवांच्या कोणत्याही पातळीवरून कितीही शोध घेतला तरी ज्याचा अंत, परीघ, शेवट सापडत नाही असा असल्याने तुला अत्यंत सार्थपणे **अनन्तरूपः** म्हणतात. तुला निरंतर वंदन असो.

### ९३३) अनन्तश्रीः । अनंतश्रिये नमः ।

(अनन्त) शेषनाग व लक्ष्मी समीप असलेला. असंख्य प्रकारचे ऐश्वर्य (लक्ष्मी = श्री) ज्याच्यापाशी आहे असा. योगशास्त्राच्या दृष्टिकोनातून वैयक्तिक संदर्भात पाहता, कुंडलिनी (नाग) चा स्वामी व देहबुद्धीजन्य अविद्येच्या समुद्रातून संवेदना, प्रतिक्रियांच्या मंथनाद्वारे प्राप्त होणाऱ्या आत्मप्रचीतीचा कर्ता व आत्मप्रचीतीरूप व आत्मप्रचीतीजन्य ऐश्वर्याचा खरा भोक्ता तू आहेस. अन्य दृष्ट्या पाहता कल्पांतीच्या स्थित्यंतररहित अवस्थेत कालातीततेने असणारा सृष्टीचा आधार (शेषनाग) व ऐश्वर्याची स्वामिनी (श्री) याना स्वामित्वाने जवळ बाळगणारा विश्वाचा स्वामी तू आहेस. तुला साष्टांग प्रणिपात असोत.

### ९३४) जितमन्युः । जितमन्यवे नमः ।

राग, क्रोध, जिंकलेला. तुझ्या अशरीरी अस्तित्वात आणि कृष्णावतारासारख्या सगुण रूपात रागाचा लवलेश नसतो. कारण तू सदासर्वदा पूर्ण, सर्वज्ञ, अजरामर व सर्वसामर्थ्यवान आहेस. त्यामुळे तुला कधीही भीती नाही. व राग नाही. स्थितप्रज्ञतेचा महान उपदेश व आदर्श घालून देणाऱ्या तुला पुनः पुन्हा दंडवत असोत.

### ९३५) भयापहः । भयापहाय नमः

भय नष्ट करणारा. तूच भक्तांना सर्वसामर्थ्यवान, सर्वज्ञ, सर्वसमावेशक व अमर अशा त्यांच्या आत्मरूपाची (तुझी) प्रचीती देतोस व त्यांचे भय नष्ट करतोस. तुला विनम्र अभिवादन असो.

### ९३६) चतुरस्रः । चमतुरस्राय नमः ।

अवैयक्तिक, अशरीरी, सर्वज्ञ, नियंत्रक, सर्वसमावेशक, सामर्थ्यसंपन्न अस्तित्वाने अचूक विश्वनियम बनविणारा व अंमलात आणणारा तू आहेस. विश्वातील प्रत्येक क्रिया ही संबंधित पूर्वक्रियेनुसार जेव्हा घडते तेव्हा त्या प्रक्रियेला कार्यकारण भाव म्हणतात किंवा कर्मफल सिद्धान्त म्हणतात. सजीव असो अगर निर्जीव पूर्वक्रियेनुसार सुयोग्य परिणाम किंवा फळ मिळणे हा नयाय होय व असा न्याय तूच देतो. म्हणून तुला समदृष्टी व न्यायी म्हणतात. समाजाच्या संदर्भांत विचार केल्यास समाजाची व्यवस्था अशा तऱ्हेने लावणारा की त्यातून सर्वांना न्याय मिळावा. कालचक्राचा विचार करता तू हे अत्यंत कुशलतेने करतोस. कालानुसार समर्पक तऱ्हेने करतोस. योग्यवेळी नव्या युगाची नवी चाहूलही देणाऱ्या तुला सादर प्रणाम असोत.

### ९३७) गभीरात्मा । गभीरात्मने नमः ।

गहन, खोल, प्रगल्भ, गंभीर असा आत्मा. अविद्या-मायेच्या डोहामध्ये जाणीव बुडाल्याने आणि तू जाणिवेच्याही पलिकडे अधिक खोलवर असल्याने तू गहन आहेस. कोणतेही क्षुद्र व देहबुद्धीजन्य चाळे तुझ्या ज्ञानापर्यंत पोचत नाहीत म्हणून तू गंभीर आहेस. हृदयांतर्यामी कूटस्थ असल्याने तू अतिशय खोल आहेस. सर्वांतर्यामी व म्हणून सर्वज्ञ असल्याने तू प्रगल्भ आहेस. तुझे भक्त असेच अनाकलनीय असतात. तुला शतशः प्रणिपात असोत.

### ९३८) विदिशः । विदिशाय नमः ।

काहीही कमतरता नसलेला पूर्ण आणि असामान्य दाता. संपूर्ण विश्वाचा, गणित, पदार्थ विज्ञान, जीवशास्त्र व अन्य भौतिक शास्त्रांच्या सहाय्याने परिश्रमपूर्वक शोध घेऊन (जे तुझ्या कृपेमुळे घडते) त्या अंतर्गत सापडणारी निरीक्षणे व आडाखे यांच्या अतीत जे पूर्णत्वाने व अनंतत्वाने राहाते ते तू आहेस. मानसशास्त्राला जे कळत नाही ते तू आहेस. तू पूर्ण आहेस. तसेच पूर्णत्वाने व कालातीततेने असल्याने सर्वोच्च अशा आत्मप्रचीतीचे दान देणारा एकमेवाद्वितीय दाता तू आहेस. तुला विनम्र वंदन असो.

### ९३९) व्यादिशः । व्यादिशाय नमः ।

सत्ताधाऱ्यांच्या सत्तेचा सर्वशक्तिमान कारक व नियंता, असामान्य सत्ताधारी. सत्ताधाऱ्यांचा सत्ताधारी, स्वामी व ईश्वर तू आहेस. अस्तित्वाच्या सर्व पातळ्यांवर तुझीच सत्ता आहे. देव-देवता (विविध पातळ्यांवरील अस्तित्वे जी व्यक्तीच्या जाणिवेच्या एकाद्या स्तराशी निगडित होऊ शकतात) तुझ्याच सत्तेमध्ये आहेत. तुझ्याच सत्तेने, अज्ञानी ज्ञानी बनतातच पण विद्वान पंडित देखील संकुचित देहबुद्धी, अविद्या अहंकार इ. पूर्णपणे ईश्वरार्पण करून अचेतन, असमर्थ व बंधनकारक ज्ञानातून व अपुरेपणातून मुक्त होता. तत्स्वरूपाची प्रचीती घेतात. ज्ञान व सामर्थ्य देणाऱ्या सर्वसत्ताधीश अशा तुला साष्टांग नमस्कार असोत.

### ९४०) दिशः । दिशाय नमः ।

योग्य मार्ग दाखवणारा. अंध ज्याप्रमाणे अंधाला मार्ग दाखवू शकत नाही त्याचप्रमाणे एक देहबुद्धीने व अविद्येने ग्रासलेला दुसऱ्या देहबुद्धीने व अविद्याग्रस्त व्यक्तीला मार्ग दाखवू शकत नाही. संपूर्ण विश्वामध्ये संपूर्णपणे ज्ञानी केवळ तूच आहेस. तू गुरूंचा गुरु आहेस, विश्वगुरु आहेस. आत्मज्ञानाचे लिखित मार्गच नव्हे तर इतर गुरु-शिष्य परंपरेने आलेले व वेळोवेळी तुझ्या साक्षात्कारी कृपेतून प्रगट झालेले इतर मार्ग (लौकिक दृष्ट्या चमत्कार) यांचा कर्ता व नियंता तूच आहेस. विश्वातील सर्व धर्म-संप्रदायांच्या,

सर्व वंशांच्या सर्व वयाच्या स्त्री-पुरुषांना हे मार्ग तुझ्या कृपेने उपलब्ध झाले आहेत. सद्‌गुरूंचाही सद्‌गुरू अशा तुला निरंतर प्रणाम राहोत.

**अनादिर्भुर्भुवो लक्ष्मीः सुवीरो रुचिरांगदः ।**
**जननो जनजन्मादिर्भीमो भीमपराक्रमः ।**

**९४१) अनादिः । अनादिने नमः । अनादये नमः ।**

सुरुवात, आरंभ नसलेला. विश्वाचे नियंत्रक बीजरूप असा तू निर्मिला गेलेला नाहीस म्हणून तुला आरंभ नाही. स्थित्यंतरातीत आहेस व आरंभ व शेवट तुझ्याच आधाराने आहेत. त्यामुळेही तुला आदि नाही. विश्वाचेही (आरंभ शेवटासह) सर्व काही तुझ्यातून उगम पावते याचा मथितार्थ तू रूढ अर्थाने 'निर्माता' नाहीस असा आहे. मूळ बीजरूपातील विश्व, तुझ्या नियंत्रणाद्वारे, बीजरूपी तुझ्यात बदल न होता, दृश्यादृश्य प्रक्रियांतून उलगडत जाते. तुला विनम्र नमस्कार असोत.

**९४२) भूर्भुवः । भूर्भुवाय नमः ।**

संपूर्ण चराचर विश्वाचा आधार. पृथ्वी, अंतराळ, काळ, काळातीत जाणीव, इत्यादी अस्तित्वाच्या सर्व क्षेत्रात, घटनात अंतर्बाह्य सर्व काही व्यापून राहिलेला मूलाधार व चिरंतन शाश्वत आधार तू आहेस. संकुचित व्यक्तित्वशून्य जाणिवेच्या माध्यमातून (स्वकृपेने) प्रचीतीस येणाऱ्या विश्वनियंता व आत्मरूप अशा तुला साष्टांग प्रणिपात असोत.

**९४३) लक्ष्मीः । लक्ष्म्यै नमः ।**

ऐश्वर्य. विश्वातील सर्व स्तरांवरील अप्रतीम सौंदर्य, तेज, माधुर्य, परमोच्च भावना हे सारं काही महान ऐश्वर्य म्हणजेच लक्ष्मी. लक्ष्मीरूपही तूच असल्याने तुला लक्ष्मीः म्हणतात. (चंचल मायेचा कर्ता, आधार व मायारूपी देखील अचल साक्षी असा तूच आहेस). वैयक्तिक पातळीवर व्यक्तीचे अत्युत्कृष्ट जीवन मूलतः तूच आहेस आणि तुझ्या प्रचीतीविना ते पूर्णपणे निरर्थक कःकिंमत आहे. तुला शतशः दंडवत असोत.

**९४४) सुवीरः । सुवीराय नमः ।**

सर्वोत्कृष्ट विजयी महाबली. विश्वाच्या रमणीय घडामोडींमध्ये सर्वोच्च नियंत्रक भूमिकेतून सर्वोत्तम अविष्कार साधणारा महाप्रतापी वीर तू आहेस. सामाजिक पातळीवर विविध प्रकृति गुणधर्मानुसार कधी राजर्षी, कधी ब्रह्मर्षी, कधी महाकवी, कधी योगीराज तर कधी भक्तराज, अशा उत्तमोत्तम आविष्कारात प्रगट होणारा तूच आहेस. समाजकल्याणाच्या ह्या खंद्या निर्भय लोकोत्तर वीरांचा स्वामी सर्वोत्तम महाबली,

महावीर तू आहेस. वैयक्तिक पातळीवर जीवनाची सर्वोच्च पातळी गाठणाऱ्या आत्मप्रचीतीच्या यशस्वी मोहिमेतील वीरांचा कुशल सेनानायक, महायोद्धा तूं आहेस. तुला साष्टांग नमस्कार असोत.

**९४५) रुचिरांगदः । रुचिरांगदाय नमः ।**

खांदे व बाहूंना संरक्षण देणारी उत्तम बाहुभूषणे वापरणारा. सगुण रूपामध्ये नयनमनोहर व संरक्षक आभूषणे घालणारा. याचा मथितार्थ, कुशल योद्ध्याप्रमाणे सर्व वैश्विक घडामोडी घडवून आणणारा व आत्मज्ञानाची विजयी पताका उंच फडकत ठेवणारा. अन्य दृष्टीने, उत्तम बाहुभूषणे म्हणजे धर्माला आधार देण्याची क्रिया व उत्कृष्ट दान देण्याची क्रिया. तू आत्मज्ञानाची प्रचीती देऊन एकसमयावच्छेदेकरून धर्माला आधार व संरक्षण देतोस. धर्माचे संगोपन करतोस उत्तम दानही देतोस. तुला विनम्र प्रणाम असोत.

**९४६) जननः । जननाय नमः ।**

जन्म देणारा. विश्वाला व सजीव सृष्टीला जन्म देणारा. तू सजीवांना आत्मज्ञान व आत्मसाक्षात्काराने अजरामर अस्तित्वाचा जन्म देणाराही आहेस. स्वतःच्या मायरूपी गर्भाशयातून जन्म देऊन स्वस्वरूपी स्थिर करणारा असा सर्वोच्च जन्म देणारा तू उदात्ततम माता-पिता-गुरु आहेस. माता, पिता आणि गुरु यांचाही माता-पिता-गुरु तू आहेस. अजरामर अस्तित्वाचा जन्म देणाऱ्या तुला शतशः दंडवत असोत.

**९४७) जनजन्मादिः । जनजन्मादये नमः ।**

जन्मांचा जन्मदाता. जन्मण्याचे मूळ कारण. जन्म-मृत्यूच्या चक्राचा कारक तू आहेस. वासना-संकल्पानुसार व कर्मफलानुसार पुनर्जन्म प्राप्त होतो याची बुद्धिगम्य सत्यासत्यता भविष्यात शोधून पाहता येईल. त्यासाठी स्थूल देहाच्या मन, भावना, लिंगदेह, सूक्ष्मदेह, त्यांच्या वासना, ध्यास, संकल्प यांचे पदार्थ वैज्ञानिक गुणधर्म व परिमाणे आणि त्यांचा आनुवंशिकता, गणसूत्रीय संघटन प्रकटन, विकास, विनाश यावर होणारा परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे. जन्माला जन्म देणाऱ्या व जन्मकल्पना व जन्माचे आकलन यानाही जन्म देणाऱ्या तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**९४८) भीमः । भीमाय नमः ।**

भयंकर. अविद्येमुळे देहबुद्धीमुळे व्यक्तीचे सामर्थ्य व सामर्थ्याची जाणीव अस्तंगत झालेली असते. आत्मस्वरूपाचे विस्मरण झालेली व्यक्ती कुबड्यांचा विनाकारण

वापर करणाऱ्या 'अपंगा' प्रमाणे असते. परंतु तुला पाहणे म्हणजे देहबुद्धी टाकणे, कुबड्या टाकणे. त्यामुळे तुझ्या दर्शनाच्या विचारानेही व्यक्तीचा थरकाप उडतो. एकाद्या व्यक्तीला प्रचंड दरीच्या वर किंवा अथांग महासागराच्यावर किंवा अंतराळात सोसाट्याच्या वादळात किंवा वजनरहित अवस्थेत अत्यल्प आधारावर ठेवल्यास त्याची जी अवस्था होईल तीच तुझ्या दर्शनाने होते. याचे आणखी एक कारण असे की तुझे दर्शन केवळ निष्प्रभ, प्रभावहीन वस्तूच्या दर्शनाप्रमाणे क्षणभंगूर सुख-दुःखादी संवेदना-प्रतिक्रिया उत्पन्न करणारे नसते. तुझे दर्शन अस्तित्वाला अंतर्बाह्य सर्व दिशानी छेदून भेदून जाणारे असते. देहबुद्धीमुळे ज्या अस्तित्वाला सर्वस्व मानले व आयुष्यभर ज्याबद्दल जीवापाड आत्मीयता व आसक्ती बाळगली त्या अस्तित्वाच्या ठिकऱ्या उडताना पाहणे ही गोष्ट महाभयानक आहे. आपुले मरण पाहिले म्या डोळा असे सहज म्हणणाऱ्या महाज्ञानी भक्तांची बाब निराळी. एरवी तुझ्या दर्शनाने स्वतःचे मरण पाहावे लागणे हे अंतर्बाह्य पिळवटून टाकणारे असते. म्हणूनच तुझे दर्शन घेण्यासाठी व्यक्तिलाही महामानवी धैर्य असावे लागते. स्वतःच्या जाणिवाना विरघळून जाताना पाहणे म्हणजे स्वतःचे घरदार, जमीनजुमला, प्रियकर/प्रेयसी, आई, वडील, भाऊ, मुलेबाळे, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय सत्ता, आर्थिक सत्ता, सर्वच्या सर्व ऋणानुबंध यांना धूळीत मिळताना पाहण्यापेक्षाही अधिक भयंकर असते. समर्पण भावनेने जेव्हा भक्त तुझ्या भजनात दंग झालेला दिसतो तेव्हा तुझ्या अमर्याद कृपेने त्याने कोणती महान कसोटी पार केलेली असते, कोणत्या दिव्यातून तो बाहेर आलेला असतो, कोणत्या विलक्षण व भयावह अनुभवातून त्याने प्रचीतीचे शिखर गाठलेले असते त्याची कल्पना करणे अशक्य असते. ते अनुभवल्याशिवाय त्याचे भयानक रौद्रभीषण पण अंतिमतः अत्यंत हृदयंगम रूप कळणे शक्य नाही. अविद्या, देहबुद्धीमुळे वासनेची पकड जेवढी घट्ट तेवढे तुझ्या दर्शनाचे भय अधिक. काही विद्वान पंडितानी तथाकथित बुद्धीच्या व तर्कशास्त्राच्या अजस्र साखळदंडांनी स्वतःला जखडून ठेवलेले असते. कर्मठांनी कर्मांच्या तुरुंगात स्वतःला खितपत ठेवलेले असते. स्वैराचाऱ्यांनी स्वतःच्या वासनातृप्तीच्या अंधाऱ्या गुहेबाहेर कधी प्रवेश केलेला नसतो. तुझ्या अथांग अमर्याद स्वरूपामध्ये त्यांचे भानच हरपते, बोबडी वळते, केवळ तुझ्याच कृपेने या सर्वांना तुझ्या जीवनदायी अस्तित्वाची साक्ष पटू शकते. प्रचीती येऊ शकते. ते दिवाभीताप्रमाणे तुझ्या भीतीने दूर पळाले तरी तुझी कृपा त्यांना तुझ्या दर्शनाचे हे प्रचंड ज्ञानपहाड उल्लंघायला पेलायला व पचवायलाही समर्थ बनवते. तुझ्याप्रमाणेच, तुझ्या भक्तांचे अंतरंगही धुंडाळायला निघालेला माणूसही त्या अंतरंगात विरघळून स्वतःला हरवण्याच्या सीमेवर येतो तेव्हा त्याचीही भीतीने गाळण उडते. स्वतःच्या कृपेने ज्ञानाचे महासागर, प्रचीतीचे अंतराळ सहजासहजी गिळण्याचे व पचवण्याचे प्रचंड साहस व महान सामर्थ्य देणाऱ्या सर्वशक्ती, रौद्रभीषण

आणि सर्वव्यापी अशा तुझ्याचरणी साष्टांग दंडवत असोत.

**९४९) भीमपराक्रमः । भीमपराक्रमाय नमः**

महापराक्रमी. तू सर्वव्यापी व सर्वशक्तिमान आणि त्यामुळे सर्वाधिक पराक्रमी आहेस. अजरामर आणि अनादि अनंत अशा कालातीत सामर्थ्याने सदैव विजयी होणारा असा तू आहेस. विश्वकल्याणाचा तुझा संकल्प तूच सिद्ध करू शकतोस. अक्षरशः प्रेतांमध्ये संजीवनी भरूनही तूच धर्माचा विजय साध्य करू शकतोस. तुला मनोभावे नमन असो.

**आधारनिलयोधाता पुष्पहासः प्रजागरः ।**
**ऊर्ध्वगः सत्पथाचारः प्राणदः प्रणवः पणः ।**

**९५०) आधारनिलयः । आधारनिलयाय नमः ।**

मूळ आधार. संपूर्ण अस्तित्वाचा व जाणिवेच्या सर्व स्तरांच्या अंतर्बाह्य राहणारा मूलाधार व शाश्वत आधार तू आहेस. जाणणाऱ्याशिवाय जाणणे व करणाऱ्याशिवाय होणे नाही तद्वतच संपूर्ण विश्वाचे अस्तित्व व जाणीव तुझ्याच आधाराने व नियंत्रणानेच अस्तित्वात आहेत. तसेच व्यक्तीचे व समाजाचे अस्तित्व व उच्च अनुभूतीचे विश्व तुझ्या कृपेनेच शक्य आहेत. अन्यथा नाही. तुला विनम्र वंदन असो.

**९५१) धाता । अधाता । धात्रे नमः । अधात्रे नमः ।**

सर्वांना आधार देणारा व सर्वोच्च नियंत्रक, (परंतु, रूढार्थाने आधार देणारा वा नियंत्रण करणारा नव्हे) असा तू आहेस. स्वयंभू आणि कोणाचाही कोणताही आधार नसलेलया सर्वसामर्थ्यवान अशा तुला आदरपूर्वक अभिवादन असो.

**९५२) पुष्पहासः । पुष्पहासाय नमः ।**

फुललेल्या फुलाप्रमाणे तेजस्वी व प्रसन्न. संपूर्ण विश्व जणू काही एकाद्या सुंदर फुलाच्या उमलण्याप्रमाणे अत्यंत सुनियंत्रित, आणि अचूक पद्धतीने उलगडत जाते. तुझी कृपा फुलाच्या सुगंधाप्रमाणे विश्वात दरवळत राहते. वैयक्तिक पातळीवर हृदयकमल आणि सहस्रदलकमल आत्मज्ञानाच्या तेजाने फुलवणारा तू आहेस. तसेच यातून निर्माण होणारा विश्वात्मकतेचा भावसुगंध मनामध्ये आणि त्याद्वारे दहाही दिशाना अंतर्बाह्य दरवळविणाराही तूच आहेस. तुला शिरसाष्टांग प्रणिपात असोत.

**९५३) प्रजागरः । प्रजागराय नमः ।**

जागृतीच्या पुढची जागृती असलेला. नेहमीचा जागेपणा ही खरे तर आत्मरूपाची विस्मृती असल्याने झोप किंवा मृत्यूची स्थिती असते. तू अवैयक्तिक, शाश्वत,

स्थित्यंतरातीत तरलतम असे नियंत्रक अस्तित्व असल्याने व जड चैतन्यातीत असल्याने व नेहमीच आत्मरूपी असल्याने अशी 'झोप' किंवा 'मृत्यूची स्थिती' (म्हणूनच मनुष्य जन्माला मृत्यू लोक म्हणणे सयुक्तिक आहे) प्राप्त होत नाही. यालाच जन्ममृत्यूच्या फेऱ्यापासून मुक्त अशी अवस्था म्हणतात. योग्यांना, ज्ञान्यांना व तुझ्या भक्तांना व्यावहारिकदृष्ट्या ते जन्मले व मृत झाले तरी ही अवस्था तूच प्राप्त करून देतोस. ही जागृती म्हणजेच योगनिद्रा व सच्चिदानंदमय समाधी, म्हणजेच तू आहेस. तुला अखंड नमन असो.

**९५४) उर्ध्वगः । उर्ध्वगाय नमः ।**

वर जाणारा. उर्ध्वगामी आणि अधोगामी अशा दोन तऱ्हानी व्यक्तीमध्ये प्रक्रिया होत जाते. उर्ध्वगामी प्रक्रियेत विशालता, निस्पृहता, प्रेम तरलता, सत्वगुण, सौंदर्य, माधुर्य, तेज, इत्यादी असतात. अधोगामी प्रक्रियेत संकुचितपणा, हाव, द्वेष, तमोगुण, कुरूपता, कटुता, अंधार, भीती, वेदना, पारतंत्र्य, परवलंबित्व, असहायता इत्यादी असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुझ्या प्रचीतीच्या दिशेने जाणारा तो उर्ध्वगामी आणि तुझ्या (आत्मस्वरूपाच्या) विस्मरणातून विस्मरणाकडेच जाणारा तो अधोगामी होय. तद्रुप झालेला, होणारा भक्त हे तुझेच रूप असल्याने तुला **उर्ध्वगः** म्हटले आहे. वैयक्तिक आणि योगमार्गाच्या दृष्टीने पाहता ज्यांच्या जाणिवा लैंगिकतेशी व क्षुद्र वासनांशीच निगडित राहतात त्याना अधोरेत म्हणतात (त्यांची वागणूक वासनानी व देहबुद्धीने नियंत्रित होते) आणि ज्यांच्या जाणिवा हृदय आणि बुद्धीशी निगडित असतात आणि हृदय व बुदधीच्या (अहंकाराच्या) अतीत हृदयांतर्यामीच्या कूटस्थ ईश्वराच्या-तुझ्या (आत्मरूपाच्या) दिशेने जातात (मनाची एकाग्रता, यम-नियम आदी अष्टांगाच्या योगे भरून) त्यांना उर्ध्वरेत म्हणतात. तद्रूप झालेला उर्ध्वरेत योगी म्हणजेही तुझेच रूप असल्याने तुला **उर्ध्वग**ः म्हटले आहे. तुला भक्तीपूर्वक प्रणाम असोत.

**९५५) सत्पथाचारः । सत्पथाचाराय नमः ।**

सत्यमार्गी. जे आचरण म्हणजे निव्वळ सत्य असते आणि ज्या आचरणाने सत्याचा साक्षात्कार होतो ते सत्याचरण होय. तुझे आचरण सत्य असते व ज्या आचरणाने व्यक्ती तद्रुपी समरस होते ते सत्य असते. तू स्वयंसिद्ध सत्य आहेस. त्रिकालाबाधित सर्वव्यापी सत्य असलेल्या तुला आणि तद्रूप झालेल्या भक्तांना शिरसाष्टांग नमस्कार असोत.

**९५६) प्राणदः । प्राणदाय नमः ।**

प्राणशक्ती देणारा. संपूर्ण विश्वात आणि सजीवांमध्ये चैतन्य भरणारा प्राणशक्तीचा

उगम तू आहेस. या महान तत्त्वाचा वापरच प्राणायामाच्या अतिशय सोप्या तंत्रात करण्यात आला आहे. चित्ताची एकाग्रता वाढण्यासाठी आणि अविद्येकडे धावणारे अविद्येत रमणारे मन स्वरूपी विलीन करण्यासाठी प्राणायामाचा, श्वासावर नामस्मरण करण्याचा, श्वासोश्वासावर लक्ष केंद्रित करण्याचा खूप फायदा होऊ शकतो. प्राणायामाचे महानतम दान विश्वाला देणाराही तूच आहेस. तुला शतशः दंडवत असोत.

**९५७) प्रणवः । प्रणवाय नमः ।**

ओंकार. तू ओंकार आहेस म्हणजे विश्वाचे बीज आहेस. त्याचप्रमाणे विश्वाचे नियंत्रक तत्त्वही आहेस. तू ओंकार आहेस म्हणजे तू वैश्विक व वैयक्तिक अस्तित्वाचा व जाणिवेचा परावाणीच्या अतीत असा उगम आहेस. तसेच जाणिवेचा नियंताही आहेस. ओंकाररूपी, स्थळकाळातील व रूपगुणातीत अशा तुला सदैव अभिवादन असो.

**९५८) पणः । पणाय नमः ।**

म्हणजे विश्वातील प्रत्येक घटनेची सुयोग्य पद्धतीने व्यवस्था लावणारा योग्य ती देवघेव करणारा. वैश्विक घटनांमध्ये ऋण-धन, रात्र-दिवस, उंच-सखल, थंड-गरम, अशा अनेक प्रकारच्या घटनांचे प्रमाण निश्चित करणारा आणि सामाजिक पातळीवर पाप-पुण्य, दुःख-सुख, सज्जन-दुर्जन, संकुचित-विशाल वगैरेंचे प्रमाण निश्चित करणाराही तूच आहेस. वैयक्तिक पातळीवरही सर्व भाव-भावनांचे प्रमाण सुनियंत्रित करणाराही तूच आहेस. विश्वाचे, समाजाचे व व्यक्तीचे सर्व स्तरांवर आणि सदासर्वदा व्यवस्थापन करणाऱ्या तुला भक्तीपूर्वक दंडवत असोत.

**प्रमाणं प्राणनिलयः प्राणभृत्प्राणजीवनः ।**
**तत्त्वं तत्त्वविदेकात्मा जन्ममृत्युरातिगः ।**

**९५९) प्रमाणं । प्रमाणाय नमः ।**

प्रमाण म्हणजे आधार, पुरावा. ज्याच्या अस्तित्वाला पुरावा म्हणून जो स्वतःच आहे आणि विश्वाच्या अस्तित्वाची खरी ओळख (प्रमाण) ज्याच्यापाशी असते असा तू आहेस. तू अस्तित्वाचे अस्तित्व आहेस. जाणिवेच्या क्षेत्रात पाहता वेद (आत्मज्ञान ) जे संपूर्ण विश्वाच्या अस्तित्वाचे प्रमाण आहेत, तू आहेस. अन्य दृष्ट्या पाहता विश्वातील प्रत्येक बाब योग्य प्रमाणात संतुलित ठेवणाराही तूच आहेस त्यामुळेही तुला **प्रमाणं** म्हणणे सयुक्तिक आहे. तुला विनम्र वंदन असो.

**९६०) प्राणनिलयः । प्राणनिलयाय नमः ।**

प्राणांचा उगम. मूळ वसतिस्थान. प्राण, अपान, व्यान, समान, उदान हे पाच प्राण

वर्णिले जातात. शरीराच्य संदर्भातील हे प्राण तुझ्यातच उगम पावतात व अंती तुझ्यातच विलय पावतात. तसेच विश्वामध्ये जो वायू आहे व इतर महाभूते आणि त्यांचे कार्य आहे त्याचाही उगम व अंत तुझ्यातच आहे. अशा तऱ्हेने सर्व घटनांचा व प्राणाचा (जीवन, चैतन्य) उगम व अंत ज्याच्या ठायी आहे व जो स्वत: कालातीत आहे अशा तुला सादर प्रणिपात असोत.

**९६१) प्राणभृत् । प्राणभृते नम:**

विश्वातील सर्व तुझ्यातून उत्पन्न होते आणि अखेर तुझ्यात विलीन होते म्हणून प्राणभृत्. तू सजीवांच्या जीवनातील सर्व क्रिया करून घेणारा प्राणांचा नियंता आहेस. तसेच प्राणांचे पोषणही करणारा आहेस. सर्वसत्ताधीश व सर्वज्ञ अशा तुला साष्टांग नमस्कार असोत.

**९६२) प्राणजीवन: । प्राणजीवनाय नम: ।**

प्राण्यांचे प्राणरूपी जीवन असलेला. वेगळ्या दृष्टीने पाहिल्यास तू प्राणांचा उद्‌गाता, पोशिंदा व नियंता आहेस आणि प्राणांचाही प्राण आहेस. प्राणांचे जीवन आहेस. प्राणशक्तीच्याद्वारे तू प्राण्यांना त्यांचे जीवन देतोस व मनुष्यांना याच प्राणशक्तीच्या नियमनांच्या द्वारे आत्मज्ञानप्राप्तीचे मार्ग दाखवतोस. खऱ्या अमर जीवनाचे महाद्वार उघडून देतोस. तुला कृतज्ञ प्रणाम असोत.

**९६३) तत्वं । तत्वाय नम: ।**

विश्वाचे अविनाशी सारतत्त्व. साऱ्या अस्तित्वाचे अविनाशी व स्थित्यंतरातीत शाश्वत आणि सत्य असे सार तू आहेस. म्हणूनच बाकी सारे काही असार आहे असे म्हणतात. सर्वस्व तुझ्याचरणी लीन राहो.

**९६४) तत्ववित् । तत्वविदेनम: ।**

स्वत: तत्त्व असल्याने तत्त्वाचे संपूर्ण ज्ञान एकत्वाने, एकात्मतेने असणारा. तत्त्वाचे प्रथम प्रतीचे मूळ ज्ञान असलेला तूच आद्य ज्ञानी आहेस, सर्वज्ञ आहेस, आद्यतम तत्वज्ञ आहेस. तुझ्या भक्तांनाही असे ज्ञान देणाऱ्या सद्‌गुरुरूपी तुला साष्टांग दंडवत असोत.

**९६५) एकात्मा: । एकात्मने नम: ।**

एक आत्मा. जाणिवेच्या सर्व सतरांसहित संपूर्ण विश्वाच्या अंतर्बाह्य सर्व काही स्थित्यंतरातीत व कालातीत अवस्थेने व्यापणारा व सांधून ठेवणारा विश्वातील एकता अखंडता यांचा आद्य मूलाधार तू आहेस. अनेक रूपांच्या स्वत:च्या आविष्कारातून

(ब्रह्मज्ञानी योगी भक्तांना व त्यांच्या द्वारे इतराना) चिरंतन एकत्वाचा हरघडी साक्षात्कार देणारा विश्वाचा एकमेव आत्मा-परमात्मा, तू आहेस. सर्व आत्म्यांचा एकमेव परमात्मा तू आहेस. अनेक आत्म्यांना विजेची उपमा देता येईल. इलेक्ट्रॉन्स भिन्न असले तरी वीज ही भिन्नत्वाच्या वेगळ्या परिमाणावर, अभिन्नच असते. तुला माझे विनम्र वंदन असो.

**९६६) जन्ममृत्युजरातिगः । जन्ममृत्युजरातिगाय नमः ।**

जन्म, मृत्यू व वार्धक्याच्या अतीत असा. उत्पत्ती-स्थिती नाश, जन्म-जीवन-जरा मृत्यू, जाणिवेचा नाश अशा सर्व स्थित्यंतरांच्या अतीत अशरीरी आणि अजरामर कालातीत अस्तित्वाने असणारा तू आहेस. तुझ्या कृपेने तुझ्या या अवस्थेमध्ये तुझे भक्तही चिरंतनपणे राहतात. म्हणूनच ते देहबुद्धीशून्य असतात आणि जुन्या कपड्यांप्रमाणे हसत शरीराचाही त्याग करू शकतात. तुला व तुझ्या भक्तांना नम्र अभिवादन असो.

**भूर्भुवःस्वस्तरुस्तारः सपिता प्रपितामहः ।**
**यज्ञो यज्ञपतिर्यज्वा यज्ञांगो यज्ञवाहनः ॥**

**९६७) भूर्भुवः स्वस्तरुः । भूर्भुर्वः स्वस्तरवे नमः ।**

तिन्ही लोक व्यापणारा वैश्विक वृक्षाचा जीवनरस. भू, भुवः व स्वः ह्या जाणिवेच्या तीन पातळ्या आहेत. ह्या संज्ञांना व्याहृति म्हणतात. वैश्विक यज्ञकताच्या रूपात जाणिवेच्या सर्व पातळ्या (व्याहृति) व्यापणाऱ्या मंत्राच्या सहाय्याने तू यज्ञ करतोस, अशी सार्थ कल्पना केलेली आहे. मथितार्थ असा की अस्तित्वाच्या आणि जाणिवेच्या सर्वच्या सर्व स्तरांना सदासर्वदा व्यापून असतोस आणि भक्तांना तुझी अमर प्रचीती देतोस, अविद्येतून तारून नेऊन त्याना आत्मज्ञानावस्थेत कायम करतोस. तुला अखंड नमन असो.

**९६८) तारः । ताराय नमः ।**

तारून नेणारा. तुझे अस्तित्व तरलतम आहे. त्यामुळे निर्वात पोकळी जसे मातीचे कण शोषून घेते त्याप्रमाणे तू व्यक्तीच्या जाणिवा अविद्या शोषून घेतोस आणि व्यक्तीला तुझ्याप्रमाणेच पोकळ (तरलतम) बनवतोस. तू अग्नीप्रमाणे आहेस. तुझ्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना तू ज्ञानाच्या ज्वाळा प्रदान करून ज्ञानाग्नि बनवतोस. तू चैतन्यमय चुंबक आहेस. तुझ्या चुंबकत्वाने भक्तांना तू चैतन्याचे चुंबक बनवतोस. तरलतम असल्याने भक्तांचे जडत्व घालवून तू त्यांना तद्रूप बनवतोस, सर्वसत्ताधीश बनवतोस. तू त्यांना मायेच्या प्रभावातून वाचवतोसच परंतु इतरांना मायेतून तारून नेण्याची महान शक्तीही त्याना प्रदान करतोस. तुझ्या चरणी कृतज्ञ दंडवत असोत.

**९६९) सविता । सवित्रे नमः । सपिता । सपित्रे नमः ।**

साऱ्या विश्वाचा पिता. ज्याने सृजनशील असे विश्व उत्पन्न केले तो साऱ्या विश्वाचा पिता (सगुण रूपातील ब्रह्मदेव) तू आहेस. सजीव, निर्जीव आणि जाणिवांच्या सर्व स्तरांवरील सर्व सृजनशीलतेचा पिता तू आहेस. कौटुंबिक जीवनामध्ये याचेच प्रतिबिंब पडून पितृदेवो भव व मातृदेवो भव ह्या कल्पना रूढ झाल्या. मातृत्व आणि पितृत्व यातून ईश्वरत्वाची आठवण करणे हे ह्या कल्पनांमधील तथ्य अत्यंत महत्त्वाचे आहे. तुला अखंड अभिवादन असो.

**९७०) प्रपितामहः । प्रपितामहायनमः ।**

विश्वाच्या पित्याचा (ब्रह्मदेवाचा) पिता. सृजनशीलतेच्या उगमाचा उगम आहेस हे तुझ्या सगुण रूपामध्ये स्पष्टपणे दाखवलेले असते. वेगळ्या दृष्टीने पाहिल्यास तुझ्या अफाट, अमर्याद, कालातीत अस्तित्वाचे आकलन अधिकाधिक अचूक व्हावे यासाठी शब्दाचे उपयोजन करणाऱ्या प्रज्ञावंतानी तुला प्रपितामह म्हटले आहे. आणखी एक प्रकारे पाहिल्यास तू कधी जन्मत नाहीस व जन्मत नाहीस म्हणून व सर्वव्यापी असल्याने विश्व तू, विश्वाचा पिता तू आणि पित्याचा पिताही तू आहेस. वेगळया दृष्टीने पाहिल्यास व्यक्तीच्या माता पित्यांचा (पूर्वजांचा) पिता ब्रह्मदेव हा पितामह म्हणून त्याचा पिता तू, प्रपितामह आहेस. तुला भक्तिभावपूर्वक नमन असो.

**९७१) यज्ञः । यज्ञाय नमः ।**

यज्ञ. शरीशराचा धर्म कृती आहे. जेव्हा एकादी कृती तुझ्या स्मरणात, तुझ्या सेवेत, तुला समर्पित होऊन, आणि तुझ्याच संकल्पाच्या सिद्धीशिवाय अन्य कोणतीही भावना (आशा-अपेक्षा) न ठेवता घडते (तुझ्या कृपेने) तेव्हा त्या कृतीला यज्ञ म्हणतात व त्या कृतीचे स्वरूप स्थळ काळानुसार भिन्न असले तरी त्या कृतीमध्ये तू असतोस. म्हणून तुला यज्ञ म्हणतात. अन्य दृष्ट्या पाहिल्यास ज्याला जाणणे योग्य, आणि संतोषकारी असते आणि ज्याच्या चरणी स्वत:ला समर्पित करणे म्हणजे जीवनाचे सार्थक असते व जो स्वतः अशा समर्पणाचा कर्ता असतो व समर्पणाची क्रिया (यज्ञ) असतो त्या तुझ्या या सर्व रूपांत भेद नाही म्हणूनही तुला यज्ञ म्हणतात. संपूर्ण विश्वाला आत्मज्ञानाच्या श्रेष्ठ प्रक्रियेत नेण्याच्या (तुला समर्पित होण्याच्या) वैश्विक यज्ञाचा कर्ता व वैश्विक यज्ञरूप तूच आहेस म्हणूनही तुला यज्ञ म्हणतात. तुला माझे अखंड वंदन असो.

**९७२) यज्ञपतिः । यज्ञपतये नमः ।**

यज्ञाचा स्वामी. विश्वात्मक भावनेने, विश्वकल्याणकारी अशा तुझ्या उदात्त संकल्पात सर्वतोपरी झटताना शरीर, भावना, मन व बुद्धी समर्पित करण्याच्या प्रक्रियेला

यज्ञ म्हणतात. अशा प्रकारे एकत्र येऊन केल्या जाणाऱ्या यज्ञाचा कर्ता करविता आणि स्वामी तू आहेस. अशा यज्ञांचा परमोच्च अनुभव उपभोगणाराही तूच आहेस. म्हणून तुला (यज्ञरक्षक) **यज्ञपतिः** म्हणतात. तुला माझे अखंड वंदन असो.

**९७३) यज्वा । यज्वने नमः ।**

यज्ञ करणारा. यज्ञाचा यजमान. तुझ्या संकल्पानुसार तन-मन-धन अर्पून स्वतःचा अहंकार, बुद्धी, आशा-आकांक्षा, शारीरिक गरजा सर्व काही समर्पित करून कार्य (यज्ञ) करणारे जे भक्त, योगी, ज्ञानी, निष्काम कर्मवीर आहेत ते सर्व तुझेच आविष्कार आहेत. म्हणून तुला यज्वा (यज्ञाचा यजमान) म्हणतात. भक्त, भक्ती व देव एकत्र येण्याचा एकात्म असण्याचा हा परमोच्च क्षण म्हणजे अनंत काळचे सत्य होय. तुझ्या चरणी माझे विनम्र प्रणाम असोत.

**९७४) यज्ञांगः । यज्ञांगय नमः ।**

(यज्ञ व) यज्ञातील आहुती (यज्ञाची साधने) ज्याचे अवयव आहेत असा. विश्वाचा आत्मज्ञानर्प्राप्तीचा प्रवास हा महान यज्ञ (तू) असून ह्या यज्ञाचा यजमानही तूच आहेस. यज्ञातील साहित्य (विश्व) तत्स्वरूपी समरस होत असल्याने ते तुझेच अवयव आहेत. समाज व व्यक्तीच्या संदर्भातही जे जे विश्वकल्याणाच्या संकल्पामध्ये समर्पित होतं (तुझ्या कृपेने) ते ते तुझाच भाग बनतं. याच अर्थाने सत्यसंकल्पात कामी येणाऱ्याना वीरगती, श्रेष्ठ गती प्राप्त होते असे म्हणतात. सत्कार्यात सत्संकल्पात (तुझ्या कृपेने) स्वतःचे सर्वस्व तुझ्या चरणी अर्पण करणारे अविद्येपासून मुक्त होऊन तुझेच अंग बनतात. पण हे सारे म्हणजे तुझेच रूप असल्याने, तुला यज्ञांग म्हणतात. तुझ्याचरणी माझे सादर अभिवादन असो.

**९७५) यज्ञवाहनः । यज्ञवाहनायनमः ।**

यज्ञांचा वाहक. यज्ञक्रिया उत्तम तऱ्हेने सिद्धीस नेणारा तूच आहेस. सर्वोत्तम संकल्पात (ईश्वरी संकल्पात) समर्पण वृत्तीने केलेल्या कुशल कृतींचा खरा कारक आणि त्यांना योग्य विश्वकल्याणाचे फळ देणारा आणि कृती (यज्ञ) हेच वाहन करून भक्त हृदयामध्ये अवतरणारा तूच आहेस. तुला माझे निरंतर लोटांगण असो.

**यज्ञमृद् यज्ञकृद् यज्ञी यज्ञभुग् यज्ञसाधनः ।**
**यज्ञान्तकृद् यज्ञगुह्यमन्नमन्नाद एव च ॥**

**९७६) यज्ञभृत् । यज्ञभृते नमः ।**

यज्ञाचा नियंता व रक्षक. अवैयक्तिकतेने निस्वार्थपणे समर्पण भावनेने केलेल्या

कर्तव्यकर्माचा उद्‌गाता, शास्ता, नियंता आणि रक्षक तूच आहेस. कितीही मोठे कार्य असो व कोणत्याही हेतूने केलेले असो त्याचा कर्ता करविता तूच असतोस हे त्रिकालाबाधित सत्य आहे. तुला माझे त्रिवार वंदन असो.

**९७७) यज्ञकृत् । यज्ञकृते नमः ।**

यज्ञ करणारा व यज्ञ नष्ट करणारा. वैश्विक पातळीवर एकाप्रकारे पाहता विश्वाला तुझी प्रचिती येणे हा यज्ञ करण्याचा तर अविद्या-मायाजन्य विश्वनिर्मिती हा यज्ञ संपविण्याचा प्रकार होय. वैयक्तिक पातळीवर अविद्येचा नाश करून ज्ञानोदय घडवणे हा यज्ञ यशस्वीपणे करण्याचा तर अविद्या-मायेच्या मोहात व्यक्तीला ढकलणे हा यज्ञ नष्ट करण्याचा भाग होय. सज्जनांचा यज्ञ यशस्वी करणारा व दुर्जनांचा यज्ञ नष्ट करणारा असेही तुला म्हणतात. तुला माझे विनम्र प्रणिपात असोत.

**९७८) यज्ञी । यज्ञिने नमः ।**

यज्ञासह असणारा. तुझ्या चरणी (आत्मरूपी) सर्व काही अर्पण करणे हा सर्वश्रेष्ठ यज्ञ होय. यज्ञाचा भोक्ता आणि खरा कर्ता करविता ईश्वर होय. अशा वैश्विक किंवा वैयक्तिक पातळीवरील प्रतिकात्मक प्रक्रियेचे आणि सर्व पातळ्यांवरील (व्यावहारिक) कल्याणाचे एक रूप म्हणजे तंत्रशुद्ध विधिवत् यज्ञकुंडादि-तर्पणादि सर्व बाबींसह मंत्रघोषपूर्ण यज्ञ होय. वैज्ञानिकांना पूर्णपणे आकलन झालेल्या वा न झालेल्या प्रचीतीच्या साधनांनी युक्त अशा यज्ञामध्ये तू नेहमीच पाठिराखा असतोस. तुला माझे भक्तिपूर्वक नमस्कार असोत.

**९७९) यज्ञभुक् । यज्ञभुजे नमः ।**

यज्ञ भोगणारा. यज्ञाचा कर्ता व भोक्ता तू आहेस. तुला माझे सादर अभिवादन असो.

**९८०) यज्ञसाधनः । यज्ञसाधनाय नमः ।**

यज्ञाचे साधन. सहाय्य. तुझ्या संकल्पात स्वत्वाचा त्याग करून मूलतः तुझ्या कृपेनेच केलेल्या धडपडीचा (यज्ञाचा) निरंतर सहाय्यक तूच आहेस. त्याच्या यशाचे परिपूर्णतेचे साहित्य तू आहेस. ज्याला प्राप्त व्हायचे व ज्याची प्रचीती घ्यायचे उत्तम साधन यज्ञ आहे अशा तुला साष्टांग नमन असो.

**९८१) यज्ञान्तकृत् । यज्ञांतकृते नमः ।**

म्हणजे पूर्णाहुती शेवटची आहुती. यज्ञाच्या शेवटी सर्व संकुचित स्वार्थी कल्पनांची, इच्छांची, आवडीची, गरजांची पूर्ण आहुती अत्यंत कळकळीने आणि भावनोत्कटतेने आवाहन केलेल्या नारायणाच्या चरणी अर्पण करायची असते. संपूर्ण समर्पणाच्या

नंतर तत्क्षणी नारायण अवतरतो म्हणून तुला **यज्ञान्तकृत्** म्हटले आहे. तुझ्याचरणी माझे साष्टांग प्रणिपात असोत.

**९८२) यज्ञगुह्यम् । यज्ञगुह्याय नमः ।**

यज्ञाचा हेतू, स्वरूप,, फळ, कर्ता, भोक्ता ह्या सर्व संदर्भातले गुपित तू आहेस. शरीररूपी यज्ञकुंड, जाणीवरूपी अग्नी आणि माया मोह अहंकाररूपी द्रव्य यानी ब्रह्मयज्ञ होतो. यज्ञाचे सर्व काही, तुझाच अविष्कार आहे. त्यामुळे ते सर्व गूढ व अनाकलनीय आहे. अन्य दृष्ट्या यज्ञाद्वारे मिळवण्याचे, जाणण्याचे अनुभवण्याचे महान रहस्य (ज्याच्याबद्दल सर्व विश्वाला कळत-नकळत उत्कंठा असते) ते तू आहेस. तुला शतशः नमस्कार असोत.

**९८३) अन्नम् । अन्नाय नमः ।**

अन्न. पोषण. संपूर्ण विश्वाला अंतर्बाह्य चेतना देणारा व आधार देणारा म्हणून तुला साऱ्या विश्वाचे अन्न म्हंटले आहे. प्राणतत्त्वाच्या रूपाने तू सजीवाना जीवनरूपी अन्न देतोस. तू असे (आत्मज्ञानरूपी) अन्न आहेस की जे कुणालाही कितीही प्रमाणात (भक्ती करून) घेऊन जाता येते व तरीही कधीही ते कमी होत नाही व नेणारा तृप्त होत नाही. (थोड्या वेगळ्या अर्थी, विश्व तुझ्यामध्ये विलीन होते म्हणून विश्व ज्याचे अन्न आहे असा तू आहेस.) तुझ्याचरणी माझे साष्टांग दंडवत असोत.

**९८४) अन्नादः । अन्नादाय नमः ।**

अन्न घेणारा, खाणारा, उपभोगणारा. वैश्विक, सामाजिक आणि वैयक्तिक जाणिवा आणि कृतीच्या सर्व पातळ्यांवरील सर्व काही ज्याच्या स्वरूपी विलीन होते असा तू आहेस. वैयक्तिक पातळीवर, **''अन्नं ब्रह्म, रसो विष्णूः, भोक्ता देवो महेश्वरः''** या वचनाप्रमाणे तू अन्नचा स्वीकारकर्ता व भोक्ता असतोस. तुला माझे साष्टांग प्रणाम असोत.

**आत्मयोनिः स्वयंजातो वैखानः सामगायनः ।**
**देवकीनंदनः स्रष्टा क्षितीशः पापनाशनः ॥**

**९८५) आत्मयोनिः । आत्मयोनये नमः ।**

स्वतःच्या जन्माचे स्वतःच कारण असलेला. योनी याचा अर्थ उगम. अन्य कुणापासून जो जन्मतो (तयार होतो) त्याच्या जन्मण्याचे कारण व उगम दाखवता येतो. तू कुणापासूनही जन्मलेला नसल्याने तुझा उगम व तुझ्या जन्माचे कारण देता येत नाही. तूच स्वतःच्या उत्पत्तीचे कारण आहेस, अन्य काहीही तुझ्या उत्पत्तीचे नाही. (कारण

सर्व काही तुझ्यापासून बनलेले आहे.) तुला माझे विनम्र वंदन असो.

**९८६) स्वयंजातः । स्वयंजातकाय नमः ।**

स्वतःच स्वतःचा जन्मदाता असणारा व स्वतःपासून स्वतः जन्मणारा, उत्पन्न होणारा. ज्याचा कर्ता, कर्म व क्रिया एकरूप आहेत असा तू आहेस. तुला नम्र नमन असो.

**९८७) वैखानः । वैखानाय नमः**

पृथ्वी फाडणारा. यातून वराह अवताराकडे संकेत कलेला आहे. पृथ्वी मोठ्या शिताफीने फाडून सूक्ष्म व तरल अशा हिरण्याक्षाला (ज्याने विश्वातील सन्मार्गी मूल्ये, आत्मज्ञानाधिष्ठीत मूल्ये संपवण्याचा प्रयत्न केला होता) नष्ट करणारा म्हणजे वराहरूपी तू होय. याचा तात्विक अर्थ शरीरात प्रवेश करून जडत्व फाडून तमोगुण फोडून, कापून अविद्या-देहबुद्धी-माया-अहंकाररूपी हिरण्याक्षाचा नाश करणारा असा आहे. तुला माझे निरंतर प्रणिपात असोत.

**९८८) सामगायनः । सामगायनाय नमः ।**

सामवेदाचे गायन व गायन करणारा. विशिष्ट उच्चार, आरोह, अवरोह, जोर, लय, ताल इत्यादी प्रकारे मंत्र म्हणण्याची पद्धत जगातील बहुतेक अव्वल संस्कृतींमध्ये आढळते. संपूर्ण मज्जासंस्था, मेंदू, विचार, वातावरण यात उन्नयन होऊन व्यक्तीची विभूती व पृथ्वीचा स्वर्ग बनवण्याची ही साधने आहेत. सामवेदाचे व इतर वेदांचेही गायन हा त्याचाच भाग आहे. आत्मज्ञानाचा हा मार्ग (सामवेद) तूच आहेस. तुला माझे विनम्र प्रणाम असोत.

**९८९) देवकीनंदनः । देवकीनंदनाय नमः ।**

देवकीचा पुत्र. देवकीचा पुत्र आठवा अवतार-ज्याला पूर्णावतार म्हणतात - श्रीकृष्ण तूच आहेस. तूच तुझ्या लीलानी देवकीच्या हृदयाला आल्हाद देणारा आहेस. तुला माझे साष्टांग नमस्कार असोत.

**९९०) स्रष्टा । स्रष्टे नमः ।**

सृष्टीचा निर्माता. सृजनशीलतेसकट आणि प्रतिभेच्या अत्युत्कृष्ट आविष्कारासकट नवनवोन्मेषशालिनी बहुप्रसवा प्रकृती रचणारा (ब्रह्मदेव हे सगुणरूप) तूच आहेस. तुला माझे भावपूर्ण वंदन असो.

**९९१) क्षितीक्षः । क्षितीक्षाय नमः ।**

पृथ्वीचा स्वामी. पृथ्वीतत्व-सृष्टी या सर्वांचा स्वामी तूच आहेस. पृथ्वीचे दुःख हरण करणारा, तिला तद्रुपतेकडे, अमर चैतन्याकडे नेणारा तूच आहेस. तुला माझे शिरसाष्टांग दंडवत असोत.

**९९२) पापनाशनः । पापनाशनाय नमः ।**

पाप नष्ट करणारा. तूच भक्तांना तुझ्या चिंतनाची, भजनाची, संकीर्तनाची, तुझ्या सेवेची, तुझ्या अभ्यासाची, शोधाची बुद्धी देतोस. प्रेरणा देतोस. त्यांच्या अंतर्यामी राहून त्यांना आत्मरूपाचे स्मरण देतोस व त्यांचे पाप नष्ट करून त्यांना चिरंतन असा आत्मसाक्षात्कार देतोस. तुला माझे कृतज्ञ अभिवादन असो.

**शंखभृन्नन्दकी चक्री शांर्गधन्वा गदाधरः ।**
**रथांगपाणिरक्षोभ्यः सर्वप्रहरणायुधः ॥**

**९९३) शंखभृत् । शंखभृते नमः ।**

शंख धारण करणारा. सगुण रूपात तू पांचजन्य शंख धारण करतोस. हा पांचजन्य शंख म्हणजे (पाचापासून जन्मलेला) व्यक्तीचा अहंकार होय. कारण पाच ज्ञानंद्रियांद्वारे होणाऱ्या संवेदना/ज्ञानातूनच मन व अहंकार तयार होता. इथे अहंकार याचा अर्थ गर्व, मद, माज, माजोरी, आढ्यता इ.नव्हे. अहंकार म्हणजे संकुचित मीपणा, स्वतःचे शरीर, बुद्धी, कल्पना, परिवार वगैरे म्हणजे पूर्णसत्य असल्यासारखे वाटणे, तू सर्वांतर्यामीचा सर्वशक्तिमान सर्वसमावेशक शाश्वत नियंता असल्याने तू अशा शंखाचा धारणकर्ता आहेस. भक्तहृदयांना हे स्पष्ट जाणवते म्हणून संपूर्ण कर्तेपणा तुझ्याकडे असल्याचे ते जाणतात. तुझ्या सगुण अवतारातूनही, जेथे तू शरीर व तज्जन्य व्यक्तित्व धारण करतोस, हेच वेगळ्या तऱ्हेने प्रचीतीस येते. तुला माझे सविनय अभिवादन असो.

**९९४) नन्दकी । नन्दकिने नमः ।**

नन्दक तलवार धारण करणारा. नन्दक तलवार ही आत्मज्ञान (‘असंगशस्त्र’) आहे. आत्मसाक्षात्कारी ज्ञानमय तलवारीने अज्ञानाची खांडोळी करणारा अश्वत्थाचे मूळ कापणारा व भक्तांनाही तेच सामर्थ्य देणारा तूच आहेस. तुला माझे सदैव प्रणाम असोत.

**९९५) चक्री । चक्रिणे नमः ।**

चक्र धारण करणारा. तू सुदर्शन चक्र धारण करतोस याचा अर्थ मन असा घेतला जातो. व्यक्तीचे ‘मन’ तूच धारण करीत असल्याने, तू कोणत्याही क्षणी ते नष्ट करू शकतोस. तुझे चक्र हे आयुध कधीच वाया जात नाही कारण तू चक्राच्या रूपाने व्यक्तीच्या

कृतीचे कारक असे तिचे मनच तुझ्या हाती असते. त्याला तू कुठेही वळवू शकतोस, त्याचा नाशही करू शकतोस. शारीरिक दृष्ट्या संपूर्ण मज्जासंस्था आणि तिचे कार्य (जे मनाचा शारीरिक पाया आहे) व योग दृष्ट्या सहस्रचक्रासहित षट्‌चक्रांचा जी आत्मानुभूतीचे मार्ग आहेत - त्यानाही तू धारण करतोस. या सर्व वर्णनाचा मथितार्थ असा की तू कधीही - कुणालाही प्रभावीपणे संकुचित मनाचा विलय करून आत्मदर्शन देऊ शकतोस. म्हणून या चक्राला सुदर्शन चक्र म्हणतात. तुला माझे निरंतर वंदन असो.

**९९६) शार्ङ्गधन्वा । शार्ङ्गधन्विने नमः**

शार्ङ्ग हे धनुष्य धारण करणारा. हे धनुष्य म्हणजे चित्त होय. ह्याच्या एकाग्रतेनेच (अचुकतेने नेम धरून) व्यक्ती (आत्मा) स्वस्वरूपाला प्राप्त होते. तुझ्याचरणी माझे साष्टांग नमन असो.

**९९७) गदाधरः । गदाधराय नमः ।**

कौमोदकी गदा धारण करणारा. बुद्धीरूपी गदेच्या सहाय्याने सर्व भ्रम, अज्ञान, अविद्या दूर करणारा तूच आहेस. ( बुद्धीच्याच शक्तीने बुद्धीच्या मर्यादा स्पष्ट होऊ शकतात.) त्यामुळे आत्माराम ईश्वर व्यक्तीच्या अंतर्यामी व्यक्तीची बुद्धीरूपी गदा पारजून कार्यरत असतो व व्यक्तीला आत्मस्वरूपाचा साक्षात्कार देतो. तुला शतशः नमस्कार असोत.

**९९८) रथांगपाणिः । रथांगपाणिने नमः ।**

रथचक्र धारण करणारा. रथचक्र याचा अर्थ रथाच्या चलनवलनास सहाय्यभूत होणारे चक्र. रथ म्हणजे व्यक्तिजीवन. रथचक्र म्हणजे जन्म-मृत्यूचे चक्र. (सर्वतोपरी प्रयत्न करूनही शक्य न झाल्यास) व्यक्तीला आत्मज्ञान देण्याचा उपाय म्हणजे जन्म-मृत्यूच्या चक्राचा वापर होय. अन्य दृष्ट्या पाहिल्यास शरीराला रथचक्र म्हणता येईल. कारण व्यक्तित्वाचे वाहक तेच आहे. भक्तांचे शरीरही आत्मज्ञानमार्गी लावणारा (कर्मयोग, हठयोग) व आत्मज्ञान देणारा तूच आहेस. तुला माझे कृतज्ञ प्रणिपात असोत.

**९९९) अक्षोभ्यः । अक्षोभ्याय नमः ।**

कधीही न कोपणारा. क्षोभ, दाह, संताप, चीड येण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे स्वतःच्या विश्वासाला, श्रद्धेला, धारणेला तडा जाणे. देहबुद्धीमुळे मनाला जडता येते. जडतेमुळे बुद्धी, भावना, वासना यांच्यासाठी ‘आसरास्थाने’, ‘निवारास्थाने’ लागतात. चाकोरी लागते. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, आरोग्य, शिक्षण, तत्त्वचिंतन, काव्य, क्रीडा, धर्मसंप्रदाय, विज्ञान इत्यादी सर्व क्षेत्रात ‘श्रद्धास्थाने’

कोसळली की सांप्रदायिकांचा क्षोम होतो. मूळापासून अस्तित्वाचेच उच्चाटन झाल्यामुळे ते अंतर्बाह्य ढवळून निघतात. तू आणि तुझ्या प्रचीतीने पुनीत झालेल्याना बौद्धिक, भावनिक, वासनिक वगैरे कोणत्याही प्रकारचे जाड्य नसते. स्थूलता नसते. त्यामुळे तू व तुझे भक्त स्वयंभू, स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र असता. श्रद्धास्थानांच्या अतीत असता. संशय आणि श्रद्धा यांच्या अतीत असल्याने आत्मप्रचीतीत शांत असता. त्यामुळे तू व तुझे भक्त अस्वस्थ केले जाऊ शकत नाही. तुला व तुझ्या भक्तांना माझे निरंतर वंदन असो.

**१०००) सर्वप्रहरणायुधः । सर्वप्रहरणायुधाय नमः ।**

सर्व आयुधानिषी असणारा. सगुणावतारातील आयुधांचे तात्पर्य हे आत्मसाक्षात्कार निगडित आहे. मन, बुद्धी, चित्त, अहंकार व ही महान आयुधे वापरून भक्तांना आत्मसाक्षात्कार देणारा तू आहेस. पारंपरिक दृष्ट्या नखे, दर्भ, हुंकार, श्रवण, स्मरण इत्यादी आयुधाचाही आत्मसाक्षात्काराची प्रचीती देण्यासाठी वापर करणारा तू आहेस. तुझ्या चरणी माझे शतशः साष्टांग नमस्कार असोत.

**फलप्राप्तीसंबंधी भीष्माचार्य व युधिष्ठिर राजा यांच्यातील संवादाचे विश्लेषण व मथितार्थ**

**इतीदं कीर्तनीयस्य केशवस्य महात्मनः**
**नाम्नां सहस्रं दिव्यानामशेषेण प्रकीर्तितम्ः ।**

भीष्म म्हणाले, ''हे राजा, ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचा (जन्म, जीवन, मृत्यू व उत्पत्ती स्थिती - विलय यांच्या महाप्रेरणांचा) निर्माता असा हा परमेश्वर आहे. दर कल्पाच्या अंतराने (ठराविक काळाने) उत्पत्ती, स्थिती, विलयाच्या प्रेरणा कमी अधिक प्रमाणात उत्पन्न होऊन विश्वोत्पत्ती, स्थिती व विलयाचे कालचक्र चालू राहते, असा सिद्धांत आहे. उत्पत्ती व स्थिती ही मोठी स्थित्यंतरेच होय. कारण विलयाच्या शेवटीही विश्व, बीजरूपाने ईश्वराच्या ठायी राहे. ह्या ईश्वराचे अस्तित्व काळातीत व जाणिवांच्या अतीत आहे. असंख्य तारका समूह, आकाशगंगा देखील त्याच्या रोमरंध्रात आत बाहेर करतात, परंतु असे घडतानाही त्या रोमरंध्रांचे अस्तित्व बुजत नाही. अस्तित्त्वाच्या आणि जाणिवांच्या पातळीवरील आणि मानवेतर योनीतील अस्तित्वांना (देवदेवता यक्ष किन्नर आदी) देखील आत्मसवरूप विस्मरणरूपी पापातून मुक्त करणारा हा महात्मा आहे. ह्या महानतम सर्वेश्वराची दिव्य अशी सहस्त्रनामे तुला त्याच्याच कृपेने माझ्याकडून समजली. परमेश्वराला साक्षात्कारासाठी, प्रचीतीसाठी, चिरंतन अनुसंधानासाठी,

आत्मविस्मृतीच्या पापमुक्तीसाठी, सर्वोच्च सत्तेशी कायमचे एकरूप होण्यासाठी ही नावे अत्यंत उपयुक्त आहेत. त्यामुळे हे धर्मराजा ! हे सहस्रनामस्तोत्र वाचण्यास, सांगण्यास, चिंतन करण्यास, अभ्यास करण्यास, कीर्तन करण्यास, जप करण्यास सर्वतोपरी सर्वोत्कृष्ट आहे, हे सहस्रनामस्तोत्र पाठ करण्यास, चर्चा करण्यास, शिकण्यास त्याचा आशय समजावून घेण्यास शिकवण्यास व त्याचा आशय समजावून देण्यास सर्वोत्कृष्ट आहे.

**य इदं श्रृणुयान्नित्यं यश्चापि परिकीर्तयेत् ।**
**नाशुभं प्राप्नुयात्किंचित्सोमुत्रेह च मानवः ॥२॥**

भीष्मानी पुढे म्हटले, ''युधिष्ठिरा, ह्या सहस्रनामाच्या चिंतन, पठण श्रवणाने आत्मरूपाची (ईश्वराची) प्रचीती येते. अंतर्बाह्य स्थित्यंतर होऊन तरलतम अवस्था प्राप्त होते. आत्मसाक्षात्कार होतो. संकुचित अस्तित्वाचा व क्षुद्र सुखदुःखांचा नाश होऊन ईश्वरी अस्तित्वाशी व ईश्वरी सत्तेशी एकात्मता प्राप्त होते व अनुभवाला येते. सच्चिदानंदाचा लाभ होतो. सर्व सुखांवर सत्ता प्राप्त होते पण वखवख नष्ट होते. आत्मरूपाच्या विस्मरणाचा अनर्थ टळतो. जप करण्यास या सहस्रनामाहून श्रेष्ठ असा अन्य कोणताही मंत्र नाही.''

**वेदान्तगो ब्राह्मणः स्यात्क्षत्रियो विजयी भवेत् ।**
**वैश्यो धनसमृद्ध स्याच्छूद्रः सुखमवाप्नुयात् ॥३॥**

काळ ज्याप्रमाणे कुणासाठीही कमी किंवा अधिक असत नाही, त्याचप्रमाणे ह्या विष्णुसहस्रनाम स्तोत्राची महती सर्वांसाठी सारखीच आहे. परंतु ज्याप्रमाणे काही जणांकडून काळाचा अपव्यय केला जातो तर काही जणांकडून काळाचा सदुपयोग केला जातो त्याचप्रमाणे ब्रह्मजिज्ञासा, वीरश्री, अर्थाकांक्षा, निव्वळ सुखाची आकांक्षा इत्यादी गुणांच्या प्रादुर्भावानुसार विविध व्यक्तींना या सहस्रनामस्मरणाने वेगवेगळी फलप्राप्ती होते. असे होणे निश्चितच ईश्वरी योजना आहे. कारण अशा परस्परपोषक समतोल साधणाऱ्या विविधतेशिवाय विश्वाचे अस्तित्व आणि सुयोग्य व्यवस्थेचे निरंतरत्व अशक्य आहे. सर्वांना सारखीच फलप्राप्ती होण्याचा अट्टाहास ठेवणे स्वतःच्या क्षुल्लक देहबुद्धीच्या सापळ्यात स्वतःला अडकवून घेण्यासारखे आहे. **समानता** व **साम्याच्या** कृत्रिम सक्तीऐवजी **आत्मज्ञानजन्य विश्वात्मकता**, प्रगल्भता, सहिष्णुता, निर्भयता यांचे स्वयंस्फूर्त व उत्स्फूर्त आविष्कार हवे आहेत. समता, साम्य वगैरे कल्पनांच्या अतीत असलेली स्वात्म्यता आविष्कृत होणे आज अत्यावश्यक आणि सुयोग्य आहे. ईश्वरी कृपेने तसे होईल. ज्यांना बुद्धी कमी असेल किंवा विष्णुसहस्रनाम समजून घेणे अन्य कारणांनी जमत नसेल त्यांनी हे विष्णुसहस्रनाम इतरांकडून समजावून

घेतले तरी त्यांना आनंद प्राप्त होईल. कारण इथे पांडित्य वाढवण्याचा प्रश्न नसून उलट क्षुद्र अहंकारी अस्तित्वाचे, पोकळ तर्कशास्त्राचे व कोरड्या पांडित्याचे, उन्नयन करण्याचा प्रश्न आहे. या सहस्रनामस्तोत्राचे चिंतन, मनन, श्रवण करणाऱ्याला जर सुखप्राप्ती झाली नाही किंवा उद्वेग, अस्वस्थता वाटली तर त्याचे एकमेव कारण त्या व्यक्तीमधील देहबुद्धी, अविद्या, अहंकार, यांचा प्रचंड जोर, हेच होय. अशा परिस्थितीत त्याने याचे श्रवण पठण चिकाटीने चालू ठेवावे आणि निस्पृह व निरहंकारी व्यक्तीकडून ते समजावून घ्यावे. त्यामुळे ईश्वरी कृपा व कल्याण होईलच. या विष्णुसहस्रनामस्तोत्राने सरसकट इच्छा असो वा नसो सर्वांनी पठण मनन केलेच पाहिजे असा अट्टाहास नाही. ईश्वरी कृपेने ज्यांना ते वाचावेसे वाटेल त्यांनी ते वाचावे. (देहबुद्धीच्या जोरामुळे) ते वाचावेसे वाटत नाही त्यांनी (ईश्वरी कृपेने) जर व जेव्हां केव्हां त्यांना ते वाचावेसे वा समजावून घ्यावेसे वाटेल तेव्हाच तसे करावे. इथे प्रचीतीचा व स्वेच्छेचा प्रश्न आहे. सक्तीचा दबावाचा किंवा श्रद्धेचा नाही. विश्वकल्याणकारी क्रांती कोणत्याही अभिनिवेशातून वा आवेशातून नव्हे, बंदुकीच्या नळीतून नव्हे, तर ईश्वरी कृपेने होणाऱ्या स्वयंस्फूर्त अशा आत्मशोधातून आणि त्याच्याच कृपेने होणाऱ्या आत्मज्ञानाच्या आविष्कारातून होणार आहे. विष्णुसहस्रनामास्तोत्राच्या वाचन, मननाने, चिंतनाने असे घडेल हा त्रिकालाबाधित ईश्वरी संकेत आहे.

**धर्मार्थी प्राप्नुयाद्धर्ममर्थार्थी चार्थमाप्नुयात् ।**
**कामानवाप्नुयात्कामी प्रजार्थी चाप्नुयात्प्रजाम् ॥४॥**

या विष्णुसहस्रनामाच्या अभ्यासाने, व्यक्तीचा आडमुठेपणा संपून लीनता येते. मन ईश्वरी संकल्पाचा स्वीकार करते. ईश्वरी संकल्पानुसार त्या त्या व्यक्तीच्या द्वारे धर्मव्यवहार, अर्थव्यवहार, धर्मरक्षण व अधर्माचे पारिपत्य, न्याय्य राजकीय शासन, देहवासनापूर्तीसेवा, इत्यादी अंतिमतः लोककल्याणकारी कार्ये घडून येतात. त्या त्या कार्यामध्ये त्यांना यश प्राप्त होते.

**भक्तिमान्यःयः सदोत्थाय शुचिस्तद्नतमानसः ।**
**सहस्रं वासुदेवस्य नाम्नामेतत्प्रकीर्तयेत् ॥५॥**

(ईश्वरी कृपेने) भक्तीमान पुरुषाने, (ईश्वराची प्रचीती आणि त्याच्या प्रेम व भक्तीची अनुभुती घेतलेल्या पुरुषाने) पवित्र अंतःकरणाने (कोणत्याही संकुचित स्वार्थाचा, हेतूचा लवलेशही मनात न ठेवता संपूर्ण समर्पण भावनेने) वासुदेव मूर्तीचे चिंतन करून(संकुचित व्यक्तिमत्व, अविद्या,देहबुद्धी यांचा प्रभाव दूर करून) सद्गदित मनाने (निरासक्त निष्पाप प्रेमभरित मनाने) श्री वासुदेवाचे (विष्णुचे) हे सहस्रनामस्तोत्र जर विविध मार्गानी (कीर्तनादी) इतराना समजावून सांगितले तर त्याला:-

**यशः प्राप्नोति विपुलं ज्ञातिप्राधान्यमेव च ।**
**अचलां श्रियमाप्नोति श्रेयः प्राप्नोत्यनुत्तमम् ॥६॥**

(ईश्वरी संकल्पानुरूप त्याच्या हातून घडणाऱ्या कार्याला) यश प्राप्त होईल. तसेच संबंधित जनसमुदायांमध्ये (त्या जनसमुदायांचे कल्याण साध्य करणारे) अध्यात्मिक, वैचारिक व व्यावहारिक नेतृत्व व महत्त्व प्राप्त होईल आणि आत्मज्ञानरूपी कल्याणकारी सत्ता व ऐश्वर्य (जे सर्व कल्याणकारी ऐर्श्वयामध्ये सर्वश्रेष्ठ आहे) प्राप्त होईल.

**न भयं क्वचिदाप्नोति वीर्यं तेजश्च विन्दति ।**
**भवत्यरोगो द्युतिमान्बलरूपगुणान्वितः ॥७॥**

हे सहस्रनाम नियमित ऐकल्याने, वाचल्याने, म्हटल्याने, समजावून घेतल्याने, पुनः पुन्हा चिंतनात-विचारात-मननात-स्मरणात आणल्याने, दुसऱ्यास समजावल्या आत्मरूपविस्मरण होण्यापासून व अविद्याजन्य दुःख, खेद, दुबळेपणा, असहायता, चिंता, भीती, मत्सर, वैफल्य इत्यादींपासून मुक्तता प्राप्त होते. त्याचप्रमाणे असे करणारा अंतर्बाह्य शुद्ध, विश्वासात्मक, उदात्त, तेजस्वी, ओजस्वी, निस्पृह, निर्भय, न्यायी, सामर्थ्यवान ज्ञानसंपन्न आणि वीर्यवान होतो.

**रोगार्तो मुच्यते रोगाद्बद्धो मुच्येत बंधनात् ।**
**भयान्मुच्येत भीतस्तु मुच्येतापन्न आपदः ॥८॥**

(हे विष्णुसहस्रनाम मनःपूर्वक लक्ष देऊन वाचल्यास आत्मा, बुद्धी, मन, अहंकार, शरीर, बाह्य भौतिक परिस्थिती यांमध्ये संतुलन, सुनियंत्रितता, सुसंबद्धता, सुसूत्रता, निर्माण होऊन) रोग (रोगजन्य दुःखे), बद्धता, (देहबुद्धी, अविद्या-माया यामुळे व रज आणि तमोगुणामुळे प्राप्त होणारी गुलामी), भय (देहबुद्धी व अविद्येमुळे उत्पन्न होणाऱ्या भ्रमापासून उत्पन्न होणारे), यांपासून सुटका होते. तसेच आत्मसाक्षात्कारामुळे व्यक्तीच्या बाह्यपरिस्थितीवर परिणाम होऊन आपत्तीमध्ये खितपत पडणाऱ्यांचे संपूर्ण जीवन आत्मज्ञानाभिमुख व वैभव आणि प्रगल्भतेने परिपूर्ण बनते.

**दुर्गाण्यतितर त्याशु पुरुषः पुरुषोत्तमम् ।**
**स्तुवन्नामसहस्रेण नित्यं भक्तिसमन्वितः ॥९॥**

निरंतर निरलसतेने भक्तिभावपूर्वक जर या विष्णुसहस्रनामाचे श्रवण-कीर्तन केले तर हृदयांतर्यामीच्या सच्चिदानंद पुरुषोत्तमाकडे कायमचा आश्रय मिळतो आणि अशी प्रचीती येते. यामुळे आत्मविस्मरण घडवून आणणाऱ्या सर्व संकटातही आत्मरूपाचा (ईश्वराचा) विसर न पडण्याचे मोठेच व परमानंददायी यश प्राप्त होते.

**वासुदेवाश्रयो मर्त्यो वासुदेवपरायणः ।**
**सर्वपापविशुद्धात्मा याति ब्रह्म सनातनम् ॥१०॥**

(वासुदेवाच्या कृपेने) वासुदेवास पूर्णतया शरण जाऊन (अहंकाराचा त्याग करून) वासुदेवाप्रीत्यर्थ (ईश्वराची सेवा म्हणून) वासुदेवाची कर्मे (ईश्वरी संकल्पानुरूप कार्य) करणारा वासुदेवमय झालेला (सगुणाचा दासानुदास झालेला) माणूस अविद्याजन्य वासनांपासून मुक्त होऊन शाश्वत, स्थित्यंतरातीत, अवैयक्तिक, नियंत्रक,तरलतम स्थळकाळातीत, सर्वसमावेशक असे जे ब्रह्म त्या ब्रह्मस्वरूपी अढळतेने चिरकाल स्थिर होतो.

**न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित् ।**
**जन्ममृत्युजराव्याधिभयं नैवोपजायते ॥११॥**

वासुदेवाचे जे भक्त झाले त्यांचे कधीही कांहीही अशुभ होत नाही. जन्म, मृत्यू, वार्धक्य, रोग भीती इत्यादी कोणतीही अशुभ बाब भक्ताच्या स्थळ काळातीत, शुभाशुभातीत, अजरामर अस्तित्वापर्यंत कधीही पोचू शकत नाहीत.

**इमं स्तवमधीयानः श्रद्धाभक्तिसमान्वितः ।**
**युज्येतात्मा सुखक्षान्तिश्रीधृतिस्मृतिकीर्तिभिः ॥१२॥**

या सहस्त्रनामाच्या वारंवार, नियमित, सतत पठणाने, श्रवणाने व हे समजावून घेण्याने व्यक्ती हळु हळु संकुचित, क्षणभंगुर, क्षुद्र, देहबुद्धीजन्य विचार-भावना-वासना-आचार यातून मुक्त होऊन अधिकाधिक प्रमाणात सर्वसमावेशक ईश्वराशी निगडित होत जातात व ईश्वरी सामर्थ्याने परिपूर्ण होऊन निरंतर भगवत्स्मरणात (आत्मज्ञान - आत्मानुसंधान) राहू लागतात. ह्यामुळे त्यांचे प्रज्ञाचक्षु उघडत जाऊन आत्मरूपाचा त्यांना वाढता प्रत्यय येऊ लागतो ते, आत्मानंद, धैर्य, आत्मज्ञानाचे चिरंतन सर्वश्रेष्ठ सत्तात्मक वैभव, शाश्वत सुख आणि तज्जन्य लोकोत्तर कार्यामुळे मिळणारी सत्कीर्ति (कोणतीही खोटी प्रसिद्धी न करता, त्यांच्या प्रत्येक कृतीचा ईष्ट परिणाम झालेला प्रत्यक्ष दिसल्याने किंवा त्यांच्या शब्दातील सत्याचा निःसंशय पडताळा आल्याने उत्स्फूर्तपणे केली जाणारी प्रशंसा, कदर) यानी परिपूर्ण होतात.

**न क्रोधो न च मात्सर्यं न लाभो नाशुभाः मतिः ।**
**भवन्ति कृतपुण्यानां भक्तानां पुरुषोत्तमे ॥१३॥**

क्रोध, मत्सर, लोभ, दुसऱ्याला(विनाकारण किंवा स्वार्थांधतेने) छळण्याची, लुबाडण्याची दुष्ट बुद्धी यापैकी काहीही भगवत्स्वरूप झालेल्या भक्तांच्या हृदयात उत्पन्न होत नाही. (त्यांच्या कल्याणकारी जीवनातून विश्वकल्याणकारी क्रांती आविष्कृत होते.)

**द्यौः सचन्द्रार्कनक्षत्रा खं दिशो भूर्महोदधिः ।**
**वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः ॥१४॥**

युधिष्ठिरा, ज्याचे हे सहस्रनामस्तोत्र तुला सांगितले तो, चंद्र, सूर्य, नक्षत्रे, आकाश, दिशा, पृथ्वी, समुद्र, काळ, जाणीव इत्यादी सर्व काही (एकात्म ज्ञानाने व सर्वश्रेष्ठ सत्तेने) सुयोग्य पद्धतीने नियंत्रित करणारा सर्वश्रेष्ठ परमात्मा व सर्वश्रेष्ठ महावीर वासुदेव होय.

**ससुरासुरगंधर्वं सयक्षोरगराक्षसम् ।**
**जगद्वशे वर्ततेदं कृष्णस्य सचराचरम् ॥१५॥**

ज्याचे हे सहस्रनाम आहे तो म्हणजे अस्तित्वाच्या व जाणिवांच्या सर्व पातळ्यांवरील सर्व योनी (देव, दैत्य, गंधर्व, यक्ष, राक्षस, सर्प वगैरे) ज्याच्या स्वाधीन आहेत असा भगवान श्रीकृष्ण होय.

**इंद्रियाणि मनो बुद्धिः सत्वं तेजो बलं धृति ।**
**वासुदेवात्मकान्याहुः क्षेत्रं क्षेत्रज्ञ एव च ॥१६॥**

पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेद्रिये, मन, बुद्धी, सत्व, धैर्य,बल, (चित्त, अहंकार, सत्व-रज-तम गुण, पंचमहाभूतात्मक) शरीर व हे सर्व जाणणारा जीवात्मा म्हणजेच क्षेत्रज्ञ हे सर्व काही वासुदवाचेच रूप (अविष्कार) आहे. (याचे चिंतन (सत्य चिंतन) श्रेयस्कर आहे.)

**सर्वांगमानामाचारः प्रथमं परिकल्पते ।**
**आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः ॥१७॥**

सर्व वेदशास्त्राचे व आत्मज्ञानमार्गदर्शक ग्रंथांचे, उक्तींचे, शिकवणींचे सर्वश्रेष्ठ सार किंवा धर्माचा प्रमुख सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे भगन्नामस्मरण आणि संकीर्तन होय. अशा भगन्नामस्मरण संकीर्तनरूपी धर्माचा स्वामी म्हणजेच (आत्मरूपी) अच्युत होय. आत्मज्ञानी लोकांची (वेदशास्त्रकर्ते) शिकवण नामस्मरण. नामस्मरणाचा स्वामी, (आत्मरूप) अच्युत. नामस्मरणाची परिणती अच्युत कृपा व अच्युत प्राप्ती, शाश्वत (आत्मज्ञानपूर्ण स्थिती), आत्मज्ञानाची परिणती उत्तम आचार म्हणजेच अध्ययन, अध्यापन, नाम-संकीर्तन त्याचा परिणाम जगत्कल्याण. विष्णुसहस्रनामाचे हे अनन्यसाधारण व संशयातीत महत्त्व आहे.

**ऋषयः पितरो देवा महाभूतानि धातवः ।**
**जंगमाजंगमं चेदं जगन्नारायणोद्‌भवम् ॥१८॥**

ऋषी, पितर (पूर्वज), पंचमहाभूते, (पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश) सात धातु (रस,रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र), चराचर, सजीव, निर्जीव, हे सर्व (तसेच जाणिवेच्या सर्व पातळ्या व काळ देखील) नारायणापासून उत्पन्न झालेले आहे, नारायणस्वरूप आहे आणि नारायणात्मकही (त्याचा आत्मा स्थित्यंतरातीत नारायण

आहे.) आहे.

**योगो ज्ञानं तथा सांख्यं विद्याः शिल्पादिकर्म च ।**
**वेदाः शास्त्राणि विज्ञानमेतसर्वं जनार्दनात् ॥१९॥**

अष्टांग, षडांग किंवा सप्तांग योग, आत्मानात्म, सारासार, चिरंतन-क्षणभंगुर यांचा विचार व ज्ञान, सांख्य तत्त्वज्ञान, आत्मसाक्षात्कार, आत्मसाक्षात्काराच्या विविध मार्गांचे प्रचीतीपूर्ण विवरण, शिल्पकलेसारख्या कला, विश्वाचे सम्यक् ज्ञान आकलन करण्याच्या विविध पद्धती व ज्ञान प्रक्रिया व ज्ञान-विज्ञान हे सर्व काही जनार्दनापासून (श्रीकृष्ण) विष्णूपासून उद्‌भवते, विष्णूच्या सत्तेखाली असते.

**एको विष्णुर्महद्‌भूतं पृथग्भूतान्यनेकशः ।**
**त्रीलोकान्व्याप्य भूतात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः ॥२०॥**

विष्णू हे एकच मूळ महाभूत असून त्यापासून अनेकविध तऱ्हानी अनेक भूते तयार झाली. जाणिवेच्या सर्व पातळ्यांना (तिन्ही लोकाना) व्यापणाऱ्या ह्या भूतात्मक विश्वाचा आत्मत्वाने उपभोग घेणारा एकमेव अविनाशी स्थित्यंतरातीत आत्मा विष्णू आहे.

**इमं स्तवं भगवतो विष्णोर्व्यासेन कीर्तितम् ।**
**पठेद्य इच्छेत्पुरुषः श्रेयः प्राप्तुं सुखानि च ॥२१॥**

सर्व विश्व व्यापणाऱ्या व सामावणाऱ्या विश्वपती विष्णूचे हे सहस्त्रनाम (श्रीवेदव्यासानी सांगितले असून) स्वतःच्या व विश्वाच्या सर्वश्रेष्ठ शाश्वत सुखाची आणि परमोच्च कल्याणाची (ईश्वरप्राप्ती/आत्मसाक्षात्कार) इच्छा असणाऱ्यांनी नित्यनेमाने परिशीलन करावे.

**विश्वेश्वरमजं देवं जगतः प्रभवाप्ययम् ।**
**भजन्ति ये पुष्कराक्षं न ते यान्ति पराभवम् ॥२२॥**

साऱ्या विश्वाची उत्पत्ति-स्थिती-विनाश ज्यापासूनआहे, तसेच सृजनशील महाप्रेरणेचा (ब्रह्मदेवाचा) जो पिता आहे, जन्मदाता आहे, तसेच जन्मरहित, ज्ञानप्रकाशमय व चिदाकाशरूपी डोळे असलेला असा जो शाश्वत व स्थित्यंतरातीत ईश्वर आहे त्याचे स्मरण, चिंतन, भजन, कीर्तन करणारे भगवंतमय होतात. त्याना अन्य गती प्राप्ती होत नाही.

**अर्जुन उवाच ।**

**पद्‌मपत्रविशालाक्ष पद्‌मनाभ सुरोत्तम ।**
**भक्तानामनुरक्ताम् त्राता भव जनार्दन ॥२३॥**

भीष्मानी युधिष्ठिराला पुढे म्हटले, ''कृष्णार्जुन संवादामध्ये अर्जुन म्हणाला, ''कमलदलासारखे नेत्र असलेल्या, भक्तांवर कृपा करणाऱ्या देवाधिदेवा, पद्मनाभा, (देहबुद्धी-अविद्या-माया-अज्ञान-मोहापासून) माझे कृपया रक्षण कर.''

**श्री भगवानुवाच ।**

**यो मां नामसहस्रेण स्तोतुमिच्छति पांडव ।**
**सोऽहमेकेन श्लोकेन स्तुत एव न संशयः ॥२४॥**

''तेव्हा अर्जुनाला उद्देषून श्रीकृष्ण उत्तरले, ''या सहस्रनामानी माझी स्तुती करू इच्छिणाऱ्याने पुढे दिलेला एक श्लोक सतत म्हटला तरी त्याची स्तुती (भक्ती), (त्याचा कुटस्थ परमात्मा असलेल्या) माझ्यापर्यंत पोचते.'' भगवान श्रीकृष्णानी जो श्लोक सांगितला तो असा:

**प्रभोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये ।**
**सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।**
**सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते ।**
**सहस्रकोटीयुगधारिणे नमः ॥२५॥**

''सहस्रावधी आकार-प्रकारांनी (मूर्तीनी) आविष्कृत होणाऱ्या, संपूर्ण विश्वातील चराचरात्मक व सजीवांच्या अंगोपांगात्मक (सहस्रावधी पाय डोकी, बाहू व नाव) असलेल्या व सहस्रकोटी युगांचा उद्गाता, धारणकर्ता, व नियंता असलेल्या (स्थित्यंतरातीत शाश्वत) परमश्रेष्ठ आदिपुरुष अनंताला पुन्हा पन्हा नमस्कार असोत.'' त्या श्लोकाच्या पुढे भगवंताच्या स्तुतीपर काय म्हणावे हे भीष्म सांगतात.

**नमः कमलनाभाय नमस्ते जलशायिने ।**
**नमस्ते केशवानन्त वासुदेव नमोऽस्तुते ॥२६॥**

नाभीमध्ये कमळ असून पाण्यातील शेषावर पहुडलेला अशा (सगुण रूपातील) तुला, हे केशवा, वासुदेवा, अनंता पुन्हा पुन्हा नमन असो.

**वासनाद्वासुदेवस्य वासितं भुवनत्रयम् ।**
**सर्वभूतनिवासोऽसि वासुदेव नमोऽस्तुते ॥२६॥**

जाणिवेच्या सर्व स्तरांसकट संपूर्ण चराचर विश्व केवळ वासुदेवाच्यामुळे, वासुदेवाच्या इच्छेमुळे अस्तित्वात आहे. सर्व अस्तित्वाच्या अंतर्बाह्य सर्वत्र असणाऱ्या वासुदेवाला साष्टांग प्रणिपात असोत. भीष्माचार्य पुढे म्हणतात :

**नमो ब्रम्हण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च ।**
**जगाद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः ॥२८॥**

ब्रह्म, ब्रह्मज्ञ व ब्रह्मस्थ, गाई, पृथ्वी यांच्या व विश्वाच्या हिताप्रीत्यर्थ कृष्णाला, गोविंदाला साष्टांग नमस्कार असोत. भीष्म युधिष्ठिराला विष्णूचे सर्वोच्च महत्त्व समजावताना पुढे म्हणतात :

**आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।**
**सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥२९॥**

आकाशातून सर्वत्र पडणारे पाणी जसे समुद्राना मिळते त्याचप्रमाणे सर्व देवांना केलेला नमस्कार (कोणत्याही पूजा पद्धतीने केला तरी) एकमेवाद्वितीय केशवाला पोचतो.

**एवं निष्कण्टकः पन्था यत्र संपूज्यते हरिः ।**
**कुपथं तं विजानीयाद्गोविंदरहितागमम् ॥३०॥**

ह्या निष्कंटक मार्गाने हरीची (आत्मरूप ईश्वराची) पूजा करणारे सर्व तऱ्हेच्या कुमार्गावर विजय मिळवून (ईश्वरी कृपेने) चिरंतन हितमय गोविंदात (ईश्वरात-शाश्वत सच्चिदानंदात) जिवंतपणी विलीन होतात.

**सर्ववेदेषु यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलम् ।**
**तत्फलं समवाप्नोति स्तुत्वा देवं जनार्दनम् ॥३१॥**

वेदांचे (शास्त्रे-दर्शने) परिशीलन, तीर्थयात्रा यांपासून जे फळ मिळते (आत्मज्ञान) ते सर्व (आत्मसाक्षात्कार) जनार्दनाच्या (कूटस्थ ईश्वराच्या-आत्मरूपाच्या) स्मरणाने, स्तुतीने व भक्तीने प्राप्त होते.

**यो नरः पठते नित्यम् त्रिकालं केशवालये ।**
**द्विकालमेककालं वा क्रूरं सर्वं व्यपोहति ॥३२॥**

जो कुणी हे सहस्रनाम रोज तीनदा, दोनदा किंवा एकदा सगुण मूर्तीच्या सन्निध (सगुणोपासनेचा आधार घेऊन) म्हणेल तो सर्व भयंकर अरिष्टांपासून सुरक्षित राहील. (कारण आत्मरूपी स्थिर झालेल्या व्यक्तीचे अस्तित्व स्थलकालातीत सामर्थ्य असलेले असे असते.) अशा अस्तित्वाकडे येणारी/आलेली सर्व भयानक संकटे (मातीचे ढेकूळ खडकावर फुटावे त्याप्रमाणे) चक्काचूर होऊन जातात.

**दह्यन्ते रिपवस्तस्य सौम्याः सर्वे सदा ग्रहाः ।**
**विलीयन्ते च पापानि स्तवे ह्यस्मिन् प्रकीर्तिते ॥३३॥**

ह्या विष्णूसहस्रनामाच्या स्तवनाने अंतर्बाह्य सर्व शत्रू (अविद्या-माया-देहबुद्धी-दुष्ट शक्ती) जळून जात. सर्व वैश्विक दुष्परिणाम फारच सौम्य होतात व सर्व पापे (आत्मस्वरूप विस्मरणजन्य) नष्ट होतात, असा असंख्यांचा अनुभव आहे.

**येन ध्यातः श्रुतो येन येनायं पठ्यते स्तवः ।**
**दत्तानि सर्वदानानि सुराः सर्वे समर्चिताः ॥३४॥**

जो ह्या सहस्रनामाचे श्रवण, मनन, चिंतन, पठण, संकीर्तन करील त्याला सर्व देवदेवता त्यांचीच पूजा केल्याप्रमाणे प्रसन्न होऊन कृपा करतील. (कारण निसर्गातील सर्व प्रकारच्या शक्ती आत्मरूप ईश्वराच्या अधीन आहेत.) भीष्मानी पुढे म्हटले, ''श्रीकृष्णभगवान अर्जुनाला म्हणाने:

**इह लोके परे वापि न भयं विद्यते क्वचित ॥**
**नाम्नां सहस्रं योऽधीते द्वादश्यां मम सन्निधौ ॥३५॥**

द्वादशीलाजो माझ्या नजीक राहून (माझ्या चिंतनामध्ये, समर्पण भावनेने) या सहस्रनामाचे ध्यान करील त्याला जाणिवेच्या व अस्तित्वाच्या कोणत्याही पातळीवर (तो अमर आणि सर्व सामर्थ्यवान बनल्यामुळे) कोणतीही भीती संभवत नाही.

**शनैर्दहति पापानि कल्पकोटिशतानि च ।**
**अश्वत्थसन्निधौ पार्थ ध्यात्वा मनसि केशवम् ॥३६॥**

(अर्जुना), अश्वत्थ वृक्षाखाली बसून केशवाचे (माझे) चिंतन करणाऱ्याची कोट्यवधी पापे (अविद्याजन्य/आत्मविस्मरणजन्य) हळू हळू नष्ट होतात. द्वादशी, ग्रहांचे परिणाम, गाईचे महत्त्व, अश्वत्थ वृक्षाचे मनुष्यावरील परिणाम हे सर्व वैज्ञानिक पद्धतीनी आणि देहबुद्धीच्या अतीत जाऊन डोळस वृत्तीने अभ्यासायचे, अनुभवायचे विषय आहेत.)

**पठेन्नामसहस्रं तु गवां कोटिफलं लभेत् ।**
**शिवालये पठेन्नित्यं तुलसीवनसंस्थितः ॥३७॥**

तुळशीच्या वनातील शिवालयामध्ये या सहस्रनामाचे पठण करणाऱ्याला कोटी कोटी गाईदान केल्याचे पुण्य मिळते. मथितार्थ तुळशीचे महत्त्व ठसवण्याचा आहे, तसेच गाईदान याचा अर्थ मोठ्यात मोठा त्याग जो संकुचित (देहबुद्धी-अविद्याजन्य) अस्तित्वाच्या बेड्या तोडण्यामध्ये अत्यंत महत्त्वाचा असतो. त्याप्रमाणे आत्मसाक्षात्काराचे फळ सहस्रनामस्तोत्राचे पठणाने मिळते हे ठसवण्याचे आहे. (तुळस, बेल इत्यादींचा वातावरणातील परिणाम हे काही प्रमाणात प्रयोगसिद्ध आहेत पण देहबुद्धीच्या अतीत जाऊनच त्यांचे खरे प्रचीतीपूर्ण ज्ञान होऊ शकेल.) भीष्म युधिष्ठिराला म्हणाले:

**नरो मुक्तिमवाप्नोति चक्रपाणेर्वचो यथा ।**
**ब्रह्महत्यादिकं घोरं सर्वपापं विनश्यति ॥३८॥**

श्रीकृष्णानी म्हटल्याप्रमाणे जाणिवेच्या सर्वात खालच्या पातळीवर असलेल्या

संकुचित-अविद्यापूर्ण-देहबुद्धीपूर्ण व्यक्तीलाही या सहस्त्रनामपठणाने ''मुक्ती म्हणजेच खरे स्वातंत्र्य मिळते.'' तसेच

**विलयं यान्ति पापानि चान्यपापस्य का कथा ।**
**सर्वपापविनिर्मुक्तो विष्णुलोकं स गच्छति ॥३९॥**

अशा तऱ्हेने सर्व पापांपासून (आत्मविस्मृतीजन्य) मुक्ती मिळून सहस्त्रनाम पठण, मनन चिंतन, कीर्तन करणारा विष्णुलोकाला जातो-भगवत्स्वरूप होतो.''

**(इति श्रीमन्महाभारते शतसाह स्त्र्यां संहितायां वैय्यासिक्यामानुशासनिके पर्वणि दानधर्मेषु भीष्मयुधिष्ठिर संवादे श्राविष्णोंदिव्यसहस्रनामस्तोत्रम् संपूर्णं श्रीकृष्णार्पणमस्तु.)**

श्री महाभारतांतर्गत-भीष्मयुधिष्ठिरांच्या संवादातले श्री विष्णूचे दिव्य सहस्त्रनाम स्तोत्र संपूर्ण झाले ते परमात्मा श्रीकृष्णाला अर्पण असो.